१६२४
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
वा. नं. २८०

REFBK-0002553
REFBK-0002553

वा. इ. २८०
ता.

मराठी
वा. इं. २८०
ता.
ठाणे

# वऱ्हाडचा इतिहास

इ. नं. ३

लेखक
यादव माधव काळे, बी. ए. एल्. एल्. बी.
मध्यप्रांताच्या कायदेकौन्सिलाचें मेंबर,
भारत इतिहास संशोधक मंडळाचे सभासद.

२५५३

REFBK-0002553
REFBK-0002553

किंमत तीन रुपये.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर.
" जगद्धितेच्छु प्रेस," ५०७ शनवार पुणें.
प्रकाशकः—यादव माधव काळे, वकील.
बुलडाणे, वऱ्हाड.

वा.इ. नं. २२०

# अर्पणपत्र

श्रीमंत राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले, नागपुरकर
यांस त्यांच्या इतिहासप्रेमाबद्दल
हा ग्रंथ अर्पण केला आहे.

ग्रंथकार

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर.
" जगद्धितेच्छु प्रेस," ५०७ शनवार पुणें.
प्रकाशकः—यादव माधव काळे, वकील.
बुलडाणे, वऱ्हाड.

ना.इ. नं. २२०.
ता. ..... ...

# अर्पणपत्र

श्रीमंत राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले, नागपुरकर
यांस त्यांच्या इतिहासप्रेमाबद्दल
हा ग्रंथ अर्पण केला आहे.

ग्रंथकार

# प्रस्तावना.

वऱ्हाडाचे इतिहासाचा पहिला भाग प्रस्तुत लेखकानें इ. स. १९०५ मध्यें प्रसिद्ध केला. त्यांत प्राचीन काळाचा इतिहास आला आहे. त्या लहानशा चोपड्याचा स्वीकार वऱ्हाडांतील बहुतेक लोकांनीं सहानुभूतिपर केला. पुष्कळशा विद्वान् लोकांनीं लेखकास उत्तेजन यावें म्हणून त्या भागाची बरीच तारीफ केली व पुढील भाग लिहिण्याचा आग्रह केला.

भिन्न व्यवसायामुळें म्हणण्यासारखा वेळ मिळेना व साधनांची सोय मुळींच नाहीं, अशा स्थितींत हें काम बरेंच मागें पडलें. पुष्कळ मित्रांच्या व इतर रसिकांच्या टोंचण्या सुरू झाल्या. रा. अच्युतराव साठे एम्. ए. एल्एल् बी. यांनीं तर शेवटीं सांगितलें कीं " जी कांहीं माहिती जमविली असेल, ती एकाद्या मासिकांतून तरी छापून टाका. " शेवटीं सदरहू काम यथाशक्ति व यथामति पुरें करून लोकांपुढें ठेवलें आहे.

अर्वाचीन काळांत वऱ्हाडांत स्वतंत्र राज्य बहुतेक झालेंच नाहीं. राजधानी दूर असून सुभेदारांनीं राज्य चालवावें अशी स्थिति नेहमीं होती. शेवटीं शेवटीं निजामाचे कारकीर्दींत तर वऱ्हाडचा मक्ता कंत्राटदारास हरासपुकारीप्रमाणें देण्यांत येत असे. त्यावरून अद्यापहि वऱ्हाडास " बावनवऱ्हाड " असें दूरवर नांव पडलें आहे. मक्तेदार वऱ्हाडची व्यवस्था कशी ठेवित असेल याची कल्पना वाचकांना करतां येईलच.

याप्रमाणें वऱ्हाड हा संपन्न देश असूनहि दुर्दैवीच राहिला. नेहमीं स्वाऱ्या, लुटालुटी यांच्या दंग्यांत कागदपत्र नाहींसे झाले. इंग्रजी अमलाच्या सुरवातीस जे कांहीं कागदपत्र मिळण्यासारखें होते तेहि जमविण्याचा कोणीं प्रयत्न केला नाहीं. त्यामुळें अनास्थेनें बाकीचे कागदपत्र व इतर साधनें नाहींशीं झालीं. खुद्द वऱ्हाडांतील लोक शिकून त्यांच्या मनांत या आधुनिक कर्तव्याची कल्पना देण्यास उशीर लागला. शिकलेले लोक बाहेरून वऱ्हाडांत पुष्कळ आले परंतु ते निवळ धंद्यानिमित्त आलेले, त्यांना त्यांचें हें खास कर्तव्य असें वाटण्यासारखें नव्हतेंच. तरी

कावतकर, वामनराव ओक वगैरे लोकांनीं एका दिशेनें कांहीं प्रयत्न केला व अलीकडे अच्युतराव साठे वगैरे गृहस्थांनीं काव्यप्रकाशनाच्या कामीं निरपेक्ष काम केलें.

उमरावतीचे रा० लक्ष्मणराव डोळे यांनीं व त्यांच्या मित्रमंडळीनें कांहीं साधनें जमविलीं होतीं असें म्हणतात, परंतु शेवटीं त्यांनीं जमविलेल्या साधनांचा लाभ प्रस्तुत लेखकास झाला नाहीं.

माहिती मिळविण्याकरितां जितकें हिंडावयास पाहिजे होतें तितकें लेखकाच्यानें झालें नाहीं, त्यामुळेंहि पुस्तकांत पुष्कळ कमीपणा राहिला असेल. पत्रोपत्रीं अशीं कामें होत नाहींत हा अनुभव आहे. वाशीमचे काळू व मलकापूरचे राजे नेमिवंत यांच्या माहितीकरितां त्या त्या घराण्यांतलि सद्‌गृहस्थांना पत्रें पाठविलीं परंतु उत्तर नाहीं. देऊळगांवकर राजे दत्ताजीराव जाधवराव, अडगांवकर राजे अमृतराव व राजे उदाराम घराण्यांतलि पुरुषोत्तम जगजीवनराव देऊळगांवचे नानासावजी लाड यांनीं मात्र शक्य ती माहिती आनंदानें दिली.

इतक्या अडचणींतून शक्य ती माहिती गोळा करून वाचकांपुढें ठेवली आहे.

पहिल्या भागांत वऱ्हाडचे स्वाभाविक विभाग व एकंदरींत देशवर्णन दिलें आहे. हल्लींच्या चिमुकल्या वऱ्हांडात राहणाऱ्या लोकांस याची विशेष जरूरी आहे असें वाटणार नाहीं. परंतु वऱ्हाडाबाहेरील लोकांस पुढील भाग जास्त चांगल्या तऱ्हेनें समजण्यास या माहितीचा उपयोग होईल, व सशास्त्र इतिहास पद्धतीस व पुस्तक स्वयंपूर्ण करण्यास हा भाग आवश्यक आहे. वऱ्हाडाबाहेरील लोकांस एरव्हीं "वऱ्हाड" व "घाट" हे शब्द चागलेसे कळले नसते.

दुसऱ्या भागांत पौराणिक काळाचा सर्व इतिहास दिला आहे. वऱ्हाडच्या इतिहासांत हाच काल जास्त उज्वल आहे. निदान दक्षिणेंत तरी वऱ्हाडाइतका उज्वल इतिहास दुसऱ्या प्रांताचा नाहीं. सर्व महाराष्ट्राचें मूळ वऱ्हाडांत आहे. सर्व महाराष्ट्राची मातृभूमि वऱ्हाड आहे. वऱ्हाडांतून सर्व महाराष्ट्रीय दक्षिणेस पैठणापर्यंत व पश्चिमेस समुद्रापर्यंत गेले. हल्लीं पुणें प्रांतांतून वऱ्हाडांत येणारे महाराष्ट्रीय आपण परप्रांतांत

आलों असें समजतात. वास्तविक तसें नसून ते परत आपल्या मूळदेशीं, माहेरीं, परत आलेले आहेत व मुख्य माहेराचा त्यांना अभिमान वाटला पाहिजे. कुंडिनपुरासारख्या अत्यंत प्राचीन शहराचें अस्तित्व त्याच नांवानें वऱ्हाडांत असतां महाराष्ट्राच्या गाभ्यांत, पुण्यांत, तें प्राचीन शहर बेदराच्या जवळपास कोठें असावें असे तर्क विद्वान् लोकांत चालतात हें आश्चर्य आहे. याचें मूळ वरील लोकांच्या अनास्थेंत आहे. पुण्याकडील विद्वान् " महाराष्ट्र व वऱ्हाड " असें म्हणताना वऱ्हाडाची गणना महाराष्ट्रा बाहेर करतात असा भास होतो. याचें कारण महाराष्ट्राच्या त्या भागास हल्लीं वऱ्हाडापेक्षां जास्त महत्त्व राजकारणामुळें आलें आहे वास्तविक वऱ्हाडांत महाराष्ट्रीयत्व कमी नाहीं, उलट जास्त आहे. परंतु राज्यव्यवस्थेच्या भिन्नपणामुळें ही वृत्ति साहाजिकपणें उत्पन्न होते. राजकीय महत्त्वाच्या मागें सर्वच महत्त्व धांवत सुटतें. प्राचीन काळच्या कुंडिनपूर; भोजकटाचें सर्व ऐश्वर्य मध्यकाळीं पैठण देवगिरीकडे गेलें व अर्वाचीन कालीं सर्व महाराष्ट्राचें महत्त्व पुण्या मुंबईस गेलें. ह्या ऐतिहासिक कालाच्या पायऱ्या आहेत.

पूर्वी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतील तिसरा, चौथा व पांचवा भाग यांत धार्मिक व सामाजिक स्थिति, वऱ्हाडांतील मराठी भाषेवरील विचार व वऱ्हाडांतील जुन्या इमारती यांचें वर्णन होतें. या विषयावर सर्वकालीन परिस्थितीचा परिणाम झाला आहे सबब सदरहू सर्व कालाचा इतिहास आल्यानंतर त्या कारकीर्दींचा उमटलेला दृश्य परिणाम लिहिणें ज्यास्त योग्य वाटल्यावरून हल्लीं हे भाग शेवटीं भाग ११ ते १४ म्हणून घातले आहेत. यांत कालाचा अनुक्रमहि साधला व या भागांतील विचार पूर्वींचे भाग वाचल्यानंतरच वाचकांस चांगले पटतील. कारण देशांतील सामाजिक स्थिति, पूर्वींच्या निरनिराळ्या कालखंडाचे निरनिराळे ठसे उमटून, त्यांचा संयुक्त परिणाम म्हणून बनलेली असते. धार्मिक परिस्थितीचाहि कांहीं प्रमाणांत हाच प्रकार. राजकीय परिस्थितीसही न जुमानणाऱ्या हिंदु धर्मावरहि तिचा थोडासा परिणाम झालाच आहे; हें भाग १२ मध्यें दिसून येईल व त्यांतील कांहीं गोष्टी वाचकांस मनोरंजक वाटतील. हा प्रकार थोड्या बहुत अंशानें सर्व महाराष्ट्रासहि

वऱ्हाडांतील मराठी भाषेसंबंधाचे कांहीं विचार सामान्य वाचकांस चमत्कारिक वाटतील. परंतु तो भाग व्यवहार्य दृष्टीनें लिहिला नसून ऐतिहासिक दृष्टीनें लिहिला आहे. या दृष्टीनें वाचक वाचतील तर त्यांनाहि त्यांत मनोरंजक प्रकार सांपडतील. त्यापेक्षां वरच्या दर्जाचे वाचक तर त्याकडे योग्य दृष्टीनें पाहतीलच, परंतु त्याचा विशेष सूक्ष्म व शास्त्रीय दृष्टीनेंहि विचार करतील. त्याच विचाराचा विस्तृत लेख प्रस्तुत लेखकानें मराठी शुद्धलेखनाच्या दुरुस्तीच्या बाबटळींत कोल्हापूरच्या ग्रंथमाला मासिकांत छापला होता, व त्याच्या दुसऱ्याच अंकांत विद्वन्मणि कै. मोरो केशव दामले यांचाहि त्याच विषयावर लेख आला होता. त्यांनीं प्रस्तुक लेखकाचे लेखाचा सहानुभूतिपर निर्देश केला होता.

भाग ४ ते ७ यांतील मुसलमानी कारकीर्दींत विशेष मनोरंजक भाग जरी वाचकांस सांपडणार नाहीं तरी तो भाग वाचण्यांत गेलेला वेळ व्यर्थ गेला असें तरी खास त्यांना वाटणार नाहीं. हा भाग नेहमींच नीरस व क्रूर कर्मांनीं भरलेला असावयाचा. परंतु त्याहि गोष्टी माहीत असणें अवश्य आहे, इतिहास हा अत्यंत कठोर आहे. त्यांत आवड निवड चालत नाहीं.

भाग ८ यांतील शिवाजीच्या उदयापासून भाग पुन्हां मनोरंजक वाटूं लागेल. दिल्लीपतीची एकनिष्ठ सेवा करणाऱ्या पराक्रमी राजे उदाराम या ब्राह्मण वीरघराण्यांतील "रायबागिणी"सारख्या स्त्रीनें शिवाजी-सारख्या मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या बलाढ्य वीरांस पाणी पाजणाऱ्या मराठा राजावर स्वारी करावी यांत पुष्कळ अर्थ आहे. या घराण्याच्या वर्णनानें शिवकालीन बखरींतील एका अप्रसिद्ध व संशयित मानलेल्या भागावर लख्ख उजेड पडला आहे, असें एका इतिहासभक्तानें प्रस्तुत लेखकानें ही माहिती त्याजकडे पाठविली तेव्हां कबूल केलें आहे. या घराण्याचे वृत्त पुण्याचे भा. इतिहास संशोधक मंडळाचे १९२१ चे संमेलनाचे वेळीं प्रस्तुत लेखकानें प्रसिद्ध केलें तें मंडळानें छापलें आहे.

मराठा कारकीर्दीचा भाग एकंदरीनें सर्वप्रसिद्धच आहे. परंतु तो संकलित रीतीनें भाग ८ यांत पाहण्यास मिळेल. नागपूर भोंसल्यांचें वऱ्हाडांतील मूळ ठिकाण "राजाची भाम" हें पुष्कळ वाचकांच्या

प्रथमच दृष्टीस पडेल. कांहीं कांहीं स्थानिक लोकांस नवीन माहिती मिळेल. भाग १५ पैकीं पोटभाग ४ हा मूळ भाग ८ मध्यें यावयास पाहिजे होता परंतु विस्मृतीनें तो मजकूर राहिला, तो पुढें या रूपानें दिला आहे. तो भाग ८ यास जोडून वाचावा.

निजामाच्या कारकीर्दीचा भाग ९ यांतील मजकूर वृद्ध लोकांच्या अद्याप स्मरणांत आहे. पेंढारी व नाईक लोकांचे दंगे, मक्तेदारी पद्धतीचे दुष्परिणाम, धर्मनिष्ठ राजा चंदूलालच्या देणग्या हे प्रकार जसे स्मरणांत तसेच कागदपत्रांतहि अद्याप पहावयास सांपडतात.

भाग १० यांतील कारकीर्द फार अलीकडची, चालू काळाची म्हटली तरी चालेल. इतिहासग्रंथाचा वास्तविक तो विषय नाहीं. वर्तमानपत्रांचा व मासिकांचा विषय पुष्कळ गोष्टी वादग्रस्त व जागृत मनोविकारांचा परिणाम होऊन मतें चुकलीं असण्याचा व एकतर्फी असण्याचा संभव फार. परंतु वऱ्हाडांतील अव्वल इंग्रजी अमदानींतील मुद्दां पुष्कळ गोष्टी अप्रसिद्ध आहेत. त्या लुप्त होऊन जाण्याचाहि संभव आहे. उदाहरणार्थ वऱ्हाडांतील रयतवारी पद्धतीचा मूळ इतिहास वगैरे. तेव्हां असलेली माहिती लिहून टाकणेंच बरें वाटलें. वादग्रस्त गोष्टींचा नुसता नामनिर्देश करून दोन्ही विरुद्ध बाजू त्यांच्याच शब्दांत दिल्या आहेत. उदाहरणार्थ महार बलुतें, जहागिरदार व कुळें, इजारदार व कुळें, वऱ्हाडचें उत्पन्न व खर्च, वऱ्हाड परत निजामाचे राज्यास जोडण्याचा प्रश्न वगैरे. या प्रश्नांवर एक तर बहुजनसंमत अशींच विधानें केलीं आहेत, नाहींतर दोन्हीं पक्षांचें म्हणणें फक्त पुढें ठेवलें आहे. हाहि मोह लेखकानें आवरला असता. परंतु वरील प्रश्नांचा चांगलासा विचार करणारें प्रचलित वाङ्मय वऱ्हाडांत नाहीं व बाहेरच्या लोकांस त्यांत स्वारस्य नाहीं. परंतु होईल तोंपर्यंत एका बाजूस विशेष कल दिसूं नये असा प्रयत्न लेखकानें केला आहे.

वऱ्हाडांतील इतिहासप्रसिद्ध घराण्यांचा इतिहास भाग १५ यांत दिला आहे. एलिचपूरचे प्रसिद्ध नवाबघराण्याचा इतिहास प्रस्तुत लेखकानें वीस वर्षांपूर्वीं एलिचपूरच्या "प्रभात" नामक वर्तमानपत्रांत क्रमशः प्रसिद्ध केला. त्याची फक्त स्थानिकच प्रसिद्धी झाली होती, परंतु

त्यावेळीं लेखकाचा उद्देश मिळालेली माहिती कोठें तरी छापून पुढील कार्यकर्त्या माणसास एक साधन उपलब्ध करून ठेवण्याचा होता.

प्रसिद्ध जाधवरावांचे घराण्याचाहि थोडक्यांत इतिहास दिला आहे. त्यांचा विस्तृत इतिहास लिहिण्याचीं साधनें उपलब्ध आहेत परंतु मधील पुष्कळ सांखळ्या तुटलेल्या आहेत, व अनास्थेनें एका उत्तम घराण्याच्या इतिहासांतील मधील मधील भाग तुटून गेल्याचें हें आणखी एक उदाहरण आहे. मराठामित्रकारानें प्रयत्न केला आहे परंतु तो एकदेशीय असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं चुका झाल्या आहेत व निराधार विधानें केलीं आहेत.

राजे उदाराम, राजे नेमिवंत, काळू या घराण्यांचा इतिहास जसा मिळाला तसा दिला आहे. आणखीही घराण्यांचा इतिहास मिळण्याचा संभव आहे. समशेरबहादर आटोळे यांचें घराणें वऱ्हाडांत चिखली तालुक्यांत शेळगांव आटोळे या गांवीं आहे. त्यांचा इतिहास लेखक जमवीत आहे.

ग्याझिटियरचे धर्तीवर स्थलवर्णनात्मक सूचि परिशिष्ट २ म्हणून जोडलेली आहे. तींत संक्षेपरूपानें ऐतिहासिक, दंतकथारूप पौराणिक गोष्टी दिल्या आहेत. वरील गोष्टीपैकीं सर्वच मूळ ग्रंथांत येण्याच्या स्वरूपाच्या नसतात. बहुतेकांत अतिशयोक्ति असते. सामान्य कल्पना, सामान्य चमत्कार, इतिहासकालाचे पूर्वापर संबंधाची असंबद्धता ह्या गोष्टी त्यांत असावयाच्याच. त्यास किंमतहि तितकीच दिली पाहिजे. म्हणून त्या मूळग्रंथांत न घालतां या परिशिष्टांत घातल्या आहेत.

शेवटीं आधुनिक धर्तीवर विषयांची व नांवांची सर्वसाधारण सूचि ( Index ) दिली आहे. त्यावरून कोणती माहिती कोणत्या पानावर आहे हें चटकन् सांपडेल. ही सूचि रा० दिगंबर श्रीकृष्ण देशपांडे बी. ए. एल्. एल्. बी. व जनार्दन श्रीकृष्ण देशपांडे एम्. ए. या विद्वान् बंधुद्वयानें करून दिली, त्याचप्रमाणें यवतमाळचे विद्वान् संशोधक रा. यशवंत खुशालराव देशपांडे, एम्. ए. एल्.एल्. बी यांनींहि या कामीं लक्ष घालून वेळोवेळीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल लेखक त्यांचाहि फार आभारी आहे.

अस्सल तहनामे, सनदा वगैरेचे तर्जुमे व नकला परिशिष्ट १ यांत दिल्या आहेत. साधारण वाचकास हा भाग बहुधा दुर्मिळ असतो. वऱ्हाडचे चालू प्रश्नास याचा फार उपयोग होईल.

पूर्वी कोणीं न आक्रमिलेला, न रुळलेला मार्ग आहे. त्यांत दोष बरेच असतील. पुष्कळ खांच, खळगे भरून काढण्याचे राहिले असतील, टेंकड्या खोदण्याच्या असतील, परंतु वरील अडचणी लक्षांत घेऊन सूज्ञ वाचक या प्रयत्नाचा सहानुभूतिपर स्वीकार करतील अशी आशा आहे. पुढें सुधारणा होण्याकरितां ज्या ज्या सूचना येतील त्यांचा लेखक साभार स्वीकार करील.

शेवटीं, ज्या कृपाळु परमेश्वराचे कृपेनें हें लेखनकार्य तडीस गेलें त्याचा आठव करून हा प्रस्तावनालेख संपवितों.

बुलडाणें ( वऱ्हाड ),
१-११-१९२३.

यादव माधव काळे.

त्यावेळीं लेखकाचा उद्देश मिळालेली माहिती कोठें तरी छापून पुढील कार्यकर्त्या माणसास एक साधन उपलब्ध करून ठेवण्याचा होता.

प्रसिद्ध जाधवरावांचे घराण्याचाहि थोडक्यांत इतिहास दिला आहे. त्यांचा विस्तृत इतिहास लिहिण्याचीं साधनें उपलब्ध आहेत परंतु मधील पुष्कळ सांखळ्या तुटलेल्या आहेत, व अनास्थेनें एका उत्तम घराण्याच्या इतिहासांतील मधील मधील भाग तुटून गेल्याचें हें आणखी एक उदाहरण आहे. मराठामित्रकारानें प्रयत्न केला आहे परंतु तो एकदेशीय असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं चुका झाल्या आहेत व निराधार विधानें केलीं आहेत.

राजे उदाराम, राजे नेमिवंत, काळू या घराण्यांचा इतिहास जसा मिळाला तसा दिला आहे. आणखीही घराण्यांचा इतिहास मिळण्याचा संभव आहे. समशेरबहादर आटोळे यांचें घराणें वऱ्हाडांत चिखली तालुक्यांत शेळगांव आटोळे या गांवीं आहे. त्यांचा इतिहास लेखक जमवीत आहे.

ग्याझिटियरचे धर्तीवर स्थलवर्णनात्मक सूचि परिशिष्ट २ म्हणून जोडलेली आहे. तींत संक्षेपरूपानें ऐतिहासिक, दंतकथारूप पौराणिक गोष्टी दिल्या आहेत. वरील गोष्टीपैकीं सर्वच मूळ ग्रंथांत येण्याच्या स्वरूपाच्या नसतात. बहुतेकांत अतिशयोक्ति असते. सामान्य कल्पना, सामान्य चमत्कार, इतिहासकालाचे पूर्वापर संबंधाची असंबद्धता ह्या गोष्टी त्यांत असावयाच्याच. त्यास किंमतहि तितकीच दिली पाहिजे. म्हणून त्या मूळग्रंथांत न घालतां या परिशिष्टांत घातल्या आहेत.

शेवटीं आधुनिक धर्तीवर विषयांची व नांवांची सर्वसाधारण सूचि ( Index ) दिली आहे. त्यावरून कोणती माहिती कोणत्या पानावर आहे हें चटकन् सांपडेल. ही सूचि रा० दिगंबर श्रीकृष्ण देशपांडे बी. ए. एल्. एल्. बी. व जनार्दन श्रीकृष्ण देशपांडे एम्. ए. या विद्वान् बंधुद्वयानें करून दिली, त्याचप्रमाणें यवतमाळचे विद्वान् संशोधक रा. यशवंत खुशालराव देशपांडे, एम्. ए. एल्.एल्. बी यांनींहि या कामीं लक्ष घालून वेळोवेळीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल लेखक त्यांचाहि फार आभारी आहे.

अस्सल तहनामे, सनदा वगैरेचे तर्जुमे व नकला परिशिष्ट १ यांत दिल्या आहेत. साधारण वाचकास हा भाग बहुधा दुर्मिळ असतो. वऱ्हाडचे चालू प्रश्नास याचा फार उपयोग होईल.

पूर्वी कोणीं न आक्रमिलेला, न रुळलेला मार्ग आहे. त्यांत दोष बरेच असतील. पुष्कळ खांच, खळगे भरून काढण्याचे राहिले असतील, टेंकड्या खोदण्याच्या असतील, परंतु वरील अडचणी लक्षांत घेऊन सूज्ञ वाचक या प्रयत्नाचा सहानुभूतिपर स्वीकार करतील अशी आशा आहे. पुढें सुधारणा होण्याकरितां ज्या ज्या सूचना येतील त्यांचा लेखक साभार स्वीकार करील.

शेवटीं, ज्या कृपाळु परमेश्वराचे कृपेनें हें लेखनकार्य तडीस गेलें त्याचा आठव करून हा प्रस्तावनालेख संपवितों.

बुलडाणें ( वऱ्हाड ),<br>१-११-१९२३.

**यादव माधव काळे.**

त्यावेळीं लेखकाचा उद्देश मिळालेली माहिती कोठें तरी छापून पुढील कार्यकर्त्या माणसास एक साधन उपलब्ध करून ठेवण्याचा होता.

प्रसिद्ध जाधवरावांचे घराण्याचाहि थोडक्यांत इतिहास दिला आहे. त्यांचा विस्तृत इतिहास लिहिण्याचीं साधनें उपलब्ध आहेत परंतु मधील पुष्कळ सांखळ्या तुटलेल्या आहेत, व अनास्थेनें एका उत्तम घराण्याच्या इतिहासांतील मधील मधील भाग तुटून गेल्याचें हें आणखी एक उदाहरण आहे. मराठामित्रकारानें प्रयत्न केला आहे परंतु तो एकदेशीय असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं चुका झाल्या आहेत व निराधार विधानें केलीं आहेत.

राजे उदाराम, राजे नेमिवंत, काळू या घराण्यांचा इतिहास जसा मिळाला तसा दिला आहे. आणखीही घराण्यांचा इतिहास मिळण्याचा संभव आहे. समशेरबहादर आटोळे यांचें घराणें वऱ्हाडांत चिखली तालुक्यांत शेळगांव आटोळे या गांवीं आहे. त्यांचा इतिहास लेखक जमवीत आहे.

ग्याझिटियरचे धर्तीवर स्थलवर्णनात्मक सूचि परिशिष्ट २ म्हणून जोडलेली आहे. तींत संक्षेपरूपानें ऐतिहासिक, दंतकथारूप पौराणिक गोष्टी दिल्या आहेत. वरील गोष्टींपैकीं सर्वच मूळ ग्रंथांत येण्याच्या स्वरूपाच्या नसतात. बहुतेकांत अतिशयोक्ति असते. सामान्य कल्पना, सामान्य चमत्कार, इतिहासकालाचे पूर्वापर संबंधाची असंबद्धता ह्या गोष्टी त्यांत असावयाच्याच. त्यास किंमतहि तितकीच दिली पाहिजे. म्हणून त्या मूळग्रंथांत न घालतां या परिशिष्टांत घातल्या आहेत.

शेवटीं आधुनिक धर्तीवर विषयांची व नांवांची सर्वसाधारण सूचि ( Index ) दिली आहे. त्यावरून कोणती माहिती कोणत्या पानावर आहे हें चटकन् सांपडेल. ही सूचि रा० दिगंबर श्रीकृष्ण देशपांडे बी. ए. एल्. एल्. बी. व जनार्दन श्रीकृष्ण देशपांडे एम्. ए. या विद्वान् बंधुद्वयानें करून दिली, त्याचप्रमाणें यवतमाळचे विद्वान् संशोधक रा. यशवंत खुशालराव देशपांडे, एम्. ए. एल्.एल्. बी यांनींहि या कामीं लक्ष घालून वेळोवेळीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल लेखक त्यांचाहि फार आभारी आहे.

अस्सल तहनामे, सनदा वगैरेचे तर्जुमे व नकला परिशिष्ट १ यांत दिल्या आहेत. साधारण वाचकास हा भाग बहुधा दुर्मिळ असतो. वऱ्हाडचे चालू प्रश्नास याचा फार उपयोग होईल.

पूर्वीं कोणीं न आक्रमिलेला, न रुळलेला मार्ग आहे. त्यांत दोष बरेच असतील. पुष्कळ खांच, खळगे भरून काढण्याचे राहिले असतील, टेंकड्या खोदण्याच्या असतील, परंतु वरील अडचणी लक्षांत घेऊन सूज्ञ वाचक या प्रयत्नाचा सहानुभूतिपर स्वीकार करतील अशी आशा आहे. पुढें सुधारणा होण्याकरितां ज्या ज्या सूचना येतील त्यांचा लेखक साभार स्वीकार करील.

शेवटीं, ज्या कृपाळु परमेश्वराचे कृपेनें हें लेखनकार्य तडीस गेलें त्याचा आठव करून हा प्रस्तावनालेख संपवितों.

बुलडाणें ( वऱ्हाड ),<br>१-११-१९२३. } यादव माधव काळे.



# अनुक्रमणिका.


प्रस्तावना पा. ( १ )

**भाग १—देशवर्णन. पान १.**

मर्यादा पा. १ स्वाभाविक विभाग १ नद्या, पर्वत व० २ हवा पाणी ३ पिकें ३ क्षेत्रफळ, लोकसंख्या ३ खनिज पदार्थ ६ उद्योगधंदे ७ व्यापार ८ सान्याची पद्धति ८ राज्यव्यवस्था ९ उत्पन्न व खर्च ९.

**भाग २—प्राचीन काळ—पौराणिक पान १०.**

प्राचीन काळाच्या इतिहासाचीं साधनें १० वऱ्हाडांतील मूळच्या जाती ११ वऱ्हाडांत आर्याचें आगमन, अगस्ति ऋषि ११ विदर्भाचें राजकुल १३ विदर्भाचे राजकुलाचे शरीरसंबंध १५ लोपामुद्रा १५ केशिनी १५ दमयंती १५ इंदुमती १६ रुक्मिणी १६ शुभांगी १८ रुक्मावती १९

वऱ्हाडाचीं जुनीं नांवें २० महाराष्ट्र २० विदर्भ, कैशिक, क्रथकैशिक, भोज, भोजकट २० वर्धातट २२.

विदर्भ शब्दाची व्युत्पत्ति २३ वऱ्हांड नांव कसें पडलें २३ राजवाडे यांचा तर्क २५.

विदर्भाचें राज्याचा विस्तार २६ कोसल २८.

विदर्भातील वाङ्मयाचें सर्व श्रेष्ठत्व २८ वैदर्भी रीति २९ कैशिकी वृत्ति २९ वैदर्भी रीतीचें लक्षण ३० विदर्भीय वाङ्मयाचें सर्वश्रेष्ठत्व ३१ विदर्भाच्या या कीर्तीबद्दल असूया ३२ विदर्भातील कवि व ग्रंथकार ३३ भवभूति ३४ हेमाद्रिनाथ उर्भ हेमाडपंत ३६ बोपदेव ३७ राजकवि भोज ३८ लक्ष्मण ३८ त्रिविक्रम भट्ट ३९ ज्योतिष ग्रंथकार ४० पाथरीचें घराणें ४० ज्ञानराज ४० धुंडिराज ४३ सूर्य पाडित

पूरचें घराणें ४५ अनीत ४६ नीलकंठ ४७ राम ४७ गोविंद ४८ दहीगांव पूर्णा येथील घराणें ४८ राम ४८ कृष्ण ४९ नारायण व मुनीश्वर ४९ रामकृष्ण ५० नागेश दैवज्ञ ५०.

वऱ्हाडांतील प्राचीन स्थानें ५० कुंडिनपुर ५२ सालबर्डी ५२ लोणार ५४ कळंब ५५ चांडस ५५ कारंजा ५६ मेहकर ५६ भांदक ५६ भोकरघन ५७ वाशीम ५७ एलिचपुर ५७ मातृपुर, मातापुर ५७ जळगांव ५७.

**भाग ३—मध्ययुग पा. ५८.**

यशसेन ६० मालविकाग्निमित्र ६० भोज ६२ वाकाटक राजे ६३ चम्मक येथील ताम्रपट ६३ शिवणीचा ताम्रपट ६५ ईल राजाची कथा ७० राष्ट्रकूट ७२ भांदक येथील ताम्रपट ७२ इतर ताम्रपट ७२ चालुक्य ७३ देवगिरीचे यादव ७३ मुकुंदराज ७४ सिंघण ७४ पाटण येथील ताम्रपट ७४ कृष्णदेव व महादेव ७५ रामदेव ७५ बारशी टाकळीचा शिलालेख ७७ अमडापुरचा शिलालेख ७८.

**भाग ४—खिलजी व तघलघ पा. ७९.**

देवगिरीचे यादव ८० महादेव, रामदेव ८० अल्लाउद्दीनाची स्वारी ८१ मलिककाफराची स्वारी ८२ शंकरदेव८२ हरपालदेव ८३. जाफरखान, अल्लाउद्दीन बहामनशहा ८४.

**भाग ५—बहामनी घराणें पा. ८६.**

बहामनी राज्याचें चार सुभे अथवा तर्फा ८८ महमदशहा ८८ त्याचा क्रूरपणा ८९ त्याचे वेळचें नाणें ८९ मुजाहिदशहा, त्याचा खून ९० दुसरा महमदशहा, त्याचे सद्‌गुण ९१ सैफुद्दीन घोरी ९१ एका पश्चात्तापी जारिणी स्त्रीचा युक्तिवाद ९२ पेशवा या किताबाचा प्रथमतः उपयोग ९२ फेरोझशहा ९२ खेरला येथील गोंड राजे, नरसिंगदेव ९३ नरसिंगदेवानें वऱ्हाड घेतलें ९३ फेरोझशहाची स्वारी, माहूर घेतलें ९३ खेरला येथील लढाई ९४ [illegible]

लढाई ९५ पराभूत हिंदु राजांच्या मुलींशीं लग्नें करणें ९५ फेरोझशहाचा धर्मनिष्ठपणा ९६ मद्यपान व कामासक्ति या संबधानें त्यानें ओढून ताणून काढलेला शास्त्रार्थ ९६ अहमदशहा ९६ त्याचा हिंदुद्वेष ९७ गाविलगड किल्ला बांधला ९७ हिंदु राज्यसंस्थापनेचा एक प्रयत्न ९७ नरनाळा किल्ल्याची दुरुस्ती ९९, १००. माळव्याचा हुशंगशहा. याची खेरल्यावर स्वारी १०२ त्याची अहमदशहाची वऱ्हाडांत लढाई, हुशंगशहाचा पराभव व पलायन १०२ हुशंगशहानें खेरला सर करून आपलें राज्यास जोडलें १०३.

अल्लाउद्दीन अहमदशहा १०३ खानदेशच्या नसीरखानाची वऱ्हाडावर स्वारी, मेहकर येथें तळ १०३ दक्षिण वऱ्हाडांत येण्याचे ठराविक घांट, रोहिणखेड, राजूर व जयपूर कोथळीचे घांट १०४.

दरबारांतील दोन फळ्या, दक्षिणी परदेशी मुसलमान १०६ हुमायून बादशहा, त्याचा खून १०६ माळव्याचा महमूदशहा याची वऱ्हाडावर स्वारी १०६ त्याचा पराभव १०७.

तिसरा महमद १०७, वऱ्हाडचा सुभेदार निजाम तुर्की याची खेरल्याच्या हिंदु मांडलिकावर स्वारी, निजाम याचा खून, निजामाच्या अधिकाऱ्यांनीं खेरला शहराची केलेली कत्तल १०७.

फत्तेउल्ला इमादुल्मुल्क वऱ्हाडाचा सुभेदार १०७ प्रामाणिक मुत्सद्दी खाजा महमद गावान १०८ त्याची राज्यव्यवस्था, वऱ्हाड सुभ्याचे दोन सुभे केले, गाविलगड. माहूर १०८ गावान याचा दग्यानें खून १०९ बहामनी राज्याचे तुकडे ११० फत्तेउल्ला इमादुल्मुल्क या वऱ्हाडांत स्वतंत्र झाला १११ वऱ्हाडांत दुष्काळ १११.

भाग ६—एलिचपूरचें इमादशाही घराणें, पा. ११२.

अल्लाउद्दिन २२२, अमीर बरीद प्रकरण ११३ अहमदनगरशीं तंटा. ११३. पाथरी प्रकरण ११४ माहूर प्रकरण ११५ देरिया ११७ बुऱ्हाणशहा ११८ तुफालखान ११८. तुफालखानानें

पूरचें घराणें ४५ अनीत ४६ नीलकंठ ४७ राम ४७ गोविंद ४८ दहीगांव पूर्णा येथील घराणें ४८ राम ४८ कृष्ण ४९ नारायण व मुनीश्वर ४९ रामकृष्ण ५० नागेश दैवज्ञ ५०.

वऱ्हाडांतील प्राचीन स्थानें ५० कुंडिनपुर ५२ सालबर्डी ५२ लोणार ५४ कळंब ५५ चांडस ५५ कारंजा ५६ मेहकर ५६ भांदक ५६ भोकरघन ५७ वाशीम ५७ एलिचपुर ५७ मातृपुर, मातापुर ५७ जळगांव ५७.

**भाग ३—मध्ययुग पा. ५८.**

यशसेन ६० मालविकाग्निमित्र ६० भोज ६२ वाकाटक राजे ६३ चम्मक येथील ताम्रपट ६३ शिवणीचा ताम्रपट ६५ ईल राजाची कथा ७० राष्ट्रकूट ७२ भांदक येथील ताम्रपट ७२ इतर ताम्रपट ७२ चालुक्य ७३ देवगिरीचे यादव ७३ मुकुंदराज ७४ सिंघण ७४ पाटण येथील ताम्रपट ७४ कृष्णदेव व महादेव ७५ रामदेव ७५ बारशी टाकळीचा शिलालेख ७७ अमडापुरचा शिलालेख ७८.

**भाग ४—खिलजी व तघलघ पा. ७९.**

देवगिरीचे यादव ८० महादेव, रामदेव ८० अल्लाउद्दीनाची स्वारी ८१ मलिककाफराची स्वारी ८२ शंकरदेव८२ हरपालदेव ८३. जाफरखान, अल्लाउद्दीन बहामनशहा ८४.

**भाग ५—बहामनी घराणें पा. ८६.**

बहामनी राज्याचें चार सुभे अथवा तर्फा ८८ महमदशहा ८८ त्याचा क्रूरपणा ८९ त्याचे वेळचें नाणें ८९ मुजाहिदशहा, त्याचा खून ९० दुसरा महमदशहा, त्याचे सद्गुण ९१ सैफुद्दीन घोरी ९१ एका पश्चात्तापी जारिणी स्त्रीचा युक्तिवाद ९२ पेशवा या किताबाचा प्रथमतः उपयोग ९२ फेरोझशहा ९२ खेरला येथील गोंड राजे, नरसिंगदेव ९३ नरसिंगद्देवानें वऱ्हाड घेतलें ९३ फेरोझशहाची स्वारी, माहूर घेतलें ९३ खेरला येथील

लढाई ९५ पराभूत हिंदु राजांच्या मुलींशीं लग्नें करणें ९५ फेरोझशहाचा धर्मनिष्ठपणा ९६ मद्यपान व कामासक्ति या संबधानें त्यानें ओढून ताणून काढलेला शास्त्रार्थ ९६ अहमदशहा ९६ त्याचा हिंदुद्वेष ९७ गाविलगड किल्ला बांधला ९७ हिंदु राज्यसंस्थापनेचा एक प्रयत्न ९७ नरनाळा किल्ल्याची दुरुस्ती ९९, १००. माळव्याचा हुशंगशहा. याची खेरल्यावर स्वारी १०२ त्याची अहमदशहाची वऱ्हाडांत लढाई, हुशंगशहाचा पराभव व पलायन १०२ हुशंगशहानें खेरला सर करून आपलें राज्यास जोडलें १०३.

अल्लाउद्दीन अहमदशहा १०३ खानदेशच्या नसीरखानाची वऱ्हाडावर स्वारी, मेहकर येथें तळ १०३ दक्षिण वऱ्हाडांत येण्याचे ठराविक घांट, रोहिणखेड, राजूर व जयपूर कोथळीचे घांट १०४.

दरबारांतील दोन फळ्या, दक्षिणी परदेशी मुसलमान १०६ हुमायून बादशहा, त्याचा खून १०६ माळव्याचा महमूदशहा याची वऱ्हाडावर स्वारी १०६ त्याचा पराभव १०७.

तिसरा महमद १०७, वऱ्हाडचा सुभेदार निजाम तुर्की याची खेरल्याच्या हिंदु मांडलिकावर स्वारी, निजाम याचा खून, निजामाच्या अधिकाऱ्यांनीं खेरला शहराची केलेली कत्तल १०७.

फत्तेउल्ला इमादुल्मुल्क वऱ्हाडाचा सुभेदार १०७ प्रामाणिक मुत्सद्दी खाजा महमद गावान १०८ त्याची राज्यव्यवस्था, वऱ्हाड सुभ्याचे दोन सुभे केले, गाविलगड. माहूर १०८ गावान याचा दग्यानें खून १०९ बहामनी राज्याचे तुकडे ११० फत्तेउल्ला इमादुल्मुल्क या वऱ्हाडांत स्वतंत्र झाला १११ वऱ्हाडांत दुष्काळ १११.

भाग ६—एलिचपूरचें इमादशाही घराणें, पा. ११२.

अल्लाउद्दिन २२२, अमीर बरीद प्रकरण ११३ अहमदनगरशीं तंटा. ११३. पाथरी प्रकरण ११४ माहूर प्रकरण ११५ दरिया ११७ बुऱ्हाणशहा ११८ तुफालखान ११८. तुफालखानानें

पूरचें घराणें ४५ अनीत ४६ नीलकंठ ४७ राम ४७ गोविंद ४८ दहीगांव पूर्णा येथील घराणें ४८ राम ४८ कृष्ण ४९ नारायण व मुनीश्वर ४९ रामकृष्ण ५० नागेश दैवज्ञ ५०.

वऱ्हाडांतील प्राचीन स्थानें ५० कुंडिनपुर ५२ सालबर्डी ५२ लोणार ५४ कळंब ५५ चांडस ५५ कारंजा ५६ मेहकर ५६ भांदक ५६ भोकरघन ५७ वाशीम ५७ एलिचपुर ५७ मातृपुर, मातापुर ५७ जळगांव ५७.

भाग ३—**मध्ययुग पा. ५८.**

यज्ञसेन ६० मालविकाग्निमित्र ६० भोज ६२ वाकाटक राजे ६३ चम्मक येथील ताम्रपट ६३ शिवणीचा ताम्रपट ६५ ईल राजाची कथा ७० राष्ट्रकूट ७२ भांदक येथील ताम्रपट ७२ इतर ताम्रपट ७२ चालुक्य ७३ देवगिरीचे यादव ७३ मुकुंदराज ७४ सिंघण ७४ पाटण येथील ताम्रपट ७४ कृष्णदेव व महादेव ७५ रामदेव ७५ बारशी टाकळीचा शिलालेख ७७ अमडापुरचा शिलालेख ७८.

भाग ४—**खिलजी व तघलघ पा. ७९.**

देवगिरीचे यादव ८० महादेव, रामदेव ८० अल्लाउद्दीनाची स्वारी ८१ मलिककाफराची स्वारी ८२ शंकरदेव ८२ हरपालदेव ८३. जाफरखान, अल्लाउद्दीन बहामनशहा ८४.

भाग ५—**बहामनी घराणें पा. ८६.**

बहामनी राज्याचें चार सुभे अथवा तर्फा ८८ महमदशहा ८८ त्याचा क्रूरपणा ८९ त्याचे वेळचें नाणें ८९ मुजाहिदशहा, त्याचा खून ९० दुसरा महमदशहा, त्याचे सद्‌गुण ९१ सैफुद्दीन घोरी ९१ एका पश्चात्तापी जारिणी स्त्रीचा युक्तिवाद ९२ पेशवा या किताबाचा प्रथमतः उपयोग ९२ फेरोझशहा ९२ खेरला येथील गोंड राजे, नरसिंगदेव ९३ नरसिंगदेवानें वऱ्हाड घेतलें ९३ फेरोझशहाची स्वारी, माहूर घेतलें ९३ खेरला येथील लढाई ९४ नरसिंगदेवाचा पराभव

लढाई ९५ पराभूत हिंदु राजांच्या मुलींशीं लग्नें करणें ९५ फेरोझशहाचा धर्मनिष्ठपणा ९६ मद्यपान व कामासक्ति या संबधानें त्यानें ओढून ताणून काढलेला शास्त्रार्थ ९६ अहमदशहा ९६ त्याचा हिंदुद्वेष ९७ गाविलगड किल्ला बांधला ९७ हिंदु राज्यसंस्थापनेचा एक प्रयत्न ९७ नरनाळा किल्ल्याची दुरुस्ती ९९, १००. माळव्याचा हुशंगशहा. याची खेरल्यावर स्वारी १०२ त्याची अहमदशहाची वऱ्हाडांत लढाई, हुशंगशहाचा पराभव व पलायन १०२ हुशंगशहानें खेरला सर करून आपलें राज्यास जोडलें १०३.

अल्लाउद्दीन अहमदशहा १०३ खानदेशच्या नसीरखानाची वऱ्हाडावर स्वारी, मेहकर येथें तळ १०३ दक्षिण वऱ्हाडांत येण्याचे ठराविक घांट, रोहिणखेड, राजूर व जयपूर कोथळीचे घांट १०४.

दरबारांतील दोन फळ्या, दक्षिणी परदेशी मुसलमान १०६ हुमायून बादशहा, त्याचा खून १०६ माळव्याचा महमूदशहा याची वऱ्हाडावर स्वारी १०६ त्याचा पराभव १०७.

तिसरा महमद १०७, वऱ्हाडचा सुभेदार निजाम तुर्की याची खेरल्याच्या हिंदु मांडलिकावर स्वारी, निजाम याचा खून, निजामाच्या अधिकाऱ्यांनीं खेरला शहराची केलेली कत्तल १०७.

फत्तेउल्ला इमादुल्मुल्क वऱ्हाडाचा सुभेदार १०७ प्रामाणिक मुत्सद्दी खाजा महमद गावान १०८ त्याची राज्यव्यवस्था, वऱ्हाड सुभ्याचे दोन सुभे केले, गाविलगड. माहूर १०८ गावान याचा दग्यानें खून १०९ बहामनी राज्याचे तुकडे ११० फत्तेउल्ला इमादुल्मुल्क या वऱ्हाडांत स्वतंत्र झाला १११ वऱ्हाडांत दुष्काळ १११.

भाग ६—एलिचपूरचें इमादशाही घराणें, पा. ११२.

अल्लाउद्दिन २२२, अमीर बरीद प्रकरण ११३ अहमदनगरशीं तंटा. ११३. पाथरी प्रकरण ११४ माहूर प्रकरण ११५ दरिया ११७ बुऱ्हाणशहा ११८ तुफालखान ११८. तुफालखानानें

पूरचें घराणें ४५ अनीत ४६ नीलकंठ ४७ राम ४७ गोविंद ४८ दहीगांव पूर्णा येथील घराणें ४८ राम ४८ कृष्ण ४९ नारायण व मुनीश्वर ४९ रामकृष्ण ५० नागेश दैवज्ञ ५०.

वऱ्हाडांतील प्राचीन स्थानें ५० कुंडिनपुर ५२ सालबर्डी ५२ लोणार ५४ कळंब ५५ चांडस ५५ कारंजा ५६ मेहकर ५६ भांदक ५६ भोकरघन ५७ वाशीम ५७ एलिचपुर ५७ मातृपुर, मातापुर ५७ जळगांव ५७.

**भाग ३—मध्ययुग पा. ५८.**

यज्ञसेन ६० मालविकाग्निमित्र ६० भोज ६२ वाकाटक राजे ६३ चम्मक येथील ताम्रपट ६३ शिवणीचा ताम्रपट ६५ ईल राजाची कथा ७० राष्ट्रकूट ७२ भांदक येथील ताम्रपट ७२ इतर ताम्रपट ७२ चालुक्य ७३ देवगिरीचे यादव ७३ मुकुंदराज ७४ सिंघण ७४ पाटण येथील ताम्रपट ७४ कृष्णदेव व महादेव ७५ रामदेव ७५ बारशी टाकळीचा शिलालेख ७७ अमडापुरचा शिलालेख ७८.

**भाग ४—खिलजी व तघलघ पा. ७९.**

देवगिरीचे यादव ८० महादेव, रामदेव ८० अल्लाउद्दीनाची स्वारी ८१ मालिककाफराची स्वारी ८२ शंकरदेव८२ हरपालदेव ८३. जाफरखान, अल्लाउद्दीन बहामनशहा ८४.

**भाग ५—बहामनी घराणें पा. ८६.**

बहामनी राज्याचें चार सुभे अथवा तर्फा ८८ महमदशहा ८८ त्याचा क्रूरपणा ८९ त्याचे वेळचें नाणें ८९ मुजाहिदशहा, त्याचा खून ९० दुसरा महमदशहा, त्याचे सद्गुण ९१ सैफुद्दीन घोरी ९१ एका पश्चात्तापी जारिणी स्त्रीचा युक्तिवाद ९२ पेशवा या किताबाचा प्रथमतः उपयोग ९२ फेरोझशहा ९२ खेरला येथील गोंड राजे, नरसिंगदेव ९३ नरसिंगदेवानें वऱ्हाड घेतलें ९३ फेरोझशहाची स्वारी, माहूर घेतलें ९३ खेरला येथील

लढाई ९५ पराभूत हिंदु राजांच्या मुलींशीं लग्नें करणें ९५ फेरोझशहाचा धर्मनिष्ठपणा ९६ मद्यपान व कामासक्ति या संबधानें त्यानें ओढून ताणून काढलेला शास्त्रार्थ ९६ अहमदशहा ९६ त्याचा हिंदुद्वेष ९७ गाविलगड किल्ला बांधला ९७ हिंदु राज्यसंस्थापनेचा एक प्रयत्न ९७ नरनाळा किल्ल्याची दुरुस्ती ९९, १००. माळव्याचा हुशंगशहा. याची खेरल्यावर स्वारी १०२ त्याची अहमदशहाची वऱ्हाडांत लढाई, हुशंगशहाचा पराभव व पलायन १०२ हुशंगशहानें खेरला सर करून आपलें राज्यास जोडलें १०३.

अल्लाउद्दीन अहमदशहा १०३ खानदेशच्या नसीरखानाची वऱ्हाडावर स्वारी, मेहकर येथें तळ १०३ दक्षिण वऱ्हाडांत येण्याचे ठराविक घांट, रोहिणखेड, राजूर व जयपूर कोथळीचे घांट १०४.

दरबारांतील दोन फळ्या, दक्षिणी परदेशी मुसलमान १०६ हुमायून बादशहा, त्याचा खून १०६ माळव्याचा महमूदशहा याची वऱ्हाडावर स्वारी १०६ त्याचा पराभव १०७.

तिसरा महमद १०७, वऱ्हाडचा सुभेदार निजाम तुर्की याची खेरल्याच्या हिंदु मांडलिकावर स्वारी, निजाम याचा खून, निजामाच्या अधिकाऱ्यांनीं खेरला शहराची केलेली कत्तल १०७.

फत्तेउल्ला इमादुल्मुल्क वऱ्हाडाचा सुभेदार १०७ प्रामाणिक मुत्सद्दी खाजा महमद गावान १०८ त्याची राज्यव्यवस्था, वऱ्हाड सुभ्याचे दोन सुभे केले, गाविलगड. माहूर १०८ गावान याचा दग्यानें खून १०९ बहामनी राज्याचे तुकडे ११० फत्तेउल्ला इमादुल्मुल्क या वऱ्हाडांत स्वतंत्र झाला १११ वऱ्हाडांत दुष्काळ १११.

भाग ६—एलिचपूरचें इमादशाही घराणें, पा. ११२.

अल्लाउद्दिन २२२, अमीर बरीद प्रकरण ११३ अहमदनगरशीं तंटा. ११३. पाथरी प्रकरण ११४ माहूर प्रकरण ११५ देरिया ११७ बुऱ्हाणशहा ११८ तुफालखान ११८. तुफालखानानें

बुऱ्हाणशहास कैद केलें ११९ मुर्तिजा निजाम शहाची वऱ्हाड-वर स्वारी, तुफालखानाचा पराभव व पलायन ११९ मुर्तिजा निजामशहानें वऱ्हाड घेतलें अकबराची धमकी १२१ तुफाल खान व बुऱ्हाणइमादशहाचा अंत १२१ वऱ्हाड निजामशाही राज्यांत सामील १२१.

भाग ७—निजामशाही व मोंगल कारकीर्द. पा. १२३.

अकबरानें वऱ्हाड घेण्यास अजीमखान यास पाठविलें १२४ त्यानें एलिचपुर व बाळापूर घेतलें १२४ मुर्तिजा निजामशहाचा खून व नंतरची बंडाळी १२४ अकबराची संधि, जमालखान वऱ्हाडचा सुभेदार, त्याचें प्राबल्य व अप्रियता १२५ रोहिण-खेडच्या घाटाखालीं जमालखानाचा पराभव व अंत १२७ रोहिणखेड व फतेखेर्डा येथील सुंदर मशीदी १२७.

मुराद याची अहमदनगरावर स्वारी व चांदबिबीचा पराक्रम १२८ तह, वऱ्हाड मोंगलांस दिलें १२९ मुराद यानें वऱ्हाडचा ताबा घेतला १२९ बाळापुराजवळ शहापुर येथें मुराद राहिला १२९ जालन्याची लढाई, मोंगल सरदार खानखानान याचा जय १३१.

मलिकंबर, जाधवराव व शहाजी भोंसले १३३ ऐनी अकबरींतील वऱ्हाड सुभ्याचें वर्णन १३३—१३४ शहाजहान वऱ्हाडचा सुभेदार १३५ मोंगल सरदार दरावखान याचा मेहकर येथें तळ व अहमदनगरचे मराठे लष्कराशीं चकमकी १४६ शहाजहानचें बंड १३७ शहाजहान गादीवर बसला, मोंगलांची दक्षिणेवर स्वारी १३९ मोंगलांचें लष्कर व नगरचें लष्कर यांचे देऊळगांव राजा व जालना येथें तळ, भयंकर दुष्काळ १४०.

मलिकंबरचा मृत्यु व ,जाधवरावाचें मोंगलांकडे जाणें १४० एकट्या शहाजी भोंसल्यावर निजामशाहीचा भार १४० शहाज-हानचा पुत्र सुजा याचा मलकापुरास तळ १४० नवीन प्रांत विभाग १४०.

निजामुल्मुल्काचा उदय १४४ वऱ्हाणपूरची लढाई १४५ बाळापूरची लढाई १४६ साकरखेर्ड्यांची लढाई १४८ शिंदखेडच्या जाधवांचा या लढाईंत भाग १५१.

**भाग ८—मराठे व निजाम, दोअमली कारकीर्द पा. १५२.**

शिंदखेडचे जाधवराव १५९ लुकजी १५९ मालोजी भोंसलें लुकजीकडे नोकर राहिला १६० रंगपंचमीची गोष्ट १६१ शहाजी व जिजाबाईची सोयरीक व लग्न १६३ जाधव भोंसल्यांचें वितुष्ट व लुकजी मोंगलांकडे गेला १६४ भातोडीची लढाई, जाधवराव व राजे उदाराम यांची त्रेधा १६५ शहाजी भोंसल्याचा लुकजीनें केलेला पराभव व पाठलाग, जिजाबाई बापाचे हातीं सांपडली १६५ तिचा स्वाभिमान १६६ लुकजी व त्याचे आप्त यांचा दौलताबादेच्या किल्ल्यांत दग्यानें खून १६६ जगदेवराव जाधव १६७ जिजाबाई माहेरीं १६८ जाधवांची शाखा दिल्लीस राहिली १६८ तेथें रुस्तुमरावाची मुलगी शाहूस दिली १६८.

शिवाजीचा उदय, संभाजीची वऱ्हाडांतील जहागीर १७१ प्रतापरावाची वऱ्हाडावर स्वारी १७२ कारंजा शहर लुटलें १७२–१७३ शिवाजीनें सुरत लुटलें १७४ रायबागीण नांवाचे शूर ब्राह्मण स्त्रीची शिवाजीवर स्वारी १७६–१७७ राजे उदाराम घराण्याचा त्रोटक इतिहास १७५–१७६.

परसोजी भोंसले १७८ भाम येथें ठाणें १७८-७९ कान्होजी १८२ त्यावर शाहूची अवकृपा १८२ पहिला रघूजी १८३ कान्होजीस रघूजीनें पकडून शाहूकडे पाठविलें १८४.

पेशव्यांचे वऱ्हाडांतील मोकासे, इतर अधिकाऱ्यांचे वऱ्हाडांत मोकासे, त्यावेळची पत्रव्यवहाराची रीत, तंट्यांचे निकाल व दाव्यांचे प्रकार १८५–१८८ शिंद्याचा वऱ्हाडांतील कांहीं भागावर अमल १८८–१८९.

पेशवे व भोंसले यांचें वैमनस्य १९० निजाम अलीचें शहाणपण व मुत्सद्दीगिरी १९२ भवानराव काळू १९५ वऱ्हाडाचे साठीचाळिसीचा तह १९५ दुसरा रघूजी १९५ कुंभारीची

लढाई १९५ गुलाबसिंग रजपुताचें बंड १९६ खर्ड्यांची लढाई १९७ यशवंतराव होळकराचें भोंसल्यांस पत्र १९९ आसईची लढाई २०२ अडगांवची लढाई २०४ गाविलगडची लढाई २०७ देवगांवचा तह, वऱ्हाड निजामाकडे गेलें २११ सुरजी अंजनगांवचा तह २१२ मराठ्यांचे वेळीं वऱ्हाडची स्थिति २१३ अशांतता २१४ तत्कालीन खाजगी पत्रव्यवहारांतील उतारे २१५–२१८.

भाग ९—निजामाची कारकीर्द पा. २१९.

शिकंदरजहा निजाम २२० रेसिडेंटाचा निजामावर वरचष्मा २२० निजामाची सांपत्तिक अडचण व अव्यवस्था २२० मीर आलम दिवाण यांची निजामाचे मर्जीविरुद्ध नेमणूक २२१ राजा महिपतराम वऱ्हाडचा सुभेदार याजकडे निजामाचा कल २२१ मीर आलम रेसिडेन्सींत जाऊन राहिला २२२ रेसिडेंटाचा निजामावर रोष, निजामाची पडती २२२.

राजा चंदूलाल याचा उदय २२२ राजा महिपतरामापासून वऱ्हाडाचे सुभेदारीचा ताबा लढून घ्यावा लागला २२३ वऱ्हाडची मक्तेदारी पद्धत २२४ मुनीरउल्मुल्क दिवाण २२४ राज्याचा कर्जबाजारीपणा, पामर आणि कंपनी २२४ मेटकाफ साहेबानें केलेली या कंपनीची हकालपट्टी. २२५.

इ. स. १८२२ मध्यें मुलखाची अदलाबदल २२५ मेटकाफ साहेबानें केलेली सुव्यवस्था २२७ नसीर उद्दवला निजाम, त्यानें सर्व अधिकार आपलेकडे घेतले, अव्यवस्था २२७ कर्जाची वाढ २२८ वऱ्हाड निजामास दिलें २२८ हैदराबाद दरबारच्या पदव्या २२९ निजामाचे वेळीं राज्यांत धामधूम २३० अरब व रोहिले २३०.

वऱ्हाडचे सुभेदार, राजा महिपतराम, गोविंदबक्ष, राजा बिशनचंद, पूरणमल, पेस्तनजी. २३१ पेस्तनजीनें केलेले चांगले प्रयत्न. कापसाचे लागवडीस उत्तेजन २३२.

निजामाचे वेळचे दंगेधोपे व अस्वस्थता २३३ पेंढारी, नाईक, अरब, रोहिले, हटकर, वंजारी २३४ नवसाजी नाईक २३४ सदरलंड यानें केलेला नायकांचा मोड २३५ शेख डल्ला २३५ देशमुखीच्या मानपानाबद्दल आकोट येथें लढाई २३६ मलकापूरची लढाई २३७ मुगुटराव मराठ्याचा दंगा २३८ तोतया आप्पासाहेब भोंसले २३८.

**भाग १०—इंग्रजी कारकीर्द.**

सरकारी अधिकाऱ्यांचे हुद्दे व पगार, लोकसंख्या व उत्पन्न २४१ हल्लींची सरहद्द २४२ जिल्ह्याची अदलाबदल २४२ कायमचा कौल २४३ निजामशहाकडे परत जाण्याबद्दल लोकांस पृच्छा व त्यांची नाखुषी २४३ वऱ्हाडाची भरभराट व वाढ २४४–४७ सरकारी उत्पन्न व विनियोग २४७ निजामास स्वामित्वाबद्दल रक्कम २४८ नवीन सुधारणा २४८.

**निरनिराळ्या कारकीर्दींतील वऱ्हाडाचें उत्पन्न पा. २४९,**
**इ. स. १८५३ पासून १९०१ पर्यंत वऱ्हाडच्या जमाखर्चाचा तक्ता—पान २५०—५१.**

**भाग ११—वऱ्हाडांतील जमीनधाऱ्याची पद्धत. जहागिरी, इजारे, वतनदारी जमिनी. जमिनीची व जमीनदारांची स्थिति. पान २५२.**

वतनदार लोक २५२ देशमुख, देशपांडे, मोहरील २५३ भोंसले व निजाम २५४ मक्तेदारी पद्धत, बिछायती अथवा असामी २५५ मोहकमासिंगाची गर्दी २५५ पांढरी, मुंड, हाडोळी २५५ पांढरी व काळी २५५ गढी व मानपान २५६ तक्षीमदार २५७ बिरादर २५७.

सुरू इंग्रजींतील मौजेवार आकारणी व जमीनदारी पद्धतीचा प्रयोग २५८ एडमंडस्टन २५८ माल्टबी याची खटपट, रयतवारी पद्धतीची स्थापना २५९ वऱ्हाडची प्रथम जमाबंदी व मोजणी व तिचा खर्च, उत्पन्नाची वाढ २५९ तीस वर्षांचा ठराव

२५९ स्वाभाविक वाढ २६० रेकर्ड आफ राइट ( हक्कांचें रजिस्टर ) २६० पूर्वीची सदोष पद्धत २६१ जमिनीचे मालकांची एकंदरींत स्थिति २५१ इतर प्रांतांशीं तुलना २६१.

इजारा पद्धति, २६१–६२ पालंपट २६३ जहागिरी व इनाम २६३–२६५ जमीनदार व कुळें यांमधील लढे २६५.

**भाग १२—धार्मिक व सामाजिक स्थिति, चाली रीती वगैरे—पा. २६६.**

पाटील व त्यांचे मानपान २६६–६८ वतनदार व आसामी उर्फ बिछायती २६८ पांडेबुवा उर्फ दिवाणजी २६९ वतनदार महार २६९ महार बलुतें २७० इतर बलुतेदार २७० इतर चालीरीति २७१.

स्त्रियांचा दर्जा—लक्ष्मी २७२ धार्मिक स्थिति २७२ बुद्ध व जैन धर्माचा परिणाम २७३ मानभाव २७५ मुसलमानी कारकीर्दीचा परिणाम २७५ हिंदु मुसलमानांचें धार्मिक ऐक्य २७७–७८ मुसलमानी अमदानींतील हिंदु सत्पुरुष २७८–८० मुसलमानी राज्यकर्त्यांकडून हिंदु देवस्थानांस जहागिरी व इनामें २८०.

**भाग १३—वऱ्हाडांतील मराठी भाषा, वाङ्मय, कवि, वगैरे—पा. २८१.**

फारशी व उर्दू शब्दांचें मिश्रण २८१ स्थानिक वैशिष्टय २८२ स्थानिक विभाग २८२–८३ उत्तर वऱ्हाडांतील भाषेतील पांच विशेष गोष्टी २८४–८५ घाटावरील भाषा २८६ हल्लीं चालू असलेलें एकीकरण २८७–८८ कांहीं विशिष्ट शब्द २८८—२९०.

वऱ्हाडांतलि मराठी कवि २९० अमृतराय २९१–९५ देवनाथ २९५–९६ दयाळनाथ २९७ गोसावीनंदन २९७ शिवदिन केसरीच्या मठ २९७ मोरेश्वर २९८ गोविंद २९८ मुकुंद राजाविषयीं निरनिराळे तर्क २९८–९९ त्रिंबकराज २९९ अनंत, विठ्ठल, उत्तमश्लोक, विष्णदास २९९ शिवकल्याण ३००.

भाग १४—वऱ्हाडांतील जुन्या इमारती—३०१.

लोणार येथील दैत्यसूदनाचें देऊळ ३०२ मेहकरची बाला-जीची मूर्ति ३०२ मेहकरची एक जुनी इमारत ३०३ अमडा-पूरच्या देवीच्या मूर्तीचे अवशेष.

जैन धर्मी इमारती ३०४ मुक्तागिरी ३०५ शिरपुरचें जैन मंदिर ३०५.

मुसलमानी इमारती ३०६.

एलिचपूरची दूला रहिमानशाची कबर ३०६ एलिचपुरचा तट व वेशी ३०६ हौज कटोरा ३०७ किल्ला ३०७.

नरनाळा किल्ला ३०७-८ नऊ गज तोफ ३०९.

गाविलगड ३०९-१० इतर इमारती ३१०.

भाग १५—वऱ्हाडांतील इतिहासप्रसिद्ध घराणीं—३११.

१ शिंदखेडचे राजे जाधवराव पा. ३११—मुळे आड-नांवाच्या ब्राम्हणाचें देशमुखी वतन ३१२ रवीराव ढोणे ३१३ भानोसे ३१३ लुकजीचा उदय व भरभराट ३१३-१५ शहा-जीशीं भांडण ३१६ खंडागळ्याच्या हत्तीवरून भोंसले व जाधवांचें भांडण व कापाकापी ३१६ भातोडीची लढाई ३१७-१८ शहाजी निजामशाही सोडतो ३१८ लुकजी मोंगलाची सरदारी पतकरतो ३१९.

दौलताबाद किल्ला लुकजीनें घेतला त्याविषयीं एक दंतकथा ३१९-२० दौलताबाद किल्ल्याचें वर्णन ३२०-२१ लुकजीस निजामशाहानें दग्यानें मारलें ३२३-२४ जगदेवरावास मनसब ३२५ त्यांचें व पुढील पिढ्यांचें दिल्लीस वास्तव्य, अंबिकाबाईचें शाहूशीं दिल्लीस लग्न ३२६-२७.

संताजी व धनाजी ३२८ चंद्रसेन व रामचंद्रराव ३२९ राघोजीची शाखा ३२९ दत्ताजी ३२९ राव जगदेव ३२९ राघोजी व अंबिकाबाई ३३० साकरखेर्ड्यांचे लढाईत राघोजीचा भाग ३३०-३१ बाबजी साताऱ्यास राहिला ३३१ ताराबाईचा

आधारस्तंभ ३३१–३२ पेशव्यांशीं वैर ३३१ ताराबाईचा पेशव्यांशीं तह व बाबजी औरंगाबादेस जातो ३३२.

राजे बाजीराव याचे लष्कराचा दंगा व त्याचें वतन खालसा ३३२ राजे बाजीरावाचा दौलताबादच्या किल्ल्यांत कैदेंत मृत्यु ३३२ पुढील दुःखद कहाणी ३३३ देऊळगांवचें बालाजीचें संस्थान ३३३ हरीसा लाड व त्यावर दावा ३३४ राजे यांची व्यवस्था व संस्थानची अव्यवस्था व पैशाची अफरातफर ३३५ रासोजी ३३५ त्याचा अंत व लोकप्रियता ३३५ रासोजीचा पोवाडा ३३५.

मानासिंगराव ३३५ दुसरे बाजीराव ३३६ देसाईबंधू ३३६ संस्थानाविषयीं राजावर सार्वजनिक दावा ३३६–३७ राजे दत्ताजी राव व आनंदराव ३३७ संस्थानची चालू व्यवस्था ३३७ जाधवराई इमारती ३३८.

लुकजीचे समाधीवरील लेख ३३९ लुकजीचे सात पुत्र ३३९ जाधवरावांचा वंशवृक्ष ३४० ( परि० ).

**२ वाशीमचे राजे उदाराम पा. ३४१**

उद्धवराव ३४१ पद्माजी सत्पुरुष ३४२ प्रथम मलिकंबराचे पदरीं ३४२ नंतर मोंगल बादशहाची नौकरी ३४३ लुकजी व उदारामाची जोडी ३४३ शहाजहानाचें बंडांत त्याचे पक्षास, शहाजहान माहुरास राहतो व सर्व कुटुंब व जडजवाहीर उदारामाजवळ ठेवतो ३४३ भातोडीचा छापा ३४३ हरचंदराय ३४४.

जगजीवनराव ३४४ त्याचा पराक्रम व वाढ.

बाबूराव ३४५ रायबागीण ३४६ राजव्याघ्री ३४६ तिची कोंकणप्रांतावर स्वारी ३४६ शिवाजीवर स्वारी ३४७ उमरखिंडींत शिवाजीशीं लढाई व पराभव ३४७–४८ शिवाजीनें केलेला गौरव ३४८ बखरींतील उतारे ३४८ शंकरराव ३५० पुढील निरनिराळ्या शाखा ३५१ उदाराम घराण्याचा वंशवृक्ष ३५२

३ एलिचपुरचे नवाब.

उदय ३५३–५४ सुलतानखां व सरमसखा ३५४ इस्मालखां ३५४–५५ मुधोजी भोंसल्याशीं स्नेह ३५५ मुधोजी, साबाजीचा तंटा ३५७ मुधोजीवर एलिचपुरास मारेकरी ३५७ निजामाची इस्मायलखांवर स्वारी ३५८–५९ घवसा व काटसुरा येथें लढाई ३५९ इस्मायलखां पडला.

सलाबलतखां ३६० साडेतीन स्वार ३६० खर्ड्यांची लढाई व त्यांत सलाबतखांचा पराक्रम ३६० परशरामभाऊवर हल्ला, भाऊ जखमी, भाऊचा पुत्र हरिपंत हा धांवतो ३६१ बाबूराव फडके याची धांदल ३६१

राजा महिपतराम व नबाब सलाबतखान यांस मराठ्यांविरुद्ध इंग्रजांस मदत करण्याचा हुकूम ३६१ सलाबतखान अडगांवा-जवळ वेलस्लीस मिळतो, अडगांवची लढाई ३६१–६२ गावि-लगड किल्ला घेण्यास मदत ३६२ लूट ३६२.

शेखडल्ला लुटारू ३६२–६३ फतेजंगखां ३६३–६४.

नामदारखां नवाब ३६५ त्याचा कृपणपणा ३६५ नाणें ३६६ नामदारबाग, आरसेमहाल ३६६ आप्पासाहेब भोंसल्यांच्या तोत-याचें बंड, नामदारखानें त्याचा मोड करून कैद केलें ३६६.

इब्राहीमखां ३६७ पीसेखांची स्वारी ३६८–६९ वऱ्हाडांत दुष्काळ ३६९–७०.

हसनअल्लीखां ३७१ सनदेची खटपट ३७१ मौल्यवान् कुरा-णाची प्रत ३७१–७२ केशवराव मुत्सद्दी, त्याचा झालेला छळ ३७२–७४ बहादरखांच्या छळानें केशवराव विष खातो ३७४ पूरणमलचे कर्ज व नबाबाचे इष्टेटीची जप्ती ३७६ नवाबास सनद मिळते ३७६ इंग्रजांकडे मुलूख जातो ३७६ दाऊदखां व यूनसखां ३७७ नबाबांचे कारकीर्दीचा परिणाम, उद्योगधंदे ३७७ नबाबांचा वंशवृक्ष ३७८.

४ नागपूरकर भोंसले व त्यांचे पदरची मंडळी.

समशेरबहादर आटोळे हा जालन्याजवळ रघूजीस अडवितो ३७९ मंदारची लढाई व कान्होजीस कैद ३८० राजूर (वणी) येथें रघूजीची छावणी ३८० रघूजी नरनाळा व गाविलगड घेतो ३८० रघूजीचा मृत्यु, जानोजी ३८०–८१.

देवाजीपंताचा उदय ३८१ निजामअलीच्या वांटणीस एलिचपुर व वऱ्हाड ३८२ वऱ्हाडचे साठ चाळिसीचा तह ३८२–८३ निजामअलीचा मराठ्यांवर स्वारी करण्याचा प्रयत्न, बापूकरांच्याची सावधगिरी व निजामावर छापा ३८३ निजामाशीं औरंगाबादेस लढाई ३८४ अल्पवयी विश्वासरावाचा दत्ताजी शिंद्याच्या हाताखालीं लढाईचा पहिला धडा ३८४ विठ्ठल सुंदर बाळापूराहून निजामाकरितां दोन लाख रुपये कर्ज नेतो ३८५ निजामाचा औरंगाबादेस पराभव ३८५ रामचंद्रराव जाधव निजामाचे मदतीस येतो ३८५ दत्ताजीनें शिंदखेडच्या गढींत त्यास कोंडलें ३८५ निजामअली त्यास सोडविण्याकरितां धावतो ३८६ नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ हेहि दत्ताजीचे मदतीस येतात, शिंदखेडची लढाई ३८६ निजामाचा पराभव ३८६ साखरखेर्ड्यांचा तह ३८७.

भास्कररामाची बायको ताईबाई इला वऱ्हाडाची सुभेदारी, पंचगव्हाण व पिंजरचे जमेदाराचा तंटा, ताईबाईचे गुमास्त्याचा पक्षपात व त्याची बडतर्फी ३८७.

पारोळेकर देशमुखांचा मुधोजीस कैद करण्याचा प्रयत्न ३८८ मुधोजी, जानोजीचा तंटा, नांदगांवची लढाई ३८९ पेशव्यांची भोंसल्यावर स्वारी, पेशव्यांनीं आमनेर व भंडारा घेतला, चंद्रपुरचा वेढा ३९२ देवाजीपंताची कैद व गुप्त कारस्थानें ३९४ देवाजीपंताचें गुप्त पत्र पकडलें गेलें ३९५ चंद्रपुरचा वेढा उठतो ३९६ भोंसले पुणें लुटतात अशी आवाई, पुणें ओस होतें, पळापळ ३९६ वाशीम येथें माधवराव पेशवे व जानोजी भोंसले यांची भेट व तहाच्या शर्ती ३९७ कनकापूरचा तह ३९८.

काळू घराणें ३९९–४००.

दुसरा रघूजी ४०० दर्याबाई, सबाजी, मुधोजी यांची चढाओढ. कुंभारी येथील लढाई ३०३ नारायणरावाचा मृत्यु. महिपतरावास कैद, तो पळून जातो ४०५

उमरावतीस दंड ४०६ एलिचपुरास मुधोजीस मारण्याचा प्रयत्न, त्याची मनोरंजक हकीकत ४०६-०७ पांचगांवची लढाई व साबाजीचा मृत्यु ४०७ प्रसिद्ध पुरुषांच्या घडामोडी ४०८-०९.

वऱ्हाडांतील इतर प्रसिद्ध घराणीं ४१०

५ मलकापूरचे राजे नेमिवंत. पान ४१२.

६ देऊळघाटचें नबाब पान. ४१३.

७ मेळघाटांतील राजे पान ४१३-४१७. परिशिष्ट-ऐतिहासिक तहनामे व इतर कागदपत्रांचे तर्जुमे व नकला पान ४१८.

स्थलविषयक सूचि पान ४४३ ते ४४६

सर्वसाधारण सूचि पान १ ते ३१

# सर्वसाधारण सूचिपत्र.


अ.

अकबर—४७, ११७, १२१, वऱ्हाडवर स्वारी १२३, १२४, १३२, १३५, ३४१.
अकबरनामा—१३१.
अकबरनवीस—३३८.
अगस्ति—११, १२, १३, १५, ५०, ५३.
अग्निमित्र—६०.
अचल—३३९.
अचलपूर ( एलिचपूर )—५७.
अचलोजी—१५९, १६६, ३१५, ३२३.
अज राजा—१६.
अजनाभवर्ष—१४.
अजिंठा पर्वत—२, १०, ५९, २३६.
अजीम—उल—उमरा—२२०.
अडगांव—लढाई—२०४, २०५, चोरलूट २३३, ३६१.
अडगांव राजा—१७०.
अडगांवकर देशपांडे—२०५.
अडोणीचा वेढा—९०.
अनर्घराघव—२१.
अनवरखान—१४५.
अनंत ज्योतिषी—४६.
अनंत कवी ( भक्तरहस्य )—२७९, २९९, ३४१.
अनंतराव घोंडिराज कोठेकर—४०९.
अनंतवर्मा—५९.
अन्वरापूर ( अमडापूर )—७८, ( शिलालेख ).
अनागोंदी—१८०.
अनिरुद्ध—१९.
अपरान्त देश ( कोंकण )—२२.
अफगाणिस्थान—३५३.
अबदूल कादर उर्फ खानजहान—९७.
अबदुल्लाखान—( गुजराथचा सुभेदार )—१३६.
अबूल फजल—२२, २३, १३१, १३२, १३३.
अमृतेश्वर—२९३.
अमृतराय कवि—१५५, २७९, २९१—२९५.
अमृतराव पेशवे—२०५.
अमरसिंग—३४६.
अमडापूर—मोकासा १८६, २ २३६, ३०३.
अमरावती—२७.

अमीर उमरा १३७.
अमीर बरीद–११३,११५,११६.
अमीन–२२८.
अयोध्या–२१.
अरब–२३३,२३४.
अल्लाउद्दीन खिलजी–८०, ८३, ३०६.
अल्लाउद्दीन बहामनी–७७, ८०, ८२,८४,१०६,३०८,३०९.
अल्लाउद्दीन इमादशहा—११०, ११२,११७,३०७.
अल्लिखान ( खानदेशचा )–१२५, १२८,१३०.
अलीखान–१४८.
अलीवर्दीखान–१४२,३८७.
अलीमर्दानखा५–३५४.
अलीफखान–३६१.
अलंअलीखान-१८१,१४५,१४६.
अवघडरायाची सावंगी–२१७.
अवन्ति–१३.
अश्मक देश–२२,३३, ( टीप ).
अशीरगड–१३२, १४२, १४४, २०२,३६३.
अशोक–५८.
असई–४१३.
असफजहां–१४२, १४३, १४४, ३५४,३८२.
अहमदखान–९३,९४.
अहमदशहा वली–२०६.
अहमदशहा बहामनी–९७,३०८, ३०९.
अहमद निजामशहा–११३,१२८.
अहमदनगर-९,११३,११७-१२१ १२१,१३२,१४१,१४३.
अहिल्याबाई–३३२, ३३५,३३६.

## आ.

आईनाथ साधु–२७९,
आकोला–खनिज पदार्थ ७, रघुजीची शुजायतखांशीं लढाई १८३,२३२,२४२,शिवकल्याणांचा मठ ३००,३१०,४०४.
आकोलसिंग–स्थलांची सूचि ( पुरवणी )
आकोली–३७५.
आकोलखेड–३७५.
आकोट—उद्योगधंदे ७,२०३, लढाई–२३६, ३५३, ३६५, ३७५, ३८९, ४००, ४०१, ४१४.
आग्रा–३८८.
आजम ( मो. सेनापति )–१४०.
आटोळे ( समशेरबहादर )–३७९.
आडविहीर–६.
आथार–आथारी–२७१.
आदिलशहा–खानदेशचा–११४.
ऑन्स्लो–ब्रिगेडियर–२३९.
आनंदराव–३३७.
आपटे–५३.

आप्पास्वामी-(रिसोडकर)-२७९.
आप्पासाहेब भोसले ( तोतया )
२३८,३६६.
आयासम्या-३६४.
आबासपुरा-३६४,३७६.
आर्वी-१३४,२१३,२३६.
आमनेर-२१३,२३६,३५८,
३९२.
आरभटी वृत्ति-२९.
आलेगांव-४१०.
आलम अलीखान-१४५,१४६,
१८१.
आवजी कावरे-१९०.
आवणे शिवणें-४११.
आवंढे ( नागनाथ )-संभाजीच्या
नांवानें जहागीर १७१,३९७.
आष्टी-१३४,२१३,२३६.
आसई-१९८,२०२,४१३.
आसफजहां-असफजहां पहा.
आसदखान मामुरी-( वऱ्हाड सुभे
दार )-१३७.
आळंद-४११.
आळसपुर-( एलिचपुर पहा )
३६६.
आंगरे-२१७.
आंध्र-२८.
आंढेरा-४११.

इ.

इजारा-२६१,२६२.
इनाम-२६३,२६४.
इब्राहीम-आदिलशहा-१३०.
इब्राहीम निजामशहा-१२८.
इब्राहीमखां-एलिचपुरचा नवाब
३६६,३६७,३६९,३७०,
३७७,३७८.
इमादशाही घराणें-११२,१२२,
३७७.
इमादुल्मुल्क-८३,३०७.
इमाम-( मुसलमानी धर्मातील
बारा इमाम )-१२०.
इमामबाडा-३६६.
इमारती ( जुन्या )-३०१,३१०.
इरादतखान-१३९.
इलावर्त-१४.
इस्मायल निजामशहा-१२३,
१२४,१२७.
इस्मयलखां नवाब ( एलि. )
३०६,३५३,३६०,३६४.
इस्मायलखां उर्फ माल्लमियां(एलि.
नवाब )-३६६,३७७, ३७८,
४००, ४०१, ४०३, ४०४,
४०७,४०८.
इस्मायलयारजंग-२२१.
इंगळे-( करवंडकर देशमुख )
२१७.
इंगोली-२४०,२४२.
इंदुमती-६,१४.
इंदूर-३९७.

ई.

ईरिजखान–१४३.

ईल राजा–७०,२७३,३०५.

ईवाजखान–( निजामाचा चुलता ) १४५.

उ.

उटी–( ब्रह्मचारीबुवाची )–२७९

उत्तमश्लोक–२७९,२९५.

उद्धवसुत–(समर्थचरित्रकार)२७९,

उद्धवराव–१७५,३४१,३४२, ३४४,३५१.

उदगीर–लढाई १९१,१९२, १९३,१९४,३७६.

उदाराम राजे—१५५,१५६, भातवडीचा छापा व पलायन १६५,रायबागीण १७४,१७५, उद्धवराव १७५, जगजीवनराव व बाबूराव १७६, रायबागीण व पंडिता हे किताब १७६, रायबागिणीची शिवाजीवर स्वारी १७६,१७७,२७९, ३१८, ३३९, ३४१—३४४, ३५०, उदारामपेठ–३४५.

उद्योगधंदे–७.

उपराई–२७८.

उमरखिंड–१७७,३४७.

उमरखेड–गोपिकाबाईस चोळीबांगडी ३४,१९४,१९७,२३५, २३६,२७९,२९९,३९५,

उमरावती-जहागीर ७,८,१७,५०, १७९, २४२, २३५, १३९, ३१०,३७५,३९४,४०६.

उमाजी विनायक–३८९,३९२, ३९३.

उंबरखेड–( उमरखेड पहा ) ३४.

ऋ.

ऋद्धपुर ( रिथपुर )- ४.

ऋषभदेव–१४.

ए.

एकलासखान–१७४.

एदलाबाद–४०२.

एडमंडस्टन–२५८.

एलिचपूर–( अचलपूर )–उद्योगधंदे ७, वर्णन ५७,७०,७१, लढाई, ७२ अल्ला खिलजीची स्वारी ८१-८४,९१,९३,१०४, १२१, १२४, १४१, १४२, २३३, २३५, २४२, २७३, २७४, भोलाराम २७९, इमारती ३०६,३०७,३१०,३८२, ३८३,३८७,४०१,४०४— ४०८, ४११, ४१४, ४१५, एलिचपुरचे नबाब १८१,१९५, ३५३–३५६, ३५८, ३६२, ३६५, ३६८, ३७५, ३७७, ३७८.

एरंडोल–२०२.

एल्फिस्टन–२२६.

## ऐ.

ऐनी अकबरी–२२,१३१,१३३.

## ओ.

ओडिसा–३९९.

## औ.

औरंगजेब–१४१,१४३,३०८, ३११,३४३,३४५,३४७, ३५०.

औरंगाबाद–१३५, १४१, १४६, १४८, १७०, २१५, ३३१, ३३२, ३३५, ३४२, ३४७, ३८४, ३८५, ३८७, ३९०, ३९८.

## अं.

अंबिकाबाई–१६८,३३०, ३३१.

अंबिकापुर–५३.

अंजनगाव (सुरजी )–१२१,३७५, ३८०.

अंशुमान् पर्वत–१४.

## क.

कटक–१८२,३८१, ३८८,३९९, ४०९.

कडकबिजली तोफ–३०९.

कनकापूर–तह १९४,३९८.

कार्निंगह्याम–२७,६३.

कमळदीपुर–४१२.

कमलाकर–४१,४५.

कमलपुर–३३.

कमरुद्दीन–मीर–निजाम—१४४.

कमालजंग–३०८.

कर्नाटक–६०.

कर्झन–२४२.

कर्नुल–३६१.

करतलबखान–३४६,३४७.

करवली– ३१२.

करजगांव–८.

करंजी–३१.

करवंडकर देशमुख–२१७.

करीमखां–३५६.

कल्याण–३४७.

कलिंग देश–२२.

कळमनुरी–१८६ ( मोकासा ).

कळंब–५५,१३४, १८०, २३९.

कळंबगव्हाण–२०७.

कवि–( वऱ्हा. मराठी ) २९०—३००.

काटसुरा–लढाई–३५९,४०८.

कान्होजी भोंसले–१४७,१७९, १८०,१८२,१८३ कैद१८४, ३७९,३८०.

कापालिक–६०.

कामधेनु ( टिकाग्रंथ )–४६.

कामबक्ष–१४३.

कामिलखान–११५.

कायर बोरी–४०२.

कारंजा–८,५६, प्रतापरावानें लुटलें १७२, १७३, कस्तुरीचं

ई.

ईरिजखान–१४३.

ईल राजा–७०,२७३,३०५.

ईवाजखान–( निजामाचा चुलता ) १४५.

उ.

उटी–(ब्रह्मचारीबुवाची )–२७९

उत्तमश्लोक–२७९,२९५.

उद्धवसुत–(समर्थचरित्रकार)२७९,

उद्धवराव–१७५,३४१,३४२, ३४४,३५१.

उदगीर–लढाई १९१,१९२, १९३,१९४,३७६.

उदाराम राजे—१५५,१५६, भातवडीचा छापा व पलायन १६५,रायबागीण १७४,१७५, उद्धवराव १७५, जगजीवनराव व बाबूराव १७६, रायबागीण व पंडिता हे किताब १७६, रायबागिणीची शिवाजीवर स्वारी १७६,१७७,२७९, ३१८, ३३९, ३४१—३४४, ३५०, उदारामपेठ–३४५.

उद्योगधंदे–७.

उपराई–२७८.

उमरखिंड–१७७,३४७.

उमरखेड–गोपिकाबाईस चोळीबांगडी ३४,१९४,१९७,२३५, २३६,२७९,२९९,३९५,

उमरावती-जहागीर ७,८,१७,५०, १७९, २४२, १३५, १३९, ३१०,३७५,३९४,४०६.

उमाजी विनायक–३८९,३९२, ३९३.

उंबरखेड–( उमरखेड पहा ) ३४.

ऋ.

ऋद्धपुर ( रिथपुर )-४.

ऋषभदेव–१४.

ए.

एकलासखान–१७४.

एदलाबाद–४०२.

एडमंडस्टन–२५८.

एलिचपूर–( अचलपूर )–उद्योगधंदे ७, वर्णन ५७,७०,७१, लढाई, ७२ अल्ला खिलजीची स्वारी ८१-८४,९१,९३,१०४, १२१, १२४, १४१, १४२, २३३, २३५, २४२, २७३, २७४, भोलाराम २७९, इमारती ३०६,३०७,३१०,३८२, ३८३,३८७,४०१, ४०४—४०८, ४११, ४१४, ४१५, एलिचपुरचे नबाब १८१,१९५, ३५३–३५६, ३५८, ३६२, ३६५, ३६८, ३७५, ३७७, ३७८.

एरंडोल–२०२.

एल्फिस्टन–२२६.

### ऐ.

ऐनी अकबरी–२२,१३१,१३३.

### ओ.

ओडिसा–३९९.

### औ.

औरंगजेब–१४१,१४३,३०८,
३११,३४३,३४५,३४७,
३५०.

औरंगाबाद–१३५, १४१, १४६,
१४८, १७०, २१५, ३३१,
३३२, ३३५, ३४२, ३४७,
३८४, ३८५, ३८७, ३९०,
३९८.

### अं.

अंबिकाबाई–१६८,३३०, ३३१.

अंबिकापुर–५३.

अंजनगाव (सुरजी )–१२१,३७५,
३८०.

अंशुमान् पर्वत–१४.

### क.

कटक–१८२,३८१,३८८,३९९,
४०९.

कडकबिजली तोफ–३०९.

कनकापूर–तह १९४,३९८.

कानिंगह्याम–२७,६३.

कमळदीपुर–४१२.

कमलाकर–४१,४५.

कमलपुर–३३.

कमरुद्दीन–मीर–निजाम—१४४.

कमालजंग–३०८.

कर्नाटक–६०.

कर्झन–२४२.

कर्नुल–३६१.

करतलबखान–३४६,३४७.

करवली– ३१२.

करजगांव–८.

करंजी–३१.

करवंडकर देशमुख–२१७.

करीमखां–३५६.

कल्याण–३४७.

कालिंग देश–२२.

कळमनुरी–१८६ ( मोकासा ).

कळंब–५५,१३४, १८०, २३९.

कळंबगव्हाण–२०७.

कवि–( वऱ्हा. मराठी ) २९०—
३००.

काटसुरा–लढाई–३५९,४०८.

कान्होजी भोंसले–१४७,१७९,
१८०,१८२,१८३ कैद१८४,
३७९,३८०.

कापालिक–६०.

कामधेनु ( टिकाग्रंथ )–४६.

कामबक्ष–१४३.

कामिलखान–११५.

कायर बोरी–४०२.

कारंजा–८,५६, प्रतापरावानें लुटलें
१७२, १७३, कस्तुरीची

आख्यायिका १७२, भवानराव काळूंचे ठाणें १९५, २७४, २७७रोकडा रामाचा मठ२७९, ४०४,४१०.
कालिदास–६०.
कावडसेन–( कंवरसेन ) १५५.
काशी–३८७.
काळाकोट–३३८.
काळी–२५५.
काळू घराणें–३९९, ( भवानी काळू, पाडुरंग काळू वगैरे पहा).
काळे–( दाणी )–सावकार–४११.
कासीम बरीद–११०.
कांडली–७२,३५५,( जहागीर ).
किनगांव जट्ट–जहागीर भोंसले १९४.
किनगांव राजा–१७०,३३७.
कीचकदरा–२५.
कुतुबशहा–११७.
कुमारील भट्ट–३४.
कुंजरपर्वत–१२,५०.
कुंडकल्पलता–ग्रंथ–४३.
कुंडनमल–३७३,३७६.
कुंडिनपुर–१२,१३,१७,२१,५२, ५३.
कुंतल–देश–२६,२८.
कुंतिभोज–१३.
कुंभारी–१९५,४०३,४०४लढाई.
कुराण–३७१,३७२.
कुरुंदवाडकर–पत्र–२१३.
कुवारचंद बुंदेला सरदार–१४९.
कुशावर्त–१४.
कृष्ण–( श्री )-१६,१९.
कृष्ण–ज्योतिषी–४८,४९.
कृष्णदेव–( यादव )–७५.
कृष्णाजी अनंत–( पेश कमाविसदार )–३५०.
कृष्णाजी गोविंद–(वऱ्हा. सुभेदार) ३८१,३८७,३८८.
केतना नदी–२०१.
केनी–इं.–सरदार–२०८, २११.
केशवराव–( मोंगलांचे पदरचा ) १९३.
केशवराव–( एलि. नबाबांचे पदरचा )–३७३,३७४,४०९.
कोशिनी–१५.
केसोपंत वकील–२१६,२१७.
केळापुर–२९९.
कैकाडी–४.
कैशिक–१४,१६,२०.
कैशिकी वृत्ति–२९.
कोठेकर–( अनंतराव धोंडिराज ) ४०९.
कोतुळकचे तळें–३२३.
कोथळी–१२९.
कोन्हेरराम–१८३,३८१.
कोन्हेरपंत–मुजुमदार–३८१.
कोरकू लोक–४,११,१३५.

कोरके–४११.
कोलाम लोक -४,११.
कोसल देश–२७.
कोळसा–दगडी–७.
कोंडाबाई जाधवराव–३३६.
कौंडिन्यपुर–१३ कुंडिनपुर पहा.
कौंडिण्य ऋषि–१३.
कंपू ( ची फौज )–२१६,२१७.
कंबरसेन–१५५.
क्रथ } १४,१६,२०.
क्रथकैशिक }

ख.

खटकाळी–४१६.
खडकपूर्णा–२.
खनिजपदार्थ–६.
खरड्याची लढाई–१९७, खर्डा ३६०.
खलफखान–१०५.
खंजरखान–१३६.
खंडागळ–हत्तीवरून भांडण-१४७.
खंडेराव ( उदाराम )–३५१.
खंडेराव काशी न्यायाधीश–मोकाशे –१८६.
खंडेराव दाभाडे–१४७.
खंडेराव बल्लाळ–३०४.
खंडुजी करांडे–४०३.
खंडोबा–२१७.
खंडो मुकुंद–४११.
खाजा महंमद गावान–१०६, १०७.
खान आजम–मीर आजम–१२४.
खान खानान–१२८ ते १३२, १३७.
खान जमान–१३८, वऱ्हाडचा सुभेदार–१७३.
खान जहान तुर्क–१०६,१०७, १३७.
खान जहान उर्फ अबदुल कादर– ९७.
खाने जहान–इमदाद–उल्–मुल्क– १३८,१३९.
खान डौरान–१४१,१४२.
खामगांव–२३२,
खिडकी–१३५,१३६.
खिलजी–७९,८३ राज्यकारभार– ८४.
खुदावंत खान-१०९,११०,११५, ११६,१२७.
खुमानासिंग–४१६.
खुरम–१३५.
खुशालसिंग–४१५,४१६.
खेरला ( गोंडराज्य )–९३,१०७, १२५,२९८,२९९.
खेरडा, खेलडा, खेडले,–फत्तेखेर्डा पहा.
खेरला–१८०,१३४.
खोळापूर–१२१,३७७.

आख्यायिका १७२, भवानराव काळूंचे ठाणें १९५, २७४, २७७रोकडा रामाचा मठ२७९, ४०४,४१०.
कालिदास-६०.
कावडसेन-( कंवरसेन ) १५५.
काशी-३८७.
काळाकोट-३३८.
काळी--२५५.
काळू घराणें-३९९, ( भवानी काळू, पाडुरंग काळू वगैरे पहा).
काळे-( दाणी )-सावकार-४११.
कासीम बरीद-११०.
कांडली-७२,३५५,( जहागीर ).
किनगांव जट्टू-जहागीर भोंसले १९४.
किनगांव राजा-१७०,३३७.
कीचकदरा-२५.
कुतुबशहा-११७.
कुमारील भट्ट-३४.
कुंजरपर्वत-१२,५०.
कुंडकल्पलता-ग्रंथ-४३.
कुंडनमल-३७३,३७६.
कुंडिनपुर-१२,१३,१७,२१,५२, ५३.
कुंतल-देश-२६,२८.
कुंतिभोज-१३.
कुंभारी-१९५,४०३,४०४लढाई.
कुराण-३७१,३७२.
कुरुंदवाडकर-पत्र-२१३.
कुवारचंद बुंदेला सरदार-१४९.
कुशावर्त-१४.
कृष्ण-( श्री )-१६,१९.
कृष्ण-ज्योतिषी-४८,४९.
कृष्णदेव-( यादव )-७५.
कृष्णाजी अनंत-( पेश कमाविसदार )-३५०.
कृष्णाजी गोविंद-(वऱ्हाड सुभेदार) ३८१,३८७,३८८.
केतना नदी-२०१.
केनी-इं.-सरदार-२०८, २११.
केशवराव-( मोंगलांचे पदरचा ) १९३.
केशवराव-( एलि. नबाबांचे पदरचा )-३७३,३७४,४०९.
कोंडिनी-१५.
केसोपंत वकील-२१६,२१७.
केळापुर-२९९.
कैकाडी-४.
कैशिक-१४,१६,२०.
कैशिकी वृत्ति-२९.
कोठेकर-( अनंतराव धोंडिराज ) ४०९.
कोतुळुकचे तळें-३२३.
कोथळी-१२९.
कोन्हेरराम-१८३,३८१.
कोन्हेरपंत-मुजुमदार-३८१.
कोरकू लोक-४,११,१३५.

कोरके-४११.
कोलाम लोक-४,११.
कोसल देश-२७.
कोळसा-दगडी-७.
कोंडाबाई जाधवराव-३३६.
कौंडिन्यपुर-१३ कुंडिनपुर पहा.
कौंडिण्य ऋषि-१३.
कंपू (ची फौज)-२१६,२१७.
कंबरसेन-१५५.
क्रथ } १४,१६,२०.
क्रथकैशिक }

ख.

खटकाळी-४१६.
खडकपूर्णा-२.
खनिजपदार्थ-६.
खरड्याची लढाई-१९७, खर्डा ३६०.
खलफखान-१०५.
खंजरखान-१३६.
खंडागळ-हत्तीवरून भांडण-१४७.
खंडेराव (उदाराम)-३५१.
खंडेराव काशी न्यायाधीश-मोकाशे -१८६.
खंडेराव दाभाडे-१४७.
खंडेराव बल्लाळ-३०४.
खंडुजी करांडे-४०३.
खंडोबा-२१७.
खंडो मुकुंद-४११.
खाजा महंमद गावान-१०६, १०७.
खान आजम-मीर आजम-१२४.
खान खानान-१२८ ते १३२, १३७.
खान जमान-१३८, वऱ्हाडचा सुभेदार-१७३.
खान जहान तुर्क-१०६,१०७, १३७.
खान जहान उर्फ अबदुल कादर-९७.
खाने जहान-इमदाद-उल्-मुल्क-१३८,१३९.
खान डौरान-१४१,१४२.
खामगांव-२३२,
खिडकी-१३५,१३६.
खिलजी-७९,८३ राज्यकारभार-८४.
खुदावंत खान-१०९,११०,११५, ११६,१२७.
खुमानसिंग-४१६.
खुरम-१३५.
खुशालसिंग-४१५,४१६.
खेरला (गोंडराज्य)-९३,१०७, १२५,२९८,२९९.
खेरडा, खेलडा, खेडले,-फत्तेखेर्डा पहा.
खेरला-१८०,१३४.
खोलापूर-१२१,३७७.

खोलेश्वर–७४.

. . . : . ग.

गजाजीपंत–४११.
गणपतीनाथ–२९७.
गणपतसिंग–४१६.
गणितामृतलहरी (ग्रंथ)–५०.
गणेश–४३.
गवळीगड–२०६.
गंगथडी–४०९.
गंगाधर–४५.
गंधमादनपर्वत–१७.
ग्रहफलोत्पत्ति (ग्रंथ)–४३.
ग्रहलाघव टीका ( ग्रंथ )–४४.
ग्रहलाघवोदाहरण ( ग्रंथ )–४३.
गाजीउद्दीन फेरोझजंग—१४३, १४४.
गाजीखान–२१५.
गावान–खाजा-महमद गावान पहा.
गाविलगड (किल्ला)–पूर्ववृत्त, ९७, ९९, १००, सुभ्याचें ठिकाण १०८,१०९,१११, (गावील) ११६, १२१, १२४, १३१, १३४, भोंसल्यानें घेतला १९४, गाविलगडची लढाई २०६–२११,२३६, किल्ल्याचें वर्णन३०९–३१०, इंग्रजांनीं घेतला २६२, ( मौल्यवान कुराण ) ३७२, ( जयाजीची नेमणूक ) ३८०, ३९१ मोंगलांच्या लष्करावर हल्ला ४०५, ४०९,४१३.
गांव–८६.
ग्वालेर किल्ला–१३३.
गिरजाबाई–लुकजी जाधवरावाची बायको–१६७,३२३.
गिरवली–३१३.
गिलू ( मेजर )–३०१,३०३.
गुजर ( नागपूरचे )–३८१,४०२, ४०३.
गुजाबा दादा गुजर–४०६.
गुरू गोविंदसिंग–२३७.
गुलबुर्गा–८४,८८.
गुलाबसिंग रजपूत–बंड १९६.
गुलाम हसन अलिखां–३६७, ३६८, ३७०, ३७१, ३७६, ३७८.
गोचरस्वामी (साधू)–२७९.
गोंड–४,९३,९४,१३५,गोंड राजे ४१४, गोंडवण ११,१८०, १८२.
गोदावारी–५४,८८.
गोपाळनाथ–२९७.
गोपाळराय–९४.
गोपाळराव–३९२, ३९३, ३९६, ३९७.
गोपिकाबाई–मोकाशे–१९४.
गोमाजी नाईक पानसंबळ–१६९.
गोरेगांव–१५०.

गोल्डास्मिथ—२६९.
गोलग्राम ( गोळेगांव )—४३.
गोवळकोंडें—१७०,११७.
गोविंद—४८
गोविंद कवि वणीकर—२९८.
गोविंद देव जाधव—३११.
गोविंदनाथ—२९७.
गोविंद बक्ष-राजा—२२२,२३१.
गोविंदराव (देऊळगांव राजा)—३३६.
गोविंदराव गायकवाड—३९०.
गोविंदराव मुकुटराव—४०३.
गोविंद शिवराम खाजगीवाले—३९७.
गोसावी नंदन—१५५,२९७.
गौडीय (रीति )—२९.
गौतमनाथ—२९८.

घ.

घटाटे—४११.
घराणीं (वऱ्हाडांतील प्रसिद्ध)—४१०—४१७.
घाट—२ ( रोहिनखेडचा ) १०४.
घाटगे—निजामशाही सरदार—३१७,४०३.
घाटबोरी—१०४.
घीसेखां—३६८,३६९.
घोनसर—शिवेचा तंटा १८७.
घोरपडे—४०३.

च.

चतुर्वर्ग चिंतामणि ( ग्रंथ )—३६, ७६.
चम्मक—१०, ताम्रपट ६३,६४, ६९.
चंगदेव—३६,४०,७४.
चंगीसखान ( मुर्तिजा निजामशहाचा प्रधान )—१२०.
चंदुलाल ( राजा )—२२२,२२४ ते २२६, मृत्यु २२८,२५४, ३६४.
चंद्रपूर ( अथवा चांदा )—११, ६७,३८८,३९२,३९३,३९५ ३९६, ४०१, ४०२, ४०४, ४०७.
चंद्रसेनजाधव-१४६,३१६,३१९.
चंपूरामायण ( ग्रंथ )—१४,३८.
चाकण—१६३.
चामर्स—२०८,२११.
चालुक्य—५८,७३,७९.
चावरद—४१२.
चांडस—५५.
चांदबिबी—१२८, १२९, १३१, १३२, मृत्यु १३३,१५९.
चांदा ( चंद्रपुर पहा )—९३,१८० १८२.
चिखलदरा—हवा ३, उंची ३.
चिखली—३४२,२७४,३७९.
चितोर—१३४.

चितु पेंढारी–३६२.
चित्रसेन–१४.
चिनकिलिचखान–१४२.
चिनी दरवाजा–३४५.
चिमणाजी दामोदर–१७८.
चिमूर–३८१.
चिवरे–३४१.
चिंचपूर–शिवेचा तंटा१८७.
चिंचांबें–लढाई–२३०.
चिंतामणि–४२,४६.
चुकोती–२१६,२१८.
चुनखडी–७.
चेदिदेश–१६.
चैनासिंग–२१८.
चौथाई–सरदेशमुखी–१७०,१८१
१९६,३८३.

छ.

छत्तिसगड–३८२,३८८,४०९.
छत्रपति—चे मोकासे १८७.
छादक निर्णय ( ग्रंथ )–४९.

ज.

जगजीवनराव–३४४,३४५,३४६,
३५१.
जगदीशराव–३५१.
जगदेवराव ( गुजर )–४०६.
जगदेवराव ( जाधव. )–१६७,
रुस्तुमराव किताब१६८,३२३,
३२५,३३८.
जगन्नाथ ( राजा )–१३०.
जनकोजी शिंदे–( कमावीसदार )
१८८.
जफीरुद्दुला–३५५, ३५६,३५९.
जमदग्नि–५१.
जमालखान–१२५,१२६.
जयपूर–४७.
जयपूर–( कोथळी ) घाट १२९,
१३२.
जयवंतराम–३७४.
जयसिंग–( राजा ) १४३,३१०.
जयाजभाई–३८०,३८१.
जलग्राम–५७ ( जळगांव पहा. )
जल्हण–७५.
जसवंत ( लुकजीचा मुलगा )–
३३९.
जसवंतसिंग–१७१.
जहागिरी–२६३,२६४.
जहांगीर–४९,१३५,१३८.
जळगांव जामोद–( अथवा जल-
ग्राम. )—लूट २३३,२३८,
४०४.
जातक पद्धति ( ग्रंथ )–४६.
जातकाभरण ( ग्रंथ. )–४३.
जाती—लोकवस्तिचें प्रमाण ४.
जाधव–८०,३११,३१२.
जाधवराव—राजे १३३,१३६,
१३८,१५५,१५६,१५८,—
लुकजी १५९—१६७.

ना.इ. १२८०

जानेफळ—२४२, २९९, ३३२, ३३७,३३८,४११.
जानोजी ( भोंसले )–१९१,१९५, ३५७,३८०–३८३,३८७—३९०,३९२,३९५–४००.
जाफरखान ( हसन )–८४.
जाफराबाद–१८६,२०२;३०८.
जामगड–४१६.
जामसिंग–४१६.
जामोद–१२२,२३८.
जामोदी–३६६.
जालना ( पुर )–१२९,१३०, लढाई १३१,१४०, मोकासा १८६, शिंद्यांचा अंमल १८८, २०२,२३६,३७९.
जालंदरनाथ–-समाधी २७८.
जिजाबाई–१५८,१६१,लग्न१६३, १६५, शिवाजीचा जन्म१६६, १६७,१६८,३२६.
जितगड–४१६.
जिफिरुद्दवला–( ऊर्फ धवसा. ) ४०३.
जिवबा बक्षी–३६१.
जैत्रपाल–४०,७३.
जोगाईचें अंबे–२९८.
जोरावरखान–२१५.
ज्यौतिषग्रंथकार–वऱ्हाडांतील. ४०.

झ.

झामसिंग—२०६, २०७, ४०५, ४०९.

ट.

टापरगांव–४५.
टॉमसब्राउन्–३७५.
टेंपल ( सर रिचर्ड )–२३३.
टेलर ( मेडोज )–५३.

ठ.

ठाकूरजी जाधव–३१२.

ड.

डावरगांव–३१३.

त.

तघलख–८३,८४.
तपोवन–५०.
तर्फ–८८.
तळेगांव ( दशसहस्र )–४११.
तक्षिमदार–२५७,२६७.
तंजावर–करवंडकर देशमुख २१७.
तंट्या भिल्ल–२३५,३६२,४१५, ४१६.
ताईबाई–३८७.
ताजिक पद्धति ( ग्रंथ )–४३.
तात्या टोपी ३०९.
ताम्रपट–चम्मक–६४, ६५ शिवणी ६६.
ताराबाई–१५१,३३०,३३१.
तारानाथ ( तर्कवाचस्पति )–२३.

तारासिंग–४१६.
तालीकोट—लढाई ११९.
तालेमनखां–३७८.
तिवरखेड–७२.
तुकाबाई ( शहाजीची बायको ) १६७.
तुपकर–४११.
तुफालखान–११८—१२३.
तुळाजाऊ–३३८.
तेलीगड–३०८.
तेलंगण–८८
तैमुरलंग–९९.
तोडरमल–४८,१३३.
त्रिंबकजी राजे–३८१.
त्रिंबकराज–२९९.
त्रिंबकराव कोन्हेर ( परभू )–३८८.
त्रिंबकराव मामा पेठे–३३१,४०५.
त्रिविक्रम भट्ट–३८.

थ.

थळझाडा–१८८.

द.

दण्डी ( कवि )–५९.
दत्ताजीराव जाधव–३११,३१५, ३१७,३२९,३३७,३४०.
दत्ताजीराव शिंदे–३८४–३८६.
दधिग्राम ( दहीगांव पहा ) ४८.
दम–१४,१५.
दमन–१५,५१.
दमयन्ती–१४,१५.
दमाजी गायकवाड–१४७.
दयाळनाथ–१९७.
दराबखान–१३६,१३७.
दर्याखान–१०७,१३९.
दर्यापूर–११७,१९३.
दर्याबाई–( जानोजी भोंसल्याची स्त्री ) १९५,३५७.३९९–४०१, ४०३–४०७.
दर्याबाद–११७.
दर्यावसिंग–२०७.
द[illegible]कुमार चरित ( ग्रंथ )–५९.
दशराथ ( राजा )–१६.
दहींगांव ( पूर्णा )–४८.
दहीहांडा–६.
दळवी–३४०.
दक्ष–१४.
दंडकारण्य–११,१२,२१,५४.
दाउदखान-९०,९१,१७४,३४७, ३७७,३७८.
दाढी–( गांव व नदी ) १७.
दाताळा–२३७.
दादाजी–३३९.
दादासाहेब पेशवे ३८८,४०५, ४०७.
दानासिंग–४१६.
दानियल–१३२,१३५.
दाभाडी–२१५.
दामाजीपंत–२५४.
दारव्हें–१८१,३८२,३८३.

दाराशुको-३४३.
दावल-२७७.
दांत-१५.
दिलावरखान-१४५,१४६,१४८.
दिवाकरपंत चोरघोडे (अथवा देवाजीपंत)—१९७,३८१, ३८२,३९४, ३९७, ४००, ४०२,४०४,४०८,४१०.
दिवाकरपंत (दिवाण)-३८९.
दीपाबाई-२१७.
दीक्षित (शंकर बाळकृष्ण)-५३.
दुर्गाऊ-३३१.
दुदांडी-३६६.
दुला दर्गा-३६८,३६९.
दूलारहिमानशहा-७१,७२,३०६, ३५५.
देऊरवाडा-५७.
देऊळगांव (राजा)-८,१४०, १७०, १८८, १८९, ३११, ३२९,३३३,३३७.
देऊळगांव (साकरशा)-२७४.
देउळघाटघाटवेस-१२६, मोकासा १८६,४०५,४१३.
देरिया-११७,११८,१२३.
देवगड-११,९३,१४२, १८०,-हून यशवंतराव होळकरांचें पत्र १९९, २००, २३६, २७४, शिवादिन केसरीचा मठ २९७.
देवगांव२०७,-चा तह २११, ४१८.
देवगिरी-दौलताबाद पहा.
देवजी गवळी-२१८.
देवदास बडनेरकर (समर्थ शिष्य) २७९.
देवघाबें-४१२.
देवनाथमहाराज-१५५, २७९, २९५,२९६.
देवलदेवी-८२.
देवळी-७२.
देवाजी डोंगरदेव-४०६.
देवादित्य-३९.
देशपांडे-२५२,२५३.
देशमुख-२५२,२५३.
देसाई-३३३,३३५.
दो अमली कारकीर्द-१९५,३८४.
दौलतराव नरसिंह-४०९.
दौलतराव शिंदे-२०१,२०३.
दौलताबाद-२७,३६, ३७, ७३, ७९-८१,८३,८४,८८,१३९-१४१, १६३, १६६, १६७, ३११,३३२,३७७, (देवगिरी पहा.)
द्रुम-(ऋषी)-१६.
द्वारका-१३.

### ध.

धनाजी जाधव-१६९,३२८,३२९.
धरणगांव-४१२.

धर्मपूर-४५.
धवसा-३५८,३५९,४०४,४०८.
धानोरा-३७५.
धाराशिव-१२६,२४१.
धावडशीकर—( ब्रम्हेंद्रस्वामी ) २७९.
धुंडीराज—( ब्राम्हण सरदार ) ३१७.
धुंडिराज-( ग्रंथकार ) ४३.
धूळघाट-४१६.
धोत्र-७३,३०२,४१०.

न.

" नऊगज तोफ "-३०९.
नगर नाईक काळे-४१०.
नद्या-वऱ्हाडांतील ५१.
नरनाळा-हवा ३,-उंची ३,९९, १११, ११८, १२१, १३१, १३४, १६४, १८०, २३६, ३०६, किल्ल्याचें वर्णन-३०७ -३०९,३७५,३८०,४१३.
नरसिंग देव-९३,९४,१०३.
नरसिंगपूर-९३.
नरसिंगबुवा-२७६,२७९.
नरसिंगराय-( खेरला येथलि राजा) १०१.
नरसिंगराव-सुभेदार २१५.
नरहरिनाथ-२९७.
नलचम्पू-( नलोपाख्यान ) १६, ३८,-ची आख्यायिका ३९, ४०.
नलदुर्ग-२३१,२४०-२४२,३८७.
नलराजा-१५.
नवघरे-४११.
नवलसा लाड १८९,३३४.
नवसाजी नाईक-२३५.
नवांकुरा-( ग्रंथ )४९.
नसीखान-१०३,१०५.
नंदुरबार-८३.
नाईक-२३३-२३५.
नागनाथ-४१.
नागपूर-११, ९३, १४२, ३५३, ३८०-३८२,३८८,४००—४०२,४०४,४१०,४११.
नागार्जुन-२७३.
नागेश दैवज्ञ-५०.
नाथपंथ-१५४.
नादीरशहा-४१३.
नाना फडणीस-वऱ्हाडांतलि सुरंगली व इतर गांवें निजामाकडून जहागीर १९३,३९६, ४०८,४०९.
नानासाहेब पेशवे-१९४,३३१, ३८१,३८४,३८६,३८७.
नानासाहेब-( साधू पातूरकर. ) २७९.
नामदारखां-( एलिचपूरचा नबाब) २०४,३६४-३६७,३७८.

नामदारबाग–३६६.
नायकांचा झेंडा–४१०.
नारायण–( ज्योतिषी ) ४५,४९.
नारायणराव—३५१.
नारायणराव पेशवे–४०५.
नारो त्रिंबक हणमंते–१६९.
नासिरजंग ३५४.
नासिरुद्दिन–८३,८४.
नासिरुद्दौला ( निजाम )–२२७.
नांदगांव रहाटगांव–३४९.
नांदीपूर ( नांदुरा )–७२.
नांदूरा–८.
नांदेड–मोकासा १८६,–शीखांचें स्थान २३७,३७९.
निजाम–१९८,४०८.
निजामअल्ली–१९२, ३८२-३८७.
निजाम अल्लीखान–१४४–१५१.
निजामशहा ( बहामनी )–१०६.
निजामुल्मुल्क १४२, १४३,३३०, ३३१, ३५०, ३५४, ३८४, ४१२.
निमगांव ( नांदूरा )–३८३.
निराजी–१७४.
निर्मळ–३९७,४०३.
निलजगांव–३१३.
निषधदेश–१५.
निंबाळकर–१६१, २१५, ४०३.
नीलकंठ ( फलज्योतिषी )–४६.
नीलकंठी ( ग्रंथ )–४७.
नीळकंठराव भानवसे–३१३.
नृग ( राजा )–५१.
नृसिंह ( ग्रंथकार )–४५.
नृसिंहचम्पू ( ग्रंथ )–४३.
नृसिंह दैवज्ञ–५०.
नेमिवंत ४१२, विनायकराव ने— ४१३ श्रीविनायकराव ने.— ४१३, नेहंगखान–१३२.
नौलोजी नाईक–४११.

प.

पटवर्धन–३९६.
पडतूर–३१४.
पदव्या—निजामाचे राज्यांतील २२९.
पद्मपूर–३३.
पद्माजी–साधू–२७९,३४२.
पद्माकर–१४.
पद्यामृततरंगिणी ( ग्रंथ )–४३.
पनवेल–३४७.
पयोष्णी ( अथवा पूर्णा नदी ) २, १२,५१,१४६,३०३.
परगणा–८६,८७.
परतवाडा–३६२,३६९.
परभणी–२३२.
परवीज–१३७.
परशुराम–१६.
परशुरामभाऊ–३६१.
परसोजी भोंसले–भाम येथें ठाणें

१७१,-शाहूस मिळाला १८० मोकासे १८०,४१०.
परिंडा-१४०.
पवनार-१३४,१८०.
पवार-३८६.
पंचगव्हाण-३८७.
पंचोत्रेकर-२१८.
पंचांगफल ( ग्रंथ )-४३.
पंडिता ( किताब )-३४६.
पाइनगंगा-२,२३६,३०३.
पाइनघाट ( अथवा पायांघाट )-२,१४१.
पांचगांवची-लढाई--४०७.
पाटण-७४.
पातुरडी-अडगांवची लढाई २०४.
पातुर-१०, लूट २३३, २३७, २७३,२७९,३०४.
पाथरी-४०, ४१, ११४, ११९, १३०,१३४, मोकासा १८६, २८०,३९७.
पानसंबळ-१६९.
पान्हेर-४१२.
पामर आणि कंपनी-२२४,२२६.
पारडी--२१५.
पारोळेकर-३८८.
पार्लमेंट-हेस्टिंग्जची चौकशी १९६.
पालंपट-२६३.
पांचाली ( रीति )-२९.
पांडवगड-१८३.
पांडुरंग गणेश काळू-१६६,४०९.
पांडे-२६९.
पांढरकेवडा-३९२,३९३.
पांढरझाडा-१८८.
पांढरी-२५५.
पिजगांव-७,३१२.( पैठण पहा )
पिटमन् ( मेजर )-२३५.
पिराजी नाईक ( निंबाळकर )-३८९,३९१.
पिंजर-११,३०४,३८७.
पिंपरी-७२.
पिंपळगांव-ची लूट २३३.
पिंपळगांव देवी-२३७.
पिंपळगांव राजा ५०
पीयूषधारा-( ग्रंथ ) ४८.
पीरफत्ते दरवाजा २०८.
पुणें-जहागिर १६३,३३४,३८१, ३८२,३९७.
पुण्यवर्मा-५९.
पुतळी-१८७.
पुरणमल-२२८, २३१, २३२, ३७३,३७६.
पुरंदर-चा तह १७१.
पुलादखान ९२.
पुष्यमित्र-६०.
पुसद-३०४.
पूर्णा-( दक्षिण ऊर्फ खडकपूर्णा नदी. ) २,१४८.
पेठ-( उदाराम )३४५.

पेरन्-( फ्रेंच सरदार ) २०१.
पेशवे-९२,निजामाची वऱ्हाडांत जहागीर १९३, भोंसल्याशीं लढा १९६, अडगांवची लढाई २०४,३५०,३८२.
पेस्तनजी-२३१,२३२.
पेंढारी-२०४,२१६,२३३.
पैठण-७९,३३१.
पोतनीस-४११.
पोते-२६९.
प्रणीता-( पाइनगंगा ) ५१.
प्रतापराव गुजर-१७१,१७४.
प्रतापरुद्र मानेराव-२१७.
प्रतापवंत-( राजेबहाद्दर विठ्ठल सुंदर )-१९२.
प्रतिनिधी-निजामाची वऱ्हाडांत जहागीर-१९३.
प्रतिष्ठान-२७.
प्रमोदसिंग-२०७,४०९.
प्रद्युम्न-१८,१९.
प्राचीन स्थानें-वऱ्हाडांतील-५०-५७.

फ.

फजलउल्ला अंजु-९५.
फजलउल्ला शिराशी-९४.
फत्तेउल्ला इमादशहा-१०७,१०९, ११०-११२, २०६, २८०.
फत्तेउल्ला इमादुल्मुल्क-१००, ३०९.
फत्तेखान ( मलिकंबराचा पुत्र )- १३८, १६६, ३२२, ३२५.
फत्तेखेर्डा-१२७,लढाई १४८—१५०,१८०,१८८,२१५, लूट २३३, २३६, २७९, २९१, जहागीर ३१४,३३२, ३५४.
फत्तेजंगखा-३६३-३६५, ३६७.
फिरोजजंग-१४३.
फिरोजशहा खिलजी-८१.
फेरिस्ता, महमद कासीम ( इतिहासकार )-८१,९०,१२५.
फेरुक्शेर-१४३,१८१.
फेरोजशहा-९२-९५.
फेरोजाबाद-९२.
फौरन्-२६९.

ब.

बखतबुलद-३५३.
बडनेर-२७९.
बधनापूर-८,२०२.
बरीद ( अमीर )-११३.
बऱ्हाणपूर-लूट १०५, १२१, १२३, १३५, १४०, लढाई १४४, १४५, १४६, २०२, २३५, २३७, ३४५, ३५४, ३८३,३८८,४१४.
बलराम-१९.
बल्लाळपूर-७.
बलूतें-२७०.

बहलोलखां–३६०, ३६१, ३७८, ४०८.

बहादरखां–३७३,३७४.

बहादूरजी जाधवराव–३१५,३२३.

बहामनी–८६, नाणें ८९–९०, राजे १९२.

बहिरमबुवा–२७७.

बहिरामखां ( निजामशाही सरदार) १२४,२०६,३१०.

बंगस–२१५

बाकाटक–२७.

बाकेखान–१७४.

बाजी देशपांडे–१६८.

बाजी मोहिते–१६७.

बाजीराव (जाधव)–३३२,३३४,–३३७.

बाजीराव (पाहिले)–१४७, मोकासे १८४, रघूजी भोंसल्याशीं चुरस १९०, तह १९१, चौथाईचा तंटा १९७.

बापू करंडा–३९७.

बाबजी जाधवराव–१५१.

बाबजी मानासिंग–३३१.

बाबजी नाईक–१९१.

बाबूराव–३४५—३४८, ३५०, ३६१.

बाबूराव मुजुमदार–३८१.

बाबूराव हरी–३९२,३९३.

बारशी टाकळी—शिलालेख–७७, लूट २३३,३०४.

" बारादरी "–३०७,३६६.

बालकराम ( समर्थशिष्य )–२७९.

बालरामायण ( ग्रंथ )–२१.

बालाघाट–३,८०, १३६, १४१, १४६.

बालाजी–३२९,३३३.

बावनपागे ( सरदार )–२१६.

बावनवऱ्हाड–२२३.

बाहदार–३९९.

बाळाजी बाजीराव–१९१,३५०.

बाळापूर—उद्योगधंदे—७,१०४, १२४, १२९, १३५, १३७, १४३, १४५, १४६, १५४, संभाजीच्या नांवानें जहागीर १७१, कापड १९४, भोंसल्यांचा तळ २०३,२३२,इमारती ३०६,३१०,३५३-३५६, ३५८, ३६५, ३७७, ३७९, ३८०,३८४,४०८.

बिछायती–२५५,२६८.

बिन्नी–३९२.

बिन्नीवाले–३९२.

बिरादर–२५७.

बिशनचंद–२३१,३७४.

बिंबाजी भोंसले–१८३,३८२.

बीचन–३६९.

बीजप्रबोध ( ग्रंथ )–५०.

बीड–४१,१३१,१३८,१३९.
बुक्कराय–९०.
बुद्धधर्म–५८.
बुऱ्हाण इमादशहा–११७.
बुऱ्हाण निजामशहा–११३,११४, १२४–१२७.
बुलक–२०५.
बुलढाणें–हवा ३, उंची ३,८५, छावणी २४०, जिल्हा २४२.
बुसी ( फ्रेंच सरदार )–३८२.
बृहदारण्यकोपनिषत् ( ग्रंथ )–१३.
बृहद्भानु–१४.
बेदर–८८,९१,१०५.
बेनीसिंग–२०६–२११.
बेरटीकर–३४७.
बैतुलवाडी–८८.
बोदड–२१६.
बोधन बेदर–३९७.
बोधसुधाकर ( ग्रंथ )–४३.
बोपदेव—३६,३७, ग्रंथविस्तार ३७,३८.
बोरगांव कंडी–३८३.
बोरडी–३७५.
ब्रह्मावर्त–१४.
ब्रह्मेंद्रस्वामी (धावडशीकर)–२७९.
ब्रह्मेश्वर–३९८.

भ.

भक्तरहस्य ( ग्रंथ )–२७७,२८०, ३४१.
भगवती गीत ( ग्रंथ )–४३.
भगवद्गीता ( टीका ) २७७,
भद्रावती ( भांदक पहा )
भरतखंड–१४.
भरोस–२१७,२१८.
भर्तृहरी–५७.
भवभूति–३३.
भवरगड–१२२.
भवानी आटोळे–४०३.
भवानी काळू–१९५,१९६,३९९, ४००,४०२,४०८,४१०.
भवानीपंत मुनशी–४००,४०१ ४०३,४०९.
भवानी शिवराम–४०८.
भंडारा ( किल्ला )–३९२.
भातकुली–१७.
भातवडी–ची लढाई–१६५,३१७ ३४३.
भानवसे–३१३.
भाम–भोंसल्यांचें प्रथमचें ठाणें १७८, जहागीर १७९, ३७९ ३८०.
भारज–२१७.
भारती ( वृत्ति )–२९.
भालकी–३८५.
भालचंद्रनाथ–२९७.
भाषा–वऱ्हाडांतील–२८१–२९०.
भास्कर पांडित–१८३.
भास्करभट्ट–४०.

भास्करराव ( अथवा भास्करराम ) कोल्हटकर–३८७,३८८.
भास्करवर्मा–५९.
भास्कराचार्य ४०.
भांदक ( अथवा भद्रक, भद्रावती, भानक. ) १२,५६,५९,६७, ७२,२७३.
भिकारीदास–२१७.
भिल्ल–११,३१४.
भिल्लम–७३.
भिंगारा–४१६.
भिमराजा–१४,१५.
भीष्मक–१४,१६,१८.
भुतजी ( ऊर्फ भेतोजी ) ३१२, ३१४.
भुमराळे–भोंसल्यांची जहागीर–१९४.
भैमी–१५.
भैरवगड–१२२.
भैसदेही–२०७.
भोकरदन–( अथवा भोगवर्धन ) ५७,२०२.
भोगवर्धन–( भोकरदन पहा )
भोज–१३,१४,१६,३८,६२.
भोजकट–१२,१७,२०,
भोजदेश–२०.
भोजराज कवि–२०.
भोपाळ–लढाई १९०,४०६.
भोलाराम–( समर्थ सांप्रदायी शिष्य ) २७९.
भोंसले–३१०,३६३,४१०.

म.

मॅककिनान (कॅपटन्)–२०३.
मकला–४१५,४१६.
मजलस–ई–अल्ली–८८.
मदारी (हत्ती)–४०४.
मध्यदेश–१३.
मनोरमा (ग्रंथ)–४५.
मन्याबापू भोंसले–२०३.
“मराठा मित्र”–३११.
मलकापूर–१४०, २३७, २४२, ४१२,४१३.
मलकापूर (पांगरें)-मोकासा १८६.
मलिकंबर–१३३, १३५—१४०, १६४,२५३,३१८,३४३.
मालिककाफूर हजारदिनारी–८२.
मल्लारी–४४.
मल्हारराव होळकर–३९०.
मशीर उल्मुल्क–३८७.
महमद कासीम–(फेरिस्ता पहा).
महमदखान (निजाम सरदार)—१२९,१३०.
महमद तघलख–८३,८४.
महमद रहिमानखान–४१३.
महमद सलामुल्लाखान ( देऊळघाटचे नबाब)–४१३.

महमदशहा (खानदेशचा)—१२१.

महमदशहा (गुजराथचा)–११६.

महमदशहा बहामनी (तिसरा)—१०७.

महमदशहा बहामनी (दुसरा)—९१,९२,११२.

महमदशहा बहामनी (पहिला)—८८–९०.

महमदशहा (माळव्याचा)–१०६, १०७.

महमदशहा (मोंगल बादशहा)–१४४,३५४.

महादजी लष्करी–४०९.

महादेव राजा–७५,८०

महाभारत–२१.

महाभोज–१३.

महार–२६९,२७०

महाराष्ट्र–२०,२१.

महाराष्ट्री (रीती)–२२.

महाल (रंगपंचमीचा)–३३८.

महालदारखान–३२६.

महिपतराम (राजा)–२०४,२२१–२२३,२३१,२६१.

महिपतराव काशी–४०५

महिपतराव दिनकर–३८९,३९२, ३९३, ३९५, ४०२, ४०३, ४०५,४०७,४०८.

महिपतराव नरसिंह धारूरकर—३९९.

महेश्वराचार्य–४०.

मंगरूळ–२१५,४११.

मंगलसिंग–४१६.

मंगलनाथ–साधु २७९

मंदार–१८४,३८०.

माकोडी–४१२.

माणिक दुर्ग–१३४.

मातापूर (माहूर पहा.)

माधवराव निळकंठ (भोंसल्यांचा सरदार)–२०३.

माधराव पेशवे–१५४,३९०,३९२ ३९४.

माधवसेन–६०.

मानपान–२५६,२६७,२६८.

मानभाष–४,२७४.

मानसिंग (ऊर्फ बापजी)–३३१.

मानसिंगराव–३३०, ३३३, ३३५, ३३६.

मानसिंगराव मोहिते–३८८.

मानसिंग राजा–१३७.

मानसिंग रुस्तुमराव जाधव–१६८.

मानूरीचा घाट–१३२.

मानेराव–२१७,२१८.

मारकीनाथ–२७९.

मार्कंडेय–५१,५३.

मार्तंडवल्लभा (ग्रंथ)–४५.

मालगणी–४०५.


2543

मालतीमाधव ( ग्रंथ )–३५.
मालविकाग्निमित्र ( ग्रंथ ) २७, ६०.
मालोजी भोंसले–१६०,३११.
माल्टबी ( कमिशनर )–२५८.
माहूर ( अथवा मातापूर, मातृपूर. ) –४६,५७,९३, १०७, ११५, ११६, १३४, १३७, १७४,, १८०, ३१०, ३४५, ३५३, ३५४, ३९३, ३९५, ३९७, ४०४.
माहेन्द्र ( अस्त्र )–१७.
मितभाषिणी ( ग्रंथ )–४५.
मिथिला–४७.
मियासाहेब–२७६,२७९.
मीयनमंजू–१२८.
मीर आलम–२२०–२२४.
मीरन हुसेन–१२३,१२४.
मीर मुल्लाखां–३५५–३५८.
मीरमुसा फकीर–११९.
मुकम्मलखान–११३,११४.
मुकुंदराज–४०,७३, ७४, ९३, २९८.
मुक्तागिरी–४,७०,२७३,३०५.
मुक्ताफल ( ग्रंथ )–३६.
मुगुटराव–२३८,३०९.
मुद्गल–५१.
मुग्धबोध ( ग्रंथ )–३७.
मुजाहिदशहा–९०.
मुधोजि ( ऊर्फ आप्पासाहेब सेनाधुरंधर. )–३८८.
मुधोजी भोंसले-१९५,३०६,३५५, ३५७,३५८, ३८०, ३८१, ३८२, ३८८, ३८९, ४००, ४०३–४१०.
मुनसी–४०३, ४०४, ४०८, श्रीधरपंत–४०९
मुनीनाथ ( साधू )–२७९.
मुनीर–उल्मुल्क–२२४,२२५.
मुनीश्वर–४९,५०.
मुबारकशहा–८३.
मुबारिजखान–१४८-१५१, ३३०. ३३१.
मुमताजमहाल–३४३.
मुराद–१२८,१२९,१३२,१५९.
मुरादाबाद–१४४.
मुरारसा–२१७.
मुरारि–( कवि ) २१.
मुर्तिजा निजामशहा–११९,१२०, १२१,१२३.
मुर्तिजापूर–१२०,१२३.
मुर्तिजा सय्यद ( सबजेवारी सुमेदार )–१२३.
मुलताई–७२.
मुल्लामहमद ( निजामशाही सरदार ) ३१७.
मुहूर्तचूडामणि ( ग्रंथ )–४५.
मुहूर्तचिंतामणि ( ग्रंथ )–४७.

मुहूर्तमार्तंड ( ग्रंथ. )–४५.
मुंड–२५५.
मेटाकाफ ( सर चार्लस )–२२५, –२२७.
मेडोज टेलर–४१६.
मेहुणें–१७०.
मेहेकर—८,१०,५५, ५६,१०३, १३४, १३६, १५४, १९४, २१५, २४२, २७९, ३०२, ३०३, ३१२, ३१४, ३३०, ३७९,३९०.
मेहेदवीपंथ–१२५.
मेळघाट १२२,२३५,२३६,४१३, ४१६,४१७.
मोजणी–वऱ्हाडची–२५९, २६०.
मोजीम–१७१,१७४.
मोडक–३००.
मोतीसमाध–३३८.
मोरेश्वरबुवा ( वाशीमकर )–२८९, २९८.
मोर्शी–२४२.
मोहकमासिंग–२५५.
मोहबदखान–१७४,३२५, ३२६, ३४७.
मोहनासिंग भोंसले–३८८.
मोहरील–२५३.
मौर्य–५८.
म्हाळसाबाई–१६१,१६२, १६८, ३२३,३२८.

य.

यमुनाबाई मुळे–३१६,३३६.
यवतमाळ–७,२४२.
यशवंतराव काळू–४०९.
यशवंतराव जाधवराव—३२३, ३४०.
यशवंतराव होळकर—पत्र १९८, २०१.
यज्ञसेन–६०.
यादव–१३,७३–८०.
यूनसखां–३७७,३७८.
यूसफ आदिलखान–१०७.
यूसफखान गारदी–४०७.

र.

रखमाजी गणेश परभू—३७९, ३८१.
रघुजी बापुसाहेब–४००.
रघुनाथराव–३५१.
रघुवंश–१६.
रघुवंशी—रजपुतांची फिर्याद— १८७.
रघोजी करांडा–३८३,३८९.
रघोजी भोंसले ( दुसरा )–१९५– १९८, २०२, ४००, ४०६, ४०७.
रघोजी भोंसले ( पहिला )–१८३, १९०,१९१,१९४, चौथाईचा तंटा १९६,१९७,३०६,३७९, ३८०,३८१.

रविराव ढोणे-३१३.
रसेल ( रेसिडेंट )-२२६,२३३.
रहिमतखातून-३७८.
रहिमान-४०७.
रहिमानसहा-८१.
रंगनाथ-४५.
रंगपंचमीचा महाल-१६०,१६१, ३३८.
रंगमहाल-२२२.
राघव-३३९.
राघोजी जाधवराव-१५१,३१५, ३२३,३२९-३३१.
राघोबादादा-१९१,१९३.
राजगड-४०६.
राजतरंगिणी ( ग्रंथ )-१०.
राजव्याघ्री-३४६.
राजशेखर-२१.
राजसबाई-३२६,३२७.
राजाराम बक्ष-३६७,३६८,३७४.
राजाराम छत्रपति-१५१.
राजारामपंत-३८७.
राजाराम मुकुंद-४०९.
राजीनामा कबुलायत-२६१.
राजूर—८५, १०४, गणपतीचें २७९,३८०-चा घाट १२६, २०३.
राम-४६.
रामकृष्ण-४९.
रामकृष्ण काव्य ( ग्रंथ )-४३.
रामगड-१३४.
रामचंद्र ( श्री )-१६,२१.
रामचंद्र गणेश पटवर्धन-३९२, ३९६.
रामचंद्र यादो ( एलिचपुरकर ) ४०९.
रामचंद्रराव ( जाधव )-३२९, ३३४-३३७, ३८५, ३८६, ३९१,३९५.
रामचंद्र वाघ (भोंसल्यांचा सरदार) २०३.
रामजीपंत-१८३,३४१,३५९.
रामटेक-३९१.
रामदेव-७५,८०-८२.
रामबक्ष ( राजा )-२२८.
रामविनोद ( ग्रंथ )-४७.
रामवोटा-१९६.
रायचूर-९२,२३१,२४०-२४२.
रायपूर-४०९.
रायबागीण—१७४,३२४,३४१, ३४६,३४७,३४८.
रावजगदेव-३२९, ३३०, ३३३, ३३८.
रावजी सोमनाथ-१७८.
राष्ट्रकूट-५८,७२,७३.
रासपंचाध्यायी ( ग्रंथ )-३००.
रासोजी-३३५.
रास्ते-३८६.
राक्षसभुवन-३९०.

रिपुमर्दन–१४.
रिसोड ( अथवा रिसवड )–८, १४९,२१५,२७९.
रीथपूर–४,१८०,१८१,२७४.
रुकनौद्दल्ला–३९१, ३९५, ४०५, ४०६.
रुक्मावती–१९.
रुक्मिणी–१४,१६,१७,१९.
रुक्मी–१४,–२०.
रुक्मांगद–१४.
रुद्रनानाथ–२७९.
रुस्तुमराव–१६८,३२५.
रुपगड–४१६.
रुपवर आगा–९०.
रेकर्ड ऑफ राइट्र–२६०.
रेतीचे दगड–७.
रोकडाराम ( साधू )–२७९.
रोजें ( गांव )–१४३,२७८.
रोहिणखेड–८५–चा घाट–१०४, १०५, १२३, १२६, १२७, १३७,१४०.
रोहिले–२३३,२३४, दंगा ४०६.

ल.

लखूजी जाधवराव–( लुकजी पहा. )
लबाडेगांव–२०७.
लभाणी–४.
ललिंग–( किल्ला ) १०५.
लक्ष्मण–( कवि ) ३८.
लक्ष्मण–( ज्योतिषि ) ५०.
लक्ष्मण खंडेराव–( अमडापूरकर ) २१७.
लक्ष्मण जाधवराव–(लुकजी पहा. )
लक्ष्मणपंत–४०४.
लक्ष्मणराव काशी–४०९.
लक्ष्मी–२७२.
लक्ष्मीकांत नाईक–४१०.
"लक्ष्मीकांत" (निशाण )–४०३.
लक्ष्मीघर–३६, ७३.
लंका–२१.
लांकूड–( सागवानी ) ४१४.
लाखनवाडा–१०४, घाट ३७९.
लायल–( सर आलफ्रेड ) ३०१.
लालखां–३६०,३६१.
लालमहमद–४०७.
लालसिंग रजपूत–( दाताळेकर ) २३७,२३८.
लुखजी जाधवराव १४०,१५९–१६६, ३१२–३३०, ३३८–३४०,३४३,३४४.
लोकसंख्या,–शहर व खेड्यांतील प्रमाण ४.
लोकस्वभाव–वऱ्हाडांतील ४.
लोखंड–७.
लोणार–सरोवर २,–क्षार ६,१०, वर्णन व दंतकथा ५४,७३, १३५,२१५,–इमारती ३०२, ३३०,४११.

लोणी-( सखारामबुवाचें ) २७९.
लोपामुद्रा-१५.

व.

वडदरी--इजारा-१८७.
वडर-४.
वणी-खनिज पदार्थ-७,२३८, २४२,३८०,४०९.
वतन-८६.
वतनदार-२६८.
वरदा ( नदी )-वर्धा पहा.
वरयात्रा-२४.
वरोडा-७.
वर्ग-२६०.
वर्धा ( नदी )-अथवा वरदा-२, ७,१३,२३,५१.
वर्धातट-२०,२२,२५.
वर्धाहार-२५.
वला-२१४.
वशिष्टा-५१.
वसई-तह-१९८.
वसमत-३७९.
वसंतभानू-५९.
वंजारी नाईक-२३४.
वाइन गंगा ( अथवा वेणा )— १८,५१.
वाकद-मोकासा-१८६.
वाकाटक-५८, ६२,-ताम्रपट ६३-६६, सीमा ६६,६७,- वंश-वृक्ष-६८,६९,७२.
वाघांबरी-३६.
वाङ्मय-२८,२९०,३००.
वाचस्पत्यम्-२३.
वारकरी पंथ-१५४.
वारन हेस्टिंग्ज-१९६.
वारी-३०३.
वालसावंगी-२१७.
वाल्मिकी-५३.
वाशीम ( अथवा वत्सगुल्म, वच्छोम. )-५७,१३४,१५४, कापड १९४,-टांकसाळ व देऊळ १९५, लूट २३३,— साधू २७९, ३०३, ३६६, ३९१,३९७,४००
विघ्नमोचन ( ग्रंथ )-४३.
विजयानगर-११७,११८,१९२.
विजापूर-१७०.
विठोजी जाधवराव-१५९.
विठोजी भोंसले-१६०,३४४.
विठ्ठल ( कवि ) २९९.
विठ्ठल बल्लाळ-४०९,-खड्यांची लढाई-१९७,२०३.
विठ्ठल दिनकर-४०९.
विठ्ठलनाथ-२९७.
विठ्ठल सुंदर-३८४.
विदर्भ ( देश )-११, १२, २०, २१,२३,२७.
विदर्भ ( राजा )-१३, १४, २०.
विदर्भा ( नगरी )-१३.

विदर्भा (नदी)-२३,५१, वर्धा पहा.
विदिशा-६०.
विरज-५४.
विराट-(अथवावैराट)-२५, २६.
विरंबाली-(हत्ती)-४०४.
विलायतपुरा-३६८.
विवेकसिंधु (ग्रंथ)-७४.
विश्वनाथ-(ज्योतिषग्रंथकार)—४५.
विश्वनाथ (लुकजीचा मुलगा)—३३९.
विश्वासराव-(नानासाहेब पेशव्याचा मुलगा)-३८४,३८५.
विष्णाप्पा (म्हैसूरकार)-२०५.
विष्णुदास-२९९.
विंडहॅम-(मेजर)-२३८.
विंध्य-११,१२,१३.
वीरसेन-६१.
वृष्णिकुल-१३.
वेणा-(वाइनगंगा पहा)-१८, ५१.
वेरूळ-५९,७९,११४.
वेलस्ली-१९८,२००,२०१,२३२ ३६१,३६२,४१३.
वेळू-४१४.
वैदर्भी-(रीती)१५,२२,२९-३३.
वैरागड-१३४.
व्यंकटराव-३५०.
व्यंकटराव काशी-४००, ४०१, ४०९.
व्यंकोजी तंजावरकर-२१७.
व्यंकोजी भोंसले-२०२,२०३.

## श.

शमसूल उमरा-२२४,३७१,३७२
शम्सखातून-३७०.
शहाजहान-१३३, १३५, १३७, ३४२,३४३.
शहाजी भोंसले-१३३, १३८, १३९,१६१-लग्न १६३,—माहुलीस प्रयाण व राज्यकारभार १६४,१६५,१६६-हत्तीवरून भांडण ३१७,३९८.
शहा दावल-३७८.
शहा नवाजखान-(वऱ्हाडचा सुभेदार) १३७.
शहानामा-३५०.
शहापूर १२९,३१०.
शहा बगरवान-(वऱ्हाडचा सुभेदार) १४२.
शहा बहामनी-२७६.
शहा बुहिन १४४.
शंकर दिग्विजय-(ग्रंथ) ५९.
शंकरदेव-८२.
शंकरराव-३५०,३५१.
शंकरसागर-३३८.
शंकराचार्य-५९.
शंकराजी मल्हार-१४७.

शंकराभरण—४३.
शाईचावडी—१८९.
शाबासखान—४१६.
शाहिस्तेखान—३४६.
शाहू (राजा)—१४५,३३१,३७९.
शिकंदरजहा—२२०,२२७.
शिरपूर—३, १८६, २७३, २७४, २७९,३०५,३३०,३४२.
शिरसोली २०३—२०५.
शिराजुद्दिन हुसेन—३६८,३७५.
शिलालेख,—अमडापूर ७७,—बारशी टाकळी—७८.
शिवकल्याण—३००.
शिवणी १०,—ताम्रपट ६३,६५, ६६,३१३.
शिवदिन केसरि—१५५,२९७.
शिवदैवज्ञ—४५.
शिवनेरी—१६३.
शिवभट साठे—३८१,३८८,३९९.
शिवाजी—जन्म १६६, वऱ्हाडशीं संबंध १७०, संभाजीचे नांवानें मनसब १७१, ३४६, ३४७, ३४८.
शिवाजीपंत टाळकुटे—४०२,४०३.
शिवाजी भोंसले—( उमरावतीकर ) ४०८.
शिवानंदबुवा २७९.
शिशुपाल—१६.
शिंदखेड,—चे जाधवराव १३३, १५८,१६८—शिंद्यांचा अम्मल १८८, चौथाई १९७, २३३, २३६, २९७, ३१०—३१४, ३३०, ३३१, ३३७, ३३८, ३५४, ३८५, ३८६.
शिंदे—३६३.
शुक्राचार्य—५१.
शुजायतखां—( एलिचपूरचे नबाबाचा सरदार )—१८३.
शुभांगी—१८.
शेख डल्ला—२३५,३६२,४१५,—४१६.
शेख बाबू—२७६.
शेख महमद—२७६.
शेगांव—१४६.
शेरखाजा १३१.
शेलगांव—२१७.
शेवली—२१६.
श्रीपति पद्धति गणित ( ग्रंथ )—४३.
श्रीपति पद्धति टीका ( ग्रंथ )—४९.

## स.

सगर—१५.
सखारामबुवा लोणीकर—२७९.
सखाराम हरी—३९२,३९३.
सफदरखान—८८,९०,९२.
सटवाजी वारीक—३१४.
सदरलंड ( मेजर )—२३५.

सदाशिवराव भाऊ-३८६.
सदाशिव हरी दिवरण-३८८, ३८९.
समशेर गुल्मुल्क-११९,१२१.
समशेर बहाद्दर-२१८.
समशेर बहाद्दर आटोळे-३७९.
समुद्रगुप्त-५९.
सय्यद बंधु-१४३,१४५,१४७.
सरदेशमुखी-३८३.
सरमसखां-३५३.
सरमसघुरा-३५४,३६०,३६४.
सर्फखास-३७१.
सलाबतखां ( एलिचपूर )-२०५, २१८, ३६०-३६५, ३७८, ४०८.
सलाबतखान ( अहमदनगर )-९२,९३,१२३-१२५,४१५.
सलाबतजंग-३८२,३८६.
सहदेव-१८.
संग-६०.
संताजी-३२८.
संताजी शिंदे-१४७
संतोकसिंग-४०९.
संभाजी कोल्हापूरकर-१४५
संभाजी जाधव-१६८.
संभाजी भोंसले ( शिवाजीचा पुत्र ) १७१.
संभाजी भोंसले ( शिवाजीचा भाऊ )-३२८.
संभाजी भोंसले ( विठोजीचा पुत्र ) ३१७.
साकरखेर्डा--( फत्तेखेर्डा पहा ) १८६, ३३०, ३८६, ३८७, ३९०,४१२.
साठचाळिशीचा तह-१९५,३८४ ३८७.
सातगांव-७३,३०२.
सातपुडा-२,१२,५०,३६३,४१३ ४१४.
सातवाहन-५८.
सातारा-३८०.
सात्वती ( वृत्ति )-२९.
साबाजी ( भोंसले )-१९५,१९६, ३५७, ३५८, ३८०, ३८२, ३९९-४०१,४०३-४०७.
सायड-२७१.
सारगांव-४१२.
सालबर्डी-१४,५०,५३,५४.
सालरजंग ( सर )-२४७.
सत्वरगांव ( वर्धाकांठ )-१४१, ३४१.
सावळापूर-१५४,३०३.
सावंगी ( वालसावंगी )-अवघडरायाची सावंगी पहा.
सितोळे-२१७.
सिद्धान्ततत्वविवेक-( ग्रंथ ) ४५.
सिद्धान्तसुंदर-( ग्रंथ ) ४२.
सिपादारखान-१४१,१४२.

सिराजुल्मुल्क–३७५.
सिंघण–७४,७८,३०४.
सिंहगड–३९६.
सीताकान्त–( निशाण )–४०३.
सीता नाहाणी–५३
सीताराम पंडित–३६७.
सुग्रीव २१.
सुजनासिंह–१६७,१६८,३२८.
सुजा–१४०,३४३.
सुथील–१४.
सुपें–जहागीर–१६३.
सुभेदार–४११.
सुरजी–अंजनगांव—१८७, तह २१२, २७९, २९५, २९८, ३७५,३८०.
सुरत–लूट–१७४,३४७.
सुराजुल्मुल्क–२२८, मृत्यु २२९, जहागिरी २६४.
सुराबूर–२४१.
सुराष्ट्र–१८.
सुलतान इमादुल्मुल्क–१२२.
सुलतानखां–३५३.
सुलतानखां पन्हा–३८३.
सुलतानपूर–(भोंसल्यांची जहागीर) १९४.
सुलतानपुरा–३५४.
सूर्यपंडित–४१.
सूर्यप्रकाश–( ग्रंथ ) ४३.
सेनाधुरंधर–३८२,४०३.
सेनाधुरंधर मुधोजी–( ऊर्फ आप्पा-साहेब ) ३८८,३९२.
सेनासाहेब सुभा–२१८, ३८२, ४०३.
सेलिम–१३५.
सैफुद्दिन घोरी–९१.
सोनपत–१३०.
सोनबा–२७९.
सोनाळें–२७९.
सोरबाबाई–३३८.
सोहेलखान–( सरदार ) १३०, १३१.
सौरागम–( ग्रंथ ) ४५.
स्लेटीचे दगड–७.
स्टीव्हनसन २०१–२०८.

ह.

हटकर नाईक–२३४.
हणमंते–१६९.
हत्या–२७१.
हमीदखां–३७८.
हमीदखान–३२२.
हरचंदराय–३४४.
हरपालदेव–८३.
हरिलीला ( ग्रंथ )–३६.
हरिवंश–१६.
हरिहरराय–९२.
हरीपंत तात्या–२१५.
हरीसा लाड–१८९,३३४.
हलधर–१४.

हशमतजंग–२१५.
हसन ( जाफरखान)–८४.
हसूमिया–३७१,३७३,३७४.
हॅमटन् ( ब्रिगेडियर )–२३९.
हंडिया–१४१.
हाडोळी–२५५.
हिंमतखातून–३७७,३७८.
हुएनसंग–२८.
हुमायून बहामनी–१०६.
हुशंगशहा–१००.
हुसेन निजामशहा–१६६.
हेग ( इतिहासकार )–९९.
हेमाडपंत ( अथवा हेमाद्रिनाथ )–
३६, ३७, ७५, ८०, ३०२,
३०३.
हैदरजंग–३८२.
हैदराबाद–१४९, १५०, ३३४,
३५४, ३५७, ३८२, ३८७,
४१३.
होळकर–२२१.
“ हौज कटोरा ”–१२२,३०७.

ज्ञ.

ज्ञानराज–४०,–चा वंशवृक्ष–४२.
ज्ञानेश्वर–७६.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | २ | उ—क | उद्रेक |
| १२ | १७ | दशाची | देशाची |
| १३ | ९ | मोज | भोज |
| २८ | ६ | —ली. | मैल |
| २९ | ८ | त्या | ह्या |
| २९ | १८ | वत्ति | वृत्ति |
| ,, | ,, | त्या | ह्या |
| २९ | १९ | कशकी | कैशिकी |
| ,, | २० | सवश्रष्ट | सर्वश्रेष्ठ |
| ,, | २३ | गलो | गेली |
| ३० | ५ | वदभा | वैदर्भी |
| ३१ | २ | विदभाय | विदर्भीय |
| ,, | ३ | सवश्रष्टत्व | सर्वश्रेष्टत्व |
| ,, | १३ | वृात्त | वृत्ति |
| ३२ | ९ | विदभ | विदर्भ |
| ४१ | ६ | म्हणन | म्हणून |
| ४३ | १० | ग्रथ | ग्रंथ |
| ,, | १२ | सूर्यप्रकश | सूर्यप्रकाश |
| ४८ | २० | ग्रंथ | ग्रथांत |
| ५२ | ५१ | कैकं | कैक |
| ५२ | २ | — | नगराचे |
| ६१ | ३ | माधवसेमानी | माधवसेनाची |
| ६२ | ७ | यशसन | यशसेन |
| ६२ | २० | उकलल्यास | ढकलल्यास |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६४ | २ | तुकड | तुकडे |
| ७९ | २० | चलुक्य | चालुक्य |
| ९१ | १० | युद्ध | युद्धं |
| १०० | १८ | चिखलदारा | चिखलदरा |
| ११५ | ६ | हा | ही |
| १३६ | १८ | खाळी | साली |
| १४८ | २४ | ---- | सैन्य |
| १५३ | ११ | ब | व |
| १५७ | १२ | कांटक | काटक |
| १६३ | २६ | रुरकारचे | सरकारचे |
| १८१ | २ | अमल | अंमल |
| १९८ | ४ | हाळकर | होळकर |
| २११ | १० | धर्धा | वर्धा |
| २१४ | २१ | रांजा | राजा |
| २५८ | २३ | समलापूर्वीं | अमलापूर्वीं |
| २५९ | १८ | तालक्याची | तालुक्याची |
| २६१ | २५ | वं | व |
| २६३ | १७ | पेशमुख | देशमुख |
| २६९ | ८ | करण | कारण |
| २७९ | १६ | पहिलें | पाहिलें |
| ,, | ६ | मियसाहेब | मियासाहेब |
| ,, | १८ | तसच | तसेच |
| २८३ | १४ | लर्वस्वी | सर्वस्वीं |
| २८४ | २३ | घेनु | घेनू |
| २८५ | टीप | वुरुषात | पुरुषांत |
| २९१ | २३ | आरंगाबादेस | औरंगाबादेस |
| २९३ | ५ | साकरखर्डे | साकरखेर्डे |
| २९६ | १३ | श्रीमत | श्रीमंत |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २९६ | १६ | पंडिताते | पंडितांन |
| २९८ | ११ | इश्वर | ईश्वर |
| २९९ | ८ | एफा | एका |
| ,, | १९ | तो | ती |
| ३०५ | १८ | खाब | खांब |
| ३०८ | १६ | पाहण्यसारखी | पाहण्यासारखी |
| ३११ | टीप | क्षाग | भाग |
| ३१३ | १० | आह | आहे |
| ३१४ | | पादशहा | बादशहा |
| ३२७ | २४ | सिघान्त | सिद्धांत |
| ३३४ | ६ | वरुन | करून |
| ३५५ | १० | इस्मालखास | इस्मायलखांस |
| ३७५ | १८ | शिरातुद्दीन | सिराजुद्दीन. |
| ३७७ | ६ | हिमंतखतुन | हिंमतखातून |
| ३९४ | १५ | रिकाभी | रिकामी |
| ३९६ | १० | दाहासाहेब | दादासाहेब |
| ३९७ | १५ | देवाजीपतास | देवाजीपंतास |
| ४०२ | २२ | ानश्चय | निश्चय |
| ,, | २४ | पलीकड | पलीकडे |
| ४१५ | ११ | धदा | धंदा |

टीप—अनुस्वार वगैरे इतर चुका सहज लक्षांत येण्यासारख्या असल्यामुळें त्या दुरुस्त केल्या नाहींत.

# वऱ्हाडचा इतिहास.

## भाग पहिला.

### देशवर्णन.

**मर्यादा.** सांप्रत वऱ्हाडांत मोडणाऱ्या प्रदेशाची पूर्व सरहद्द वर्धा नदी. पश्चिमेस खानदेश व निजामचे राज्यापैकीं अजिंठा, भोकरधन वगैरे भाग; दक्षिणेस निजामचें राज्य. पैकीं बऱ्याचशा भागास पाईनगंगा नदीची हद्द व उत्तरेस मध्यप्रांताचा नेमाड जिल्हा व सातपुड्याचे डोंगर. हा सांप्रतचा विस्तार कमी कमी होत आलेला आहे. मोंगल व मराठा कारकीर्दींत हल्लींपेक्षां पुष्कळच जास्त विस्तार होता. तो निरनिराळ्या कारकीर्दींच्या इतिहासांत पुढें दिला आहे. सोबत जोडलेल्या नकाशांत तो एकदम दिसेल.

**स्वाभाविक विभाग.** वऱ्हाडच्या नकाशाकडे पाहिल्याबरोबर त्याचे तीन स्वाभाविक विभाग दिसतात. उत्तरेस सातपुड्याचा निवळ डोंगराळ प्रदेश. यास मेळघाट असें म्हणतात व याचा मेळघाट म्हणून निराळा तालुकाच केला आहे. दक्षिणेस अजिंठा पर्वताचा विस्तीर्ण पठार अथवा सपाट देश. पूर्वपश्चिम साधारण समांतर रेषेनें या पठाराचा चढाव हल्लींच्या रेलवे लाइनीच्या दक्षिणेस वीस मैलांपासून सुरू होतो व ही उंची चढून गेलें म्हणजे फार

मोठें मैदान लागतें. वरील प्रदेशास घाट असें म्हणतात. उत्तर वऱ्हाडांतून दक्षिण वऱ्हाडांत कोठेंहि जावयाचें असल्यास कोठें ना कोठें तरी हा घाट चढावाच लागतो. पूर्वीं या जागीं नाकेबंदी व वेशी असत, त्या अद्याप कायम आहेत. घाटावरील प्रदेशांत उंच सखल प्रदेश मधून मधून पुष्कळच आहे. परंतु साधारणपणें प्रदेश सपाटीचा आहे. या भागाचें जुनें कागदोपत्रीं नांव "बालाघाट" असें आहे. परंतु व्यवहारांत फक्त "घाट" असेंच म्हणतात. तिसरा भाग म्हणजे उत्तरेस सातपुड्याचा मेळघाट तालुका व दक्षिणेस बालाघाट ऊर्फ घाट याचे दरम्यानचा खोलवट प्रदेश; यांतून पूर्णा नदी वाहते. हा भाग अस्सल काळ्या जमिनीचा व गाळवट असून फार सुपीक आहे. वऱ्हाडच्या श्रीमंतीचा जो लौकिक आहे तो याच जमिनीवर आहे. या भागास "पाइनघाट ऊर्फ पायांघाट" असें नांव आहे. परंतु व्यवहारांत यास "वऱ्हाड" असेंच म्हणतात. उत्तर हिंदुस्थानास व्यवहारांत जसें "हिंदुस्थान" म्हणतात त्याचप्रमाणें या भागास नुसतें "वऱ्हाड" असें म्हणतात. दक्षिण वऱ्हाडास नुसतें "घाट" असें म्हणतात.

**नद्या, पर्वत वगैरे.**

उत्तरेस सातपुडा व दक्षिणेस अजिंठा हे दोन पर्वत आहेत. या डोंगरांवरील पाणी दोन्हीच्या दरम्यानच्या प्रदेशांत दक्षिणोत्तर लहान लहान अनेक नद्यांनीं पयोष्णी ऊर्फ पूर्णा या नदीस मिळून पूर्वेकडून पश्चिमेकडे जाऊन तापीस मिळतें. अजिंठ्याच्या दक्षिणभागाचें पाणी याचप्रमाणें पाईनगंगा व खडकपूर्णा या दोन मोठ्या नद्यांस मिळतें. पूर्वेस वर्धा ( वरदा ) ही मोठी नदी आहे. दक्षिणेस लोणार नांवाचे प्रसिद्ध गांवाजवळ याच नांवाचें खाऱ्या पाण्याचें सरोवर आहे.

**हवापाणी.**

वऱ्हाडाची हवा अतिशय उष्ण आहे. रेलवेचा पूर्वपश्चिम-पट्टा अतिशय उष्ण आहे. अत्यंत उष्ण हवा-मान ११५ डिग्रीपर्यंत जातें. या मानानें घाट कमी उष्ण आहे. नरनाला, चिखलदरा व बुलठाणें हीं ठिकाणें थंड हवेचीं म्हणून प्रसिद्ध आहेत. नरनाला समुद्रसपाटीपासून ३००० फूट व चिखलदरा ३६०० व बुल-ढाणें २२०० फूट उंचीवर आहे.

वऱ्हाडांत पावसाचें मान बरेंच कमी आहे. सरासरीनें पाऊस ३० इंच पडतो व सर्व पाणी बाहेर निघून बहुतेक ठिकाणीं पिण्याचें पाणीहि पुरेसें मिळत नाहीं. तलाव, पाट, कालवे मुळींच नाहींत. त्यामुळें पाऊस न पडल्यास सर्व शेती बुडते व विहिरी आटतात. दोन्ही डोंगरांवरील पाणी अडविल्यास वऱ्हाडास फार मोठा फाय-दा होणार आहे पण याकडे सरकारानें अद्याप लक्ष दिलें नाहीं.

**पिकें**

वऱ्हाडांतील मुख्य पिकें ज्वारी व कापूस, कापसाचें प्रमाण नेहमीं वाढत असतें. शेंकडा ४० कापूस, ४० जवारी व इतर पिकें. २० याप्रमाणें पेऱ्याचें प्रमाण आहे.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या.**

वऱ्हाडचें क्षेत्रफळ १७॥ हजार चौरसमैल आहे. पूर्वपश्चिम लांबी सरासरीनें दीडशें मैल व दक्षिणोत्तर साधारणपणें तेव-ढीच आहे. लोकसंख्या तीस लक्ष आहे. वस्ती मुख्यत्वें हिंदूंची आहे; परंतु मुसलमानांचा अंमल बरेच दिवस राहिल्यामुळें मुसलमानांचीहि वस्ती बरीच आहे. एके काळीं वऱ्हाडांत जैनधर्मास राजाश्रय असल्यामुळें त्या धर्माचे लोकांची बरीच जुनी वस्ती आहे. शिरपूर;

मुक्तागिरि हीं त्यांचीं महत्वाचीं स्थानें आहेत. मानभाव ( महानुभाव ) पंथाचें मोठें ठिकाण रीथपूर ( ऋद्धपूर ) हें वऱ्हाडांत आहे, त्यामुळें त्या पंथाचे मठ पुष्कळ जागीं आहेत. तसेंच अनार्य समजल्या जाणाऱ्या जाती गोंड, कोरकू, कोलाम, लमाणी, वडर, कैकाडी यांचीहि संख्या बरीच आहे. हिंदु व मुसलमान यांचें प्रमाण ९ : १ याप्रमाणें आहे.

सन १९११ च्या खानेसुमारीप्रमाणें निरनिराळ्या धर्मांचे लोकवस्तीचे आंकडे पुढें दिले आहेत.

| हिंदु | मुसलमान | जैन | खिस्ती | शीख | पारशी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| २६६८१४८ | २३८६६५ | १८९०० | २८२३ | २०४ | ५३१ | ३०५७१६२ |

निरनिराळ्या काळीं लोकवस्तीचें प्रमाण.

| १८७२ | १८८१ | १८९१ | १९०१ | १९११ |
|---|---|---|---|---|
| २२२७६५४ | २६७२६७३ | २८९७४९१ | २७५४०१६ | ३०५७१६२ |

लोकसंख्या शहरांतून व खेड्यांतून खालीं दिल्याप्रमाणें वांटली गेली आहे.

| ५०० वस्तीच्या आंतील गांवें | १००० | २००० | ५००० | १०००० | २०००० | ५०००० |
|---|---|---|---|---|---|---|
| ४०८२ | १२२३ | ४२८ | १२७ | २६ | ८ | २* |

इंग्रजी कारकीर्दीपासून तों आतांपर्यंत दुसऱ्या प्रांतांतून निरानिराळ्या धंद्यांच्या निमित्तानें लोक येऊन वऱ्हाडांत स्थाईक झाले आहेत. परप्रांतांतून येथें आलेल्या लोकांची संख्या फार मोठी आहे व ती अद्यापहि वाढत आहे. शेती व कांहीं सावकारी खेरीज करून बाकी सर्व धंदे परप्रांतांतील लोकांच्या हातीं आहेत. सरकारी लहान मोठ्या कचेऱ्या व वकीली, डाक्टरी वगैरे पांढरपेशा धंद्यांत मुंबई पुण्याकडील महाराष्ट्रीय लोक, सावकारी व व्यापाराकरितां मारवाडी, कच्छी, बोहरी व भाटे, मजूरीकरतां नगर, सोलापुराकडील गरीब व दुष्काळग्रस्त लोक व उत्तर हिंदुस्थानांतील पुरभय्ये, मारवाडी व पुरभय्ये सुतार व इतर धंदेवाले यांचा वऱ्हाडांत एकसारखा ओघ चालू आहे. वऱ्हाडांत लोक मुख्यतः शेतकी व वतनदारींचे धंदे यांवर अवलंबून आहेत. त्यांच्यामध्यें उत्साह व नवीन धंदे करण्याची व घर सोडून जाण्याची धमक दिसून येत नाहीं. प्रांत खाऊनपिऊन सुखी असल्यामुळें आळस फार व महत्वाकांक्षा कमी हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. एकंदरींत लोक गरीब, शांत, उदार मनाचे, परंतु आळशी, भित्रे व अल्पसंतुष्ट असे आहेत.

* अकोला २'१८२६, उमरावती ३४२७०.

**खनिजपदार्थ**

पूर्वीं दहिहांडा वगैरे गांवीं विहिरीच्या *पाण्यापासून मीठ करीत असत. इ. स. १८७० च्या सुमारास इंग्रज सरकारानें तें बंद केलें आहे. दहीहांड्यापासून आकोल्यापर्यंत जमिनीच्या पोटांत हा खाऱ्या पाण्याचा मोठा पट्टा असावा अशी तज्ज्ञ लोकांची कल्पना आहे. बुलढाणें जिल्ह्यांत आडविहीर येथेंहि एके वेळीं याप्रमाणें मीठ निघत असे.

लोणार येथील खाऱ्या पाण्याच्या सरोवरांतून निरनिराळ्या जातीचे क्षार निघतात. राजपुतान्याच्या सांबर सरोवरांतील क्षाराप्रमाणेंच या सरोवरांतील क्षार काढण्याची रीत आहे. उन्हानें पाणी खूप आटलें म्हणजे क्षार बनून पाण्याचे बुडाशीं क्षाराचे मोठाले खडे सांपडतात.

तळावांतील पाण्यांतील क्षाराचें प्रमाण कमी असल्यामुळें व वाहतुकीचा खर्च फार असल्यामुळें हा धंदा वाढावा तसा वाढलेला नाहीं! तरी नवीन धर्तीनें क्षार शुद्ध करून तो मुंबईसारख्या मोठ्या बाजारांत पाठविण्याचे प्रयत्न सुरू आहेत; परंतु त्यांस अद्याप यावें तसें यश आलें नाहीं. लोणारचें सरोवर व त्याचे

---

* सदरहू विहिरी खणण्याची रीत अशी होती कीं एका ठरीव खोलीपयत विहीर खणीत गेलें म्हणजे नेहमींच्या अनुभवावरून आतां पाणी जवळ आहे असें खणणारे लोक ओळखीत व काम बंद करून एक दोन खणणारे पाळण्यांत बसून खणीत व पाणी जवळ आलें असें पाहतांच एक जोराचा शेवटचा घाव घालीत व वरच्या लोकांस इशारा करीत त्यासरसे वरील लोक त्यास वर ओढून घेत. इकडे विहिरींत पाणी एकदम उसळून एका क्षणांत सर्व विहीर भरून जाई. खणणारास लौकर वर ओढून न घेतल्यास तो पाण्यांत बुडावयाचा. सदरहू पाणी वर काढून खाचांमध्यें सोडीत व उन्हानें सुकवून त्याचें मीठ करीत.



लोणार येथील खाऱ्या पाण्याचें सरोवर

[ पृ. ७

भोंवतालची वर्तुलाकार डोंगराची ओळ हीं पूर्वीं मोठा ज्वालाग्राही उ`क होऊन बनलीं असावींत असा पुष्कळांचा तर्क आहे.*

वर्धेच्या दोन्ही कांठीं दगडी कोळशांचा दक्षिणोत्तर एक लांब पट्टा गेला आहे. वर्धेच्या पूर्वेकडील वरोडा, बल्लाळपूर व वर्धेच्या पश्चिमेस निजामच्या राज्यांतील भागांत खाणींचें काम चालू आहे पण वऱ्हाडच्या हद्दींत अद्याप काम सुरू झालें नाहीं. फक्त निरीक्षण झालें असून वणी तालुक्यांत पिजगांव येथें मागेंपुढें खाणी खणल्या जाण्याचा बराच संभव आहे.

यवतमाळ जिल्ह्यांत चुनखडी, रेतीचे दगड (Sand Stone) नकशी होण्याजोगे नरम दगड (Soap Stone), स्लेटीचे दगड वगैरे आहेत. परंतु त्यांचा अद्याप उपयोग करून घेतला नाहीं. वणीकडील नरम दगडाची एक खुर्ची करून पूर्वीं आकोल्यास प्रदर्शनांत पाठविण्यांत आली होती.

आकोला व उमरावती जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं व वणी तालुक्याच्या सरहद्दीवर लोहारा या गांवाचे जवळ लोखंडाच्या खाणी आहेत; परंतु त्या कोणीं अद्याप चालू करून पाहिल्या नाहींत.

**उद्योगधंदे.** वऱ्हाड हा निवळ शेतकीचा प्रांत असल्यामुळें यांत उद्योगधंदे फार नाहींत व जे कांहीं होते ते सर्व हिंदुस्थानाप्रमाणेंच बुडाले आहेत. त्यांतून कांहीं जीव धरून आहेत.

एलिचपूर, आकोट, बाळापूर येथें सत्रंज्या, पागोटीं व इतर कापड अद्याप होतें. देऊळगांवराजा येथें लुगडीं व खण वगैरे होतात. खोलापूर व अंजनगांव येथें रेशमी कापड, मुकटे,

---

* **Geological Survey of India,**
Vol. XLI P. IV.

कद वगैरे तयार होतात. बाळापूर येथें दौलताबादी कागदाच्या तोडीचा कागद तयार होत असे व त्याचा सर्व वऱ्हाडभर खप होत असे. एलिचपुराजवळ करजगांव येथें धातु गाळून घंटा व इतर सामान तयार होतें. देऊळघाट येथें पोलादी सामान, अडकित्ते वगैरे तयार होत असे. पुष्कळ ठिकाणीं रंग चांगला होत असे; त्यांत रिसोड हें गांव प्रसिद्ध असे. कारंजा, देऊळगांवराजा येथें कुंकू, वणी येथें किरकोळ लांकडी काम व दगडी काम होतें. नांदूरा येथें लहान मोठ्या गाड्या फार पूर्वींपासून तयार होऊन लांबवर जातात.

नवीन धंद्यांपैकीं कापूस ओटण्याचे व गठ्ठे बांधण्याचे कारखाने गांवोगांव आहेत. बडनेरा, आकोला येथें कापड विणण्याच्या गिरण्या आहेत. आकोला उमरावती येथें तेलाच्या गिरण्या आहेत. कारंजा व मेहकर येथें कांहीं उद्योगी गृहस्थांनीं साबणाचे कारखाने काढले आहेत, परंतु त्यांचा खप मोठ्या प्रमाणावर नाहीं.

**व्यापार**

वऱ्हाडांतील मुख्य व्यापार कापसाचा. दरसाल आठदहा लक्ष गांठी वऱ्हाडांतून जातात. आयात व निर्गत मालाची घडामोड दहा कोटींची होते.

**साऱ्याची पद्धति**

वऱ्हाडांत रयतवारी पद्धति आहे व ती मुंबई इलाख्याच्या धर्तीवर आहे. यवतमाळ व वाशीम जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं जमीनदारी पद्धतीच्या धर्तीवर इजाऱ्याची पद्धति सरासरी साडेचारशें गांवांस चालू आहे. पूर्वींच्या बादशहांनीं दिलेल्या जहागिरी, इनामेंहि बरींच आहेत. त्यांपैकीं बहुतेक सर्व दिल्लीचे बादशहा व निजाम यांनीं दिलेल्या आहेत. दोन मात्र पेशव्यांनीं दिलीं आहेत.

जा.ई.२८०



**राज्यव्यवस्था**

वऱ्हाडावर कायदेशीर स्वामित्व हैद्राबादच्या निजाम सरकारचें आहे पण तें नांवाचेंच आहे. निजामानें १८५३ पासून इंग्रजसरकारच्या वहिवाटीस हा प्रांत दिला असून इ.स.१९०२च्या तहानें हा प्रांत कायमच्या कौलानें दिला आहे. त्याबद्दल इंग्रजसरकारानें निजामसरकारास दरसाल पंच५सि लक्ष रुपये स्वामित्व देण्याचें ठरलें आहे. बाकी सर्व व्यवस्था इंग्रजी मुलखाप्रमाणेंच आहे. नागपूरच्या गव्हर्नराकडेच या प्रांताचा अंमल आहे. व राज्यव्यवस्था मध्यप्रांताशीं संलग्न आहे. कायदेशीर रीतीनें वऱ्हाड अद्याप "परकीय मुलूख" असल्यामुळें कायदेकानू गव्हर्नरजनरल हे परराष्ट्रीय मुलखासंबंधाच्या अधिकारांत करतात; परंतु नागपूरच्या कायदे कौन्सिलांत मध्यप्रांताप्रमाणेंच वऱ्हाडचे प्रतिनिधि असून वास्तविक कायदे थेंच होतात.

**उत्पन्न व खर्च**

वऱ्हाडचें एकंदर उत्पन्न सरकारी दोन कोट रुपये असून खर्च सव्वा कोटीच्या जवळपास आहे. निजामाचे पंचवीस लाख रुपये जाऊन बाकीची वऱ्हाडाची शिल्लक मध्यप्रांतास खर्च होते व वऱ्हाडांत सुधारणा होत नाहींत म्हणून वऱ्हाडी लोकांची ओरड आहे म्हणून कांहीं न्यायाची व्यवस्था ठरणार आहे.

---

# भाग दुसरा

---

## प्राचीनकाळ–पौराणिक

**प्राचीन काळाच्या इतिहासाचीं साधनें**

वऱ्हाडासंबंधीं प्राचीन माहिती संस्कृत ग्रंथ, पुराणें, दंतकथा, ताम्रपट, शिलालेख व देवळें यांवरून मिळते. वऱ्हाडाच्या राजवंशाचा आधुनिक पद्धतीवर अगर राजतरंगिणीसारखा इतिहास एका जागीं कोठेंहि दिलेला नाहीं. जेथें जेथें वऱ्हाडाचा संबंध आला आहे तेथें तेथें तुटक माहिती सांपडते तीच पुढें ग्रथित केली आहे.

वऱ्हाडांत शिलालेख अगर ताम्रपट विशेष उपलब्ध झालेले नाहींत. या दिशेनें संगतवार प्रयत्नहि कोणीं अद्याप केला नाहीं. त्यामुळें जे आतांपर्यंत कदाचित् उपलब्ध झाले असते तेहि नाहींसे होत चालले आहेत.

पातूर येथें खडकांत कोरलेले दोन विहार आहेत. त्यांवर कांहीं कोरलेला लेख आहे, तो अद्याप वाचला गेला नाहीं. त्याच लेण्यांत एक मोठा संस्कृत लेख होता असें जुने लोक सांगतात; पण तो कडा तुटून तो लेख नाहींसा झाला. **लोणार** येथें दोन शिलालेख आहेत.पण ते अद्याप वाचले गेले नाहींत. मेहकर येथें अंदाज चाळीस वर्षांपूर्वी लेख असलेले तांब्याचे पत्रे सांपडले होते व ते अधिकाऱ्यांनीं सरकारांत पाठविले; परंतु त्यांचा पत्ता लागत नाहीं. मेहकर येथें एका जुन्या मूर्तीवर लेख आहे; परंतु त्यांत ऐतिहासिक महत्त्वाचें कांहीं नाहीं. अजिंठा येथील एक शिलालेख, एलिचपुराजवळील चम्मक येथील ताम्रपट, शिवणी येथील ताम्रपट यांमुळें

ना. इ. २८०



वऱ्हाडांतील एका मध्यकालीन राजघराण्याचा शोध लागला आहे. पिंजर येथें व इतर ठिकाणीं कांहीं किरकोळ लेख आहेत. वऱ्हाड हा लहान प्रांत असल्यामुळें प्राचीन वस्तुसंशोधनाचें काम सरकारी रीतीनें अद्याप झालेलें नाहीं.

वऱ्हाडांतील मूळच्या जाति

आर्यलोक वऱ्हाडांत येऊन राहण्यापूर्वीं मूळच्या अनार्य लोकांची येथें वस्ती होती. त्यांपैकीं गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल, ह्या जाती अद्याप कायम आहेत. सातपुड्यांत, वर्धेच्या पूर्वेस देवगड, चंद्रपूर, नागपूर येथें त्यांचीं राज्यें होतीं. नागपूर व पूर्वेकडील भागास " गोंडवन " असेंच नांव आहे. नागपूर व चंद्रपूर येथील गोंड राज्यें रघोजी भोंसल्यानें बुडविलीं. त्यांचे वंशज तेथें अद्याप आहेत. सातपुड्यांतील गोंड राजे मेळघाटांत अद्याप टिकाव धरून आहेत. अनार्य जातींचें इतर लोकवस्तीशीं प्रमाण शेंकडा पांच आहे व त्यांची वस्ती मुख्यत्वें मेळघाट व यवतमाळ जिल्ह्याच्या पूर्वभागांत आहे.

वऱ्हाडांत आर्यांचें आगमन. अगस्ति ऋषि.

दक्षिणेंत प्रथम आर्यांनीं वस्ती केली ती विदर्भांत. म्हणून दक्षिण हिंदुस्थानांत सर्वांत जुना देश वऱ्हाड. विंध्य पर्वत दुर्गम असल्यामुळें आर्यांची गति तेथेंच कुंठित झाली होती व दक्षिणेंत येणें फार कठीण होतें. अगस्ति ऋषीनें हा मार्ग प्रथम खुला केला व विंध्यपर्वत ओलांडून दक्षिणेकडील दंडकारण्याचा भाग मोकळा

---

१ भाग १५ पहा.

2 The first or oldest ryan Vprovince in the southern Country must have been the Vidarbha or the Berars.

Ancient History of the Deccan [ Dr. Bhandarkar] P.3

करून त्यांत वस्ती केली. विंध्य पर्वत फार उंच होऊन सर्वांस त्रास होऊं लागला म्हणून अगस्ति ऋषींनीं त्यास नमविण्याचें काम आपल्या आंगावर घेतलें व ते त्या पर्वताजवळ गेले. विंध्यपर्वत हा अगस्ति ऋषींचा शिष्य होता म्हणून गुरु जवळ येतांच त्यानें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां अगस्ति ऋषींनीं त्यास सांगितलें कीं मी दक्षिणेकडे जातों. मी परत येईपर्यंत तूं असाच पडून रहा, त्यामुळें तो तसाच आहे. त्यामुळें उत्तरेचा दक्षिणेस येण्याचा मार्ग मात्र मोकळा झाला. वरील कथा पुराणांत प्रसिद्ध आहे.

याचा व्यावहारिक अर्थ वर सांगितल्याप्रमाणें लावला गेला आहे व तो योग्यहि दिसतो. अगस्तीनें वस्ती करण्यापूर्वीं विदर्भ देश दंडकारण्यांतच मोडत असे. वऱ्हाडांतील ब्राह्मणलोक आपल्या धार्मिक नित्यकृत्यांत देशकालाचा उच्चार करतांना "दण्डकारण्ये देशे गोदावर्या उत्तरे तीरे" असाच अद्याप करतात. वऱ्हाडांत वस्ती झाल्यावर व राज्यस्थापना झाल्यावर पश्चिमेकडील भागास मात्र दंडकारण्य म्हणूं लागले. कारण वऱ्हाडचा भाग नंतर 'देश' झाला. वऱ्हाडांत एक मोठें राजकुल नांदत असतांना व देशाची अत्यंत भरभराट झाली असतांना सुद्धां पश्चिमेकडील भाग रामायण व भारतकालीं सुद्धां अरण्यमयच होता. विदर्भ देश व दंण्ड-कारण्य शब्द एकाच वेळीं उपयोगांत आलेले पुराणांतून जागोजाग सांपडतात.

वऱ्हाडांत आर्यांचें आगमन सातपुड्यांच्या पूर्वेकडून झालें असावें. विदर्भाची राजधानी कुंडिनपूर ही पूर्वेचे बाजूस आहे व पयोष्णीचे कांठचीं तीर्थेंहि तिकडेच आहेत. तसेंच सालबर्डी, देऊ-

१ सातपुड्यास पूर्वी पुष्कळ ठिकाणीं विंध्य म्हटलें आहे हलीच्या विंध्यास पारियात्र असें नांव होतें, भा. व. भूवर्णन. पा. ५१

खाडा, मार्कंडेय, भांदक, भोजकट वगैरे प्राचीन स्थळें त्याच बाजूस आहेत. वर्धा नदीचे पूर्वेस विदर्भाचें अर्धें राज्य होतें. अगस्तीनें कुंजर पर्वतावर आश्रम बांधला व आपल्या क्षत्रिय शिष्यांकडून मूळच्या अनार्य लोकांस धर्म व सुधारणेची दीक्षा देऊन सर्व बाजूंस वसाहत वाढविली. त्याच्या बरोबरच्या क्षत्रियकुलानें राज्यसंस्थापना केली.

वऱ्हाडांतील हें राजघराणें यदुवंशीय अर्थात् सोमवंशी होतें. यदुवंशाच्या अनेक शाखा होत्या.
विदर्भाचें राजकुल त्यांत भोज नांवाची एक शाखा होती.
या भोज शाखेचे क्षत्रिय अवन्ती मध्यदेशापर्यंत आले होते. महाभोज, कुंतिभोज वगैरे घराणीं तर प्रसिद्धच होतीं. अवान्ति व मध्यदेशाच्या भोजांनीं श्रीकृष्णाच्या वृष्णि कुलास हटवून पश्चिमेकडेस द्वारकेपर्यंत पिटाळलें होतें.

याच भोजांपैकीं एका शाखेनें विंध्यपर्वताचे दक्षिणेस राज्य स्थापिलें. या यादववंशांत विदर्भ नांवाचा राजा होता. तोच मूळचा संस्थापक. त्याचे बायकोचेंहि नांव भोजा असें आढळतें. त्यानें विदर्भा नांवाची नगरी वसवून ती आपली राजधानी केली. विदर्भानगरीचें दुसरें नांव कुंडिनपूर अथवा कौण्डिन्यपूर. हल्लीं हें गांव याच नांवानें प्रसिद्ध असून चांदूर तालुक्यांत वर्धेचे कांठीं आहे. कुंडिन अथवा कौंडिन्य ऋषीच्या नांवावरून नगरास हें नांव दिलेलें दिसतें. बृहदारण्यकोपनिषदांत विदर्भी कौडिन्य म्हणून एका ऋषीचें नांव आहे तोच हा असावा.

---

१ महाभारताचा उपसंहार वैद्य. ३७३–७४

२ विदर्भाच्या बापाचेंच नांव यादव असें होतें. हरिवंश विष्णुपर्व अ.५९.

दुसऱ्या एका आधारावरून[2] ऋषभदेवनामक भरतखंडाच्या राजानें अजनाभवर्ष म्हणजे भरतखंड याचे नऊ भाग करून ते आपल्या नऊ पुत्रांस वांटून दिले. त्या पुत्रांच्या नांवांवरून देशांस नांवें पडलीं. कुशावर्त, ब्रह्मावर्त, इलावर्त हीं अशींच नांवें आहेत. त्यांतच विदर्भ म्हणून एक पुत्र होता. त्यास जो देश मिळाला त्याचें नांव विदर्भ पडलें.

विदर्भाच्या राजघराण्याची वंशावळ जमविणें कठीण आहे; परंतु त्यांतील प्रसिद्ध व उपलब्ध नांवें खालीं दिलीं आहेत. यांत कालानुक्रम साधण्याचा प्रयत्न केला आहे परंतु वंशावळ तुटक आहे.

विदर्भानंतर कांहीं पिढ्यांनीं भीम राजा झाला. त्याचा पुत्र दक्ष, त्याचा वंश बृहद्भानु, हलधर, सुशील, पद्माकर, रिपुमर्दन, चित्रसेन, भीम, रुक्मांगद........भीम ( दमयंतीचा बाप.), दम, ( भाऊ दांत, दमन, )........भोज ( पहिला म्हणजे इंदुमतीचा भाऊ. )

त्याच वंशांत पुढें कांहीं पिढ्यांनीं क्रथ आणि कैशिक हे दोघे भाऊ झाले. क्रथाचा पुत्र अंशुमान्, कैशिकाचा भीष्मक, भीष्मकाचा प्रसिद्ध रुक्मी ( रुक्मिणीचा भाऊ ). रुक्मीच्या पुढील पिढ्या प्रसिद्ध नाहींत. चंपूरामायणाचा कर्ता भोज याच वंशांत होऊन गेला असावा.

---

१. बृह. अ. २ ब्रा. ३

काणे. वि. ज्ञा. वि. पु. ४३ पा. ४८२

२. भागवत स्कं. ५ अ. २. २०

भा. व. भूवर्णन पा. ६

१ हरिवंश. विष्णुपर्व. अ. ५९

गणेश पुराण. उपासना खंड. अ. १९ ते २१

**विदर्भांचे राजकुलाचे शरीरसंबंध**

विदर्भांतील राजकुलाशीं भरतखंडांतील अत्यंत प्रसिद्ध राजकुलांचे संबंध झालेले आहेत. या राजकुलाशीं शरीरसंबंध होणें ही गोष्ट श्लाघ्य[1] समजली जात असे. विदर्भांतील राजकन्या, वीरपत्नी व वीरमाता या नात्यानें विशेषत्वानें दृष्टीस पडतात.

**लोपामुद्रा.**

अगस्ति ऋषीची पत्नी लोपामुद्रा ही विदर्भदेशाच्या राजाची मुलगी होती. त्या राजास ही कन्या अगस्ति ऋषीच्या वरप्रसादानें झालेली होती. ती उपवर होतांच अगस्तीनें तिजविषयीं राजाजवळ मागणी[2] घातली व राजानें ती त्यास दिली. त्यावरून लोपामुद्रेस रुक्मिणी, दमयंती यांचप्रमाणें वैदर्भी, विदर्भजा, विदर्भराजकुमरी असें ठिकठिकाणीं[3] म्हटलेलें आहे.

**केशिनी.** रघु कुलाचा मूळपुरुष सगर राजा याची राणी केशिनी ही विदर्भराजकन्या होती.

**दमयंती**

ही भीमराजाची मुलगी, म्हणून इला भैमी असेंहि म्हटलेलें आहे. भीमराजा अनपत्य असल्यामुळें त्यानें दमन नांवाच्या ऋषीची सेवा केली. त्याच्या कृपेनें त्यास दम, दांत, दमन हे तिघे पुत्र व दमयंती ही कन्या इतकीं अपत्यें झालीं. या ऋषीच्या नांवावरूनच यांचीं नांवें ठेविलेलीं आहेत. दमयंतीनें स्वयंवरांत निषध देशाच्या नलराजास वरिलें

---

१ तं श्लाघ्यसंबंधमसौ विचिन्त्य । रघुवंश ५.४०

२ भांडारकर. दक्षिणेचा प्राचीन इतिहास. पा. ३

३ आपटे. संस्कृत कोश. पा. ९७४.

४ रामायण. बालकांड. सर्ग ३८.

यांचें कथानक नलचम्पू, नलोपाख्यान वगैरे ग्रंथांस आधार झालें आहे.

इंदुमती

ही कुंडिनपूरच्या भोजराजाची बहीण. इनें स्वयंवरांत अयोध्येच्या रघुकुलांतील राजपुत्र अज यास वरिलें. हिचा पुत्र श्रीराम चंद्राचा पिता दशरथ. स्वर्गांतून फुलांचा हार आंगावर पडून ही मरण पावली. हिचे स्वयंवराचा, मृत्यूचा व अजविलापाचा प्रकार अत्यंत हृदयंगम व करुणरसपूर्ण रीतीनें कालिदासानें[1] रघुवंशांत वर्णिला आहे.

रुक्मिणी.

देवी रुक्मिणी ही प्रत्यक्ष लक्ष्मीचा अवतार ही कैशिक राजाची नात व भीष्मकराजाची कन्या. तिचें स्वयंवर करण्याचें ठरविल्यानंतर श्रीकृष्ण कुंडिनपुरास आले. श्रीकृष्णास स्वतःचें राज्य नसल्यामुळें स्वयंवराचे वेळीं राजमंडलांत त्याचा अपमान होईल म्हणून क्रथकैशिकांनीं आपलें सर्व राज्य देऊन त्यास राज्याभिषेक केला अशी कथा हरिवंशांतें[2] आहे.

भीष्मक राजाचा पुत्र रुक्मिन् हा फार बलाढ्य व पराक्रमी होता. द्रुम नांवाच्या ऋषीपासून दिव्यास्त्रांची व परशुरामापासून ब्रह्मास्त्राची त्यानें प्राप्ति करून घेतली होती. परंतु स्वभावानें हा अत्यंत उर्मट असून खुद्द भीष्मकराजा त्यास भीत असे. त्यानें आपली बहीण रुक्मिणी हिला [3]चेदिदेशाचा राजा शिशुपाळ यास देण्याचें ठरविलें होतें. परंतु खुद्द रुक्मिणीची इच्छा श्रीकृष्णास वरण्याची होती. तिनें ब्राह्मणाच्या हातानें श्रीकृष्णास पत्रिका पाठविली कीं "मीं मनोभावें तुम्हांस वरिलें आहे. तरी तुम्ही येऊन मला घेऊन जावें."

---

१ रघुवंश, सर्ग ६

२. हरिवंश. विष्णुपर्व. अ० ५०

३ जबलपुराजवळील प्रदेश.

रुक्मिणी ही कुंडिनपुराचे नगराबाहेरच्या अंबेच्या[1] दर्शनास कुळनेमाप्रमाणें गेली असतां श्रीकृष्णानें सैन्यासह येऊन तिला रथांत घालून तिचें हरण केलें.

रुक्मी यास श्रीकृष्णानें रुक्मिणीस नेलें याचा संताप आला व "श्रीकृष्णाचा पराभव करून बहिणीस घेऊन येईन तरच कुंडिनपुरास परत येईन" अशी प्रतिज्ञा करून तो सैन्यासह श्रीकृष्णाचा पाठलाग करीत गेला व त्यास गांठलें. त्यांची लढाई होऊन[2] श्रीकृष्णानें त्याचा पराभव करून त्याची दाढीमिशी काढून विरूप करून सोडून दिलें.

आपली प्रतिज्ञा पूर्ण झाली नाहीं म्हणून मानी रुक्मी कुंडिनपुरास गेला नाहीं. अलीकडेच भोजकट नांवाचें नवीन नगर वसवून तेथेंच तो राहिला. पुढें हीच विदर्भाची राजधानी झाली. भीष्मक मात्र कुंडिनपुरासच राहिला. परंतु पुढें कुंडिनपूरचें महत्त्वच कमी होत गेलें. विदर्भाचा वंश भोजशाखेपैकीं होता हें मागें आलेंच आहे. त्या नांवावरूनच भोजकट हें नांव दिलेलें दिसतें. उमरावती जिल्ह्यांतील भातकुली हें गांव पूर्वींचें भोजकट होतें असें मानण्यांत येतें. येथें रुक्मीचें एक देऊळ आहे यावरून या गोष्टीस पुष्टि येते. पुढें विदर्भास भोजकट हें देशवाचक नांव पुष्कळ दिवस चालू होतें.

---

१ उमरावतीच्या तटाबाहेरची देवी. ( दंतकथा )

२ ही लढाई नर्मदेपार झाली असें पुराणांत वर्णन आहे. हरिवंश विष्णु. अ. ५९-६०.

परंतु उमरावती जिल्ह्यांत दाढी नदी व दाढी गांव आहे. तेथें ही लढाई झाली व त्यावरूनच हीं नांवें पडली अशी दंतकथा आहे. खरी असण्याचा बराच संभव आहे.

कृष्णानें रुक्मी याचा पराभव केल्यावर त्यानें गंधमादन पर्वतावर जाऊन तपश्चर्या केली व माहेंद्र नामक शिवाचें अस्त्र त्यानें मिळविलें. तो फार बलाढ्य होऊन त्यानें पुष्कळ राजांस जिंकून आपलें राज्य वाढविलें. पांडव=कौरव युद्धांत हा पांडवांतर्फे लढत होता. पांडवदिग्विजयाचे वेळीं सहदेव दक्षिणेंत आला होता. रुक्मी व भीष्मक यांशीं सहदेवाचें दोन दिवस युद्ध झालें. त्यांस जिंकून सहदेव वेणातटाच्या राजावर गेला. ( ही वेणा म्हणजे हल्लींची वाईनगंगा, कृष्णावेण्णा निराळी. )

दक्षिणेस जिंकून परत जातांना सुराष्ट्र ( गुजराथ ) देशांत असतांना सहदेवानें रुक्मी व भीष्मक यांस बोलावून घेतलें व करभार घेऊन त्यांस प्रेमानें निरोप दिला.

रुक्मी याचें कांहीं दिवस श्रीकृष्णाशीं वांकडें राहिलें. परंतु तो व श्रीकृष्ण पुढें व्याही झाले. रुक्मीची

**शुभांगी.** कन्या शुभांगी इच्या स्वयंवरांत कृष्णरुक्मिणी-चा पुत्र प्रद्युम्न हा आला होता;त्यास शुभांगीनें

---

१ म. उद्योगपर्व. अ. १५८.

० महाभारताचा उपसंहार वैद्य. पान ३७४.

२ ततो रत्नान्युपादाय पुरं भोजकटं ययौ ।
तत्र युद्धमभूद्राजन् दिवसद्वयमद्भुतम् ॥ ११ ॥
स विजित्य दुराधर्षं भीष्मकं माद्रिनंदनः ।
कोसलाधिपतिं चैव तथा वेणातटाधिपम् ॥ १२ ॥

३ सुराष्ट्रविषयस्थश्च प्रेषयामास रुक्मिणे ॥ ६२ ॥
राज्ञे भोजकटस्थाय महामात्राय धीमते ।
भीष्मकाय स धर्मात्मा साक्षादिंद्रसखाय वै ॥ ६३ ॥
स चास्य प्रतिजग्राह ससुतः शासनं तदा ।
प्रीतिपूर्वं महाराज वासुदेवमवेक्ष्य च ॥ ६४ ॥

महाभारत सभापर्व. अ. ३१

माळ घातली व प्रद्युम्न याप्रमाणें जांवई झाला.

**रुक्मावती.** प्रद्युम्नाचा पुत्र अनिरुद्ध. रुक्मीची नात (मुलाची मुलगी) रुक्मावती ही अनिरुद्धास देण्याबद्दल खुद्द रुक्मिणीनें भावाजवळ मागणी केली. त्यामुळें रुक्मीनेंहि खुषीनें ती दिली. याप्रमाणें नातें वाढत जाऊन पूर्वींचा द्वेष नाहींसा झाला.

अनिरुद्धाचें लग्न मोठें कडाक्याचें झालें. श्रीकृष्ण, रुक्मिणी, बलराम व लग्नांतील सर्व वऱ्हाडी मंडळी यांस रुक्मी यानें फार दिवस आग्रहानें ठेवून घेतलें.

एकदां बलरामाशीं रुक्मी द्यूत खेळत असतां अनभिज्ञ बलरामदादा नेहमीं हरत व रुक्मी व तत्पक्षीय मंडळी हांसून त्यांची टर उडवीत. त्यामुळें बलरामदादा फारच चिडून गेले. शेवटीं बलरामदादानें कधीं नव्हत एकदां डाव जिंकला; परंतु रुक्मी हा मीच डाव जिंकला असें म्हणून पुन्हां चिडवूं लागला. आधींच चिडलेले बलरामदादा बेताल होऊन देहभान विसरले व रुक्मीस मारण्यास धांवले. त्या दोघांची मारामारी वाढत जाऊन त्यांत बलरामदादांनीं रुक्मीस ठार मारिलें. हें वर्तमान श्रीकृष्णरुक्मिणीस समजतांच त्यांना अतोनात दुःख झालें; परंतु बलरामदादांस कोण बोलणार ? बलरामदादाहि पस्तावले पण काय उपयोग? शेवटीं सर्वजण कष्टी होऊन आपल्या देशीं परत गेले.

रुक्मीनंतर हा वंश बरेच दिवस विदर्भांत राज्य करीत होता. परंतु पुढील राजांची माहिती सांपडत नाही. बरेच दिवसांनीं भोज नांवाचा राजकवि मात्र या वंशांत होऊन गेला.

---

१ मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची रीत वऱ्हाडांत अद्याप आहे व इतरत्र महाराष्ट्रांतहि आहे.

पौराणिक काळाचा इतिहास येथें संपला. हा काळ अत्यंत मोठा असून त्याचा इतिहास मात्र फार थोडा उपलब्ध आहे. परंतु हीच परिस्थिति मध्ययुगापर्यंत चालली हींच सामाजिक. धार्मिक व वाङ्मयविषयक स्थिति मुसलमानी कारकीर्दीपर्यंत होती. ती कशी हें पुढें क्रमाक्रमानें दिसेल.

वऱ्हाडाचीं जुनीं नांवें

वऱ्हाडास संस्कृत ग्रंथांतून निरनिराळ्या वेळीं पुढील नांवें चालू असलेलीं आढळतात. विदर्भ, कैशिक, क्रथकैशिक, भोज, भोजकट, महाराष्ट्र, वर्धातट. सर्वांत प्रसिद्ध नांव विदर्भ हें असून अद्यापहि शिष्टभाषेंत हेंच नांव चालू आहे. हीं नांवें कशीं पडलीं हें पुढें दिलें आहे.

वऱ्हाडचे राज्याचा मूळ संस्थापक विदर्भ राजा याचे नांवावरून विदर्भ हें नांव पडलें. कैशिक राजाच्या नांवावरून कैशिक व क्रथ व कैशिक या दोघा भावांच्या नांवावरून क्रथकैशिक. या वंशाच्या नांवावरून भोज व भोजकट हीं नांवें पडलीं. भोजकट हें शहर रुक्मीराजानें वसविलें, परंतु त्यास नांव मात्र आपल्या घराण्याचें दिलें. ( भोज + कटक = भोजांची राजधानी )

हल्लीं महाराष्ट्र हा शब्द ज्या विस्तृत भागास लावण्यांत येतो तसा तो पूर्वी नसून विदर्भ देशासच महाराष्ट्र. लावीत होते. विदर्भ देश जेव्हां फार मोठा झाला तेव्हां त्यास त्याच्या विस्तारावरून महाराष्ट्र म्हणूं लागले. विदर्भ व महाराष्ट्र हीं दोन्ही नांवें एका वेळीं समानार्थानें उपयोगांत येत असत. विस्तृत विदर्भ म्हणजेच महाराष्ट्र

राजशेखर कवीच्या बालरामायण नांवाच्या नाटकांत विदर्भ व महाराष्ट्र हीं नांवें एकाच देशाबद्दल एकाच वेळीं उपयोगांत आणलीं आहेत. विमानांत बसून श्रीरामचंद्र, सीता व सुग्रीव हे लंकेहून अयोध्येस जात असतांना सुग्रीव प्रत्येक देशाचें वर्णन श्रीरामचंद्रास सांगतो असें दाखविलें आहे. सुग्रीव म्हणतो, " भरताग्रजा, पहा आतां पुढें महाराष्ट्रदेश लागला. " महाराष्ट्रदेश म्हणजे विदर्भच सबब श्रीरामानें सीतेस सांगितलें—

"सीते, विद्येचें माहेरघर असा हा विदर्भदेश पुढें पहा. " त्यावर सीता म्हणते " जेथें माझ्या आजे सासूबाई इंदुमती यांचा जन्म झाला तो. "

मुरारि कवीच्या अनर्घराघवांतहि अशाच वर्णनांत कुंडिनपुराचें वर्णन करीत असतां म्हटलें आहे – " इदमग्रे महाराष्ट्रमण्डलैकमण्डनं कुंडिनं नाम नगरम् " असें म्हणून कुंडिनपूर ही महाराष्ट्राची राजधानी होती असें दर्शविलें आहे.[२]

सबंध महाभारतांत महाराष्ट्र हें नांव मुळींच नाहीं. त्यावेळीं विदर्भ देशाचेंच नांव सांपडतें. भोंवतालच्या दंडकारण्याचें

---

On acconnt of its great size the country (विदर्भ) was also called Maharashtra आपटे सं. कोश. पान ११९६.

विदर्भ देशाच्या विस्ताराबद्दल पुढें पा. २६ पहा.

१ सुग्रीवः—भरताग्रजायमग्रे महाराष्ट्रविषयः ।
रामः—सोऽयं सुभ्रु पुरो विदर्भविषयः सारस्वती-जन्मभूः ।
सीता—यत्रोत्पन्ना मे पितामहश्वशुरस्य गृहिणीन्दुमती ।
( यांत कुन्तल देशाचाहि अन्तर्भाव केलेला दिसतो. )
बालरामायण. १०.७४.

२ अनर्घ अं. ४ व ५. वि. ज्ञा. वि. पु. ४९ पा. ६३ पहा.

३ वैद्य महाभारताचा उपसंहार. पा. ३७४.

व अश्मक, कालिंग, अपरान्त[1] वगैरेचीं नांवें आहेत. अर्थात् त्या वेळीं महाराष्ट्र असें देशवाचक नांव पडलें नव्हतें. त्यानंतर हें नांव पडलें असावें. कांहीं काळापर्यंत दोन्हीं नांवें चालून नंतर महाराष्ट्र हेंच नांव रूढ झालें व त्यांत पश्चिमेकडील समुद्रापर्यंत सर्व लहान देशांचा अंतर्भाव झाला. तीन महाराष्ट्रें[3] असल्याबद्दल-हि उल्लेख कोठें कोठें सांपडतो व त्यावरून फार विस्तृत झालेल्या देशाचें पुन-र्विभागीकरणहि सूचित होतें.

अलंकारशास्त्रांत तीन रीति प्रसिद्ध आहेत त्यांत " वैदर्भी ऊर्फ महाराष्ट्री " म्हणून एक रीति आहे[4]. ती समानार्थानें लाव-ण्यांत येते. एकाच देशाबद्दल हे समानार्थक शब्द असण्याबद्दल हेंहि एक आणखी प्रमाण आहे.

विदर्भाची संस्कृति व विदर्भाची भाषा जेथपर्यंत पसरली तेथपर्यंत महाराष्ट्राचा विस्तार होता. सबब हल्लींच्या विस्तृत महा-राष्ट्राचें म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचें बीज विद-र्भांत आहे.

**वर्धातट** हें नांव फारच क्वचित् सांपडतें. ऐनी अकबरींत वऱ्हाड सुभ्याचें वर्णन देतांना अबुल फजल यानें वऱ्हाडचें जुनें नांव वर्धातट होतें असें म्हटलें आहे. कोणत्याच काळाच्या वाङ्मयांत हें नांव सांपडत नाहीं. फक्त एका ठिकाणीं यास परिपोषक प्रमाण सांपडतें:—

---

१ अजिंठ्याचे पश्चिमेकडील भाग.

२ कोंकण.

३ वि. ज्ञा. विस्तार पु. ४३ पा. ४८५.

४ चालू भाग. पा. १९ पहा.

" वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महाराष्ट्रम् ।
दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र ॥

यावरून अबुल फझल याचें म्हणणें अगदींच निरर्थक दिसत नाहीं. विदर्भा नदी म्हणजे वर्धा.

**विदर्भ शब्दाची व्युत्पत्ति**

पं. तारानाथ तर्कवाचस्पति यांनीं आपल्या " वाचस्पत्यम् " नामक ग्रंथांत विदर्भ याची व्युत्पत्ति " विगता दर्भाः कुशा यतः " म्हणजे जेथून दर्भ म्हणजे गवत नाहींसें झालें तो देश, अशी दिली आहे. नवीन लागवडीस आणलेला देश. विदर्भ राजाच्या नांवावरून देशाचें नांव पडलें यास स्पष्ट प्रमाण असल्यामुळें या व्युत्पत्तीची जरूर नाहीं हें उघड आहे.

**वऱ्हाड नांव कसें पडलें ?**

वऱ्हाड हें हल्लींचें नांव संस्कृत काळानंतरचें आहे. तें कसें पडलें हें खात्रीपूर्वक सांगणें बरेंच कठीण आहे. परंतु त्यासंबंधीं दोन तीन तर्क आहेत ते पुढें मांडणें जरूर आहे.

लग्नांतील मंडळीस वऱ्हाडी व समुदायात्मक अर्थानें वऱ्हाड म्हणतात. या अर्थानें भाषेंत हा शब्द रूढ आहे व दुसरा देशवाचक अर्थानेंहि आहे. त्यामुळें सहजच त्या दोन्हींचा एकमेकांशीं संबंध असावा असा तर्क होतो. या तर्कास अनुसरून याबद्दल दंतकथाहि तयार आहे. श्रीकृष्णाचे लग्नाचे वेळीं वऱ्हाडी मंडळी येथें

---

१ नलचम्पू. ६·६६.

१ वऱ्हाडाचे दक्षिणभागास ' रावणाचे वाजंत्र्यांचा देश असें म्हणणारी एक जुनी दंतकथा आहे. रावणानें आपल्या वाजंत्र्यांस हा दिला होता, असें सांगण्यांत येतें.

२ वऱ्हाड नोहे वर हाड आलें. ॥

पुष्कळ आली व ती येथेंच राहून गेली व त्यांचेवरून देशास वऱ्हाड हें नांव पडलें अशी एक दंतकथा पूर्वीपासून प्रचलित आहे.

मराठी भाषेंत या दोन अर्थानें एकच शब्द रूढ असणें हा आकस्मिक योगायोगहि असेल. निरनिराळ्या शब्दांपासून स्वतंत्रपणें हे समानध्वनीचे दोन शब्दहि कदाचित् झाले असतील अगर परस्परांचा एकमेकांशीं संबंध असल्यास एक दुसऱ्यापासून झाला असेल म्हणजे लग्नांतील वऱ्हाड्यांवरून देशवाचक शब्द अगर देशावरून लग्नमंडळीस नांव. म्हणजे वरील तीन गोष्टींपैकीं एकच गोष्ट खरी असूं शकेल.

प्रथम लग्नांतील ' वऱ्हाड ' याची व्युत्पत्ति पाहूं. ही व्युत्पत्ति स्वतंत्रपणें लावतां येते. संस्कृत वर+हाट= वर म्हणजे नवरदेव याचा हाट म्हणजे समुदाय, बाजारबुणगें. यावरून वऱ्हाड हा शब्द बनलेला असावा. परंतु संस्कृतापासून बनलेल्या इतर भाषांत हा शब्द असावयास पाहिजे पण तसा तो नाहीं.

वरयात्रा या शब्दापासून ' वरात ' हा शब्द बनलेला आहे. संस्कृतापासून बनलेल्या इतर भाषांत तो आहे. उ० हिंदी—बरात, लग्नांतील मंडळी—" बराती " बंगाली—वरयात्र. यास समानार्थक मराठींत 'वरात' आहे; पण ' बराती ' च्या ऐवजीं 'वराती' असें नसून ' वराडी ' अगर ' वऱ्हाडी ' असें आहे. असा अपभ्रंश होणें कठीण नाहीं.

अ. वरहाट अगर वरयात्रा यांपासून लग्नांतील वऱ्हाड, वऱ्हाडी हे शब्द बनले. याप्रमाणें त्याची स्वतंत्र व्युत्पत्ति लागली. तरी

---

१ श्रीकृष्णाचे लग्नाचे वेळची मंडळी किती दिवस राहिली हें निश्चित म हित नाहीं. परंतु अनिरुद्धाचे लग्नाचे वेळची वऱ्हाडी मंडळी मात्र फार दिवस राहिली होती याबद्दल पुरावा आहे. ( मागें पा.१९ पहा. )

२ हाट हा शब्द बाजार या अर्थानें वऱ्हाडांत अद्याप रूढ आहे.

पण देशास हें नांव या शब्दावरून पडलें अगर निराळ्याच स्वतंत्र रीतीनें पडलें हा प्रश्न तसाच रहातो. स्वतंत्र रीतीनें देशवाचक व्युत्पत्ति न लागल्यास ह्या तर्कास पुष्टि मिळेल हें खरें. परंतु तरी सुद्धां वरील तर्क युक्तिवादास धरून पाहिजे. वऱ्हाडी मंडळी देशांत राहिल्यामुळें देशास वऱ्हाड नांव पडणें अशक्य नाहीं; तरी फारसें संभवनीयहि नाहीं.

आ. विदर्भ या जुन्या नांवावरूनच अपभ्रंश होत होत बिडुर्र, बराड असा शब्द होणें शक्य आहे असें एका प्रसिद्ध भाषाशास्त्र-कोविदाचें मत आहे.

( इ ) राजवाडे यांचे मतें वर्धाहार ( वर्धा+आहार ) वर्धेच्या कांठचा देश, यावरून वड्ढाहार–वढार–वऱ्हाड असा अप-भ्रंश झाला आहे. ही व्युत्पत्ति भाषाशास्त्राच्या दृष्टीनें ठीक असेल परंतु वर्धाहार हें नांव या देशास असल्याबद्दल कोठेंहि दाखला मिळत नाहीं. वरदातट, वर्धातट अशा नांवाबद्दल दाखला सांप-डतो पण तोहि फारच थोड्या जागीं. हें नांव बरेंच रूढ असल्यास या शब्दापासून मात्र हें नांव पडणें सर्वांत जास्त संभवनीय आहे.

( ई) वऱ्हाड हें नांव विराट अथवा वैराट या नांवावरून पडलें अशी दंतकथा वऱ्हाडांत आहे. विराटाचें राज्य येथपर्यंत होते असें सांगण्यांत येतें व त्याचे पुष्टिकरणार्थ मेळघाटांतील खालील स्थळें दाखविण्यांत येतात. सातपुड्यांतील एका मोठ्या खोऱ्याचें नांव " कीचकदरा " असें आहे. " भीमचूला " नावांची एक विशाल दगडी चूल मोठमोठे तीन दगड चुलीसारखे पडून झाली आहे. वैराट नांवाचें गांवहि मेळघाटांत आहे.

---

१ राजवाडे.

दंतकथांचा संबंध ऐतिहासिक सत्याशीं नेहमींच असतो असें नाहीं. एखादी सुंदर नदी अथवा जलसंचय, दाट झाडी व एखादें जुनें देऊळ अशी प्राचीन ऋषींच्या आश्रमास शोभेल अशी जागा असली कीं वाल्मीकि, वसिष्ठ, अगस्ति वगैरे वाटेल त्या ऋषीचा आश्रम दंतकथारूपानें त्या ठिकाणीं उत्पन्न होतो. त्यामुळें दंतकथांचा विचार फारच सावधपणें करावा लागतो. परंतु सर्वच दंतकथा सोडून देण्याच्या नसतात. कांहीं दंतकथांवरून अनपेक्षित शोध लागतात. विराटाचें राज्य कोणत्या ठिकाणीं व कोठवर होतें याबद्दल बराच मतभेद आहे. विराट अथवा मत्स्य दोन होते असें निरनिराळे[1] विद्वान् प्रतिपादन करतात. ( कित्येकजण विराट नांवाचे देश चार होते असें सांगतात ). एक मथुरेच्या पश्चिमेस, दुसरा अयोध्येच्या पूर्वेस, वांईच्या जवळपासच्या प्रदेशासहि हेंच नांव होतें असें म्हणतात. परंतु वऱ्हाडांतील कोणत्याहि भागास हें नांव होतें असें दिसत नाहीं. सबब हा तर्क निवळ नामसादृश्यावरून कोणी अनभिज्ञ माणसानें केला असावा असें दिसतें.

**विदर्भाचे राज्याचा विस्तार**

स्थूलमानानें विदर्भ देश उत्तरेस नर्मदेपासून तों दक्षिणेस कृष्णेपर्यंत म्हणजे कुंतल देशास लागून होता[1]. गोदावरीच्या दोन्ही कांठांवरील लोक आपणांस विदर्भीय म्हणवीत असत, असें १४–१५ व्या शतकां-

---

[1] भा. व. भूवर्णन पा. १८५, भारतीय साम्राज्य, आपटे, दत्त.

[1] विदर्भ The modern Berar, a great kingdom in ancient times lying to the north of kuntala and extending from the banks of the Krishna to about the banks of the Narmada. On account of its great size, the country was also called Maharashtra. cf. B, R, 10, 74, Apte's Sanskrit Dictionary, p, 1196.

तील ग्रंथकारांच्या ग्रंथांतील वर्णनावरून सिद्ध होतें. मालविकाग्नि-मित्रांतील कथानकांत वर्धेच्या पूर्वेकडील अर्धे राज्य एका भावास व पश्चिमेकडील अर्धे राज्य दुसऱ्या भावास याप्रमाणें वांटणी केली आहे. त्यावरून पूर्वेस नागपुरापलीकडे म्हणजे जेथपर्यंत मराठी भाषा बोलण्यांत येते तेथपर्यंत विदर्भाची मर्यादा होती असें दिसतें. वऱ्हाडांतील वाकाटकांचे राज्याची पश्चिम सीमा अजिंठ्याच्या पश्चिमेस होती असें अजिंठ्याच्या लेण्यांपैकीं एका शिलालेखावरून सिद्ध होतें. यावरून पश्चिममर्यादा आजिंठ्यापर्यंत म्हणजे हल्लींच्या हद्दीच्या थोडी पश्चिमेस गेली होती. त्या पलीकडे अश्मक देश होता. खानदेशांतलें कांहीं भाग वऱ्हाडांत येत होता.

वऱ्हाडाचे राज्याचे यानंतर दोन भाग झाले. उत्तरेस अमरावती व दक्षिणेस प्रतिष्ठान ( पैठण ) ह्या राजधान्या[5] झाल्या. त्यानंतर वऱ्हाडचें केंद्र देवगिरी ( दौलताबाद ) हें बनलें. हल्लीं देवगिरी वऱ्हाडच्या दक्षिण हद्दीजवळ आहे; परंतु पूर्वीं मध्यवर्ती राजधानीचें शहर होतें व त्या राज्याची सीमा उत्तरेस सातपुड्या-पर्यंत होती.

प्राचीनसंशोधक मे० कानिंगहाम यानें कोसलदेश म्हणजे विदर्भ असें म्हटलें[6] आहे. परंतु हें बरोबर

---

१ चालू भाग. पुढें पा. ४२,४४,४७ पहा.

२ पुढें भाग ३ पहा.

३ पुढें भाग ३ पहा.

४ वि. ज्ञा. विस्तार काणे. पु. ४३ पा. ४८७.

५ आपटे सं. कोश. पा. ११९६ ( मूळ आधार दिला नाहीं. )

६ कनिंगहम हिं. प्राचीन भूगोल. पा. ५२०
Joppen's Hist. Atlas.

**कोसल.** नाहीं. कोसल अथवा दक्षिण कोसल हा देश विदर्भाचे पूर्वेस नागपुरापासून छत्तीसगडापर्यंत होता. दोन्हीच्याहि दक्षिणेस आंध्र अथवा कुंतल देश होता. हें चुकीचें मत पुढें येण्यास कारण प्रसिद्ध चिनी प्रवासी हुएनसंग हा होय. त्यानें आपल्या ग्रंथांत कोसलाचें वर्णन दिलें आहे तें असें:- कलिंग देशाच्या वायव्येस १८०० ली अंतरावर हा देश लागला. याचे दक्षिणेस आंध्र देश. कोसलाच्या राजधानीपासून आंध्र देशाची राजधानी आग्नेयेस होती. सदरहू वर्णन प्राचीन विदर्भास लागू पडतें. तसेंच या देशांतील बुद्धधर्मीय लेण्यांबद्दलचें वर्णन वेरूळच्या लेण्यास लागू पडतें. यावरून पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांनीं चुकून विदर्भ व कोसल यांस एकच देश म्हणून म्हटलें आहे. शेजारच्या कोसलाचें नांव हुएनसंगनें चुकूनं या देशास लावलेलें दिसतें.

**विदर्भांतील वाङ्मयाचें सर्वश्रेष्ठत्व.** संस्कृतकाळीं विदर्भ देश विद्येच्या कामांत फारच पुढें आलेला होता असें दिसतें. हल्लींची व त्या वेळची स्थिति व्यस्त प्रमाणांत दिसून येते. विदर्भांत अनेक नामांकित कवि, ग्रंथकार, ज्योतिषी वगैरे होऊन गेले.

---

१ नलानें दमयंतीस विदर्भाचा मार्ग सांगितला त्यांत विदर्भ व कोसल निराळे देश दाखविले आहेत. आणखीहि पुष्कळ ठिकाणीं हें भिन्नत्व दाखविलें आहे.

एष विंध्यो महाशैलः पयोष्णी च समुद्रगा।
एष पन्था विदर्भाणामसौ गच्छति कोसलात ॥
महाभारत वनपर्व अ. ६१.

२ फर्ग्यूसन व ग्रांट. R. A. S. J. 1875. P. 290.
Watter's Hieun Chung P. 209-10

विदर्भीय कवींनीं आपल्या वाङ्मयांत इतकी सुधारणा केली कीं सर्वसाधारण संस्कृत वाङ्मयांत त्यांनीं आपले देशांतील गुण-वैशिष्ट्य व तेंहि उच्च प्रकारचें, असें बनवून ठेविलें. त्यामुळें विदर्भांतील काव्यरचनेस संस्कृत अलंकारशास्त्रांत अग्रमान मिळाला आहे.

**वैदर्भी रीति**

संस्कृत काव्यरचनेच्या तीन विशिष्ट पद्धति प्रसिद्ध आहेत. त्यांना " रीति" असें पारिभाषिक नांव दिलेलें आहे. त्या तीन रीति म्हणजे " वैदर्भी," "गौडीय" व "पांचाली." यांचीं नांवें त्या त्या देशाच्या काव्यरचनेच्या गुणांवरून व पद्धतीवरून पडलेलीं आहेत. विदर्भ देशांत विशेषतः प्रचलित असलेल्या व त्या प्रकाराचें अनुकरण करणाऱ्या काव्यप्रकारास वैदर्भीरीतीचें काव्य म्हणतात व अलंकारशास्त्रांत वैदर्भी रीतीच्या काव्यांत कोणकोणते गुण असतात हें सांगितलें आहे. तिन्ही रीतींत वैदर्भीरीति श्रेष्ठ मानली आहे. कारण तिचे गुणच तसे आहेत हें पुढें दिसून येईल.

भाषारचनेवरून वरील तीन रीति ठरविल्या जातात. परंतु काव्याच्या रसोत्पत्तीवरून त्याचे चार भाग ठरविले आहेत व त्यास " वत्ति हें पारिभाषिक नांव आहे. त्या वृत्ति चार आहेत. " कारार्का, सात्वती, भारती व आरवटी. येथेंहि पहिली व सवश्रेष्ठ रसपद्धति विदर्भाचीच समजली गेली आहे. कैशिक हें विदर्भाचेंच नांव एकच 'वैदर्भी' हें नांव रीतींत व वृत्तींत येऊं नये म्हणून 'कैशिकी' हें विदर्भाचेंच दुसरें नांव घातलें.

यावरून विदर्भांत काव्यरचना किती परिणतस्थितीस गेली होती हें दिसून येईल. या विदर्भीय काव्याचे मासले व उल्लेख

विक्रमोर्वशीय विद्धशालभंजिका, विक्रमांकदेवचरित, साहित्यदर्पण वगैरे ठिकाणीं झाला आहे.

साहित्यदर्पणांत वैदर्भी रीतीचें लक्षण सांगितलें आहे:—

माधुर्यव्यंजकैर्वर्णैः रचना ललितात्मिका ।
वैदर्भी रीतीचें अवृत्तिरल्पवृत्तिर्वा वैदर्भी रीतिरिष्यते ॥
लक्षण

जीमध्यें मधुरवर्ण असतात, ध्वनि मनोहर असतो, समासघटित लांब लांब पदें मुळींच नसतात व असल्यास समास अगदीं लहान असतात तिला वैदर्भी रीति असें म्हणतात. काव्याच्या अलीकडील परीक्षेच्या कसोटीस सुद्धां उतरल अशी हीं लक्षणें आहेत. बिल्हण कवीनें तिचें वर्णन दिलें आहे:—

अनभ्रवृष्टिः श्रवणामृतस्य सरस्वती विभ्रमजन्मभूमिः ।
वैदर्भरीतिः कृतिनामुदेति सौभाग्यलाभप्रतिभूः पदानाम् ॥

तसेंच काव्यादर्शांत वैदर्भी रीतीचें लक्षण सांगितलें आहे:—

श्लेषः प्रसादः समता माधुर्यं सुकुमारता ।
अर्थव्यक्तिरुदारत्वमोजः कांतिसमाधयः ॥
इति वैदर्भमार्गस्य प्राणा दशगुणाः स्मृताः ।
एषां विपर्ययः प्रायो दृश्यते गौडवर्त्मनि ॥

गौडीय रीतींत सर्व शब्दचमत्कृतींत भर. अर्थात् तें काव्य हीन तऱ्हेचेंच असणार.

एका आधुनिक पंडिताचे याच विषयावरील विचार खालीं दिले आहेत. त्यांवरून वरील मत सर्वमान्य आहे हें सिद्ध होईल:-

१ kales edition Intro P. 40

२ पान ३७ अहो ह्या वैदर्भी रीतिः । माधुर्यमपर्याप्तम ।

विदर्भाय वाङ्मयाचें सर्वश्रेष्ठत्व

" संस्कृत अलंकारशास्त्रांत तीन रीति भाषारचनेच्या संबंधानें व चार वृत्ति रसव्युत्पादनेच्या संबंधानें सांगितल्या आहेत. ' वैदर्भी, गौडी व पांचाली ' या तीन रीति व कैशिकी, सात्वती, भारती व आरभटी ' या चार वृत्ति. वैदर्भी हीस कोणी ' महाराष्ट्री ' असेंहि म्हटलेलें आढळतें. हें नांव विदर्भदेश म्हणजे वऱ्हाडप्रांत या नांवावरून पडलेलें. गौडी म्हणजे बंगाल्यांतली व पांचाली गंगा व यमुना या दोन नद्यांमधील मुलखांतलि या तिन्हींत श्रेष्ठ वैदर्भी असें अलंकारिक म्हणतात. सगळे गुण भरलेले म्हणजे वैदर्भींतच. कैशिक हेंहि विदर्भाचेंच दुसरें नांव. क्वचित् कैशिक व क्वचित् क्रथकैशिक विदर्भदेशाला म्हटलेलें आढळतें. कैशिकी वृत्तीचा आदर प्रायः शृंगाररसांत होतो. जर विदर्भ देशांतील रीति व विदर्भ देशांतील वृत्त संस्कृत ग्रंथकारांनीं सर्वश्रेष्ठ ठरविली तर विदर्भ देशांतील मराठे मोठेच विद्याप्रिय व रसिक असले पाहिजेत एरव्हीं त्यांच्या रीतीस व वृत्तीस सर्वश्रेष्ठत्व संस्कृत आलंकारिकांच्या हातून मिळण्याचा संभव नाहीं ".[1]

ह्यापेक्षांहि जास्त महत्त्वाची शिफारस नवव्या शतकांत झालेल्या राजशेखर कवीनें केली आहे. विदर्भाचें वर्णन त्यानें त्या देशांतील सुंदर वाङ्मयाबद्दल केलें आहे व अखेरीस त्यास विद्येचें माहेरघर असें म्हटलें आहे. श्रीरामचंद्राच्या मुखांत त्यानें पुढील श्लोक घातला आहेः—

1 प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत मराठ्यांसंबंधीं चार उद्गार पा. २. तसेंच वि. ज्ञा. विस्तारांतील प्रो. काणे यांचा उत्कृष्ट लेख पहा. पु. ४३ पा. ४८८–४९०.

यत्क्षेमं त्रिदिवाय वर्त्म निगमस्यांगं च यत्सप्तमम्
स्वादिष्टं च यदैक्षवादपि रसाच्चक्षुश्च यद्वाङ्मयम् ।
तद्यस्मिन्मधुरं प्रसादि रसवत्कान्तं च काव्यामृतम् ।
सोऽयं सुभ्रु पुरो विदर्भविषयः सारस्वतीजन्मभूः ॥

बालरामायण. १०–७४

अ०– हे सुंदरि ( सीते ), स्वर्गाचा सुखकर मार्गच, व वेदाचें सातवें अंग, उंसाच्या रसापेक्षांहि गोड व शब्दरूपी नेत्रच कीं काय असें जें मधुर, प्रासादिक, सुरस व मनोहर काव्यामृत ज्या देशांत आहे व जो देश विद्येचें केवळ माहेरघरच आहे असा हा विदर्भ देश पुढें आहे.

अर्थात् त्या काळीं विदर्भदेश कशाबद्दल प्रसिद्ध असेल तर तो प्रामुख्यानें विद्येबद्दल अशी त्याची ख्याति असली पाहिजे.

**विदर्भाच्या या कीर्तीबद्दल असूया**

वैदर्भी काव्याचा हा नांवलौकिक झाला. त्याबद्दल पुढें इतर प्रांतांतील तेजस्वी व गुणवान् कवींना थोडीशी सात्विक असूयाहि उत्पन्न झाली. कारण विदर्भांतील काव्य कसेंहि असलें तरी तें चांगलें व इतर देशांतील कितीहि उत्तम असलें तरी तें कमी प्रतीचें असें मानण्याची प्रवृत्ति वाढू लागली. विदर्भांतील काव्य प्राधान्येंकरून चांगलें असल्यामुळें कांहीं विशिष्ट गुणांनीं युक्त काव्यास तें नांव पडतें. परंतु त्यामुळें सर्वच विदर्भीय काव्य चांगलें व इतर वाईट असें थोडेंच असणार ? इतर प्रांतांतहि उत्तम प्रतीचें काव्य होतच होतें व विदर्भांतहि कांहीं हीन काव्य होत होतें. भामह नांवाच्या प्रसिद्ध काश्मिरी अलंकारिकास याबद्दल साहजिकच वैषम्य वाटलें व त्यानें देशावरून गुणांची परीक्षा करणारी ही वर्गवारीच त्याज्य ठरविली. तो म्हणतो:—

वैदर्भमन्यदस्तीति मन्यन्ते सुधियोऽपरे ।
तदेव च किल ज्यायः सदर्थमपि नापरम् ॥
गौडीयमदमेतत्तु वैदर्भमिति किं पृथक् ।
गतानुगतिकन्यायान्नानाख्येयममेधसाम् ॥
ननु चाश्मकवंशादि वैदर्भमिति कथ्यते ।
कामं तथास्तु प्रायेण संज्ञेच्छातो विधीयते ॥

भामह. १. ३१--३३

"कांहीं शहाणे लोक वैदर्भ काव्य कांहीं निराळेंच असून तेंच श्रेष्ठ आहे; दुसरें सदर्थयुक्त असलें तरी हीनच असें म्हणतात. परंतु हें गौडीय व हें वैंदर्भ असें कांहीं भिन्नाभिन्न आहे काय? केवळ गतानुगतकत्वानें मूर्ख लोकांनीं हे दोन मार्ग पृथक् आहेत असें म्हणूं नये. जर अश्मकवंशादि काव्यग्रंथ वैदर्भमार्गाचे आहेत असें कोणाचें म्हणणें असेल तर त्यांनीं खुशाल म्हणावें. संज्ञा देणें हें देणाराचे खुषीवर[२] आहे."

**विदर्भांतील कवि व ग्रंथकार**

विदर्भांतलि सर्वांत मोठा कवि भवभूति हा होय. ह्याची जन्मभूमि पद्मपुर[१] नांवाचें गांव होतें. हल्लीं या नांवाचें गांव कोठें नाहीं. कमळपूर, कमळगांव, अशीं गांवें आहेत. पण पद्मपूर अगर त्यासारखें गांव दिसत नाहीं. वऱ्हाडांतील जुन्या शास्त्रीलोकांचे मतें हें गांव दहीहांड्याच्या जव-

---

* अश्मक हें खानदेशाच्या पश्चिम भागास नांव होतें. तेथें एक राज्य होतें. त्या राजवंशाच्या वर्णनाचें हें हीनप्रतीचें काव्य असावें.

२ वि. ज्ञा. वि. काणे. पु. ४३ पा. ४९०.

१ अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम्. मालती. अ. १

ळपास कोठें तरी होतें. आधुनिक विद्वानांच्या मतें भवभूति हें गांव चंद्रपूर, वणी या बाजूस कोठें तरी असावें. कदाचित् हा कवि मूळचा* उंबरखेड येथील मूळचा राहणारा असावा व तेथून पद्मपुरास गेला असावा.

हा कवि इ. स. ७०० चे सुमारास होऊन गेला. प्रख्यात दाक्षिणात्य पंडित कुमारीलभट्ट[2] याचा हा शिष्य होता. कुमारीलभट्टाचें नक्की ठिकाण अद्याप कळलेलें नाहीं. एका नाटकांत भवभूतीनें आपल्या गुरूचें नांव ज्ञाननिधि असें दिलें आहे. परंतु हें विशेषनाम नसून गुणवर्णनात्मक असावें असें वाटतें.

भवभूतीनें आपल्या प्रत्येक नाटकांत स्वतःचें थोडें थोडें वर्णन दिलें आहे. त्याचा सारांश असा आहे कीं "दक्षिणेस विदर्भदेशांत पद्मपूर नांवाचें नगर आहे तेथें उदुंबर* या आडनांवाचे काश्यप गोत्रीय अग्निहोत्री ब्राह्मण राहतात. त्यांचे वंशांत वाजपेय यज्ञ करणारा महाकवि नांवाचा पुरुष झाला. त्यापासून पांचव्या पिढीचा पुरुष भट्ट गोपालाचा नातू व नीलकंठ भट्टाचा पुत्र श्रीकंठ नांवाचा आहे. श्रीकंठ यासच भवभूति म्हणतात. आईचें नांव जतुकर्णी.

---

१ मालती सार व विचार लेले.

२ डॉ. बेलवलकर उतरराम प्रस्तावना.

* उदुंबर हें आडनांव कदाचित गांवांच्या नांवावरून पडलेले असेल गांवाच्या नांवापुढें "कर" असा हल्लींप्रमाणे शब्द न लावतां फक्त गांवाचेच नाव आडनांव म्हणून लावण्याची पूर्वी रीत होती (Indian Antiguary 1921. P. पहा.) हल्लींहि कर्नाटकांत तीं रीत चालू आहे, असें असल्यास हें घराणें मूळचें उदुंबर म्हणने हल्लीचें उंबरखेड येथील असलें पाहिजे. हें गांव अद्यापिहि प्राचीन विद्येविषयीं व श्रद्धालूपणाविषयीं प्रसिद्ध आहे.

भवभूतीच्या मालतीमाधवाचें कथानक कल्पित आहे; परंतु त्यानें आपले जन्मभूमीचा संबंध त्यांत मुद्दाम आणिला आहे. या नाटकांतील नायक माधव हा विदर्भदेशाच्या राजाच्या मंत्र्याचा मुलगा व कुंडिनपूरचा राहणारा. नायिका पद्मावतीच्या अमात्याची मुलगी. पद्मावती हें नांवहि पद्मपुरावरूनच सुचलेलें दिसतें.

वरील कल्पित संविधानकावरूनहि भवभूतीचें आपल्या मातृभूमीवरील प्रेम व अभिमान दिसून येतो. आपल्या मातृभूमीचा संबंध आणून त्यावर आपली कुशलता चालविणें हें कवीस साहजिकपणेंच आल्हादजनक होत असलें पाहिजे.

कालिदास भवभूतीच्या पूर्वीं होऊन गेला तरी या दोन्ही अप्रतिम कविवरांच्या गुणांच्या सांगडींत कालाचीहि सांगड घालण्याचा मोह पूर्वींच्या विद्वान् व कल्पनासृष्टींत वावरणाऱ्या पंडितांस आवरला नाहीं. कालीदास व भवभूति यांच्या समकालीनत्वाविषयीं अनेक दंतकथा रूढ आहेत. भवभूतीचें सर्वगुणसंपन्न ' उत्तरराम ' वाचून रसिक कालिदास तें नाटक डोक्यावर घेऊन नाचला व त्यानें " रात्रिरेवं व्यरंसीत् " या पदांतील " एवं " वरील अनुस्वार काढण्याची सूचना केली व ती भवभूतीनें अमलांतहि आणली येथपर्यंत या दंतकथांची मजल गेली आहे. परंतु या सर्वांवरून एवढेंच अनुमान काढावयाचें कीं या दोन्ही कवींविषयीं जुन्या पंडितांमध्यें अत्यंत आदर होता व या पंडितांच्या गुणग्राहकपणाबद्दलहि आनंद वाटतो. करुण व वीररसांत कालीदासासहि मागें टाकणाऱ्या भवभूतीस कालीदासाच्या बरोबरीचा मान मिळावा हें साहजिकच आहे.

---

१ संस्कृत कविपंचक भवभूति. पान. २

**हेमाद्रिनाथ ऊर्फ हेमाडपंत.**

तेराव्या शतकांतील विशाल बुद्धीचा पुरुष हेमाद्रिनाथ हा विदर्भांतील * होता. याच्या वेळीं एवढा विद्वान् व कर्तृत्वशील पुरुष दुसरा नव्हता. मोडीसारख्या नवीन लिपीचा जनक, हजारों देवळें बांधणारा शिल्पशास्त्रचतुर, व्याकरण, वैद्यक, धर्मशास्त्र यांवर प्रचंड ग्रंथ लिहिणारा व लिहविणारा हा राजकार्यधुरंधर मुत्सद्दी देवगिरीच्या रामदेव व महादेव या दोन राजांच्या वेळीं होता. त्या राज्यांतील हा मुख्य मंत्री असून यानें त्या वेळचे दक्षिणेतील सर्व विद्वान् लोक देवगिरीस जमविले होते. त्याचे वेळीं देवगिरी ही सर्व विद्वानांचें आश्रयस्थान बनली होती. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य याचा पुत्र लक्ष्मीधर याचे आश्रयानें होता व लक्ष्मीधराचा पुत्र चंगदेव यासहि या राज्यांतलि इनाम गांव असून त्यानें खानदेशांत एक मोठी पाठशाला चालविली होती. त्याचे खालोखाल प्रसिद्ध असलेला विदर्भीय पंडित बोपदेव हा याचा उजवा हात होता व अत्यंत मर्जीतला होता. बोपदेव व हेमाद्रि बहुधा मूळचे एका गांवचे असावेत. हेमाद्रिनाथाच्या वेळच्या पुष्कळ इमारती वऱ्हाडांत आहेत. हेमाद्रिनाथाचा चतुर्वर्गचिंतामणि म्हणून प्रचंड ग्रंथ आहे.

हा विद्वान, कवि, वैद्य व वैय्याकरणग्रंथकार तेराव्या शतकांत होऊन गेला. यानें मुक्ताफल व हरिलीला हे

---

* वि. ज्ञा. विस्तार. काणे. पु. ४३ पा. ४९०

मुक्ताफलांत हेमाद्रीचें वर्णन करतांना "सारधीः" असें श्लिष्ट विशेषण लावलें आहे.

सार्थ हें बोपदेवाचें गांव ( पुढें बोपदेव पहा ) कांहीं ठिकाणीं वर्धेच्या कांठचें दुसरें गांव दिलें आहे.

**बोपदेव** काव्यग्रंथ रचिले हरिलीलेंत सर्व भागवत संक्षेपानें आणलें आहे. त्यानें **मुग्धबोध** नांवाचें संस्कृत व्याकरण रचिलें. शिवाय त्यानें वैद्यकावरहि कांहीं ग्रंथ लिहिले आहेत.

हा वर्धानदीच्या कांठीं **सार्थ** अथवा **सार्ध** गांवचा राहणारा असें त्यानें आपल्या[1] ग्रंथांत लिहिलें आहे. तो **केशव** नामक वैद्याचा[2] पुत्र व **धनेश** नांवाचे पंडिताचा शिष्य. हा धनेशहि त्याच गांवीं राहाणारा होता. बोपदेव हा देवगिरीच्या यादवराजाच्या पदरीं होता व यादवांचा प्रसिद्ध विद्वान मंत्री हेमाद्रीपंत ऊर्फ हेमाडपंत याचा त्यास आश्रय होता. मुक्ताफल व हरिलीला हे ग्रंथ त्यानें हेमाद्रिपंतांना संतुष्ट करण्याकरितां रचिले असें त्यानें[3] लिहिलें आहे. या दोन्ही ग्रंथांवर हेमाद्रिपंतांनीं दुसऱ्या पंडितांकडून टीका करविल्या आहेत.

महाराष्ट्रांत बोपदेव दोन झाले. दुसराहि बोपदेव प्रसिद्धच होता.

**बोपदेवाचा** ग्रंथविस्तार मुक्ताफलाची **कैवल्यदीपिका** नामक टीका आहे तिचे कर्त्यानें खालीलप्रमाणें दिला आहे त्यावरून दिसून येईल.

**यस्य व्याकरणे वरेण्यघटनाः स्फीताः प्रबंधा दश ।**
**प्रख्याता नव वैद्यके च तिथिनिर्धारार्थमेकोऽद्भुतः ॥**

---

१ भांडारकर द. प्रा. इ. पान ११७.

२ विद्वद्धनेशशिष्येण भिषक्केशवसूनुना ।
हेमाद्रिर्बोपदेवेन मुक्ताफलमचीकरत् ॥
मुक्ताफल ४-५४

३ श्रीमद्भागवतस्कंदाध्यायार्थादि निरूप्यते ।
विदुषा बोपदेवेन मंत्रिहेमाद्रि-तुष्टये ॥
हरिलीला. १.१

साहित्ये त्रय भागवततत्वोक्तौ त्रयस्तस्य च ।
भूर्गीर्वाणशिरोमणेरिह गुणाः के के न लोकोत्तराः ॥

यावरून बोपदेवाचे व्याकरणग्रंथ दहा, वैद्यक नऊ, ज्योतिष एक, साहित्य तीन, भागवतावर तीन याप्रमाणें ग्रंथ आहेत. या बोपदेवाचे ग्रंथविस्तारावरून तो केवढा विद्वान् होता हें दिसून येईल. याच्या कीर्तितेजानें दुसरे पंडित नेहमीं दिपून जात असत.*

**राजकवि भोज**

विदर्भांतील भोजराजा स्वतः विद्वान् व कवि असून विद्वानांचा चाहता होता. त्याचे पदरीं अनेक विद्वान् लोक होते. कालिदासाचा धारा नगरीचा भोज निराळा व हा निराळा. याचें चंपूरामायण नांवाचें काव्य प्रसिद्ध आहे. त्यांतहि पहिलीं पांच कांडेंच याच्या हातचीं आहेत. प्रत्येक कांडाचे शेवटीं " विदर्भराजभोजविरचित " असा उल्लेख आहे.

**लक्ष्मण**

कुंडिनपूरच्या भोजराजाच्या पदरीं लक्ष्मण नांवाचा कवि होता. त्यानें वरील चंपूरामायणाचें सहावें कांड रचिलें असा त्यांत उल्लेख आहे. या लक्ष्मणकवीचे आणखी ग्रंथ असावेत पण ते आज प्रसिद्ध नाहींत.

**त्रिविक्रमभट्ट**

नलचम्पूकार त्रिविक्रमभट्ट हाहि विदर्भांतील होता असा अंतःस्थ पुरावा आहे. त्याचें सर्व घराणें वऱ्हाडांत व आसपास होतें. स्वतः कवीनें आपल्या देशाबद्दल नलचंपूत " दक्षिणदेश " म्हणून मोघम म्हटलेलें आहे. परंतु त्यावेळच्या दक्षिणदेशाच्या स्थितीवरून व

* याविषयीं त्या वेळच्या पंडितांत कोणीं एक श्लोक केला होता.
बोपदेवमहाग्राहग्रस्तो वामनदिग्गजः
कीर्तेरेव प्रसंगेन माधवेन विमोचितः ॥ काणे

सदरहू ग्रंथांत विदर्भांतील स्थळांचें जें अत्यंत सूक्ष्म वर्णन केलें आहे त्यावरून कवीचें वास्तव्य विदर्भांतच असलें पाहिजे असें वाटतें. कुंडिनपुर नगर, वरदा (वर्धा) नदी, पयोष्णी नदी, तिच्या कांठींची निरनिराळीं क्षेत्रें व देवालयें जीं वऱ्हाडच्या बाहेर बरींच अप्रसिध्द होतीं त्यांचें वर्णन एरव्हीं येणें कठीण.

त्रीविक्रमभट्ट हा शांडिल्यगोत्री ब्राह्मण होता, त्याचे नलचम्पूविषयीं पुढील आख्यायिका प्रसिध्द आहे:—

भट्टांचे वडील देवादित्य पंडित राजाचे पदरीं होते. एके काळीं ते कामानिमित्त बाहेरगांवीं गेले असतां दूरचा एक पंडित राजदरबारीं वाद करण्याकरितां आला. राजानें देवादित्यांस बोलावणें पाठविलें; परंतु ते घरीं नाहींत असें पाहून दूतांनीं भट्टांस आणिलें. भट्ट साधारण विद्वान् होते. त्यांनीं राजसभेस जाण्यापूर्वीं कुलस्वामिनीची प्रार्थना केली व कुलस्वामिनीनें वर दिला कीं, "तुझा पिता परत येईपर्यंत तुझे मुखीं सरस्वती राहील." भट्ट दरबारीं गेले व आलेल्या पंडितांस त्यांनीं वादांत जिकलें. राजानें भट्टांचा बहुमान केला. भट्ट घरीं आल्यावर त्यांनीं विचार केला कीं, पिता परत येईपर्यंत अनायासें सरस्वती मुखीं राहणार आहे. याचा उपयोग करून घेऊन एखादें काव्य रचून प्रसादाचें सार्थक तरी करून घ्यावें. त्यामुळें त्यांनीं काव्य लिहिण्यास सुरवात केली.

" पुण्यश्लोको नळो राजा " या उक्तीवरून नलाख्यानाचाच विषय हातीं घेतला. कदाचित् विदर्भाचा त्यांत बराच संबंध येणार म्हणूनहि तें आख्यान त्यांनीं पसंत केलें असेल. भट्टांनीं रोज एक उच्छ्वास याप्रमाणें सात दिवसांत सात उच्छ्वास लिहिले. त्यांत नलराजा स्वयंवराकरितां कुंडिनपुरास आला येथपर्यंत

वर्णन आलें आहे. सातवे दिवशीं सायंकाळीं देवादित्य पंडित घरीं आले व भट्टांचा प्रभाव संपून नलचम्पू अपूर्णच राहिला.

त्रिविक्रमभट्टाचें घराणें अत्यंत प्रसिद्ध विद्वानांनीं भरलेलें होतें. याचे नंतराचा वंशज भास्करभट्ट यास भोज राजानें विद्यापति अशी पदवी दिली होती. हा भोजराजा बहुधा चंपूरामायणाचा कर्ता विदर्भाधिपति भोज असावा. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य व त्याचा बाप महेश्वराचार्य कवीश्वर हेहि याच वंशांतील होते. त्यांनीं आपलें गांव सत्यकुलाश्रित विज्जलविड असें दिलें आहे. भास्कराचार्यांचा पुत्र लक्ष्मीधर हा देवगिरीस होता व त्याचा पुत्र चंगदेव यास देवगिरीचा जैत्रपाल राजा ( आदिकवि मुकुंदराज याचा शिष्य ) यानें सर्व पंडितांवर मुख्य नेमलें होतें व त्यानें पुढें खानदेशांत पाटणें येथें एक पाठशाळा काढली होती.

**ज्योतिषग्रंथकार.**

आर्यज्योतिषांत वऱ्हाडांतील ज्योतिषांनीं फारच पुढाकार घेतलेला दिसतो. वऱ्हाडांत फार मोठे ज्योतिषी होऊन गेले. त्यांनीं स्वतंत्रपणें निरीक्षण करून ज्योतिषाच्या निरनिराळ्या उपांगांवर ग्रंथ लिहिले आहेत. वऱ्हाडांतील ठिकाणांचे अयनांश त्यांनीं आपल्या प्रांतांकरितां ठरवून ठेवले होते.

## पाथरी उर्फ पार्थपूरचें घराणें.

**ज्ञानराज.**

मुख्यतः ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनांत व ग्रंथरचनेंत ज्या पुरुषांनीं जन्म घालविले व नवीन नवीन शोध लाविले त्या वऱ्हाडांतील एका विद्वान् घराण्यांत ज्ञानराज जन्मला. हे विदर्भ देशांतील पार्थपूर अथवा पाथरी या गांवचे राहणारे, असें त्यांनीं आपल्या ग्रंथांत वर्णन केलें आहे. पाथरी हें गांव हल्लींच्या वऱ्हाडाच्या दक्षिण सरहद्दीवर

असून अव्वल इंग्रजीपासून तें निजामाकडे गेलें आहे. या गांवाचा एकंदर इतिहास फार उज्वल आहे. येथील ब्राह्मण देशपांडे व चौधरी फार शूर होऊन गेले व त्यांचेच वंशापैकीं एका पुरुषास बहामनी राजांनीं बाटवून मुसलमान केलें व त्यानेंहि आपल्या कर्तबगारीनें अहमदनगरचें निजामशाही राज्य स्थापिलें. त्या घराण्याचा हा मूळपुरुष. हें मूळचें वतनाचें गांव म्हणन या गांवाकारितां निजामशाही राजांच्या व वऱ्हाडांताल इमादशाही राजांच्या पुष्कळ लढाया झाल्या.

**ज्ञानराजाचा** बाप **नागनाथ** हे **भारद्वाज** गोत्री ब्राह्मण. यांचें गांव **पार्थपूर** अथवा **पाथरी** हें **गोदा** व **विदर्भा** या दोन नद्यांच्या संगमापासून[1] उत्तरेस एक कोसावर व देवगिरीपासून सोळा[2] योजनांवर याप्रमाणें ज्ञानराजाचा पुत्र **सूर्यपंडित** यानें आपल्या एका ग्रंथांत आपलें कुलवृत्त देतांना म्हटलेलें आहे. **कमलाकर** नांवाच्या दुसऱ्या विदर्भीय ग्रंथकारानेंहि असेंचं लिहिलें आहे.

या घराण्यांतील पुरुष हल्लीं मोंगलाईत **बीड** येथें असून

---

*भारतिय ज्योतिषशास्त्र दीक्षित. पा. २६७–२७४.

१ आस्तेत्रस्त समस्तदोषानिचयं गोदाविदर्भा युतेः
क्रोशनोत्तरतस्तदुत्तरतटे पार्थाभिधानं पुरम् ।
तत्राभूद्गणकोत्तमः पृथुयशाः श्रीनाबनाथाभिधो
भारद्वाजकुले सदैव परमाचारो द्विजन्माग्रणीः ॥

लीलावतीटीका.

२ प्रसिद्धमस्तात् ( देवगिरेः ) नृप ( १६ ) योजनैः प्राक्
याम्यांतराशास्थित पाथरी च ।
विदर्भदेशांतरगास्ति रम्या
राज्ञां पुरी तद्वत- देशमध्ये ॥

कमलाकर.

त्यांचे पूर्वजांचा अमूल्य ग्रंथसंग्रह त्यांचे जवळच आहे. व तेहि अद्याप याच व्यासंगांत आहेत.

ज्ञानराजाचे घराण्याचा मूळपुरुष राम हा देवगिरीच्या रामदेवराजाच्या सभेंत होता. त्याचेपासून पुढील वंश खालीं दिल्याप्रमाणें:—

- राम
  - नीलकंठ
    - विष्णु
      - नीलकंठ
        - नागनाथ
          - नरसिंह
            - नागनाथ
              - ज्ञानराज
                - सूर्यपंडित
                - चिंतामणी
            - धुंडिराज
              - गणेश

ज्ञानराज हा पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला. ह्यानें सिद्धांतसुंदर नांवाचा ज्योतिष ग्रंथ लिहिला आहे. त्यावर ज्ञानराजाचा पुत्र चिंतामणि याची टीका आहे. ह्या ग्रंथांत ज्ञान-

राजानें भास्कराचार्यांच्या बीजगणितांतील एका सूत्राचें खंडन केलें आहे. याशिवाय ज्ञानराजानें जातक, साहित्य व संगीत या शास्त्रांवर तीन निरनिराळे ग्रंथ लिहिले आहेत.

**धुंडिराज** हा ज्ञानराजाचा चुलता. यानें जातकाभरण नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. ह्याशिवाय ग्रहलाघवोदाहरण, ग्रहफलोत्पत्ति, पंचांगफल, कुंडकल्पलता वगैरे ग्रंथ यानें केले आहेत. याचा पुत्र गणेश यानेंहि कांहीं ग्रंथ केले आहेत.

**सूर्यपंडित** ह्या घराण्यांतील अत्यंत प्रासिद्ध ग्रंथकार सूर्यपंडित हा फारच विद्वान व शोधक होता. त्याचे पुष्कळ ग्रंथ आहेत. कांहीं स्वतंत्र असून कांहीं टीकापर आहेत. सूर्यप्रकाश, श्रीपातिपद्धति–गणित, बीजगणित, ताजिकपद्धति, बोधसुधाकर इत्यादि त्याचे विशेष प्रसिद्ध ग्रंथ आहेत.

त्यानें कांहीं काव्येंहि लिहिलीं आहेत. त्यांत पद्यामृत-तरंगिणी, रामकृष्णकाव्य, शंकराभरण, नृसिंहचंपू, विघ्नमोचन, भगवतीगीत इत्यादि मुख्य आहेत. रामकृष्ण–काव्यांतील प्रत्येक श्लोकाचा एक अर्थ रामास व एक अर्थ कृष्णास लागतो.

भास्कराचार्यांच्या लीलावतीवर सूर्यपंडिताची अमृत-कूपिका नांवाची टीका आहे. त्याचे कांहीं प्राकृत ग्रंथहि आहेत.

### गोलग्राम ऊर्फ गोळेगांवचें* घराणें.

वरील पाथरीच्या पश्चिमेस अडीच योजनें गोलग्राम ऊर्फ

---

* भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास दीक्षित पा. २७८–२८३.
पं. सुधाकर द्विवेदीकृत संस्कृत गणकतरंगिणी. पा. ७८; ९८

गोळेगांव म्हणून गांव आहे तेथेंहि असेंच प्रसिद्ध ज्योतिष घराणें होऊन गेलें. कांहीं[1] जणांनीं आपल्या ग्रंथांत आपल्या गांवाचें नांव पार्थपुर अथवा पाथरी हेंच दिलें आहे व तें मोठें गांव म्हणून दिलें आहे. कदाचित् ते मूळचे पाथरीचेच असून जवळच्या गोळेगांव नांवाच्या खेड्यांत राहण्यास गेले असतील. शिवाय ज्ञानराजाच्या घराण्याप्रमाणें ते भारद्वाज गोत्री होते. यावरून कदाचित् ज्ञानराजाचेच वंशांतील भाऊबंद असतील. या घराण्याचा वंशवृक्ष खालीं दिल्याप्रमाणें:—




या घराण्यांतील ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ:—

१ मल्लारि— ग्रहलाघवटीका.

---

१ देशे पार्थसमाव्हयेऽतिरुचिरे तीरे च गोदोत्तरे । मल्लारि.
गोलग्रामे वाक्पतीनां जनानां । गोलज्ञानां वा निवासेन सार्थम् ॥
गोदावर्याः सौम्यतीराधिवासे । शालिन्याढ्ये तद्विदर्भाख्य देशे ॥
शिव दैवज्ञ.

२ विश्वनाथ– सर्व प्रसिद्ध ज्योतिषग्रंथांवर यानें आपले कल्पनेनें उदाहरणें बसविलीं आहेत विद्यार्थ्यांना फारच उपयुक्त आहेत

३ नृसिंह– सौरागम, वासनाकल्पलता.

४ शिवदैवज्ञ (सर्वांत प्रसिद्ध)–मुहूर्तचूडामणि व इतर दोन.

५ कमलाकर– सिद्धांततत्वविवेक.

६ रंगनाथ– मितभाषिणी.

देवगिरीजवळ वेरूळचे उत्तरेस टापरगांव नांवाचे* गांवीं नारायण नांवाचा एक प्रख्यात ज्योतिषी होऊन गेला.

**नारायण टापरगांवकर.**

हा माध्यंदिन शाखी कौशिक गोत्री ब्राह्मण होता. त्याचा मुहूर्तमार्तंड म्हणून फारच प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यावर मार्तंडवल्लभा नांवाची त्यानें स्वतःच टीका लिहिली आहे. ज्योतिषशास्त्रांतील अत्यंत महत्त्वाचे ग्रंथांपैकीं हा एक आहे.

त्याचा पुत्र गंगाधर यानें ग्रहलाघवावर मनोरमा नांवाची टीका केली आहे.

## धर्मपूरचें घराणें[1]

पाथरी व गोळेगांव या घराण्यांप्रमाणेंच याहि घराण्यांतील

---

* श्रीमत्कौशिकपावनो हरिपदद्वंद्वार्पितात्मा हरिः ।
तज्जोऽनंत इलासुरार्चितगुणो नारायणस्तत्सुतः ॥
ख्यातं देवगिरेः शिवालयमुदक् तस्मादुदक्टापर- ।
ग्रामस्तद्वसतिं मुहूर्तभवनं मार्तंडमत्राकरोत् ॥

मुहूर्तमार्तंड ११.१

१ भा. ज्योतिःशास्त्र पा. २७४–२७६
गणकतरंगिणी. पा. ६८,७१,७४.

पुरुषांनीं ज्योतिषशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. त्यांचा वंशवृक्ष खालीलप्रमाणें आहे.




**अनंत**

वऱ्हाडांत* धर्मपूर येथें अनंत नांवाचा एक मोठा ज्योतिषी होऊन गेला. त्याचे जातकपद्धति व कामधेनुटीका हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याचा बाप चिंतामणि हाहि प्रख्यात ज्योतिषी होता. तो साहित्यशास्त्रांतहि प्रवीण होता. याचे पुत्र **नीलकंठ** व राम यांनीं ज्योतिषशास्त्रावर कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. पुढें हें घराणें काशी येथें राहण्यास गेलें. काशी येथें अनंताचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.

---

* अतीव प्रख्यातः स जयति गुणानां जननभू-
विंदर्भाख्यो देशो हरिरिव सदानन्दजनकः । इ०
तस्मिन्विदर्भविषये विषये वितृष्ण-
श्चितामणिर्द्युमाणिरेव बभूव मूर्तः ।

गोविंदकृत पीयूषधारा.

आसीद्धर्मपुरे षडंगनिगमाध्येतृद्विजे मंडिते । इ०

रामकृत मुहूर्तचिंतामणि.

हें धर्मपूर मातापुर उर्फ माहूर या गांवाच्या दक्षिणेस गोदावरीच्या कांठीं आहे. अद्यापि येथें विद्वान ब्राह्मण बरेच आहेत. अनंताचा नातू गोविंद यानें आपले गांवाचें नांव मातृपूर असें दिलें आहे. मातृपूर म्हणजे मातापूर. अथवा माहूर गोविंद हा काशीस राहिला होता व तेथून लिहितांना जवळच्या मोठ्या व प्रसिद्ध गांवाचें नांव त्यानें लिहिलें असावें.

नीलकंठ. नीलकंठानें नीलकंठी नामक फलज्योतिषावर एक ग्रंथ * लिहिला आहे. त्यांत फारशी, अरबी शब्द बरेचसे आले आहेत. त्यावरून तो फारशी व अरबी भाषा सुद्धां शिकला होता असें दिसतें. कारण अनंत हा काशीस गेल्यावर या घराण्याचा लौकिक दिल्ली-पर्यंत पोहोंचला होता. नीलकंठ हा अकबराच्या दरबारांत मुख्य पंडित होता. याचा जातकपद्धतिनामक दुसरा साठ श्लोकांचा ग्रंथ आहे व तो मिथिला प्रांतांत मोठा प्रमाणभूत धरिला जातो.

राम. यानें काशीस मुहूर्तचिंतामणि नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. हा या शाखेच्या ग्रंथामध्यें फार महत्वाचा ग्रंथ आहे. याचाहि आपल्या भावाप्रमाणेंच अकबराच्या दरबाराशीं व मुख्य मुख्य सरदारांशीं संबंध होता असें दिसतें. कारण त्या दरबारांतील प्रसिद्ध सरदार जयपूरचा राजपुत्र " राम याचेकरितां हा ग्रंथ केला " असें राम हा आपल्या ' रामविनोद ' नामक[2] करण ग्रंथांत म्हणतो

---

* गणकतरंगिणी पा. ६८.

१ गोदाकांठचा कौंडिण्यगोत्री बोपदेवाचा पुत्र महादेव याच्या कामधेनुगणित नामक ग्रंथावर ही टीका आहे.

२ गणपतिमभिवंद्य श्रीशपदारविंद—
स्मरणविदिततत्वोऽनन्तजो रामचंद्रः ॥ रामविनोद.

व त्या रामराजाच्या नांवावरूनच रामविनोद हें त्या ग्रंथाचें नांव यानें ठेविलें आहे जयपुराकडे या ग्रंथाचा विशेष प्रचार आहे. अकबराचा प्रसिद्ध मंत्री राजा **तोडरमल** याचे नांवावरून ' तोडरानन्द ' नांवाचा दुसरा ग्रंथ यानें लिहिला आहे; परंतु तो दुर्मिळ आहे. काशी येथील संस्कृत पाठशाळेच्या अभ्यासक्रमांत रामाचा मुहूर्तचिंतामणि मुद्दाम ठेविला आहे.

**गोविंद.** हाहि काशीस होता. यानें आपला चुलता राम याच्या मुहूर्तचिंतामणीवर पीयूषधारा नामक सर्वमान्य टीका लिहिली आहे. या ग्रंथांत त्याची शोधकता व कुशाग्रबुद्धि चांगली दिसून येते. याचे कांहीं काव्यपर ग्रंथ आहेत.

## दहीगांव पूर्णा येथील घराणें.

एलिचपुराजवळ पयोष्णी म्हणजे पूर्णा नदीच्या कांठीं दधिग्रामें[२] म्हणजे दहीगांव ज्यास " दहीगाव पूर्णा " असें व्यावहारिक नांव आहे त्या ठिकाणीं हें एक प्रसिद्ध ज्योतिष घराणें झालें.

**राम.** या घराण्यांतलि मुख्य पुरुष **राम** हा प्रख्यात ज्योतिषी होता व राजदरबारांतहि याचें चांगलें वजन होतें. व वऱ्हाडचा राजा याच्या म्हणण्याप्रमाणें वागत असे असें याचा नातू **कृष्ण** हा आपल्या ग्रंथीं[३]

१ गणकतरंगिणी. पा. ७४

२ एलिचपूरसमदेशे तटे पयोष्ण्याः शुभे दधिग्रामे ।
मुनीश्वर. गोलाध्यायमरीचि.

३ भविष्यदर्थज्ञतयाहि यस्य । विदर्भराजोऽपि निदेशवर्ती ॥
कृष्ण बीजांकुरा.
गणकतरंगिणी. पा. ७१.

म्हणतो. याच वेळीं एलिचपुरास इमादशाही मुसलमान घराणें राज्य करीत होतें.

**कृष्ण.**

या घराण्यांत सर्वांत प्रसिद्ध ज्योतिषी व ग्रंथकार कृष्ण हा होता. याचा छादकनिर्णय नांवाचा स्वतंत्र ग्रंथ व बीजगणितावर ' नवांकुरा ' नामक टीका हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बीजगणितावरील सर्व टीकांत कृष्णाची टीका उत्तम ठरली आहे. त्यानें स्वतःच्या कल्पनेनें कांहीं नवीन रीति बसविल्या आहेत.

धर्मपुरच्या घराण्याप्रमाणें हेंहि घराणें पुढें कांशास[1] राहण्यास गेलें. कृष्ण हा जहांगीर बादशहाचे दरबारचा[2] ज्योतिषी होता.

कृष्णाचे ग्रंथ—नवांकुरा, श्रीपतिपद्धति टीका, छादकनिर्णय.

**नारायण व मुनीश्वर.**

या घराण्यांचे पुढील पिढ्यांत हे दोघे ग्रंथकार झाले. यांचे ज्योतिष व गणित ग्रंथ आहेत. मुनीश्वराचा शिष्य अमरावतींकर रामकृष्ण हाहि ग्रंथकार होता.

---

१ काशी हें प्राचीन संस्कृत विद्येचें आगर व खऱ्या गुणाची परीक्षा तेथेंच होणार. यामुळें सर्व हिंदुस्थानांतील विद्वान लोक तेथें जाऊन आपल्या गुणाची परीक्षा देत असत. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं फार पूर्वीपासून महाराष्ट्रीय पंडितांनीं विद्वत्तेंत जो अग्रमान मिळविला आहे तो अद्याप कायम आहे.

पं. हरप्रसाद शास्त्री. Indian Antiquary 1912 P. 7

२ गणकतरंगिणी. पा. ७१.

३ भा. ज्योतिःशास्त्र पा. २८३ ते २८६.

कोठें दिसत नाहींत. समुद्रगुप्ताचे स्वारीचा मार्ग बहुतेक ठरल्यासारखाच आहे. त्याची स्वारी वऱ्हाडांत झाली नाहीं. पश्चिमेकडून जवळून खानदेशांतून तो परत गेला. फ्रेंच पंडित डुब्रैल याचे मतें तो पूर्व किनाऱ्यावरूनच गेला.पश्चिमेकडे मुळींच आला नाहीं.भांदक, वेरूळ व अजिंठा येथील लेणीं मात्र बुद्धधर्माचा प्रसार एका काळीं या भागांत होता याची साक्ष देतात.

दण्डीचे दशकुमारचरितांत विदर्भांतील भोजवंशीय कुलांतील कांहीं राजांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत पुण्यवर्मा, अनंतवर्मा व भास्करवर्मा हीं नांवें आहेत. अनंतवर्मा हा दुर्व्यसनी निघाल्यामुळें त्याचा पश्चिमेकडील शेजारी व प्रतिस्पर्धी अश्मकदेशाचा राजा वसंतभानु यानें कोंकण, वनवासी वगैरे देशाचे राजे आपले मदतीस बोलावून अनंतवर्म्याचे देशावर स्वारी केली व विदर्भदेश घेतला. अनंतवर्मा याचा लहान मुलगा भास्करवर्मा यास घेऊन राणी पळून गेली; याप्रमाणें कथा आहे. यांत ऐतिहासिक सत्य किती आहे हें सांगतां येत नाहीं. या कथानकाचा प्रत्यंतरी पुरावा दुसरीकडे कोठें मिळत नाहीं.

शंकरदिग्विजयावरून कळतें कीं श्रीशंकराचार्य हे अनेक दुर्मतांचें खंडन करून वेदांत धर्माचें प्रस्थापन करीत हिंडत असतां आंध्र देशांतून श्रीव्यंकटेशाचें दर्शन घेऊन विदर्भ देशांत आले. विदर्भ देशाच्या राजानें त्यांचें स्वागत करून त्यांना आपल्या राजधानीस नेलें. विदर्भांत त्यावेळीं भैरव सांप्रदायी लोक होते. आचार्यांनीं आपल्या शिष्यांकरवीं त्यांचे मताचें खंडन करून वेदांत-

---

१ व्हिन्सेंट स्मिथ पा. २७०. २ डुब्रैल पान ४९.

३ उछ्वास ८ वा.

४ सर्ग १५ श्लो. ६–११

उमरावतीसहि एक घराणें प्रसिद्धीस आलें होतें. रामकृष्ण याचा आजा नृसिंहदैवज्ञ व बाप लक्ष्मण हेहि विद्वान ज्योतिषी होते. रामकृष्ण हा दहीगांव पूर्णा येथील प्रख्यात ज्योतिर्विद् घराण्यांतील मुनीश्वर याचा शिष्य होता. बीजगणितावर बीजप्रबोध नांवाची एक टीका व गणितामृतलहरी नांवाचा दुसरा ग्रंथ हे रामकृष्णाचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. आणखी कांहीं असल्यास माहीत नाहींत.

**रामकृष्ण**

पिंपळगांव राजा[२] येथें हा एक ज्योतिषग्रंथकार होऊन गेला. त्याचे वेदांतपराहि कांहीं ग्रंथ आहेत. ते अद्याप प्रसिद्ध झालेले दिसत नाहींत. त्यांच्या ज्ञानावरून त्यास त्या काळीं शेषाचा अवतार म्हणून मानीत असत. त्याचे वंशज तेथें अद्याप असून त्या गांवचे वतनदार जोशी आहेत. ते अद्याप नागपंचमीस त्याची प्रतिमा वगैरे करून पूजा करतात. परंतु आपल्या पूर्वजाचें महत्त्व जाणण्याइतकी त्यांना विद्या दिसत नाहीं.

**नागेश दैवज्ञ**

प्राचीन ग्रंथांत वऱ्हाडांतील स्थानांचा उल्लेख आला आहे. येथें पुष्कळ ठिकाणीं जुनीं देवळें असून तीर्थें व ऋषींच्या आश्रमांच्या जागा आहेत. 'तपोवन' नांवाचीं दोन तीन गांवें आहेत.

**वऱ्हाडांतील प्राचीन स्थानें**

अगस्ति ऋषीचा आश्रम कुंजरपर्वतावर होता पण तो कोणत्या जागीं हें नक्की सांगतां येत नाहीं. सातपुड्याच्या पायथ्याशीं सालबर्डी येथें असण्याचा बराच संभव आहे.

---

१ भा. ज्यो. पा. २५२

२ प्रत्यक्ष माहिती.

पयोष्णी ( पूर्णा ) नदी इची गणना पवित्र नद्यांत केली आहे. इचा उल्लेख पुष्कळ जागीं आला आहे. वैवस्वत मनूचा पुत्र नृग राजा यानें इच्या कांठीं तप केलें व एका ऋषीचा त्यास शाप झाला होता त्याचे शापांतून तो मुक्त झाला, अशी कथा भारतांत आहे. धौम्यतीर्थवर्णनांत "पयोष्णी नृगनिर्मिता" असा उल्लेख आहे. पयोष्णीमहात्म्य म्हणून ग्रंथ असून त्यांत तिच्या कांठच्या स्थळांचें वर्णन आहे.

इतर नद्यांचीं नांवें:-

वरदा, वसिष्ठा, विदर्भा—वर्धानदी

वेणा—वाईनगंगा. ( कदाचित प्राचीन गंगा ) राजवाडे यांचें मत.

२५५३

प्रणीता—पाईनगंगा ( पश्चिमगंगा—राजवाडे ) वर्धा व पाइन गंगा यांचा संगम झाल्यानंतरहि पुढें प्रणीता नांव आहे.

शुक्राचार्य, दमन, मुद्गल, जमदग्नि, मार्कंडेय या ऋषींचीं स्थळें विदर्भांत पयोष्णीचे कांठीं होतीं. वर्धेच्या पूर्वतीरास चंद्रपूर जिल्ह्यांत मार्कंडेय म्हणून महादेवाचें फार प्रसिद्ध स्थान आहे व तेथें मोठी यात्रा भरत असते. तेथें मार्कंडेय ऋषीचें स्थान आहे. तेथील देवळांवर कांहीं जुने लेख आहेत.

---

१ यस्य ( कुंडिनस्य ) नातिदूरे दर्शनदूरीकृतदुरिता......पातकभंगा गंगासुपहसन्ती......पुण्यपयाः पयोष्णी वहति । —नलचम्पू.

२ यस्य च पश्चिमदेशे......वैदर्भमंडलस्य भगवतो भार्गवस्याश्रमः । "शुक्रो भोजकटेऽभवत्" इति श्रुतिः ।

मार्कंडेय प्रमुख महामुनिनिवासपवित्रिताः

खल्विमाः पयोष्णीपरिसरवनभूमयः ।

श्रूयते किलास्माद्‌द्देशात्पूर्वदिग्भागे भगवतः पुराणपुरुषावतारस्य परशुरामस्य जनयितुर्जमदग्नेराश्रमः ।

ततोऽपि न्नातिदूरे भगवतो महावराहस्यायतनम् । नलचम्पू.

कुंडिनपूर — कैक शतकें ही वऱ्हाडाची राजधानी होती. कुंडिन अथवा कौंडिण्य ऋषीच्या नांवावरून या नगराचें नांव पडलें हें मागें[1] आलेंच आहे. कुंडिनपुराविषयीं नलचम्पूकारानें म्हटलें आहे;

देशानां दक्षिणो देशस्तत्र वैदर्भमण्डलम् ।
तत्रापि वरदातीरं मंडनं कुंडिनं पुरम् ॥

" महाराष्ट्रमंडलैकमंडनं कुंडिनं नाम नगरम् "

असें अनर्घ्यराघवांतहि वर्णन आहे. अगदीं भरभराटींत असतांना कुंडिनपुराचा घेर २१ कोसांचा होता असें म्हणतात. यांत जरी अतिशयोक्ति असली तरी विजयानगरसारख्या अर्वाचीन शहरांचा विस्तार लक्षांत घेतल्यास हें अगदींच असंभाव्य नाहीं. कुंडिनपूर हें त्यावेळीं असामान्य शहर होतें. कैक शतकें-पर्यंत विदर्भासारखें प्रसिद्ध राज्य व राजघराणें सर्व दक्षिणेंत दुसरें नव्हतें. विदर्भांतील सारस्वत पाहिलें म्हणजे फार काळपर्यंत शांतता व समृद्धि राज्यांत नांदत असली पाहिजे हें उघड आहे अशा प्रख्यात देशाची राजधानीहि फार मोठी वाढली असेल. भोवतालीं वाड्या व पेठा अनेक असतील. निरनिराळ्या लहान खेड्यांचा त्यांत समावेश झाला असेल.

कुंडिनपुराच्या वरील विस्ताराबद्दल एक दंतकथा प्रसिद्ध आहे. कुंडिनपुराच्या वेशीबाहेरच्या अंबेच्या[2] देवळांत रुक्मिणी कुलनेमाप्रमाणें पूजेस गेली असतां कृष्णानें तिचें हरण केलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. तें अंबेचें देऊळ म्हणजे सध्यां उमरावतीच्या तटाबाहेर अंबादरवाज्याबाहेरील प्रसिद्ध अंबेचें देऊळ होय व रुक्मि-

१ पा. १३ पहा.
२ कित्येक जागीं 'इंद्रायणीच्या' असें म्हटलें आहे.

णीस्वयंवरांतील अंबिकापूर हेंच उमरावती होय अशी पूर्वापार दंतकथा आहे. उमरावतीहून हल्लींचें कौंडिण्यपूर १२कोस आहे.हल्लीं हें ४००।५०० वस्तीचें एक खेडें असून पूर्वीचें कुंडिनपूर जमिनी-खालीं दबलेलें आहे. ज्या तऱ्हेनें कुंडिनपूर मोठें वाढत गेलें त्याच्या उलट तऱ्हेनें तें मोडत जाऊन हल्लींचें खेडें राहिलें आहे. अंबिका-पुराची वस्ती वाढत जाऊन तें पुढील राजकीय वातावरणांत वाढत जाऊन हल्लींच्या रूपास आलें आहे. कुंडिनपूर हें वऱ्हाडांत एवढें प्रसिद्ध असून पुणें वगैरे बाजूस तें कोठें असावें याबद्दल निरनिराळ्या विद्वानांचे निरनिराळे तर्क चालू होते. विद्वद्रत्न व कोशकार आपटे यांनीं त्याची स्थापना बेदर येथें केली. ( सं. कोश पा. ११९६ ). ज्योतिर्विद् शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं नागपूर चंद्रपूरच्या पश्चिमेस कोठें तरी असावें असा स्थूलमानानें शेरा दिला. ( भारत वर्षीय भूवर्णन पा. २७९ ) सर्व हिंदुस्थानांत पूर्वीच्या नांवानेंच जीं थोडीं स्थळें कायम आहेत त्यांतील एक कुंडिनपूर अथवा कौंडिण्यपुर हें आहे.

**सालबर्डी.** वऱ्हाडच्या ईशान्येच्या हद्दीवर अंशतः बैतुल जिल्ह्याच्या हद्दींत हें एक पुरातन ठिकाण आहे. येथें वाल्मीकिचा आश्रम होता अशी दंतकथा आहे. कदाचित् अगस्तीचा आश्रम येथें असावा. तेथें एक थंड पाण्याचा व एक गरम पाण्याचा याप्रमाणें दोन कुंडें आहेत व त्यास सीतानाहाणी म्हणतात व सीता अज्ञातवासांत असतांना वाल्मीकि ऋषीच्या आश्रमांत होती त्यावेळचीं हीं आहेत असें म्हणतात. वाल्मीकिनें लवकुशांस येथेंच शिकविलें. सीताराम यांच्या दण्डकारण्यांतील पुनर्मीलनाची जागाहि हीच असें

१ या कुंडांत मेडोज टेलर यानें १८५७ सालीं स्नान केलें व त्यामुळें त्याचा मलेरियाचा ताप कांहीं दिवस थांबला असें त्यानें लिहिलें आहे.

म्हणतात. येथून गोदावरी व दण्डकारण्य मात्र फार दूर होतें ही गोष्ट या कथेस विसंगत आहे.

येथें दोन बुद्ध विहार खडकांत कोरलेले सांपडले आहेत.

**लोणार.**

याचें जुनें नांव " विरज " विरजमहात्म्य नांवाचा संस्कृत ग्रंथ आहे. त्यांत येथील तीर्थांची माहिती व पौराणिक कथा दिलेल्या आहेत. कपिलातीर्थ ऊर्फ धार म्हणून एक जुनें तीर्थ असून भोंवतालीं पुष्कळ देवळें आहेत. या तीर्थांत पाण्याची एक मोठी धार गायमुखांतून पडते. दैत्यसूदनाचें देऊळ म्हणून एक जुनें चालुक्यांचे धर्तीचे देऊळ आहे व शुक्राचार्यांची पाठशाळा म्हणून एक देऊळ असून तेथें एक भस्माची टेकडी आहे ती होमहवनाची राख आहे असें म्हणतात.

लवणासुर नांवाच्या राक्षसास येथें बालविष्णूनें मारलें अशी कथा आहे. लवणासुराच्या रक्ताचें हल्लींचें क्षाराचें सरोवर झालें व लवण ( लोण ) या नांवावरूनच गांवाचें नांव लोणार असें पडलें. या स्थळाचे भोंवतीं असंख्य हेमाडपंती देवळें व कुंडें आहेत. सरोवराचे डोंगराचें आंत " कमलजा " नांवाचे देवीचे पुरातन स्थान आहे.

आनंदरामायण, यात्राकांड सर्ग ७ यांत श्रीरामाचा प्रवास वर्णिला आहे त्यांत घृष्णेश्वराचें दर्शन घेऊन श्रीराम विरज तीर्थास आले व तेथील देवीस वंदन करून पुढें गेले असें वर्णन आहे.

पद्मपुराण अ. ३९ यांत विरजतीर्थ,वंशगुल्म ( वाशीम ) वरदासंगम, पयोष्णी यांचा उल्लेख आहे. त्याच पुराणाच्या अ.

---

१ प्रस्तुत लेखकाचें " लोणारवर्णन " पुस्तक पहा.

१८९ मध्यें सुनंद नांवाच्या ब्राह्मणाची गोष्ट आहे. तो मेघंकर (मेहकर) येथून गोदावरीचे स्नानाकारितां निघाला. पहिले दिवशीं त्यानें विरजतीर्थाचें स्नान केलें, कमलेचें (सरोवरांतील देवीचें) पूजन केलें व कपिलासंगम तीर्थांत (लोणार येथील एक कुंड) स्नान केलें व अष्टतीर्थांत पितृतर्पण केलें असें वर्णन आहे. हीं सर्व स्थळें येथें आहेत.

यवतमाळ तालुक्यांत कळंब हें प्राचीन स्थान आहे. याचें जुनें नांव कदंब. याचें वर्णन गणेशपुराण उपासना खंड, अ० ३४–३९ यांत दिलें आहे. इंद्रास गौतम ऋषीचा शाप झाल्यावर त्यानें येथें येऊन एका कदंब वृक्षाखालीं तप केलें. तेथें त्यास गणेशानें दर्शन देऊन स्वर्गंगेचें स्नान घातलें व चिंतामणि रूपानें आपण तेथें राहिला. तें गणेशकुंड व चिंतामणीचें देऊळ व मूर्ति तेथें आहे. भाविक लोक तेथें जातात.

**कळंब.**

या क्षेत्राविषयीं कुरुंदवाडकरांच्या गणेश पुराणांत पुढील वर्णन आहे:–

श्रीचिंतामण्यालय वैदर्भी शुभ कदंब नगरांत ॥
आहे गणेशकुंडहि जें स्नानें मुक्ति दे नरकरांत ॥

कुंडिनपूरच्या दुसऱ्या भीम राजाचा पुत्र रुक्मांगद यास मुकुंदा नांवाच्या ऋषिपत्नीच्या शापानें कुष्टरोग झाला होता तो या गणेशकुंडाच्या स्नानानें गेला. (गणेश पुराण अ० २८).

शिवलीलामृतांतील व्याधाची कथा जेथें घडली तें हें ठिकाण तेथें शिवाचें प्राचीन देवालय, बेलाचीं झाडें व एक बांधीव कुंड ज्यांत पुष्कळ निरुपद्रवी सर्प

**चांदस**

---

१ अध्याय ३

आहेत असें आहे. त्या कुंडांत मधोमध पाण्याचे तळाशीं एक शिवलिंग आहे असें म्हणतात व त्या कुंडाचे मधोमध बेलाचें पान टाकलें म्हणजे तें तळाशीं जाऊन त्या शिवलिंगावर पडतें असें म्हणतात. कुंडांतील सर्पांस बायका हातानें बाजूस सारतात इतके ते निरुपद्रवी आहेत.

**कारंजा** गुरुचरित्रांतील वर्णिलेलें कारिंज ऋषीचें स्थान. येथें कारिंज ऋषीनें तप करून देवीस प्रसन्न केलें व तिनें निर्मिलेल्या सरोवरांत स्नान करतांच त्याचा रोग दूर झाला. तो तलाव अद्याप ऋषितलाव नांवानें प्रसिद्ध आहे व जवळ देवळें आहेत. दत्ताचा एक अवतार येथें झाल्याबद्दलहि उल्लेख आहे.

**मेहकर** जुनें नांव मेघंकर. पद्मपुराण अ. १८९ यांत कथा आहे कीं प्रणीता ( पाइनगंगा ) नदीच्या कांठीं मेघंकर ( मेहकर ) नांवाचें सुंदर नगर होतें. तेथें सुनंद नांवाचा ब्राह्मण होता. तो गोदावरीच्या यात्रेस निघाला. व०

मत्स्यपुराणांत* श्राद्धकल्पास योग्य ठिकाणें सांगितलीं आहेत त्यांत या क्षेत्राचें मेघंकर व देवतेचें नांव " महाविष्णु " असें दिलें आहे. तीच हल्लीं सांपडलेली बालाजीची मूर्ति. श्राद्धकल्पाची जागा पाइनगंगेच्या कांठीं " मढ " या नांवाची आहे.

**भांदक.** पूर्वीचें नांव भद्रक, भद्रावती, भानक ( गणेशपुराण खं. अ० ३७ )गृत्समद ऋषीनें येथें गणपतीची तपश्चर्या केली व वरप्राप्ति झाली.वरदविनायक नांवाच्या गणपतीची स्थापना केली व गजाननाचें देऊळ बांधलें.

---

* अध्याय



यवतमाळाकडील एक जुळें देऊळ. [ पृ. ५६



प्राचीन
विदर्भ
पान ९७
अवन्तिदेश
चेदिदेश
नर्मदा
विंध्य पर्वत
(परियात्रा)
अश्मक
दण्डकारण्य
तापी
सातपुडा
(विंध्य)
कुंजर पर्वत
अचलपुर
पयोष्णी (पूर्णा)
भोगवर्धन
(भोकरधन)
विदर्भा नदी
भद्रावती (भांदक)
चंद्रपुर (चांदा)
मार्कंडेय
(मार्कंडा)
नामितीर्थ
(नांदेड)
कर्नाटक देश
प्रतिष्ठान (पैठण)
गोदावरी
त्रिलिंग
(तेलंगण)
धर्मपुर
गोलग्राम (गोळेगांव)
पार्थपुर (पाथरी)
मातापुर
(माहूर)
विरज
(लोणार)

येथें इतरहि प्राचीन देवळें आहेत. हें ठिकाण हल्लीं वणीचे पूर्वेस चांदा जिल्ह्यांत आहे.

**भोकरधन.** वऱ्हाडच्या पश्चिम हद्दीवर हल्लीं निजामाचे हद्दींत भोकरधन म्हणून तालुक्याची जागा आहे. भोगवर्धन, अश्मक म्हणून या बाजूस लहान लहान राज्यें होतीं त्यांतील भोगवर्धन हें असावें ( मार्कंडेय पुराण अ० ५४-४८ )

**देऊर-वाडा.** पयोष्णीच्या कांठीं. नृसिंहाचें मंदिर व करशुद्धितीर्थ नांवाचें कुंड आहे. नृसिंहानें हिरण्यकशिपूस मारल्यानंतर या तीर्थांत हात धुतले अशी कथा आहे.

**वाशीम.** याचें जुनें नांव वत्सगुल्म. कोठें कोठें वंशगुल्म म्हटलेलें आहे. ( पद्मपुराण अ० ३९ ). वच्छोम म्हणून राजशेखर कवीच्या कर्पूरमंजरी नामक प्राकृत ग्रंथांत नांव आहे. जुनीं स्थानें महादेवाचें देऊळ, पद्मतीर्थ वगैरे आहेत. वत्सगुल्ममहात्म्य म्हणून संस्कृत ग्रंथ आहे.

**एलिचपूर** जुनें नांव अचलपूर ( वि. ज्ञा. विस्तार पु. ४३ पा. ४८८ काणे यांचा लेख पहा. )

**मातृपुर मातापुर** माहूर हेंहि प्राचीन स्थान आहे तेथें देवीचें व दत्ताचें याप्रमाणें दोन प्रसिद्ध देवस्थानें आहेत.

**जळगांव** जलग्राम येथें "राजा भर्तृहरीचें" एक जुनें देऊळ आहे. भर्तृहरि येथें येऊन राहिला असावा व येथेंच मरण पावला असावा. असें म्हणतात. परंतु भर्तृहरि दोन तीन होऊन गेले त्यांपैकीं प्रसिद्ध राजा भर्तृहरी सोडून हा दुसरा असावा.

---

# भाग तिसरा

## मध्ययुग.

प्राचीन काळाच्या इतिहासापेक्षां हिंदुस्थानाच्या मध्ययुगाचा इतिहास बराच अंधुक आहे. तो काळ धामधुमीचा गेला. धार्मिक व राजकीय क्रांतीचा झाला. बौद्ध व जैन धर्मांचा उदय व अस्त, व परकीय लोकांच्या स्वाऱ्या याचवेळीं झाल्या. प्राचीन युगाची सुधारणा कळसास जाऊन पोहोंचल्यानंतर आलेली ग्लानि या युगानें पाहिली.

या काळाचा इतिहास बहुतेक लुप्तच आहे व तो अद्याप उजेडांत येत आहे. त्यामुळें वऱ्हाड यावेळीं कोणकोणत्या राजांच्या ताब्यांत होता हें सांगणें बरेंच कठीण आहे.

स्थूलमानानें असें दिसतें कीं इसवी सनाच्या पहिल्या दोन तीन शतकांत वऱ्हाड प्रांत प्रथम मौर्य व नंतर शातवाहन या आंध्र वंशीय राजांच्या ताब्यांत होता. तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत वाकाटक नांवाचे राजे वऱ्हाडांत झाले. त्यानंतर पहिल्या चालुक्य वंशाच्या ताब्यांत वऱ्हाड गेलें. त्यानंतर राष्ट्रकूट, दुसरे चालुक्य व देवगिरीचे यादव असा क्रम होता.

या कारकीर्दींत वऱ्हाडासंबंधीं अशी विशेष माहिती कांहीं मिळत नाहीं. अशोकाच्या वेळीं वऱ्हाड त्याच्या ताब्यांत आला होता. परंतु मूळच्या राजघराण्यास त्यानें मांडलिक म्हणून ठेवलें अगर काय केलें याचा कोठें उल्लेख दिसत नाहीं. बुद्धधर्माचा वऱ्हाडांत विशेष प्रसार झालेला दिसत नाहीं. त्या धर्माचे स्तूप वगैरे

कोठें दिसत नाहींत. समुद्रगुप्ताचे स्वारीचा मार्ग बहुतेक ठरल्यासारखाच आहे. त्याची स्वारी वऱ्हाडांत झाली नाहीं. पश्चिमेकडून जवळून खानदेशांतून[1] तो परत गेला. फ्रेंच पंडित डुब्रैल[2] याचे मतें तो पूर्व किनाऱ्यावरूनच गेला. पश्चिमेकडे मुळींच आला नाहीं. भांदक, वेरूळ व अजिंठा येथील लेणीं मात्र बुद्धधर्माचा प्रसार एका काळीं या भागांत होता याची साक्ष देतात.

दण्डीचे दशकुमारचरितांत[3] विदर्भांतील भोजवंशीय कुलांतील कांहीं राजांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत पुण्यवर्मा, अनंतवर्मा व भास्करवर्मा हीं नांवें आहेत. अनंतवर्मा हा दुर्व्यसनी निघाल्यामुळें त्याचा पश्चिमेकडील शेजारी व प्रतिस्पर्धी अश्मकदेशाचा राजा वसंतभानु यानें कोंकण, वनवासी वगैरे देशाचे राजे आपले मदतीस बोलावून अनंतवर्म्याचे देशावर स्वारी केली व विदर्भदेश घेतला. अनंतवर्मा याचा लहान मुलगा भास्करवर्मा यास घेऊन राणी पळून गेली; याप्रमाणें कथा आहे. यांत ऐतिहासिक सत्य किती आहे हें सांगतां येत नाहीं. या कथानकाचा प्रत्यंतरी पुरावा दुसरीकडे कोठें मिळत नाहीं.

शंकरदिग्विजयावरून[4] कळतें कीं श्रीशंकराचार्य हे अनेक दुर्मतांचें खंडन करून वेदांत धर्माचें प्रस्थापन करीत हिंडत असतां आंध्र देशांतून श्रीव्यंकटेशाचें दर्शन घेऊन विदर्भ देशांत आले. विदर्भ देशाच्या राजानें त्यांचें स्वागत करून त्यांना आपल्या राजधानीस नेलें. विदर्भांत त्यावेळीं भैरव सांप्रदायी लोक होते. आचार्यांनीं आपल्या शिष्यांकरवीं त्यांचे मताचें खंडन करून वेदांत-

---

१ व्हिन्सेंट स्मिथ पा. २७०. २ डूब्रेल पान ४९.

३ उछ्वास ८ वा.

४ सर्ग १५ श्लो. ६-११

मताचा जास्त प्रसार केला. नंतर कर्नाटकांत जाऊन कापालिकांचा मोड केला.

यावेळीं कोण राजा होता त्याचें व राजधानीचें नांव मूळ ग्रंथांत दिलेलें नाहीं. त्यामुळें ऐतिहासिक माहितींत विशेष भर पडत नाहीं. उत्तरेस संग अथवा शुंग घराणें राज्य करीत असतां त्यांचे समकालीन विदर्भाचें एक राजघराणें अस्तित्वांत होतें. त्याचा संबंध मागें व पुढें जोडतां येत नाहीं.एका तुटक प्रसंगाचीच माहिती सांपडते. ती मालविकाग्निमित्र नाटकांत आहे. या नाटकांतील कथानक कल्पित नसून त्यांत ऐतिहासिक सत्य आहे असें सिद्ध झालें आहे. कालिदासानें हें कथानक कोठून घेतलें हें समजत नाहीं. त्या वेळच्या अगर त्या पूर्वींच्या उपलब्ध ग्रंथांत या घराण्याचा इतिहास कोठें दिला नाहीं. निदान हल्लीं उपलब्ध असलेल्या ग्रंथांत तरी नाहीं. कालिदास हा या काळाच्या नंतर लौकरच झाला व वरील गोष्टी कदाचित् त्याचे वेळेस सर्वतोमुखी असाव्यात व त्यावरूनच त्यानें हें कथानक घेतलें असावें.अगर त्याचे वेळीं हा इतिहासग्रंथ उपलब्ध असावा. हें घराणें पहिल्या दोन शतकांत वऱ्हाडांत झालें. त्याची माहिती या नाटकावरून देतां येते ती अशीः—

यज्ञसेन हा राजा विदर्भांत राज्य करीत होता.त्याचा चुलत भाऊ माधवसेन या नांवाचा होता. माधवसेन हा राज्यांत हिस्सा मागूं लागला. यज्ञसेन त्यास हिस्सा देईना.उभयतांचें युद्ध सुरू झालें. यज्ञसेनानें माधवसेनाचा पराभव करून त्यास पळावयास लावलें. त्यावेळेस उत्तर हिंदुस्थानांत संग अथवा शुंग या घराण्यांतील प्रसिद्ध पुष्यमित्र राजा राज्य करीत होता. त्याचे राज्याचा विस्तार

१ भांडारकर. दक्षिणेचा प्राचीन इतिहास पा. १४

Vincent Smith P. 188. 202

जवळ जवळ नर्मदेपर्यंत होता. त्याचेतर्फें त्याचा पुत्र अग्निमित्र हा विदिशा[1] येथें राज्य करीत होता व तोहि फार पराक्रमी होता. माधवसेनानी बहीण मालविका ही अग्निमित्र यास देण्याचें ठरलें होतें.

माधवसेनाचा पराभव झाल्यानंतर तो विदिशेकडे पळत चालला. अग्निमित्राची मदत घेऊन पुन्हां स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. परंतु रस्त्यांत त्याच्यावर यज्ञसेनाच्या एका सरदारानें छापा घातला व माधवसेनास पकडलें. माधवसेनाची बहीण मालविका हीहि बरोबर होती परंतु ती कशी तरी सुटून पळून गेली व विदिशेस जाऊन अग्निमित्र राजाच्या राणीजवळ जाऊन तिच्या आश्रयास म्हणून राहिली. राजास ही कोण म्हणून माहीत नसतांही त्यांचें प्रेम जडलें.

माधवसेनास यज्ञसेनानें कैद केलें हें समजतांच अग्निमित्रानें यज्ञसेनावर आपला मेहुणा वीरसेन यास पाठवून त्याचा पराभव करून माधवसेनास कैदेतून सोडविलें. व या दोघां भावांचा समेट करून दिला व आपल्या हातानें विदर्भाच्या राज्याच्या दोन वांटण्या करून दिल्या. वरदा* म्हणजे हल्लींची वर्धानदी इच्या

---

१ हल्लींचें भिलसा.

* तौ ( यज्ञसेन माधवसेनौ ) पृथग्वरदाकूले शिष्टामुत्तरदक्षिणे ।
नक्तं दिवं विभज्योभौ शीतोष्णकिरणाविव ॥

मालविकाग्निमित्र. ५. १३.

" चंद्र व सूर्य ज्या प्रमाणें रात्र व दिवस काल वांटून घेतात त्याप्रमाणें यज्ञसेन व माधवसेन यांनीं वर्धेच्या उत्तर व दक्षिण कांठांवरील मुलूख वांटून घेऊन पृथक् पृथक् राज्य करावें. " वर्धा नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. तिचे उत्तर व दक्षिण भाग म्हणजे डावा व उजवा कांठ. अर्थात् पश्चिमेकडील अर्धें राज्य एकास व पूर्वेकडील अर्धें दुसऱ्यास.

पश्चिमेकडील अर्धा मुलूख यज्ञसेनास दिला व पूर्वेकडील अर्धा मुलूख माधवसेनास दिला.

मालविका व अग्निमित्र यांचा, पुढें मोठ्या थाटानें विवाह झाला.

हें कथानक खिस्ती शतकापूर्वीं दीडशें वर्षांचें आहे असें व्हिन्सेंट स्मिथ[1] यांचें मत आहे.

यज्ञसन व माधवसेन यांचे मागील अगर पुढील वंशजांचा अगर त्या घराण्याचा आणखी इतिहास उपलब्ध नाहीं. वऱ्हाडच्या प्राचीन "भोज" या घराण्याचें नांवच त्यावेळींहि दिलेलें आढळतें. परंतु त्यावरून विदर्भाच्या प्राचीन भोजवंशांतले हे राजे असतील असें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. कारण प्राचीन भोज राजांस दरम्यान इतका कालावधि होऊन गेला होता कीं, इतके दिवस तें एकच घराणें कायम राहिलें असेल हें संभवत नाहीं. या घराण्यानंतर लौकरच विदर्भांत वाकाटक नांवाचें राजघराणें झालें. त्याचा उपलब्ध इतिहास पुढें दिलाच आहे. त्यांचें वंशावळींत वरील नांवें नाहींत परंतु वाकाटकांचे नांवापुढें "सेन" हें उपपद आहे म्हणून यज्ञसेन व माधवसेन हे कदाचित् त्याच वाकाटक घराण्यांतलि पूर्वींचे वंशज असतील. शिवाय या घराण्याचा काल स्मिथसाहेबांच्या अंदाजाच्या पुढें एक दोन शतकें ढकलल्यास कालानुक्रमहि वरील तर्कास जुळण्यासारखा येतो. परंतु अखेर हाहि एक तर्कच आहे या पलीकडे खात्रीलायक असें कांहीं मानतां येणार नाहीं.

इ० स० च्या तिसऱ्या शतकापासून तों सहाव्या शतकापर्यंत वाकाटक नांवाच्या घराण्याचें राज्य वऱ्हाडांत होतें. पांचव्या

१ हिं. प्राचीन इतिहास. पा. २०२.

**वाकाटक राजे*** शतकांत या घराण्याची सत्ता पूर्ण उत्कर्षास पावली होती. मेजर कनिंगहाम यानें या घराण्याचा काल इ० स० २९४ पासून ५२५ पर्यंत ठरविला आहे. दक्षिण कोसलाच्या गुप्त राजांचेहि हे समकालीन होते.

या घराण्याचा शोध मूळ अजिंठ्याच्या लेण्यांतील लेणें नं. १६ मधील लेखावरून लागला. त्यांत या घराण्यांतील कांहीं राजांचीं नांवें दिलीं आहेत. इतर आधारभूत शिलालेख व ताम्रपट पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

गुप्तकालीन शिलालेख शिवणी नं. ५६
" चम्मक नं. ५६
एलिग्राफिका इंडिका व्हॉ. ३ पा. २५८ दुधिया.
" व्हॉ ९ पा. २६८ बालाघाट.
इंडियन ॲन्टिकेरी. व्हॉ ४१ सन १९१२ पा.२१५ताम्र.
आजिंठ्याचे दोन शिलालेख. (Arch Survey of Western India Vol IV
घटोत्कच लेणें (Arch Survey W. I. Vol IX)
नाचणा येथील शिलालेख. (Arch Survey of India Vol XXI P.97-98

वऱ्हाडासंबंधीं जास्त महत्वाचे लेख म्हणजे चम्मक व शिवणीचे ताम्रपट हे होत.

एलिचपुराच्या दक्षिणेस सात मैलांवर चम्मक म्हणून एक गांव आहे. तेथें इ. स. १८६८ मध्यें एका शेताची जमीन नांगरीत असतां एका शेतकऱ्यास एक ताम्रपट सांपडला. तो तांब्याच्या

---

* Journal R. A. S. April 1914 Dr. Dubrenil, Aneiuh History of the Decccan Part IV
Arch. Survey of India Vol VII P.87

जाड तुकड्यांवर कोरलेला असून प्रत्येक तुकडा ७॥ इंच लांब व ३॥ इंच रुंद असा होता. असे सात तुकडे एका जाड कडींत अडकवून कडी पक्की ठोकली होती. हा ताम्रपट त्या वेळच्या एलिचपूर जिल्ह्याचे डेप्युटी कमिशनर मे० स्पान्स्की यांनीं मिळवून मुंबईचे डॉ० विल्सन यांजकडेस पाठविला. डॉ. भाऊदाजी यांनीं त्याचें अक्षर लावून तो छापला.

चम्मक येथील ताम्रपटांतील मुख्य मजकूर खालीलप्रमाणें आहे.

" ॐ स्वस्ति प्रवरपुरात्........वाकाटकानां परममाहेश्वर महाराज श्रीप्रवरसेनस्य वचनात्........भोजकटराज्ये मधुनदीतटे चर्मांकनाम ग्रामः राजमाणिक भूमिसहस्रैरष्टाभिः (८०००) शत्रुघ्नराजपुत्र कोंडराज विज्ञप्त्या नानागोत्रचरणेभ्यो ब्राह्मणेभ्यः सहस्राय दत्तः"

" प्रवरपुराहून (हुकूम देण्यांत येतो कीं) वाकाटक कुळांतील महाराज प्रवरसेन यांचे हुकुमावरून शत्रुघ्नराज याचे पुत्र कोंडराज यांचे विनंतीवरून भोजकट प्रांतांतील मधु नदीच्या कांठचें चर्मांक नांवाचें गांव त्या खालील सरकारी मापानें ८००० मापें जमिनीसह निरनिराळ्या गोत्रांच्या पुढील एक हजार ब्राह्मणांस दान दिलें आहे"

प्रवरपूर हें राजधानीचें नांव दिसतें. व प्रवरसेन राजाच्या नांवावरून पडलेलें दिसतें. मधुनदी ही पूर्णेस मिळणारी चम्मकच्या जवळची चंद्रभागा नदी असावी. भोजकट राज्य म्हणजे पूर्वींच्या विदर्भाचें राज्य व उमरावती जिल्ह्याचा भाग. शत्रुघ्न राजपुत्र कोंडराज हा याच वंशांतील राजपुत्र असावा. हल्लींच्या एकराप्रमाणें त्यावेळीं जमीन मोजण्याचें सरकारी माप होतें.

यापुढें चांगल्या वर्तनानें राहिलें पाहिजे, गुन्हे न केले पाहिजेत अशा शर्ती घातल्या आहेत.त्याचप्रमाणें राजदूतापासून कराचा, बिगारीचा, सरबराईचा वगैरे त्रास या गांवास मुळींच होऊं नये असा बंदोबस्त केला आहे. ब्राह्मणांचीं नांवें गोत्रासहित खालीं दिल्याप्रमाणें लिहिलीं आहेत.

गणार्य शात्यायन, देवार्य वत्स, कुमारशर्मार्य, रुद्रार्य, सोमार्य वगैरे.

या व शिवणीच्या ताम्रपटांत अखेर राजमुद्रा म्हणजे मोहोर केली आहे ती अशी:—

**वाकाटकललामस्य क्रमप्राप्तनृपश्रियः**
**राज्ञः प्रवरसेनस्य शासनम् रिपुशासनम्**

कुंतल, अवंति, कलिंग, कोसल, त्रिकूट, लाट, आंध्र हे देश यांनीं जिंकले असा मजकूर आहे. हा ताम्रपट इ० स० च्या ४३० वर्षाचे सुमारास लिहिलेला आहे.

गुप्तकालीन शिलालेख ( पा. २४१ ) या ग्रंथाच्या आधारें फ्रेंच पंडित डॉ० डुब्रेल यांनीं चर्माङ्क हें गांव महानदीच्या उगमाजवळ असावें असें लिहिलें आहे. परंतु तें चुकीचें आहे. कारण भोजकट प्रांतांत हें गांव असल्याबद्दल ताम्रपटांतच लिहिलें आहे व भोजकट प्रांत म्हणजे उमरावतीच्या जवळचा प्रदेश.

या घराण्याचा दुसरा एक ताम्रपट* उपलब्ध आहे. तो वऱ्हाडच्या उत्तरेस शिवणी जिल्ह्यांतील शिवणीचा ताम्रपट एका मालगुजाराजवळ सांपडला. हाहि चम्मक येथील ताम्रपटाचे सालाचाच आहे. त्यांतील मुख्य भाग खालीं दिल्याप्रमाणें:—

*Gupta Inscriptions ( cor. Ind. Ind. Vol III ) P. 243

महाराज श्रीप्रवरसेनस्य वचनात्....वेण्णाकार्परभागे प्रवर्धमानराज्यसंवत्सरे अष्टादशमे । फाल्गुन शुद्ध द्वादश्यां मौद्गल्यसगोत्राय । तैत्तिरीयाध्वर्यवे देवशर्माचार्यायोदकपूर्वं सकोरटः स पंचाषट्कः ब्रह्मपूरकन्नाम ग्रामोऽतिसृष्टः । वटपूरकस्योत्तरेण, किणिहिखेटकस्यापरेण, पवरज्जवाटकस्य दक्षिणतः । कोल्हापूरकस्य पूर्वेण । स्वसीमापरिच्छेदेन करंज वीरकतटे । इ०

यांत इनाम दिलेल्या ब्रह्मपूर या गांवाच्या चतुःसीमेचीं गांवेंहि दिलीं आहेत. वटपुर हल्लीं वडगांव,किणिहिखेटक हें किन्ही किनखेड, किनगांव, कोल्हापूर हें कोलापुर. खोलापुर असें कोठें तरी असावें. या नांवांचीं गांवें वऱ्हाडांत आहेत. करंज हें प्रसिद्ध कारंज्याशीं जुळतें. परंतु हें सर्व लागू पडणारें ब्रह्मपूर कोणतें हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. बारशी टाकळी व कारंजा या बाजूस अगर दहीहांड्याच्या जवळ या नांवांचीं गांवें आहेत. त्यांपैकीं हें एक असावें. करंजवीरतटे यावरून पहिलें असण्याचा संभव जास्त. खोलापुर हें गांव उमरावती तालुक्यांत आहे. तेथें रेशमी कापड होतें.

यांचा अंमल साधारणपणें प्राचीन विदर्भाच्या इतकाच मोठा होता. उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत हें राज्य असून पलीकडेस उज्जयनीच्या पहिल्या कुमारगुप्ताचें राज्य होतें. पूर्वेस रायपुराजवळ शरभपूर येथील महासुदेव नांवाच्या राजाचें राज्य होतें. त्याचे पलीकडेस कलिंग देशाचें राज्य होतें. शरभपुराचें राज्य वाकाटकांचें मांडलिक असावें असा तर्क आहे. आग्नेयेस व दक्षिणेस वेंगीचें राज्य होतें व दक्षिण मर्यादा कृष्णा व भीमा या नद्यांशीं समांतर होती. भीमेच्या पलीकडे कर्नाटकांतील कदंब राजांचें राज्य

---

१ डुब्रैल पान ७८

होतें. पश्चिमेस समुद्रकिनाऱ्याच्या अपरान्त (कोंकण) देशांत त्रैकूट नांवाचे राजे[1] होते. शिवणी व एलिचपूर हीं गांवें याच राज्यांत होतीं. एकंदरींत प्राचीन विदर्भ उर्फ महाराष्ट्राचे राज्याचे हे राजे होते व हल्लींचा बहुतेक महाराष्ट्र यांचे ताब्यांत येत होता. त्यामुळें बहुतेक पंडितांनीं यांस विदर्भाचे राजे असेंच म्हटलेलें आहे.

एके काळीं बुंदेलखंडापर्यंतही या राजांचा अंमल गेला असावा. बुंदेलखंडांतील नाचना येथील शिलालेखांत "वाकाटकानां महाराज श्रीपृथ्वीसेन पादानुद्योतो व्याघ्रदेवः" असा उल्लेख आहे. हा व्याघ्रदेव मोठा पराक्रमी असून वाकाटकांचा मांडलिक[2] होता.

या वाकाटक घराण्याची राजधानी चंद्रपुराजवळील भांदक उर्फ भद्रावती ही असावी असें एक अनुमान आहे. या घराण्यांतील राजांनीं दिलेले कांहीं ताम्रपट[3] चंद्रपूरच्या जवळपास सांपडले आहत. व त्यांत चंद्रपुरांचें नांव आहे. तें कदाचित् उमरावती जिल्ह्यांतील चांदूर असावें असाहि कित्येकांचा तर्क आहे. भांदक येथें जुनीं देवळें व लेणीं आहेत. मार्कंड ऋषीच्या देवळावर फार जुने लेख आहेत व ते वरील काळाचे असावेत असें त्यांच्या लिपी वरून दिसतें. यांच्या राजधानीचें नांव प्रवरपुर असें होतें व तें या वंशांतील प्रवरसेन नांवाच्या राजाच्या नांवावरून पडलेलें होतें. प्रवरपुराचें हल्लींचें नांव काय व तें कोठें होतें हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं.

---

१ डुब्रैल पान ७४

२ Arch Survey of India Vol. 21 P. 91. 98,

३ Chanda District Gazetteer & Balaghat plate.

वरील साधनांचे आधारें या घराण्याचा वंशवृक्ष पुढील प्रमाणें आहे:—

विंध्यशक्ति, पहिला प्रवरसेन, गौतमीपुत्र, पहिला रुद्रसेन, पहिला पृथ्वीसेन, दुसरा रुद्रसेन, दुसरा प्रवरसेन.

दुसऱ्या प्रवरसेनाचे दोन पुत्र. पहिल्याचें नांव अद्याप सांपडलें नाहीं. त्यास पुत्र देवषेण, त्यास पुत्र हरीषेण, दुसऱ्या प्रवरसेनाचा दुसरा पुत्र नरेंद्रसेन त्याचा पुत्र दुसरा पृथ्वीषेण.

प्रत्येक राजाचे नांवापुढें 'सेन' हें उपपद आहे. आजिंठ्याचे लेण्यांत मूळपुरुष महाराज वगैरे शब्दांनीं संबाधिले नसून फक्त वाकाटकाच्या वंशाचा ध्वज असें म्हटलें आहे. त्याचा पुत्र प्रवरसेन यास महाराज लिहिलें आहे. त्यावरून अभिषिक्त राजा प्रवरसेन ह्राच पहिला असावा. यानें अश्वमेध यज्ञ केला.

गौतमीपुत्र हाहि "महाराज" झाला नाहीं. तो बापापूर्वीं मेला असावा. उत्तरेंतील भाराशिवाचा राजा भवनाग याचे कन्येशीं गौतमीपुत्राचें लग्न झालें होतें. भाराशिव हें गंगेच्या कांठीं कोठें तरी होतें. कारण "भागीरथीच्या पवित्र उदकानें त्यांचीं मस्तकें भिजत होतीं" असा उल्लेख आहे.

पहिल्या रुद्रसेनासंबंधानें कांहीं विशेष माहिती अद्याप उपलब्ध झाली नाहीं. पहिल्या पृथ्वीसेन राजानें कुंतल म्हणजे कदंब (हल्लीं कर्नाटक) येथील राजावर स्वारी करून त्याचा पराभव केला होता.

विदर्भांतील वाकाटक घराण्याच्या दुसऱ्या रुद्रसेनानें उत्तर हिंदुस्थानांतील दुसरा चंद्रगुप्त याच्या श्रीप्रभावतीनामक कन्येशीं लग्न केलें. (इ.स.३९५) त्यांचा मुलगा दिवाकरसेन याच्या अज्ञाना-

नावस्थेंत या राणीनें दिलेला एक ताम्रपट उपलब्ध आहे+

नरेंद्रसेनाचें लग्न कदंबाचे राजाचे कन्येशीं झालें होतें. कोसल, माळवा, कुंतल, त्रिकूट, लाट या देशांतहि एके काळीं या राजांचा अंमल चालत होता. तेथील राजांस जिंकून मांडलिक केलें होतें. वाकाटक घराण्यानंतर कलचूरि, राष्ट्रकूट व चालुक्य नांवांचीं राज्यें उदयास आलीं. राष्ट्रकूट व चालुक्याच्या राज्यांत या वाकाटक राज्याचा अंतर्भाव झाला.*

तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत दक्षिणेंत सर्वांत प्रसिद्ध घराणें वाकाटकांचें होतें. त्यानें सर्व दक्षिणेच्या सुधारणांत अग्रभाग घेतला होता. उत्तर हिंदुस्थानाच्या सुधारणा व संस्कृत

---

+ वाकाटकललामस्य क्रमप्राप्तनृपश्रियः

जनन्या युवराजस्य शासनं रिपुशासनम् ॥

Indian Autiquary 1912 P. 214,

* Indian Antiquary 1911. P. 44

१Of all the dynasties of the Deccan, that have reigned from the 3rd to the 6th century the most glorious, the most important, the one that must be given the place of honour, the one that has excelled all others, the one that has had the greatest that influence on the civilization of the whole of the Deccan, is unquestionably the illustrious dynasty of Vakatakas.

Dr. Dubrueil A. H. D. P. 71 (Trans. Dikshit).

The Vakatakas reigned over an empire that occupied a very central position, and it is through this dynasty that the high civilization of the Gupta empire and the Sanskrit culture in particular, spread through-out the Deccan. Between 400 and 500 A.D. the Vakatakas occupied a predominent position and we may say that " In the history of the Deccan the 5th century is the century of the Vakatakas."

Dubreuil P. 75

वाङ्मय दक्षिणेंत आणून त्याचा प्रसार करण्याचा मान या घराण्यास आहे. सर्व हिंदुस्थानांत मध्यवर्ती ठिकाणीं हें राज्य असल्यामुळें सर्व हिंदुस्थानचा यांच्याशीं संबंध येत असे. या घराण्यानें त्या वेळच्या इतर सर्व राजघराण्यांस मागें टाकिलें होतें. यांचा संबंध उत्तर हिंदुस्थानच्या राजघरांण्याशीं झाला असल्यामुळें उत्तर हिंदुस्थान व दक्षिण यांचेमधील ही सांखळी होती.[1]

**ईलराजाची कथा**

या मध्ययुगाचे अखेरीस म्हणजे मुसलमान प्रथम दक्षिणेंत आले त्यापूर्वीं एलिचपूर येथें ईलें[2] नांवाचा जैनधर्मी राजा राज्य करीत होता. सातपुड्याच्या पायथ्याशीं त्यानें एक शहर वसवून ती आपली राजधानी केली व त्या शहरास आपल्या नांवावरून ईलपूर असें नांव दिलें. त्याचें ईलिचपूर, एलिचपूर, आळसपूर असे अपभ्रंश झाले आहेत. व ईलिचपूर शहर इ. स. १०९८ मध्यें वसविलें अशी साधारण समजूत आहे.

एलिचपुराहून चार कोसांवर सातपुड्याच्या वऱ्हाडाकडील बाजूस मुक्तागिरी नांवाचीं विस्तीर्ण जैन लेणीं व देवळें व एक लहानसा धबधबा आहे. तींहि ईलराजाच्या वेळचीं आहेत असें मानण्यांत येतें.

ईलराजाच्या नांवावरून ईलिचपूर अथवा एलिचपूर हें नांव पडलें हा तर्क " तवारीख-इ-अमजदी " काराचा आहे. वेरूळचें जुनें नांव ईलापूर, एलापूर असें होतें. वेरूळच्या लेण्यांत कांहीं जैनधर्मींहि आहेत परंतु बहुतेक बुद्धधर्मी आहेत.

---

* इल हें नांव पुराणकाळांतलें आहे. १ इलावर्ताचा राजा इल नांवाचा २ वैवस्वत मनूचा पुत्र.

Indian Antiquary Vol 42 P. 220




मुक्तागिरि येथील धबधबा. [ पृ. ७०

वरील तर्क प्रथमदर्शनीं बरोबर दिसतो; परंतु ईलराजाच्या काळापूर्वीचें नांव अचलपुर असें सांपडतें. बैतुलाकडील एका ताम्रपटांतहि अचलपूर असेंच नांव आहे. तसेंच मुक्तागिरीच्या जैन लेण्यांबद्दल " निर्वाणभाक्ति " नांवाच्या एका जैन ग्रंथांत अचलपूर असेंच+ नांव दिलें आहे, सदरहू नांवाचा व्युत्क्रम होऊन हल्लींचें नांव बनलें आहे.

ईलराजाची व गिझनीकडील "शहा दूला रहिमान गाजी " याची लढाई झाल्याबद्दल उल्लेख कांहीं फारसी ग्रंथांत आहे. यांतील बराचसा भाग दंतकथात्मक आहे; परंतु त्याचे स्थलविषयक पुरावे एलिचपुरास हल्लीं कायम आहेत म्हणून ती कथा येथें देणें जरूर आहे. कित्येकांनीं ईलराजाचें व दूला रहिमान या दोघांचें अस्तित्वहि काल्पनिकच आहे असें म्हटलें आहे. कारण या कथेस प्रत्यंतरीं पुरावा दुसरे कोणाचे लेखांत मिळत नाहीं.

शहादूला रहिमान गाजी हा गिझनीचा राजपुत्र होता. ईलराजानें एका मुसलमान फकीरास वाईट रीतीनें वागविल्यामुळें त्यानें या राजपुत्राजवळ तक्रार केली. त्यामुळें त्यानें ईलराजावर स्वारी करून त्याच्याशीं धर्मयुद्ध केलें. आपलें स्वतःचें लग्न* टाकून तो धर्मांकरितां लढाई करण्यास इतक्या दूरवर आला. त्याची व ईलराजाची लढाई झाली त्यांत राजा ईल व शहा रहिमान दोघेहि लढाईत पडले. मुसलमानांचे अकरा हजार लोक पडले. त्या सर्वांस एका ठिकाणीं पुरलें व त्यावर मोठी इमारत बांधली ती " गंजी

\+ अचलपुर वरणियदे । ईसान्नें मेधिगिरी सिहरे ॥
अहुठ्य कोडियो निव्वाण । गया नमो तेसिं ॥
Indian Antiquary Vol 42 P, २२० पहा.

' अचलपुराचे ईशान्येस मेधिगिरि ( मुक्तागिरि ) पर्वताच्या शिखरावर साडेतीन कोटि लोक निर्वाण पावले त्यास नमस्कार असो.

* त्यावरूनच दूला ( नवरदेव ) हें उपपद त्याच्या नांवास आहे.

शहीदा " ( धारातीर्थीं पडलेल्यांची कबर ) म्हणून प्रसिद्ध आहे. तसेंच दूला रहिमान याचीहि मोठी कबर एलिचपुरास अद्याप आहे. ह्या कबरीच्या खर्चाकरितां " कांडली " नांवाचें गांव अद्याप जहागीर आहे. ही जहागीर एलिचपूरच्या नबाबानें दिली आहे. दूला रहिमानाची मोठी कबर अल्लाउद्दीन खिलजीनें बांधविली होती. हल्लींची इमारत त्यानंतरची आहे. ईलराजासहि जवळच पुरलें.

**राष्ट्रकूट**

या राजांचाहि अमल वऱ्हाडावर होता. या वंशांतील राजांनीं एक गांव दान दिल्याबद्दल भांदक येथें एक ताम्रपट सांपडला[1] आहे. दुसऱ्या कृष्ण राजानें नांदिपुर ( नांदुरा ) येथें स्वारीवर असतांना जवळील उदुम्बरमन्ति येथें असलेल्या आदित्यायतनास णगणपुरी हा गांव जहागीर दिल्याचा उल्लेख आहे. सदरहू दान दिलेलें गांव यवतमाळ तालुक्यांतील गणोरी हें असावें असें एका विदर्भस्थ शोधक विद्वानानें ठरविलें आहे व त्याचा तर्क तज्ज्ञांस पसंत पडला आहे. याच वंशाचे आणखी ताम्रपट देवळी, तिवरखेड, मुलताई, पिंपरी येथें सांपडले असून त्यावरून या राजांचा अमल

---

१ Epigraphic Indica Vol 14 P. 121.

२ रा. यशवंत खुशाल देशपांडे एम. ए. एलएल. बी. यवतमाळ. पूर्वीचीं गांवांचीं नांवें व हल्लींचीं नांवें कशीं आहेत तें:—

| ताम्रपटांतील नांव | हल्लींचें नांव. |
|---|---|
| उदुंबरमंत्ति | उमरावती ( राणी ) |
| णगणपुरी | गणोरी. |
| अंतरैग्राम | अंतरगांव. |
| नागाम | नायगांव |
| उम्बरग्राम | उंबरी. |
| नांदीपुर | नांदुरा. |

३ R. B Hiralal's "Inscriptions in C P. & Berar.

४ चांदोरकर यांनीं प्रभात मासिकांत छापलेला. वर्ष १ अं. ९

सर्व वऱ्हाडभर व त्याच्या उत्तरेसहि होता असें दिसतें. या घराण्याचा वंशवृक्ष इतरत्र प्रसिद्ध आहे.

**चालुक्य**

दुसऱ्या चालुक्य घराण्याचें राज्य वऱ्हाडावर होतें. त्यांच्या वेळचीं बरींच देवळें वऱ्हाडांत आहेत. तीं त्या काळच्या धर्तीवरून ओळखूं येतात. या देवळांचा सर्वोत्कृष्ट नमुना लोणार येथील दैत्यसूदन नामक विष्णूचें देऊळ हा होय. चिखली तालुक्यांत सातगांव, धोत्र या गांवीं अगदीं हुबेहुब याच नमुन्याचीं देवळें आहेत. यांशिवाय चालुक्याच्या राज्याचा अवशेष वऱ्हाडांत कांहीं राहिला नाहीं.

**देवगिरीचे यादव.**

या यादव वंशाच्या अनेक शाखा दक्षिण देशांत होत्या. त्यांपैकीं एका शाखेंतील भिल्लम नांवाच्या पुरुषानें इतर शाखांस व चालुक्यांच्या अवशेष वैभवास पादाक्रांत करून देवगिरीस राज्य स्थापिलें.( इ. स. १०८७ ) त्यांचे राज्यांत सर्व वऱ्हाड येत असे. देवगिरी हें राजधानीचें शहरच मुळीं वऱ्हाडांत होतें. भिल्लमानंतर त्याचा पुत्र जैत्रपाल हा गादीवर आला ( ११९१–१२०९ ). देवगिरीच्या राजाचा लौकिक विद्येच्या उत्तेजनाबद्दल विशेष होता; त्याचा पाया यानें घातला. हा मोठा पराक्रमी तर होताच परंतु विद्या व ईश्वरप्राप्ति इकडेहि याचें बरेंच लक्ष होतें. त्यावेळचे सर्व विद्वान् व साधु त्यानें आपल्या राजधानींत जमविले होते. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य याचा पुत्र लक्ष्मीधर हा याच्या पंडितांत मुख्य होता. आदिकवि मुकुंदराज यांच्याविषयीं

जी आख्यायिका* आहे ती याच राजासंबंधीं. मुकुंदराजांनीं याचे आश्रयानें राहून ग्रंथरचना केली, हें विवेकसिंधु या वेदांतपर ग्रंथांत मुकुंदराजांनीं लिहिलें आहे. +

**सिंघण.** जैत्रपालानंतर त्याचा पुत्र सिंघण ( १२०९–१२४७ ) यानें राज्य केलें. पराक्रम व पंडितसंग्रह यांत त्यानें आपल्या बापासहि मागें टाकलें. लक्ष्मीधराचा पुत्र चंगदेव यानें भास्कराचार्यांचे गणित व ज्योतिष ग्रंथ शिकविण्याकरितां खानदेशांत एक मठ व पाठशाळा स्थापली होती, मठास सिंघणाचा मांडलिक सोइदेव यानें एक गांव इनाम दिल्याबद्दल शिलालेख पाटण ( खानदेश ) येथें सांपडला* आहे. याचा सेनापति खोलेश्वर नांवाचा ब्राह्मण होता.

---

* जैत्रपाल राजास ईश्वरप्राप्तीचा नाद लागून त्यानें प्रत्येक पंडितास व साधूस आणून मला आत्मज्ञान करीव व तेंहि निमिषार्धांत, असें म्हणावें व तसें करतां न आल्यामुळें त्यानें पुष्कळ पंडित व साधु बंदींत टाकले. एकदां मुकुंदराजमहाराज तेथे आले. त्यांसहि राजानें तोच प्रश्न केला. राजा त्यावेळीं शिकारीस जाण्यास निघाला होता त्यानें एक पाय घोड्याच्या रिकीबींत घातला होता व दुसरा पाय दुसऱ्या रिकीबींत घालण्यापूर्वी आत्मज्ञान झालें पाहिजे असा त्याचा आग्रह होता. मुकुंदराजमहाराजांनीं त्याच्या हातांतील चाबुक घेऊन त्यास मारण्यास सुरवात केली व दुसरा पाय रिकिबींत घालण्यापूर्वीच घोड्यावर बसतांच राजाची समाधि लागली व त्यास आत्मज्ञान प्राप्त झालें.

+ नृसिंहाचा बल्लाळू । त्याचा पुत्र जैत्रपाळू ॥
तणें करविला खेळू । ग्रंथरचनेचा ॥

या मुकुंदराजाची समाधि सातपुड्याच्या उत्तरेस खेरला येथें आहे असा एक तर्क आहे. परंतु तो बरोबर दिसत नाहीं. तो मुकुंदराज दुसरा असावा. जानफळ येथेंहि एका मुकुंदराजाची फार जुनी समाधि आहे. तो कोणता हेंहि समजत नाहीं. जोगाईचें अंबें येथील कोणी मांडलिक होता त्यासंबंधीं वरील वर्णन आहे असें म्हणणारा एक मोठा पक्ष आहे.

* Epigraphic Indica Vol I. P. 340. प्रभात व. १ अं. ५

कृष्णदेव व महादेव

सिंघणानंतर त्याचा भाऊ कृष्णदेव यानें इ. स. १२४७ पासून १२६० पर्यंत राज्य केलें. जल्हण वगैरे ग्रंथकार याच्या संग्रहास होते. याची सत्ता पश्चिम समुद्रापर्यंत होती. त्याचेनंतर त्याचा भाऊ महादेव हा गादीवर बसला. महादेवाचे वेळेस यादव घराण्याचा दरारा चांगला बसला होता; इतका कीं, यांचे धाकानें भोंवतालच्या कांहीं राज्यांत बचावाखातर एकदां एका स्त्रीच्या व एकदां एका अल्पवयी मुलाच्या नांवानें राज्य चालविलें होतें. कारण यादव राजे धर्मानें वागणारे असून स्त्रिया व अर्भकें यांजवर कधींच हात घालीत नसत अशी प्रसिद्धी होती.

रामदेव.

रामदेव हा महादेवाचा पुतण्या व कृष्णदेवाचा पुत्र. याचे वेळेस यादवांच्या सत्तेचा कळस झाला होता. बौद्धिक उत्कर्षाची परमावधि याचे वेळेस झाली महादेवाच्या वेळेपासून हेमाद्रिनाथ अथवा हेमाडपंत नांवाचा अलौकिक बुद्धिमान पुरुष यांना लाभला. तो श्रीकरणाधिप म्हणजे मुख्य प्रधान असून राजनीतिनिपुण व मोठा पंडित होता. काव्य, अलंकार, व्याकरण, धर्मशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे अनेक विषयांत हा पारंगत असून त्यांवर त्यानें ग्रंथरचना केली. मोडी लिपीसारखी अति उपयुक्त लिपि त्यानें शोधून प्रचारांत आणली. राजकीय जमाखर्च व राजकारणांतलि इतर व्यावहारिक गोष्टी अगदीं आधुनिक धर्तीवर त्यानें अमलांत आणल्या. हजारों देवळें बांधविलीं. तीं हेमाडपंती देवळें या नांवानें प्रसिद्धच आहेत. विशेष गोष्ट ही कीं, त्यानें विद्येस फारच उत्तेजन दिलें. त्याचे वेळीं देवगिरीस जितके पंडित जमले होते तितके केव्हांच जमले नसतील. हेमाद्रिनाथाविषयीं या पंडितांच्या मनांत किती आदर

होता हें त्यांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून समजतें. चतुर्वर्गचिंतामणि नांवाचा प्रचंड ग्रंथ यानें स्वतः लिहिला व इतर पंडितांकडूनहि अनेक उपयुक्त ग्रंथ लिहविले. ज्ञानेश्वरासारखे संत सुद्धां देवगिरीच्या आकर्षण कक्षेंत आले होते व त्यांनीं देवगिरीचा व रामदेवरावाचा मोठ्या अभिमानानें उल्लेख* केला आहे.

---

* ऐसे युगी परि कळीं । आणि महाराष्ट्र [1]मंडळीं ॥
श्री गोदावरीच्या [2]कुळीं । [3]दक्षिणलीं ॥
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ॥
जेथ जगाचें जीवनसूत्र । [4]**श्रीमहालया** असे ॥
तेथें यदुवंश विलास । जो सकळ कळानिवास ॥
न्यायातें पोषी क्षितीश । **श्रीरामचंद्र**[5] ॥
तेथ महेशान्वय संभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ॥
केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥

१ महाराष्ट्र देशांत.

२ कांठीं.

३ उजवीकडेस, उत्तरेस.

या शब्दाचे अर्थासंबंधानें मोठा वाद आहे. दक्षिणेकडे असा साधारण लोक अर्थ करतात तो बरोबर नाहीं. कारण देवगिरी गोदावरीच्या उत्तरेस आहे, दक्षिणेस नाहीं. कित्येकांनीं दक्षिणदेशीं असा अर्थ केला आहे परंतु वरच्याच ओळींत देशाची उक्ति झाली असल्यानें पुनरुच्चार संभवत नाहीं. दक्षिण हा शब्द नदीचें तीर व हस्त यासंबंधानें उपयोगांत आणण्याचा संस्कृत भाषेत फार प्रघात आहे. याच्या उलट वाम व क्वचित् उत्तर असेंहि म्हणतात (मागें पान६१ पहा) समुद्रास नदी मिळतें तें मुख समजतात व तसें कल्पून उजवी बाजू ( दक्षिण तीर ) गोदावरीच्या उत्तरेस येते.

४ दौलताबादेच्या किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलें जगदंबेचें स्थान याची मुसलमानांनीं थोडासा फेरफार करून मशीद बनविली आहे. परंतु मूळची हिंदू बांधणी स्पष्ट दिसते. त्याचप्रमाणें किल्ल्याचे वरील गणपतीच्या देवळाची स्थिति आहे.

५ रामदेवराव.



बारशी टाकळी येथील देवीचे देवळाचें आंतील काम.  पृ. ७७

यादवांच्या अखेरच्या कारकीर्दींत त्यांस कोणी शत्रु न राहिल्यामुळें फार शांतता राहिली. त्यामुळें शांततेचा स्वाभाविक परिणाम आलस्य व गाफलपणा हा सर्वत्र पसरला. हेमाडपंतासारखा सर्वगामी व जागरूक मनुष्य कोणी राहिला नाहीं. याचा परिणाम भयंकर झाला. मुसलमानांचें लष्कर सर्व राज्य ओलांडून देवगिरीच्या जवळ येईपर्यंत त्याचा पत्ताहि राजधानीस लागला नाहीं व त्यास कोणी अडथळाहि केला नाहीं. मुसलमानांच्या थोड्याशा काव्यानें व एका लहानशा धक्क्यानें अनेक शतकें चाललेली हिंदु साम्राज्याची इमारत वाळूच्या बांधासारखी ढांसळून पडली ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे. एका लहानशा गोष्टीनें पुढील इतिहासांत भयंकर फरक पडला. शांतता, विद्यानंद, सुख व समाधान यांत लोळणारी प्रजा अकल्पितपणें मारामारी, कापाकापी, धर्मच्छल, जाळपोळ या क्रूर व दुःखमय पाशांत सांपडली. शांततेच्या व वाङ्मयाच्या आनंदांत पोहणारी देवगिरी आज पडक्या इमारतींनीं आच्छादलेली दृष्टीस पडते व त्या जागीं हिंदूंच्या गतवैभवास हांसणारा अल्लाउद्दीन बहामनशहाचा प्रचंड जयस्तंभ दृष्टीस पडतो, तो इतिहास पुढें दिसेल !

**बारशी टाकळीचा शिलालेख**

आकोला जिल्ह्यांत बारशी टाकळी येथें भवानीच्या देवळावर एक संस्कृत शिलालेख आहे. त्यांत भिल्लम, हेमाद्रि, मालुगी वगैरे यादववंशीय राजांचीं नांवें असून "टेकली राजधानी" असा उल्लेख आहे. सदरहू शिलालेख शके १०९८ इ. स. ११७६ मधील आहे. यादववंशाच्या दुसऱ्या एखाद्या शाखेनें या टाकळीस राजधानी केली असावी व कांहीं काळपर्यंत येथें स्वतंत्र राज्य असावें असा एका

विद्वानाचा+ तर्क आहे. परंतु इतर पुराव्याच्या अभावीं या तर्का-बद्दल थोडसें साशंक रहावें लागतें.

**अमडापूरचा शिलालेख**

बुलढाणें जिल्ह्यांत अमडापूर येथें एका टेंकडीवर प्राचीन देवीचें देऊळ आहे. तेथील जुनी मूर्ति फार विशाल होती ती हल्लीं फुटून पडली आहे. त्या देवळांत एक संस्कृत लेख* असून तोहि बारशी टाकळीच्या लेखाप्रमाणेंच महत्त्वाचा आहे. तो शके ११३३ इ. स. १२११ मधील असून "श्रीमत्-प्रतापवर्ति सिंघणदेव" म्हणजे देवागिरीच्या प्रख्यात सिंघण याद-वाच्या वेळेचा आहे. पदुमनशेटी नांवाच्या सावकारानें हें देऊळ बांधलें असा उल्लेख आहे. हल्लींचें देऊळ पेशव्यांचा अमडापूर येथील कमावीसदार खंडो बल्लाळ यानें बांधलें असून देवीस "बल्लाळी देवी" असेंहि म्हणतात. लेखांत अमडापूरचें नांव "अन्वरापूर" असें दिलें आहे.

---

+ रायबहादुर हीरालाल Inscriptions in C.P. & Berar P.133-134

* Inscriptions in C. P. & Berar P. 139

# भाग चवथा.

## खिलजी व तघलघ

आतांपर्यंत झालेलें वर्णन कांहींसें पौराणिक व कांहींसें ऐतिहासिक झालें. एक तर वरील काळ फार जुना व दुसरें त्या वेळचा इतिहास विशेष विश्वसनीय असा कोठें लिहिलेला नाहीं. हिंदु राजांत मुसलमानी राजांप्रमाणें इतिहास लिहिण्याची विशेष रीत नव्हती व कांहीं साधनें मिळालीं असतीं तीं सुद्धां पुढील धामधुमीचें काळांत नाहींशीं झालीं. मुसलमानी राजे व शिपाई यांची जित राष्ट्रांस वागविण्याची कल्पना जुन्या हिंदूच्या अगर आधुनिक लोकांच्या पेक्षां फारच कनिष्ठ दर्जाची होती. त्यामुळें जिंकलेल्या लोकांचे ग्रंथ कायम ठेवणें व त्यांच्या सुधारणांस उत्तेजन देऊन त्यांपुढें आपण मजल मारणें ह्या गोष्टी त्यांचे कल्पनेच्या बांहर होत्या. उलट पक्षीं जुन्या संस्कृतीचा नाश करण्यांत त्यांना भूषण वाटे. ह्यामुळें वऱ्हाडांतील उत्तमउत्तम कारागिरीचीं देवळें वगैरे छिन्नभिन्न झालीं व पुढेंही सुराज्य नसल्यामुळें ग्रंथ व कागदपत्रांचा नाश झाला.

मुसलमानी राज्यांतील चांगल्या गोष्टींपैकीं इतिहास लिहिणें ही होय. त्यावेळच्या परिस्थितीच्या मानानें मुसलमानी तवारिखा एकतर्फी कां होईना पण बऱ्याच चांगल्या तऱ्हेनें लिहिल्या आहेत. ह्यामुळें मुसलमानी कारकीर्दीपासून हिंदुस्तानचा संगतवार इतिहास सांपडतो त्या मानानें वऱ्हाडचा राजकीय इतिहास याच वेळेपासून विशेष विश्वसनीय रीतीनें उपलब्ध आहे.

चालुक्य वंशाचे कारकीर्दींत व त्यानंतर यादवांचे वेळेस महाराष्ट्राचें राजकीय केंद्रस्थान वऱ्हाडाचे हल्लींचे दक्षिण सरहद्दीचे अगदीं जवळ होतें. पैठण, देवगिरी, दौलताबाद, वेरूळ हीं ठिकाणें त्या वेळचे राजकीय घडामोडींत प्रमुख असत. एकंद-

रींत वऱ्हाड व विशेषतः वऱ्हाडचा दक्षिणभाग ज्यास बालाघाट म्हणतात तो वरील राजधान्यांपासून जवळ असल्यामुळें सर्व सुधारणेंत बराच पुढें गेला होता, हें तेथील जुन्या इमारतीवरून व त्यांचे धर्तीवरून दिसून येतें. घांटावरील सर्व देवळें चालुक्यांच्या धर्तीचीं आहेत.

चालुक्य घराण्यानंतर देवगिरीचें यादव घराणें उदयास आलें. त्यांची राजधानी देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथें होती व त्यांचे राज्यांत वऱ्हाडासह सर्व महाराष्ट्र सामील होतें. हें पहिलें मराठी राज्य झालें. यादव वंशांतील **महादेवराजानें** इ. स. १२६० पासून १२७१ पर्यंत राज्य केलें. त्याचे वेळीं त्याचा प्रधान प्रसिद्ध **हेमाद्रिनाथ** अथवा **हेमाडपंत** हा होता. तो मोडी-लिपीचा जनक असून " हेमाडपंती " देवळांच्या बांधण्याचे धर्तीवरूनहि तो प्रसिद्ध आहे. हेमाडपंती देवळें सर्व वऱ्हाडभर पुष्कळ आहेत. दक्षिणेंतील सर्व मराठे जाधव व **जाधवराव** या घराण्याचे वंशज म्हणवितात.

महादेवानंतर त्याचा पुतण्या **रामदेव** गादीवर बसला. यादवांचे राज्यांत शांतता नांदत असून प्रजा सुखी होती. देवगिरी-इतकें द्रव्य* खुद्द दिल्लींतही नव्हतें अशी त्यावेळीं प्रसिद्धि होती.

* दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशीं विस्तीर्ण पटांगणावर पसरलेल्या दुहेरी कोटाच्या हद्दींत पसरलेल्या असंख्य पडक्या इमारती व सदरहू किल्ल्याच्या पायथ्याशीं व किल्ल्यावर असलेलीं देवीचीं व गणपतीचीं हिंदु देवळें-ज्यांच्या हल्लीं थोडा फेरफार करून मशिदी केल्या आहेत व त्या अभेद्य किल्ल्याच्या मूळ रचनेंत दिसणारा सार्वत्रिक हिंदुपणा पाहिला म्हणजे वरील वैभवाचा खरेपणा अजमावितां येतो. किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेल्या " अल्लाउद्दीन बहामनशहाचें " प्रचंड विजयस्तंभाचें महत्वही त्याव-रूनच सार्थ वाटत आहे देवगिरीच्या विजयाची किंमत मुसलमान जेत्यांस किती वाटत होती त्यावरूनही देवगिरीचे महत्व दिसून येईल.

ती जात जात दिल्लीस राज्य करीत असलेला फिरोजशहा खिलजी याचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी याच्या कानीं गेली. तो गंगाकांठीं एका प्रांताचा सुभेदार होता. त्यानें ८००० लष्कर जमवून खरें कारण लपवून प्रसंग पडेल तशा थापा देत देत तो नर्मदा उतरून आला सातपुडा ओलांडुन तो वऱ्हाडांत आला व एलिचपूर येथें त्यानें २ दिवस तळ दिला. त्याचे जवळचें लष्कर बरेंच कमी झालें होतें व त्याजवळ सामुग्रीही कमीच होती. त्यानें अशी गप्प उठवून दिली कीं,माझें व चुलत्याचें भांडण झाल्यामुळें दक्षिणेंत कोणा मोठ्या राज्याकडे मी नोकरीस जात आहें. यामुळें रस्त्यानें त्यास कोणी त्रास दिला नाहीं. अशा थापा देत देत तो सर्व वऱ्हाड ओलांडून दौलताबादेजवळ आला. रामदेव राजा बेसावध होता. अशा स्थितींत एकदम छापा घालून त्यानें रामदेवाचा पराजय केला व मनमुराद द्रव्य घेऊन परतला. जातांना त्यानें एलिचपूरचा व त्या खालील सुपीक प्रांत पाहिला होता. सबब त्यानें तो मागून घेतला व रामदेवास तो सोडणें भाग पडलें. ही स्वारी इ. स. १२९४ मध्यें झाली. अल्लाउद्दीनाच्या थापाथापींचें व नीच कृत्यांचें वर्णन फेरिस्ता[१] व इतर मुसलमान ग्रंथकारांनीं फार सविस्तर दिलें आहे. अल्लाउद्दीन जातांना वऱ्हाडांतूनच गेला व पुन्हां एलिचपुरास मुक्काम करून त्या प्रदेशाचा ताबा घेऊन व अधिकारी नेमून परत गेला. एलिचपुरास दूला रहिमानशहा याची कबर बांधण्याकरितां त्यानें पुष्कळ रक्कम दिली. हल्लींचें दूला रहिमानशहाचें कबरस्थान व भोंवतालच्या इमारती त्यानंतर पुष्कळ वर्षांनंतरच्या बांधलेल्या आहेत. अल्लाउद्दीनानें परत जाऊन चुलत्याचा खून करून तो गादीवर बसला. वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत.

---

१ Ferishta ( Briggs ) R. Cambre Vol I.

यानंतर एलिचपूर रामदेवाच्या ताब्यांतच राहिलें व त्याचा फक्त वसूल त्यानें दिल्लीस पाठवावा अशी व्यवस्था चालली. रामदेवानें आपले बाकीचे मुलखाप्रमाणेंच एलिचपुरास हिंदु अधिकारी नेमून आपलें काम चालविलें. इ. स. १३०२ चे सुमारास अल्लाउद्दीनानें मलीककाफूर हजारदिनारी[1] नांवाच्या एका सरदारास रामदेवावर स्वारी करण्यास पाठविलें. कारण रामदेवानें पैसा पाठविणें बंद केलें व गुजराथच्या एका हिंदु राजास अल्लाउद्दीनाविरुद्ध साह्य केलें. गुजराथच्या हिंदु राजास अल्लाउद्दीनानें त्याची देवलदेवी या नांवाची मुलगी मागितली होती. पण त्यानें ती देण्याचें नाकारलें. देवलदेवीची आई केवलदेवी हिला अल्लाउद्दीनानें गुजराथचे स्वारींत कैद करून तिचेशीं निका लावला होता. मुसलमानी राजांच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें हें लढाईस मोठेंच कारण झालें. काफूर यानें रामदेवाचा पराभव करून त्यास व त्याचे कुटुंबास कैद करून दिल्लीस पाठविलें. रामदेवानें अल्लाउद्दीनाची पुष्कळ विनवणी केल्यावर त्यास माफी देऊन परत देवगिरीस पाठविण्यांत आलें.

रामदेवराव इ. स. १३०९ मध्यें मरण पावला व त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर बसला. त्यानेंही खंडणी न पाठविल्यामुळें काफूर यानें इ. स. १३१२ मध्यें पुन्हां देवगिरीवर स्वारी करून शंकरदेवास ठार मारलें व सर्व मलूख जोडून परत गेला. दक्षिणेंत मुसलमान येण्यापूर्वीं फार दिवसपर्यंत शांतता राहिल्यामुळें सर्व हिंदु राजे बेसावध होते व त्यानंतरहि युद्धकौशल्याचे गुणांत ते मुसलमानांस फार लवकर हार गेले. त्यावरून त्यांची संघटना फार विस्कळित झाली होती हें स्पष्ट दिसतें.

---

१ एक हजार दीनारास विकत घेतलेला गुलाम

अल्लु उद्दीन खिलजी इ. स. १३१६ मध्यें मरण पावला. त्यानंतर दिल्लीस गादीसंबंधानें जो घोंटाळा झाला त्या गडबडींत देवगिरीस रामदेवरावाचा जांवई हरपालदेव यानें सर्व मुलुख परत आपले ताब्यांत घेतला व राज्य करूं लागला. परंतु लवकरच दिल्लीची गडबड शांत होऊन कुतबुद्दीन मुबारकशहा हा गादीवर बसला. त्यानें देवगिरीवर स्वारी करून हरपालदेवास ठार मारलें व सर्व प्रांत काबीज केला. याप्रमाणें महाराष्ट्राच्या मुख्य व आद्य राज्याचा भयंकर तऱ्हेनें व धडपड करीत अंत झाला. व बाकीच्या राज्यांबरोबर वऱ्हाड प्रथमच कायमचें मुसलमानीं अमलाखालीं गेलें तें इंग्रजी अमदानीपर्यंत बहुतेक सर्व काळ कायमच राहिलें.

सर्व महाराष्ट्राबरोबर वऱ्हाड खिलजी व तघलख बादशहांच्या सत्तेखालीं गेलें. महमद तघलख गादीवर असतांना दक्षिणेंतील मुसलमान सरदारांनीं नासिरुद्दीन नांवाच्या वृद्ध सरदारास आपला मुख्य करून बंड केलें व तघलघ बादशहांची सत्ता झुगारून दिली. वऱ्हाडांत दिल्लीकडून महमद तघलघ बादशहाचा जांवई यास इमाद-उल-मुल्क* हा किताब होता तो सुभेदार होता. दक्षिणेंतील सर्व मुसलमान सरदारांबरोबरच वऱ्हाडांतीलहि सरदार वरील कटांत सामील झाले. व हळू हळू बरेंच लष्कर इमाद्-उल्-मुल्क यास सोडून जाऊं लागलें तेव्हां त्यास भीति पडली कीं, एकादे दिवशीं हे फितुरी लोक आपणास पकडून कटवाल्यांच्या स्वाधीन करतील. म्हणून इमाद एलिचपुराहून शिकारीचे निमित्तानें निघून नंदुरबारकडे गेला व पुढें दिल्लीचें लष्कर आलें त्यास मिळाला. इकडे कटवाल्यांनीं सर्व खजीना ताब्यांत घेतला व दौलताबादेस

*वऱ्हाडचे सुभेदारास पुढें हाच किताब कायम राहिला. वऱ्हाडांतील इमादशाही स्वतंत्र राज्याचे मूळ पुरुषासहि हाच किताब होता.

जाऊन ते कटवाल्यांच्या लष्करास मिळाले. महमद तघलघ यानें या बंडखोर सरदारांवर स्वारी केली व त्यांचा पराभव केला. परंतु नासिरुद्दीन दौलताबादचे किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. त्यास महमदानें वेढा दिला परंतु तितक्यांत गुजराथेमध्यें बंड झाल्यामुळें त्यास तिकडे जावें लागलें; त्यामुळें बंडखोर सरदारांस चांगलेंच फावलें. नासिरुद्दीन फार वृद्ध असल्याकारणानें हसन ऊर्फ जाफरखान यास सर्वांनीं राज्यपद देऊन दक्षिणेंत गुलबुर्गा* येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. जाफरखान यानें "अल्लाउद्दीन बहामनशहा" हा किताब घेऊन त्या नांवानें शिक्का मोर्तब व नाणें सुरू केलें ह्या राजाच्या खऱ्या किताबासंबंधानें व त्याच्या उगमासंबंधानें बऱ्याच चुकीच्या गोष्टी रूढ झाल्या आहेत. परंतु त्यांचा खरा किताब वर लिहिल्याप्रमाणें होता हें त्यावेळच्या सांपडलेल्या नाण्यावरून सिद्ध झालें आहे. याप्रमाणें वऱ्हाडचीं व महाराष्ट्राचीं राज्यसूत्रें उत्तरेकडून निघून पुन्हां दक्षिणेंत आलीं. (इ०स० १३४७)

खिलजी व तघलघ घराण्याचे कारकीर्दींत प्रजेस विशेष सुख झालेसें दिसत नाहीं कारण शांतता मुळींच नव्हती. राजधानी बरीच दूर असून प्रांतावरील अधिकाऱ्यांच्या बरेवाईटपणावर प्रजेचें सुखदुःख अवलंबून असे. अधिकारी परके असून प्रजेच्या सुखदुःखासंबंधीं त्यांना कांहींच फिकीर नसे.

महाराष्ट्राचे त्यावेळीं चार भाग पाडलेले असून त्यांवर शिकेदार म्हणून अधिकारी असत. वऱ्हाड हा स्वतंत्र भाग असून तो फार महत्त्वाचा समजला जात असे. वऱ्हाडचा सुभेदार एलिचपुरास रहात असे. जमीनमहसुलाच्या आंकड्यांवरून पाहिलें तर

---

* गुलबुर्गा येथें जाफरखानाची पूर्वींची जहागीर होती, त्यामुळें त्यानें तेथेंच राजधानी केली.

सरकारी बोजा फारच जास्त होता; परंतु ह्या रकमा बहुधा कागदींच असत.

सर्व दक्षिणेंत त्यावेळीं दौलताबाद शहर प्रसिद्ध होतें व त्याचे आसपास मोठमोठीं शहरें असल्यामुळें त्या भागास फार महत्त्व असे. दिल्लीहून दौलताबादेचा रस्ता सातपुड्याचे बगलेंतून पश्चिम वऱ्हाडांतून जात असे,त्यावेळीं रस्ते फारच वाईट होते. यामुळें हल्लींप्रमाणें वाटेल तेथून डोंगर व घाट चढून जातां येत नसत. या कारणानेंच बुलढाण्याजवळचा “ रोहिणखेड व राजूरचा घाट व खिंड फारच महत्वाची होती व पुढील* बऱ्याच लढायांत हें ठिकाण प्रसिद्धीस आलें आहे.

वऱ्हाड ज्या ज्या राजांच्या अमलाखालीं गेलें त्या त्या राजांच्या घराण्यांतील पुरुषांचा अगर वऱ्हाड शिवायकरून बाकीच्या त्यांच्या प्रदेशांत काय काय भानगडी झाल्या त्या सांगण्याचा प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश नाहीं. त्यामुळें वरील राजांच्या कारकीर्दींतील अत्यंत महत्वाच्या उलाढालींचा सुद्धां उल्लेख यांत येणार नाहीं, जेथें जेथें वऱ्हाडचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध येईल त्याच भागाचा उल्लेख करण्याचा उद्देश आहे.

मुसलमानी अमलापूर्वीं दक्षिणेची स्थिति फारच संपन्न होती. त्यावेळीं सर्व दक्षिणेंत सोन्याचें नाणें चालू असे. रुप्याचें नाणें मुळींच प्रचारांत नसे.

---

* पुढें पान व पहा.
Briggs's Ferishta ( Vol. I Page 375 Note)

# भाग पांचवा.

## बहामनीघराणें ( १३४७ पासून १४८४ पर्यंत )

वऱ्हाड बहामनी घराण्याच्या ताब्यांत सन १३४७ पासून सन १४८४ पर्यंत राहिलें. सर्व हिंदुस्थानाप्रमाणेंच वऱ्हाडांत गांव व परगणे हे फार जुने राजकीय विभाग आहेत. गांव ही स्वयंपूर्ण संस्था फारच प्राचीन आहे. तिचा नक्की आरंभ सुद्धां कोणास सांगतां येणार नाहीं. परंतु त्याचप्रमाणें–थोडेसे कमी प्रमाणांत परगणे सुद्धां फार प्राचीन आहेत. परगणे हे हिंदु राजांचे वेळचे राजकीय विभाग आहेत. हें त्यांवरील देशमुख व देशपांडे या अधिकाऱ्यांच्या नांवांवरूनच स्पष्ट दिसतें. मुसलमान लोक येण्यापूर्वींच परगणे होते व तीं गांवें व परगणे अद्याप जसेच्या तसे चालू आहेत. वरील राजकीय विभाग बदलले. खुद्द वऱ्हाडाचा विस्तार प्रत्येक वेळीं कमी कमी होत गेला. सिकेदार, तालुकदार, तरफदार, सुभेदार यांचे अमलाखालील प्रदेश सुद्धां बदलत गेले. परंतु गांवें व परगणे जसेच्या तसेच कायम आहेत.

या चिरस्थायी विभागांचें मूळ कारण वतन हें आहे. वऱ्हाडांत सर्वस्व वतन हें आहे. वतनाकरितां धर्म सुद्धां सोडलेलीं उदाहरणें आहेत. देशमुखी व पाटीलकीसारखीं महत्त्वाचीं वतनें तर असोच, परंतु जोशीपणाचे वतनाकरितां धर्मांतर केलेलीं एकदोन उदाहरणें आहेत. त्यांचे मुसलमान वंशज वतनदार जोशी नात्यानें ब्राह्मण गुमास्त्याकडून जोशाचीं सर्व कामें अद्याप करतात, या वतनांमुळेंच ग्रामसंस्था अद्याप जवळ जवळ मूळ स्वरूपांत कायम राहिल्या आहेत. जरी सर्व वतनदारांना सरकारी शिक्का नाहीं तरी

पूर्वीचे बारा बलुतेदार अद्याप कायम असून त्या त्या वतनावर आपला उदरनिर्वाह करीत आहेत.

राजकीय अधिकाऱ्यांपैकीं ग्रामाधिकारी व पांडे (पटवारी, कुळकर्णी) हे आपल्या वतनाकरितां मजुरापेक्षांही कमी वेतनावर संतुष्ट राहून काम करीत आहेत. तरी वेळोवेळच्या सरकारचे ते खरोखरीच आधारस्तंभ आहेत. त्याचप्रमाणें किंबहुना त्यांपेक्षांहि जास्त महत्त्वाचे वतनदार म्हणजे परगण्याचे अधिकारी म्हणजे देशमुख व देशपांडे हे होत व परगण्याचे पलीकडे हजारों लहान मोठ्या वावटळी येऊन बादशहा, राजे, नबाब, अमीर, सुभेदार वगैरे मोठमोठे वृक्ष उलथून पडले तरी पाटील, पांडे व परगण्याचे देशमुख देशपांडे हे "लव्हाळें" जीव धरून व वाटेल तो राजा आला त्यास नम्र होऊन इनामें इतबारें काम करीत आहेत. त्यांच्या प्राचीनपणामुळें व निकट संबंधांमुळें त्यांचें समाजावर इतकें वजन असे कीं, खरें "सरकार" तेच असत. गरीब निरक्षर व अज्ञाणी लोकांस हल्लीं जसा तहसीलदार अगर फार तर डेप्युटी कमिशनर यांपलीकडे दुसरें सरकार नाहीं, त्याप्रमाणें पूर्वीं देश-मुख, देशपांडे, ह्यांपलीकडे सरकार नव्हतें. हल्लींप्रमाणें ते बदलणारे अधिकारी नसून कायमचे व वतनदार असल्यामुळें त्यांचें वजनही कायमचें असे. अखेरी अखेरीस अव्यवस्थेमुळें व गरीबीमुळें या वर्गा-ची नीतिमत्ता बरीच खालावली असून जरी त्यांचें वजन थोडें फार कायम आहे तरी समाजांत त्यांचेविषयीं आदर मात्र नाहीं.

यामुळें कोणीही नवीन राजा आला तरी त्यास या परगणा अधिकाऱ्यांचे आधाराशिवाय कायमचे पाय रुतवितां येत नसत. त्यामुळें जसें खालीं तसेंच वरहि त्यांचें वजन असे. यामुळेंच ब्रिटिश सरकारानेंही जरी त्यांचे अधिकार काढले तरी त्यांचें वेतन, पेन्शन

अगर रुसुम या नांवानें वंशपरंपरा चालू ठेविलें आहे. सर्व तऱ्हेचे अधिकार त्यांस असत. त्यांनींच सर्व उत्पन्न वसूल करून रकम पुढें पाठवावी.

यावरील अधिकारी व त्यांचे हाताखालील विभाग हे मात्र बदलत गेले. परगण्यापेक्षां मोठे विभाग म्हणजे " सरकार." वऱ्हाडाचे एकंदर तेरा "सरकार" होते. सरकाराचे ऐवजीं हल्लीं जिल्हे आहेत. सरकारापेक्षां वर "तरफ" व सुभे हे भाग असत. हे हल्लींच्या कमिशनरीच्या डिव्हिजनच्या बरोबरीचे होते. तालुका अगर त्याचे बरोबरीचा भाग त्यावेळीं नव्हता.वऱ्हाड हा कायमचा स्वतंत्र सुभा होता.

बहामनी राजांनीं आपल्या सर्व राज्याचे चार भाग पाडून त्यांस " तर्फ" असें नांव दिलें होतें. हे भाग वऱ्हाड, दौलताबाद, बेदर व गुलबुर्गा हे होते. वऱ्हाडच्या तर्फदारांचें मुख्य ठिकाण एलिचपूर हेंच होतें. वऱ्हाडचा विस्तार त्यावेळीं हल्लींच्या दुप्पट होता. दक्षिणेस गोदावरी व पश्चिमेस **बैतुलवाडी** ह्या त्याच्या मर्यादा होत्या.

प्रत्येक तर्फदारास मानाचा किताब असे. त्याचप्रमाणें वऱ्हाडचे तर्फदारास " **मजलस-ई-अली** " असा किताब होता

अल्लाउद्दीन बहामनशहानंतर त्याचा मुलगा महमदशहा यानें १३५८ पासून १३७५ पर्यंत राज्य केलें.त्याचे वेळीं सफदरखान नांवाचा इराणी तर्फदार होता महमशहानें १३६२ मध्यें तेलंगणावर स्वारी केली; त्यांत वऱ्हाडचें लष्कर घेऊन हा तर्फदार स्वतः गेला होता. महमदशहानें तैलंगणाचे राजावर व विजयानगरचे राजावर विनाकारण स्वाऱ्या केल्या व फार क्रूरपणा केला.

वरील स्वाऱ्यांत त्यानें एकंदर पांच लक्ष हिंदू ठार मारले. त्या वेळच्या मुसलमानांची अंध धर्मश्रद्धा व क्रूरपणा इतका कमालीस गेला होता कीं, निरपराधी लोक, लहान लहान अर्भकें व बायका ह्यासुद्धां त्यांच्या क्रूरपणाला बळी पडल्या. कर्नाटकांतील वस्ती त्यामुळें इतकी कमी झाली कीं, पुढें फार वर्षें ती सुधारली नाहीं. त्यांत आश्चर्य हें कीं, सर्व मुसलमान इतिहासकारांनीं* या अमानुष क्रूरपणाचें मोठ्या गौरवानें वर्णन केलें आहे. महमदशहा हा दरसाल आपल्या राज्यांतील एका प्रांतांत फिरत असे. त्याप्रमाणें तो वऱ्हाडांतहि येत असे. त्यामुळें त्या वेळेच्या मानानें कांहीं दाब रहात असे.

बहामनी राजांच्या वेळेस जें नाणें चालत असे तें चौकोनी असून एका बाजूस मुसलमानी धर्माच्या पहिल्या चार कालिफांचीं नांवें असत. व दुसऱ्या बाजूस बहामनी राजाचें नांव व सन असे. मुसलमानी बादशहाचें नाणें कांहीं हिंदु सराफांनीं गाळल्याबद्दल महमदशहानें पुष्कळ सराफांना ठार मारून फक्त मुसलमानी बहामनी नाणेंच चालू रहावें असा हुकूम केला होता व दिल्लीचें नाणें पाडणारे लोक दक्षिणेंत होते त्यांनाच फक्त नाणें पाडण्याची परवानगी ठेवली होती.§

कांहीं मुसलमान ग्रंथकारांनीं लिहिलें आहे कीं, बहामनी राजांच्या ( वऱ्हाडांतील ) नाण्यावर एका बाजूस गाईचें चित्र असे व आपल्या हिंदु प्रजेस खुष ठेवण्याकरितां व ज्या ब्राह्मणाच्या आशिर्वादानें आपणांस राज्य मिळालें त्याविषयीं कृतज्ञता दाखवि-

---

* फेरिस्ता ( ब्रिग्ज ) भाग १ पान ३२७

§ फेरिस्ता पान ३०० भाग २

ण्याकरितां हें केलें. परंतु ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. पहिला अल्लाउद्दीन खेरीज करून बाकीचे बहामनी राजे पराकाष्ठेचे हिंदुद्वेष्टे होते. प्रसिद्ध इतिहासकार फरिस्ता याचे इतिहासांत या गोष्टीस आधार नाहीं. फेरिस्ताचा इतिहास इतका विस्तृत आहे कीं त्यांत ही गोष्ट नसणें मुळींच संभवनीय नाहीं.

महमदशहाचे वेळेस वऱ्हाडांत शांतता होती, त्यामुळें राज्याची व्यवस्था बरी होती. त्याचेनंतर मुजाहिदशहा यानें १३७५ पासून १३७८ पर्यंत राज्य केलें. त्यानें विजयानगरच्या बुक्कराय राजावर स्वारी केली. त्यांत वऱ्हाडचा सुभेदार सफदरखान यासहि बोलाविलें होतें. व त्यास अडोणीच्या वेढ्यास पाठविलें होतें. त्यानें हिंदूंचा पराभव केला. मुजाहिदशहा हा विशेष विचारी नसून धाडशी होता. त्याचें व सफदरखान याचें बनेना. सफदरखान व बेदरचा सुभेदार यांनीं मुजाहिदशहास आंवरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु त्यांचें न ऐकतां उलट त्यानें त्या दोघांसहि परत आपआपल्या प्रांतांत जाण्याचा हुकूम केला. ते जाण्याच्या पूर्वींच मुजाहिद याचा खून त्याचा चुलता दाऊदखान यानें करविला. दाऊदखान गादीवर बसला परंतु सफदरखान व दुसरे सुभेदार त्यास मान्य करिनात. ते विजापूरचा सर्व बादशाही खजिना, हत्ती व घोडे घेऊन एलिचपुरास व दौलताबादेस जाऊन राहिले. व फक्त वरपांगीं बादशहास दाखवूं लागले कीं, आम्ही आपल्या सेवेस हजर आहों. इतक्या दुष्टपणानें मिळविलेलें राज्य दाऊदखानास जास्त दिवस पचलें नाहीं. मुजाहिदशहाची बहीण रूपरवर आगा या नांवाची होती. ती फार बाणेदार स्त्री असून जनानखान्यांत मुख्य होती, व बाहेरहि तिचे वजन असे. तिच्याविरुद्ध उघडपणें जाण्याचें दाऊदखानास धैर्य होईना. आपला नातू मुजाहिद याचे खुनाबद्दल

सूड न घेतां दाऊदखानास मान्य केल्याबद्दल तिनें वृद्ध कारभारी सैफुद्दिन घोरीची निर्भर्त्सना केली व स्वतः मारेकरी घालून तिनें दाऊदखानाचा खून करविला. व महमुदशहा म्हणजे पहिला बहामनी राजा अल्लाउद्दीन याचा कनिष्ठ मुलगा महमदशहा यास गादीवर बसविलें.

दुसरा महमदशहा यानें १३७८ पासून १३९७ पर्यंत राज्य केलें. तो गादीवर बसतांच सफदरखान व दुसरे सुभेदार राजधानीस जाऊन त्यांनीं त्याचे राज्यपद मान्य केलें. हा राजा फार सद्गुणी, कोंवळ्या मनाचा व विद्वान् असे. त्यानें आपल्या कारकीर्दींत युद्ध मुळींच केलीं नाहींत. त्याचे आईचा बाप सैफुद्दीन घोरी या शहाण्या व वृद्ध मुत्सद्याच्या सल्ल्यानें तो वागत असे त्याचे वेळेस मोठा दुष्काळ पडला होता त्यावेळीं त्यानें दहा हजार बैल लावून माळव्यांतून धान्य आणविलें होतें व एलिचपुर, अहमदनगर, बेदर वगैरे ठिकाणीं अनाथगृहें बांधलीं. एलिचपुरास असेच अनाथगृह असून तेथें पुष्कळ मुलांस मुसलमानी धर्माप्रमाणें शिक्षण देत असत. हा राजा तापानें मरण पावला, व त्याचे मरणाचे दुसरे दिवशींच त्याचा वृद्ध आजा सैफुद्दीन घोरी हा १०७ वर्षांचा होऊन मरण पावला. हा प्रथमपासून बहामनी घराण्याचा आधारस्तंभ होता. फेरिस्ताच्या इतिहासांत महमूदशहाच्या वेळची एक मनोरंजक गोष्ट लिहिली आहे:—

महमदशहा हा धर्माप्रमाणें न्याय स्वतः करीत असे. एकेदिवशीं एका स्त्रीवर जारकर्माचा आरोप येऊन राजापुढें तिची चौकशी आली. त्या स्त्रीस राजानें विचारलें, "तूं हें भयंकर पापकर्म कसें केलेंस ? तिनें उत्तर दिलें, "हें कृत्य बेकायदा आहे हें मला माहीत नाहीं; कारण मुसलमानी धर्माप्रमाणें सुद्धां एका पुरुषास चार

चार बायका एकदम करण्याची परवानगी आहे, व तें कृत्य बेकायदा होत नाहीं; तर माझें कृत्य बेकायदा कां व्हावें? माझे चुकीबद्दल मला पश्चात्ताप होत आहे व मी असें पुन्हां करणार नाहीं." राजा जरी कुराणाप्रमाणें न्याय करणारा होता तरी त्याला या युक्तिवादाचा विचारच पडला व त्यानें आरोपीस समज देऊन सोडून दिलें. बहु भार्याकत्वासंबंधानें वरील स्थूल युक्तिवाद त्या वेळेच्या मानानें लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

या वेळेसच पेशवा किताबाचा अधिकारी बहामनी राज्यांत नेमला गेला. हा फारशी किताब असून हिंदुस्थानांत *यापूर्वीं याचा उपयोग कोणी केला नव्हता. यानंतर अहमदनगरचे राजांनीं त्याचा उपयोग केला व पुढें मराठी राजांनीं हा किताब आपले-कडे सुरू केला.

दुसऱ्या महमदशहानंतर दोन राजे गादीवर बसून राज्याकरितां मारले गेले. त्यानंतर या वंशांतील फेरोजशहा नांवाचा राजा गादीवर बसला. हा शूर असून गुणी व विद्याव्यासंगी होता. वैद्यशास्त्राची त्यास विशेष आवड असे. भीमेच्या कांठीं फेरोझा-बाद शहर बसवून त्यानें ती आपली राजधानी केली.

या सुमारास वऱ्हाडचा सुभेदार सफदरखान मरून त्याचा मुलगा सलाबतखान यास मजलीस-इ-अली हा किताब मिळून त्यास सुभेदार नेमलें. विजयानगरच्या दुसऱ्या हरिहरराय राजावर फेरोझशहानें स्वारी केली त्यांत सलाबतखान वऱ्हाडचें लष्कर घेऊन गेला होता. या स्वारींत फेरोझशहाचा जय होऊन सलाबतखानाचा भाऊ पुलादखान यास जिंकलेल्या रायचूर भागाचा सुभेदार नेमून बादशहा परत आला. (१३९८-९९)

* फेरिस्ता भाग २ पान ३५३.

वऱ्हाडचा सुभेदार विजयानगरच्या स्वारीवर गेल्यामुळें वऱ्हाडांत अव्यवस्था झाली. सातपुड्याचे उत्तरेस खेरला म्हणून गोंड लोकांचें लहानसें राज्य होतें. सदरहू राजे आपणांस रजपूत म्हणवीत असत. त्यावेळीं नरसिंगदेव नांवाचा गोंड राजा राज्य करीत* होता. खेरला हें ठिकाण डोंगरी व मजबूत असून गोंड लोकांची वस्ती सभोंवताली व सर्व सातपुडाभर वऱ्हाडचे हद्दींतहि होती. व देवगड, नागपूर, चांदा वगैरे ठिकाणीं गोंडवणात त्यांचीं राज्यें होतीं. गोंड लोक फार काटक, धाडशी व शूर असत. खेरला येथील राजे नेहमीं वऱ्हाडचे हद्दींत स्वाऱ्या करीत असत. नरसिंगदेव यानें वऱ्हाडचा सुभेदार सलाबतखान वऱ्हाडांत नाहीं, असें पाहून वऱ्हाडावर स्वारी केली व लुटालूट करून सर्व वऱ्हाड आपल्या ताब्यांत घेतलें व आपले अधिकारी नेमले. परंतु एवढा मोठा प्रांत पुढें ताब्यांत ठेवतां येईल इतकें मनुष्यबळ व द्रव्यबळ नरसिंगरायाजवळ नव्हतें याचा त्यानें विचार केला नाहीं.

विजयानगरचे स्वारीहून परत येतांच फेरोझशहा स्वतः वऱ्हाड परत घेण्याकरितां वऱ्हाडाकडे आला. माहूर परत घेऊन तो एलिचपुराकडे स्वतः गेला व आपला भाऊ अहमदखान ज्यास खान-इ-खानान असा किताब होता त्यास खेरल्यावर गोंड लोकांचा मोड करण्यास पाठविलें व आपण एलिचपुरास राहिला.

---

* खेरला येथील रजपूत गोंड राजे विद्वानांचेही चाहते होते. प्रसिद्ध मराठी आदिकवि व विवेकसिंधूचा कर्ता मुकुंदराज हा खेरल्याचे राजाचे पदरीं होता असें म्हणणारा एक पक्ष आहे. ( Betul gazeteer ) खेरल्यास त्याची समाधि अद्याप आहे. पण तो मुकुंदराज दुसरा कोणी असावा.

खेरला हें ठिकाण वऱ्हाडचे उत्तरेस मध्यप्रांताचे बैतुल तहसिलींत आहे.

नरसिंगदेव गोंडांचें लष्कर घेऊन लढण्यास अहमदखानावर आला व खेरल्यापासून जवळच त्यांची लढाई झाली. गोंड लोक फारच बहादुरीनें लढले. प्रथम नरसिंगदेवाचा जय होऊन त्यांनीं मुसलमानाच्या लष्कराचा मध्यभाग फोडून मुसलमानांचे मोठमोठे प्रसिद्ध चार सरदार मारले. परंतु उजव्या बाजूस स्वतः अहमदखान व डावीकडेस फजल-उल्ला-अंजू शिराझी नांवाचा सरदार होता. त्या दोघांनीं आपआपल्या बाजू कशाबशा थोपवून धरिल्या, इतक्यांत सर्व लष्करावरील मुख्य अंमलदार अहमदखान हा मारला गेल्याची गप्प फजलउल्लाचे लष्करांत आली; त्यामुळें सर्वच बुडण्याची वेळ आली. परंतु फझलउल्ला यानें फार शहाणपणानें ती बातमी जास्त पसरूं न देतां तशीच दाबली. व दुसरी एक खोटीच बातमी उठवून दिली कीं, फेरोझशहा बादशाह स्वतः मोठें लष्कर घेऊन मदतीस येऊन पोहोंचला आहे. या बातमीचे पुष्टीकरणार्थ त्यानें मोठमोठाले नगारे वगैरे वाद्यें वाजविलीं. याचा परिणाम असा झाला कीं, सैरावैरा पळत सुटलेले सर्व मुसलमान लष्कर परत एकत्र जमलें व अहमदखान व फजलउल्ला हे एकत्र फळी मिळवून एकदम नरसिंगरायाच्या लष्करावर तुटून पडले. गोंड लष्कर विजयानंदानें फुलून गाफल झालें होतें, यामुळें त्यांचा तेव्हांच मोड होऊन नरसिंगदेवाचा मुलगा गोपाळराय हा मुसलमानांच्या हातीं सांपडला. मुसलमानांनीं गोंडांची कत्तल करीत त्यांस मागें रेटीत रेटीत खेरल्यापर्यंत आणलें. नरसिंग,देव किल्ल्यांत येऊन नुकताच राहिला होता. त्यानें पुढें दोन महिने वेढा देणारे लष्करांस झुलविलें. दोन महिन्यांनंतर गोंड लोकांनीं खानखानान व फझलउल्ला यांचेशीं तहाचें बोलणें लाविलें. शेवटीं असें ठरलें कीं, नरसिंगदेव व त्याचे मुख्य सरदार ह्यांनीं एलिचपुरास बादशहाकडे

यावें व तेथपर्यंत सुरक्षित नेण्याची हमी वरील मुसलमान सरदारांनीं द्यावी. नरसिंग देवानें समक्ष बादशहाशीं काय तें ठरवावें.

ठरल्याप्रमाणें नरसिंगदेव एलिचपुरास आला व फेरोझ-शहास शरण गेला. नरसिंगदेवानें बहामनी राजांचें सार्वभौमत्व कबूल करून बरीच खंडणी, व बादशहास आपली एक मुलगी दिली व परत गेला. फेरोझशहानें खेरल्याचे लढाईत नांवाजलेला फझल-उल्ला-अंजू यास वऱ्हाडचा सुभेदार ( तरफदार ) नेमलें व परत गेला. सलाबतखान ( पूर्वींचा तरफदार ) याचें काय झालें हें समजत नाहीं, परंतु बहुधा तो खेरल्याचे लढाईत मारला गेला असावा असा तर्क आहे.

इ. स. १४०१ मध्यें फेराझशहानें विजयानगरच्या देव-रायाशीं लढाई करून त्याचा मोड केला व त्याच्या एका मुलीशीं लग्न लावून परत आला. हिंदु राजांच्या मुलींशीं लग्नें केलीं म्हणजे एक तर त्यांची मानहानि होते व नातेसंबंध जोडल्यामुळें पुढें स्नेह-भाव वाढेल अशी बहुतेक मुसलमान राजांची समजूत होती; परंतु तिचा कांहीं उपयोग होत नसे. हिंदु लोक मुसलमानांस जातिधर्मा-प्रमाणें हीन मानीत असल्यामुळें सदरहु मुलगी मेल्यासारखीच समजत असत. तिचा माहेराशीं कांहींच संबंध रहात नसे. उलटें तें एक प्रकारचें शल्यासारखें खुपत असे. जुलमानें व निरुपायानेंच अशीं लग्नें होत असत व तीं लग्नें म्हणण्यापेक्षां जुलमानें मुलगी पळवून नेणें असेंच म्हटलें पाहिजे. स्नेहभाव वाढण्यापेक्षां वैरभाव मात्र जास्त वाढत असे.

याचें प्रमाण पुढें जवळच दिसेल. लौकरच देवरायानें फेरोझ-शहावर स्वारी करून त्याचा पराभव केला व फारच नाश केला. याच लढाईंत वऱ्हाडचा तरफदार फझलउल्ला दग्यानें मारला गेला.

या पराभवामुळें बादशहा इतका खंगला कीं, त्यानें आपला भाऊ अहमदखानखानान याचे स्वाधीन राज्य केलें व दहा दिवसांनीं प्राण सोडला. कांहीं इतिहासकारांच्या मतें अहमदखानानें फेरोझशहास काढून राज्यपद बळकाविलें.

फेरोझशहा हा मुसलमानी धर्मग्रंथाप्रमाणें सर्व: काम करीत असे—निदान तसा आव तरी आणीत असे. परंतु मुसलमान शास्त्रां मध्यें मनाई असलेल्या दोन गोष्टी मात्र त्याच्याच्यानें सोडवल्या नाहींत. त्या वेळच्या मुसलमानांत अत्यंत रूढ असलेले दोन दुर्गुण म्हणजे, मद्यपान, व कामासक्ति. हे त्याचे अंगीं अतिरेकानें वास करीत असत. सुरापानासंबंधानें त्यास शास्त्रांत कोठेंच आधार सांपडेना तेव्हां व्यावहारिक युक्तिवादावरच त्यानें काम भागविलें. तो म्हणत असे कीं, " बुद्धि भ्रष्ट होईतोंपर्यंत मी दारू पीत नाहीं म्हणून ती क्षम्य आहे. "

कामासक्तिसंबधानें मात्र कसाबसा त्यानें शास्त्रार्थ शोधून काढला. मुसलमानी शास्त्राप्रमाणें एका पुरुषास फक्त चारच बायका करण्याची परवानगी आहे. परंतु तेवढ्यानेंच या स्वारीची तृप्ति होत नसे म्हणून कायदेशीर रीतीनें पुष्कळ जास्त बायका कशा करतां येतील याबद्दल त्यानें सर्व मुसलमान शास्त्रज्ञांना सल्ला विचारला. राज्यांतील सर्व डोकीं शास्त्रार्थ सुचवूं लागलीं. कांहींनीं सुचविलें कीं, प्रत्येक बायकोचें लग्न मोडून पुन्हां नित्य नवें लग्न करीत जावें. परंतु ही गोष्ट बादशहास पसंत पडली नाहीं. शेवटीं शियापंथांतील लोकांनीं त्यांच्या पंथांतील " मुतिया " नांवाची अल्पकालीन मुदतीचे लग्नाची पद्धति सुचविली. बादशाह सुनी असतांना व सर्व सुनी लोक विरुद्ध असतांना बादशहानें ती उचलली व एका दिवसांत ३०० बायका केल्या.या पद्धतींप्रमाणें सदरहू लग्न

ठरावाप्रमाणें सहा महिने मुदतीचें असतें. पुढें मुदत संपतांच लग्न मुद्दाम न मोडावें लागतांना आपोआपच वैवाहिक संबंध नष्ट होतात.

अहमदशहा फार शूर होता; परंतु फार दुष्ट, निर्दय व विशेषतः हिंदुद्वेष्टा होता. सर्व बहामनी घराण्यांत सर्वांत जास्त हिंदुद्वेष्टा हा होता. यानें राज्यांतील पुष्कळ देवळें व पाठशाळा पाडून टाकल्या. वीस हजार हिंदु मारले म्हणजे तो एक दिवस उत्सव करीत असे. त्यानें वारंगळच्या राजावर स्वारी करून त्यास ठार मारलें. विजयानगरावर स्वारी करून त्याचा नाश केला व सर्व मुलूख उजाड पाडला. विजयानगर व बहामनी राज्यांमध्यें एक कायमचा तहनामा होता. त्याप्रमाणें एकमेकांचें कैदी एकमेकांनीं मारूं नये असा ठराव होता तो या बादशहानें प्रथम मोडला.

त्यावेळीं वऱ्हाडावर अहमदशहानेंच नेमलेला अबदुल कादर उर्फ खानजहान (व वऱ्हाडचे तरफदारीमुळें आणखी किताब मजलिस-ई-अली) हा तरफदार होता; परंतु विजयानगरचे स्वारींत अहमदशहा आपले मूर्खपणामुळें शिकारींत हिंदूंच्या हातांत सांपडण्याच्या बेतांत होता. इतक्यांत कादर यानें पाळत ठेवून अहमदशहाचा जीव वांचविला. या उपकाराबद्दल अहमदशहानें त्यास वाढवून वऱ्हाडचा तरफदार नेमलें.

अहमदशहा १४२९ मध्यें वऱ्हाडांत आला व एक वर्षभर राहिला. याच वेळेस त्यानें वऱ्हाडांतील प्रसिद्ध गाविलगड हा किल्ला बांधला. त्या जागीं जुना लहान किल्ला होता.

**हिंदु राज्य संस्थापनेचा प्रयत्न**

विजयानगरच्या लढाईच्या गडबडींत बहामनी राजे गुंतल्यामुळें वऱ्हाडांत बरींच वर्षेपर्यंत बरीच गडबड व अंदाधुंदी चालली होती. बहामनीराजांचें पूर्वींचें सहानुभूतिपर वर्तन नाहींसें

होऊन राजांच्या आंगीं हिंदूंचा द्वेष आणि आपल्यां धर्माचा गैरवाजवी अभिमान व पक्षपात सुरू झाल्यामुळें हिंदूंचा छळ होऊं लागला. विजयानगरच्या वैभवशाली हिंदुराज्याचा व त्याचेशीं सतत लढणाऱ्या बहामनी मुसलमानी राज्याचा हिंदूंच्या मनावर परिणाम होऊं लागला. त्यामुळें वऱ्हाडांतील हिंदूंनीं वऱ्हाडांतील लष्कर विजयानगराकडे गेलें असें पाहून बंडाळी सुरू केली. वऱ्हाडांतील ग्रामसंस्था व परगणे फार प्राचीन काळापासून वतनदार हिंदूंच्या स्वाधीन असल्यामुळें त्यांचें लोकांवर फार वजन असे व त्यांचेवर मुसलमानांचा जुलूम होत असल्यामुळें परंपरेनें सर्व प्रजेच्या मनावर त्यांचें प्रतिबिंब उमटत असे. सदरहू असंतुष्टतेचें स्वरूप या बंडाळींत दिसून आलें. परंतु स्वतंत्र राज्यस्थापनेस योग्य संधि आली असतांहि शिवाजी महाराजांसारखा नेता व समर्थ रामदासस्वामींसारखा उपदेशक निर्माण न झाल्यामुळें ही हिंदूंची अव्यवस्थित उठावणी तेव्हांच जिरली. शिवाय वऱ्हाडप्रांत कोंकणासारखा अगर पुण्यासारखा राजधानीपासून दूर नसल्यामुळें हा स्वातंत्र्यांकुर कृतीनें वृद्धिंगत होण्यास मुळींच सवड सांपडली नाहीं. कारण वऱ्हाड म्हणजे वाघाच्या जाळींत होतें. त्यामुळें थोडीशी गडबड दिसतांच खुद्द बादशहा राजधानी सोडून वऱ्हाड प्रांतांत सर्व सैन्यासह एलिचपुर येथें ठाणें देऊन राहिला. त्यामुळें हिंदूंची गडबड जेथल्या तेथेंच जिरली.

वऱ्हाडांतील हिंदूस त्यावेळीं मोठा आधार म्हणजे खेरला येथील नरसिंगदेव राजाचा. त्यानें वऱ्हाड मुसलमानांपासून सोडविण्याचे पुष्कळ यत्न केले व एकदां वऱ्हाड पूर्णपणें पाईनगंगेपर्यंत आपल्या ताब्यांत घेतलें. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें त्याचा जोर कमी पडून त्यास हार खावी लागली. कारण हिंदूंचा यत्न विस्कळित होता.

अहमदशहानें प्रथम वऱ्हाडांतून दक्षिण ठाणें माहूर हें काबीज केलें व उत्तरेकडे एलिचपुराकडे जातांना त्यानें कळंब सर केलें. हीं दोन्ही ठाणीं त्यावेळीं हिंदूंच्या ताब्यांत होती.

वऱ्हाडचे मुसलमानी सत्तेस त्यावेळेस खेरला येथील राजापासून विशेष भीति होती हें पूर्वीं आलेंच आहे. शिवाय उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत येण्याचा त्यावेळचा हमरस्ता सातपुड्यांतून वऱ्हाडांतून होता हें आपण अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीच्या वेळेस पाहिलेंच आहे. त्यामुळें सातपुड्याचीच नाकेबंदी करणें विशेष जरूर होतें. त्यामुळें अहमदशहानें स्वतःचे देखरेखीखालीं गाविलगड किल्ला बांधविला व नरनाळा किल्ला पूर्वींचाच होता तो दुरुस्त करून लढाईच्या कामास सज्ज करून ठेविला व आपल्या उत्तर सरहद्दीचा पक्का बंदोबस्त केला.

प्रसिद्ध मुसलमानी इतिहासकार फेरिस्ता याचें असें मत आहे कीं, अहमदशहानें ही तयारी उत्तरेकडील खेरला, गुजराथ व माळवा हीं राज्यें जिंकण्याकरितां केली. परंतु त्याचे राज्याचे दक्षिणेस विजयानगर वगैरे राज्यांपासून त्यास सतत धोका असतांना इतक्या दूरवर अहमदशहाची मजल गेली असेल असें वाटत नाहीं. हेंच मत आधुनिक इंग्रज इतिहासकार हेग याचें आहे. व तेंच जास्त सयुक्तिक दिसतें.

फेरिस्ता याचे तर्कास एक जागा होती ती ही कीं, तैमूरलंग दिल्लीस आला त्यावेळीं (इ. स. १३९८). पूर्वींचा बहामनी बादशहा फेरोझशहा यानें एक स्तुतिपर पत्र पाठवून त्याचें स्वागत केलें होतें. त्यावर खुष होऊन त्यानें फेरोझशहास गुजराथ व माळवाप्रांत बक्षिस दिले होते. ही कागदी मालकी खरी करून दाखवावी असा अहमदशहाचा इरादा होता असा फेरिस्तानें या तयारीवरून

तर्क केला. परंतु ही गोष्ट अहमदशहाच्या ताकदीबाहेर होती. कारण गुजराथ व माळवा हीं दोन्ही राज्यें त्यावेळीं मुसलमानी होतीं व तिसरें खानदेशचे मुसलमानी राजाची व त्यांची दोस्ती होती. शिवाय अहमदशहा दुष्ट होता तरी औरंगजेबासारखा मुसलमानी धर्माचा अभिमानी असल्यामुळें दुसऱ्या मुसलमान राजांवर स्वारी करीत नसे. फेरिस्ताचे तर्कास आणखी एक जागा होती ती ही कीं, यानंतर लागलीच माळव्याचा राजा हुशंगशहा याची व अहमदशहाची वऱ्हाडांत एक मोठी लढाई झाली. तिचें वर्णन पुढें येईल. वास्तविक ही लढाई अहमदशहाकडून झाली नसून हुशंगशहाकडून झाली. कदाचित् तैमुरलंग याचे सनदीवरून फेरिस्त्याच्या तर्काप्रमाणेंच हुशंगशहाचाहि तर्क झाला असावा व ही तयारी आपल्याकरितांच आहे असें समजून हुशंगशहानें स्वारी केली असावी.

गाविलगड किल्ल्याच्या जागीं पूर्वीं गवळी, अहीर वगैरे वन्य लोकांचा मातीचा लहानसा किल्ला असे व त्या ठिकाणचें नांव पूर्वीं गवळीगड असें होतें असें म्हणतात. खानदेशांतील गवळीगड व अशीरगड ( अहीरगड ) या नांवांवरून हाच तर्क पुष्कळांनीं केला आहे. गाविलगड हा किल्ला फार उंच ठिकाणीं असून फार दुरून दिसतो. हल्लीं त्याचे जवळच चिखलदारा हें वऱ्हाडांतील हवा खाण्याचें डोंगरी ठिकाण आहे. या किल्ल्याखालीं बराच प्रदेश येतो. हा किल्ला नंतर फत्तेउल्ला उमादुल्मुल्क यानें दुरुस्त केला व पुढें नागपूरकर भोंसल्यांच्या ताब्यांत असतांना त्यांनीहि कांहीं वाढविला त्यास बाहेरचा किल्ला असें म्हणतात. भोंसल्यांच्या वेळचा किल्ल्यावर कांहीं लेख आहे परंतु तो अद्यापपर्यंत वाचला गेला नाहीं. गाविलगड किल्ला इ. स. १५७७ मध्यें निजामशाही राज्याचे वेळेसही दुरुस्त केला. कारण त्यावेळीं अकबर बादशहा

ग्रा. क्र. २५१५३



नरनाळा किल्ल्यांतील महाकाली दरवाजा.

[ पृ. १०१

दक्षिणेवर स्वारी करणार अशी बातमी आली होती. त्यावेळीं गाविलगडचा किल्लेदार बहिरामखान हा होता व त्याचे नांवाचा एक लेख किल्ल्याच्या पश्चिमेकडील दरवाजावर आहे व त्यांत मुसलमानी मूळाक्षरांतील* अक्षरी पद्धतीनें सन दिला आहे. याप्रमाणें सन लिहिण्याची सर्व मुसलमानी इमारतींची वहिवाट आहे व वऱ्हाडांतील बऱ्याच किल्ल्यांवर, वेशींवर, व इमारतींवर याप्रमाणें लेख आहेत.

गाविलगड हा डोंगरी किल्ला वऱ्हाडचे पुढील इतिहासांत फार प्रसिद्धीस आला आहे. गाविलगडची मालकी ती वऱ्हाडची मालकी समजली जात असे. गाविलगड जिंकल्याशिवाय वऱ्हाड जिंकलें गेलें असें समजलें जात नसे. एलिचपूरचा व नंतर नागपुरचा खजिना व जडजवाहीर तेथें ठेवीत असत. भोसल्यानें इंग्रजांचे तहाचे वेळीं सर्व वऱ्हाड सोडलें परंतु नरनाळा व गाविलगड सोडलें नव्हतें. यापुढें वऱ्हाड हा सुभा " सुभे गाविलगड अथवा गावेल' या नांवानें मोडत असे.+

अहमदशहानें गाविलगड व नरनाळा दुरुस्त केला हें ऐकून माळव्याचा राजा हुशंगशहा यास भीति वाटली म्हणून म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणांमुळें म्हणा त्यानें बहामनी राज्याचा मांडलिक खेरला येथील राजा नरसिंगराय यांस आपलें सार्वभौमत्व कबूल

---

* संस्कृतांत ज्याप्रमाणें आकाश, वायु, वगैरे शब्दांस काल्पनिक आंकडे दिले आहेत. व श्लोकादिकांत मोठाले आंकडे सांगतांना जसा त्यांचा उपयोग करतात तसा फारशी भाषेंत प्रत्येक मूळाक्षराचे आंकडे ठरलेले आहेत. व आंकडे जमतील असें वाक्य दिलें म्हणजे कल्पिलेल्या सनाचा बोध होतो.

+ गाविलगडचें सविस्तर वर्णन भाग १४ यांत पहा.

करण्याबद्दल निरोप पाठविला. त्यानें तें नाकारतांच हुशंगशहानें खेरल्यावर स्वारी केली. दोन वेळां नरसिंगरायानें त्याचा पराभव करून त्यास पिटाळून लावलें. शेवटीं खानदेशाच्या नसीरखानाच्या साह्यानें त्यानें तिसरी स्वारी करून कांहीं भाग जिंकला व खेरल्यावर आला. शेवटीं नरसिंगरायानें अहमदशहास निरोप पाठविला. त्यानें खानजहान यास मदतीस पाठविलें व आपण हळूहळू एलिचपुरास आला. अहमदशहाच्या सुस्तीमुळें हुशंगशहास जोर आला व त्यानें खेरला किल्ल्यास वेढा दिला. शेवटीं अहमदशहा मेळघाटांतून खेरल्याजवळ आला परंतु अहमदशहाचे छावणींतील त्याच्या धार्मिक सल्लागारांचें मत पडलें कीं, पूर्वीं कोणत्याही बहामनी राजांनीं स्वधर्मीयांशीं लढाई केली नाहीं त्याचप्रमाणें अहमदशहानेंहि वागावें. अहमदशहा हा धर्मभोळा होता त्यास तें पटलें व त्यानें हुशंगशहास फक्त निरोप पाठविला कीं, "नरसिंगराय हा आमचा मांडलिक आहे त्यास तुम्ही त्रास देऊं नये." याप्रमाणें निरोप पाठवून अहमदशहा मागें फिरला. याचा परिणाम असा झाला कीं, अहमदशहा भ्याला म्हणून मागें पळाला असें समजून हुशंगशहा त्याचे मागें लागला. शेवटीं त्यांची गांठ वऱ्हाडांत एका* नदीच्या कांठीं पडून मोठी लढाई झाली. तींत हुशंगशहाचा पराभव झाला व तो मेळघाटांतून उत्तरेकडे पळाला. रस्त्यांत मेळघाटांतील गोंड व कोरकू लोकांनीं त्यांची बरीच कत्तल केली व नरसिंगरायानेंहि त्यांचा पाठलाग करून बराच नाश केला. अहमदशहा परत गुलबुर्ग्यास गेला व त्यानें आपली राजधानी राज्यास जास्त सोइस्कर अशा बेदर शहरीं आणली.

---

* ही लढाई कोठें झाली हें समजत नाहीं.

इ. स. १४३३ मध्यें हुशंगशहानें खेरल्यावर स्वारी करून नरसिंगदेवास ठार मारलें व खेरल्याचें राज्य आपल्या राज्यास जोडलें. अहमदशहानें हुशंगशहावर स्वारी केली; परंतु खानदेशचा राजा नसीरखान यानें दोघांचा समेट केला. त्यांत हुशंगशहास खेरल्याचें राज्य घेऊ द्यावें असें ठरलें. अहमदशहा गुजराथच्या लढाईमुळें थकला होता त्यामुळें तो स्वस्थ राहिला.

अहमदशहानंतर त्याचा मुलगा अल्लाउद्दीन अहमदशहा हा गादीवर बसला. यास खानदेशचा राजा नसीरखान याची मुलगी दिली होती. परंतु अल्लाउद्दीनानें संगमेश्वर येथील एका हिंदू राजाच्या मुलीशीं लग्न लावलें होतें व तिचा तो अगदीं अंकित झाला होता. त्यामुळें नसीरखानाच्या मुलीनें बापास अल्लाउद्दीना-विरुद्ध लिहिलें त्यामुळें नसीरखान लष्करासह अल्लाउद्दीनावर चाल करून आला. नसीरखान हा मुसलमानांचा दुसरा खलीफा उमर याचे आपण वंशज आहों असें म्हणवीत असे. त्यामुळें त्याचें सर्व मुसलमानांवर धार्मिक वजन असे. त्यामुळें वऱ्हाडांतील सर्व मुसलमान सरदारांस त्यानें आपलेकडे वळवून घेतलें. त्याचप्रमाणें मेळघाटांतील गोंड व कोरकू संस्थानिकही त्यानें आपल्या बाजूस वळवून घेतले. नसीरखान बऱ्हाणपुराहून सातपुड्यांतून हल्लींच्या बुलढाणा जिल्ह्यांतून दक्षिणेस चालला. वऱ्हाडचा सुभेदार खान-जहान हा नरनाळ्यास होता. त्यास सर्व फितुरी सरदारांनीं कोंडून ठेविलें. खानजहान यानें युक्तीनें बादशहास निरोप पाठविला. बाद-शहानें दौलताबादचा सुभेदार खलफ हसन यास फौज देऊन पाठ-विलें. खलफ हसन घाटावर मेहेकर येथें येऊन पोहोंचला. खान-जहान यानें युक्तीनें आपली अटकेंतून सुटका करून तोहि मेहेकर येथें खलफ हसन यास येऊन मिळाला. तेथून त्यांनीं कांहीं दक्षिणी

सैन्य बाळापूर व एलिचपुराकडे पाठविलें व मेळघाटांतलि गोंड व कोरकू सैन्य आल्यास त्यास रस्त्यांत अडाविण्यास सांगितलें. मेळघाटांतून खास वऱ्हाडांतील सपाटींतून दक्षिणेकडील घाटावर येण्यास पूर्वीं वऱ्हाडांत ठराविक रस्ते असून व त्या रस्त्यांवर चांगल्या दगडी वेशी माऱ्याचे ठिकाणावर असून वेशींचे दरवाजे बंद करतां येत असत. याप्रमाणें उत्तरेकडून दक्षिणेच्या घाटावर कोठूनहि गेलें तरी कोणती तरी वेस ओलांडावी लागे. अशा दगडी-वेशी पश्चिमेकडून पूर्वेकडे वऱ्हाडच्या रुंदीनें घाटाच्या सरहद्दीवर अद्याप कायम आहेत. रोहिणखेड, देऊळघाट, लाखनवाडा, घाटबोरी, वगैरे जागीं अद्याप त्या कायम असून कांहीं दोन्ही बाजूंस तटबंद्या आहेत. ह्या वेशी *बहामनी राजांच्या कारकीर्दींत बांधल्या गेल्या आहेत.

सर्वांत जास्त रहदारीचा घाट व रस्ता बुलढाण्याजवळ रोहिणखेडचा घाट हा होता. यास राजूरचा घाट असेंहि म्हणत असत. जवळच जयपूर कोथळीचाहि घाट होता. चांगला हुशार सेनापति असल्यास शत्रूस अडवून त्यास आपखुशीनें रोहिणखेडच्या खिंडींत आणण्यास व तेथें अडवून त्याचा पराभव करण्यास फारशी मेहनत पडत नसे. म्हणून बऱ्याच युद्धांत रोहिणखेडचा घाट महत्वाचा म्हणून प्रसिद्धीस आला होता व तेथें बऱ्याच

---

* फेरिस्ता भाग २

कांहीं वेशी इ. स. १६७० मध्यें शिवाजीनें खानदेशावर व वऱ्हाडावर सैन्य पाठवून मुलूख लुटला त्यानंतर पुढील बंदोबस्ताकरितां औरंगजेबाचा दक्षिणेंतील सुभेदार बहादुरखान यानें बांधविल्या व दुरुस्त केल्या. दिलकशामध्यें फरदापुर, मलकापुर, लाखनवाडा, देऊळघाट, राजूर वगैरेचीं नांवें आहेत. ( सरकारचें शिवाजी पा. २२५ )

लहानमोठ्या लढाया झाल्या आहेत. हा रस्ता पुढें उत्तरेकडून दक्षिणेकडे जाण्याचा हमरस्ता झाला होता.

सदरहू रोहिणखेडच्या घाटांत खलफखानानें नसीरखानास गांठून त्याचा पुरा मोड केला. नसीरखान पळून खानदेशांत लळिंग येथील किल्ल्यांत जाऊन राहिला. त्यास बाहेर काढून खलफखानानें पुन्हां त्याचा पराभव केला. खलफखानानें बऱ्हाणपूर लुटून सर्व संपत्ति घेऊन बेदरास परत गेला. ( इ. स. १४३७ ).

पूर्वींच्या लष्कराचे मुक्काम पाणी, रस्ता, सावली वगैरेच्या सोईप्रमाणें ठरीव ठिकाणीं होत असत. वऱ्हाडांत आधीं पाण्याचा व सावलीचा त्रास जास्ती. शत्रूच्या लष्करास आपणास वाटेल तेथें तळ देण्यास भाग पाडतां येत असे. त्यामुळें अशा सोईच्या ठरीव ठिकाणास नेहमीं लष्करापासून फार त्रास पोहोंचत असे. त्यामुळें कांहीं कांहीं ठिकाणीं गांवकरी लोकांनीं तलाव फोडून दिल्याचीं उदाहरणेंहि ऐकिवांत आहेत. पूर्वींच्या लष्करी डावपेचांस अनुसरून शत्रूचें लष्कर आपल्या माऱ्यांत यावें अशा जागेच्या सोई कायम ठेवून व वाढवून व दुसरे नजीकचे ठिकाणाच्या सोई नाहींशा करून शत्रूचें लष्करास बरोबर जाळ्यांत पकडण्याच्या जागा सुद्धां तयार करून टेविल्याचीं उदाहरणें आहेत.

माळव्याचें मुसलमानी लष्कर दक्षिणेंत निजामशहा बहामनी राजावर स्वारी करून आलें असतां परत जातांना वऱ्हाडांतून गेलें परंतु अशाच डावपेंचामुळें त्यास पाण्याच्या जागा न मिळून त्याचें सहा हजार लष्कर एका दिवसांत* पाण्यावांचून मेलें व एकंदर १२ हजार लष्कर याप्रमाणें नाश पावलें.

या बादशहाचे कारकीर्दींत दरबारांत दोन फळ्या झाल्या

* पान १०६ पहा.

व त्यांचीं भांडणें चालून त्यापायींच अखेर हें राज्य लयास गेलें. ह्या दोन फळ्या एक परदेशी व दुसरी दक्षिणी. परदेशी फळींत इराणी, तुर्की, वगैरे नवीन परदेशांतून आलेले मुसलमान येत असत. व ते शिया पंथाचे असत. दक्षिणी फळींत फार दिवस दक्षिणेमध्यें राहिलेले मुसलमान, हिंदूचे बाटून झालेले मुसलमान, हबशी हे येत असत व ते सुनी पंथाचे असत. या दोन पक्षांची अधिकाराबद्दल मोठी चुरस असे प्रथम प्रथम शहाण्या व कर्तबगार राजांच्यावेळीं यांची चुरस संभावितीची व बेताबाताची असे. परंतु पुढें पुढें दोन्ही पक्ष एकमेकांस पाण्यांत पाहूं लागले व अत्यंत हलकटपणानें एकमेकांचा पाडाव करूं लागले.

अल्लाउदीन १४५७ मध्यें मरण पावला.त्यानंतर हुमायून नांवाचा क्रूर व दुर्गुणी बादशहा झाला. त्यास त्याचे नोकरांनीं ठार मारिलें. त्यानें आपणामागें राज्य चालविण्याबद्दल मात्र फार उत्तम व्यवस्था करून ठेविली. त्याचा अज्ञान मुलगा निजामशहा यास गादीवर बसवून त्याचे आईनें खाजा महमद गावान व खानजहान तुर्क यांचे मदतीनें कारभार चालवावा असें त्यानें ठरविलें होतें. वरील दोघेजण परदेशी व दक्षिणी फळ्यांचे पुढारी होते. दोन्ही विरुद्ध फळ्यांचें याप्रमाणें कारभारांत आंग असल्यामुळें काम चांगलें चालेल अशी त्याची कल्पना होती व त्याप्रमाणें कांहीं दिवस काम फार उत्तम तऱ्हेनें चाललें.

यावेळीं माळव्याचा राजा महमूदशहा यानें स्वारी केली व पूर्वीच्या नसीरखानाच्या मार्गानेंच तो वऱ्हाडांतून चाल करून आला. महमद गावान यानें लष्कर उभारून व गुजराथच्या राजाची मदत घेऊन महमदशहास पळविलें. गावान यानें वऱ्हाडांत अगोदरच १०००० लष्कर पाठविलें होतें व त्यानें महमुदशहास

परत जातांना अडवावें असा गावानचा हुकूम होता. शेवटीं गावान व वऱ्हाडांतील लष्कर यास टाळतांना महमुदशहास पूर्व वऱ्हाडांतून मेळघाटाच्या जंगलांतून जावें लागलें. मेळघाटांतून रस्ता माहीत नसल्यामुळें त्यास एका कोरकू राजाची मदत ध्यावी लागली. त्यानें फसवून महमूदशहास एलिचपूर व आकोटच्या मार्गानें नेऊन निर्जल अशा दाट अरण्यांत सोडून दिलें. त्या निर्जल अरण्यांतून वाट काढतां काढतां व कोरकू लोकांच्या लुटालुटींतून वचावतां बचावतां त्याचें १२ हजार लष्कर मरून फारच थोडें लष्कर उरलें तें घेऊन तो परत गेला.

निजामशहानंतर तिसरा महमद गादीवर बसला. त्यानें निजाम-उल-मुल्क तुर्की यास वऱ्हाडचा सुभेदार नेमलें. हा माळव्याच्या राजाशीं झालेल्या लढाईत पुढें आला होता. त्यास राजानें खेरला येथील हिंदू मांडलिक संस्थानावर स्वारी करून तें सर करण्यास सांगितलें. मागील तहाप्रमाणें खेरला माळव्याच्या राजाकडे गेलें होतें सबब माळव्याच्या सैन्यानें वऱ्हाडच्या सैन्यास प्रतिबंध केला. निजाम यानें माळव्याच्या सैन्याचा पराभव केला व खेरला सर केला. तेथें दोघां रजपुतांनीं निजाम याचा खून केला. त्यावर निजामाचे हाताखालचे सरदार यूसफ आदिलखान ( जो पुढें विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा संस्थापक झाला ) व दर्याखान यांनीं सर्व शहराची बायका मुलांसुद्धां कत्तल करविली. पुढें माळव्याच्या महमूदशहाचा व बहामनी महमदशहाचा तह होऊन खेरला सोडण्याचा वऱ्हाडच्या सुभेदारास हुकूम झाला.

इ० स० १४७१ मध्यें फत्ते उल्ला-इमाद-उल-मुल्क यास वऱ्हाडचा सुभेदार नेमलें. हा पुढील इमादशाही घराण्याचा संस्थापक झाला. हा मूळचा विजयानगर येथील ब्राह्मण होता.

अहमदशहानें इ० स० १४२२ मध्यें विजयानगरावर स्वारी केली, त्यावेळीं मुसलमानांनीं त्यास बाटवून वऱ्हाडचा सुभेदार खानजहान याचे स्वाधीन केलें. त्यावेळीं तो लहान मुलगा होता. हा जरी मुसलमान झाला होता तरी विशेष गोष्ट ही कीं, मूळचे हिंदुत्वाचा अभिमान त्यास नेहमीं असे. इतिहासांत नेहमींचा अनुभव हा आहे कीं, बाटून झालेले मुसलमान खऱ्या मुसलमानांपेक्षांही जास्त हटवादी व हिंदुद्वेष्टे असतात. त्यास हा अपवाद होता. वऱ्हाडचा सुभेदार झाल्यानंतर यानें गाविलगड किल्लयाची मजबुती केली व तेथील दिल्लीदरवाजा बांधला. त्या दरवाजावर त्यानें विजयानगरच्या हिंदु राजाचें जयचिन्ह कोरलें आहे. यानें बहामनी घराण्याची फार इमानानें नोकरी केली व अखेरीस बहामनी राज्याचे तुकडे तुकडे झाल्यावर निरुपायानें यानें आपलें स्वतंत्र राज्य वऱ्हाडांत स्थापिलें.

बहामनी राज्यांतील सर्व कारभार यावेळीं महमदगावान हा चालवीत असे. हा शूर असून इमानी व मुत्सद्दी होता यावेळीं बहामनी राज्य फार वाढलें असून सर्व राज्याचे चार सुभे होते. ते गुलबुर्गा, दौलताबाद, तेलंगण, व वऱ्हाड हे होत. सुभे फार मोठे असल्यामुळें एका सुभेदारास झेंपत नसत. शिवाय सुभेदारांची सत्ता फार वाढल्यामुळें त्यांचे पासूनच पुढें मागें राज्यास अपाय होण्याची धास्ती होती. त्यामुळें शहाण्या गावाननें या चार सुभ्याचे आठ सुभे केले. त्यांत वऱ्हाडचे उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाड असे दोन सुभे होऊन उत्तर वऱ्हाडचें मुख्य ठिकाण गाविलगड

व दक्षिणेचे माहूर* हें झालें व निरनिराळे सुभेदार नेमले गेले. गावेलच्या सुभ्यावर फत्तेउल्ला उमाद्-उल-मुल्क हाच कायम राहिला व माहूर सुभ्यावर खुदावंतखान नांवाच्या हबशी सरदाराची योजना केली. गावान यानें शहाणपणानें जी व्यवस्था केली ती जरा उशीरानें व सुभेदारांची सत्ता बरीच प्रबल झाल्यानंतर, झाली. त्यामुळें तीच बहामनी राज्याचा वाजवीपेक्षांहि लौकर नाश होण्यास कारण झाली. जुन्या सुभेदारास ही व्यवस्था न आवडल्यामुळें त्यांनीं गावानविरुद्ध कट केला. यांत इमानी फत्तेउल्ला खेरीज करून बाकीचे सर्व महत्वाचे लोक होतें. या सर्व कटवाल्यांनीं बादशहा तिसरा महमद याजवळ गावानविरुद्ध खोट्या नाटचा गोष्टी सांगून व गावान याचें नांवाचें एक बनावट पत्र तयार करून व त्यावर लबाडीनें गावान याचा शिक्का मिळवून तें राजद्रोहात्मक पत्र कटवाल्यांनीं बादशहास दाखविलें, त्यावर त्या मूर्ख बादशहानें गावान यास इ. स. १४८१ मध्यें ठार मारविलें. हें कपट नंतर बादशहाच्या लक्षांत आलें व त्यास फार पश्चात्ताप झाला. असें सांगतात कीं, वऱ्हाडचे सुभेदार फत्तेउल्ला व खुदावंदखान हे बादशाही स्वारीत बादशहाचे तळापासून फार दूर तळ ठेवीत. एकदां बादशहानें फत्तेउल्लास याचें कारण विचारलें असतां त्यानें धीटपणानें उत्तर दिलें कीं, " जेथें खोट्या पुराव्याचे

---

* माहुर हें प्रसिद्ध मातापुर नांवाचे देवीचें मोठें क्षेत्र असून श्रीदत्तात्रेयाचेंहि प्रसिद्ध स्थान आहे व तेथें डोंगरावर फार मजबूत व दुर्घट असा किल्ला आहे. देवीस व दत्तास चांगल्या जहागिरी असून अद्याप त्या चालू आहेत. हल्लीं पाइन गंगेची सरहद्द झाल्यामुळें हें ठिकाण वऱ्हाडचे सरहद्दीवर परंतु निजामाचे राज्यांत आहे. माहूरच्या दोन्ही देवस्थानांच्या जहागिरी वऱ्हाडांत आहेत.

भरवशावर गावान सारख्या प्रामाणिक व वृद्ध मुत्सद्याचा खून झाला तेथें आमचा इनसाफ कोण करणार ?" बादशहानें न रागावतां फत्तेउल्ला व खुदांवदखान यास भेटींत बोलावून आपला पश्चात्ताप प्रदर्शित केला व त्यांच्या मदतीनें कटवाल्यांचा नाश करण्याचा निश्चय केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं.

बादशहाच्या मूर्खपणाच्या कृत्यामुळें त्याचें सुभेदारांवरील वजन उडालें. नंतर त्यानें पश्चिमेकडील प्रांतांवर स्वारी केली. त्यांत वऱ्हाडचे लष्कर घेऊन दोन्ही सुभेदारांस बोलाविलें. ते बादशहाबरोबर गेले परंतु नेहमीं दूर तळ देत व बादशहास दुरून कुर्निसात करीत. शेवटीं मध्येंच परवानगी न घेतां ते निघून परत वऱ्हाडांत आले ते पुन्हां गेले नाहींत.

यानंतर लौकर बहामनी राज्याचे तुकडे तुकडे झाले. महमदशहा मरून त्याचा अल्पवयी पुत्र गादीवर बसला जिकडे तिकडे अव्यवस्था माजली. गावान याच्या शत्रूपैकीं मुख्य मलिक-हसन निजामुल्मुल्क हा राजधानींत अधिकारारूढ झाला. फत्तेउल्ला इमादुल्मुल्क यासहि बादशहानें प्रधान मंडळांत घेऊन त्याचा मुलगा अल्लाउद्दीन यास गाविलचे सुभ्यावर पाठविलें परंतु खून व कट ह्या गोष्टी फत्तेउल्लाच्या स्वभावाविरुद्ध असल्यामुळें तो प्रधानमंडळांत न शिरतां वऱ्हाडांत परत आला. कारण, एकदां निजाम व इमाद या दोघांसहि मारण्याचा बादशहानें हुकूम केला होता परंतु ते राजवाड्यांतून फार धैर्यानें तरवारीच्या जोरावर बाहेर पडले.

इ. स. १४८९ मध्यें निजामुल्मुल्क याचा खून झाला व राजधानींत सर्वच दंगल माजली. कासीमबरीद नांवाचा सरदार कारभार चालवूं लागला परंतु, त्याचे कोणी ऐकेना. इ. स. १४९० मध्यें मलिक हसनाचा पुत्र मलिकमहमद निजामुल्मुल्क यानें अह-

मदनगरावर स्वतंत्र होण्याची सर्व तयारी करून विजापुरचा सुभेदार यूसफ आदिलखान व वऱ्हाडचे सुभेदार फत्तेउल्ला उमादुल्मुल्क व खुदावंदखान यास बोलावून आपआपल्या सुभ्यांत स्वतंत्र राज्यस्थापनेची द्वाही फिरविण्यास सांगितलें. राजधानींत कांहींच जोर राहिला नव्हता. शेवटीं वरील सुभेदारांनीं आपआपल्या सुभ्यांत आपआपल्या नांवांनीं खुतबा पढविला व राजरोस रीतीनें स्वतंत्र झाले. फत्तेउल्ला इमादुल्मुल्क यानें "फत्तेउल्ला इमादशहा" हा किताब घेतला व गाविलगड व नरनाळा हे किल्ले दुरुस्त करून तो तयारींत राहिला.

इ. स. १४७३–७४ या दोन सालीं वऱ्हाडांत मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळीं सर्व लोक माळवा व गुजराथेकडे गेले. त्यानंतर कांहीं वर्षें सर्व प्रांत उजाड झाला होता. कांहीं वर्षांनीं हळू हळू मूळचे लोक परत आले.

---

# भाग सहावा

## एलिचपूरचें इमादशाही घराणें.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें फत्तेउल्ला हा स्वतंत्र होऊन त्यानें एलिचपुरास स्वतंत्र राज्याची स्थापना केली. अर्वाचीन काळांत वऱ्हाडांत स्वतंत्र राज्य एवढेंच झालें. बाकीचे सर्व अमदानींत राजधानी वऱ्हाडचे बाहेर होती. तरीसुद्धां वऱ्हाडची प्राचीन पूर्वपरंपरा, त्याचा सुपीकपणा व त्यामुळें आलेलें स्वाभाविक महत्त्व यामुळें वऱ्हाडचा नेहमीं स्वतंत्र सुभा असे. त्यामुळें त्याचा स्वतंत्रपणा व त्याचें स्वयंपूर्ण एकरूप अद्याप कायम राहिलें आहे. फक्त विस्तार मात्र लहान झाला आहे.

फत्तेउल्ला हा स्वतंत्र झाला व त्याच सालीं मरण पावला. वास्तविक, अशा स्थितींत बंडाळी होऊन उदय व अस्त एकदमच व्हावयाचा; परंतु फत्तेउल्ला हा फार दिवस वऱ्हाडचा सुभेदार होता व त्याचें सर्व आयुष्य वऱ्हाडांत गेलें होतें. तो हुशार व कार्यकर्ता पुरुष असल्यामुळें त्याचे पाय वऱ्हाडांत चांगलेच रुतले होते. त्याचें वजन चांगलें होतें. वऱ्हाडच्या बाहेरसुद्धां त्याचें वजन बरेंच होतें म्हणून सर्वत्र शांतता राहून त्याचा मुलगा अल्लाउद्दीन हा शांतपणें गादीवर बसला.

अलाउद्दीन इमादशहा
१४८४-१५२८

अल्लाउद्दीन इमादशहा याची कारकीर्द फारच भानगडीची झाली. हा बादशहा पराक्रमी परंतु दुर्दैवी होता.

या वेळेस बहामनी घराण्याचा अवशेष दुसरा महमदशहा हा राज्यावर होता. हा अगदीं दुर्बळ असून

**अमीर बरीद प्रकरण** सर्व सत्ता अमीर बरीद याचे हातीं होती. (हाच पुढें बेदरचे बरीदशाही राज्याचा संस्थापक झाला). बरीदाचा त्रास व पगडा बादशहास अत्यंत झाल्यामुळें तो पळून अल्लाउद्दीनाकडे आला व त्यानें अल्लाउद्दीनास मदत मागितली. अल्लाउद्दीन सैन्यासह बरीदावर चाल करून गेला. एवढ्या थोड्या काळांत सुद्धां महमदशहास अल्लाउद्दीनासंबंधानें जो अनुभव आला तो बरीदाहून फारसा निराळा नव्हता. महमदशहास वाटूं लागलें कीं याचेपेक्षां बरीदच बरा. बरीद बेदराहून अल्लाउद्दीनाशीं सामना देण्याकरितां चालून आला व त्यांची लढाई सुरू होते न होते तोंच महमदशहा अल्लाउद्दीनाकडून निघून बरीदाकडे गेला. लढाईचें मूळच तिकडे गेल्यामुळें अल्लाउद्दीनास लढाई बंद करून परत वऱ्हाडांत यावें लागलें व बरीदाचा रोष मात्र त्याच्या पदरांत पडला. बरीदानें महमूदशहास मरेपर्यंत कैदेंत ठेवलें व आपण सर्व कारभार बळकावला. नांव मात्र बादशहाचेंच चालूं ठेवलें.

अल्लाउद्दीनाचें अमीरबरीदाशीं बिघडलें त्याचप्रमाणें अहमदनगरचे निजामशाही राज्याशींहि त्याचा **अहमदनगरशीं तंटा** बिघाड झाला. इ. स. १५०८ मध्यें अहमदनगरचा अहमद निजामशहा मरून त्याचा मुलगा बुऱ्हाण निजामशहा गादीवर बसला. अहमदशहाचा दिवाण **मुकम्मलखान** हाच कारभारी झाला. मुकम्मलखान हा दक्षिणी असल्यामुळें दक्षिणीपक्षाचें अर्थातच प्राबल्य झालें व तें परदेशी* फळीस सहन न होऊन त्यांनीं दक्षिणीफळीस उलथून पाडण्याचा कट केला; परंतु तो सिद्धीस न जातां उघडकीस

---

* पान १०५ पहा.

# भाग सहावा

## एलिचपूरचें इमादशाही घराणें.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें **फत्तेउल्ला** हा स्वतंत्र होऊन त्यानें **एलिचपुरास** स्वतंत्र राज्याची स्थापना केली. अर्वाचीन काळांत वऱ्हाडांत स्वतंत्र राज्य एवढेंच झालें. बाकीचे सर्व अमदानींत राजधानी वऱ्हाडचे बाहेर होती. तरीसुद्धां वऱ्हाडची प्राचीन पूर्वपरंपरा, त्याचा सुपीकपणा व त्यामुळें आलेलें स्वाभाविक महत्त्व यामुळें वऱ्हाडचा नेहमीं स्वतंत्र सुभा असे. त्यामुळें त्याचा स्वतंत्रपणा व त्याचें स्वयंपूर्ण एकरूप अद्याप कायम राहिलें आहे. फक्त विस्तार मात्र लहान झाला आहे.

**फत्तेउल्ला** हा स्वतंत्र झाला व त्याच सालीं मरण पावला. वास्तविक, अशा स्थितींत बंडाळी होऊन उदय व अस्त एकदमच व्हावयाचा; परंतु फत्तेउल्ला हा फार दिवस वऱ्हाडचा सुभेदार होता व त्याचें सर्व आयुष्य वऱ्हाडांत गेलें होतें. तो हुशार व कार्यकर्ता पुरुष असल्यामुळें त्याचे पाय वऱ्हाडांत चांगलेच रुतले होते. त्याचें वजन चांगलें होतें. वऱ्हाडच्या बाहेरसुद्धां त्याचें वजन बरेंच होतें म्हणून सर्वत्र शांतता राहून त्याचा मुलगा **अल्लाउद्दीन** हा शांतपणें गादीवर बसला.

**अलाउद्दीन इमादशहा १४८४-१५२८** अल्लाउद्दीन इमादशहा याची कारकीर्द फारच भानगडीची झाली. हा बादशहा पराक्रमी परंतु दुर्दैवी होता.

या वेळेस बहामनी घराण्याचा अवशेष **दुसरा महमदशहा** हा राज्यावर होता. हा अगदीं दुर्बळ असून

**अमीर बरीद प्रकरण** सर्व सत्ता अमीर बरीद याचे हातीं होती. (हाच पुढें बेदरचे बरीदशाही राज्याचा संस्थापक झाला). बरीदाचा त्रास व पगडा बादशहास अत्यंत झाल्यामुळें तो पळून अल्लाउद्दीनाकडे आला व त्यानें अल्लाउद्दीनास मदत मागितली. अल्लाउद्दीन सैन्यासह बरीदावर चाल करून गेला. एवढ्या थोड्या काळांत सुद्धां महमदशहास अल्लाउद्दीनासंबंधानें जो अनुभव आला तो बरीदाहून फारसा निराळा नव्हता. महमदशहास वाटूं लागलें कीं याचेपेक्षां बरीदच बरा. बरीद बेदराहून अल्लाउद्दीनाशीं सामना देण्याकरितां चालून आला व त्यांची लढाई सुरू होते न होते तोंच महमदशहा अल्लाउद्दीनाकडून निघून बरीदाकडे गेला. लढाईचें मूळच तिकडे गेल्यामुळें अल्लाउद्दीनास लढाई बंद करून परत वऱ्हाडांत यावें लागलें व बरीदाचा रोष मात्र त्याच्या पदरांत पडला. बरीदानें महमूदशहास मरेपर्यंत कैदेंत ठेवलें व आपण सर्व कारभार बळकावला. नांव मात्र बादशहाचेंच चालूं ठेवलें.

**अहमदनगरशीं तंटा** अल्लाउद्दीनाचें अमीरबरीदाशीं बिघडलें त्याचप्रमाणें अहमदनगरचे निजामशाही राज्याशींहि त्याचा बिघाड झाला. इ. स. १५०८ मध्यें अहमदनगरचा अहमद निजामशहा मरून त्याचा मुलगा बुऱ्हाण निजामशहा गादीवर बसला. अहमदशहाचा दिवाण **मुकम्मलखान** हाच कारभारी झाला. मुकम्मलखान हा दक्षिणी असल्यामुळें दक्षिणीपक्षाचें अर्थातच प्राबल्य झालें व तें परदेशी* फळीस सहन न होऊन त्यांनीं दक्षिणीफळीस उलथून पाडण्याचा कट केला; परंतु तो सिद्धीस न जातां उघडकीस

---

* पान १०५ पहा.

आल्यामुळें ते पळून अल्लाउद्दीनाकडे गेले. त्यांचेबरोबर त्यांचें लष्कर होतें. त्यांनीं अल्लाउद्दीनास भर दिली कीं, अहमदनगरचा कारभार विस्कळित झाला असून तें राज्य घेण्याची हीच संधि आहे. अल्लाउद्दीनास तें खरें वाटून व तो आपलें सैन्य व वरील फितुरी सैन्य बरोबर घेऊन अहमदनगरावर चाल करून गेला; परंतु नगरचें सैन्य तयार होतें. त्यानें अल्लाउद्दीनावर चाल करून त्याचा पुरा मोड केला व लांबवर त्याचा पाठलाग केला व वऱ्हाडांतील बराच मुलूख उध्वस्त केला. अल्लाउद्दीनानें खानदेशच्या आदिलशहास मध्यस्थी घालून नगरचें सैन्य मागें परतविलें.

**पाथरी प्रकरण**

अहमदनगरचे निजामशाही घराण्याचा मूळ पुरुष मलिक-हसन हा मूळचा पाथरी या गांवच्या वतनदार कुळकर्ण्याचा मुलगा होता. तो विजयानगरच्या लढाईच्या गर्दींत मुसलमानांच्या हातीं सांपडून बाटविला गेला. पुढें तो नांवारूपास चढून अहमदनगरच्या निजामशाही राज्याचा संस्थापक झाला. पाथरी हें गांव वऱ्हाडच्या राज्यांत मोडत होतें तें राज्य आपल्या राज्यांत असावें अशी साहजिकपणें निजामशाही राजांना इच्छा झाली व बुऱ्हाणशहातर्फे त्याचा दिवाण मुकम्मलखान यानें अल्लाउद्दीनास लिहिलें कीं पाथरी परगणा आम्हास द्या. त्याचे बदलीं आम्ही त्याचेपेक्षां मोठा व सरस परगणा तुम्हांस देतों. परंतु अल्लाउद्दीनानें हें ऐकिलें नाहीं व पुढील प्रसंग ओळखून एकदम स्वतः पाथरीकडे जाऊन गांवाची तटबंदी सुरू केली व परत एलिचपुरास आला. मुकम्मलखान यानें अल्लाउद्दीनाचा उद्देश ओळखून बादशहास हवापालट करण्याचें व वेरूळचीं लेणीं पहाण्याचें निमित्त करून एकदम सैन्यासह येऊन

पाथरी शहरावर कामिलखान नांवाच्या सरदारास बंदोबस्ताकरितां ठेवून परत नगरास गेला ( इ० स० १५१८ )

अल्लाउद्दीनाच्या पोटांत वरील शल्य राहिलें परंतु नगरचे सैन्याशीं लढाई करण्याची त्याची तयारी नव्हती. त्यानें बरेच दिवस वाट पाहिली. निजामशहाचें व विजापूरच्या आदिलशाही राजाचें वांकडें आलें हा संधि पाहून अल्लाउद्दीन अदीलशहास मिळाला व इ० स० १५२७ मध्यें दोन्ही लष्करांनीं मिळून पाथरी परगणा पुन्हां ताब्यांत घेतला. परंतु बुऱ्हाणशहानें शत्रूचा पक्ष प्रबळ झालेला पाहून बेदरच्या अमीर बरीदची मदत घेतली व पुन्हां पाथरी परगणा ताब्यांत घेतला व आपल्या मूळच्या घराण्यांतील तेथेंच कायम असलेल्या आपल्या ब्राह्मण वंशजांस देऊन टाकला. अद्याप त्यांचे वंशज सदरहु परगण्याचा वतनदारीचा उपभोग घेत आहेत. हल्लीं पाथरी गांव वऱ्हाडचें सरहद्दीवर निजामसरकारचे हद्दींत आहे.

**माहूरप्रकरण**

वऱ्हाडचा दुसरा पोटसुभा माहूर येथील सुभेदार खुदावंतखान हाहि सर्व सुभेदारांचें उदाहरण पाहून स्वतंत्र झाला होता. बहामनी राज्यांत अमीर बरीद हाच कारभारी होता व तोहि स्वतंत्र होण्याच्या तयारींतच होता. परंतु स्वतंत्र होण्यापूर्वीं अगदीं रोडावलेल्या बहामनी राज्यास कांहींतरी जास्त मुलूख मिळवून नंतर स्वतंत्र व्हावें अशी त्याची इच्छा होती. कारण एकदां स्वतंत्र झाल्यावर थोडीतरी गडबड उडणारच व मिळविलें तेंच कायम ठेवतांना पुरेवाट होईल मग नवीन प्रदेश जिंकण्याचें दूरच. त्यापेक्षां बहामनी राज्याच्या नांवाखालींच त्याच्या गळालेल्या तुकड्यापैकीं एखादा परत मिळविण्याच्या तो खटपटींत होता.

वरपंगीं त्यास आपला प्रयत्न स्तुत्य व रास्त असाच दाखवितां येत होता. बाकीचीं सर्व राज्यें आपल्या आटोक्याच्या बाहेर आहेत हें पाहून बरीदानें सर्वांत दुर्बळ म्हणजे माहुरचें राज्य घेण्याचा घाट घातला. कारण खुदावंतखान हा कोणाच्याहि भानगडींत नसल्यामुळें त्याचा कोणाशींच सहाय्यकारी तह नव्हता. बरीदानें सैन्यासह माहुरावर स्वारी केली. खुदावंतखान माहुरच्या डोंगरी किल्ल्याचा आश्रय धरून राहिला व त्यानें बरेच दिवस टिकाव धरला परंतु अखेर किल्ला सर झाला. बरीदानें खुदावंतखान यास ठार मारिलें.

इकडे अल्लाउद्दीन इमादशहास बरीदाचा सूड घ्यावयाचाच होता. त्यानें माहुरावर स्वारी केली. बरीदानें पाहिलें कीं, आतां आपणास हें राज्य पचत नाहीं तेव्हां खुदावंतखानाचे मुलास राज्य परत देऊन तो निघून गेला अल्लाउद्दीनाचा बरीदास गांठण्याचा हेतू तडीस गेला नाहीं तरी त्यानें खुदावंतखानाचे मुलास गादीवरून काढून माहूरचें राज्य परत वऱ्हाडास जोडून तो परत गावेलास आला. इकडे खुदावंतखानाच्या मुलानें अहमदनगरची मदत मागितली. निजामशहानें सैन्य पाठवून अल्लाउद्दीनाच्या शिबंदीचा मोड करून खुदावंतखानाचे मुलाचे ताब्यांत राज्य परत दिलें. अल्लाउद्दीन यापुढें फारच वृद्ध व दुर्बळ झाला होता परंतु निजामशहाचें ताब्यांतून पाथरी परत घेण्याचा नाद त्यानें सोडला नाहीं. दक्षिणेंत कांहीं जमत नाहीं असें पाहून गुजराथच्या महमदशहाची त्यानें मदत मागितली. महमदशहा मोठें लष्कर घेऊन वऱ्हाडांत आला व वऱ्हाडचा सुपीक व समृद्ध प्रदेश पाहतांच त्याचे तोंडास पाणी सुटलें. त्यानें नगरचे राज्याचा पराभव केला परंतु परत जाण्याचा त्याचा बेत दिसेना शेवटीं निजामशहास व अल्ला-

उद्दीनासहि या नवीन तिऱ्हाईत बलाढ्य पाहुण्याची धास्ती पडली तेव्हां त्यांनीं आपसांत समेट करून व नांवापुरतें महमदशहाचें सार्वभौमत्व कबूल करून कांहीं खंडणी वगैरे देऊन त्याची रवानगी केली.

वृद्ध अल्लाउद्दीनाचें दुर्भाग्य एवढ्यानेंच संपलें नाहीं. गोंवळकोंड्याचा सुलतान कुतुबशहा यानें आपल्या तेलंगणांतील मुलखाचा कांहीं भाग वऱ्हाडांत गेला आहे. असें निमित्त करून स्वारी करून आग्नेयेकडील बराच भाग बळकाविला.

इ० स० १५२० मध्यें अल्लाउद्दीन मरण पावला. त्याचे-नंतर त्याचा पुत्र देरिया हा गादीवर बसला.

देरिया बुराणशहा.

देरीयाचे नांवावरून दर्यापूर, दर्याबाद वगैरे गांवांचीं नांवें पडलीं आहेत. यावेळेस उत्तर हिंदुस्थानाचा व दक्षिण हिंदुस्थानाचा फारच कमी संबंध येत असे. उत्तरेस मोंगल राज्याचा समुद्रासारखा विस्तार असून दिल्लीचे बादशहास तोच प्रदेश सांभाळतां सांभाळतां पुरेवाट होत असे. रजपुतासारखीं अवशेष हिंदु राज्यें अद्याप कायम असून त्यांचेवर नेहमीं नजर ठेवावी लागत असे. त्याचप्रमाणें गुजराथ, माळवा, बंगाल, पंजाब, वगैरे प्रांतांवरील मुसलमान सुभेदार सुद्धां प्रसंग सांपडेल तसें नेहमीं स्वतंत्र होण्यास तयार असत, त्यामुळें अकबरासारख्या शूर बादशहास सुद्धां दक्षिणेंतील राज्यकारस्थांनांत पडतां येत नसे.

परंतु दक्षिणेंत त्याच्या विस्ताराच्या मानानें त्यावेळीं फारच खळबळ असे व त्या सर्वांचें केंद्रस्थान हल्लींच्या निजामच्या मुलखाच्या उत्तरार्धांत असे. अहमदनगर, विजापूर, वऱ्हाड, गोंवळकोंडे व बेदर हीं पांच मुसलमानी राज्यें व विजयानगरचें प्रबळ हिंदु राज्य यांच्यामध्यें नेहमीं तंटे बखेडे चालू असत.

हीं सर्व राज्यें लहान लहान असून जवळ जवळ असत. त्यांना नैसर्गिक स्थलमर्यादा नसल्यामुळें ज्याचा जसा जोर चालेल तसा ते आपल्या शेजाऱ्याचा मुलूख बळकावीत असत. पांची मुसलमान राजे स्वतः चोरच असल्यामुळें नैतिक पाठबळ कोणासच नव्हतें. यामुळें त्यांच्यामध्यें नेहमीं तंटे, लढाया चालू असत. जशी वेळ येईल व प्रत्येकाच्या त्यावेळच्या स्वार्थाची वेळ जशी बदलेल तसतसे मित्रांचे अथवा शत्रूंचे संघ बनत असत. विजयानगरचें हिंदु राज्य यापैकीं कोणा एका पक्षाकडून असे व त्याची मदत फार महत्वाची मानली जात असे.

देरियाच्या कारकीर्दीच्या आरंभाचीं कांहीं वर्षें शांततेंत गेलीं परंतु पुढें अहमदनगर व विजापूर या दोन राज्यांत लढाई सुरू झाली. अर्थात नेहमींप्रमाणें दक्षिणेंतील सर्व राज्यें या लढाईच्या चक्रांत सांपडलीं त्याबरोबर वऱ्हाडचें राज्यही सांपडलें. या लढाईच्या गडबडींतच देरिया मरण पावला. व बुऱ्हाण गादीवर बसला तो वरील लढायांत सामील झाला. त्याचे मागें तुफालखान नांवाचा अमीर कारभार करीत होता. बुऱ्हाणशहा वरील लढाईतून परत आला असतां तुफालखान यानें त्यास कैद करून नरनाळा किल्ल्यांत कोंडून ठेविलें व आपण गादीवर बसला.

या सुमारास दक्षिणेंतील सर्व मुसलमान बादशहा विजयानगरच्या हिंदुराजाच्या विरुद्ध झाले होते व सर्व मुसलमान राजांनीं मिळून हें प्रबळ हिंदु राज्य बुडवावें असा त्यांनीं कट केला होता. या कटांत सामील होण्यास तुफालखानास वरील राजांनीं बोलावलें परंतु तुफालखानाचे पाय वऱ्हाडांत अद्याप पक्के झाले नव्हते आपण बाहेर गेल्यास बुऱ्हाणास कोणी तरी सोडवून गादीवर बसवितील व आपलें राज्य जाईल ही त्यास भीति होती म्हणून तो या मुसलमान संघांत सामील झाला नाहीं.

तुफानखान सामील न झाल्यामुळें दक्षिणेतील सर्व मुसलमान राजे त्यावर बदलले. तालीकोटची लढाई होऊन विजयानगरचे राज्य बुडविल्यानंतर अहमदनगर व विजापूर या दोन राजांनीं वऱ्हाडावर स्वारी केली अहमदनगरच्या राजानें वऱ्हाड व बेदर घ्यावें असें ठरलें व विजापूरकरानें विजयानगरचें पाडाव झालेलें सर्व राज्य काबीज करावें अशी वांटणी ठरली.

अहमदनगर व विजापुरकरांनीं वऱ्हाडावर स्वारी केली. पहिल्या स्वारींत तुफालखानानें विजापुरकरांस पुष्कळ द्रव्य देऊन त्याचे मार्फत मुर्तिजा निजामशहाची समजूत करून पावसाळा नजीक आल्यामुळें वरील दोन्ही लष्करें परत गेलीं. इ. स. १७९२ मध्यें पुन्हां मुर्तिजानिजामशहानें पाथरी येथें तळ देऊन तुफालखानास निरोप पाठविला कीं, बुऱ्हाण इमादशहास सोडून देऊन गादीवर बसवावें व तुफलखानानें निघून जावें. हें निव्वळ कुरापतीस निमित्त आहे हें तुफालखानानें ओळखलें व आपला शूर मुलगा समशेर उल-मुल्क-यास लष्कर देऊन त्यानें मुर्तिजावर पाठविलें. दोन्ही सैन्याची जंगी लढाई झालीं. प्रथम वऱ्हाडचे सैन्याचा जय झाला परंतु अहमदनगरचे सैन्यास कुमक मिळाल्यामुळें त्यांचा जय झाला व वऱ्हाडचें सैन्य एलिचपुरास परत आलें. वऱ्हाडचे सैन्यांतील सुमारें ३०० हत्ती शत्रूंच्या हातीं सांपडले. ही मोठी लढाई कोणत्या गांवीं झाली हें नक्की माहित नाहीं ( १९७२ ).

तुफालखान सहा महिनेपर्यंत जंगलांतून पळत होता. तो एकदां एका खिंडींत सांपडला. परंतु मुर्तिजाच्या वेडेपणामुळें त्यास उशीर झाल्यामुळें तो निसटला. मुर्तिजा या खिंडीकडे त्वरेनें येत असतां त्यास मीरमूसा नांवाचा फकीर भेटला व त्यानें

मुर्तिजास अडवून त्याक्षणीं १२००० होन मागितले व मुसलमान धर्मातील १२ इमामांची शपथ घातली. मुर्तिजाचा शूर व चतुर प्रधान चंगीसखान यानें मुर्तिजास पुष्कळ समजावून सांगितलें कीं, तळावर गेल्यानंतर फकीरास सदरहु रकम देऊं. आतांची वेळ आणीबाणीची आहे. परंतु मुर्तिजा तेथून हलेना. तितकें द्रव्य आणून देईपावेतों तुफालखान निसटुन गेला. कदाचित् तुफालखानानेंहि वेळ मिळण्याकरितां ही युक्ति योजिली असेल.

मुर्तिजाशहाच्या नांवावरून मुर्तिजापुर या गांवाचे नांव पडलें आहे. ऽ त्यावरून त्या गांवचें जवळपास ही लढाई कोठें तरी झाली असावी. मुर्तिजा शहानें फार पद्धतशीर रीतीनें या विजयाचा फायदा घेतला. तो तुफलखानाच्या मागें न लागतां एकेजागीं तळ देऊन राहिला. व वऱ्हाडांतील सर्व देशमुख व देशपांडे त्यानें सन्मानानें बोलावून सांगितलें कीं तुम्हांस आमचे पासून कांहीं त्रास होणार नाहीं. तुमचीं वतनें वगैरे सर्व पूर्ववत कायम *राहतील व तुफलखानापेक्षां फार चांगलें तऱ्हेनें वागविण्यांत येईल. तुफालखानासंबंधानें कोणाचेंच मनांत प्रेम नव्हतें. त्यावर वरप्रमाणें अभिवचन मिळाल्यावर सर्वच वतनदार लोक निजाम-

---

ऽ मूर्तिजा नांवाच्या एका नायब अधिकाऱ्यांच्या नांवावरुन हें नांव पडलें असाहि तर्क आहे.

* मूर्तिजा निजामशहा हा त्यावेळेस "दिवाणा" म्हणजे वेडा या नांवानें संबोधला जात असे व त्या वेळच्या इतिहासांत त्यास हेंच विशेषण मिळालें होतें. तो फार स्वच्छंदी व नादिष्ट होता यावरून त्यास हें नांव पडलें होतें. अखेरी अखेरीस तर तो जवळ जवळ वेडाच झाला होता. त्याच्या मूर्खपणाच्या व वेडेपणाच्या पुष्कळ गोष्टी नमुद आहेत. ( फेरिस्ता भाग २ पान २५० ).

शहास अनुकूल झाले. यानंतर मूर्तिजानें एलिचपुरावर चाल केली. तुफालखान व त्याचा मुलगा समशेर उल-मुल्क मेळघाटांतून बऱ्हाणपुरास पळून गेले. खानदेशचा राजा महमदशहा यास मूर्तिजाशहानें जासूद पाठवून तुफलखानास तुम्ही आश्रय दिल्यास आम्ही तुमचवर स्वारी करूं असा धाक घातल्यामुळें तुफालखानास व त्याचे मुलास परत यावें लागलें. तुफालखान नरनाळा किल्ल्यांत येऊन राहिला व त्याचा मुलगा गाविलगड किल्ल्यांत राहिला. तुफालखानानें अकबर बादशहास मदत मागून कळविलें कीं, मी तुमचा ताबेदार आहें व तुमचा नौकर म्हणूनच पुढें वऱ्हाडचें राज्य चालवीन. अकबरानें याचा फायदा घेऊन निजामशहास पत्र लिहिलें; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. निजामशहानें दोन्ही किल्ल्यांस वेढा देऊन नरनाळा सर करून तुफालखान व बुऱ्हाण इमादशहा व त्यांचे सर्व नातलग यांस कैद केलें समशेर उलमुल्क हाहि जीवदान देण्याचें वचन घेऊन शरण आला. ह्या सर्वांस कैद करून नेऊन निजामशहानें एका किल्ल्यांत कोंडलें व तेथेंच या सर्व ४० लोकांचा अंत झाला. तो कोणत्या तऱ्हेनें झाला याबद्दल निरनिराळे प्रवाद आहेत.

याप्रमाणें इ०स० १५७२ मध्यें वऱ्हाडचे पहिल्या व शेवटच्या स्वतंत्र राज्याचा अंत झाला व वऱ्हाड अहमदनगरच्या निजामशाही राज्यांत सामील झालें.

इमादशाही कारकीर्दींत शांतता जरी विशेष नव्हती तरी देशांत राज्य असल्यामुळें पुष्कळ तऱ्हेनें देशाची प्रगति झाली. कलाकौशल्यास उत्तेजन मिळालें. एलिचपूरच्या आसपास सोलापूर अंजनगांव वगैरे ठिकाणीं. रेशमी व सुती कापडाचे कारखाने तेव्हांपासूनच आहेत. एलिचपूरचे नबाबांचे कारकीर्दींत त्यांची

आणखी वाढ झाली. लहानमोठे किल्ले याच कारकीर्दींत बांधले गेले. भैरवगड, भवरगड, मेळघाट, वगैरे लहानसहान डोंगरी किल्ले व जामोदसारखे दुसरे किल्ले त्याचप्रमाणें खुद्द एलिचपूरचा किल्ला हे याच कारकीर्दींतील आहेत. एलिचपूरच्या या किल्ल्याचा मुख्य भाग व कांहीं बुरूज अद्याप आहेत. एलिचपूरचा नबाब इस्माइलखान यानें शहराभोंवतीं मोठा तट व वेशी बांधल्यामुळें या किल्ल्याचें महत्त्व कमी झालें. परंतु बरींच वर्षेंपर्यंत कैदखाना म्हणून त्याचा उपयोग होत होता.

सुलतान इमादुल्मुल्क याचा भव्य इदगा व एलिचपूर येथील हौजकटोरा नामक जलविहाराचें स्थान याच कारकीर्दींत बांधलें गेलें. सदरहू इमारती अजून आहेत.

याहि वेळेस वऱ्हाडचा विस्तार हल्लींच्या मानानें पुष्कळच मोठा होता.

---

# भाग सातवा.

## निजामशाही व मोंगल कारकीर्द

नेहमींच्या रीतीप्रमाणें निजामशाही अमलाखालीं वऱ्हाड गेल्यानंतर वऱ्हाडांतील जुन्या सरदारांनीं बंड करून देरिया इमादशहाचा मुलगा म्हणून एक तोतया उभा केला व स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. खानदेशच्या राजानेंहि १०।१२ हजार लष्कर वऱ्हाडांत त्यांच्या मदतीस पाठविलें. परंतु अहमदनगरचें लष्कर येऊन सदरहू बंड मोडलें यानंतर वऱ्हाडांत स्वस्थता राहिली. स्वतः मुर्तिजा रोहिणखेडच्या घाटानें उतरून बऱ्हाणपुरापर्यंत जाऊन त्यानें खानदेश उध्वस्त केला.

मुर्तिजा निजामशहानंतर त्याचा मुलगा मीरनहुसेन व त्याच्यानंतर त्याचा पुतण्या इस्मायल या गादीवर बसला. इस्मायलचे कारकीर्दींत अकबरानें वऱ्हाडावर स्वारी केली. तुफालखानाचे वेळेस अकबरानें मुर्तिजानिजामशहास पत्र लिहून वऱ्हाडचे व तुफालखानाचे वाटेस न जाण्याबद्दल लिहिलें होतें. परंतु मुर्तिजानें तें जुमानलें नाहीं. यापुढें अकबरास दक्षिणेकडे लक्ष घालण्यास फावलें नाहीं. तरी सदरहू गोष्ट तो विसरला नव्हता. मुर्तिजाचे कारकीर्दीचे अखेरीस अहमदनगरचे राज्यांत बरीच गडबड झाली होती. सलाबतखान नांवाच्या मनुष्यानें सर्व सत्ता बळकाविली होती. यापूर्वीं म्हणजे इ. स. १५७८ मध्यें मुर्तिजाशहानें वऱ्हाडचे सुभेदार सय्यद मुर्तिजा* सबजेवारी यास सर्व वऱ्हाडचे

---

* एका पक्षाचे मताप्रमाणें या सुभेदाराच्या नांवावरून मुर्तिजापुर या गांवाचें नांव पडलें.

आणखी वाढ झाली. लहानमोठे किल्ले याच कारकीर्दींत बांधले गेले. भैरवगड, भवरगड, मेळघाट, वगैरे लहानसहान डोंगरी किल्ले व जामोदसारखे दुसरे किल्ले त्याचप्रमाणें खुद्द एलिचपूरचा किल्ला हे याच कारकीर्दींतील आहेत. एलिचपूरच्या या किल्ल्यांचा मुख्य भाग व कांहीं बुरूज अद्याप आहेत. एलिचपूरचा नबाब इस्माइल-खान यानें शहराभोंवतीं मोठा तट व वेशी बांधल्यामुळें या किल्ल्या-चें महत्त्व कमी झालें. परंतु बरींच वर्षेंपर्यंत कैदखाना म्हणून त्याचा उपयोग होत होता.

सुलतान इमादुल्मुल्क याचा भव्य इदगा व एलिचपूर येथील हौजकटोरा नामक जलविहाराचें स्थान याच कारकीर्दींत बांधलें गेलें. सदरहू इमारती अजून आहेत.

याहि वेळेस वऱ्हाडचा विस्तार हल्लींच्या मानानें पुष्कळच मोठा होता.

## भाग सातवा.

### निजामशाही व मोंगल कारकीर्द

नेहमींच्या रीतीप्रमाणें निजामशाही अमलाखालीं वऱ्हाड गेल्यानंतर वऱ्हाडांतील जुन्या सरदारांनीं बंड करून देरिया इमादशहाचा मुलगा म्हणून एक तोतया उभा केला व स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. खानदेशच्या राजानेंहि १०।१२ हजार लष्कर वऱ्हाडांत त्यांच्या मदतीस पाठविलें. परंतु अहमदनगरचें लष्कर येऊन सदरहू बंड मोडलें यानंतर वऱ्हाडांत स्वस्थता राहिली. स्वतः मुर्तिजा रोहिणखेडच्या घाटानें उतरून बऱ्हाणपुरापर्यंत जाऊन त्यानें खानदेश उध्वस्त केला.

मुर्तिजा निजामशहानंतर त्याचा मुलगा मीरनहुसेन व त्याच्यानंतर त्याचा पुतण्या इस्मायल या गादीवर बसला. इस्मायलचे कारकीर्दींत अकबरानें वऱ्हाडावर स्वारी केली. तुफालखानाचे वेळेस अकबरानें मुर्तिजानिजामशहास पत्र लिहून वऱ्हाडचे व तुफालखानाचे वाटेस न जाण्याबद्दल लिहिलें होतें. परंतु मुर्तिजानें तें जुमानलें नाहीं. यापुढें अकबरास दक्षिणेकडे लक्ष घालण्यास फावलें नाहीं. तरी सदरहू गोष्ट तो विसरला नव्हता. मुर्तिजाचे कारकीर्दीचे अखेरीस अहमदनगरचे राज्यांत बरीच गडबड झाली होती. सलाबतखान नांवाच्या मनुष्यानें सर्व सत्ता बळकाविली होती. यापूर्वीं म्हणजे इ. स. १५७८ मध्यें मुर्तिजाशहानें वऱ्हाडचे सुभेदार सय्यद मुर्तिजा* सबजेवारी यास सर्व वऱ्हाडचे

* एका पक्षाचे मताप्रमाणें या सुभेदाराच्या नांवावरून मुर्तिजापुर या गांवाचें नांव पडलें.

लष्कराची पाहणी करण्याकरितां राजधानीस बोलाविलें होतें. त्याप्रमाणें तो तेथें गेला असतां सलाबतखानानें त्याचा अपमान केल्यामुळें तेथेंच नगरचें व वऱ्हाडचे सैन्याची लढाई झाली. अकबर वऱ्हाडावर स्वारी करणार या करितां वऱ्हाडचे उत्तर सरहद्दीचा चांगला बंदोबस्त करण्याचा सुभेदारास हुकूम झाला होता. त्याप्रमाणें सय्यद मुर्तिजा सबजेवारी यानें गाविलगड किल्ला पुष्कळ पैसे खर्च करून दुरुस्त केला. त्यावेळीं गाविलगडचा किल्लेदार बाहिरामखान नांवाचा होता. त्याचेमार्फत वरील दुरुस्तीचें काम झालें. त्यानें एका बुरजावर आपलें नांव खोदलें आहे तें अद्याप कायम आहे. त्याचा हिजरी सन ९८९ लिहिला आहे. ( इसवी १५७७ ) सलाबतखानाचें व वऱ्हाडचा सुभेदार सय्यद मुर्तिजासबजेवारी याचें याप्रमाणें वांकडें येऊन सय्यदानें वऱ्हाडचें लष्कर घेऊन अहमदनगरावर स्वारी केली; परंतु सलाबतखानानें त्याचा पराभव करून त्याचा पाठलाग केला. हल्लींच्या बुलडाणें जिल्ह्यांतून सय्यद पळत पळत अकबरबादशहाकडे गेला. मुर्तिजा निजामशहाचा भाऊ बुऱ्हाणशाहि तेथेंच आश्रय घेऊन पूर्वींच राहिला होता. अकबरानें आपला सरदार मीर अजीमखान ऊर्फ खान आजम हा माळव्याचा सुभेदार होता त्यास अहमदनगरावर स्वारी करून वऱ्हाड घेण्यास हुकूम केला- त्याप्रमाणें त्यानें वऱ्हाडावर स्वारी केली व एलिचपूर व बाळापूर घेतलें; परंतु त्याचा विशेष परिणाम झाला नाहीं. ( इ० स० १५९४ ) व त्यास परत माळव्यास जावें लागलें.

मुर्तिजा निजामशहा मेल्यावर राज्यांत फारच गडबड झाली. मुर्तिजा यास त्याचा पुत्र मीरन हुसेन यानें ठार मारून तो गादीवर बसला. तोहि ९-१० महिन्यांतच ठार झाला व बाकीचे सरदारांनीं मुर्तिजाचा पुतण्या अल्पवयी इस्मायल म्हणजे बुऱ्हाणचा

पुत्र यास गादीवर बसविलें व वऱ्हाडचा सुभेदार जमालखान नांवाचा होता तो कारभार पाहूं लागला. अकबरास ही संधि योग्य वाटली.+

अकबरानें कुरापत काढली कीं, बुऱ्हाण हा त्याचे मुलांपेक्षां जवळचा अधिकारी आहे त्यास गादीवर बसवावें. अकबराचा फायदा हा होता कीं, बुऱ्हाण अकबराचे आश्रयास असल्यामुळें तो गादीवर बसल्यास अकबराचें सार्वभौमत्व अनायासेंच कबूल करील व अहमदनगरचें राज्य अनायासेंच ताब्यांत येईल.

जमालखान हा मेहेदवी पंथाचा मुसलमान होता व त्या पंथाचा प्रचार तो सर्व राज्यांत करूं लागला. त्यामुळें दक्षिणेचे सर्व अमीरउमराव त्याच्या विरुद्ध होते. कारण ते सुन्नी पंथाचे होते. अकबराचा डाव बुऱ्हाण याचे लक्षांत आला व अकबराचें लष्कर घेऊन राज्य कमावून अकबराचा मांडलिक होण्याचें त्यानें साफ नाकारलें. शेवटीं अकबरानें त्यास एक जहागीर दिली व खानदेशाचे राजास पत्र दिलें व बुऱ्हाण याचबरोबर थोडेंसें सैन्य देऊन त्यास दक्षिणेंत पाठविलें. त्यानें वऱ्हाडावरच पहिली मोहीम केली. परंतु त्याचा पराभव होऊन त्यास बऱ्हाणपुरापर्यंत हटावें लागलें नंतर त्यानें खानदेशचा राजा अलीखान याची मदत घेतली व विजापुरच्या आदिलशाही राजासहि नगरावर स्वारी करण्याची फूस दिली. त्याप्रमणें त्यांनहि दक्षिणेकडून उचल केली. वऱ्हाडांतील सर्व सरदार एक होऊन त्यानीं सलाबतखान नांवाचा शूर सरदार खेरला

---

+ प्रसिद्ध इतिहासकार महमद कासीम ऊर्फ फेरिस्ता हा मूर्तिजा निजामशहापासून या राज्यांत हुद्यावर होता व या सुमारास जमालखानाचे गडबडींत तो विजापुरकराकडे गेला. या वेळच्या सर्व हकीकती त्यानें प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत.

किल्ल्यांत बंदिवान होता त्यास सोडविलें व सर्वजण बुऱ्हाण यास मिळाले.

जमालखान यानें धाराशिव येथें विजापूरच्या सैन्याचा पराभव केला. तितक्यांत त्यास बातमी समजली कीं वऱ्हाडचे सर्व सरदार बुऱ्हाण यास मिळून त्यांनीं वऱ्हाडावर स्वारी केलीं. तो तसाच आपलें थकलेलें सैन्य घेऊन वऱ्हाडांत शिरला. विजापूरचें सैन्य पराभूत झालें होतें; परंतु त्याचा पुरा मोड झाला नव्हता. त्यानें जमालखानाचे लष्करास बराच त्रास दिला. विजापूरच्या पदरच्या मराठे सरदारांनीं तर वऱ्हाडांत येऊनहि त्याची रसद अडवून वारंवार त्याचे बाजूवर व पिछाडीवर हल्ले केले. बुऱ्हाणचें लष्कर जवळ येत चाललें. जमालखानाचें लष्कर त्यास सोडून हळूहळू बुऱ्हाणकडे जाऊन मिळालें.

लष्करी दृष्टीनें प्रथम जाऊन जास्त माऱ्याची सोईची जागा प्रथम पटकावणें वरील अडचणीमुळें जमालखानास साधलें नाहीं. बुलडाण्याजवळ देऊळघाटांत या भागाची घाटवेस आहे. ती वास्तविक अडवितां आली असती तरच जमालखानाच्या थकलेल्या व कमजोर सैन्यास कांहीं टिकाव धरतां आला असता. परंतु जमालखानास इतक्या त्वरेनें कूच करतां येईना. जमालखान येण्यापूर्वीच रोहिणखेडचा व राजूरचा घाट चढून व देऊळघाटची वेस ओलांडून बुऱ्हाण घाटावरील सपाटीवर आला व जमालखानाची वाट पहात तळ देऊन व चांगली सोईची जागा पाहून ती अडवून बसला.

जमालखानाचें सैन्य कमजोर व थकलेलें असल्यामुळें समोरून हल्ला करण्याचा विचार त्यानें सोडून दिला व पाठीमागून येऊन पिछाडीवर अगर बगलेवर हल्ला करण्याचा त्यानें आत्म-

घानकी बेत केला व मोठ्या अडचणीच्या व कठीण मार्गानें मोठें चक्कर घेऊन तो निराळ्याच मार्गानें रोहिणखेडच्या घाटाखालीं उतरून त्यानें तळ दिला. सदरहू रस्त्यानें पाणी मुळींच नव्हतें. दिवस कडक उन्हाळ्याचे. अशा स्थितींत तो जेथें तळ देऊन राहिला तेंहि ठिकाण निर्जल व गैरसोईचें मिळालें; त्यानें सर्व सैन्य कंटाळून गेलें. इतक्यांत त्याचे जासूदांनीं बातमी दिली कीं, येथून ३—४ कोसांवर सुंदर पाण्याचें ठिकाण आहे. अर्थात् तेथें गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. जमालखानानें सर्व तळ तेथें नेला. " बुडत्याचा पाय खोलांत " त्याप्रमाणें वरील गोष्ट झाली. मागें सांगितल्याप्रमाणें शत्रूस भुलवून तळ देण्याची ही जागा होती. याचे वरचे बाजूस माऱ्याची जागा होती. बुऱ्हाण हा पत्त्यावरच होता. त्यानें जमालखान येण्याचे पूर्वींच वरील माऱ्याची जागा धरून घेतली व खालीं जमालखानाचा तळ पडला. तळाची जागा बदलण्यापेक्षां व पुन्हां पाण्याचा शोध करण्यापेक्षां एकदां पाणी वगैरे पिऊन ताजे तवाने होऊन लढाई करण्याचा जमालखानानें निश्चय केला व त्याचें लष्कर मोठ्या निकरानें बुऱ्हाणच्या लष्करावर तुटून पडलें. व त्यास जय मिळणार इतक्यांत एक गोळी लागून जमालखान पडला व हिंदुस्थानांतील लढाईच्या रीतीप्रमाणें दुसरा नायक न मिळाल्यामुळें सर्व लष्कर सैरावैरा पळत सुटलें. इस्मायल बादशहा फौजेंतच होता. त्यास बुऱ्हाण यानें पकडून कैदेंत ठेवलें व आपण नगरास जाऊन गादीवर बसला.

रोहिणखड येथें एक सुंदर मशीद बांधली आहे ती यांच सुमाराची आहे. जमालखानाचा एक मेहेदवी सरदार खुदावंदखान नांवाचा वऱ्हाडांत होता. त्यानें १९८१ मध्यें फत्तेखर्डा (त्यावेळीं साकरखेरडा) येथें तशीच एक सुंदर मशीद बांधली. फत्ते-

खेर्डा येथील मशिदीस इनाम वगैरे असून ती फारच चांगल्या स्थितींत आहे; परंतु रोहिणखेड येथील मशीद नादुरुस्त आहे. दोन्ही मशिदीवर फारशी भाषेंत लेख आहेत.

बुऱ्हाणनिजामशहानंतर त्या राज्यांत फारच गडबड उडाली. त्याचेनंतर त्याचा मुलगा इब्राहिम हा गादीवर बसला. व तीन चार वर्षांनीं तो मरण पावला. त्याचेनंतर अहमदशहा हा गादीवर बसला. त्याचे कारकीर्दींत गादीचे वारसाबद्दल तंटे व बंडाळी होऊन दोन कारभाऱ्यांमध्यें सत्तेकरितां तंटे लागले. त्यापैकीं इब्राहिम याचे पक्षाचा एक मीयनमंजू म्हणून होता. त्याचा पक्ष कमजोर झाल्यामुळें त्यानें अकबराचा पुत्र मुराद हा गुजराथेंत होता त्यास मदत मागितली व अहमदनगरचें राज्य मिळवून देतों अशी लालूच दाखविली. अकबराचा डोळा निजामशाही राज्यावर फार दिवसापासून होता. व त्यानें त्याकरितां आजपर्यंत पुष्कळ प्रयत्न केले होते. व संधि आल्यास ती वांया न जाऊं देण्याबद्दल त्यानें सर्व हस्तकांस सांगून ठेवलें होतें.

इ. स. १५९५ चे सप्टेंबर महिन्यांत मुराद हा तीस हजार मोंगल व रजपूत लष्कर घेऊन व मदतीस खानदेशाचा राजा अलीखान व अकबराचा सरदार खानखानान यांस घेऊन अहमदनगरावर आला. इतक्यांत मियनमंजू याचे पक्षाची सरशी झाल्यामुळें त्याचे हातीं पुन्हां सत्ता आली होती म्हणून तो मुराद यास न मिळतां किल्ल्याचा बंदोबस्त करून राहिला व बादशहाची आत प्रसिद्ध चांदबिबी हिचे स्वाधीन किल्ला करून देऊन आपण अहमदशहा यास बरोबर घेऊन विजापूर व गोवळकोंडें येथील राजांची मदत मागण्याकरितां स्वतः गेला. इकडे मुराद यानें किल्ल्यास वेढा दिला. चांदबिबीनें फार शौर्यानें किल्ला लढ-

विला ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. अखेर दोन्ही पक्ष आपल्या मनांत भिऊं लागले. विजापूर व गोवळकोंडें येथील कुमक जवळ येत चालली व मोंगल लष्करास रसदेची पंचाईत पडूं लागली. इकडे किल्ल्यास दोन तीन सुरुंग लागले होते. दोस्त लष्करांचा उपयोग अखेर काय होईल हीहि पक्की खात्री नव्हती. शेवटीं मुराद यानें वऱ्हाड मिळाल्यास वेढा उठवून परत जाण्याचें कबूल केलें व तशा प्रकारची मागणी चांदबिबीस केली. चांदबिबीनेंहि दूरचा विचार करून ती गोष्ट कबूल केली व वऱ्हाड मोंगलास दिल्याबद्दल कागदपत्र करून दिले. मुराद यानें वेढा उठवून तो वऱ्हाडचे मुलखाचा ताबा घेण्याकरितां दौलताबादेहून जयपूर-कोथळीचे घाटानें उतरून उत्तरवऱ्हाडांत आला. मुराद गेल्या-नंतर तीन दिवसांनीं किल्ल्यास कुमक येऊन पोहोंचली.

मुराद व खानखानान हे वऱ्हाडांत आले व सर्व मुलखा-वर त्यांनीं अंमल बसविला. मुराद हा बाळापुरास येऊन राहिला व त्या शहराजवळच शहापूर नांवाचें सुंदर शहर वसवून ती आपली रहाण्याची जागा केली. तेथें उत्तम राजवाडा बांधून खान-देशच्या राजाच्या मुलीशीं समारंभानें लग्न केलें. निजामशाही सैन्यानें वऱ्हाड परत घेण्याकरितां कांहीं गडबड करूं नये म्हणून मुराद यानें खानखानान यास जालना येथें तळ देऊन ठेविलें.

इकडे अहमदनगरास दोस्त राष्ट्रांचें लष्कर आल्यावर वऱ्हाड मोंगलांस दिल्याबद्दल सर्वांस वाईट वाटलें व जो तो चांद-बिबीस दोष देऊं लागला; परंतु मोंगलांनीं वऱ्हाडचा ताबा सुद्धां केला होता त्यामुळें इलाज राहिला नव्हता. चांदबिबीचा अधि-कार कमी होऊन महमदखान नांवाच्या मनुष्याच्या हातीं सर्व कारभार गेला. चांदबिबीनें आपला पुतण्या विजापूरचा इब्राहिम

आदिलशहा यास मदतीस बोलाविलें व त्यानें सोहेलखान नांवाच्या सरदाराबरोबर लष्कर देऊन चांदबिबीच्या हाताखालीं पाठविलें.

यामुळें महमदखान घाबरून त्यानें खानानखान याची मदत मागितली व सर्व निजामशाही राज्य मिळवून देण्याची हमी घेतली; परंतु चांदबिबीचा पक्ष प्रबळ होऊन तिनें महमदखान यास कैद केलें. त्यामुळें चांदबिबीचा पक्ष फारच मजबूत झाला.

वरील मजबुतीमुळें व वऱ्हाडांत पुरा अंमल अद्याप बसला नसल्यामुळें खानानखान यास इतक्यांतच नगरचे कारभारांत पडणें योग्य वाटलें नाहीं. म्हणून तो बाळापुराजवळ शहापूर येथें राजपुत्र मुराद याचा सल्ला घेण्याकरितां गेला.

इकडे निजामशाही पक्ष प्रबळ झाल्यामुळें व वऱ्हाडचें शल्य त्याचे पोटांत खुपत असल्यामुळें त्या दरबारानें मोंगलांशीं लढून वऱ्हाड परत घेण्याचा बेत केला व त्यांना योग्य निमित्तहि सांपडलें. मोंगलाचे लष्करानें वऱ्हाडच्या तहनाम्याच्या बाहेरचें व निजामशाही राजांचें मूळचें वतनाचें म्हणून प्रसिद्ध असलेलें पाथरी शहर घेतलें. त्यामुळें वीस हजार निजामशाही लष्कर व सोहेलखानाचें विजापुरी लष्कर, त्याचप्रमाणें गोवळकोंड्याचें लष्कर हीं तिन्हीं लष्करें एक होऊन वऱ्हाडावर स्वारी करण्यास निघालीं. त्यांनीं गोदावरीजवळ सोनपत येथें येऊन तळ दिला.

इकडे खानखानान यानें खानदेशचा राजा अल्लीखान व राजा जगन्नाथ* यांचें व स्वतःचें मोंगल लष्कर जमा केलें व जालन्यास परत आला व निजामशाही लष्करावर चाल करून जाऊन त्याचे नजीक येऊन गोदेचे कांठीं छावणी दिली.

* हा कोण हें समजत नाहीं. हा कोणी मोंगलांचा हिंदु सरदार असावा.

इ० स० १५९७ चे जान्युआरीचे २६ तारखेस दोन्ही सैन्याची जंगी लढाई झाली. मोंगल लष्कराचा आदिलशाही लष्करानें मोड करून त्यांचा शहापुरापर्यंत वऱ्हाडांत पाठलाग केला. मुराद हा मदतीकरितां निघाला तों त्यास कळलें कीं, खानखानान हा अद्याप टिकाव धरून आहे. इकडे खानखानान याची व सोहेलखान याची पुन्हां लढाई झाली त्यांत खानखानान याचा जय झाला व दोस्त सैन्य पळून आपआपल्या राजधानीकडे गेलें. खानखानान यानें त्यांचा पाठलाग न करितां वऱ्हाडांतील नरनाळा, गाविलगड व इतर किल्ले घेण्याकरितां त्यानें आपलें लष्कर पाठविलें व आपण पुनः जालना येथें छावणी देऊन राहिला. खानखानान याच्या छावणीच्या खुणा अद्याप जालना येथें आहेत.

जालन्याची लढाई
लढाई
इ. स. १५९७

खानखानान यानें दूरदर्शीपणानें केलेला हा विचार मुराद यास पसंत पडला नाहीं. मागील विजयानंतर लागलीच अहमदनगरवर स्वारी करून मुलूख न घेतल्याबद्दल त्यानें खानखानान यास दोष दिला. खानखानान यानें उलट कळविलें कीं, वऱ्हाडांतील पुष्कळ किल्ले अद्याप घेणें असून वऱ्हाडांत पूर्ण अंमल बसविल्यानंतर पुढील वर्षी नगरावर जाणें चांगलें. परंतु मुराद यास तें पसंत न पडून त्यानें अकबराकडे खानाविरुद्ध कागाळी केली. अकबरानें खानास परत दिल्लीस बोलावून ऐनी अकबरीचा व अकबरनाम्याचा कर्ता प्रसिद्ध अबुल फजल यास दक्षिणेच्या सैन्याचें आधिपत्य देऊन पाठविलें. त्यानें सर्व किल्ले सर केलें.

इतक्यांत बीड येथील मोगल अधिकारी शेर खाजा यास निजामशाही लष्करानें धुडावून दिले. त्यास अबुल फजलाकडून

लौकर मदत मिळाली नाहीं. त्यामुळें त्यानें अकबराकडे तक्रार केली. अकबर बादशहानें खानखानान यास दक्षिणेंत पाठवून अबुल फजल यास परत बोलावण्याचें ठरविलें. पण इतक्यांत राजपुत्र मुराद हा अति मद्यपानामुळें शहापूर येथें मरण पावल्याचें वर्तमान त्यास समजलें. त्यामुळें त्यानें खानखानान यास बरोबर देऊन दुसरा राजपुत्र दानियाल यास पाठविलें. इतक्यांत अबुल फजल यानें अकबरास स्वतः दक्षिणेंत येण्याबद्दल आग्रहपूर्वक लिहिलें त्यावरून अकबर स्वतः इ. स. १५९९ मध्यें येऊन बऱ्हाणपुरास राहिला. त्यानें खानखानान व दानियल यांस नगरावर पाठविलें व आपण असीरगडास वेढा देऊन बसला.

अहमदनगरास ते वेळीं नेहंगखान नांवाचा कारभारी होता. तो पंधरा हजार लष्कर घेऊन रस्त्यावरील जैपूर कोथळीचा घाट अडविण्याकरितां त्वरा करून आला; परंतु माहितगार खानानें त्याचे पूर्वींच मानूरीच्या रस्त्यानें चक्कर घेऊन सदरहू घाट अजिबातच टाळला. नेहंगखानास इतक्या थोड्या सैन्यानिशीं प्रचंड मोंगल लष्करास मैदानावर तोंड देणें शक्य नव्हतें म्हणून तो अहमदनगर बचावण्याकरितां मागें आला. परंतु चांदबिबीशीं त्याचें बिघडलें असल्यामुळें तिनें त्यास येऊं दिलें नाहीं व मोंगल लष्कर अडथळा न होतां येऊन अहमदनगरचे किल्ल्यास वेढा देऊन बसलें.

अहमदनगरच्या राज्याची स्थिति अगदींच खालावली होती. चांदबिबीचें कांहीं वजन राहिलें नव्हतें. कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं, दोस्त राज्यांची मदत नाहीं, अशी स्थिति आली होती. अशा स्थितींत प्रबल मोंगलांशीं किल्ला लढविणें कठीण होतें. शेवटीं चांदबिबीनें निरुपाय म्हणून सर्वांचे जिवास अभय घेऊन किल्ला सोडण्याचा निश्चय केला. परंतु मूर्ख दरबारी लोकांनीं "चांद सुलताना

मोंगलास फितुर झाली असून किल्ला मोंगलांच्या ताब्यांत देणार आहे" असा गिल्ला केला व त्यांनीं चांदबिबीस ठार मारलें. थोडे-च दिवसांत मोंगलांनीं सुरुंग लावून किल्ला सर केला व बादशाही घराण्यांतील सर्व माणसें कैद करून बऱ्हाणपुरास अकबराकडे पाठ-वून सर्व राज्य हस्तगत केलें.अकबरानें बादशाही माणसांस ग्वाल्हे-रच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. निजामशाही सरदारांनीं कांहीं दिवस गडबड केली परंतु कांहीं उपयोग न होतां सर्व राज्य मोंगलांच्या ताब्यांत आलें. खानदेश व दक्षिण वऱ्हाड दानियलचे ताब्यांत देऊन अकबर परत गेला.

पुढें कांहीं दिवस प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर यानें निजाम-शाही घराण्याचें अस्तित्व ठेवलें व फार कौशल्यानें कारभार केला व वऱ्हाडचा बराच भाग परत ताब्यांत घेतला. या कामांत शिंदखेडचे प्रसिद्ध जाधवराव व शहाजी भोंसले यांचा त्यास फार उपयोग झाला; परंतु पुढें जाधवराव मलिकंबर व शहाजी यांचा बिघाड होऊन जाधवराव यांनीं मोंगलांची सरदारी कबूल केली व वऱ्हाडचा सर्व मुलूख परत मोंगलांचे ताब्यांत आला.पुढें शहाजहा-नाचे कारकीर्दींत निजामशाही घराण्याचा अवशेष पूर्ण नाहींसा होऊन १६३७ मध्यें तें नामशेष झालें.

वऱ्हाड मोंगलांचे ताब्यांत आल्यानंतर तोडरमलाच्या पद्धतीप्रमाणें त्याची मोजणी वगैरे झाली. ऐनी अकबरींत अबुल फजल यानें वऱ्हाडचे सुभ्याचें वर्णन केलें आहे. त्यावरून त्या-वेळची वऱ्हाडची स्थिति स्थूलमानानें दिसून येईल.

अकबरानें आपल्या राज्याचे एकंदर पंधरा सुभे केले होते. वऱ्हाडच्या सुभ्याखालीं तेरा सरकार ( जिल्हे ) असत. या सुभ्यांचें उत्पन्न पावणेदोन कोट येत असे. वऱ्हाडचे सुभ्याचा

विस्तार त्यावेळीं फारच मोठा होता. दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत हद्द होती. पूर्वेस अष्टी, अर्वी, पवनारपर्यंत परगणे मूळपासूनच वऱ्हाडचे* होते. गाविलचा सरकार फार मोठा असून महत्त्वाचा होता. पूर्वेस वर्धेपलीकडील पवनारचा भाग हल्लीं वऱ्हाडाबाहेर वर्धा जिल्ह्यांत आहे. माहूरचा रामगडचा भाग कायमचा वऱ्हाडचा होता. तो आतां निजामाकडे आहे. माणिकदुर्ग, बैतुलवाडी, पत्याळे (?) हा भाग वास्तविक तेलंगणाचा असून तो अकबराच्या ताब्यांत आल्यामुळें फक्त सोईसाठीं वऱ्हाडचे सुभ्याखालीं आला होता. खेरला हें वऱ्हाडचे सरहद्दीवर समजलें जात असे. पाथरी हा परगणा कायमचा वऱ्हाडचा होता; परंतु निजामशाही बादशहाचें तें वतनाचें गांव असल्यामुळें त्यांनीं तें इमादशाही राजापासून घेतलें होतें. एकंदर सुभे खालीलप्रमाणें असत.

| | |
|---|---|
| १ गाविल ( गाविलगड). | ७ माहूर. |
| २ पेनार ( पवनार). | ८ पाथरी. |
| ३ खेरला. | ९ मेहेकर. |
| ४ नरनाळा. | १० बैतुलवाडी. |
| ५ कळंब. | ११ माणिकदुर्ग. |
| ६ वाशीम. | १२ रामगड. |
| | १३ पत्याळें. |

अबुल फजल हा स्वतः वऱ्हाडांत राहिला होता. त्यामुळें मुख्य मुख्य गांवांचें वर्णन त्यानें दिलें आहे. वऱ्हाडांत त्यावेळीं लहानमोठे हिंदु जमीनदार बरेच असत व त्यांचेजवळ बरेंच सैन्य असून ते चांगले प्रबळ असत. पूर्वेस वैरागड येथें रत्नांची खाण असे. व पाथरीजवळ चितोर येथें जवाहिराची मोठी पेठ असे. दोनतीन ठिकाणीं लोखंडाच्या खाणी असून गाविलगड येथें

पोलादी शस्त्रांचें काम चांगलें होत असे. बाळापुरास नदींतील चित्रविचित्र दगडांच्या कौशल्याच्या जिनसा करीत असत. ऊंस व पानवेलीची लागवड फार असे. दक्षिणेकडे लोणार येथें कांच व साबण तयार होत असे. सर्व वऱ्हाड वहीत होता. गावेलचें सरकार फार मोठें असून त्याखालीं ६४ परगणे असत. उमरावती शहर त्यावेळीं महत्त्वाचें नव्हतें. तें परगण्याचें गांव नसल्यामुळें त्याचा नामनिर्देशहि नाहीं. मेळघाटांत दोन परगण्यांत गोंड (वास्तविक) कोरकू लोकांचें १०० घोडेस्वार व २००० पायदळ असे.

इ. स. १६०५ मध्यें शहाजादा दानियल हा अति मद्यपानामुळें ब्ऱ्हाणपूर येथें मरण पावला. व त्याच सालीं अकबर बादशहाहि मरण पावला. नंतर सेलिम ऊर्फ जहांगीर गादीवर बसला. याचे कारकीर्दींत मलिकंबर यानें वऱ्हाडांत अंमल बसविला होता. व सर्व वसूलहि तोच घेत असे, अहमदनगर मोंगलांचे हातीं गेल्यामुळें मलिकंबरानें दौलताबादेजवळ खिडकी (हल्लींचें औरंगाबाद) येथें राजधानी केली होती. इ. स.(१५९९) अकबराचे कारकीर्दीचे अखेरीस वऱ्हाडचा सुभेदार दानियल हा ब्ऱ्हाणपुरास राहिल्यामुळें वऱ्हाडांतील मोंगलांचा अंमल कच्चा झाला होता. त्यांचें बाळापुरास लष्करी ठाणें होतें; परंतु सुभेदार दूर रहात असल्यामुळें देखरेख कडक नसे. जहांगीरनें खुरम—जो पुढें शहाजहान बादशहा झाला—त्यास दक्षिणचे सुभेदारीवर पाठविलें. तेव्हांपासून थोडा जास्त बंदोबस्त राहूं लागला. मलिकंबरानें सर्व वऱ्हाड ताब्यांत घेतलें होतें त्यास शहाजहानानें वऱ्हाडाबाहेर हांकून दिलें. तरी बरींच वर्षें वऱ्हाड मलिकंबरानें वारंवार स्वाऱ्या करून ताब्यांत ठेविलें होतें.

इ. स. १६२० त जहांगीरची काश्मीरकडे स्वारी झाली व सर्व मोंगल सैन्य तिकडे गुंतलेलें पाहून मलिकंबरानें मोंगलाचा किल्लेदार खंजरखान यास किल्ल्यांत कोंडून किल्ल्यास वेढा दिला व सर्व बालाघाट ताब्यांत घेऊन मोंगल लष्कर पळवून लावलें. तें बाळापुरास वऱ्हाडचा सुभेदार दराबखान याजकडे गेलें. दराबखानानें सैन्य जमवून नगरावर स्वारी केली. व मलिकंबराचे सैन्यास पळावयास लावलें; परंतु त्यास चंदी न देण्याचा दक्षिणेच्या लष्करानें इतका बंदोबस्त केला कीं, त्यास परत बाळापुरास यावें लागलें. तेथून सर्व सामुग्री जमा करून दराबखान पुन्हां चाल करून घाटावर मेहेकर येथें तीन महिने तळ देऊन राहिला. निजामशाहीच्या मराठी सैन्याशीं त्याच्या नेहमीं चकमकी होत असत. त्यानें तीन वेळा या मराठे लष्कराचा पराभव केला परंतु त्यांनीं आपल्या अंगभूत चपलतेनें व युक्तिबाजीनें दराबखानास इतकें त्रस्त करून सोडलें कीं त्यास कांहींच रसद मिळेना. जाधवरावी मराठे लष्कर याच भागांतील असल्यामुळें त्याचें स्थानिक महत्व व माहिती जास्त. शेवटीं दराबखान यास पुढें जाण्याचें सोडून परत बाळापुरास यावें लागलें.

याचे पुढील खालीं मलिकंबराचें व जाधवरावाचें वांकडे येऊन तो मोंगलास मिळाला व त्यामुळें दक्षिण वऱ्हाडांत घाटावर मोंगलांची मोठी मजबुती झाली शहाजहान यानंतर दक्षिणेंत येऊन त्यानें नगरचा वेढा उठवून खंजरखानास सोडविलें व खिडकी शहर पाडून जमीनदोस्त केलें.

इ. स. १६१२ मध्यें जहांगिरानें मलिकंबराविरुद्ध मुद्दाम दोन्ही बाजूंनीं दोन लष्करें पाठविलीं. गुजराथचा सुभेदार अबदुल्ला खान यास नाशिकमार्गानें दौलताबादवर १४००० लष्कर घेऊन

जाण्यास हुकूम दिला व प्रसिद्ध राजा मानसिंग व खानजहान व अमीर-उमरा या तिघांस रोहिणखेड मार्गें बालाघाटांतून दौलताबादेवरच जाण्याचा हुकूम झाला. दोन्ही सैन्यांनीं निरानिराळ्या बाजूंनीं मलिकंबरास गांठावें अशी ही योजना होती. परंतु मोंगल-सरदारांच्या आपसांतील मत्सरानें हा हेतु निष्फल झाला. वऱ्हाडचे मोंगल अधिकारी गुजराथच्या सुभेदारास मदत करीनात. शेवटीं मलिकंबरानें गुजराथच्या सैन्यास निराळें गांठून त्याचा पराभव केला व राजा मानसिंग आल्या मार्गानें वऱ्हाडांतून बऱ्हाणपुरास परत गेला.

इ०स० १६१६ मध्यें वऱ्हाडचा सुभेदार शहानबाजखान हा बाळापूर येथें होता त्याजकडे मलिकंबराचे पुष्कळ सरदार सैन्यासुद्धां येऊन मिळाले. तेव्हां त्यानें रोहिणखेडमार्गें घाटावर चढून खिडकीजवळ मलिकंबराचा पराभव केला. परंतु या विजयाचा फायदा घेण्याइतकें त्याचें बळ नसल्यानें मलिकंबरानें त्यास हटवीत हटवीत आल्या मार्गानें बाळापूरपर्यंत हांकून लावलें.

इ०स० १६१७ मध्यें शहाजहान वऱ्हाडचा सुभेदार झाला व त्यानें सर्व किल्ले घेऊन वऱ्हाडावर चांगला अंमल बसाविला.

इ०स० १६२२ मध्यें शहाजहानानें बंड केलें. वऱ्हाडचा सुभेदार दराबखान हा शहाजहानास या बंडांत साह्य झाला होता. शहाजहानाचा भाऊ परवीज व खानखानान यानें वऱ्हाडांत येऊन माहूरपर्यंत शहाजहानाचा पाठलाग करून त्यास वऱ्हाडचे बाहेर हांकून दिलें. परवीज यानें आसदखान मामुरी नांवाच्या सरदारास एलिचपूरचा सुभेदार नेमलें. शहाजहानाचे ताब्यांतून वऱ्हाड परत बादशाही सैन्याचे ताब्यांत आल्यानंतर शहाजादा परवीज यास वऱ्हाड व दक्षिणचा सुभेदार नेमिलें. तो बऱ्हाण-

पुरास मद्यपानानें रोग होऊन इ. स. १६२२ मध्यें मरण पावला. याच वेळीं मलिकंबर हा वयाच्या ८० व्या वर्षीं मरण पावला.

यानंतर मलिकंबराचा मुलगा फत्तेखान व पडत्या निजामशाहीचा अवशेष मुर्तिजाशहा यांनीं दक्षिणेंत जोर केला. त्यावर जहांगिरानें इमदाद्-उल्-मुल्क खानेजहान नांवाचे सरदारास वऱ्हाडचा सुभेदार करून पाठविलें. त्यानें स्वतः बारा लक्ष रुपयांची लाच खाऊन सर्व दक्षिण–वऱ्हाड म्हणजे बालाघाट इ. स. १६२६ मध्यें शत्रूस दिलें. जहांगीर मरण पावला व त्याचे गादीबद्दल राजधानींत तंटे सुरू झाल्यामुळें इकडे लक्ष देण्यास कोणास फावलें नाहीं.

शहाजहान १६२८ मध्यें गादीवर बसल्यानंतर त्यानें निजामशाही राजास बादशाही फर्मान पाठवून बालाघाट खालीं करून देण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें भिऊन त्यांनीं हा भाग सोडून दिला; परंतु बीड येथील निजामशाही अधिकारी मात्र आपलें ठाणें सोडीना. शेवटीं शहाजहानानें खानजमान नांवाचा सरदार तें ठाणें घेण्याकरितां पाठविला.

या वेळेपूर्वींच निजामशाही दरबारांत पुष्कळ मराठे सरदारांचा प्रवेश झाला होता. व शिंदखेडच्या जाधवरावासारखे पुष्कळ मराठे हे राज्याचे आधारस्तंभ म्हणून समजले जात असत. प्रसिद्ध शहाजी भोसले हा या वेळीं निजामशाही सैन्यांत सरदार होता. त्यास निजामशहानें सहा हजार मराठे घोडेस्वारांसह खानजमानावर पाठविलें व खानजमान पुढें आल्यानंतर बऱ्हाणपूर व एलिचपूर येथून त्यास मदत मिळूं नये म्हणून त्याच्या सैन्याच्या सांखळीचे मागील दुवे तोडण्यास सांगितलें. खानजमा-

नचे लष्कराशीं तोंड देण्याचा या मराठी लष्कराचा मुळींच उद्देश नव्हता. कारण मोंगलांच्या प्रचंड लष्करावर एवढ्या थोड्या लष्करानिशीं जाऊन उपयोग नव्हता; परंतु मराठे घोडेस्वारांच्या प्रसिद्ध चपल हालचालींचा शत्रुसैन्याचें बुणगें लुटण्यास,त्यास वैरण व रसद मिळूं न देण्यास व सर्व प्रकारें त्राहित्राहि करावयास लावण्यास फार उपयोग होत असे हें पुढें मराठ्यांच्या इतिहासांत स्पष्ट दिसून आलेंच आहे. जाधवराव, शहाजी वगैरेंचीं मराठी लष्करें दक्षिण-वऱ्हाड, दौलताबाद व नगर वगैरे भागांतून उभारलीं जात असत व नंतरच्या स्वराज्यांतील मराठी लष्करांचा ज्यांना संबंधहि आला नाहीं, अशा मराठे लोकांत विशेषत: दक्षिण–वऱ्हाडांत ही लढाऊ परंपरा अद्याप दृष्टोत्पत्तीस येते.मूळचे लढवय्ये मराठे अद्याप ठिकठिकाणीं कायम आहेत.

शहाजीच्या सैन्यानें उत्तर–वऱ्हाडांतून तों खानदेशापर्यंत सर्व पूर्वपश्चिम पट्टी अडवून एलिचपूर व बुऱ्हाणपुराकडील कुमक बंद केली; परंतु इतक्यांत बीड येथील सुभेदारानें हार खाऊन आपलें ठाणें सोडून दिलें व तिकडील लढाई थांबली. दर्याखान नांवाच्या रोहिल्याची जहागीर उमरावतीच्या बाजूस होती. त्यानें शहाजीवर चाल करून त्यास हांकून दिलें. खानजहान याची सुभेदारी जाऊन त्याचे जागीं इरादतखान नांवाचा सुभेदार आला. खानजहान निजामशहाकडे जाऊन मिळाला. त्यास ताब्यांत देण्याबद्दल शहाजहाननें मूर्तिजा निजामशहास लिहिलें; पण तो त्यास सोडीना व बालाघाट पुन्हां आपल्या ताब्यांत घेऊन बसला.

शेवटीं १६३० मध्यें शहाजहानानें स्वत: बऱ्हाणपुरास येऊन बालाघाट परत ताब्यांत घेतला व दौलताबादचा किल्ला सर केला. शहाजहानानें तीन सरदार पन्नास हजार लष्कर देऊन

वऱ्हाडांत घांटांवर ठेवले. आजम मुख्य सेनापति हा देऊळगांव-राजा येथें बरसाद निघून जाईपर्यंत तळ देऊन राहिला व दक्षिणचें सैन्य सात कोसांवर जालना येथें तळ देऊन राहिलें; परंतु त्याच सालीं बरसात मुळींच न झाल्यामुळें प्रांतांत दुष्काळ पडला. दुष्काळांत तेरावा महिना या म्हणीप्रमाणें या दोन्ही लष्करांचा देशास फार उपद्रव झाला. सदरहू लष्कर दुष्काळ निघून जाईपर्यंत तसेंच राहिलें. हा दुष्काळ इतका भयंकर झाला कीं, आई मुलास ओळखीना. अन्नाकरितां परदेशांत जातां जातां रस्त्यांत प्रेतांचे ढीग पडले व देशांत माणूस राहिलें नाहीं.

मलिकंबर मरण पावला व लुकजी जाधवराव मोंगलाकडे गेला. हे दोन आधार तुटल्यामुळें निजामशाहीचा भार एकट्या शहाजीवर पडला. इ. स. १६३३-३४ मध्यें दौलताबाद व परिंडा हीं ठिकाणें मोंगलांच्या हातीं जाऊन निजामशाहीचा अंत झाला. इ. स. १६३४ मध्यें शहाजहानाचा पुत्र सुजा याचा तळ मलकापुरास होता. व रोहिणखेडच्या घाटावर मोंगलांची शिबंदी ठेवली होती. व उत्तरेकडून दक्षिणेकडील सांधा कायम ठेवण्यास या नाक्याचा उपयोग होत असे.

**नवीन प्रांतविभाग.**

इ. स. १६३४ मध्यें शहाजहानानें एक बादशाही फर्मान काढून दक्षिणेच्या सुभ्यांची नवीन विभागणी केली. आतांपर्यंत दक्षिणचे तीन सुभे होते. १ वऱ्हाड २ खानदेश ३ निजामशाही राज्याचा जिंकलेला भाग. तिन्ही सुभे मिळून एक प्रांत होता व त्याचा मुख्य अधिकारी बऱ्हाणपूर येथें रहात असे.

नवीन व्यवस्थेप्रमाणें तीन सुभ्यांचे दोन सुभे झाले. नर्मदेच्या दक्षिणेकडे माळव्यांतील हंडिया सरकारचे परगणे होते ते खानदेशास मिळविले. खानदेश व वऱ्हाडचे बालाघाटाचे उत्तरेकडील सखल जमीन व मेळघाट यासुद्धां सर्व पूर्वपश्चिम लांबीचा एक सुभा करून त्यास पायांघाट सुभा असें नांव दिलें. याचे दक्षिणेकडील बालाघाट सुभ्यांत वऱ्हाडचा बालाघाट व निजामशाही राज्यांतील नवीन आलेला मुलूख सामील केला. उत्तर वऱ्हाडास पायांघाट व दक्षिण वऱ्हाडास बालाघाट हीं नांवें पूर्वींचींच होतीं. तींच या दोन सुभ्यांस दिलीं होतीं. हे विभाग बरेचसे नैसर्गिक होते. हे सुभे पूर्वपश्चिम लांब असे होते. दोन्ही सुभ्यांची मर्यादा बालाघाटच्या उत्तरेकडील कांठची डोंगराची कडा ही होती. पश्चिमेस रोहिणखेडापासून पूर्वेस वर्धाघाटच्या सावरगांवापर्यंत रेषा काढली तर ती साधारणपणें या दोन सुभ्यांची मर्यादा होईल. या नवीन सुभ्यांमुळें वऱ्हाडचें कदीमचें एकरूप कांहीं थोडा काळपर्यंत द्विधा झालें. परंतु ही व्यवस्था अगदीं थोडा काळपर्यंत म्हणजे दोनच वर्षें राहिली. पायांघाटाचा सुभेदार खानडौरान हा असून त्याच्या हाताखालीं सिपादारखान म्हणून कामगार एलिचपुरास असे.

हे सुभे फार मोठे झाले होते. म्हणून शहाजहानानें आपला मुलगा औरंगजेब यास दक्षिणेचा सुभेदार नेमलें. तेव्हां या दोन सुभ्यांचे चार सुभे केले.

१ दौलताबाद व अहमदनगर. मुख्य शहर दौलताबाद असे. परंतु औरंगजेब खिडकी येथें रहात असे व त्याचें नांव त्यानें औरंगाबाद असें ठेविलें.

२ तेलंगण.

३ खानदेश; मुख्य शहर ब-हाणपूर व लढाऊ ठिकाण आशिरगड.

४ व-हाड; मुख्य शहर एलिचपूर व लढाऊ ठिकाण गाविलगड.

प्रत्येक सुभ्यावर स्वतंत्र सुभेदार औरंगजेबाचे हुकमाखालीं वागत असत. व-हाड पूर्वींप्रमाणें एक झालें व खानडौरान हा सुभेदार व सिपादारखान हा त्याचा नायब झाला.

यापुढील इतिहास साखरखेर्ड्याच्या लढाईपर्यंत विशेष महत्वाचा नाहीं. मराठ्यांच्या सत्तेचा उदय होऊन ती एकसारखी वाढत चालली होती. दिल्लीस खून, कट, मारामाऱ्या होऊन उतरती कळा लागली होती. याचा शेवट चिनाखिलिचखान निजामुल्मुल्क ऊर्फ असफजहां हा दक्षिणेंत येऊन स्वतंत्र झाला व हैदराबादेस निजामाची स्वतंत्र गादी स्थापन झाली. उत्तरेचा संबंध सुटून सर्व राज्यकारस्थानाचें केंद्र दक्षिणेंत आलें.

इ. स. १६३७ मध्यें व-हाडचा सुभेदार खानडौरान हा आपल्या सैन्यासह नागपुरावर जाऊन चांद्याचे गोंड राजाच्या मदतीनें त्यानें नागपूर घेतलें. यानंतर देवगड सरकार हें व-हाडच्या सुभ्याखालीं आलें.

इ. स. १६४२ मध्यें शहाबेगखान व-हाडचा सुभेदार झाला व अल्लावर्दीखान यास सिपादारखानाचे मृत्यूनंतर नायब सुभेदार नेमलें व त्यास एलिचपुरास जहागीर मिळून पांच हजार सैन्याचें आधिपत्य मिळालें.

औरंगजेब गादीवर बसल्यावर त्यानें राजा जयसिंग* यास दक्षिणेचे मुख्य सुभेदार नेमून, ईरिजखान यास वऱ्हाडचे सुभेदार केले. यानंतर निरनिराळे सुभेदार झाले त्यांत औरंगजेबाचा मुलगा कामबक्ष हाहि कांहीं वर्षें होता. इ. स. १७०२ चे सुमारास प्रसिद्ध निजामुल्मुल्क असफजहां याचा बाप गाझीउद्दीन खान फिरोझजंग हा वऱ्हाडचा सुभेदार बरींच वर्षें होता.

इ.स. १७०७ मध्यें औरंगजेब अहमदनगरास मरण पावला व दौलताबादेजवळ रोझा¹ येथें त्यास पुरलें. तेथें त्याची कबर आहे. हें ठिकाण वऱ्हाडचे नैर्ऋत्य हद्दीजवळ वेरूळ व दौलताबाद यांचे दरम्यान आहे.

औरंगजेबाचे मृत्यूनंतर दिल्लीचे राज्यांत अंदाधुंदी झाली. मराठ्यांनीं सर्व मुसलमानी मुलखावर चौथ व सरदेशमुखी सुरू करून ती इ. स. १७१८ मध्यें फरुखसियर बादशहाचे कारकीर्दींत दिल्लीपतींनीं कायदेशीर रीतीनें लेखी मान्य केली. तिचे जोरावर सर्व ठिकाणीं मराठ्यांचें बोट शिरकलें. त्यानंतर निजामुल्मुल्क दाक्षिणेंत स्वतंत्र झाला. तरी त्यापूर्वींच मुसलमानी मुलखाचे बोकांडीं इंग्रजांचे सबसिडिअरी सैन्याचे बोजाप्रमाणें, हें चौथाई व सरदेशमुखीचें पिलूं बसलें. तें त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले असतांहि निघालें नाहीं. व त्यामुळेंच मराठ्यांचें राज्य एकसारखें वाढत राहिलें.

---

* राजा सवाई जयसिंग यानें बांधलेली एक छत्री बाळापुरास नदीचे पात्रांत आहे. ती मध्यंतरी पुरानें ढासळली होती तेव्हां जयपुरच्या दरबारांतून तीन हजार रुपये येऊन दुरुस्त झाली. हल्ली ती चांगल्या स्थितींत आहे.

१ रोझा येथें मुसलमानांपैकीं पुष्कळ प्रसिद्ध लोकांच्या कबरी आहेत. पहिल्या निजामुल्मुल्काचीहि कबर तेथेंच आहे. सदरहू गांव वेरूळच्या लेण्यांच्या माथ्यावर असून तेथें राहण्यास एक बंगला आहे.

औरंगजेब बादशहाचे सैन्यांत शहाबुदीन नांवाचा तुराणी मोंगलजातीचा शूर सरदार होता. त्यानें दक्षिणेंत औरंगजेबाचे स्वारींत मराठ्यांविरुद्ध बऱ्याच कामगिऱ्या केल्यावरून औरंगजेबानें त्यास एलिचपुरास वऱ्हाडचा सुभेदार नेमून गाझीउद्दीन व फेरोझजंग हे किताब दिले व सात हजारांची मनसब दिली.

औरंगजेब मरण पावल्यानंतर गाझीउद्दिनाचा मुलगा प्रसिद्ध पहिला निजाम मीर कमरुद्दीन हा प्रसिद्धीस आला. त्याचेंहि बरेंच आयुष्य मराठ्यांविरुद्ध कामगिऱ्या करण्यांत गेलें. त्यास चीनखिलिचखान, असफजहां व निजाम-उल् मुल्क असे तीन किताब मिळाले व दक्षिणेची सुभेदारी मिळाली.

दिल्लीस महमदशहा गादीवर असतांना सर्व सत्ता सय्यद बंधूंच्या हातीं होती. निजाम-उल्-मुल्क हा दिल्लीस होता व त्यास कोठें तरी दुसरे ठिकाणीं पिटाळून लावण्याचे खटपटींत सय्यद होते. कारण हा डोईजड सरदार आपणास भारी होईल अशी त्यांस मत्सरबुद्धि उत्पन्न झाली होती; पण उघडपणें त्याच्याशीं वैर करण्याची त्यांची हिंमत नव्हती. त्यास मुरादाबादचा सुभेदार नेमण्याचें सय्यदबंधूंनीं कबूल करून दिल्लीस बोलाविलें होतें; परंतु ती सुभेदारी दुसऱ्यास देऊन माळव्याची सुभेदारी त्यांनीं निजामुल्मुल्कास सांगितली. व त्यानेंहि ती वरवर कबूल केल्यासारखें दाखविलें; परंतु दक्षिणेंत त्याचा पाय बरेच दिवस रुतला असल्यामुळें या चांगल्या सुपीक प्रांतांत कायमचें ठाणें देण्याची त्यानें तयारी केली. माळव्याचे सुभेदारीवर जाण्याचें निमित्त करून तो दिल्लीहून निघाला तो माळव्याजवळ सैन्य जमा करून त्यानें १७२० चे एप्रिल महिन्यांत असीरगड किल्ला घेतला. त्याचप्रमाणें बऱ्हाणपूर व खानदेशाचा बराच भाग त्याचे ताब्यांत आला

शाहु व कोल्हापुरकर संभाजीचे मराठे सैन्यांपैकीं कांहीं मराठे त्याचे सैन्यास मिळाले. निजामाचा चुलता ईवाजखान हा वऱ्हाडचा सुभेदार होता तोहि निजामास मिळाला.

निजामाचा विचार सय्यदबंधूंनीं ओळखून त्याचे पाठीवर दिल्लीहून लष्कर पाठविलें. त्यावरील सरदार दिलावर अल्लीखान यास निजामुल्मुल्क याजवर पाठीमागून हल्ला करण्यास हुकूम झाला. त्याचप्रमाणें सय्यदांचा पुतण्या अलंअल्लीखान नांवाचा औरंगाबादेस दक्षिणचा सुभेदार होता. त्यासहि सय्यदांनीं दक्षिणेकडून निजामावर हल्ला करण्यास सांगितलें. अलंअल्लीखानानें ईवाजखानास वऱ्हाडचे सुभेदारीवरून काढून अनवरखान यास नेमलें पण तोहि निजामअल्लीस मिळाला.

राज्यसंस्थापक नेहमींच चतुर व दूरदर्शी असतात. दिलावर अल्लीखान व अलंअल्लीखान यांच्या कैचींत न सांपडण्याचा एकच मार्ग म्हणजे दोघांची गांठ पडण्यापूर्वीं प्रत्येकाशीं वेगवेगळी लढाई करून दोघांचाहि क्रमाक्रमानें पराभव करणें हाच कायतो मोकळा होता. पावसाळ्याच्या तोंडी नर्मदा व तापी ह्या नद्या दिलावरखानास अडवितील व त्यास येण्यास बराच वेळ लागेल तोंपर्यंत अलंअल्लीखानाशीं लढाई करून त्याचा मोड करावा या निश्चयानें निजामअल्ली पुढें चालला; परंतु दिलावरखान हा धाडशी व अविचारी असल्यामुळें तो त्वरेनें नद्या भरून जाण्यापूर्वींच त्या उतरून दक्षिणेंत आला. त्यानें बऱ्हाणपुराजवळच निजामअल्लीस गांठलें.

**बऱ्हाणपूरची लढाइ १७२०**

(१७२० इ० स०). दिलावरखानाचा हूड व अविचारी स्वभाव मुरलेल्या निजामअल्लीस चांगला

माहीत असल्यामुळें त्यानें प्रथम हटल्यामारखें दाखवून आंगावर घेऊन व मग एकदम उलट खाऊन त्याजवर मारा करून मोड केला व दिलावरखानास ठार मारलें.

बाळापुरची लढाई.
१७२० जून

दिलावरखानाचे पराभवाची बातमी अलंअल्लीखान यास औरंगाबादेसच समजली. त्यानें हि बरेंच मराठा लष्कर जमविलें व बऱ्हाणपुराकडे चाल केली. बऱ्हाणपुराकडून दक्षिणेंत जाण्याचा रस्ता वऱ्हाडांतून असल्यामुळें निजामअल्लीखान हा सातपुड्याचे पश्चिम कोपऱ्यांतून वऱ्हाडच्या पाईन घाटांत उतरला. पावसाळा सुरू झाल्यामुळें पयोष्णी ऊर्फ पूर्णानदीस पूर आलेला होता त्यामुळें त्यास उतार सांपडेपर्यंत थांबावें लागलें. शेवटीं उतार सांपडून निजामअल्लीखान पूर्णा उतरून दक्षिणेस शेगावास आला. नागपुरकर भोसल्याच्या सैन्यानें त्यावर छापे घालून दाणावैरण व सामुग्री मिळूं दिली नाहीं. शेवटीं तो बाळापुरास जाऊन तळ देऊन राहिला. तोंपर्यंत अलंअल्लीखान हा दक्षिणेकडील बालाघाट उतरून आला. दोघांची गांठ बाळापुराजवळ पडली. निजामअल्लीनें पूर्वींप्रमाणेंच कावा लढवून अलंअल्लीखानावर हल्ला केला. अलंअल्लीखान फार शौर्यानें लढला व अखेरपर्यंत तलवार चालवून पडला. त्याचे बरोबरचे मराठे शिपाईहि फार शौर्यानें लढले व अलंअल्लीखानाचे प्रेतासभोंवतीं त्याचे इमानी मराठ्यांच्या प्रेतांचा गंज पडला होता.

बाळापूरचे लढाईंत शाहूचे प्रतिपक्षी कोल्हापूरकर संभाजी, चंद्रसेन जाधव वगैरे मराठे निजामाकडेस होते व शाहूचे पक्षाची मराठे मंडळी अलंअल्लीखानाच्या म्हणजे दिल्लीच्या पक्षास होती. शाहू बादशाही गादीचा पक्षपाती होता त्यामुळें त्यास अलंअल्ली-

खानास मदत करण्याबद्दल पत्र आलें होतें. त्यानें संताजी शिंदे, खंडेराव दाभाडे, दमाजी गायकवाड, शंकराजी मल्हार, कान्होजी भोंसले वगैरे सरदार मोंगल लष्करास मदत करण्यास पाठविले होते व ते सर्व बाळापूरच्या लढाईंत हजर होते. एकंदर सतरा अठरा हजार मराठे लष्कर या लढाईंत मोंगलांच्या बाजूनें होतें. शंकराजी मल्हार जखमी होऊन कैद झाला होता तो त्या जखमांनींच पुढें मरण पावला. दमाजी गायकवाडाच्या उदयाचा मूळ पाया बाळापूरचे लढाईतच आहे. खुद्द पहिला बाजीराव पेशवा या लढाईचे वेळीं बाळापुरास हजर होता असा दाखला पेशव्यांचे रोजनिशींत आहे व बहुधा लढाईंतहि सामील असावा असा *तर्क आहे.

इ०स० १७२२ पर्यंत निजाम दक्षिणेंत राहिला. या अवधींत सय्यद बंधूंचा खून होऊन बादशहा त्यांचे त्रासांतून मुक्त झाला व हे सर्व निजामुल्मुकाचे पक्षानें केल्यामुळें त्या पक्षाचें दरबारांत वजन वाढून निजामुल्मुल्क यास वजीर नेमण्यांत आलें व तो दिल्लीस गेला.

निजामाचें वर्चस्व बादशहास आवडेना. शेवटीं त्यानें वजिरीचा राजीनामा दिला व इ. स. १७२३ चे आक्टोबर महिन्यांत शिकारीस जाण्याचें निमित्त करून तडक दक्षिणेंत आला. व आपल्या सुभेदारी मुलखाचा ताबा घेतला. ही वेळ निजामुल्मुल्काची स्वतंत्र होण्याची ह्मणून समजली जाते. कारण यानंतर जरी बरींच वर्षे निजाम हे कागदोपत्रीं† दिल्लीचे अंकित व सुभेदार म्हणून म्हणवीत असत. व प्रत्येक वारस जरी दिल्लीहून वस्त्रें

---

* सरदेसाई. म.वि.पा. १९१

† निजामच्या सनदांवरील शिक्क्यांत ते दिल्लीपतीचे अंकित असें म्हटलेलें आहे.

आणवीत, तरी कृतींनें ते पूर्ण स्वतंत्र असत. याप्रमाणें शेंकडों वर्षेंपर्यंत ज्या दक्षिणेच्या राज्याकरितां अकबराच्या वेळेपासून मोंगलरक्ताचे पाट वाहिले तें दक्षिणचें राज्य चुटकीसरसें दिल्लीचे ताब्यांतून कायमचें गेलें.

निजामुलमुल्क माळव्यापर्यंत आला तोंच त्यास समजलें कीं, हैदराबादचा त्याच्या तर्फेचा सुभेदार मुबारिजखान हा फितून आपल्या विरुद्ध झाला आहे. मुबारिजखान यास बादशहानें सैन्य जमवून निजामुलमुल्काचा पराभव करण्यास हुकूम दिला होता. व त्याची दक्षिणेची सुभेदारी मुबारीजखानास देण्याचें कबूल करून तसें फर्मानहि पाठविलें होतें. त्या लालचीनें मुबारीजखान यानें मोठें सैन्य जमवून निजामावर चाल केली.

**साकरखेड्यांची लढाई**
**१३ आक्टोबर १७२४**

निजाम औरंगाबादेस तळ देऊन राहिला होता. मुबारीजखान यानें त्यास चुकवून उत्तरेचा मार्ग धरला. मुबारीजखानाचा डाव हा होता कीं, उत्तरेकडून दिल्लीकडील फौज त्याचे मदतीस येईल व तिचें पाठबळ आपणास रहावें अशा रीतीनें दक्षिणेकडून निजाम व उत्तरेकडून आपण अशा रीतीनें तो तोंड देणार होता. कारण दिलावरखानाची व अलीखानाची दशा काय झाली हें त्यास माहीत होतें.

वऱ्हाडच्या दक्षिण हद्दीवर बालाघाटावर दक्षिणपूर्णा म्हणून बरीच मोठी नदी आहे. ती उतरून मुबारीजखान उत्तरेस आला व नदीचा उतार अडविण्याकरितां त्यानें आपलें कांहीं कर तेथें ठेविलें व उत्तरेकडून दिल्लीहून येणाऱ्या लष्कराची तो

वाट पहात तो हल्लींच्या मेहेकर तालुक्यांतील साकरखेरडा या गांवीं तळ देऊन राहिला.

निजामुल्मुल्क यानें मुबारीजखान आपणास चुकवून पलीकडे गेला हें पाहून त्याचा कावा ओळखला व दिल्लीच्या लष्कराची व त्याची गांठ पडण्याच्या अगोदरच त्याशीं सामना करणें इष्ट आहे हें ओळखून तोहि त्वरेनें त्याच रस्त्यानें पूर्णा ओलांडून उतार अडविणाऱ्या तुकडीचा पराभव करून पुढें आला तों त्यास समजलें कीं, मुबारीजखान साकरखेर्ड्यास लढाईच्या तयारीनें तळ देऊन आहे.

साकरखेर्ड्याच्या दक्षिण बाजूस जंगी पटांगण असून, जवळच पिछाडीस दोनतीन पाण्याचे तलाव होते. ते आतां वरील लढाईनंतर लष्करी छावण्यांच्या त्रासानें गांवकरी लोकांनीं फोडून टाकले आहेत. कारण अशा पाण्याच्या सोईच्या जागीं लष्करी तळ पडून गांवकऱ्यांस व भोंवतालच्या रयतेस पूर्वीच्या अमदानींतील रसद बिगारीचा फार त्रास होत असे. रिसोड व इतर कांहीं ठिकाणीं याच कारणानें गांवाच्या भोंवतालचे मोठमोठे सुंदर तलाव लोकांनीं फोडून टाकलेले पहाण्यांत येतात. व त्याचें वरील कारण वृद्ध लोक सांगतात.

वरील विस्तृत पटांगणावर मुबारीजखानाचा तळ पडला असतां निजामउल्मुल्कानें त्यावर हल्ला केला. निजामुलमुल्काबरोबर कुवारचंद म्हणून बुंदेला सरदार होता व त्याचे बुंदेले शिपायांजवळ कांहीं तोफखानाहि होता. तो अघाडीवर होता. मुबारिजखानानें प्रथम हल्ला केला, परंतु त्याचे व निजामाचे सैन्याचे दरम्यान जागा साफ नसून एक नाला व आणखी खांचखळगे होते. त्यामुळें त्याचे हल्ल्यास फार गैरसोय झाली. तो पुढें येतांच निजा-

माचे सैन्यानें हल्ला केला व दोन्ही सैन्यांत फार निकराचें युद्ध झालें. मुबारीजाखनाचे दोन मुलगे मारले गेले व दोघे घायाळ होऊन विरुद्धपक्षाचे हातांत सांपडले. मुबारीजखानाचा हत्तीवरील महात घायाळ होऊन पडला व मुबारीजखान त्याचे जागीं बसून कसाबसा जीव घेऊन पळाला; परंतु त्याचा पाठलाग होऊन तोहि मारला गेला. मुबारीजखानाचे तीन हजार लोक लढाईत पडले. निजामाचे दोघे चुलते पडले. एकंदरींत त्याचें नुकसान थोडें झालें.

या लढाईमुळें निजामाचें दक्षिणेंतील स्वातंत्र्य पक्कें झालें. साकरखेर्ड्याची लढाई म्हणजे निजामाचे राज्यस्थापनेचा खरा आरंभ होय.

या ठिकाणीं फत्ते (जय) झाल्यामुळें निजामुल्मुल्कानें या गांवाचें साकरखेर्डा हें जुनें नांव बदलून फत्तेखेर्डा असें ठेवलें तें अद्याप कागदोपत्रीं व सरकारी दरबारीं चालू आहे. जुने लोक अद्याप साकरखेर्डा म्हणतात.

निजामुल्मुल्काबरोबर जे बुंदेले लोक होते त्यांपैकीं बरेचसे लोक या गांवीं कायमचे राहिले ते अद्याप तेथें जमावानें आहेत. मुबारीजखानाची कबर या लढाईच्या जागीं एका शेतांत असून दोन शेतें त्यास इनाम आहेत. जवळच एक जुनी विहीर आहे. साखरखेर्ड्याच्या या लढाईची जागा गावांचे दक्षिणेस गोरेगांव नांवाच्या गांवाच्या हद्दींत असून तेथें कांहीं थडगीं अद्याप आहेत. दोन थडगीं कबंधांचीं आहेत असें सांगतात.

निजामुल्मुल्क हा तीनचार दिवस साकरखेर्डा येथें राहून नंतर औरंगाबाद मार्गानें हैदराबादेस गेला व तेथें दक्षिणचे सहा सुभ्यांचा सुभेदार म्हणून त्यानें स्वतंत्रपणें अधिकार सुरू केला.

साखरखेड्यांचे लढाईंत सिंदखेडच्या जाधवरावांच्या घराण्यांतील राघोजी हा मोंगलातर्फे हजर होता. जाधव घराणें जें एकदां मोंगलांकडे गेलें तें अखेरपर्यंत त्यांच्याशीं इमानानें राहिलें. निजामाविरुद्ध मुबारीजखानास मदत करावी म्हणून दिल्लीहून राघोजीस हुकूम आला. तेव्हां तो औरंगाबादेहून मुबारीजखानास सैन्यासह मिळाला. जाधवराव औरंगाबादेसच रहात असत. फत्तेखेड्यांच्या लढाईंत राघोजी फार बहादुरीनें लढला व लढतां लढतां मरण पावला. याबद्दल सूड घेण्याकरितां निजामउलमुल्कानें लढाईनंतर औरंगाबादेस जातांना देऊळगांवाहून जाधवरावांचीं मुलें माणसें धरून आणण्याकरितां लोक पाठविले; परंतु त्यांना आधींच बातमी लागून ते पळून साताऱ्यास शाहूकडे गेले. कारण राघोजीस राजारामाची मुलगी दिली होती. पुढें राघोजीची आई, बायको व मुलगा पुष्कळ दिवस साताऱ्यास राहिली. शाहूचे मध्यस्थीनें निजामाकडून त्यांची जहागीर सुटली. राघोजीचा मुलगा बाबजी हा पुढें ताराबाई व पेशव्यांच्या तंट्यांत ताराबाईच्या पक्षाचा आधारस्तंभ होता. राजारामास अटकेंत ठेवण्यास व पेशव्यांशीं भांडण्यांत ताराबाईस यानेंच मुख्यतः मदत केली. पेशव्यांची सरशी होऊन ताराबाईचा पक्ष खालीं झाल्यावर हा निघून औरंगाबादेस आला.

---

# भाग आठवा.

## मराठे व निजाम

### दोअमली कारकीर्द

मुसलमानांचा महाराष्ट्रांत पाय पडल्यापासून शेंदीडशें वर्षांत देवगिरीचे यादव व विजयानगरचे बलाढ्य हिंदु राजे नामशेष होऊन मुसलमानी राज्य सर्व महाराष्ट्रांत अबाधित चालू झालें. मुसलमानी जुलमाच्या अंधःकारमय व निराशापूर्ण स्थितींतून कांहीं उजेड दिसेल अशी आशा नसतांना वरवर चमत्कारिक व आकस्मिक दिसणारी परिस्थिति आंतून अदृश्यपणें कशी तयार होत होती हें न्या. रानडे यांनीं प्रथमतः अत्यंत सुंदर रीतीनें प्रतिपादन केलें व त्याचाच अनुवाद त्यानंतरचे इतिहासकार आजवर करीत आहेत. पुढील स्थिति समजण्याकरितां सदरहू पृथक्करण खालीं दिलें आहे.

हिंदुधर्मावर मुसलमानांचे अत्याचार अनंत होऊन सर्व हिंदु लोक चिडून गेले होते. त्यांच्या देवांच्या मूर्ति त्यांचे समक्ष छिन्न-भिन्न होत होत्या; देवळें जमीनदोस्त होऊन त्यांचे जागीं मशीदी येत होत्या, कांहीं उभीं असलेलीं परंतु छिन्नभिन्न झालेलीं देवळें मुसलमानांचा जुलूम पुढील पिढ्यांस अद्याप दाखवीत आहेत हजारों हिंदूंस त्यांचे मर्जीविरुद्ध बाटवून मुसलमान करीत असत. सर्वांपेक्षां जास्त चीड उत्पन्न करणारी व निर्बळ हिंदूंच्या हृदयास जाळणारी गोष्ट म्हणजे हिंदू बायकांवरील अत्याचार पदोपदीं दिसणें ही होय. बायकांकरितां स्वाऱ्या करून जबरीनें बायका नेऊन त्यांशीं लग्नें लावणें ही गोष्ट मुसलमानी अमदानींत साधारण झाली होती.

परंतु हे अत्याचार चालू असूनहि पहिली वावटळ निघून शांतता झाल्यानंतर मुसलमानी राजांचें हिंदूंच्या मदतीशिवाय चालत नसे. दक्षिणेंत आलेले अस्सल मुसलमान आधीं फारच थोडे व तेहि शांततेच्या काळांत ऐषआरामी बनून कार्यकर्तृत्वास निरुपयोगी होत असत. बाकी राहिले बाटलेले हिंदू. अस्सल मुसलमानापेक्षां या बाटीव मुसलमानांचा धर्माभिमान जास्त बिकट व तो अद्यापिही तसाच आहे अस्सलीपेक्षां नकलींची झकाकी नेहमींच जास्त असते; परंतु हे लोक बहुधा मूळच्या जातींतील अगदीं हलक्या जातीचे असतात. अर्थात् त्यांचे आंगीं अक्कलहुशारी व कार्यकर्तृत्व मुळींच नसते.

राज्यकारभार चालविण्यास जी अक्कल व मेहनत पाहिजे ती या मुसलमान राज्यकर्त्यांत बरीच कमी. त्यांचें श्रेष्ठत्व लढाईच्या पेशांत व धर्माभिमानांत. हिंदु लोक पिढीजात अकलेचा धंदा करणारे व त्यांचीं धर्मतत्वें ऐषआरामाच्या अगदीं विरुद्ध. अर्थात् अशा लोकांच्या मदतीशिवाय मुसलमान राज्यकर्त्यांचें चालेनासें झालें व त्यांना राज्यांतून लहान पासून मोठ्या जागांपर्यंत हळूहळू प्रवेश मिळाला.

" परित्राणाय साधूनां, विनाशाय च दुष्कृताम् "

हें तत्त्व शिकलेल्या साधुसंतांचा महाराष्ट्रांत ईश्वरी नेमानुसार याच जरूरीच्या प्रसंगीं पूर आला व त्यांनीं मनस्वी धर्मजागृति केली. लोकांचें मानसिक आलस्य झाडून त्यांना खडबडून जागें केलें. सर्व महाराष्ट्रभर निरनिराळे मठ व धर्मपंथ स्थापन झाले. महाराष्ट्राच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत रामदासी पंथाचे व पंढरपूरच्या भक्तिमार्गी सांप्रदायाचे अनुयायी होऊन दळणवळण, येणेंजाणें व विचारविनिमय सुरू झाला.

मुसलमानांच्या जुलमापासून सुटण्याची उत्कट इच्छा प्रत्येक हिंदुमात्राच्या मनांत उत्पन्न झाली. व असा प्रयत्न कोणी केल्यास त्याचेबद्दल सहानुभूति व आवड बहुजनसमाजांत उत्पन्न झाली. असा पुरुष व प्रसंगच कायतो येण्याचा बाकी राहिला होता.

वरील सर्व परिस्थिति महाराष्ट्राचा महत्त्वाचा भाग जो वऱ्हाड त्यासहि तंतोतंत लागू होतीच. वऱ्हाडांतील असंख्य फोडलेलीं देवळें अद्याप उभीं आहेत. त्यांना बांधण्यास लागलेलें द्रव्य-सामर्थ्य, कौशल्य व मेहनत यांची कल्पना नजरेसमोर उभी राहून अद्याप हृदय करपून जातें. प्राणापलीकडे जतन करून ठेवलेल्या व मुसलमान फोडतील या धाकानें पुरून ठेवलेल्या मेहकर, वाशीम व सावळापूर वगैरे ठिकाणच्या सुंदर सुंदर मूर्ति अद्याप जमिनीच्या उदरांतून निघत आहेत व मुसलमानांच्या भयंकर जुलमाची व हिंदूंच्या धर्मप्रेमाची व निर्बलतेची साक्ष देत आहेत. पाथरीचा ब्राह्मण कुळकर्णी बाटविल्यानंतर आपल्या तेजानें निजाम-शाही राज्याचा स्थापक म्हणून पुढें येत आहे व बाळापूर एथील ब्राह्मण देशपांडे मुसलमान झाल्यामुळें त्यांच्या मूळच्या वंशांतील मंडळी, उत्तरेच्या उदरांतील पांडवांच्या अवशिष्ट गर्भाप्रमाणें त्या घराण्यांतील एका अर्भकाचें संगोपन करून आपला धर्म व वतन प्रयासानें कायम ठेवीत आहेत. मूळचे ब्राह्मण जोशी बाटविल्या-मुळें कैक पिढ्यांनंतर अद्याप जोसीपणाचीं वतनाचीं कृत्यें गुमास्त्या ब्राह्मणाचे हातानें करवून तें वतन अद्याप पोटाशीं धरून आहेत. एकादशी व महालक्ष्मीचा सण करणारे मुसलमान मागील पिढीपर्यंत त्यांच्या हिंदुत्वाची आठवण देत असत.

रामदासी पंथ, नाथ पंथ व पंढरपुरचा वारकरी पंथ वऱ्हा-डांतहि पूर्ण जागृत असून पंढरपुरास पुराप्रमाणें जात होता व

तिकडील कल्पना इकडे पेरीत होता. त्यानंतरच्या काळांतही वऱ्हाडांत धर्मजागृतीचें काम मागें पडलें नाहीं. सुरजी अंजनगांव येथील देवनाथमहाराजांनीं ( १७५४–१८२१ ) नाथपंथ स्थापन करून सर्व उत्तर वऱ्हाडभर व बऱ्हाणपुर-ग्वाल्हेरपर्यंत आपल्या शाखांचें जाळें तयार केलें. दक्षिणेंत देऊळगांवराजा, शिंदखेडापासून पैठणापर्यंत शिवदिनकेसरीचे वंशजांनीं व गोसावीनंदन यांनीं ( १२५८–१७३८ ) मठ स्थापन केले. व साकरखेड्डुलेकर—अमृतेश्वर ( अमृतराय ) हा वतनदार कुळकर्णी गृहस्थ कवि वऱ्हाडमोंगलाईपासून पुण्यापर्यंत आपल्या फारसी व हिंदी रसभरित कटावांचा टणत्कार कीर्तनांत करीत होता ( १६९८–१७५१.) सर्व वऱ्हाडभर सांधुसंतांचे मठ कायम आहेत. राजे जाधवराव, राजे उदारामासारखे मुसलमानांचे कां होईना, पण एका तऱ्हेनें हिंदूंचें आत्मतेज व कर्तृत्व दाखवीत होते. एकंदरींत या परिस्थितीमुळें व अंतस्थ सहानुभूतीमुळें वऱ्हाडांत महाराष्ट्रराज्य संवर्धन सोपें झालें.

बाकीच्या महाराष्ट्राप्रमाणें सर्व वऱ्हाडांतहि ग्रामसंस्था व परगणे हिंदूंच्या हातीं असत. तेथें मुसलमानांचा कधीं रिघाव झाला नाहीं. मागें सांगितलें आहेच कीं, राज्यक्रांत्यांच्या महापुरानें चालुक्य, यादव व निरनिराळीं मुसलमान घराणीं वगैरे सर्व वृक्ष उन्मळून पडले; परंतु पाटील, कुळकर्णी, वतनदार लोक व परगण्याचे देशमुख हे लव्हाळें मात्र वेळ येईल तसें गरिबीनें वांकून जीव धरून अद्याप उभें आहे.

हे लोक अर्थात् कर्तबगार असत व योग्य संधि येतांच आपल्या आंगचा गुण दाखवीत असत. निजामशाही घराण्यांत कंवरसेन ऊर्फ कावडसेन या ब्राह्मणास पेशवा नेमल्यापासून निरनिराळ्या कर्तबगार हिंदू लोकांस सरकारी महत्त्वाच्या जागा व सरदाऱ्या मिळण्यास सुरवात झाली. सदरहू लोकांनीं आपल्या आंगचें तेज व शहाणपण दाखवून आपणास मोठमोठीं कामें करतां येतात असें दाखवून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें स्वराज्यास मदत केली.

असे पुरुष वऱ्हाडांत या काळापूर्वीं व नंतरहि बरेच झाले. त्यांतील विशेष प्रसिद्ध शिंदखेडचे मराठे देशमुख " जाधवराव राजे " व वाशीम माहूरकडील ब्राह्मण देशमुख "राजे उदाराम" हे प्रमुख आहेत. पुढील काळांत तर पुष्कळच झाले.

त्या वेळचें खरें महाराष्ट्र म्हणजे वऱ्हाडापासून तों दक्षिणेस दौलताबाद, पैठण हें असून हा भाग सुधारणेचें केंद्र होतें. वास्तविक हीं ठिकाणें मूळचे " विदर्भांत " व महाराष्ट्रांतच होतीं. पुढील भक्त मंडळीच्या ओघांत ही सुधारणा पश्चिमेकडे व दक्षिणेकडे वाढत गेली. मुसलमान राजे व सुभेदार विजापूर, औरंगाबाद, एलिचपूर, अहमदनगर वगैरे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं रहात असत. वऱ्हाड स्वतंत्र सुभेदारांच्या हाताखालीं असून दक्षिणेकडून उत्तरेकडे व उत्तरेकडून दक्षिणेकडे जाण्याचा हमरस्ता वऱ्हाडांतून होता, त्याचप्रमाणें वऱ्हाडचा सुपीकपणा व सुसंपन्नता या गुणांमुळें हा प्रांत राज्यास फार महत्त्वाचा होता म्हणून त्याकडे राजांचें व अधिकाऱ्यांचें दुर्लक्ष होणें शक्य नव्हतें. सैन्यास प्रतिरोधक असे सह्याद्रिसारखे पर्वत वऱ्हाडांत नाहींत व अवघड ठिकाणीं उत्तम रस्ते तयार झालेले असून वेशी व नाकेबंदी कायमची झालेली होती.

उलटपक्षीं शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य स्थापन केल्याचा मान ज्या प्रदेशास प्राप्त झाला तो प्रदेश म्हणजे डोंगराळ, अगदीं एकीकडचा असून विशेष सुपीक अगर संपन्न नव्हता. राज्याच्या केंद्रस्थानापासून तो फार दूर असल्यामुळें जवळच्या घडामोडींतून तिकडे दूरवर लक्ष देण्यास राज्यकर्त्यांस विशेष फावत नसे. जीव तोडून लक्ष देण्याइतका तो सुपीक व समृद्धहि नव्हता. तिकडे कायमचे रहाणारे सुभेदार सुद्धां नसत; मग तिकडे पाहतो कोण? त्यामुळेंच शिवाजीनें बराच धुमाकूळ माजविला तरी तिकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. नवीन राज्यस्थापनेस व कमी बळाच्या सैन्यास प्रबळ लष्कराविरुद्ध आश्रय देण्यास तेथील डोंगर व खोरीं फार उपयोगी असत. त्याचप्रमाणें लंगोटी घालणारे गरीब परंतु कांटक मावळे वीर मदतीस मिळविण्याची तीच जागा होती. वऱ्हाडांतील व या मध्यवर्ती महाराष्ट्रांतील कायमचे पिढीजाद वतनदार व खाऊनपिऊन सुखी असलेले लोक अशा धाडसाचे कामीं उपयोगी पडण्यासारखें कधींच नसतात. त्यांचें नफानुकसान बरेंच मोठें असल्यामुळें ते संपत्तीच्या व आधिभौतिक सुखाच्या मायापाशांत फारच गुंतलेले असतात, व ती स्थिति बदलून संकटाची स्थिति अंगावर घेण्यास ते केव्हांच तयार होण्यासारखे नसतात. उलटपक्षीं ज्यांची भौतिक स्थिति थोडीशी कष्टप्रद असते, ज्यांचें नफानुकसान विशेष नसतें ते लोक अशा धाडसाचे कामीं फार उपयोगी असतात. त्यांच्या स्थितींत विशेष फरक पडण्याचा नसतो. तरीसुद्धां वऱ्हाडांत स्वराज्यस्थापनेचे प्रयत्न मुळींच झाले नाहींत असें मात्र नाहीं. अगदीं आरंभीं खेरल्याचा नरसिंगराय यानें बहामनी राजांच्या वेळीं वऱ्हाडांतील सर्व हिंदूंच्या मदतीनें वऱ्हाड

मुसलमानांच्या ताब्यांतून सोडवून स्वतंत्र केला; परंतु हें स्वातंत्र्य फार वेळपर्यंत टिकलें नाहीं. शिंदखेडचे जाधवराव हे सुद्धां त्यांचेसमोर बादशहाचा हिंदूवर जुलूम होत असतां त्यांचेवर उलटल्याचा उल्लेख त्यांचे बखरींत आहे.

यामुळें इतर परिस्थिति साधारपणें सारखी असतांना व शिवाजीमहाराजांचें वतन व आप्तसंबंधी या प्रदेशांत असतांना वरील कारणांमुळें या कामास जास्त योग्य अशा दूरच्या डोंगराळ भागांत स्वराज्यस्थापनेच्या पवित्र कामास आरंभ झाला. या प्रदेशाची परिस्थिति व नैतिक पाठबळ हें शिवाजीमहाराजांस कमी उपयोगीं पडलें असेंहि नाहीं. पुढील प्रसाराच्या कामीं या अनुकूल परिस्थितीचा फायदा मिळून राज्यविस्ताराचें काम सोपें झालें.

मराठी राज्यसंस्थापनेस वऱ्हाडाकडून महत्वाची मदत झाली. मराठी राज्य संस्थापकाचें अंगांत आईकडून वऱ्हाडचें रक्त खेळत होतें व सर्व इतिहासकारांच्या एकमतानें या सर्व कृत्यास राजमाता जिजाबाईचा उपयोग शिवाजीस फार झाला. बापाचा व शिवाजीचा बहुतेक संबंधच पडला नाहीं व मातुलपक्षाप्रमाणेंच शिवाजीच्या पित्यानेंही मरेपर्यंत मोंगलांची नोकरी केली.

या भागाचे आरंभीं सांगितल्याप्रमाणें मुसलमानी राज्यांत जे हिंदु सरदार उदयास आले त्यांत शिंदखेडचे जाधवराव हे प्रख्यात आहेत. वऱ्हाडांतील किंबहुना महाराष्ट्रांतील सर्व जुन्या इतिहासप्रसिद्ध घराण्यांत यांच्या तोडीचें दुसरें घराणें नाहीं. देवगिरीचें यादवांचें राज्य मुसलमानांनीं बुडविल्यानंतर त्यांच्या शाखा निरनिराळ्या दिशेस पळाल्या. त्यांतील ही एक शाखा देवगिरीजवळच शिंदखेडास येऊन राहिली.

हे शिंदखेडचे वतनदार* देशमुख होते. त्यांनीं आपल्या पराक्रमानें २७ महाल व बावन्न चावड्याची देशमुखी मिळविली. व निजामशाहींत पांच हजार स्वारांची मनसब मिळविली. वाढत वाढत हे जाधव "राजे जाधवराव" होऊन निजामशाही राज्याचे आधारस्तंभ बनले. इ. स. १६०० चे पूर्वींच जाधवराव हे पिढीजाद सरदार म्हणून त्यांचें मोठेंच प्रस्थ असे. विठोजी जाधवराव हा तालिकोटचे लढाईत मुसलमानांच्या तर्फेनें लढत होता.

अचलोजी व विठोजी जाधवरावांच्या नंतर लक्ष्मण ऊर्फ लखूजी जाधवरावानें सर्वांवर ताण करून आपल्या घराण्याचा नांवलौकिक फारच वाढविला. इतिहासांत तो " लुकजी" या नांवानें प्रसिद्ध आहे. अकबराचा पुत्र मुराद यानें अहमदनगरास वेढा दिला त्यांत प्रसिद्ध चांदबिबीनें जो पराक्रम दाखविला व पुढें पडती निजामशाही तोलून धरण्यांत जी मुत्सद्देगिरी दाखविली त्यांत लखूजी जाधवरावाचा भाग प्रामुख्यानें होता. मोंगलाच्या दुसरे हल्ल्यांत सुद्धां चांदबिबीचा खून झाल्यानंतर व नगरचा किल्ला मोंगलांचे हातीं गेल्यानंतर लखूजी जाधवरावानें दुसरे सरदार जमा करून अज्ञान राजास पळवून दुसरीकडे नेलें व तेथें बरेच दिवस निजामशाहीचा पडता काळ लांबविला. या वेळेस लखूजीस दहा हजारांची मनसब होती.

या वेळेस लखूजी जाधवराव करील ती पूर्वदिशा अशी निजामशाहीची स्थिति होती. लखूजीचें मुख्य ठिकाण नौकरीनिमित्त दौलताबादेस असे.

---

* लुखजीनें वतनदारी कशी मिळविली वगैरे मनोरंजक माहिती भा.१५ मध्यें पहा.

मुसलमानांच्या ताब्यांतून सोडवून स्वतंत्र केला; परंतु हें स्वातंत्र्य फार वेळपर्यंत टिकलें नाहीं. शिंदखेडचे जाधवराव हे सुद्धां त्यांचेसमोर बादशहाचा हिंदूवर जुलूम होत असतां त्यांचेवर उलट-ल्याचा उल्लेख त्यांचे बखरींत आहे.

यामुळें इतर परिस्थिति साधारपणें सारखी असतांना व शिवाजीमहाराजांचें वतन व आप्तसंबंधी या प्रदेशांत असतांना वरील कारणांमुळें या कामास जास्त योग्य अशा दूरच्या डोंगराळ भागांत स्वराज्यस्थापनेच्या पवित्र कामास आरंभ झाला. या प्रदे-शाची परिस्थिति व नैतिक पाठबळ हें शिवाजीमहाराजांस कमी उपयोगीं पडलें असेंहि नाहीं. पुढील प्रसाराच्या कामीं या अनु-कूल परिस्थितीचा फायदा मिळून राज्यविस्ताराचें काम सोपें झालें.

मराठी राज्यसंस्थापनेस वऱ्हाडाकडून महत्वाची मदत झाली. मराठी राज्य संस्थापकाचें अंगांत आईकडून वऱ्हाडचें रक्त खेळत होतें व सर्व इतिहासकारांच्या एकमतानें या सर्व कृत्यास राजमाता जिजाबाईचा उपयोग शिवाजीस फार झाला. बापाचा व शिवा-जीचा बहुतेक संबंधच पडला नाहीं व मातुलपक्षाप्रमाणेंच शिवाजी च्या पित्यानेंही मरेपर्यंत मोंगलांची नोकरी केली.

या भागाचे आरंभीं सांगितल्याप्रमाणें मुसलमानीं राज्यांत जे हिंदु सरदार उदयास आले त्यांत शिंदखेडचे जाधवराव हे प्रख्यात आहेत. वऱ्हाडांतील किंबहुना महाराष्ट्रांतील सर्व जुन्या इतिहासप्रसिद्ध घराण्यांत यांच्या तोडीचें दुसरें घराणें नाहीं. देव-गिरीचें यादवांचें राज्य मुसलमानांनीं बुडविल्यानंतर त्यांच्या शाखा निरनिराळ्या दिशेस पळाल्या. त्यांतील ही एक शाखा देव-गिरीजवळच शिंदखेडास येऊन राहिली.

हे शिंदखेडचे वतनदार* देशमुख होते. त्यांनीं आपल्या पराक्रमानें २७ महाल व बावन्न चावड्याची देशमुखी मिळविली. व निजामशाहींत पांच हजार स्वारांची मनसब मिळविली. वाढत वाढत हे जाधव "राजे जाधवराव" होऊन निजामशाही राज्याचे आधारस्तंभ बनले. इ. स. १६०० चे पूर्वींच जाधवराव हे पिढीजाद सरदार म्हणून त्यांचें मोठेंच प्रस्थ असे. विठोजी जाधवराव हा तालिकोटचे लढाईत मुसलमानांच्या तर्फेनें लढत होता.

अचलोजी व विठोजी जाधवरावांच्या नंतर लक्ष्मण ऊर्फ लखूजी जाधवरावानें सर्वांवर ताण करून आपल्या घराण्याचा नांवलौकिक फारच वाढविला. इतिहासांत तो " लुकजी" या नांवानें प्रसिद्ध आहे. अकबराचा पुत्र मुराद यानें अहमदनगरास वेढा दिला त्यांत प्रसिद्ध चांदबिबीनें जो पराक्रम दाखविला व पुढें पडती निजामशाही तोलून धरण्यांत जी मुत्सद्देगिरी दाखविली त्यांत लखूजी जाधवरावाचा भाग प्रामुख्यानें होता. मोंगलाच्या दुसरे हल्ल्यांत सुद्धां चांदबिबीचा खून झाल्यानंतर व नगरचा किल्ला मोंगलांचे हातीं गेल्यानंतर लखूजी जाधवरावानें दुसरे सरदार जमा करून अज्ञान राजास पळवून दुसरीकडे नेलें व तेथें बरेच दिवस निजामशाहीचा पडता काळ लांबविला. या वेळेस लखूजीस दहा हजारांची मनसब होती.

या वेळेस लखूजी जाधवराव करील ती पूर्वदिशा अशी निजामशाहीची स्थिति होती. लखूजीचें मुख्य ठिकाण नौकरीनिमित्त दौलताबादेस असे.

---

* लुखजीनें वतनदारी कशी मिळविली वगैरे मनोरंजक माहिती भा. १५ मध्यें पहा.

याच वेळेस भोसले घराणें जाधवरावांच्या आश्रयानें पुढें आलें. शिवाजीचा आजा मालोजी व त्याचा भाऊ विठोजी भोसले हे दौलताबादेजवळ वेरूळ म्हणून गांव आहे तेथें येऊन राहिले. व कांहीं शेती करूं लागले. तेथें बायका ठेवून चाकरी करितां शिंदखेडास आले.ऽ नंतर ते दोघे भाऊ लखूजी जाधवरावांचे घरीं बारगीर म्हणून राहिले व त्यांनीं फार चांगली नोकरी करून आपल्या यजमानाची मर्जी प्रसन्न केली ( इ. स. १५७७.) असें म्हणतात कीं, मालोजी शरीरानें असा धिप्पाड होता कीं, त्याचे स्वारीस घोडें टिकत नसे. पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें बारगिरास घोडें मनसबदारास द्यावें लागे. त्यामुळें जाधवरावानें त्यास बारगिरीवरून काढून आपले देवडीवर नोकरी दिली, दोघां भावांस जेवण व दरमहा प्रत्येकीं पांच होन प्रमाणें पगार होता. *देवडीवरील नोकरी हलके दर्जाची त्यामुळें कांहीं दिवस नौकरी करून हुशारी दाखविल्यानंतर जाधवरावानें शिफारस करून त्यास सरकारी सैन्यांत शिलदारी देवविली. पुढें मालोजी आपल्या हुशारीनें बराच पुढें आला. यानंतर रंगपंचमीचे दिवशीं विनोदानें जाधवराव बोलतांच तेंच पक्कें धरून मालोजीनें सोयरीक लादल्याची प्रसिद्ध गोष्ट घडली.

रंगपंचमीची गोष्ट दौलताबादेस झाली अगर शिंदखेडास झाली हें नक्की माहीत नाहीं. शिंदखेडास जाधवरावांच्या घराण्याच्या मोठमोठ्या इमारती, महाल, कचेऱ्या, समाधि व जलविहार स्थानें आहेत. त्यापैकीं बहुतेक पडक्या स्थितींत आहेत. तरी हल्लींच्या स्थितींत सुद्धां जाधवरावांचे राजवैभवाची त्या साक्ष देतात.

---

ऽशि. छ. बखर भारतवर्ष १—११–१२.

*शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर भारतवर्ष पु. १ अ.११।१२

सदरहू इमारतीपैकीं एक मोठा महाल "रंगपंचमीचा महाल" या नांवानें प्रसिद्ध आहे व तेथें प्रसिद्ध रंगपंचमीचा प्रकार घडला. अशी दंतकथा आहे. दौलताबाद व शिंदखेड यांत फारसें अंतर नाहीं व मुख्य वतनदारीचें गांव शिंदखेड. तेव्हां तेथेंच ही गोष्ट घडली असावी असें वाटतें. सदर प्रकार खालीलप्रमाणें झाला.

रंगपंचमीचे दिवशीं आपले महालांत सर्व सोयरे व मानकरी यांस बोलावून नाच, रंग, गुलाल वगैरे खेळण्यांची जाधवरावांची रीत असे. त्याप्रमाणें एके पंचमीस सर्वांबरोबर मालोजी यासहि बोलावलें. यावेळेस मालोजी थोडासा योग्यतेस चढला होता परंतु जाधवरावाच्या बरोबरीचा अर्थातच नव्हता. मंडळींत मालोजीबरोबर त्याचा पुत्र शहाजी ५ वर्षांचा व लखूजी जाधवरावाबरोबर त्यांची कन्या जिजाबाई तीन वर्षांची ही होती. जाधवरावानें शहाजी सुंदर व चलाख पाहून त्यास जवळ बसविलें. वडील माणसांचें पाहून हीं दोन्ही मुलेंहि बालस्वभावास अनुसरून एकमेकांच्या अंगावर गुलाल टाकूं लागलीं त्यामुळें सर्व लोकास गंमत वाटली. जाधवराव विनोदानें बोलले, "हा जोडा फार सुंदर शोभतो. मुली, हा नवरा तुला आवडतोकाय ?"

मालोजीची बायको म्हाळसाबाई हीं निंबाळकर या मराठे सरदाराची मुलगी असल्यामुळें उच्च मराठा घराण्याशीं त्याची सोयरीक झालीच होती परंतु जाधवरावासारख्या त्यावेळच्या वरिष्ठ घराण्याशीं आपला संबंध जडावा ही महत्वाकांक्षी मालोजीस इच्छा होतीच. वरील वचन मालोजीनें झेलून तेथेंच सर्वांसमक्ष बोलला "हें वचन थोरामोठ्याचें आहे. व्यर्थ न जावें, पहा हो सर्व मंडळी, जाधवरावांनीं आमच्या मुलास आपली मुलगी दिली."

जाधवरावास याचें विशेष महत्व वाटलें नाहीं व त्यानें थट्टेवरच घालविलें. मालोजीच्या धारिष्टाबद्दल सर्वांस अचंबा वाटला. परंतु वरील गोष्ट जात जात जाधवरावाची बायको म्हाळसाबाई इचे कानावर गेली. त्या तेजस्वी व मानी बाईस हा प्रकार रुचला नाहीं. बायकांस स्वभावतःच हौस जास्त असते व आपली लाडकी मुलगी आपल्या बरोबरीच्या प्रसिद्ध सरदारी घराण्यांत पडावी अशी तिची इच्छा होती, मालोजी भोसले आपल्या देवडीवरील नौकरीपासून वाढलेला व आपल्या हाताखालचा नोकर, जाधवरावांच्या बरोबरीचा होईल अशी त्या वेळी उमेद नव्हती, वतनवाटा कांहीं नाहीं सरदारी नाहीं, दौलत नाहीं अशा घरीं आपली मुलगी पडावी हें तिला कसें रुचणार ?

जाधवराव घरीं येतांच तिनें आपला नकार स्पष्ट कळविला. "सोयरीक या मुलीस करणें ती मातबर, मनसबदार पाहून ही कन्या बहुत समारंभें ज्याचे घरीं फार दौलत, वस्त्रें अलंकार तेथें द्यावयाची, आपण सभेंत बोलला हें अनुचित, यास देणें आमचे चित्तास येत नाहीं."

जाधवरावांनीं सांगितलें कीं, "आम्ही स्वाभाविक बोललों वचन कांहीं गुंतलें नाहीं." या प्रमाणें स्त्रीचें समाधान करून जाधवरावांनीं मालोजीस निरोप पाठविला कीं, शरीरसंबंधाची* गोष्ट आपण बोलू नये, आमचे घरांत कोणाचे विचारास येत नाहीं. ब्रह्मसूत्र तेथें घडेल."

मालोजीनें खरें कारण ओळखून द्रव्य मिळवून नांव लौकिक कमावला व पुनः मागणी केली. पुन्हां जाधवरावानीं नकार दिला. नंतर निंबाळकरामार्फत निजामशहाकडून मालोजीनें आग्रह करविला

* चिटणीस बखर पान १५.

जाधवरावांनीं, " यांची व आमची वतनदारींत व अधिकारांत बरोबरी नाहीं. आम्ही बावन्न चावड्यांचे देशमुख व बादशहाचे वजीर म्हणवितो. " हे सांगतांच मालोजीस पांच हजारी मनसब व जाधवरावांच्या बरोबरीचा " राजे " हा किताब व शिवनेरी व चाकण हे दोन किल्ले व पुणें व सुपें या परगण्यांची जहागीर बादशहानें दिली.† यानंतर कांहीं सबब न राहिल्यामुळें जाधवरावांनीं कबूल केलें व हें महत्वाचें लग्न दौलताबादेस इ.स. १६०४ * मध्यें झालें. शिंदखेडाहून नवरी मुलगी दौलताबादेस आणवून बादशहानें समक्ष हजर राहून हें लग्न करविलें.

कवींची उक्ति आहे कीं, " दोघे तेजस्वी पुरुष एकत्र झाले कीं त्यांचें एकमेकांशीं कधींच पटत नसतें. " याप्रमाणें पुढें जाधवराव व भोंसले या दोन घराण्यांचें झालें. विवाह–रज्जूंनीं बांधलीं गेलेलीं हीं दोन घराणीं यापुढें एकमेकांच्या नेहमीं विरुद्ध राहिलीं. परकी मराठे शिवाजीस अनुकूल झाले. परंतु जाधवरावांचें घराणें प्रथम निजामशाहीस व नंतर दिल्लीपतीस चिकटून राहिलें ते अखेरपर्यंत तसेंच राहिलें.††

मालोजी जिवंत होता तोंपर्यंत व शहाजी कारभार करूं लागल्यानंतर आरंभीं कांहीं वर्षें त्यांचें जाधवरावाशीं वैमनस्य आलें

---

† मालोजीनें दिलेल्या सनदांचा उल्लेख इकडील कागदपत्रांत आला आहे. [ खाजगी संग्रह ]

* चिटणीस बखर शके १५२६ ठाणें मराठी दप्तर रुमाल १– मार्गशीर्ष शुद्ध ५ शके १५२७ फसली १०१५.

†† खुद्द शिवाजीच्या वेळीं लुकजी जाधवरावाचा एक नातु नाशिक-त्रिंबकचे ठाण्यावर मोंगलातर्फें ठाणेदार होता. त्यावर इ. स. १६७२ मध्यें मोरो त्रिंबक यानें हल्ला करून त्याचा पराभव केला व कैद केलें होतें ( यदुनाथ सरकारचें शिवाजी पान २२२. )

नाहीं. अहमदनगरच्या पडत्या काळांत मलिकंबरास दोघांचेंहि साह्य होतें. त्यांच्या मदतीनें मलिकंबरानें शहाजनाच्या मोंगल सैन्याचा पराभव केला.

शहाजहानानें जाधवरावांचें वजन व युद्धचातुर्य पाहून त्यास आपले पक्षाकडे वळविण्याचा प्रयत्न चालविला तो आपले पक्षास मिळाल्याशिवाय निजामशाही आपले हातीं येणें कठीण हें त्यास कळून चुकलें. इतक्यांत असें झालें कीं निजामशाहींत मूर्तिजा बाद-शहा लहान असून त्याची आई कारभार करीत होती. ती शहाजी भोसल्याच्या तंत्रानें वागूं लागल्यामुळें त्याचें दरबारांत वर्चस्व वाढलें तें मलिकंबर व लखूजी जाधवरावास सहन न झाल्या-मुळें त्यांचें बिनसलें व ते शहाजीच्या विरुद्ध झाले. याचा फायदा घेऊन शहाजहानानें जाधवरावास आपले पक्षास बोलाविलें. निजामशाहींत आपलें वर्चस्व नाहींसें झालें हें पाहून जाधवराव मोंगलाकडे गेला व निजामशहाची नोकरी त्यानें सोडून दिली ( इ. स. १६२१ )शहाजहानानें त्यास शहाजाद्यास सुद्धां न मिळणारी २४००० स्वार व १५००० पायदळांची मनसब दिली व शिवाय त्याचे पुष्कळ भाऊबंदांस व आप्तांस मोठमोठ्या जागा दिल्या व या-प्रमाणें निजामशाहीच्या या प्रबळ सरदारास आपलेकडे वळवून घेतलें.

जाधवराव मोंगलास मिळतांच निजामशाहीस दिल्लीपती-च्या हातांत जाण्यास कांहींच वेळ लागला नाहीं. जाधवरावाच्या मदतीनें मोंगलांनीं अहमदनगरावर स्वारी करतांच शहाजी व मूर्तिजा निजामशहा व त्याची आई तेथून पळून माहुलीच्या किल्यांत गेले व शहाजी ...

तो हजर होता. इ०स० १६२४ मध्यें भातवडीजवळ मलिकंबरानें मोगल लष्करावर एकदम एक छापा घातला त्यावेळींहि लुकजी व वऱ्हाडांतील दुसरे प्रसिद्ध ब्राम्हण सरदार वाशीमकर "राजे उदाराम" हे आपल्या लष्करांसह मोंगलाकडेस होते. या छाप्यांत सर्व लष्कर गाफल असल्यामुळें मोंगलांचा मोड झाला. जाधवराव व उदाराम कसे तरी पळून गेले. बाकीचें पुष्कळ मोंगल सरदार धरले व मारले गेले. *

जाधवरावानें माहुलीच्या किल्ल्यास वेढा दिला व मुर्तिजास ताब्यांत घेण्याचा निश्चय केला. शहाजीनें वेढा देणाऱ्या सैन्याची रसद वगैरे बंद करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु मुर्तिजाची आई दम धरीना. तिनें जाधवरावाशीं समेट केल्यामुळें शहाजीची चळवळ अनायासेंच बंद झाली कारण ज्याचे नांवानें कारभार करावयाचा तोच विरुद्धपक्षाचे अंकित झाला.

शहाजीचा निजामशाहींतील आधार तुटल्यामुळें तो तेथून विजापूरच्या बादशाहाकडे नौकरी धरण्याकरितां निघाला. याचवेळीं जाधवरावानें त्यास माहुलीच्या किल्ल्यावरून हाकून देऊन त्याचा पाठलाग केला. शहाजीबरोबर जिजाबाई असून ती गरोदर होती. व तिचें पोटांत मराठी राज्याचा बालरवि गर्भरूपानें वाढत होता. जिजाबाईच्या गरोदरपणामुळें तिच्यासुद्धां शहाजीस त्वरेनें पळतां येईना म्हणून त्यानें निजामशाहींतील त्याच्या एका भरंवशाच्या श्रीनिवासराव नांवाच्या अमलदाराच्या स्वाधीन केलें. परंतु या सासरे जावयांच्या पाठलागांत ती आपला बाप लखूजी जाधवराव याचे हातांत सांपडली (इ०स० १६२७). तिला प्रस-

तीकरितां माहेरीं चालण्याबद्दल जाधवरावानें पुष्कळ आग्रह केला परंतु म्हाळसाबाई सारख्या मानी आईची मुलगी जिजाबाई इनें या स्थितींत माहेरीं जाण्याचें साफ नाकारून व नवऱ्याचीहि पर्वान करितां परभारें तिचे जहागिरीचे गांवीं शिवनेरीस पोंचवून देण्याबद्दल तिनें बापाची विनंती केली व तेथें जाऊन राहिली. लौकरच प्रसूति होऊन शिवाजीचा जन्म झाला. शहाजी यापुढें विजापुराकडेच राहिला.

मुर्तिजा निजामशहा मरण पावून त्याचा पुत्र हुसेन हा गादीवर बसला मलिकंबर मेल्यानंतर त्याचा पुत्र फत्तेखान हा कारभार चालवूं लागला. (हा मोंगलास फितूर झाला आहे. अशा संशयावरून मुर्तिजानें यास कैदेंत टाकलें होतें. पण यानें सुटून मुर्तिजास ठार मारलें) या वेळस निजामशाहीची राजधानी दौलताबादेस आली होती. निजामशाही बुडविण्याची शहाजहानाची एकसारखी धडपड होती परंतु ती अजीबात बुडूं नये ही जाधवरावाची मनापासून इच्छा होती व तो त्या खटपटींत असे. अशा खटपटींत जाधवराव असतांना हुसेन निजामशहानें फत्तेखानाच्या सल्ल्यानें दौलताबादेच्या किल्ल्यांत राजकारणाचें व मेजवानीचें निमित्त करून लखूजीस बोलावून त्याचा व त्याचा पुत्र अचलकर्ण उर्फ अचलोजी व त्याचे आणखी कांहीं आप्त यांचा खून करविला * (इ. स. १६२९)

या विश्वासघातामुळें व शहाजहानाच्या खटपटीमुळें पुष्कळ

लखूजी जाधवरावाचे खुनानंतर त्याची बायको गिरजाबाई व त्याचा भाऊ जगदेवराव आपलें सर्व लष्कर घेऊन आपली सून व नातू सुजनसिंह यास बरोबर घेऊन शिंदखेडास आले. लुकजीची बायको आपला दीर जगदेवराव यास बरोबर घेऊन मोंगलाकडे गेली. तिनें जगदेवरावास ९००० स्वारांची मनसब देवविली. या वेळेपासून जाधवराव कायमचे मोंगलाकडे राहिले. जगदेवरावाची शाखा पुष्कळ दिवस दिल्लीस राहिली.

शहाजी मोंगलांची नोकरी सोडून परत निजामशाहींत आला. मोंगलांनीं इ. स. १६३३ मध्यें दौलताबादचा किल्ला घेतला व निजामशहास कैद करून ग्वाल्हेरास पाठविलें व इ. स. १६३६ मध्यें निजामशाहीची कायमची इतिश्री झाली. जगदेवराव जाधव हा मोंगलाकडून शहाजीशीं लढत होता.

भोंसले व जाधवराव यांच्या विरुद्ध हितसंबंधामुळें त्यांचें नेहमींचेंच वांकडें होतें. त्यामुळें शहाजीचे जिजाबाईशीं अजिबात बनेनासें होऊन तिला त्यानें जवळ जवळ टाकून दिल्यासारखेंच केलें होतें ती आपली दोन्हीं मुलें संभाजी व शिवाजी यांसह आपल्या जहागिरीवर व कधीं कधीं माहेरीं शिंदखेडास आपले आई जवळ रहात असे. शहाजीनें विजापूरच्या दरबारांत संधान बांधून त्या राज्यांतील एक सरदार बाजी मोहिते सुपेकर याची बहीण तुकाबाई इशीं लग्न केलें. त्यामुळें तर हा भिन्नभाव जास्त वाढला. शहाजीच्या विरुद्धपणामुळें एकेकाळीं जिजाबाईस दोन्हीं मुलांसह* मोंगलांनीं १६३४ मध्यें पकडलें होतें परंतु जगदेवराव

जाधवरावानें "ती आमची मुलगी असून, शहाजीचें व तिचें पटत नाहीं" असें लिहून तिला माहेरीं आणविलें. यानंतर एक दोन वर्षें ती मुलांसह शिंदखेडास व दौलताबादेस रहात होती.

निजामशाहीच्या अखेरीच्या लढायांत जगदेवराव जाधवानें जी कामगिरी केली तीबद्दल त्यास मोंगलांकडून "रुस्तुमराव" हा किताब मिळाला व लखूजी जाधवरावाच्या नांवानें असलेली ९२ परगण्याची देशमखीहि त्याच्या नांवानें झाली. शिवाय फौजेकरितां जहागीर मिळून त्याचे दिल्लीच्या दरबारांतहि मोठें वजन वाढलें.

जगदेवरावाचे वंशजांपैकीं एक शाखा दिल्लीस जाऊन दरबारांत राहिली व त्यास जगदेवरावाचा "रुस्तुमराव" हा किताब व मानपान चालू राहिला याच घराण्यांतील "मानसिंग रुस्तुमराव" याची कन्या अंबिकाबाई ही दिल्लीस इ.स.१ ,९९ मध्यें औरंगजेबाच्या मध्यस्तीनें व त्याच्या मुलीच्या आग्रहानें शाहू राजास दिली. शाहूची ही बायको दिल्लीसच मरण पावली. दक्षिणेंत आलीच नाहीं.

जिजाबाई शिंदखेडाहून इ. स. १६३४—३९ मध्यें आपले नवऱ्याचे जहागिरीवर पुनः राहण्यास गेली. तिनें जातांना आपली आई म्हाळसाबाई व तिचा नातू सुजनसिंह ऊर्फ संताजी वगैरे मंडळीस आपले बरोबर नेलें. ते तिकडेच कायमचे राहिले. व शिवाजीच्या पुढील कारस्थानांत त्यांनी साह्य करून आपलें सर्व आयुष्य तिकडे खर्च केलें.

संताजी जाधवाचा पुत्र संभाजी जाधव यानें प्रसिद्ध बाजी देशपांडे यांचे बरोबर मोंगलाशीं युद्ध करून शिवाजी रांगणा किल्ल्यांत पोहोंचेपर्यंत खिंड अडवून धरली व संताजीचा

नातू प्रसिद्ध धनाजी जाधव हा शिवाजीचा सेनापति होता. व त्यानें स्वराज्यांत अनेक पराक्रम केले. ते इतिहासप्रसिद्धच आहेत.†

लखूजी जाधवरावानें जिजाबाईचे लग्नांत तिजबरोबर नारो त्रिंबक* हणमंते नांवाचे ब्राह्मण व गोमाजी नाईक पानसंबळ नांवाचे मराठे गृहस्थऽ आपले मर्जीतले म्हणून

---

† धनाजी जाधवाचा लुकजी जाधवाशीं वर संबंध दाखविला आहे तो मराठामित्रकारांनीं " मराठे कुळाचा इतिहास "या पुस्तकांत दर्शविल्याप्रमाणें लिहिला आहे.त्याचाच अनुवाद सरदेसाई यांनीं केला आहे. परंतु प्रस्तुत लेखकास या संबंधाबद्दल अद्याप शंका आहे. मराठामित्रकारांनीं आपल्या विधानाच्या पुष्टीकरितां आधार दिला नाहीं. प्रसिद्ध ऐतिहासिक वाङ्मयांत यास आधार नाहीं. जाधवरावांची अप्रसिद्ध बखर प्रस्तुत लेखकाजवळ आहे. तींतहि याला आधार नाहीं; परंतु मराठामित्रकारांच्या अनुमानास पुष्टि देणारे अप्रत्यक्ष दाखले कांहीं ठिकाणीं सांपडतात. ते पुढें भा. १५ मध्यें दिले आहेत.

* शिवप्रताप बखर पा. २४ हे हणमंत्याचें घराणें शिवाजीकडे फार प्रसिद्धीस आलें. यांचें घराण्यांत सुमंतपद व मुजुमदारी चालू होती नारोपंताचा मुलगा रघुनाथपंत यानें तंजावरास व्यंकोजीचा कारभार केला जाधवरावांचे संबंधानें वऱ्हाडांतील पुष्कळ कर्ते पुरुष शिवाजीकडे व पुढें त्याचे वंशजाकडे गेले. तसेच तंजावराकडेहि बरींच घराणीं गेलीं व तेथें त्यांनीं आपली कर्तबगारी दाखविली. त्यापैकीं बऱ्याच लोकांचा वऱ्हाडाशी वतनदारी वगैरे संबंधानें अद्याप संबंध आहे. चिखली तालुक्यांतील करवंड वगैरे गांवचे देशमुख व मालक पाटील इंगळे हे जाधवरावाचे सोयरे अद्याप तंजावरासच आहेत. व्यंकोजीची बायको दीपाबाई ही इंगळ्यांचीच मुलगी. हे "राजे प्रतापरुद्र मानेराव" असा किताब लावतात.

ऽपानसंबळ याचे मुलाकडे राजारामाचे वेळेस, धनाजी जाधवाचे सेनापतिपद होतें.

कायमचे पाठविले होते. त्यांचा व त्याचे बरोबरचे मंडळींचा शिवाजीच्या राजकारणांत महत्वाचा भाग आला हें महाराष्ट्राच्या इतिहासांत वेळोंवेळीं नमूद केलें आहे. शिंदखेडच्या जाधवरावाच्या शाखा देऊळगांवराजा, किनगांवराजा अडगांवराजा, मेहुणे वगैरे गांवीं व औरंगाबादेस असून निजामाच्या राज्यांत त्यांच्या जहागिरी वगैरे उत्पन्न कायम आहे. इंग्रजींत, वऱ्हाडांत वतनदारीखेरीज करून त्यांना विशेष उत्पन्न राहिलें नाहीं. तरी सदर घराण्याचा विस्तार पांचपंचवीस गांवांतून असून सदर घराण्यास अद्याप बराच मान आहे. देऊळगांवराजा येथील प्रसिद्ध बालाजीचे संस्थान हें या घराण्यांतील एक चांगलें स्मारक आहे.

शिवाजी व औरंगजेब या दोघा असामान्य पुरुषांच्या झटापटींत शिवाजीचा प्रथम वऱ्हाडाशीं संबंध आला. दक्षिणेंत त्यावेळीं विजापूर व गोवळकोंडें हीं दोन दुर्बल मुसलमानी राज्यें जीव धरून होतीं. त्यांच्यावर एका बाजूकडून शिवाजीचा दाब व दुसरीकडून औरंगजेबाचा सदरहू राज्यें बुडविण्याचा निश्चय. शिवाजीनें त्या प्रांतांत लुटालूट करूं नये म्हणून त्यांनीं शिवाजीस चौथाई व तिचे खर्चाचे वसुलीबद्दल सरदेशमुखी दिली. त्यापासून प्रत्यक्ष शिवाजीचे अधिकारी मुलखांत शिरूं लागल्यामुळें त्यांनीं शिवाजीस नगदी रक्कम तोडून देण्याचा ठराव केला.

शिवाजीस या दोन्ही मुसलमानी राज्यांविरुद्ध मोकळें सोडून त्यांना दुर्बळ करण्यांत औरंगजेबाचा हा कावा होता कीं, परभारें दुर्बळ केल्यानंतर आपणास हीं राज्यें घेण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. पण हें चौथाई–सरदेशमुखीचें भूत क्रमानें आपले राज्याचेहि पाटीस लागणार हें त्यास कळलें नाहीं.

शिवाजी आग्र्याहून सुटून आल्यानंतर शिवाजीनें मोंगलाच्या मुलखांत विशेषच धूम माजविली त्यावेळीं औरंगाबादेस जसवंतसिंग व राजपुत्र मोअजीम यांची शिवाजीविरुद्ध नेमणूक केली होती. औरंगजेबाचा कपटीपणा व विश्वासघात शिवाजीनें बराच चव्हाट्यावर आणला व या दोन सरदारांशीं गोडगोड भाषणें सुरू केली. बादशहाचा कपटीपणा सर्वांस माहीत होता. खुद्द राजपुत्र मोअजिम याससुद्धां शिवाजीचा दोष न वाटतां औरंजेबाचाच दोष वाटला व तो शिवाजीकडे कानाडोळा करूं लागला. याचें पर्यवसान इ०स० १६६८ मध्यें पुरंदरच्या तहांत होऊन शिवाजीनें आपला पुत्र संभाजी याचे नांवानें पांच हजारांची मनसब व त्याचे खर्चाकरितां वऱ्हाडांत बाळापूर व आंवढें या दोन परगण्याचीं जहागीर मिळविली. शिवाजीनें संभाजीस प्रतापराव गुजराचे बरोबर औरंगाबादेस पाठविलें. कांहीं दिवसानीं संभाजी लहान म्हणून परत आला व प्रतापराव लष्करासह औरंगाबादेस राहिला.

पुरंदरच्या तहानंतर अहमदनगर व जुन्नर या दोन प्रांताच्या हक्काबद्दल शिवाजीनें औरंगजेबापासून पुन्हां वऱ्हाडांत नवीन जहागीर मिळविली व प्रतापरावाच्या हाताखालीं वरपंगीं बादशहाचे नोकरीकरितां परंतु खरोखर राजकीय हेतूमुळें त्यानें वऱ्हाडचे सरहद्दीवर एक कायमचें लष्कर ठेऊन दिलें.

या जहागिरीचा वसूल करण्याचें निमित्त करून शिवाजीच्या सरदारांस वारंवार वऱ्हाडांत येण्यास व लुटालूट करण्यास फावलें. लुटालूट करून शिवाय ते गांवोगांवच्या पाटील कुळकर्ण्यांकडून व देशमुख देशपांड्याकडून चौथाई व सरदेशमुखी देण्याबद्दल जबरदस्तीनें करार लिहून घेत व त्याप्रमाणें रक्कम मिळाली

म्हणजे पावत्या देत. पावती दाखविणारांस पुढें मराठ्यापासून त्रास होत नसे.

औरंगजेबाचें धोरण नेहमीं चुकत असे. पुरंदरचा तह मोडण्याचें अपेशहि त्याचेच माथीं आलें. पैशाच्या कामांत त्यानें एकसारखी काटकसर चालविली. त्यांतच शिवाजीस दिल्लीस बोलाविलें तेव्हां खर्चाकरितां एक लाख रुपये त्यानें शिवाजीस दिले होते ते परत घेण्याचे निमित्तानें त्यानें शिवाजीची वऱ्हाडांतील जहागीर जप्त केली. शिवाजीस तह मोडण्यास आयतेंच निमित्त सांपडलें.

यावेळीं प्रतापराव गुजराचें अर्धें सैन्य औरंगाबादेस व अर्धें वऱ्हाडांत होतें. शिवाजीनें पुढील धोरण ओळखून सैन्याची तयारी केलीच होती. त्यानें गुप्त रीतीनें पुढील धोरण प्रतापरावास कळविलें व झुकांडा देऊन निघून येण्यास सांगितलें.

इ० स० १६७० चे दिसेंबर महिन्यांत प्रतापराव खानदेशांतून वऱ्हाडांत शिरला व अचानक कारंजा हें शहर त्यानें कैक दिवस लुटलें. कारंजा हें त्यावेळीं व त्यापूर्वीं फार *संपत्तिमान

---

* या शहराच्या संपत्तीविषयीं एक दंतकथा वऱ्हाडांतील आबालवृद्धांस माहीत आहे. ती अशीः—

कांहीं व्यापारी कस्तुरी विकण्याकरितां हिंडत होते. कस्तुरी उंटांवर होती. इतकी कस्तुरी कोण घेणार! शेवटीं कंटाळून ते म्हणाले. "या भिकार गांवांत ही कसची खपणार!" हें रस्त्यावरून जाणाऱ्या एका गरीब दिसणाऱ्या मनुष्यानें ऐकलें व त्यानें व्यापाऱ्यांस सांगितलें, तुझे जवळची सर्व कस्तुरी मी एकटा घेतों. किती आहे ती घेऊन माझे घरीं चल. व्यापाऱ्यानें थट्टा केली कारण तो गृहस्थ श्रीमंत होता परंतु पूर्वीच्या रीतीप्रमाणें त्याचा पोषाख गरीबीसारखा होता. गांवचे लोकांनीं हा श्रीमंत सावकार आहे अशी खात्री करून दिल्यावर ते व्यापारी उंट

शहर म्हणून प्रसिद्ध होतें हल्लींहि तें वऱ्हाडांतील संपन्न गांवांपैकीं एक असून तेथें व्यापार मोठा आहे. जमीनहि अत्यंत सुपीक आहे.

प्रतापरावानें ४००० बैल व घोडे भरून रोकड, जवाहीर, सोनें, रुपें, व तलम कापड वगैरे एकंदर त्यावेळीं *एककोट रुपये किमतीचें असलेलें वित्त नेलें. शहरांतील सर्व श्रीमंत सावकारांना धरून नेऊन बसविलें व नंतर रकमा घेऊन सोडून दिलें. त्यांचेपैकीं सर्वांत अत्यंत श्रीमंत असा एकच सावकार स्त्रीवेषानें लपून बसला तो मात्र यांतून सुटला.

वऱ्हाडांत यापूर्वी पांचपन्नास वर्षेपर्यंत शांतता होती. त्यामुळें मुलखांत सुबत्ता होती. या कारणानें शिवाजीच्या लष्करास या व इतर सर्व मोठमोठ्या शहरांत मनस्वी लूट सांपडली. यापूर्वी हा प्रसंग न आल्यामुळें या अकल्पित घाल्याची लोकांस कल्पना नव्हती.

वऱ्हाडचा मोंगल सुभेदार खानजमान हा एलिचपुराहून मराठ्यांवर चालून आला, पण तो येण्यापूर्वीच मराठ्याचें चपळ घोडदळ कोणीकडच्या कोणीकडे निघून सुद्धां गेलें.

---

घेऊन त्याचे घरीं गेले त्याचे दाराशीं मातीचा चिखल भिजविलेला होता, कारण एक मातीची भिंत बांधण्याचें काम चाललें होतें. तेथें जाताच सावकारानें सर्व कस्तुरी त्या चिखलांत टाकण्यास सांगितलें. व एका शिक्याची रकम मोजून दिली. ती जुनी भिंत अद्याप कारंज्यास दाखविण्यांत येते व तिची माती अद्याप कस्तुरीच्या ऐवजीं गरीब लोक औषधाकरितां नेतात.

सुरू इंग्रजींत उमरावती येथील एका वकीलानें वरच्या गोष्टीची अत्तराबद्दल नकल केली होती. त्यानें अत्तरवाल्याच्या बगलेतील पेटींतील सर्व अत्तर रस्त्यानें जातांना आपले हातांतील काठीवर ओतण्यास लावलें होतें.

* जदुनाथ सरकार शिवाजी पान २०८-९.

समासदाच्या बखरींत लिहिलें आहे कीं, औरंगजेबाचा पुत्र मोअजिम यास हुकूम आला कीं, प्रतापराव व निराजी या दोघा मराठे सरदारांस कैद करावें. हे त्यावेळीं औरंगाबादेसच होते, परंतु राजपुत्रानें वेळींच खबर देऊन त्यांस काढून दिलें व मग बादशहाचा हुकूम जाहीर केला. कारण औरंगजेबानें कारण नसतां मागील तह आपलेकडूनच मोडून पुन्हां युद्ध सुरू केलें.

यानंतर लागलींच (इ. स. १६७० आक्टोबर) शिवाजीनें सुरत शहर लुटलें. औरंगजेबानें बऱ्हाणपुराहून व औरंगाबादेहून मोंगल सैन्य शिवाजीवर रवाना केलें, व दाऊदखान, मोहबतखान, एकलासखान, बाकेखान वगैरे निरनिराळे सरदार शिवाजीवर पाठविले. शिवाजीनें मोठ्या युक्तीनें सुरतची लूट सुरक्षित पोंचविण्याकरितां ती एका टोळीबरोबर पाठवून देऊन दुसऱ्या चार टोळ्या घेऊन औरंगाबादेवर स्वारी करण्यास जातो अशी हूल उठविली व खरोखरच त्या मार्गानें तो पुढें आला व क्रमाक्रमानें त्यानें सर्व मोंगल सरदारांचा पराभव केला. इकडे त्याची लूट सुरक्षित पोंहोंचली.

शिवाजीवरील याच मोहिमेंत, वऱ्हाडांतील रायबागीण नांवाची शूर ब्राह्मण स्त्री इतिहासांत प्रसिद्ध झाली.

हल्लीं वऱ्हाडचे दक्षिण सरहद्दीवर निजामचे हद्दींत प्रसिद्ध मातापूर ऊर्फ माहूर म्हणून क्षेत्र आहे. तें फार पूर्वींपासून वऱ्हाडांतच होतें. हल्लीं इंग्रजींत पाइनगंगा नदीची सरहद्द झाल्यामुळें तें निजामाचे हद्दींत गेलें. सदरहू ठिकाण देवीचें व दत्ताचें प्रसिद्ध ठिकाण असून या दोन्ही संस्थानास पुष्कळ जहागिरी वऱ्हाडांत व निजामाचे राज्यांत आहेत. स्वाभाविक सृष्टिसौंदर्य फार उत्तम तऱ्हेचें असून उंच पर्वतावर गांव व वरील दोन्हीं देवतांचीं स्थानें

असून एक मोठा किल्ला आहे. पायथ्याशीं पाइनगंगा नदीचें विस्तीर्ण पात्र आहे.

या माहूरची देशमुखी "उदाराम" उपनांवाचे शूर ब्राह्मण घराण्याकडे असे व वाशीमपासून तों माहूरपर्यंत अनेक परगण्यांचें देशमुखी वतन व जहागिरी त्याचेकडे असून त्या अद्याप त्या घराण्याच्या निरानिराळ्या शाखांकडे चालू आहेत.

या घराण्यांतील मूळ पुरुष उद्धवराव हा मूळचा वाशीम जवळील एका गांवचा कुळकर्णी होता. त्यानें आपले कर्तबगारीवर दिल्लीस जाऊन तेथें कामगिरी करून पांच हजारांची मनसब व वऱ्हाडांतील वाशीमपासून तों माहूरपर्यंत मुलखाची जहागीर मिळविली. यावेळीं हा प्रांत हरीसिंग नांवाचे रजपुतानें लुटालूट करून बेचिराख केला होता. त्याचा मोड करून उद्धवरावानें सर्व आबादी केली. यावेळीं अकबर हा बादशहा होता. या पराक्रमाबद्दल त्यांना वरील भागाचें देशमुखी वतनही मिळालें व नंतर ते माहूर येथें राहूं लागले व माहूरचे देशमुख म्हणून नांवाजले गेले. व त्यांस "राजे" हा किताब मिळाला. शहाजहानाचे वेळीं मलिकंबराविरुद्ध मोंगल लष्करांत उदाराम राजे हे लढत होते याबद्दल मागें उल्लेख आलाच आहे.

यांची मूळ सनद अकबराचे वेळची असून हिजरी १००१ (इ. स. १५७२) ची आहे. उद्धवरावाचे "उद्धोराम", "उदाजीराम" "उदाराम" असें रूपांतर होत होत या मूळ पुरुषाच्या नांवावरून घराण्यास "राजे उदाराम" हा किताब आजपर्यंत कागदोपत्रीं व तोंडींहि सर्वत्र चालत आला आहे "राजे

जाधवराव" या घराण्याप्रमाणें हेंहि घराणें नामांकित म्हणून समजलें* जात आहे.

पहिले उदाराम राजे म्हणजे उद्धवराव हे मरण पावल्यानंतर त्यांचा अज्ञान पुत्र जगजीवनराव याचे नांवें सर्व वृत्ति व मनसब झाली. तो मेल्यावर त्याचा पुत्र बाबूराव यास मनसब मिळाली. परंतु तो लहान असल्यामुळें जगजीवनरावाची स्त्री म्हणजे बाबूरावाची आई ही कारभार पाहूं लागली ही बाई फार शूर व चतुर होती. ती स्वतः सर्व कारभार पहात असे. नवऱ्याचे स्वारींत ती नेहमीं असल्यामुळें तिचे आंगीं शूरपणा व मुत्सद्दीपणा हे गुण मुरलेले होते. बंडवाल्यांनीं पुन्हां उचल खाल्ली ती तिनें मोठ्या बहादुरीनें सैन्य उभारून व स्वतः सैन्य लढवून जिरविली. हा तिचा पराक्रम समजल्यावर औरंगजेब बादशाहाकडून तिला स्वतःला "पंडिता" व "रायबागन"† म्हणजे स्त्रीशार्दूल हे किताब इ.स. १६५८ मध्यें मिळाले.

सुरतेवर शिवाजी स्वारी करणार हें औरंगजेबास कळतांच त्यानें उत्तरेकडून बऱ्हाणपुराहून वरील मोंगल सरदारास पाठविलें व दक्षिणेकडून वऱ्हाडांतून या "रायबागिणी"स सैन्यासह जाऊन शिवाजीवर हल्ला करण्यास हुकूम दिला. शिवाजी या वेळेस नवीन नसून त्याच्या शूरपणाचा प्रभाव मोंगल सैन्यास पुष्कळदां दिसला होता, तरी या शूर स्त्रीस शिवाजीसारख्या योद्ध्यावर पाठविलें यावरून या "रायबागिणी"ची त्यावेळीं शूरपणांत केवढी ख्याति असेल याची कल्पना करतां येते. शिवाजीवर पूर्वी पाठविलेल्या सरदारांपेक्षां "रायबागीण" ही जास्त शूर व कर्तबगार समजली जात होती हें उघड आहे.

---

* या घराण्याची सविस्तर माहिती. भाग १५ यांत पहा.

† Queen Ti...

रायबागीण ही नेहमीं आपला मुलगा बाबुराव यास स्वारींत घेऊन लढाईवर जात असे. यामुळें त्यास युद्धकलेचें शिक्षण मिळावें हा तिचा हेतु असे. राजे उदाराम यासः पांच हजार फौजेची मनसब असे. तितकी पुरी फौज घेऊन " रायबागीण " ही शिवाजीवर गेली. दुसरे मोंगल सरदार एका मार्गानें गेले व रायबागीण ही दुसऱ्या मार्गानें गेली. शिवाजीस तिच्या पराक्रमाची माहिती असल्यामुळें तिच्यावर त्यानें शेलके शेलके सरदार पाठवून उमर खिंडींत तिला अडविण्याचा हुकूम केला व आपण स्वतः पाठी मागून आला व खिंडींत रायबागिणीस गांठून तिचा पराभव केला. तिचा मुलगा बाबूराव हा शिवाजीच्या हातीं सांपडल्यामुळें ती शरण आली. शिवाजीनें तिच्या पराक्रमाचें फार कौतुक करून त्याच्या नेहमींच्या उदार राजनीतिनैपुण्यानें तिला व तिच्या मुलला वस्त्रें भूषणें देऊन तिला मोठ्या सन्मानानें परत पाठविलें.*

प्रतापरावाप्रमाणेंच हंबीरराव यानें खानदेशांतून माहूरपर्यंत व तेथून पश्चिमेस सिंदखेड व जालनापुरापर्यंत फौजेसह जाऊन सर्वत्र खंडणी वसूल केली व पुन्हां देशीं जाऊन पोहोंचला.

---

* चिटणीस बखर पान. ७२ ७३मध्यें रायबागीण ही जगजीवन याची आई असें म्हटलेलें आहे. [ या पुस्तकांतील भाग १५ पहा. ] परंतु बखरकाराची ही चूक आहे. ती जगजीवन याची स्त्री व बाबूरावाची आई होती. इ० स० १६७० मध्यें जगजीवन जिवंत नसून बाबूराव हा होता. त्याच सालाची बाबूराव यास राजे किताब दिल्याबद्दल सनद मिळालेली आहे. सन १९२१ च्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलनांत प्रस्तुत लेखकानें लेख पाठविला होता तो मंडळानें छापला आहे. त्यांत वरील बखरीमुळें प्रस्तुत लेखकाचीहि चूक झाली आहे परंतु सदरहू घराण्यांतील वंशावळ व कागदपत्रांवरून हल्लीं ती चूक दुरुस्त केली आहे.

याचप्रमाणें मराठी राज्याच्या आरंभीं रावजी सोमनाथ, चिमणाजी दामोदर, परसोजी भोंसले वगैरे मराठे सरदार चौथ सरदेशमुखी वसूल करण्याच्या निमित्तानें वऱ्हाडांत वारंवार येऊन लुटालूट करित असत. औरंगजेबाच्या नंतर मोंगलाची सत्ता पडती झाल्यामुळें मराठ्यांचें प्रस्थ जास्तच वाढत चाललें.

वरील सरदारांपैकीं परसोजी भोंसले यानें वऱ्हाडांत कायमचेंच ठाणें दिलें.

परसोजी भोंसले
इ.स. १६९९-१७१९

परसोजी भोंसले हा शिवाजीच्या तालमींत तयार झालेला होता. वऱ्हाड व गोंडवण प्रांतांत त्यानें मराठ्यांचा अमल बसविल्यामुळें राजारामानें इ.स. १६९९ मध्यें "सेनासाहेब सुभा" हा किताब व सरंजाम देऊन त्यास वऱ्हाडांत पाठविलें. वरवर यांचें काम चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचें होतें परंतु ते जेथें जात तेथें आपला अमल बसवीत असत.

हे भोंसले छत्रपतीच्या वंशापैकीं असून त्यांचेप्रमाणेंच चितोडच्या राजघराण्यापासून आपली वंशावळ दाखवीत दक्षिणेंत आलेल्या मूळ पुरुषाच्या दोन शाखांपैकीं हे एक होते.

परसोजी भोंसले वऱ्हाडांत आल्यानंतर त्यानें हल्लींच्या वणी तालुक्यांत भाम या गांवीं आपलें ठाणें दिलें व तीच आपली राहण्याची मुख्य जागा केली. भोंसले नागपुरास जाईपर्यंत त्यांची राहण्याची मुख्य जागा हीच होती.

भाम हें पूर्वीं लहान गांव होतें व हल्लींहि लहानच आहे. परंतु हें गांव राजधानीस पसंत करण्यांत कांहीं पूर्वपरंपरा होती.

परसोजीचे चुलते निजामशाही राज्यांत नोकर होते ते शिवाजीचा बाप शहाजी याचे समकालीन होते. त्यांच्या नोकरीबद्दल त्यांना उमरावती व भाम हीं गांवें जहागीर मिळालीं होतीं. त्यामुळें परसोजीनें वरील भाम गांव पसंत केलें.

परसोजी भाम येथें आला त्यावेळीं त्याचे दोघे चुलते भाम* येथें आपले जहागिरीवर रहात असत.

परसोजी व त्याचा मुलगा कान्होजी यांचे वेळेस भाम हें गांव इतकें वाढलें होतें कीं, फक्त बैरागी लोकांची पांच हजार घरें तेथें होतीं. भोंसल्याचें लष्करी ठाणें तेथें होतें. हल्लीं त्याचें सर्व वैभव गेलें असून मोठमोठ्या इमारतींच्या खुणा मात्र राहिल्या आहेत. हल्लीं तें शेपन्नास घरांचें एक लहानसें खेडें आहे. व त्याचें एका काळचें क्षणिक वैभव फार थोड्या लोकांस माहीत आहे.

---

* इ० स० १८११ मध्यें भोंसल्यांच्या परिवारांतील एका वृद्ध बाईनें सांगितलेली हकीकतः— [ नागपूर ]

सदरहू बाईनें सांगितलेल्या गोष्टी आश्चर्य वाटण्याइतक्या बारकाईनें सांगितल्या आहेत. मात्र इतिहासाशीं त्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करून त्यांत फेरफार करावा लागतो. वरील जहागिरीसंबंधानें बाईनें सांगितलें कीं, निजाम सरकारची जहागीर होती. लिहिणारानें अर्थात् उतरून घेतलें कीं, निजामुल्मुल्क असफजहा याची जहागीर होती. परसोजीच्या पूर्वीं निजामुल्मुल्काचा उदय नव्हता. शिवाय शाहू राजाचाहि संबंध आपला आहे. अर्थात् हा शाहूराजा नसून निजामशाहींतील शहाजी राजे [ शिवाजीचा बाप ] यांचा संबंध असला पाहिजे व निजाम म्हणजे निजामशाही. वृद्ध अशिक्षित बाईस ही बारकाई कोठून कळणार! व लिहिणारानें पूर्वापार संबंध न पाहतां तर्कानें पूर्णता केली.

परसोजीच्या चुलत्यांनीं प्रत्येकीं सव्वापांच मणाच्या खंडेरायाच्या व देवीच्या मूर्ति केल्या होत्या.

" राजाची भाम " या नांवानें तें प्रसिद्ध असल्यामुळें नांवांत मात्र त्याचा भोंसल्यांशीं संबंध कायम राहिला आहे.

इ. स. १७०७ मध्यें शाहू दक्षिणेंत आला त्यावेळीं त्यास जे मराठे सरदार मिळाले त्यांत परसोजी भोंसले हा मुख्य होता व तो प्रथमच वऱ्हाडच्या पश्चिम सरहद्दीवर शाहूस मिळाला शाहूनें "सेनासाहेब सुभा" हा किताब वंशपरपरा केला व वऱ्हाडची कामगिरी कायम केली.

शाहूच्या वेळच्या सनदेंत भोंसल्याकडे दिलेल्या मुलखाचें वर्णन दिलें आहे तें:—

१ प्रांत रीतपूर व सरकार गावेल, प्रांत वऱ्हाड, प्रांत देवगड, चांदा व गोंडवण.

१ अनागोंदी वगैरे वऱ्हाड प्रांताचे महाल तपशील.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सरकार गावेल | महाल | ४६ |
| १ | सरकार नरनाळा | ,, | ३७ |
| १ | ,, माहूर | ,, | १९ |
| १ | ,, खेलडा | ,, | २१ |
| १ | ,, पवनार | ,, | ९ |
| १ | ,, कळंब | ,, | १९ |
| ६ | | | १४७ |

एकूण सहा सरकार दरशेंकडा ९ रुपये ११ आणे मोकाशाचे आकारास* असे.

वरील यादींतील खेलडा म्हणजे फत्तेखेर्डा नसून सातपुड्याच्या उत्तरेकडील " खेरला " हे होय. सर्व प्रांत उत्तरेकडील व पूर्वेकडील आहेत.

* नागपूरकर भोंसल्याचा इतिहास.

परसोजीनंतर कान्होजीनें रीथपूर व दारव्हे या भागावर स्वाऱ्या करून तेथील अमल कायम केला. कान्होजीच्या वेळे-सच दक्षिणेंत निजामुल्मुल्कानें स्वतंत्र गादी स्थापिली. यापूर्वींच बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं फेरुखशेर बादशहाच्या कार-कीर्दींत सय्यद बंधूच्या मध्यस्तीनें दक्षिणेच्या साडेसहा सुभ्यांचे चौथाई व सरदेशमुखीची कायदेशीर सनद मिळविली होती. निजामुल्मुल्कावर मोंगल सरदार पाठविले त्यांस मदत करण्या-बद्दल दिल्लीहून मराठ्यांस पत्रें गेलीं. त्याप्रमाणें बाळाजीनें शाहू-कडून कान्होजी भोंसले यास हुकूम पाठविला. त्याप्रमाणें बाळापूर, बऱ्हाणपूर व फत्तेखेर्डा या सर्व लढायांत दिल्लीकडील अलंअल्लीखान वगैरे सरदारांचे मदतीस भोंसल्यांचें वऱ्हाडांतील लष्कर होतें.

या सुमारास वऱ्हाडांतील पूर्वेकडील निम्मे भाग भोसल्यां-च्या ताब्यांत आलेला दिसतो. पश्चिमेकडील भाग या वेळेस मोंग-लांच्या व निजामाच्या ताब्यांत राहिला.

निजामुल्मुल्क गादीवर आल्यानंतर मात्र 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति झाली. ज्याचा जसा जोर चालेल तसा तो मुलखावर पगडा ठेवी. भोंसल्यांचें सर्व राजकारण पूर्वेकडे नागपूर व गोंडवण व नंतर कटक व बंगाल्याकडे वाढत गेलें. तसतसे निजामानें वऱ्हाडांत जोर करून आपलें घोडें पुढें ढक-लावें. मराठ्यांना चौथाईच्या निमित्तानें कोठेंच मज्जाव नसे. निजामानें मोठमोठ्या जहागिरी देऊन आपले तर्फेचे सरदार काय-मचे राहण्यास इकडे पाठवावे व एलिचपूरच्या नबाबासारखे कांहीं जहागीरदार डोईजडहि व्हावेत असा कारभार चाललेला होता. मुलखाच्या मर्यादा व अधिकारविभागणीच्या मर्यादा सूक्ष्म नसत. निजामाचे अंमलदार असले तरी मराठे चौथाईच्या हिशेबानिमित्त

आपला कमाविसदार तेथें बसवीत व मराठ्यांची चढती पायरी असल्यामुळें मराठ्यांच्या अधिकाऱ्यांचेंच खरें वर्चस्व रहात असे. कित्येक वेळा तर मराठेच, देशमुख देशपांड्यांपासून सर्व वसूल घेऊन निजामास त्याचा हिस्सा देत. याचप्रमाणें थोड्याबहुत मानानें अखेरपर्यंत कारभार चालला होता म्हणूनच या कारकीर्दीस 'दोअमली कारकीर्द' असें नांव आहे.

कान्होजी पराक्रमी होता. त्यानें वऱ्हाडभर मराठ्यांचा अमल बसवून गोंडवण व कटक ह्या प्रांतांवर स्वाऱ्या केल्या. अखेरपर्यंत त्याचें ठाणें वऱ्हाडांत भाम येथेंच होतें व म्हणूनच त्यास व त्यापुढील सर्व नागपूरकर भोंसल्यांस 'वऱ्हाडचे राजे' असेंच म्हणत असत. वॉरन हेस्टिंग्जपासून तो सन १८०३च्या तहापर्यंत सर्व इंग्रजी पत्रव्यवहारांत "वऱ्हाडचे राजे" याच नांवानें ते संबोधले जात असत.

कान्होजीवर शाहू राजाची अवकृपा* होऊन त्यास कैद

---

* कान्होजीवर शाहूची अवकृपा होण्याचें कारण कोठेंच स्पष्ट दिलें नाहीं. नागपुरकरांच्या बखरींत खालील मनोरंजक कारण दिलें आहे.

"कान्होजींचें सोंवळें फार कडक असे. मराठ्यांच्या हातचें कधीं न जेवतां ब्राह्मणाच्या हातचें अन्नग्रहण तो करी. एकदां शाहूस हें कोणी सांगितलें, "आपल्या जातीच्या आचाराप्रमाणें न वागतां स्वेच्छ वर्तन करितात व विनाकारण दंभ माजवितात" असें भासविलें, शाहूनें मुद्दाम साताऱ्यास बोलावून घरीं जेवण्यास बोलाविलें, कान्होजीनें पुष्कळ टाळाटाळी केली परंतु अत्याग्रहास्तव निरुपायानें जाणें भाग पडलें, शाहूनें पुरीच परीक्षा पाहण्याकरितां आपल्या ताटांत जेवणास बसविलें व एका ताटांतच भोजन केलें कान्होजीनें बिऱ्हाडीं येऊन गरम पाण्यांत मीठ मोहरी घेऊन घशांत बोटें घालून वमन केलें हें वर्तमान कोणी शाहूस सांगितलें, त्यावरून त्याचा कान्होजीवर फार रोष झाला,

पहिला रघूजी उर्फ बाबासाहेब यानेंच नागपूरकर भोसल्याचें नांव वाढविलें. परसोजीचा पुतण्या बिंबाजी याचा हा मुलगा. वाईप्रांतांतील पांडवगड येथील रामाजीपंत नांवाच्या सत्पुरुषाच्या आशीर्वादानें झाल्यामुळें रामचंद्राच्या नांवावरून रघूजी असें याचें नांव ठेविलें होतें. या रामाजीपंताच्या घराण्यांतील कोन्हेरराम यास पुढें रघूजीनें आपला दिवाण केलें व तो पुढील राजकारणांत फार प्रसिद्धीस आला. याच घराण्यांतील प्रसिद्ध भास्कर पंडित हा बंगाल्यातील रघूजीच्या स्वाऱ्यांत प्रसिद्धीस येऊन कपटानें बंगाल्यांत मारला गेला.

कान्होजीस मूलबाळ नसल्यामुळें त्यानें रघूजीस लहानपणापासूनच आपलेजवळ भाम येथें ठेवलें होतें. त्याचें लहानपण भाम येथें गेलें. पुढें कान्होजीस पुत्र झाल्यामुळें त्याचें रघूजीवरील लक्ष कमी झालें. त्यामुळें रघूजीस कळूं लागतांच तो तेथून निघून शाहूकडे गेला व त्याचे संगतींत राहून त्याची मर्जी त्यानें संपादन केली.

एकदां शिकारींत शाहूचा जीव त्यानें वाघाच्या सपाट्यांतून वांचविल्यापासून तर तो शाहूस फारच प्रिय झाला. त्यानें आपली मेहुणी शिरक्यांची कन्या त्यास देववून संबंध दृढ केला.

कान्होजीवर अवकृपा झाल्यावर शाहूनें रघूजीस कान्होजीस पकडून कैद करून साताऱ्यास पाठविण्याचा हुकूम करून सैन्य देऊन पाठविलें. रघूजी येतांना आकोल्यास आला व एलिचपूरकर नबाबाचा हाताखालील अंमलदार सुजायतखां नांवाचा तेथें होता व तो मराठ्यांची चौथाई वगैरे देत नसे. त्याचा रघूजीनें पराभव करून त्यास ठार मारलें व रस्त्यानें अंमलबसवीत बसवीत

तो भाम येथें आला. नंतर वणी जिल्ह्यांत मंदार या गांवीं त्यानें कान्होजीस पकडलें व शाहूकडे रवाना केलें.

भोसल्यांच्या अमदानींत पुण्याच्या दरबाराचा प्रत्यक्ष संबंध वऱ्हाडाशीं विशेषेंकरून येत नसे.

**भोसल्यांच्या कारकीर्दींत वऱ्हाडाशीं पेशव्यांचा संबंध**

नागपूरचे अधिकारी प्रत्येक ठाण्यावर असत. परंतु पेशव्यांना भोसल्यांच्या प्रथमारंभींच्या कारकीर्दींत व नंतरहि सातारच्या राजांकडून व निजामाकडून खाजगी मोकासे व इनाम वऱ्हाडांत मिळालें होतें. त्यांची खास व्यवस्था पुण्याहून होत असे.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांस इ०स० १७१९ मध्यें सातारकर राजांकडून दोन गांवें इनाम मिळालीं त्यांत एक परगणे जळगांव प्रांत वऱ्हाड, देखील तिजाई व जकात हें आहे बाळाजीच्या मृत्यूनंतर बाजीराव यासहि आणखी मोकासे मिळाले.

**पेशव्यांचे वऱ्हाडांतील मोकासे वगैरे**

इ०स० १७४०–४१ च्या ताकीदपत्रांत बाजीराव यास मोकासे पूर्वींपासून होते त्यांचीं यादी दिली आहे.

" क्तित्ता ताकीदपत्रें राजश्री बाजीराव पंडित प्रधान याकडे देहाय (गांवे) मुकासे पेशजी (पूर्वीं) आहेत तेणें प्रमाणें हल्लीं करार असे "

संमत (सुभा) नानाळा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौ.अडगांव खुर्द | प.अडगांव | १ | मौ.घनेगांव | प. अंजनगांव सुर्जी |
| १ | ,, एकलारें | ,, बाणविहीर (? | १ | ,, नांदेड | ,, नांदगांव पेठ |
| १ | ,, माळेगांव | ,, पिंपळगांवराजा | १ | ,, नेर | ,, चांदूर |

| | |
|---|---|
| १ ,,उंडणगांव ,, आकोट | १ ,,गायवाडी ,, माने |
| १ ,, शिरपूर ,, दहिहांडें | १ ., सुरूली ,, करजगांव |
| १ ,, धणेगांव ,, मलकापूर | १ ,, उदखेड ,, मानखेड (?) |
| १ ,, दूलेवार(?),, कुरुंदखेड (?) | १ ,,शिरसगांव., ,, |
| १ ,, जवळें ,, नांदेड | १ ,, बोरखेड ,, खोळापुर |
| १ ,, उगवें ,, आकोला | १ सातेफळ ,, वडनेरबिबीचे |
| १ ,,शिरसोली,, वडनेरगंगाई | १ ,,अंजनगांव ,, ,, |
| १ ,, आकोली,, महागांव | १ ,,टाकळखेड,, थूगांव |
| १ ,, धाड ,, चांडोळ | — |
| १ ,, खेटरी ,, बाळापुर | ११ |
| १ ,, सस्ती ,, बाळापुर | १ मौ. विरूर प. तळेगांव |
| १ ,, नांदेड ,, कनरूड(कन्नड?) | दहा सहस्राचा (संमत कंळब) |
| १ ,, सोनाळें ,, ,, | १ ,, सुनगांव प. जामोद |
| १ ,, शिराळें ,, गेरूमाटरगांव | एकूण देहाय (गांवें) ३० |

बाजीरावाचे मृत्यूनंतर इ०स० १७४१ त बाळाजी बाजीराव यास तेच मोकासे कायम केले आहेत. त्यांत " वेतनाचे ऐवजीं मुकासे दिले असत " असे शब्द आहेत.

परंतु वऱ्हाडाचा मुख्य कारभार भोंसल्याकडे असल्यामुळें भोसल्यांस प्रत्येक हुकमाची नक्कल माहितीकरितां जात असे. वरील यादीची एक प्रत " राजश्री रघूजी भोसले सेनासाहेब सुभा " याजकडे पाठविण्याचा व तीवर " तीस गांवें सदरहूप्रमाणें यास उपसर्ग न देणें " असा शेरा दिल्याचा उल्लेख आहे. प्रत्येक गांव-कामदारास व देशमूख देशपांड्यास हुकमाच्या प्रती जात असत.

हुकमाच्या प्रती ज्या त्या अर्जदाराजवळ देत अगर बहुधा स्वतंत्र जासूद रवाना करीत असत, त्याचें वेतन ज्यास तो हुकूम

दिला असेल त्यानें द्यावें अशी रीत होती. जासुदाचे मजुरीस "मसाला" असें म्हणत व प्रत्येक पत्रावर मसाला किती देण्याचा तो लिहिला जात असे.

मौ० कुपटें प० गिरवली येथें इ०स० १७३४ मध्यें जानोजी भोंसले यांचा कबीला (बायकामुलें वगैरे) होता. त्यावर रघोजी भोंसल्यानें मोर्चे लाविले तें उठविण्यास त्या सालचें आज्ञापत्र रघूजीस पाठविलें आहे त्यास मसाला मातान्याहून नागपुरापर्यंत प्रत्येक इसमास दीडिशेंरुपये आहे. भिकनखान व तुळोजीखळदकर नांवाचे जासूद पाठविले होते.

पेशव्यांप्रमाणें इतर अधिकाऱ्यांस सुद्धां वऱ्हाडांतील गांवें दिलीं आहेत. इ०स० १७९२ मध्यें खंडेराव काशी न्यायाधीशाकडे असलेल मोकाशांची यादी आहे त्यांत * संस्थान मेहकर पैकी परगणे ६॥० १ शिरपूर १ वाकद १ मलकापूर पांगरे १ जाफराबाद १ देऊळघाट १ साकरखेडलों ०॥०अमडापूर (!)संस्थान पाथरी, नांदेड, कळमनुरी, जाह्नापूर इतका भाग आहे.

त्यावेळेच्या शिस्तीस अनुसरून पेशवे व भोसले यांजमध्यें वरील मोकाशांचे व्यवस्थेबद्दल तंटे होत. एका म्यानांत दोन सुऱ्यांप्रमाणें पेशव्यांच्या व भोंसल्यांच्या अधिकाऱ्यांचे खटके उडत. पेशव्यांच्या कमाविसदारांस जबरदस्तीनें उठवून देऊन भोंसले

आपले कमाविसदार बसवीत असत. त्याचप्रमाणें छत्रपतींच्या खाजगीकडील गांवांचीहि तीच वाट होत असे. इ. स. १७५२ मध्यें छत्रपतींच्या खाजगीकडील वाशीम परगण्यावरचा कमाविसदार भोंसल्यांनीं उठवून दिला होता.त्याबद्दल रघूजी भोंसल्यास जोराचें पत्र, "हें आमच्या कार्यास येणार नाहीं, देखत आज्ञापत्र हुजूरचा कमाविसदार बसवून घेतला रुपया अमलदाराचे जिमेस करणें" याविषयीं आज्ञापत्र आहे व त्यावर "मसाला" पांचशें रुपये घातला आहे.

राजवाड्यांतील एका पुतळी नांवाचे दासीस इ.स.१७४१चे सुमारास मौ. वडदरी प.साकरखडल हा गांव दहा वर्षेंपर्यंत"इजारा" दिल्याबद्दल उल्लेख आहे, व तिनें त्याची वहिवाटही केली होती.

इनाम व मोकासे यांचेच बाबतींत पुण्याच्या दरबारांतून हुकूम जात असें नाहीं. इतर सामाजिक, जातीचे व वतनाचेंहि तंटे पुण्यापर्यंत जात असत. अमडापूर परगण्यांतील चिंचपूर व घोनसर या गांवचे शिवेबद्दल तंटा औरंगाबादेस गेला होता व निजामाचे अधिकाऱ्यांकडून त्याचा निकाल झाला तरी त्यांत जो जबरदस्त पक्ष होता तो ऐकेना.शेवटीं दुसरा पक्ष पुण्यास जाऊन त्यानें अर्ज केल्यावरून देशमुख देशपांडे यांस हुकूम झाला कीं, तुम्ही समक्ष जाऊन दगड रोवून शीव पक्की करून द्यावी व तंटा होऊं देऊं नये.यावरून त्यावेळचें निजामाचें दौर्बल्य व मराठ्यांचें प्राबल्य दिसून येईल.

सामाजिक स्वरूपाचे तंटेहि पुण्याचे दरबारापर्यंत कधींकधीं

मुलास आतां कोणी जातवाला मुलगी देत नाहीं. रीत मोडणारास शासन करावें "या अर्जाचा निकाल असा झाला कीं, तेथील कमाविसदारास हुकूम गेला कीं. "सदरहू मुलाचें लग्न करून देणें. जातिप्रकरणीं फत्तेखेर्डी येथील जंगमाचे मठाचें नांवचेंहि एक आज्ञापत्र आहे.

पूर्वीचें मुलकी दप्तर किती बारकाईचें होतें व पाटील कुलकर्णी व देशमुख, देशपांडे किती काळजीनें तें ठेवीत होते याचेंहि एक उदाहरण आहे. मौ. नायगांव, हवेली मेहकर येथील थळझाडा (शेतांचें रजिस्टर) व पांढरझाडा (घरांचें रजिस्टर) गांवचे कुळकर्ण्यांपाशीं होता तो धामधुमीमुळें गेला. सदरहू गांवच्या पाटील व कुळकर्ण्यांनें त्याची दुसरी प्रत मेहकरच्या देशपांड्यापाशीं मागितली असतां त्यानें दिली नाहीं. त्यावरून पाटील यानें पुण्यास लिहून देशमूख देशपांडे (रेणुको अनंत) यांजवर हुकूम आणला कीं, "थळझाडा व पांढरझाडा कुलकैफत दस्तवा सिकियानिसी करून त्याजपाशीं देणें."

निजामाचे बरेच परगणे मराठ्यांनीं जप्त केले होते. त्यासर्वांवर कमाविसदार जनकोजीशिंदे यास नेमलें होतें. (इ०स० १७५७-५८) त्यामुळें वऱ्हाडांतील बऱ्याच भागावर शिंद्याचें वजन असे. या भागांत पैठण, आंबड, पडतूर, भोकरदन, शेवली, बामनी, चारठाणें, कळमनूरी, नडसी, माहूर, इंगोली वगैरे हल्लीं मोंगलाईंत असलेला भाग व वऱ्हाडपैकीं चिखली, अमडापूर, देऊळघाट, धाड, चांडोळ, वाशीम, मंगरूळ, अनसिंग, पुसद, तामसी, चिंचोली, दारव्हा, चिकणी, गिरोली, महागांव, केनोड, मेहकर, रिसवड, शीरपूर, लोणार, मलकापूर पांगरे हा भाग होता. शिंदखेड व जालना या भागावरहि शिंद्याचा अमल होता. देऊळ-

गांव राजा येथील बालाजीचें संस्थानास इ०स० *(१८०१) मध्यें दौलतराव शिंद्यानें सनद दिली आहे. देऊळगांव येथें विणकरी लोकांची मोठी वस्ती असून पुष्कळ कापड तयार होत असे. त्यावर जकात असे. प्रत्येक सणंग त्या कामावर असलेल्या अधिकाऱ्याजवळ नेऊन त्यावर त्याचा शिक्का घ्यावा लागत असे. व शाईचावडी नांवाचा ठराविक कर द्यावा लागे. ह्या कचेरीस †"शाईचावडीची" कचेरी म्हणत. ही जागा अद्याप देऊळगांवास आहे. सदरहू शाईचावडीचें सर्व उत्पन्न वार्षिक उत्सवाच्या खर्चाकरितां दिलें होतें. त्यांतच सरदेशमुखीचा अमल सरकारचा (शिंदे) आहे असा उल्लेख आहे व या देणगींतून वजा केला आहे. सदरहू सनद त्यावेळचे कारभारी, ज्यानें हें संस्थान फार उदयास आणलं त्या "हरीसा" लाडाच्या पूर्वजांपैकीं "नवलसा बिन मुरारसा" यास दिली आहे.

**दक्षिणेंतील राजकारणाची स्थिति**

या वेळेस दक्षिणेंतील राजकारणाची स्थिति बरीच बदलली होती. मराठ्यांच्या राजकारणांत महत्वाचा फरक झाला होता. ज्या-कारणांमुळें मराठा साम्राज्य लयास गेलें तीं कारणें स्पष्टपणें आपला अंमल दाखवूं लागलीं होतीं. "तोट्याघरीं लढाई" या म्हणीप्रमाणें पाणिपतच्या लढाईमुळें जीं भांडणें विकोपास गेलीं तीं बीजरूपानें आगोदरच सुरू झालीं होतीं. पेशव्यांचे वर्चस्व असह्य होऊन बाकीचे मराठे सरदार पेशव्यांच्या उण्यावर होते. या सर्व मराठे सरदारांतहि एकमेकांत सहकारिता मुळींच नव्हती. त्यामुळें एकदम क्रांति झाली नाहीं. वरील सर्व मराठे सरदारांत

* ता. २९ मोहरम शके १७२३ (इ. ता. १२-६ १८०१)

† जेथें शाई लावून शिक्का देत असत ती जागा.

सर्वांत जास्ती त्रास नागपूरकर भोंसल्यापासून पेशव्यास झाला. ज्या उच्च हेतूनें राज्यसंस्थापकानें राज्यस्थापना केली तो उच्च हेतु पेशवे अगर दुसरे आधारस्तंभ यांजमध्यें उरला नसून व्यक्तिशः वर्चस्वाकरितां भांडणें सुरू झालीं.

" मराठा तितुका मेळवावा " व मुसलमानांचे त्रासांतून देशाची सुटका करावी हा " महाराष्ट्रधर्म "अस्तंगत होऊन त्याचे पर्यवसान पेशवे व निजाम एक होऊन भोंसल्यावर स्वारी करून नागपूर लुटण्यांत व भोंसल्यानें पुणें जाळण्याकरितां स्वारी करण्यांत झालें. वस्तुतः मराठी साम्राज्याचे निरनिराळे तुकडे होऊन त्यांच्यांत भाऊबंदकी सुरू झाली.

वऱ्हाडच्या राजकारणाशीं पेशवे, भोंसले व निजाम या तिघांचा निकट संबंध होता. बाजीराव पेशव्यापासून भोंसल्यांचें व पेशव्यांचें उघड उघड वैर सुरू झालें. शाहू राजाचें व रघूजी भोंसल्याचें फार सख्य व शाहू निपुत्रिक असल्यामुळें रघूजीचा मुलगा दत्तक घेण्याबद्दलची आवाई, यामुळें बाजीराव शाहूची व रघूजीची एकांतांत भेट सुद्धां होऊं देत नसे. रघूजी बंगाल्यांतील लुटी आणून श्रीमंत बनलेला तर बाजीरावास आपल्या फौजेस पगार देण्याची सुद्धां मुष्कील. बाजीराव उत्तर हिंदुस्तानांत स्वारीस गेला तर आधीं रघूजीस कर्नाटकच्या मोहिमेवर वाटेस लावून नंतर गेला. याप्रमाणें पहिल्यानें डावपेंच चालतां चालतां पुढें उघड उघडहि वैर सुरू झालें.

इ. स. १७३८ मध्यें बाजीराव व निजाम यांची भोपाळाजवळ लढाई झाली, त्यावेळीं बाजीरावानें मदत पाठविण्याकरितां फार आर्जवानें भोंसल्यास लिहिलें व शाहूकडूनहि लिहविलें परंतु भोंसल्यानें कांहींच मदत पाठविली नाहीं. पेशव्यांचा हिंदु-

स्तानांत कांहीं खाजगी मुलूख होता त्यापासून नागपूरकर जबरीनें चौथाई सरदेशमुखी वसूल करूं लागले. रघूजीच्या पुतण्यानें पेशव्यांच्या परवानगीशिवाय हिंदुस्थानांत स्वारी केली; या सबबीवर बाजीरावानें त्यावर आवजी कावरे नांवाचे सरदारास पाठविलें. रघूजीनें त्यावर सैन्य पाठवून त्याचा पराभव केला. याप्रमाणें दोन मराठे लष्करांत लढाई होण्याचा देखावा प्रत्यक्ष दिसूं लागला.

बाजीराव मरण पावल्यावर बाळाजीस पेशवाई मिळूं नये म्हणून हातचीं कामें टाकून रघूजी साताऱ्यास गेला व श्रीमंत सावकार बाबूजी नाईक बारामतीकर यास पेशवाई मिळण्याची त्यानें पुष्कळ खटपट केली पण ती सिद्धीस गेली नाहीं.

बाळाजी बाजीरावाचे कारकीर्दींतहि बंगाल्यांत अलीवर्दीखान नबाबाच्या तर्फेनें पेशव्यांनीं रघूजीचा पराभव केला. शेवटीं हें प्रकरण साताऱ्यास जाऊन शाहूच्या मध्यस्थीनें पेशव्यांचा व भोंसल्यांचा १७४८ मध्यें तह झाला. त्यांत बंगाल, बिहार, कटक, पाटणा, वऱ्हाड, गोंडवण या प्रांतांत भोंसल्यांची पूर्ण सत्ता रहावी व तिकडील कारभारांत पेशव्यांनीं हात घालूं नये असें ठरलें.

मराठ्यांची एकजूट होती तोंपर्यंत निजामाचें कांहीं चाललें नाहीं. मराठे लष्करानें निजामाच्या मुलखास नेहमीं त्रास द्यावा व खंडणी घ्यावी. इ.स. १७६० मध्यें उदगीरचे लढाईत निजामाचा बासष्ट लक्षांचा मुलुख मराठ्यांनीं घेतला परंतु १७६३ मध्यें जानोजी भोसल्याचे मदतीनें निजाम अल्लीनें पुण्यावर स्वारी केली व तींत जरी त्यास यश आलें नाहीं तरी त्यानें युक्तिप्रयुक्तीनें राघोबा दादाचें मन वळवून त्यांपैकीं दहा लक्षांचा मुलूख परत मिळविला. राघोबा दादानें निजामाच्या मुलखापैकीं बत्तीस लक्षांचा मुलूख जानोजीस देऊन त्यास फोडलें. व मग निजामाचा दिवाण

राजा प्रतापवंत ( म्ह. प्रसिद्ध विठ्ठल सुंदर राजे बहाद्दर ) यावर हल्ला करून त्याचा पराभव केला. राजा प्रतापवंत याच लढाईंत पडला.

दक्षिणेंतील बहामनी राज्याचे पांच तुकडे: झाल्यानंतर ते आपसांत भांडत असतां विजयानगरच्या हिंदु राजानें कधीं या पक्षास तर कधीं त्या पक्षास याप्रमाणें मदत करून आपला बराच फायदा करून घेतला. त्याप्रमाणें निजामानें कधीं पेशव्यास तर कधीं भोंसल्यास याप्रमाणें मदत देऊन आपला फायदा करून घेतला. भोंसल्यानें आयते वेळीं आपला पक्ष सोडून देऊन बत्तीस लक्षांचा मुलूख घेऊन तो पेशव्यांस मिळाला. हें शल्य त्याच्या मनांत होतेंच. पुढें तो पेशव्यास मिळून त्या दोघांनीं इ. स. १७६६ मध्यें भोंसल्यावर स्वारी केली. निजामाच्या मदतीबद्दल त्याच्या पूर्वीच्या मुलखापैकीं त्यास भोंसल्यापासून १५ लक्षांचा मुलूख परत देवविला. तो मजकूर पुढें येईल. या आपसांतील भांडणामुळेंच निजामाचें राज्य जिवंत राहिलें. उदगीरच्या लढाईंतील बासष्ट लक्षांचा मुलूख गेल्यावर त्याचें राज्य फारच रोडावलें होतें परंतु वरप्रमाणें हळू हळू त्याचा बराचसा मुलूख परत मिळाला.

निजामअल्ली हा हैदराबादचे गादीवरील सर्व पुरुषांत शहाणा व मुत्सद्दी होऊन गेला.तोच म्हणून मराठ्यांच्या प्रचंड वावटळींतून वांचला. नागपूर व पुणें या दोन मराठा संघांच्या कैचींत त्याचा वऱ्हाडांतील सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत गेलाच होता व त्यांचा हैदराबादेच्या मुलखापर्यंत शह लागला होता. परंतु निजामअल्लीनें वेळ येईल तसें कधीं भिऊन तर कधीं भिववून आपला बचाव करून घेतला.पेशवे व भोंसले यांचे भांडणाप्रमाणेंच पेशव्या-

त्यांच्या गृहकलहांत पडण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. तो राघोबा-दादाच्या मिळाला व जरी त्याच्या मदतीपासून राघोबाच्या पक्षास पक्षांस कांहीं प्रत्यक्ष फायदा झाला नाहीं तरी त्याचे भीतीमुळें दोन्ही पक्षांस त्याची खुशामत करावी लागली. मग त्यास त्रास देण्याचें तर दूरच राहिलें. याचप्रमाणें नागपूरकर भोंसले वगैरे पेशव्यांचे जुने शत्रूहि राघोबाच्या पक्षास मिळाले होते. तसेंच मराठ्यांकडील सरदारांसहि जहागिरी वगैरे देऊन फोडण्यास त्यानें कमी केलें नाहीं. नाना फडणीस, पेशवे व प्रतिनिधि वगैरे प्रमुख मराठे सरदारांस त्यानें वऱ्हाडांत जहागीरी दिल्या होत्या.

याप्रमाणें मराठी साम्राज्याची केंद्रीभूत सत्ता विभागली जाऊन त्याचें पर्यवसान निरनिराळ्या संस्थानांत झालें. भोंसल्यां-कडून इंग्रजांनीं वऱ्हाड घेतलें त्या लढाईत खुद्द पेशवे, निजाम व इंग्रज यांचें लष्कर भोंसल्याविरुद्ध लढत होतें व जो मुलूख मिळे-ल तो तिघांनीं वाटून घ्यावा असें त्यांचे करार मदार झाले होते.

आरभीं आरंभीं मध्यवर्ती सत्ता जोरदार होती तेव्हां सर्व सूत्रें पुण्याहून हलत असत. व त्यांची योग्य अमलबजावणी होत असे. लहान वादाचे अर्ज सुद्धां वऱ्हाडांतून पुण्यापर्यंत हल्लींच्या अपीलाच्या धर्तीवर जाऊन त्यांचा निकाल आधुनिक पद्धतीप्रमाणें सुनावला जात असे व त्याचे अंमल बजावणी करितां टपालानें ठाणेदारापर्यंत हुकूम पाठविले जात असत.

वऱ्हाडांतील केशवराव नांवाचा एक गृहस्थ दिल्लीच्या बादशहाच्या पदरीं नोकर होता व त्याची जहागीर ब्राम्हणवाडा, थडी, दर्यापूर वगैरे बाजूस होती. त्या गांवचे रयतेस भोंसल्यांच्या अधिकाऱ्यांकडून कांहीं त्रास झाल्यामुळें त्यांची तक्रार केशवरावा-पर्यंत गेली. केशवरावानें शाहूचें दरबारास हें कळवितांच रघूजी

भोंसल्यास दरबारांतून हुकूम गेला कीं, "या जहागिरीस त्रास न व्हावा. केशवरावाकडून दरबारांतलीं पुष्कळ कामें करून घ्यावयाचीं आहेत" यानंतर भोंसल्याकडून या जहागिरीस मुळींच त्रास झाला नाहीं.

रघूजी भोंसल्यानें वऱ्हाडांत मराठ्यांची सत्ता बरीच वाढविली व सुव्यवस्थित राज्यव्यवस्था करण्याचा प्रयत्न केला. इ. स. १७९१ मध्यें वऱ्हाडांतील प्रसिद्ध डोंगरी किल्ले नरनाळा व गाविलगड घेतले व १८०३च्या युद्धांत जरी भोंसल्याचा मोड झाला तरी हे किल्ले त्यांनीं तहांत आपलेकडेच राखून ठेवले. त्याचप्रमाणें दक्षिणेकडील उमरखेड वगैरे परगणे निजामानें इ. स. १७६४ मध्यें नानासाहेब पेशव्यांची बायको गोपिकाबाई इला चोळीबांगडी म्हणून दिले होते. त्याची व्यवस्था खुद्द पेशव्याचे नोकरांकडून होत असे. शिवाय चौथाई वगैरे वसूल करण्याकरितां सर्व ठिकाणीं पेशवाईतील व भोंसलेशाहींतील नोकर असत. भोंसल्यांनीं एलिचपूरचे मुसलमान नबाबाशीं दोस्ती केली होती.

इ. स. १७६० मध्यें उदगीरचे तहानें वऱ्हाडच्या दक्षिणेकडील मेहकर वगैरे परगणे निजामाकडून मराठ्यांकडे आले ते भोंसल्याकडे आले. याच भागांत भोसल्यांनीं निजामाकडून मिळविलेल्या तीन जहागिरी अद्यांप आहेत. (सुलतानपूर, किनगांवजटू, मुमराळें). इ. स. १७६९ मध्यें भोंसल्यांचें व पेशव्यांचे पुन्हा बिघडून माधवरावाचे कारकीर्दींत त्यांची लढाईहि झाली व कनकापूरचा तह झाला. त्या तहांत एक कलम असें आहे कीं, भोंसल्यानें दरसाल वऱ्हाडांतून वाशीम व बाळापुरचें कापड पांच हजाराचें पेशव्यास पाठवीत जावें. या दोन्ही जागीं कापड होत असे. मेहकर येथील धोतरजोडे लांबवर प्रसिद्ध असत. या-

पैकीं फक्त बाळापूरचें कापड अद्याप कांहींसें टिकून आहे. वाशीम येथें नाणें पाडण्याची टांकसाळही होती.

भोंसल्यांचा सेनापति व सुभेदार भवानराव काळू हा कारंजाचे ठाण्यावर असतांना त्यानें वाशीम येथील प्रसिद्ध बालाजींचें देवालय बांधलें.

याप्रमाणें भोंसल्याचा जम सर्व वऱ्हाडभर बसल्यावर त्यानें निजामाशीं " साठी चाळिसीचा " तह केला. त्यांत असें ठरलें कीं वऱ्हाडांतलि निजामाचे सर्व मुलखाची वहिवाट भोंसल्यानें करावी व चौथाई, घासदाणा वगैरे मराठ्यांच्या हक्काबद्दल व खर्चाबद्दल शेंकडा साठ रुपये ( २५ चौथाई, १० सरदेशमुखी, २५ स्वार व लष्करी खर्च ) घ्यावे व शेंकडा चाळीस निजामास द्यावे. यावरून या कारकीर्दीस " दो अमली " अगर " साठचाळीसीची " कारकीर्द असें म्हणतात.

जानोजी भोंसले इ. स. १७७२ मध्यें मरण पावल्यावर त्यानें दत्तक घेतलेला पुत्र दुसरा रघूजी ( मुधोजीचा पुत्र ) गादीवर बसला. तो लहान असल्यामुळें त्याचेतर्फे प्रत्यक्ष कारभार कोणी चालवावा हा वाद माजला. जानोजीची स्त्री दर्याबाई इचे व जानोजीचा दुसरा भाऊ साबाजी यांचें एकमत होतें. परंतु रघूजीचा बाप मुधोजी यास वाटे कीं आपण कारभार चालवावा. मुधोजीनें एलिचपुरचे नबाबाचे साह्यानें सैन्य जमा केलें व तो साबाजीवर चालून गेला. त्यांची लढाई इ स. १७७३ मध्यें आकोल्याजवळ कुंभारी म्हणून गांव आहे तेथें झाली. मुधोजीचा पराभव झाला. पुन्हां त्यानें तयारी करून इ. स. १७७५ मध्यें दुसरी लढाई दिली. तींतहि मुधोजीचाच पराभव झाला परंतु लढाईच्या गर्दींत

मुधोजीनें साबाजीस गांठून त्यास ठार मारलें. अर्थातच सर्व कारभार मुधोजीच्या हातीं आला.

वॉरन हेस्टिंग्ज गव्हर्नर जनरल यानें याच मुधोजीस मराठी साम्राज्याचा मालक करून देण्याचें कबूल करून इतर मराठ्यां-तून फोडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मुधोजी फसला नाहीं. पार्लमेंटापुढें वॉरन हेस्टिंग्जची चौकशी झाली त्यावेळीं "वऱ्हाड-चा राजा" मुधोजी याशीं मराठ्यांविरुद्ध कारस्थान केल्याबद्दलहि एक आरोप होता.

वऱ्हाडांत या वेळीं गुलाबसिंग नांवाच्या एका रजपुतानें बंड केलें. त्यानें एका लाकडास शेंदूर लावून त्याचें नांव "राम-सोटा" असें ठेवलें व त्यास पालखींत बसवून त्याचे नांवानें खंडणी गोळा करीत चालला. बरेच दिवसपर्यंत त्यानें भोंसल्याच्या लष्क-रास दाद दिली नाहीं. पुढें भोंसल्यानें प्रसिद्ध भवानराव काळू-चा पुतण्या पांडुरंग गणेश काळू हा वऱ्हाडांत सरदार होता, त्यास त्यावर पाठवून त्याचें बंड मोडलें.

इ०स० १७७९ मध्यें पेशवे व भोंसले यांजमध्ये पुन्हा एक वांधा पडला तो असाः— वऱ्हाडप्रांतांत पेशव्याचे खाजगत महाल होते. उमरखेडाकडील महालासंबधीं पूर्वींच मजकूर आला आहे. तसेंच अमडापूर, खेरडा, मेहकर, सिंदखेड वगैरे परगणेही पेशव्यांकडे होते. या परगण्यांवर पेशवे आपले कमाविसदार पाठ-वीत व ते भोंसल्यास चौथाई वगैरे हक्क देत नसत. पेशव्यांस हे परगणे मिळण्यापूर्वीं भोंसल्यांचा त्यावर हक्क असे. ते पेशव्यांकडे आले तेव्हां भोंसल्याच्या हक्कास बाध न येतां निजामाचे अधिका-रांतील तेवढे हक्क पेशव्यांस मिळाले. पेशव्यांचें म्हणणें हे परगणे स्वराज्यांत आल्यामुळें यावर चौथाई सरदेशमुखी घेऊं नये. भोंस-

त्यांचें म्हणणें हा प्रांत स्वराज्यांत आला नसून पेशव्यांचा खाजगत आहे सबब त्यावरील हक्क भोंसल्यांस मिळाले पाहिजेत. उत्तर हिंदुस्तानांतहि पहिले बाजीरावाचे वेळीं असाच प्रश्न निघाला होता. तेव्हां व नंतरहि भोंसल्यांचेंच म्हणणें खरें ठरलें परंतु पहिले रघूजीचे वेळेस भोसल्यांचा जोर असल्यमुळें त्यानें ते हक्क पूर्ण वसूल केले. दुसरे रघूजींचे वेळेस भोंसल्यांचा जोर राहिला नव्हता म्हणून पेशव्यांचे कमाविसदार कांहींच देईनात. शेवटीं इ०स० १७७९ त रघूजीनें आपला वकील दिवाकरपंत (देवाजीपंत, साडे तीन शहाण्यांपैकीं एक) यास पुण्यास पाठविलें व उभयतांचे कबूलीनें असें ठरलें कीं. भोंसल्यांनीं उमरखेड परगण्याबद्दल सहा-हजारांचे ऐवजीं तीन हजार रुपये घ्यावे व सिंदखेड परगण्याबद्दल योग्य पैसा भोसल्यांस देण्याबद्दल कमाविसदारांस हुकूम द्यावेत.

इ.स. १७९९ मध्यें खर्ड्याची लढाई झाली. त्यावेळीं रघूजी भोंसले व त्याचा शूर सरदार विठ्ठल बल्लाळ हजर होता. विठ्ठल बल्लाळ हा ते वेळीं वऱ्हाडप्रांताचा सुभेदार होता. त्यानें फार शौर्य दाखविलें. त्याचेबद्दल खर्ड्याचे लढाईच्या पोवाड्यांत पुढील वर्णन आहे.

" भोंसल्याचे खासे विठ्ठल पंडित पठाण.
" भले मर्द शिपाई रणामधिं भिडे जैसे पंचानन."

पेशव्यांनीं खर्ड्याचे लढाईनंतर या शूर सरदारास मेजवानी देऊन व त्याचा गौरव करून नंतर त्याची रवानगी केली. खर्ड्याचे लढाईत निजामाकडून जी रकम व मुलूख मिळाला त्यांत २९ लक्ष रुपये व हल्लीं पुसद तालुक्यांत असलेला तीन लक्षांचा मुलूख मिळाला. खर्ड्याचे लढाईनंतर वऱ्हाडावर निजामाचें स्वामित्व नांवापुरतेंच राहिलें. सर्वत्र भोंसल्यांचा अमल बसला होता.

इ. स. १८०२ मध्यें वसईच्या तहानें दुसरे बाजीरावानें मराठी साम्राज्याच्या इतर बरोबरीच्या घटकावयवाचे परवानगी-शिवाय तह करून मराठ्यांचें स्वातंत्र्य घालविलें. हा तह शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले यांनीं मंजूर केला नाहीं व यावरून शेवटचें मराठा युद्ध झालें.

या लढाईंत मराठी साम्राज्याचे घटकावयव सुद्धां एक झाले नाहींत. व एकजुटीनें लढून जें कार्य झालें असतें तें त्यांनीं विनाकारण गमावलें प्रत्येकजण वेगवेगळा लढला व पराभव पावला. इतर संस्थानिकांची सुद्धां मदत मिळाली असती, ती सुद्धां मिळविली नाहीं. आपआपसांतील मत्सर व आपले शक्तीविषयीं खोटी कल्पना यामुळें बळाबळाचा अंदाज करतां आला नाहीं. इंग्रजांनीं तोंपर्यंत हिंदुस्तानांत सर्वत्र जय मिळविला परंतु मराठे लष्कराशीं गांठ पडली तेव्हां त्यांना निराळाच अनुभव आला. ते अनुभवानें शहाणे झाले परंतु मराठी लष्करानें धडा घेतला नाहीं. निजामानें आपलें सर्व लष्कर इंग्रजांचे स्वाधीन केलें व वेलस्ली सारखा कर्तृत्ववान सेनापति मिळाला. शिंदे, होळकर, भोंसले मनसुबे करीतच बसले तों वेलस्लीनें चाल करून वऱ्हाडचे पश्चिम सरहद्दीवर आसई येथें लढाई देऊन मराठ्यांचा पराभव केला.

इंग्रजांविरुद्ध सर्व मराठे सरदार व संस्थानिक यांनीं एक होऊन निकराचा प्रयत्न करून त्यांना हांकून द्यावयाचें ही कल्पना त्या वेळेस निघाली नव्हती असें मात्र नाहीं.हा प्रयत्न चालला होता परंतु त्यास स्वरूप येण्यापूर्वींच लढाई सुरू झाली. देऊळगांवराजा-हून यशवंतराव होळकरानें इ०स० १८०३ मध्यें रघूजी भोंस-

त्यास * पत्र पाठविलें त्यांत त्यानें हे विचार फार स्पष्टपणें मांडले आहेत. व एक जुटीनें युद्ध केल्यास किती फायदा आहे हें दाखविलें आहे. परंतु पुढें यशवंतराव होळकरच फुटून राहिला व शिंदे व भोंसले यांनाच प्रथम लढाई चालवावी लागली.

यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी करून बाजीरावास पळवून लावल्यामुळेंच बाजीराव इंग्रजांच्या हातीं लागला व त्यानें वसईचा तह केला. होळकराचें व शिंद्याचें वांकडें होतें. आतां होळकरास पंचाईत पडली. उत्तरेस आपले मुलखास जावें तर शिंदे आडवा आलेला. पावसाळा नजीक आलेला. दाथी उतरून जाण्याचा धोका. पश्चिमेकडे इंग्रजांचा धाक. निजामाचें व इंग्रजांचें सख्य

---

* श्रीम्हाळसाकांत चंद्र १० जमादिलावल सन १२१३ (इ. स. १८०३) नजीक देऊळगांवराजा

राजश्री रघूजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यासी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित यशवंतराव होळकर रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असावे विशेष......इंग्रजास स्वराज्याचा लोभ उत्पन्न होऊन चाल करावी या इराद्यांत बहुत दिवस होतेच. प्रस्तुत श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब अनुकूल हें निमित्यास कारण होऊन पुणियास येऊन अलीकडे चाल करून नगरचा किल्ला घेतला. आपल्यापाशीं वकील होता तो न पुसतां उठून गेला. नबाबाकडील फौज व दळ येणें औरंगाबादेनजीक आहेत. त्यांची चाल पाहून आपण व राजश्री दौलतराव शिंदे सड होऊन भांदोल्याचे घाटावर चढून त्याची आपली छेटी (!) थोडी आहे म्हणून वर्तमान ऐकतो. त्यास आजपर्यंत फूट होती याजमुळें त्यांचा इतका पसार झाला. प्रस्तुत आपली त्रिवर्गांची एकदिली झाली. तेव्हां स्वराज्यांतील सर्व लहानथोर सरदार मराठे मुसलमान सामने होवील. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे व राजश्री समशेर बहादुर बुंदेले व समशेर बहादुर आदि-

इ. स. १८०१ मध्यें वसईच्या तहानें दुसरे बाजीरावानें मराठी साम्राज्याच्या इतर बरोबरीच्या घटकायवाचे परवानगी-शिवाय तह करून मराठ्यांचें स्वातंत्र्य घालविलें. हा तह शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले यांनीं मंजूर केला नाहीं व यावरून शेवटचें मराठा युद्ध झालें.

या लढाईंत मराठी साम्राज्याचे घटकावयव सुद्धां एक झाले नाहींत. व एकजुटीनें लढून जें कार्य झालें असतें तें त्यांनीं विनाकारण गमावलें. प्रत्येकजण वेगवेगळा लढला व पराभव पावला. इतर संस्थानिकांची सुद्धां मदत मिळाली असती, ती सुद्धां मिळविली नाहीं. आपआपसांतील मत्सर व आपले शक्तीविषयीं खोटी कल्पना यामुळें बळाबळाचा अंदाज करतां आला नाहीं. इंग्रजांनीं तोंपर्यंत हिंदुस्तानांत सर्वत्र जय मिळविला परंतु मराठे लष्कराशीं गांठ पडली तेव्हां त्यांना निराळाच अनुभव आला. ते अनुभवानें शहाणे झाले परंतु मराठी लष्करानें धडा घेतला नाहीं. निजामानें आपलें सर्व लष्कर इंग्रजांचे स्वाधीन केलें व वेलस्ली सारखा कर्तृत्ववान सेनापति मिळाला. शिंदे, होळकर, भोंसले मनसुबे करीतच बसले तों वेलस्लीनें चाल करून वऱ्हाडचे पश्चिम सरहद्दीवर आसई येथें लढाई देऊन मराठ्यांचा पराभव केला.

इंग्रजांविरुद्ध सर्व मराठे सरदार व संस्थानिक यांनीं एक होऊन निकराचा प्रयत्न करून त्यांना हांकून द्यावयाचें ही कल्पना त्या वेळेस निघाली नव्हती असें मात्र नाहीं. हा प्रयत्न चालला होता परंतु त्यास स्वरूप येण्यापूर्वीच लढाई सुरू झाली. देऊळगांवराजा-हून यशवंतराव होळकरानें इ०स० १८०३ मध्यें रघूजी भोंस-

त्यास * पत्र पाठविलें त्यांत त्यानें हे विचार फार स्पष्टपणें मांडले आहेत. व एक जुटीनें युद्ध केल्यास किती फायदा आहे हें दाखविलें आहे. परंतु पुढें यशवंतराव होळकरच फुटून राहिला व शिंदे व भोंसले यांनाच प्रथम लढाई चालवावी लागली.

यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी करून बाजीरावास पळवून लावल्यामुळेंच बाजीराव इंग्रजांच्या हातीं लागला व त्यानें वसईचा तह केला. होळकराचें व शिंद्याचें वांकडें होतें. आतां होळकरास पंचाईत पडली. उत्तरेस आपले मुलखास जावें तर शिंदे आडवा आलेला. पावसाळा नजीक आलेला. दाशी उतरून जाण्याचा धोका. पश्चिमेकडे इंग्रजांचा धाक. निजामाचें व इंग्रजांचें सख्य

---

* श्रीम्हाळसाकांत चंद्र १० जमादिलावल
सन १२१३ (इ. स. १८०३)
नजीक देऊळगांवराजा

राजश्री रघूजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यासी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित यशवंतराव होळकर रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असावें विशेष......इंग्रजास स्वराज्याचा लोभ उत्पन्न होऊन चाल करावी या इराद्यांत बहुत दिवस होतेच. प्रस्तुत श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब अनुकूल हें निमित्यास कारण होऊन पुणियास येऊन अलीकडे चाल करून नगरचा किल्ला घेतला. आपल्यापाशीं वकील होता तो न पुसतां उठून गेला. नबाबाकडील फौज व दळ येणें औरंगाबादेनजीक आहेत. त्यांची चाल पाहून आपण व राजश्री दौलतराव शिंदे सडे होऊन भांदोल्याचे घाटावर चढून त्याची आपली छेटी (?) थोडी आहे म्हणून वर्तमान ऐकतो. त्यास आजपर्यंत फूट होती याजमुळें त्यांचा इतका पसार झाला. प्रस्तुत आपली त्रिवर्गांची एकदिली झाली. तेव्हां स्वराज्यांतील सर्व लहानथोर सरदार मराठे मुसलमान सामने होतील. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे व राजश्री समशेर बहादुर बुंदेले व समशेर बहादुर आदि-

व निजाम मराठ्यांचा कायमचा शत्रू त्याचेकडे जाण्याची सोयच नाहीं. तेव्हां त्याला भोंसल्याची कास धरण्याशिवाय इलाजच नव्हता. त्यामुळेंच त्यानें हा उपक्रम केला. त्याला वऱ्हाडचेंच तोंड खुलें होतें. म्हणून त्यानें वऱ्हाडांत शिरून देऊळगांवराजाहून मागें दिल्याप्रमाणें पत्र भोंसल्यास पाठविलें. त्यांतील विचार जरी अखेर मनोराज्यासारखे ठरले तरी ते पूर्ण विचारानें लिहिले होते यांत संशय नाहीं. परंतु त्यास कालावधि फार पाहिजे होता. निदान शिंदे,होळकर व भोंसले यांचीं सैन्यें एकत्र होण्याची जरूरी होती.

भोंसले या सूचनेस राजी झाले व त्यांनीं मध्यस्ती करून होळकर व शिंदे यांशीं तात्पुरता तह ठरविला व तो अमलांत आणण्याच्या तयारींत सर्वजण खरोखरच लागले.

शिंदे, होळकर व भोंसले यांच्या या तहाची बातमी गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यांस कळतांच त्यानें तिघांसही खलिते पाठविले कीं वसईचे तहानें तुमच्या हक्कास कांहीं बाध येणार नाहीं. शेवटीं सर्वांनीं आपलें लष्कर हलवून निजामाच्या हद्दीवर

---

करून छोटेमोठे अनुकूळ होतील, इतका मरणा पाहतां पांच सहा लाख फौज व दहा कंपू होतील. दोन थोक करून चाल केली असतां कांहीं जड पडावें ऐसें नाहीं, कर्नाटक, बंगाला व अंतरवेदी आदिकरून त्यांचा मुलूख कोठ्यावधिचा आहे, इतका आपल्या पेटांत पडल्यावर आपलें हित किती. त्याजला इकडील मुलखांत येऊन नफा काय होणार हें विचार लावून पाहिल्यानंतर बळाबळ पक्ष इकडील पडून कायल होतील, आपण उतावळी करून गांठ घालून ते हावभरी होऊन चाल करतील ऐसें न करावें, धमकावुन पोक्त विचारानें पाऊल पडल्यास सहजात कायल होतील, त्यास त्याच बेतास लागावे कांहीं अवघड नाहीं,......बहुत काय लिहिणें ही विनंती.

नागपूरकर भोंसल्यांचें कामदपत्र.

रोखलें आहे याचा अर्थ काय याचीहि विचारणा केली व तुमचा इरादा अखेर काय आहे तें तरी कळवा असें विचारलें. दौलतराव शिंद्यानें उत्तर दिलें कीं, "वऱ्हाडचे राजे" यांची भेट घेऊन काय नक्की ठरेल तेंच खरें; तोंपर्यंत मित्रत्व अथवा शत्रुत्व हें आम्ही कांहीं सांगूं शकत नाहीं.

वास्तविक या मंडळींस थोडासा अवकाश पाहिजे होता. सर्वांचीं लष्करें तयार होण्यास व तीं सर्व एका ठिकाणीं जमण्यास वेळेची जरूर होती. शिवाय पावसाळा नजीक आलेला, तो निघून गेल्यास फारच उत्तम. यामुळें शिंद्यानें उडत उडत जबाब पाठविला होता. परंतु वेलस्लीनें हा डाव ओळखला. या तिघां बलाढ्य सरदारांस एकत्र होण्यास सवड देणें म्हणजे स्वतःचा खातीनें नाश करून घेणेंच होतें. त्यानें हें त्रिकूट एकत्र होण्यापूर्वींच प्रत्येकास वेगवेगळें गांठून लढाई देण्याचें ठरविलें व लढाईत कसलेल्या ज. वेलस्लीची ही बुद्धीच अखेर त्याच्या कामीं पडली.

ता. ३ ऑगस्ट १८०३ रोजीं दौलतराव शिंद्याच्या दरबारचा इंग्रज वकील छावणी सोडून गेला व हीच युद्धाची स्पष्ट खूण होती. दौलतराव शिंद्याच्या तोफखान्यावर ज. पेरन म्हणून फ्रेंच गृहस्थ होता त्यास फोडून आपलेकडे आणण्याकरितां ज. वेलस्लीनें त्याचेकडे गुप्त जासूद पाठविले. त्याचें व पेरनचें बोलणें चालणेंहि झालें परंतु अखेर ती गोष्ट जमली नाहीं.

शेवटीं यशवंतराव होळकर या त्रिकूटांतून फुटला व मागें शिंदे व भोंसले दोघेच राहिले. शिंद्यानें अहमदनगरचे बाजूस तळ दिला. भोंसल्याचें लष्कर अजिंठ्याचें घाटावर राहिलें. इंग्रजी लष्कर व निजामाचें लष्कर घेऊन क. स्टिवनसन औरंगाबादेस राहिला.

शिंदे व होळकर यांचा बेत वऱ्हाडचे पश्चिम सरहद्दीवर

एकत्र मिळण्याचा होता. त्याप्रमाणें भोकरदन, जाफराबाद या प्रदेशांत केतना नदीचे कांठीं ते तळ देऊन राहिले. घोडदळ भोकरदनाजवळ व पायदळ आसई येथें मुख्यत्वें होतें. ज. वेलस्लीनें कर्नल स्टिवनसन यास पश्चिमेकडून मराठे लष्करावर पाठविलें व आपण स्वतः पूर्वेकडून गेला व ता. २४ सप्टेंबर रोजीं दोघांनीं हल्ला करण्याचा बेत ठरविला. ज.वेलस्ली हा बधनापूर व जालना यांमधील टेंकड्यांच्या दरम्यान तळ देऊन राहिला.

ता. २३ रोजीं वेलस्लीस* वर्दी मिळाली कीं, त्यानें आपले छावणीकरितां जी सोईस्कर जागा योजून ठेवली होती त्याचे तीन कोसांवर " आसई " जवळ मराठ्यांचा तळ पडला आहे अर्थात् जास्त फायद्याची जागा ते अडवितील हें पाहून त्यानें जड सामान मागें टाकून एकदम कूच केलें व आपली जागा रोंखून धरून तेच दिवशीं ( ता. २३ रोजीं ) एकदम मराठे लष्करावर हल्ला केला व त्याचा पराभव केला.

क. स्टिवनसन दुसरे दिवशीं सकाळीं वेलस्लीचे छावणीस येऊन मिळाला.

आसई येथें पराभव झाल्यावर दौलतराव शिंदे खानदेशाकडे गेला व एरंडोलचे मैदानांत तळ देऊन राहिला. त्यास मुख्यत्वें हा धाक होता कीं वेलस्ली उत्तरेकडे शिंद्याची महत्त्वाची जागा बऱ्हाणपूर व असीरगडचा किल्ला याजवर जाईल. बऱ्हाणपूर व असीरगड गेलें म्हणजे सर्वच गेलें. म्हणून तो वेलस्लीचे लष्करास थोपवून धरण्याकरितां तेथें राहिला.

रघूजी भोंसले प्रथम टोकें येथें तळ देऊन राहिला व त्यानें आपला भाऊ व्यंकोजी यास वऱ्हाडांत पाठवून सैन्य जम-

---

*Wellesleys despatches P. 385

विण्यास सांगितलें. व्यंकोजी व दुसरे सरदार रामचंद्र वाघ व माधवराव निळकंठ हे बाळापुरास तळ देऊन राहिले व सैन्याची जमवाजमव करूं लागले. भोंसल्यांचा वऱ्हाडचा सुभेदार खर्ड्यांच्या लढाईतील वीर विठ्ठल बल्लाळ यासहि व्यंकोजीनें सैन्य तयार करून पाठविण्याबद्दल लिहिलें व त्यानें शक्य ती कुमक बाळापुरास पाठविली. व्यंकोजीनें दौलतराव शिंद्यास व रघूजीस बातमी पत्रें पाठविलीं व आकोटचे जवळपास दोघांनाहि येण्याचा संकेत केला.

वेलस्ली राजूरच्या घाटानें उतरून आकोटच्या रोखानें मराठा लष्करावर आला व क. स्टिवनसन यास त्यानें बाळापुराजवळ गांठलें व इंग्रजी लष्कराच्या ह्या दोन्ही टोळ्या एक झाल्या.

शिंदे खानदेशांतून मलकापूरमार्गें वऱ्हाडांत आला व त्यानें वेलस्लीशीं लढाई थांबविण्याबद्दल बोलणें लावलें. दौलतरावानें आपलें लष्कर एलिचपूरचे पूर्वेस वीस कोसांवर न्यावें म्हणजे मग शिंद्याशीं आम्ही लढाई थांबवूं असें वेलस्लीनें कबूल केलें परंतु भोंसल्याशीं मात्र तसें बोलणें झालें नसल्यामुळें त्यावर मात्र हल्ला करूं असें ज. वेलस्लीचें म्हणणें पडलें. शिंद्याचें म्हणणें भोंसल्याशीं सुद्धां लढाई थांबवा. भोंसल्यास सोडून आपण एकट्यानें लढाई थांबविणें व भोंसल्यास एकट्यास संकटांत टाकणें हें शिंद्यास आवडेना. शेवटीं त्यानें भोंसल्याची बाजू न सोडतां त्याचे लष्करास मिळून ते दोघेहि लढाईच्या तयारीनें राहिले.

शिंद्याचे लष्करांत फक्त घोडदळ व थोडें लष्कर होतें. भोंसल्यांचें लष्कर बरेंच मोठें असून त्यांत घोडदळ, पायदळ व तोफखाना वगैरे सर्व होतें. भोंसल्याचें लष्कर अडगांवाजवळ शिरसोली म्हणून गाव आहे तेथें मन्याबापू याचे हाताखालीं तळ देऊन होतें. शिंदे त्यास मिळाला.

एकत्र मिळण्याचा होता. त्याप्रमाणें भोकरदन, जाफराबाद या प्रदेशांत केतना नदीचे कांठीं ते तळ देऊन राहिले. घोडदळ भोकरदनाजवळ व पायदळ आसई येथें मुख्यत्वें होतें. ज. वेलस्लीनें कर्नल स्टिवनसन यास पश्चिमेकडून मराठे लष्करावर पाठविलें व आपण स्वतः पूर्वेकडून गेला व ता. २४ सप्टेंबर रोजीं दोघांनीं हल्ला करण्याचा बेत ठरविला. ज. वेलस्ली हा बधनापूर व जालना यांमधील टेंकड्यांच्या दरम्यान तळ देऊन राहिला.

ता. २३ रोजीं वेलस्लीस* वर्दी मिळाली कीं, त्यानें आपले छावणीकरितां जी सोईस्कर जागा योजून ठेवली होती त्याचे तीन कोसांवर "आसई" जवळ मराठ्यांचा तळ पडला आहे अर्थात् जास्त फायद्याची जागा ते अडवितील हें पाहून त्यानें जड सामान मागें टाकून एकदम कूच केलें व आपली जागा रोखून धरून तेच दिवशीं (ता. २३ रोजीं) एकदम मराठे लष्करावर हल्ला केला व त्याचा पराभव केला.

क. स्टिवनसन दुसरे दिवशीं सकाळीं वेलस्लीचे छावणीस येऊन मिळाला.

आसई येथें पराभव झाल्यावर दौलतराव शिंदे खानदेशाकडे गेला व एरंडोलचे मैदानांत तळ देऊन राहिला. त्यास मुख्यत्वें हा धाक होता कीं वेलस्ली उत्तरेकडे शिंद्याची महत्त्वाची जागा ब्र्हाणपूर व असीरगडचा किल्ला याजवर जाईल. ब्र्हाणपूर व असीरगड गेलें म्हणजे सर्वच गेलें. म्हणून तो वेलस्लीचे लष्करास थोपवून धरण्याकारितां तेथें राहिला.

रघूजी भोंसले प्रथम टोकें येथें तळ देऊन राहिला व त्यानें आपला भाऊ व्यंकोजी यास व्र्हाडांत पाठवून सैन्य जम-

*Wellesleys despatches P. 385

विण्यास सांगितलें. व्यंकोजी व दुसरे सरदार रामचंद्र वाघ व माधवराव निळकंठ हे बाळापुरास तळ देऊन राहिले व सैन्याची जमवाजमव करूं लागले. भोंसल्यांचा वऱ्हाडचा सुभेदार खर्ड्याच्या लढाईतील वीर विठ्ठल बल्लाळ यासहि व्यंकोजीनें सैन्य तयार करून पाठविण्याबद्दल लिहिलें व त्यानें शक्य ती कुमक बाळापुरास पाठविली. व्यंकोजीनें दौलतराव शिंद्यास व रघूजीस बातमीपत्रें पाठविलीं व आकोटचे जवळपास दोघांनाहि येण्याचा संकेत केला.

वेलस्ली राजूरच्या घाटानें उतरून आकोटच्या रोखानें मराठा लष्करावर आला व क. स्टिवनसन यास त्यानें बाळापुराजवळ गांठलें व इंग्रजी लष्कराच्या ह्या दोन्ही टोळया एक झाल्या.

शिंदे खानदेशांतून मलकापूरमार्गें वऱ्हाडांत आला व त्यानें वेलस्लीशीं लढाई थांबविण्याबद्दल बोलणें लावलें. दौलतरावानें आपलें लष्कर एलिचपूरचे पूर्वेस वीस कोसांवर न्यावें म्हणजे मग शिंद्याशीं आम्ही लढाई थांबवूं असें वेलस्लीनें कबूल केलें परंतु भोंसल्याशीं मात्र तसें बोलणें झालें नसल्यामुळें त्यावर मात्र हल्ला करूं असें ज. वेलस्लीचें म्हणणें पडलें. शिंद्याचें म्हणणें भोंसल्याशीं सुद्धां लढाई थांबवा. भोंसल्यास सोडून आपण एकट्यानें लढाई थांबविणें व भोंसल्यास एकट्यास संकटांत टाकणें हें शिंद्यास आवडेना. शेवटीं त्यानें भोंसल्याची बाजू न सोडतां त्याचे लष्करास मिळून ते दोघेहि लढाईच्या तयारीनें राहिले.

शिंद्याचे लष्करांत फक्त घोडदळ व थोडें लष्कर होतें. भोंसल्यांचें लष्कर बरेंच मोठें असून त्यांत घोडदळ, पायदळ व तोफखाना वगैरे सर्व होतें. भोंसल्याचें लष्कर अडगांवाजवळ शिरसोली म्हणून गाव आहे तेथें मन्याबापू याचे हाताखालीं तळ देऊन होतें. शिंदे त्यास मिळाला.

ता. २९ नोव्हेंबर १८०३ रोजीं वेलस्ली व स्टीबनसन यांचीं दोन्ही लष्करें, निजामाचें लष्कर राजा महिपतराम याच्या हाताखालीं, एलिचपूरच्या नामदारखा नबाबाचे लष्कर, म्हैसूरचें लष्कर व विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट म्हणजे पेशव्यांचें मराठी लष्कर हीं एका बाजूस होतीं व दुसरे बाजूस भोंसल्याचें लष्कर व शिंद्याचें थोडेंसें लष्कर यांचा जमाव होता.

अडगांवची लढाई
२९–११–१८०३

वेलस्लीनें पातुरडीचे गढीवरून सर्व मराठी लष्कराची टेहळणी केली. मराठ्यांचें लष्कर अडगांव व शिरसोली यांच्या दरम्यान पसरलेलें होतें. वेलस्लीनें पाहिलें तों मराठी लष्कर युद्धाचे तयारीनें व्यवस्था करीत आहे. म्हैसूरच्या घोडेस्वारांची व मराठे घोडेस्वारांची लहानशी चकमक उडून ते नुकतेंच वेलस्लीच्या समोर आले होते. दिवस बराच चढला होता. परंतु मराठ्यांनीं आपणांवर हल्ला करण्यापूर्वीं आपणच चालून जाणें बरें असें वेलस्लीनें ठरविलें व मराठी लष्कराकडे कूच करण्याचा त्यानें हुकूम सोडला.

वेलस्लीनें ब्रिटिश लष्कर आघाडीस ठेवून मागें व बाजूस मोंगलांचें व म्हैसुरचें लष्कर ठेवलें याप्रमाणें मराठे लष्करावर समोरून हल्ला केला.

मराठ्यांनीं भोंसल्यांचें पायदळ व तोफा मध्यभागीं घालून डावीकडेस घोडेस्वार ठेवले व उजवीकडेस शिंद्याचें पायदळ घातलें व आजूबाजूस पेंढारी व इतर लष्कर ठेवलें.

मराठ्यांच्या लष्करचा एकंदर तळ चार पांच मैलावर पडला होता. त्याचे पिछाडीस अडगांवचें गांव व मळे बागबागाईत होते. समोरचे बाजूस मोठें मैदान होतें परंतु तें विशेष साफ नसून बारी-

कब्रारीक नाले व ओघळ होते ( नकाशा पहा ).*

वेलस्लीनें आपलें लष्कर व्यवस्थेनें उभें केलें. प्रथम बराच गोंधळ झाला परंतु एकदां व्यवस्थित उभे राहिल्यानंतर त्याच्या लष्करांत पुढें विशेष गोंधळ झाला नाहीं व ते व्यवस्थेनें पुढें हल्ला करीत चालले. त्यांनीं मराठ्यांच्या डाव्या बाजूवर आपला रोख धरला कारण उजवीकडेस शिंद्याचें कवाइती लष्कर होतें. हें पाहतांच शिंद्यानें इंग्रजांच्या डावे बगलेवर हल्ला केला. युद्ध होऊन अखेर मराठा लष्कर पराभूत होऊन ३८ तोफा मागें टाकून पळत सुटलें. इंग्रजी लष्करानें व मोंगल व म्हैसुरच्या लष्करानें कैक मैलांपर्यंत त्यांचा पाठलाग करून पळणाऱ्या लोकांची मनस्वी कत्तल केली. पुष्कळ हत्ती, उंट व सामान इंग्रजांच्या हातीं लागलें.

म्हैसूरच्या लष्करावर विष्णाप्पा नांवाचा सरदार होता. त्यानें व एलिचपूरच्या सलाबतखांच्या लष्करानें बराच पराक्रम दाखविला.

पेशव्यांनीं जें लष्कर इंग्रजांच्या मदतीस दिलें होतें त्यावर अमृतराव पेशवा मुख्य होता. तो या लढाईत आला नाहीं. कारण त्याचा तळ दुसरीकडे होता. त्यास सांगण्यास वेलस्लीकडील मनुष्य गेला परंतु तो रस्ता चुकला व त्यास निरोप वेळेवर पोहोंचला नाहीं. वेलस्ली हल्ला करणार हें ऐकतांच त्यानें आपण कोणीकडून हल्ला करावयाचा हें विचारण्याकरीतां वेलस्लीकडे मनुष्य पाठविला होता. परंतु त्यापूर्वींच लढाई सुरू झाली होती.

---

* हल्लीं सहरहू जागेवर मोठें पटांगण असून शेती आहे. डावे बगलेस दोन तीन नाले गेले असून त्याचे कांठीं दाट बाभुळवन आहे, रणांत पडलेल्या एका इंग्रजांची एक कबर अलीकडे मे० बुलक नांवाच्या कमिशनरच्या सांगण्यावरून अडगांवकर देशपांड्यांनीं बांधली आहे. शिरसोलीच्या गांवखोरच्या देवळावर या लढाईतील तोफेच्या गोळ्यांनीं पाडलेलीं दोन तीन भगदाडें तेथील लोक अद्याप दाखवितात.

ता. २९ नोव्हेंबर १८०३ रोजीं वेलस्ली व स्टीवनसन यांचीं दोन्ही लष्करें, निजामाचें लष्कर राजा महिपतराम याच्या हाताखालीं, एलिचपूरच्या नामदारखा नबाबाचे लष्कर, म्हैसूरचें लष्कर व विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट म्हणजे पेशव्यांचें मराठी लष्कर हीं एका बाजूस होतीं व दुसरे बाजूस भोंसल्याचें लष्कर व शिंद्याचें थोडेंसें लष्कर यांचा जमाव होता.

वेलस्लीनें पातुरडीचे गढीवरून सर्व मराठी लष्कराची टेहळणी केली. मराठ्यांचें लष्कर अडगांव व शिरसोली यांच्या दरम्यान पसरलेलें होतें. वेलस्लीनें पाहिलें तों मराठी लष्कर युद्धाचे तयारीनें व्यवस्था करीत आहे. म्हैसूरच्या घोडेस्वारांची व मराठे घोडेस्वारांची लहानशी चकमक उडून ते नुकतेंच वेलस्लीच्या समोर आले होते. दिवस बराच चढला होता. परंतु मराठ्यांनीं आपणांवर हल्ला करण्यापूर्वीं आपणच चालून जाणें बरें असें वेलस्लीनें ठरविलें व मराठी लष्कराकडे कूच करण्याचा त्यानें हुकूम सोडला.

अडगांवची लढाई
२९-११-१८०३

वेलस्लीनें ब्रिटिश लष्कर आघाडीस ठेवून मागें व बाजूस मोंगलांचें व म्हैसुरचें लष्कर ठेवलें याप्रमाणें मराठे लष्करावर समोरून हल्ला केला.

मराठ्यांनीं भोंसल्यांचें पायदळ व तोफा मध्यभागीं घालून डावीकडेस घोडेस्वार ठेवले व उजवीकडेस शिंद्याचें पायदळ घातलें व आजूबाजूस पेंढारी व इतर लष्कर ठेवलें.

मराठ्यांच्या लष्करचा एकंदर तळ चार पांच मैलावर पडला होता. त्याचे पिछाडीस अडगांवचें गांव व मळे बागबागाईत होते. समोरचे बाजूस मोठें मैदान होंते परंतु तें विशेष साफ नसून बारी-

कबारीक नाले व ओघळ होते ( नकाशा पहा ).*

वेलस्लीनें आपलें लष्कर व्यवस्थेनें उभें केलें. प्रथम बराच गोंधळ झाला परंतु एकदां व्यवस्थित उभे राहिल्यानंतर त्याच्या लष्करांत पुढें विशेष गोंधळ झाला नाहीं व ते व्यवस्थेनें पुढें हल्ला करीत चालले. त्यांनीं मराठ्यांच्या डाव्या बाजूवर आपला रोख धरला कारण उजवीकडेस शिंद्याचें कवाइती लष्कर होतें. हें पाहतांच शिंद्यानें इंग्रजांच्या डावे बगलेवर हल्ला केला. युद्ध होऊन अखेर मराठा लष्कर पराभूत होऊन ३८ तोफा मागें टाकून पळत सुटलें. इंग्रजी लष्करानें व मोंगल व म्हैसुरच्या लष्करानें कैक मैलांपर्यंत त्यांचा पाठलाग करून पळणाऱ्या लोकांची मनस्वी कत्तल केली. पुष्कळ हत्ती, उंट व सामान इंग्रजांच्या हातीं लागलें.

म्हैसूरच्या लष्करावर विष्णाप्पा नांवाचा सरदार होता. त्यानें व एलिचपूरच्या सलाबतखांच्या लष्करानें बराच पराक्रम दाखविला.

पेशव्यांनीं जें लष्कर इंग्रजांच्या मदतीस दिलें होतें त्यावर अमृतराव पेशवा मुख्य होता. तो या लढाईंत आला नाहीं. कारण त्याचा तळ दुसरीकडे होता. त्यास सांगण्यास वेलस्लीकडील मनुष्य गेला परंतु तो रस्ता चुकला व त्यास निरोप वेळेवर पोहोंचला नाहीं. वेलस्ली हल्ला करणार हें ऐकतांच त्यानें आपण कोणीकडून हल्ला करावयाचा हें विचारण्याकरितां वेलस्लीकडे मनुष्य पाठविला होता. परंतु त्यापूर्वींच लढाई सुरू झाली होती.

---

* हल्लीं सहरहू जागेवर मोठें पटांगण असून शेती आहे. डावे बगलेस दोन तीन नाले गेले असून त्याचे कांठीं दाट बाभुळवन आहे, रणांत पडलेल्या एका इंग्रजांची एक कबर अलीकडे मे० बुलक नांवाच्या कमिशनरच्या सांगण्यावरून अडगांवकर देशपांड्यांनीं बांधली आहे. शिरसोलीच्या गांवखोरच्या देवळावर या लढाईतील तोफेच्या गोळ्यांनीं पाडलेलीं दोन तीन भगदाडें तेथील लोक अद्याप दाखवितात.

अडगांवाचे लढाईनंतर वेलस्लीनें गाविलगडचे किल्ल्यावर आपला रोख धरला. वऱ्हाडांतील भोंसल्याचें मुख्य ठाणें म्हणजे गाविलगड. अत्यंत *बिकट प्रसंगीं गाविलगडास जडजवाहीर व कुटुंबाचीं माणसें ठेवून भोंसले लढाईस जात असत.

गाविलगड किल्ला फार मजबूत म्हणून त्यावेळीं प्रसिद्ध होता. हा किल्ला मोंगलांच्याहि पूर्वीचा " गवळीगड " यावरून "गाविलगड " असें नांव पडलें असें म्हणतात. पूर्वीच्या डोंगरी गवळी जातीच्या लोकांनीं तो बांधला होता अशी आख्यायिक आहे. हल्लींच्या पद्धतीनें तो प्रथम बहामनी घराण्यांतील नववा राजा अहमदशहावली† यानें इ. स. १४२९ मध्यें बांधला. इ. स. १४८८ मध्यें इमादशाही घराण्याचा मूळ पुरूष फत्तेउल्ला यानें त्याची दुरुस्ती केली व इ. स. १५७७ मध्यें निजामशाहींत बहिरामखा नांवाच्या किल्लेदारानें त्याची आणखी दुरुस्ती केली.

मुख्य किल्ल्याच्या बाहेर "बाहेरचा किल्ला" म्हणून भाग आहे तो भोंसल्यांनीं बांधला आहे. त्यावर एक बाळबोध लिपींतील लेख आहे तो अस्पष्ट असल्यामुळें वाचला गेला नाहीं.

भोंसल्यातर्फे गाविलगडच्या किल्यावर एक किल्लेदार असे. परंतु गाविलगडचा जीव म्हणजे बेनीसिंग नांवाचा शूर रजपूत अधिकारी होता. नांवाचा किल्लेदार दुसरा होता. बेनीसिंगासच सर्वजण किल्लेदार समजत. बेनीसिंगाचा मूळपुरुष झामसिंग यास रघूजीनें बंगाल्यांतून पाडाव करून आणलें. परंतु तो शूर व इमानी आहे असें पाहून रघूजीनें त्यास वाढवीत वाढवीत त्याचे ताब्यांत मेळघाटांतील सर्व किल्ले दिले, म्हणजे त्यास सर्व किल्लेदारांवर अधि-

* ऐ. ले. सं. भा. ३ पान १०४२.

† फेरिस्ता.

कारी नेमलें. मेळघाटांत गाविलगड व नरनाळा हे दोन मोठे किल्ले असून शिवाय सावळीगड, भवरगड, भैरवगड वगैरे लहान किल्ले आहेत. झामसिंगानंतर त्याचा पुतण्या प्रमोदसिंग व नंतर दर्यावसिंग व नंतर बेनीसिंग याप्रमाणें याच घराण्यांत हा अधिकार चालविला. बेनीसिंग गाविलगड किल्लयांत रहात असे. हल्लीं त्याच्या वंशांतील लोक भैंसदेही ( बैतुल ) येथें आहेत. सदरहू गांव सातपुड्याच्या उत्तरेच्या कांठास आहे.

याशिवाय कळमगव्हाण येथील हल्लींचे जहागिरदार रजपूत घराणेंहि त्या वेळीं गाविलगड किल्लयांत असे व इतरहि रजपूत असत.

वेलस्ली ता० ५ डिसेंबर १८०३ रोजीं एलिचपुरास आला व ता० ७ रोजीं किल्लयाचे पायथ्याशीं देवगांव येथें आला. वेलस्लीनें आपला दुय्यम क० स्टिव्हनसन यास उत्तरेकडून हल्ला करण्याकरितां दुसऱ्या रस्त्यानें पाठविलें व आपण दक्षिणेकडून राहिला. या प्रदेशाची सर्व माहिती देण्यास एलिचपुरचा नबाब बरोबर होता. स्टिव्हनसन तीस मैलांचा फेरा घेऊन मोठ्या कष्टानें उत्तरेकडील बाजूस जाऊन पोहोंचला त्यास तीस मैल जाण्यास पांच दिवस लागले. रस्ते नसल्यामुळें रस्ते करून हातानें सामान व तोफा वर ओढून न्याव्या लागल्या. ता० १२ रोजीं स्टिव्हनसन हा हल्लीं पडीत झालेल्या लबाडे या गांवाजवळ येऊन राहिला. ता० १२ चे रात्रीं स्टिव्हनसन यानें किल्लयाच्या उत्तर दरवाज्यास तोफखाना वगैरे लावून ठेवला. त्याचप्रमाणें वेलस्लीनें त्याच रात्रीं ठरल्याप्रमाणें

**गाविलगडची लढाई. ता० १३–१४–१५. दिसेंबर १८०३.**

दक्षिणेकडील पीरफत्ते दरवाज्यावर मारा करण्याची सर्व तयारी करून ठेवली. ( नकाशा पहा )

ता० १३ चे सकाळपासून दोन्हीकडून किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू झाला. वेलस्लीकडील हल्ल्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. कारण अवजड तोफा टेकडीवर चढवितां येईनात. त्यामुळें किल्ल्यावर मारा लागू होईना. पितळी लहान तोफा टेकडीवर चढविल्या परंतु त्या लहान असल्यामुळें त्यांचा जोर चालेना व दरवाजा व तटबंदी पडेना. परंतु या माऱ्यामुळें किल्ल्यावरील लोकांचें लक्ष उत्तरेकडून दक्षिणेकडे लागलें व स्टिव्हनसन यास बरीच मदत झाली. स्टिव्हनसनचे माऱ्याचे जागेवरून मात्र चांगला उपयोग झाला कारण ती जागाच मारा करण्यास सोईस्कर अशी होती. असें म्हणतात कीं एलिचपूरच्या नबाबाच्या पदरच्या एका गोंडानें वेलस्लीस सांगितलें होतें कीं तुम्ही कांहीं केलें तरी किल्ल्यावर मारा लागू होणार नाहीं व तुम्हास माऱ्याची जागा कधींच सांपडणार नाहीं. वेलस्लानें त्याच्या पोटांत शिरून उत्तरेकडील माऱ्याची जागा समजून घेतली व तिकडे जरी रस्ता मुळींच नव्हता तरी त्या गोंडास बरोबर देऊन स्टिव्हनसन यास त्याच कारणानें तीस मैलांचें चक्कर देऊन पाठविलें व त्यामुळेंच किल्ला हातीं आला.

ता० १४ चे सायंकाळपर्यंत उत्तरेकडील दरवाज्याकडून बराच मारा होऊन किल्ल्यास भगदाडें पडलीं व त्यांतून हल्ला करण्याची तयारी रात्रभर स्टिव्हनसन यानें करून ठेवली.

केनी नांवाच्या इंग्रज सरदाराच्या हाताखालीं मद्रासचें हिंदी पायदळ व स्टिव्हनसनचें हिंदी लष्कर व कांहीं इंग्रजी पलटणी देऊन ता० १५ रोजीं दिवसा १० वाजतां हल्ल्यास उत्तरे-

कडून सुरवात झाली इंग्रजांकडचें लष्कर पडलेल्या तटबंदींतून आंत घुसून आंतील लष्कराशीं लढाई चालली.

इकडे दक्षिणेकडे वेलस्लीनें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल्या. आपण स्वत: दक्षिण दरवाज्यावर राहिला व क० चामर्स यास वायव्येकडील दरवाज्यावर पाठविलें. या दोन्ही तुकड्यांची कांहींच डाळ शिजेना. किल्यास अगर दरवाज्यास भोंक पडेना व हल्ला करण्याचा प्रसंग येईना. त्यांनीं एकसारखा तोफांचा मारा चालविला पण व्यर्थ. एक फायदा मात्र यापासून झाला तो हा कीं किल्ल्यांतील सर्व लष्कर उत्तरेकडील इंग्रजी लष्करावर जाऊन पडलें असतें तें दक्षिणेकडील दुहेरी माऱ्यामुळें द्विधाचित्त होऊन कांहीं इकडे गुंतून राहिलें. त्यामुळें उत्तरेकडील दरवाज्याकडील जोर कमी होऊन केनीच्या हल्ल्यास फारच मदत झाली.

केनीच्या हल्ल्यानें किल्ल्यावरील लष्कर हटून वायव्येकडील दरवाज्यानें बाहेर पडण्यास पहात होतें. त्यांना दुसरा मार्ग न राहिल्यामुळें ते वायव्येकडील दरवाजा उघडून बाहेर पडले. दरवाजा आयताच उघडल्यामुळें चामर्स यास आयतेंच आंत घुसण्यास सांपडलें. केनीला पहिल्या हल्ल्यांत यश मिळालें परंतु किल्ल्यावरचे रजपूत व मराठे निकरानें लढले व कदाचित आणखी नेट धरते तर केनीच्या लष्करास पंचाईत पडली असती. म्हणून केनी यानें प्रथम वायव्येकडील दरवाजा उघडून चामर्स यास आंत घेण्याकरीतां एक टोळी पाठविली. हेतु हा कीं दरवाजा उघडून आपलें लष्कर आंत घ्यावें म्हणजे आयतीच कुमक मिळेल. तीहि टोळी याच वेळीं वायव्य दरवाजाजवळ येऊन पोहोंचली. चामर्स यानें पळणाऱ्या लोकांची कत्तल करून आंतील लष्करास आयते वेळीं मदत पोहोंचविली.

पण एवढ्यानें अर्धेंच कार्य झालें. गाविलगड किल्ल्यास दोन तटबंद्या असून एक आंतील किल्ला व बाहेरचा किल्ला असा दुहेरी बंदोबस्त होता. बाहेरचा किल्ला ताब्यांत आला पण आंतील किल्ल्यास तोफा आणून भोंक पाडणें अगर दरवाजे फोडणेंहि शक्य नव्हतें. दिल्ली दरवाजा हा फारच मजबूत केलेला व त्यावर बंदोबस्त-हि खूप होता. किल्लेदार व स्वत: बेनीसिंग मुख्य रक्षक तेथें जातीनें खपत होता.

किल्ल्यावर चढून जाण्याशिवाय दुसरा इलाज दिसेना शेवटीं शिड्या लावून इंग्रजी लष्कर वर चढलें व हल्ला करून आंत घुसून दरवाजा उघडला. दिल्ली दरवाजा उघडतांना सुद्धां भयंकर लढाई झाली बाहेरील किल्ल्याच्या रक्षणांत किल्ल्यांतील बरेचसे लोक मेले व पुष्कळ पळून गेले. शूर किल्लेदार व इमानी बेनी-सिंग मात्र अखेरपर्यंत आपल्या थोड्याश्या लोकांसह मरेपर्यंत लढले. दरवाजा उघडला तेव्हां दरवाजांत प्रेतांचा खच पडला होता. खुद्द बेनीसिंगाचें व किल्लेदाराचें प्रेत दरवाजांतच सांपडलें.

बाहेरील किल्ला पडतांच आंतील किल्ल्याच्या उरलेल्या थोडक्या शिबंदीस पुढील भविष्य कळून चुकलें. दोन्ही बाजूनें आंत घुसलेल्या प्रचंड सैन्यापुढें आंतील थोडेंसें लष्कर काय करणार हा परिणाम जाणून रजपूत स्त्रियांनीं जोहार केला व बेनीसिंग व इतर रजपूत दिल्लीदरवाजावर आपला देह ठेवण्याकरीतां निश्चयानें पुढें आले. पुरुषांचे मनोरथ पूर्ण झाले. परंतु गडबडींत व्यवस्थित रीतीनें जोहार न झाल्यामुळें बायकांपैकीं दोघीजणी मेल्या परंतु बाकीच्या जिवंत राहिल्या.

खुद्द कर्नल केनी या लढाईंत पडला. त्यास एलिचपूर येथें पुर-ण्यांत आलें. हल्लींच्या म्युनिसिपल आफिसाचे मागें त्याची कबर आहे.

गाविलगडच्या किल्ल्यांत बरीच लूट सांपडली. या किल्ल्यांत भोंसल्यांचा बराचसा खजीना रहात असे. यांतच एक बहुमोल कुराणाची प्रत होती. ती एलिचपूरच्या नवाबानें नेली व त्याचे संग्रहीं बरेच दिवस होती.†

गाविलगडचे लढाईनंतर दोन दिवसांनीं म्हणजे ता. १७ डिसेंबर १८०३ रोजीं इंग्रज व भोंसले याजमध्यें तह झाला तो " देवगांवचा तह " या नांवानें प्रसिद्ध आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं ज्या गांवीं वेलस्लीनें तळ दिला होता तेंच हें देवगांव.

या *तहाचा सारांश असा.

देवगांवचा तह

१ कटक, बलसोर हे प्रांत व वर्धा नदीच्या पश्चिमेकडील वऱ्हाडचा सर्व भाग ( गाविलगड नरनाळा हे किल्ले व त्या खालचा प्रांत खेरीज करून ) भोंसल्यानें इंग्रज व त्यांचे साथीदार यांस द्यावा.

२ " दक्षिणेचे सुभेदार " ( निजाम ) "रायपंडित प्रधान" ( पेशवे ) यांजमध्यें व " सेनासाहेब सुभा " ( भोंसले ) यांजमध्यें असलेले व पुढें होणारे सर्व तंटे कंपनीसरकारच्या मध्यस्थीनें तोडावे

३ कंपनी सरकाराशिवाय इतर युरोपियन, अमेरिकन सरकारांशीं भोंसल्यानें संबंध ठेवूं नये व कंपनीनें भोंसल्यांचे बिरादर अगर शत्रू यांस मदत देऊं नये.

४ भोंसल्यानें मराठा राज्यसंघाशीं कांहीं संबंध ठेवूं नये.

वरील तहाप्रमाणें भोंसल्याचा वऱ्हाडचा संबंध सुटला व इंग्रज व त्यांचे

---

* परिशिष्ट पहा तहाचें भाषांतर.

Wellesleys despatches p. 41

† भाग १५ एलिचपूरचे नबाब पहा.

यांची वांटणी इंग्रजांनीं केली त्यांत " निजामाचा कांहीं जरी *हक्क नव्हता " तरी त्यास मेहेरबानीनें हा प्रांत देण्यांत आला.

सुरजी अंजनगांवचा तह
३०-१२-१८०३

ता. ३०-१२-१८०३ रोजीं दौलतराव शिंद्यानेंहि सुरजी अंजनगांव (ता. दर्यापूर) मुक्कामीं इंग्रजांशीं तह केला. त्यावरून अजिंठ्याच्या डोंगराच्या दक्षिणेकडील* सर्व प्रदेश म्हणजे वऱ्हाडच्या पश्चिम व नैऋत्येस असलेला सर्व प्रदेश व जालनापूरचा भाग, त्याचप्रमाणें अशीरगडचा किल्ला, बऱ्हाणपूर शहर व पवनगड, दोहद व त्या किल्ल्यांखालील खानदेशचा व गुजराथेचा भाग इंग्रजांस दिला.

या वांटणींत " रायपंडित परधान " (पेशवे) यांस मात्र कांहींच मिळालें नाहीं. त्यांच्या तोंडास पानें पुसण्यांत आलीं. म्हैसुरकरांसहि कांहींच मिळालें नाहीं. पेशव्यांना अहमदनगर शहर व थोडासा भाग देऊं केला. त्यानें तिरस्कारानें तोहि घेण्याचें नाकारलें. शेवटीं रेसिडेंटानें कांहीं गोडीनें व कांहीं जबरीनें वांटणीचा तहनामा कबूल करण्यास लावला. निजामाचाहि हक्क वेलस्लीने उडविला व हजारों कुलंगडीं आपल्या गुप्त रिपोर्टांत दाखविलीं पण "साठी चाळिसीमुळें" अगोदरच वऱ्हाड प्रांतांत त्याचा हात असल्यामुळें " मेहेरबानी म्हणून " त्यास वऱ्हाड देण्याची शिफारस केली.

गाविलगड व नरनाळा १८०३ चे देवगांवचे तहांत भोंसल्यानें आपल्याकडे ठेवले होते परंतु शेवटचें मराठा युद्धानंतर १८२२ मध्यें पुन्हां भोंसल्यांचा व इंग्रजांचा तह झाला त्यांत वरील दोन किल्ले व त्या खालचा प्रदेश भोंसल्यांकडून मिळाला.

Wellesley's despatches P. 423

तोहि पुन्हां वऱ्हाडास जोडण्यांत आला व पूर्ववत् निजामास मिळाला. वऱ्हाडचा वर्धा नदीच्या पूर्वेकडील, आष्टी, आमनेर, आर्वी, वगैरे वर्धा जिल्ह्यांतील बराचसा भाग राहिला तो मात्र भोंसल्यांकडे राहून तेव्हांपासून वऱ्हाडांतून गेला.

**मराठयांचे वेळीं वऱ्हाडची स्थिति**

भोंसल्यांचें वेळीं वऱ्हाडची स्थिति त्यापूर्वींच्या व त्यानंतरच्या स्थितीपेक्षां पुष्कळच चांगली होती. स्वराज्याचे पुष्कळ फायदे लोकांच्या अनुभवास आले. निजामाच्या पूर्ण अधिकाराखालीं असलेल्या गांवांस भोंसले त्रास देत असत परंतु ज्या गांवच्या लोकांनीं भोंसल्यांचें वर्चस्व कबूल केलें त्यांना बिलकुल त्रास देत नसत. व उलट निजामाच्या त्रासदायक अधिकाऱ्यांपासून रक्षण करीत असत.

धान्य व इतर जिनसा स्वस्त असत. हल्लींच्या मानानें नव्हे तर त्यावेळच्या मानानें सुद्धां इतर भागांपेक्षां सर्व गोष्टींची विपुलता असे. इ. स. १७७० मधील एका पत्रव्यवहारांत "लष्करांत सवंगाई विपुल, कांहीं न्यून नाहीं" असें पेशव्यांच्या लष्करांतील एका सरदारानें *उमरावतीहून पुण्यास पत्र पाठविलें आहे.

शिवाय भोसल्यांच्या कारकीर्दींत वऱ्हाडांतील पुष्कळ लोकांस कार्यकर्तृत्वाची संधि मिळाली. भोंसले वऱ्हाडांतच प्रथम राहिले होते व नागपुरास गेले तेव्हां वऱ्हाडांतील पुष्कळ लोकांस घेऊन गेले व गेल्यानंतरहि अखेरपर्यंत वऱ्हाडांतील विद्वान, शूर, मुत्सद्दी लोकांस आपले गुण दाखविण्यास भोंसल्याचे दरबारांत पुष्कळ संधि मिळाली. याप्रमाणें वऱ्हाडांतील पुष्कळ लोक प्रसिद्धीस

---

* ऐ. ले. सं. भाग ३ पान १३४८ पत्र नंबर ७८२ निळकंठराव पटवर्धन कुरुंदवाडकर यांचें पत्र.

आले. हल्लींची नागपूरची बरींच प्रमुख घराणीं वऱ्हाडांतील आहेत. स्वराज्यावरील प्रेमामुळें वऱ्हाडांतील हिंदु वतनदार भोंसल्यास जास्त मदत करीत व निजामास तितकी मदत करीत नसत. असाहि त्या वेळीं आरोप करण्यांत आला होता.

या वेळीं देशांत मुळींच शांतता नव्हती. नेहमीं कोणत्याना कोणत्या तरीं लष्कराचा तळ देशांत पडलेला असे व त्या लष्करानें आपल्या खर्चाकारितां अगर खंडणी म्हणून प्रत्येक मोठमोठ्या गांवांतून रकमा वसूल कराव्या. ग्रामाधिकारी अगर देशमूख देशपांडे यांच्या भोंवतीं ही एक मोठीच धोंड असे. आपल्या गांवाच्या अगर परगण्याच्या रयतेस वांचविण्याकरितां त्यांना आधींच पूर्वींच्या मुक्कामावर जाऊन लष्कराच्या अधिकाऱ्यांशीं ठराव करून रुपये द्यावे लागत नाहींतर सदरहू लष्कर गांवीं आलें ह्मणजे ग्रामाधिकाऱ्यांस व गांवातील शेट सावकारास धरून जबरीनें पैसे घेत. नाहींतर पकडून "वळा" (ओलीस) म्हणून धरून नेत व पैसे आले म्हणजे सोडून देत. दोअमली कारकीर्दीमुळें खरा बंदोबस्त कोणीच करीत नसे व कोणीही हें आपलें कर्तव्य असें समजत नसे. निजामाचें अगर मराठ्यांचे असें कायमचें लष्कर वऱ्हाडांत रहात नसे त्यामुळें कोणीहि यावें व लुटावें हा क्रम चालू असे. त्यामुळें कोणाचेंहि लष्कर आलें कीं लोक पळून जात व दूर अंतरावरून बातमी ठेवीत. मोंगल, मराठे पैकीं पेशवे, भोंसले यापैकीं शत्रु कोण व मित्र कोण, खरा राजा कोणता व रक्षणाकरितां दाद कोणास मागावी हें वऱ्हाडच्या रयतेस समजत नसे.

त्या वेळच्या खाजगी पत्रव्यवहारावरून वरील स्थिति कशी होती हें समजतें, त्यांपैकीं कांहीं उतारे खालीं दिले आहेत.:—

निंबाळकरांची फौज खेडल्याहून कूच करून मेहकर परगणियांत मुकाम केला. तेथून मेहकर व अंबडापुर परगणियांत गावगना रोखे करून दांगडो केला "

" आमचें वर्तमान तर नबाब हशमतजंग फौजेसुद्धां बाहेर निघून मौजे पार्डी पा रिसवड हा गांव मारून मंगरुळावर फौज आली त्याची वर्तणूक सुधी नाहीं म्हणून आम्ही स्थळ सोडून बाहेर निघालों. तुमचे प्रांतीं जोराबरखान व हे एक होणार. नवा सुभा औरंगाबादेचा पेशजीचा दखल झाला ऐसी प्रबळता आविंधाची जाली आहे. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. पुणियाहून राजश्री नरसिंगरावजी सुभेदार पांच हजार फौज व तोफा निघून नडसी प्रांतास येणार आणि राजश्री हरीपंत तात्या फौजेसुद्धां पंचमहालांत जाणार "

" मोगलाची फौज तिकडे जमा जाली त्यांचीहीं बातमी वरचे-वर लिहीत जावी "

" मार्गी वर्तमान ऐकिलें कीं तुमचे गांवीं फोजेचा दंगा झाला. याजमुळें चिंता प्राप्त जाली. "

गाजीखान यानीं रिसवडचा नाश करून काल द्वादशीस लोणारास चार हजार फौजेनसी उतरला याजकरीतां गुंता पडला दुष्टासी संबंध आणि जवळ आला आहे यास्तव दोन दिवस आडत-ळा आहे. तुम्ही बातमी गंगेअलीकडेस आल्याची अगत्यरूप मुजरद आपले मणुशाबरोबर ताबडतोब पाठवून द्यावी. याविसी आळस हर-गीज न करावे. "

" होळकराकडील फौजेचे रवळ्याचा व बंगसाकडील उप-द्रवामुळें दाभाडी वगैरे उज्याड जहाले........सांप्रत्य फौज

१ रावरंभा ?

बोदडीं¹ अलीकडे आली आहे. आपली मर्जी प्रसिस्त मंडळी आणावयाची असलीया स्थळ आपलेच आहे. लिहावे ऐसे नाहीं. बातमी फौजची समजत जाईल त्याजप्रमाणें बंगसाकडील वगैरे वर्तमान लिहीत जावें.

" कंपू व पेंढारी माघारी घाट उतरून गेला हे लि ॥ त्यास बातनी आणखी आणवून आम्हास लि ॥ पाठवावे. बरे असो तुर्त श्रीनें अरिष्ट टाळले परंतु बातनीविसी आळस न करावा. बावनपाग्याचे फौजचेहि वर्तमान ठेवीत जावे. आंद अथवा कोळी दाहा पंधरा बरकंदाज चांगले पाहून पाठवावे म्हणोन लि ॥ त्यास कंपू व पेंढारी घाटाखाली गेले त्याजकारितां माणसे पाठविण्यास आनमान केला त्यास पाहिजेत असल्यास लि ॥ पा ॥ म्हणजे नवे मुसलमान अथवा मऱ्हाटे ठेवून पा॥देऊ आंद कोळी मिळणार नाहींत."

" पेंढारी व कंपूची बातमी तसीच असालियास तावडतोब लि॥ पाठविणें म्हणजे आपली मुलमाणस व तात्याची ऐसी इकडे दहावीस स्वार पैदल व तट † " पा॥ इकडे घेऊन येऊं."

" कंपूचे फौजेचे चुकोतीबद्दल ऐवज द्यावयाचा त्या पो॥ लष्करांत ऐवज पोहचून बाकी देणें राहिले त्याची याद अलाहिदा पाठविली आहे. रु. सवा बावीसशे राहिले. त्याजपैकीं मरणा येथून पाठविला..........( ऐवज देऊन ) रा. केसोपंत वकील सुटोन येत ऐसे जाले पाहिजे."

" कंपूची फौज सेवलीवर आहे शेवलीचा खराबा फार केला."

मराठ्यांच्या निरनिराळ्या घटकावयांतहि सख्य राहिलें नसून एकमेकांचें कोणी मानीत नसत. पेशव्यांचे खासगत महाल

¹ बोदवड ( मलकापुराजवळ ).

† तट्टें.

आमडापुर, खेरडा वगैरे होते व तेथें लक्ष्मण खंडेराव म्हणून त्यांचा कमाविसदार होता तो पौष शु० १ शके १७२० च्या पत्रांत मुरारमा नांवाच्या सावकारास पैसे मागतांना लिहितोः—

"कंपूची फौज भारजेवर होती. तेथून शनिवारीं कूच होऊन मौजे भरोस पा खेडले येथील मुकामास आले. खेडल्याची चुकोती आगोदर सेलगांवास राऊत व कारकून आला होता त्यांनीं केली होती परंतु त्या चुकोतीवर लोकांस धीर न पुरे सबब कसबा फुटला व परगणाहि हवालदिल झाला. येथील मजकूर तरी आंबडापुर परगण्यास तोसीस लागो नये ऐसी ताकीद होती ते ताकीद देऊन रा। केसोपंत वकील यांस बाळसांगवीचे मुकामास पाठविले. लष्करांत करवंडकर* देशमुखाचे सोयरे आंगरे व सितोळे आहेत ते अवघडरायाचे सावंगीस मेजमानीस आले होते तेथें पंत मा निल्हे जाऊन भेट घेतली. वर्तमान विदित केले. त्याचे म्हणणें कीं ताकीद आम्हास सिरसावंद्य परंतु मेजमानी घासदाणा खायास पाहिजे. त्याजवरून त्यांनीं पत्र लिहिले कीं येथील फडशा एखाद बोलण्यांत आल्याखेरीज परिणाम नाहीं. कोन्ही सरकारतर्फेचे पाठवून द्यावे तेव्हां येथून खंडोबा व भिकारी

---

* हे करवंड चिखली तालुक्यांत अमडापूर परगण्यांत आहे. हे देशमुख इंगळे आडनांवाचे जाधवरावांचे व भोंसल्यांचे सोयरे. तंजावरकर व्यंकोजीची बायको दीपाबाई इंगळ्यांची मुलगी. ते हेच इंगळे असे ते सांगतात. हे देशमुख व्यंकोजीचे वेळेपासून तंजावरासच आहेत. व भोंसले व इतर प्रसिद्ध मराठे सरदारांशीं त्यांच्या सोयरिकी झाल्या आहेत. त्यांचा किताब "राजे प्रतापरुद्र मानेराव" त्यांचे सोयरे जाधवराव यांच्यापैकीं एक शाखा करवंडास त्यांचेतर्फे कारभार करते. शेजारच्या घोत्र वगैरे गांवीं इंगळ्यांचे बिरादर आहेत.

दास, मानेराव देशमुख ऐसे लष्करांत पाठविले. भरोशाचे मुकामीं भेट जाली. चुकोतीची बोलणीं मनस्वी पडलीं आहेत. कोणेही प्रकारे परगण्याचा किंच तोडिला पाहिजे. तेव्हां फडशा करणें प्राप्त ........चार हजार रुपयाचें काम व्हावे........"

त्याचप्रमाणें एलिचपूरचे नबाब सलाबतखान, देवजी गवळी, चैनसिंग, समशेरबहाद्दर आटोळे, पंचोत्रेकर, वगैरे लहान मोठ्या सरदारांचा व बंडखोरांचा नेहमीं उपद्रव असे. वरील पत्र लिहिणारा खुद्द सेनासाहेब सुभा (नागपूरकर भोंसले) यांचे फौजेबद्दलहि वरप्रमाणेंच तक्रार करतो. "श्रीमंत राजश्री सेनासाहेब सुभा यांची फौज आली होती त्यांनीं महालांत मनस्वी उपद्रव करून पायमाली केली व रु. सहा हजार घेतले. मागाहून तोफखाना वगैरे नित्यशा रेज लागली आहे त्याचा उपद्रव कांहीं लिहिन्यांत येत नाहीं."

कित्येक वेळां तर "प्रांत अगदीं निर्वीर झाला रक्षणकरता कोणी नाहीं. ईश्वर लाज ठेवील तें खरें." असे निराशेचे उद्गार खाजगी पत्रांतून सांपडतात.

वरप्रमाणें या अमदानींत स्थिति होती. दुःखांत सुख एवढेंच कीं औरंगजेबाचे कारकीर्दींपर्यंत सर्व मुसलमान राजांचें व सरदारांचें धर्मवेड पुढें विशेष दृग्गोचर होत नाहीं. त्याचें मुख्य कारण मराठी राज्याचा उत्कर्ष, मुसलमानांचे राज्यकारभारांत हिंदूंचा प्रवेश व वजन, मुसलमानांची वाढलेली संख्या व त्यांत धर्मांतर झालेल्या हिंदूंची मोठी संख्या, एकंदर मुसलमानी समाजांत आलेली ग्लानि व अवनति वगैरे अनेक कारणें आहेत.

# भाग नववा.

## निजामाची कारकीर्द १८०३ ते १८५३

१८०३ मध्यें नागपूरकर भोंसल्यांचा व शिंद्यांचा पराभव झाल्यानंतर शिंदे व भोंसले यांचे ताब्यांतील वऱ्हाडांतील मुलूख निजामास इंग्रजांकडून मिळाला व त्यावर प्रत्यक्ष निजामाचा एकट्याचा अंमल सुरू झाला.

पूर्वीच्या दोअमली कारकीर्दीमुळें जी अंदाधुंदी होती ती आतां नाहींशीं होऊन एकमुखी सत्ता सुरू झाली परंतु वऱ्हाडच्या कमनशीबाचा फेरा अद्याप संपला नव्हता. उलटा तो जास्त झाला. पूर्वीच्या कारकीर्दींत भोंसल्यांचा अंमल कबूल करणाऱ्या प्रदेशास मराठ्यांकडून त्रास न होतां निजामाकडील अधिकाऱ्यांचाहि ते बहुधा त्रास होऊं देत नसत. परंतु निजामाच्या कारकीर्दींत मुख्य सत्ता दुर्बल असल्यामुळें रक्षण होण्याचें तर दूरच परंतु निजामाचेच अधिकारी व मक्तेदार रयतेस छळीत असत.

मराठ्यांच्या वेळची व त्यापूर्वीची मलिकंबराची जमीन धाऱ्याची सुरक्षित पद्धति मोडून मक्तेदारी पद्धति सुरू झाली. त्यांत सरकारास त्रास नाहीं एवढाच फायदा असे परंतु मक्तेदार नफ्याकरितां मक्ता करीत असल्यामुळें रयतेच्या कल्याणाची त्यांना फिकीर नसे. राज्य हें पैसा मिळविण्याचें एक साधन एवढाच अर्थ असे, त्याजमुळें मक्तेदार, पोटमक्तेदार व त्यांचे हस्तक यापासून प्रजेस फार पीडा होत असे.

याच मक्तेदारी पद्धतीनें फसून अव्वल इंग्रजींत वऱ्हाडांत मालगुजारी पद्धति सुरू करण्याचे हुकूम सुटले होते. परंतु ही पद्धति

आगंतुक असून पुरातन नाहीं असें सिद्ध होऊन रयतवारी पद्धति सुरू करण्यांत आली.

निजामअल्ली मरण पावल्यानंतर शिकंदरजहा हा निजाम झाला. निजामाच्या राज्यांत अंदाधुंदी फार. निम्मे प्रांत निरर्थक जहागिरींनीं अडविल्यामुळें उत्पन्न थोडें व खर्च फार अशी नेहमींची स्थिति. संस्थान नेहमीं कर्जबाजारी व सावकारांचें वजन दरबारांत. त्यामुळें राज्यकारभार अत्यंत अव्यवस्थित असे.

ब्रिटिश रेसिडेंटस मुकाट्यानें ही स्थिति पहाणें अशक्य झालें. व सार्वभौम सत्ता जास्त मजबूत करण्याकरितां या अव्यवस्थेमुळें त्यांना कारभारांत हात घालण्यास आयती संधि मिळत असे.

निजामाचा दिवाण नेहमीं ब्रिटिश रेसिडेंटानें पसत केलेला नेमावा लागे व तो रेसिडेंटाच्या धारणानें वागून कारभार चालवीत असे. त्यामुळें अंतर्व्यवस्थेंत व पैशाचे बाबतींतहि रेसिडेंटाकडून दिवाणास मदत मिळून कारभारास मदत होत असे. निदान त्यास तसें वाटण्यास योग्य कारण होतें. यामुळें वरवर निजाम जरी खुष दिसला तरी हा रेसिडेंटाचा पूर्ण वरचष्मा त्यांचे पोटांत खुपत असे.

प्रत्येक तहाचे वेळीं "दोस्त" संस्थानिकांची सत्ता आपल्या जास्त जास्त अंकित करण्याकडे ब्रिटिश सरकारची त्या वेळीं प्रवृत्ति असे.आज फ्रेंच पलटणी काढण्यास लावल्या तर उद्यां दुसरेंच कांहीं कलम जास्त घातलें, अशा तऱ्हेनें निजामाची सर्व बाह्य सत्ता व बरीचशी अंत:सत्ता संपुष्टांत आली पण कुरकुरण्यापलीकडे त्याचे हातून कांहीं होण्यासारखें नव्हतें. पण एखादे वेळीं रेसिडेंटाचा व निजामाचा खटका उडणार हें ठरलेलें होतें.

१८०४ मध्यें जुना दिवाण अजीम–उल्–उमरा हा मरण पावला. रेसिडेंटाचा लकडा पाठीस लागला कीं मीर–आलम यास

नेमा. कारण त्याचें आंग इंग्रजांकडून होतें हें सर्वत्र प्रसिद्ध होतें. निजाम त्यास नेमण्यास याच कारणावरून नाखुष. परंतु रेसिडेंटाच्या जोरापुढें त्याचें काय चालणार? नाइलाजानें त्यास मीर आलम यास नेमावें लागलें. परंतु पूर्वीच्या दिवाणांइतकी सत्ता मात्र त्यानें मीर आलमाच्या हातीं ठेवली नाहीं.

राजा महिपतराम नांवाचा वऱ्हाडचा सुभेदार निजामातर्फेचा होता. १८०३ च्या मराठ्याचे युद्धांत निजामातर्फे हा इंग्रज सैन्यास मदत करीत होता. तो निजामाच्या विश्वासांतला असल्यामुळें व निजाम गादीवर येण्यापूर्वीं पैशांनीं व इतर तऱ्हांनीं महिपतरामानें त्यास फार मदत केल्यामुळें त्यास दिवाण करावें ही शिकंदरजहांची फार इच्छा परंतु ती रेसिडेंटाच्या आग्रहामुळें सिद्धीस जाईना. राजा महीपतराम वऱ्हाडची सुभेदारी सोडून हैदराबादेस येऊन राहिला व त्याचे वजन दरबारांत फार होतें. मीर अलम यास काढून मही-पतरामास दिवाण करण्याची निजामानें फार खटपट केली परंतु रेसिडेंटानें महिपतरामाशीं कोणताही संबंध न ठेवण्याची "सूचना" केल्यामुळें निजामास, महिपतरामास परत वऱ्हाडांत जाण्याचा हुकूम देणें भाग पडलें. महिपतरामानें वऱ्हाडांत परत न जातां शिंदे व होळकर यांशीं कारस्थान सुरू केलें व त्यांच्या करवीं निजामास इंग्रजांच्या कचाटींतून सोडविण्याचा प्रयत्न केला. या कटास निजामाचें आंतून आंग असावें असा संशय होता परंतु या-बद्दल स्पष्ट पुरावा कांहींच नव्हता. तरी राजा महिपतराम व त्याचा स्नेही इस्मायल—यारगंज या दोघांस कामावरून दूर करणें निजा-मास भाग पडलें.

मीर आलम यास आपले जिवास कांहीं अपाय होईल अशी धास्ती पडली. कारण तो निजामास नकोसा झाला होता

व दरबारांत त्याचे सर्व शत्रु झाले होते. मीर आलम एके दिवशीं रेसिडेंटास भेटण्याच्या मिषानें सर्व खटल्यासुद्धां निघून रेसिडेन्सीं-च्या हद्दींत " रंगमहाल " म्हणून इमारत आहे, तींत जाऊन राहिला व सबसिडियरी फौजेचा पहारा त्यानें आपल्या बंगल्यावर ठेवला. महिपतराम कामावरून निघाल्यावर तो पुनः आपल्या वाड्यांत येऊन राहिला. परंतु आपले घरावर फौजेची एक तुकडी ठेवल्याशिवाय त्यास निर्धास्त वाटेना. याप्रमाणें निजामाचे सर्व मनोरथ ढांसळून त्यास मीर आलमास शरण जावें लागलें. पूर्वी कधीं न झालेली गोष्ट म्हणजे खुद्द निजामानें मीर आलम दिवाण याचे घरीं जाऊन त्याची भेट घेतली व महिपतरामाच्या पक्षाच्या रिकाम्या झालेल्या मोठमोठ्या जागा मीर आलमाच्या पक्षाच्या मंडळींस निजामानें दिल्या.

याच जागांमध्यें वऱ्हाडच्या सुभेदारीची वरणी मीर अल-माच्या पक्षाकडे गेली. राजा चंदूलाल जो पुढें प्रसिद्ध दिवाण झाला तो यावेळीं मीर आलमाचा पेशकार होता. दिवाणाच्या हाताखालची पेशकारीची जागा अद्याप त्याच्या घराण्यांत चालू आहे. राजा चंदूलाल हाहि मीर आलमाप्रमाणेंच इंग्रजांच्या पूर्ण पक्षाचा होता व रेसिडेंटाच्या मर्जीमुळेंच त्याची बढती झाली. राजा चंदूलालचा भाऊ गोविंदबक्ष याची महीपतरामाच्या रिकाम्या झालेल्या वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमणूक झाली. वऱ्हाडच्या सुभे-दारीचा ताबा महिपतरामापासून घेण्याकरितां त्याचेबरोबर एक ब्रिटिश पलटण देऊन त्याची रवानगी झाली कारण त्या वेळच्या रीतीप्रमाणें व विशेषतः महीपतरामाच्या पूर्वींच्या शिरजोर वर्तना-वरून व त्यास आंतून निजामाची फूस असल्याची सर्वत्र अफवा असल्यावरून महिपतराम सुखानें ताबा देईल याबद्दल खात्री नव्हती.

महिपतरामानें सैन्य जमवून निजामाच्या तुकडीचा पराभव केला परंतु पुढें सबसीडियरी सैन्य त्यावर पाठवून त्याचा पाठलाग केला. महीपतराम नंतर पळून होळकराचे आश्रयास गेला व तिकडेच तो दंग्यानें मारला गेला. हल्लींच्या काळांत महिपतरामाचें हें वर्तन चमत्कारिक वाटेल परंतु वऱ्हाडांतील मागील पिढीच्या लोकांस याचें कांहींच आश्चर्य वाटत नाहीं. ही वहिवाट इंग्रजी-अंमल सुरू होईपर्यंत चालू होती. निजामाच्या ताब्यांत वऱ्हाड आल्यापासून त्या मुलखाचा वसूल मक्त्यानें देण्याची वहिवाट पडली होती. वऱ्हाडचा मक्ता बावन्न लक्षास दरसाल दिला जात असे, त्यावरून फार दिवसांपासून दूरवर "बावन्न वऱ्हाड" असें प्रसिद्ध नांव असे.* "वऱ्हाड व सोन्याची कराड" या म्हणीप्रमाणें वऱ्हाड हा सधन प्रांत असल्यामुळें मक्तेदारास फार नफा होत असे. त्यामुळें वऱ्हाडचा मक्ता घेण्याकरितां उड्यावर उड्या पडत असत व ज्याचा वशीला लागेल तो भाग्यवान बनत असे. लांचलुचपतीचाहि प्रकार राजरोस चाले. पुष्कळदां असें होत असे कीं, एका मक्तेदारास मक्ता देऊन तो लेखी हुकूम वगैरे घेऊन गेला म्हणजे पाठीमागून दुसऱ्यानें आणखी "कारवाई" करून पहिला मक्ता रद्द केल्याबद्दल व नवीन मक्ता दिल्याबद्दल हुकूम घेऊन पहिल्या मक्तेदाराच्या पाठोपाठीं जावें व त्यास जब-

---

* अमृतराय कवीच्या काव्यांत सुद्धां "वऱ्हाड बावन" असें वर्णन आहे.

† यावरून एक गमतीची आख्यायिका वऱ्हाडांत प्रसिद्ध आहे. ती अशी, मक्तेदार हैदराबादेहून परवाना घेऊन निघाला म्हणजे घोडा दौडीत वऱ्हाडाकडे निघे परंतु घोड्याच्या उलट बाजूस म्हणजे हैदराबादेकडे तोंड करून तो घोडा दौडीत असे, कारण न जाणो दुसरा मक्ते-

रीनें हुसकून लावून आपण ताबा घ्यावा. यावरून कांहीं दिवस होऊन जात तोंपावेतों मक्तेदाराचा जीव धोक्यांत असे. प्रजेच्या कल्याणाकडे न पाहतां, शेत मक्त्यानें देतात त्याप्रमाणें व्यापार अगर नफा म्हणून देशाचा जेव्हां मक्ता दिला जातो, तेव्हां प्रजेच्या सुखाकडे कोण पाहणार ? शक्य तितका पैसा प्रजेकडून हरतऱ्हेनें काढून होईल तितका नफा करावयाचा हा क्रम असे.

दिवाण मीर आलम हा १८०८ मध्यें मरण पावला व पुनः दि ाण नेमण्यासंबंधानें निजाम व रेसिडेंट यांच्यांत कुरबूर सुरू झाली. रेसिडेंटाच्या मतानें शमसुल्उमरा नांवाच्या सरदारास दिवाण नेमावें व राजा चंदूलाल यास पूर्वीप्रमाणें पेशकारी द्यावी. निजामाच्या मतानें मुनीर उल्मुल्क यास दिवाण नेमावें. निजामाचा हट्ट पाहून रेसिडेंटानें पडती घेतली परंतु मुनीर उल्मुल्क हा नांवाचा दिवाण रहावा व खरी सत्ता चंदूलाल याचे हातीं रहावी, दिवाणानें अगर निजामानें त्याचे कारभारांत हात घालूं नये असें ठरून कारभार सुरू झाला.

यानंतर निजामानें कंटाळून राज्यकारभारांतून अगदीं आंग काढून घेतलें व राजा चंदूलालचे हातीं सर्व कारभार आला. चंदूलालची सर्व कारकीर्द पैशाच्या ओढाताणींत गेली. राज्याचा खर्च अतोनात वाढून कर्ज फिटेना. अनेक सावकार होत होत प्रसिद्ध "पामर आणि कंपनी" संस्थानची सावकार बनली. जहागिरीनें व्यापलेलें व बडेजावी खर्चांत काटकसर करण्यास सामर्थ्य नसलेलें संस्थान या कंपनीच्या कर्जांतून कधींच मुक्त होण्याचें

---

दार दुसरा हुकूम घेऊन आपल्या पाठीवर येतों कीं काय ही त्यास नेहमीं भीति असे. ह्या आख्यायिकेंतील अतिशयोक्ति व विनोद वजा केला म्हणजे खरी वस्तुस्थिति काय असेल याची कल्पना येईल.

चिन्ह दिसेना. सर चार्लस मेटकाफ रेसिडेंट झाल्यावर त्यानें पामर कंपनीविरुद्ध ओरड करून ब्रिटिश सरकाराकडून हैदराबाद संस्थानास कर्ज देववून या कंपनीचें कर्ज फेडलें. यापूर्वीं "पामर" याचें स्तोम खुद्द रेसिडेंटापेक्षांहि जास्त झालें होतें.†

राजा चंदूलालचे कारकीर्दींत अंदाधुंदी चालू होती. स्वतः तो जरी अत्यंत हुशार व कर्तबगार असे तरी सर्वत्र लांचलुचपतीचा प्रकार पूर्वपरंपरप्रमाणें चालू असे. राजा चंदूलाल यानें १८०८ पासून १८४३ पर्यंत ३९ वर्षें प्रत्यक्ष कारभार केला १८४३मध्यें त्यानें राजीनामा दिला व ता. १९ एप्रिल १८४९ रोजीं तो मरण पावला.

राजा चंदूलाल अत्यंत उदार मनाचा, धर्मनिष्ठ व दयाळू अशी त्याची आजपर्यंत ख्याति आहे. वऱ्हाडांत पुष्कळ देवस्थानास त्याच्या हातच्या जहागिरी इनाम वगैरे दिलेले आहेत. सर्व रेसिडेंटांनीं त्याच्या हुशारीची, विद्वत्तेची व दीर्घोद्योगाची तारीफ केली* आहे.

दरम्यान १८१७ चें मराठा युद्ध सुरू झालें व त्यांतहि निजामाचे सबसीडियरी सैन्याची इंग्रजास चांगली मदत झाली. पेशव्यांशीं झालेल्या तहानंतर हैदराबादेस १८२२ मध्यें इंग्रज व निजाम यांचा तह झाला. त्यांत मराठ्यांस निजामाकडून घेणें असलेली चौथाईची सर्व बाकी माफ केली व पुढेंहि चौथाई कायमची बंद झाली. १८०३ च्या तहामध्यें आलेल्या कांहीं मुलखाची अदलाबदल होऊन एकमेकांच्या सरहद्दी निश्चित केल्या.

† वॉरन हेस्टिंगप्रमाणें पामर याचीहि पार्लमेंटापुढें चौकशी झाली.

* राजा चंदूलाल याची एक अस्सल तसबीर हैदराबादच्या रेसिडेन्सीमध्यें आहे.

पेशवाई बुडाल्यानंतर एल्फिन्स्टन साहेबानें पुण्यास जो प्रसिद्ध जाहीरनामा काढला त्या शर्तीप्रमाणें जो वागेल त्यांची वर्षासनें, जहागिरी, इनामें वगैरे निजामानें चालू ठेवावी असें ठरलें. परंतु हीं इनामें बुडविण्याचा प्रयत्न निजामाचें अधिकारी बरीच वर्षें करीत होते व तीं कायम ठेवण्याकरितां वेळोवेळीं इंग्रज सरकारास हात घालावा लागला.

इ. स. १८२० पर्यंत राजा चंदूलाल हा सर्व कारभार रेसिडेंटाच्या हुकमाप्रमाणें बिनबोभाट करीत होता. दिवाण व निजाम हे दोघेहि नामधारीच होते. एकदां निजामानें फक्त जमाखर्चाचे हिशेब पाहण्यास मागविले तर वाजवीपेक्षां संस्थानचे कामांत हात घातल्याबद्दल रेसिडेंट रसेलसाहेब यांचेकडून त्याची *कानउघाडणी झाली. तेव्हांपासून त्यानें राज्यकारभारांतून अजीबात लक्ष काढून घेतलें व निराशेच्या योगानें तो तिरसट बनला. त्याचें डोकें ठिकाणावर आहे कीं नाहीं याबद्दल संशय सुरू झाला.

१८२० मध्यें सरचार्लस मेटकाफ हा रेसिडेंट आला व त्यानें मात्र सर्व अंदाधुंदी पाहून संस्थान सुधारण्याचा मनापासून प्रयत्न केला. पामर कंपनीच्या मगरमिठींतून संस्थान सोडविल्याचें श्रेय त्यानेंच घेतलें. प्रत्येक खात्यावर विश्वासांतले युरोपियन अधिकारी मुख्य नेमले.जमीनमहसुलाची सर्व मुलखभर फेरतपासणी करून सरकारी अधिकाऱ्यांचा रयतेवर जुलूम न होईल असा बंदोबस्त केला राज्याचे जिल्हानिहाय भाग पाडून प्रत्येक जिल्ह्यावर एकएक युरोपियन अधिकारी नेमून जमीनमहसूल व पोलिस खातें त्याचे

---

* Briggs Vol. I P.95. रेसिडेंटाच्या वरचष्म्याचें सर्व वर्णन त्या वेळच्या इंग्रज लेखकांच्या लेखांवरूनच घेतलें आहे.

हाताखालीं दिलें व बाकीचा कारभार मात्र निजामाच्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं ठेवला.

ही व्यवस्था आठ वर्षें चालली व त्या काळांत प्रजेस फार सुख होऊन कामाची शिस्त चांगली लागली. मेटकाफ याच्या या अमलांतील विशेष गोष्ट हीं कीं सर्व अधिकार आपल्या हातीं बळकावण्याची त्याची इच्छा नसून रयतेस त्रास न व्हावा व हिंदी अधिकाऱ्यांसाहि अशीच शिस्त लागावी इतकाच तो दाब ठेवीत असे व त्याचे लेखी हुकूम आपल्या युरोपियन अंमलदारास जात त्यांतहि तो वारंवार आपलें हेंच धोरण दर्शवीत असे.

शिकंदरजहा निजाम ता. २१ मे १८२९ मध्यें मरण पावला व त्याचा मुलगा नासीरुद्दौला हा गादीवर बसला. त्याच्या नवीन जोमांत त्यास रेसिडेंटाचें वर्चस्व सहन करणें व आपण बाहुल्याप्रमाणें गादीवर रहाणें सहन होईना म्हणून त्यानें गव्हरनर यास लिहून रेसिडेंटाचा दाब नाहींसा होऊन प्रत्यक्ष कारभार आपल्या हातीं यावा असें मागणें केलें व गव्हर्नर जनरल यास तें मान्य करणें भाग पडलें. त्याप्रमाणें त्यानें रेसिडेंटास लिहून सर्व युरोपियन कामगार काढून टाकले.

सत्तेबरोबर जी जबाबदारी येते ती योग्य तऱ्हेनें बजावण्याची लायकी व आंग मोडून काम करण्याची संवय निजामास नसल्यामुळें राज्यांत पूर्ववत् घोंटाळा माजला. मधली कारकीर्द फार थोडे दिवस चालू होती सबब तिचीं मुळें विशेष खोल गेलीं नव्हतीं. रयतेवरचा जुलूम पूर्ववत् सुरू झाला व वर दाद लागण्याचा संभव नसल्यामुळें रयतहि आपल्या हातांत न्याय घेऊन आपली दाद आपणच लावून घेण्याचा प्रयत्न करीत असे.

१८३९ मध्यें ह्याबद्दल कोर्ट ऑफ डायरेक्टरानें निजामाची कानउघाडणी केली. निजामानें हल्लींच्या डिटेक्टिव्ह पद्धतीनें अमीन नांवाचे गुप्त अधिकारी सर्व राज्यभर नेमले व सरकारी अधिकारी रयतेवर जुलम करतील तर वर रिपोर्ट करण्याचा त्यांस अधिकार दिला परंतु असले गुप्त अधिकारी किती सत्यप्रिय व निर्भीड असणार.गरजू, हलके व पोटभरू लोकांचा यांत भरणा असल्यामुळें ते पैसे खाऊन तालुकदारास वाटेल तो जुलुम करू देत व पैसे न देणारा तालुकदार चांगला असला तरी त्याविरुद्ध खोटे रिपोर्ट करीत.

१८१८ मध्यें कोर्ट ऑफ डायरेक्टरानें रेसिडेंटाचा अंमल पुन्हां सुरू केला.

१८४३ चे सुमारास संस्थानचें कर्ज अतिशय वाढून पुरणमल वगैरे जुने सावकार लोक कर्ज देईनात. निजामाचे कानीं राजा चंदूलाल यानें वरील गोष्ट घातली परंतु तोहि कांहीं करीना शेवटीं राजा चंदूलाल यानें ता. ६ सप्टेंबर १८४३ रोजीं राजीनामा दिला. त्यास मरेपर्यंत रोजीं एका हजाराचें पेनशन चालू होतें.

कांहीं दिवस राजा रामबक्ष ( चंदूलालचा पुतण्या ) यास दिवाण नेमून शेवटीं निजामानें सुराजुल्मुल्क यास दिवाण नेमलें.

१८५० मध्यें ब्रिटिश सरकारचें कर्ज सत्तर लक्ष झालें. सबसीडियरी सैन्याचा सहा सहा महिन्याचा पगार तुंबला. दोन रुपये शेंकडा व्याज देऊन कोणी निजामास कर्ज देईना. शेवटीं इंग्रजी खजिन्यांतून सैन्यास पगार देणें सुरू झालें व निजामाच्या पाठीमागें सदरहू रक्कम देण्याचा तगादा लागला.

शेवटीं १८५२ चा तह होऊन वऱ्हाड सदरहू कर्जाकरितां इंग्रजास देण्यांत आलें. हा तह झाल्यावर तीन दिवसांनीं सुराजुल-

मुल्क दिवाण मरण पावला. त्यास वरील तह आवडला नाहीं व त्या दुःखानें तो मेला अशी एक बातमी आहे.

सदरहू * तहा अन्वयें वऱ्हाड इंग्रज सरकाराकडे वहिवाटीस दिलें गेलें. त्याचे राज्याचे व्यवस्थेचा व सबसीडियरी फौजेचा खर्च करून निजामास हिशेब द्यावा व † शिल्लक निजामास देत जावी असें ठरलें.

हैदराबाद दरबारच्या पदव्या खालपासून वरपर्यंतपुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

| मुसलमानी | हिंदु |
|---|---|
| १ खान–सुलतानखान | १ राय–राय खूबचंद |
| २ बहादूर–सलाबतखान बहादूर | राय मुरलीधर |
| ३ जंग–फरीदूनजंग–सालारजंग | २ राजा–राजा चंदूलाल |
| ४ दौला–मुनीर. उद् दौला | राजा किशनप्रसाद |
| ५ मुल्क–मुशीर उल् मुल्क | ३ वंत–राजे नेमिवंत (मलकापूर) |
| ६ उमरा–शम्स उल्–उमरा | –राजे प्रतापवंत राजा बहादुर (प्रसिद्ध विठ्ठल सुंदर) |
| ७ जहां–असफजहां | साडेतीन शहाण्यापैकीं |

वऱ्हाडचे सुभ्याचा राज्यकारभार बहुधा मक्त्यानें चालत असे मक्तेदार आपले तालुकदार वगैरे अधिकारी नेमीत. शिवाय न्यायाच्या कामाकरितां मीर अदल् व मुनसफ् असे अधिकारी असत. गांवपंचायतीकडे बरेच तंटे जात व तेथें साधारणपणें समाधानकारक रीतीनें त्यांचा निकाल होत असे. कारण गांवचे गांवीं खरी वस्तुस्थिति लपत नसे. गांवापासून पंचवीस कोसांवर दूरच्या कोर्टासमोर फक्त वादीप्रतिवादी अगर फिर्यादी आरोपी यांचेच समोर

* परिशिष्ट १ पहा.

† दहावे भागाचे शेवटची पुरवणी पहा.

हल्लीं साक्षीदारास व पक्षकारास खोटें बोलण्यास कांहींच दिक्कत वाटत नाहीं. दुसरे ओळखीचे व खरी वस्तुस्थिति जाणणारे लोक काय म्हणतील ही जाणीव आतां मुळींच रहात नाहीं. गांवांत लोकमताचा दाब असे. पाटील, कुळकर्णी, जातीजातींतील मुख्य मानकरी लोक, देशमुख, देशपांडे, यांचें वजन फार असे व बहुधा त्यांचा गांवपंचाइतीच्या तंट्यामध्यें योग्य रीतीचा दाब असे.

वऱ्हाड निजामाकडे असतांना अखेरीअखेरीस फारच अंदाधुंदी माजली होती. रोहिले लोकांचा चोहोंकडे दंगा सुरू झाला होता. निजामाचे राज्यांतील व वऱ्हाडांतील बहुतेक जहागीरदारांच्या पदरीं रोहिले. अरब, लोकांचा संग्रह असे.*तो धामधुमीचा काळ असल्यामुळें प्रत्येक मोठ्या मनुष्यास दुसऱ्यासत्रास देण्यास अगर स्वतःचा बचाव करण्यास असे लोक ठेवावे लागत. परंतु त्यावर मालकांचा विशेष दाब नसून शिस्तहि नसे. रिकामपणाच्या वेळांत ते दंगेधोपे करीत. हा त्रास फार झाला तेव्हां निजामानें सक्त हुकूम फिरविला कीं, यापुढें रोहिले लोकांस कोणी नोकर ठेवूं नये. त्यामुळें सर्वांनीं रोहिले लोकांस कामावरून दूर केलें. पण त्यामुळें ते एकदम रिकामे होऊन त्यांनीं लुटालूट सुरू केली. त्यावर हैदराबाद कंटिंजंटच्या टोळ्या पाठवून त्यांचा मोड केला. तेव्हांपासून त्यांचा त्रास मिटला. हल्लीं वऱ्हाडचे दक्षिण भागास पुष्कळ रोहिले कायमचे राहिले आहेत व नवीनहि येत आहेत. गरीब हिंदु लोकांवर जुलूम करण्यांत अद्याप त्यांची ख्याति कायम आहे. त्यांचा मुख्य धंदा सावकारीचा आहे व ते फार जबर व्याज घेत असतात व जुलमानें वसूल करतात.

रोहिल्यांची धामधूम इंग्रजी कारकीर्दीपर्यंत सुद्धां चालू होती रिसोडजवळ चिंचांबें येथें रोहिल्यांची व क्या० ख्याक् किनान

*निजामाच्या राज्यांत हल्लींहि हे लोक मोठमोठ्या लोकांच्या पदरीं आहेत.

यांची १८५९ मध्यें चकमक होऊन सदरहू कॅपटन मारला गेला परंतु रोहिल्यांचा मोड झाला.

१८५३ च्या तहाप्रमाणें वऱ्हाडाबरोबरच नलदुर्ग व रायचूर दुआब हे प्रांत इंग्रजांच्या वहिवाटीस आले होते परंतु १८५७ सालच्या बंडांत निजामानें इंग्रजांस मदत केली त्याबद्दल पुढील तहांत ते प्रांत निजामास परत दिले.

निजामाचे वेळीं प्रथम राजा महिपतराम यास वऱ्हाडचा सुभेदार नेमलें होतें. १८५३ चे तहांत वऱ्हाड निजामास दिलें त्या वेळीं राजा महिपतराम याचे कुटुंबाचे पेन्शनीचा खर्च वऱ्हाडचे उत्पन्नांतून दिला जावा असा उल्लेख आहे. याचेनंतर राजा चंदूलालचा पुतण्या गोविंदबक्ष हा वऱ्हाडचा सुभेदार झाला व त्यानंतर राजा बिशनचंद हा १८३१ चे सुमारास कामावर आला. बिशनचंदची कारकीर्द रयतेस फार वाईट गेली अशी अद्याप आख्यायिका आहे. यानंतर हैदराबाद संस्थानचा सावकार पूरणमल याचे कर्जांत कांहीं दिवस वऱ्हाड लावून दिलें होतें परंतु ब्रिटिश रेसिडेंटाच्या हुकमावरून १८३९ मध्यें त्यास काढून लावलें. त्यानंतर प्रसिद्ध पेस्तनजी नांवाच्या पारशी सावकारास वऱ्हाड मक्त्यानें दिलें. त्यास पूरणमल पासून जबरीनें ताबा घ्यावा लागला. सदरहू पेस्तनजीचें घराणें वऱ्हाडांत अद्याप प्रसिद्ध आहे व आकोला येथें त्यांचें घर आहे. पेस्तनजी यानें राज्यकारभार नवीन सुधारलेल्या पद्धतीनें चालविला होता व उद्योगधंदे वाढवून रयतेचें कल्याण करण्याकडे त्याची विशेष प्रवृत्ति होती. शेतकरी लोकांस आगाऊ पैसे देऊन कापूस पिकविण्याचा प्रघात यानेंच प्रथम पाडला.

इ० स० १८२५-२६ मध्यें प्रथम वऱ्हाडांतून मुंबईस पेस्तनजी यानें कापूस पाठविला व तेव्हांपासून वऱ्हाडचें कापसाचें

पीक वाढत वाढत वऱ्हाड आज सर्व हिंदुस्थानांतील कापसाचा मुख्य प्रांत होऊन बसला आहे. व वऱ्हाडची वाढती संपत्ति सर्व कापसावरच अवलंबून आहे. पेस्तनजी यानें खामगांव व इतर ठिकाणीं कापसाचे रेचे बसविले. खामगांव ही आज कापसाच्या व्यापाराची जंगी पेठ आहे.

पेस्तनजी यास चंदूलाल यानें इ. स. १८३९ मध्यें वऱ्हाडचा मक्ता दिला होता. चंदूलाल यानें १८४३ मध्यें राजीनामा दिल्यावर दुसरे कारभारी आले व वऱ्हाडच्या कामधेनूशिवाय हैदराबादच्या दरबारचें काम अडूं लागलें. शेवटीं १८४९ मध्यें वऱ्हाड खालीं करून देण्याचा पेस्तनजी यास हुकूम झाला. पेस्तनजीनें संस्थानकडे चाळीस लक्ष रुपये कर्ज दाखविलें व तें फिटेपर्यंत ताबा सोडण्याचें नाकारलें. शेवटीं हैदराबादचें सैन्य येऊन त्यानें परभणी बाळापूर व आकोला येथें पेस्तनजी याचे माणसांवर हल्ला करून जबरदस्तीनें ताबा घेतला. परभणी येथें पेस्तनजीचें १६ इसम मारले गेले. पेस्तनजीनें ताबा सोडल्यानंतर आपल्या पैशाचा संस्थानाकडे तगादा लावला व त्यास कारभाऱ्यांनीं आपल्या सावकारांवर हुंड्या, चिठ्ठ्या दिल्या परंतु बाजारांत त्या कागदास कोणी विचारीना व त्याची सर्व रक्कम बुडून गेली. पेस्तनजीच्या कारकीर्दींत पूर्वीं दंग्यामुळें ओस पडलेलीं गावें आबाद झालीं व सोडून दिलेल्या जमिनी वहीत झाल्या.

पेस्तनजीप्रमाणें पूरणमलचेंहि कर्ज बुडालें. दिवाणानें पूरणमलच्या कर्जाचा हिशेबच कबूल केला नाहीं व उलट सरकारी बाकी पूरणमलकडे काढली.

१८०३ मध्यें वऱ्हाड निजामाकडे आलें त्या वेळीं खुद्द निजामाचे राज्यांत सुद्धां बरीच अंदाधुंदी होती. वेलस्लीसाहेबानें

१८०४ मध्यें लिहिलें आहे .... " निजामाच्या राज्यांत गोदावरीपासून हैदराबादेपर्यंत एकसारखी अंदाधुंदी आहे. शिंदखेड हें चोरांचें माहेरघर आहे. हजारों लोक भुकेनें मरत आहेत व राजापासून प्रजेचें कांहींच रक्षण होत नाहीं" सर हेनरी रसेल रेसिडेंट ह्याचाहि १८१९ ते २० सुमाराचा हाच रिपोर्ट आहे कीं निम्मे सुद्धां उत्पन्न सरकारास होत नाहीं.

१८०३ मध्यें बारशीटाकळी व अडगांव या बाजूचीं गांवें लुटारू टोळ्यांनीं लुटलीं. १८०९ मध्यें पेंढारी लोकांनीं एलिचपूरपर्यंत मुलूख लुटला. वाशीम, जळगांव व पिंपळगांव हीं वेळोवेळीं लुटलीं. १८०८ मध्यें पातूर लुटून जाळून टाकलें. इ. स. १८१३ मध्यें दोघा मराठे सरदारांनीं फत्तेखेर्डा परगणा तीन महिने आपल्या ताब्यांत ठेवला व खुद्द फत्तेखेर्डा गांव व भोंवतालचा भाग लुटून नेला.

पेंढाऱ्यांप्रमाणेंच दक्षिण वऱ्हाडांत " नाईक " लोकांच्या दंग्यामुळें सर्व मुलूख त्रस्त झाला. हल्लीं त्या नायकांपैकीं पुष्कळसे लोक तिकडच्या भागांत शांततेनें आहेत परंतु त्यांच्या वडिलांची स्मृति त्यांच्यांत व लोकांत अद्याप जागृत आहे. पेंढारी व नाईक यांच्या दंग्यांत वऱ्हाडांतील जुने कागदपत्र व सनदा यांचा फार नाश झाला.

अरब व रोहिले हे तर दक्षिणेंतील लोकांचे शत्रूच होत. सर रिचर्ड टेंपल * यांनीं म्हटल्याप्रमाणें, " दक्षिणेंतील छोट्या बांध्याच्या दक्षिणी लोकांत शेळ्यामध्यें लांडग्याप्रमाणें हे धिप्पाड अरब व रोहिले वावरून धुमाकूळ घालीत असत. परंतु त्यांतल्या-

---

* " Men & events of my time" by Sir Richard Temple

त्यांत अरब हे मनानें थोर असून विशेष नीच कृत्यें करीत नसत. रोहिले मात्र मनानेंहि नीच असून वाटेल तीं कृत्यें करून प्रजेस पीडा देत असत." जेथील वसूल होत नाहीं तेथें किंवा निजामास जरूर पडेल तेव्हां अरब व रोहिल्यांजवळून आगाऊ पैसे घेऊन त्यांना परगणे मक्त्यानें दिले जात असत व असें झालें म्हणजे त्या परगण्यांतील रयतेचीं शंभर वर्षें भरलीं म्हणून समजावें. शिवाय मक्त्याची मुदत संपली म्हणजे छोट्याश्या लढाईशिवाय तो परगणा सरकारांत मिळण्याची मुष्कीलच असे.

नायकांच्या दंग्यामुळें बेचिराख झालेलीं पुष्कळ गांवें इंग्रजी अमलाचे आरंभीं व कांहीं पूर्वीं आबाद झालीं. तेथील वतनदार लोकसुद्धां पळून गेले होते. सदरहू गांवें आबाद करतांना परगण्याच्या देशमुख देशपांडे लोकांनीं नवीन वतनदार पाटील उत्पन्न करून त्यांचेपासून कांहीं मोबदला घेऊन त्यांना त्या गांवच्या पाटीलकीच्या व पांढरीच्या जमिनीच्या सनदा दिल्या आहेत. बऱ्याच सनदांत उल्लेख आहे कीं, "नायकांच्या दंग्यामुळें गांव उजाड झाला होता तो तुम्ही आबाद करण्याचें कबूल केल्यामुळें तुम्हास ही सनद दिली आहे."[1]

हे नाईक लोक एकाच जातीचे नसत. कांहीं हटकर नांवाच्या मेंढपाळ जातीपैकीं असत. ही जात आतां शांततेनें शेतकी करून आहे व वाशीम व त्याचे भोंवतालीं या जातीचा विशेष भरणा आहे. कांहीं लोकांनीं गांवें वसवून पाटिलक्या मिळविल्या आहेत. कांहीं वंजारी *नांवाच्या कुणबीवजा जातीचे असत व कांहीं वरच्या दर्जाच्या कुणबी पाटील घराण्यांपैकीं असत. शिपाईगिरीचा धंदा करून

१ खाजगी कागदावरून

* राजूरचे "राय यशवंत" हे वंजारी नाईक आहेत.

शेंपन्नास लष्कर हाताखालीं ठेवलें कीं तो, "नाईक" बने. त्यावेळचें सरकार त्यांना कांहीं वेतन देऊन त्यांस देशरक्षणाचें काम देत असत. त्यांचा वेळ नेहमीं लुटालूट करण्यांत जात असे.

निजामाच्या वेळीं या नायकांनीं फार प्रळय केला. इ० स० १८१८ मध्यें नवसाजी नाईक यानें मेजर पिटमन नांवाच्या गोऱ्या अधिकाऱ्याजवळच्या निजामच्या लष्कराशीं उमरखेडानजीक लढाई दिली. पुढें त्यांस पकडून हैदराबादेस पाठविलें व तेथें तो मरण पावला.

मेजर सदरलंड नांवाच्या सरदारानें नायकांचा पिच्छा पुरविला. जो नाईक सांपडेल त्यास त्यानें फांशीं दिलें. यामुळें सर्व नाईक पळून गेले. यानंतर त्यानें माफीचे जाहिरनामे काढून व कांहीं नायकांस पैसे देऊन स्थाईक केलें. हें ऐकतांच लालचीनें बाकीचे नाईक परत आले. परंतु त्या सर्वांस वरील सरदारानें विनाकारण फाशी दिलें व दाखविलें कीं अमक्या मुदतीच्या आंत येणारास ही माफी लागू होती. अद्याप पुष्कळ नाईक भराणीं लढवय्ये म्हणून प्रसिद्ध आहेत.

वरील दंग्यामुळें ब्रिटिश सरकारानें निजामास लिहून वऱ्हाडांत कायमचें साडेसात हजार लष्कर ठेवलें.

पेंढारी व नायकांप्रमाणें सातपुड्यांत व उत्तर वऱ्हाडांत एलिचपूरचे बाजूस शेखडल्ला नांवाच्या धाडशी लुटारूनें १८१४ पासून १८२० पर्यंत बराच उपद्रव दिला. तंट्याभिल्लाप्रमाणेंच याच्या धाडसाच्या व कल्पकतेच्या पुष्कळ गोष्टी एलिचपूर, मेळघाट व बऱ्हाणपूर या बाजूस प्रसिद्ध आहेत. " उपर अल्ला और नीचे शेख डल्ला " याप्रमाणें तो स्वतःची घमेंड सांगत असे. शेवटीं एका शीखानें १८२० मध्यें त्यास मारलें.

१८०३ च्या तहानंतर गाविलगड व नरनाळा या खालील प्रदेश म्हणजे सर्व मेळघाट भोंसल्यांकडे राहिला होता व उमरखेड अमडापूर, खेर्डा वगैरे दक्षिणेकडील भाग पेशव्यांच्या व शिंदखेड, देऊळगांव, जालना, अजिंठा हा शिंद्याचे ताब्यांत होता. खर्ड्यांच्या लढाईत निजामाचा कांहीं भाग मराठ्यांनीं घेतला होता तो शेवटच्या मराठे युद्धानंतर १८२२ च्या तहाप्रमाणें इंग्रजांस मिळाला व तो त्यांनीं निजामास दिला. १८०३ मध्यें वर्धानदीची हद्द झाल्यामुळें वर्धेच्या पूर्वेकडेस आष्टी, आर्वी, आमनेर, वगैरे वऱ्हाडचे जे परगणे होते ते नागपूरकडे गेले व त्यांचा वऱ्हाडशीं संबंध सुटला. एकाच परगण्यांतील कांहीं गांवें वऱ्हाडांत व काहीं नागपूरकडे गेलीं आहेत. तसाच प्रकार दक्षिणसरहद्दीवरहि झाला आहे. तिकडे तर वऱ्हाडची हद्द बरीच दूरवर होती. १८९१ च्या तहानें ५० लक्षांचा मुलूख इंग्रजांनीं आपलेकडे घेतला. त्यावेळीं निजामाकडे कर्जहि पन्नासलक्षांचेंच होतें त्यामुळें तितके उत्पन्नाची भरती होईल इतके परगणे व गांवें मोजून घेतलीं व दक्षिणेस पाइनगंगेची सरहद्द सोईकरितां धरली. याप्रमाणें हल्लींची वऱ्हाडची हद्द निजामाच्या वेळेपेक्षांसुद्धां फार कमी झालेली आहे.

सदरहू काळ दंग्याधोप्याचा असल्यामुळें क्षुल्लक कारणावरून मोठमोठाले तंटे होत असत. वतनदारीच्या अगर मानपानाच्या संबंधांत मोठमोठे जमाव मिळून दोन्ही पक्षांच्या लढाया होणें म्हणजे रोजची गोष्ट होती. देशमुखीच्या मानासंबंधानें अशी एक मोठी लढाई आकोट येथें झाली व सर्व शहरभर कैक दिवसपर्यंत रस्तोरस्तीं चकमकी चालू होत्या. प्रत्येक पक्षास भोंवतालच्या पांचपंचवीस गांवचे लोक येऊन मिळालेले होते. सरकारी बंदोबस्त बेताचाच असल्यामुळें दोन्ही पक्ष मनसोक्त लढून थकले तेव्हां स्वस्थ बसले.

यापेक्षांहि मोठी लढाई १८४९ मध्यें मलकापूर येथें झाली. तिलाही कारण असेंच क्षुल्लक होतें. मलकापूरजवळ दाताळा म्हणून एक लहानसें सुंदर व श्रीमंत गांव आहे. मलकापूर तालुक्यांत पिंपळगांव देवी येथें मोठी यात्रा भरत असते व तेथें आसपासचे सर्व लोक जमतात. तेथें दाताळ्याचा एक रजपूत व मलकापूरचा एक मुसलमान यांची बोलाचाली होऊन मुसलमानानें रजपुतास गोळीं घालून ठार मारलें. ही गोष्ट १८३७ मध्यें झाली. दोन्ही पक्षांत अदावत सुरू झाली. १८४९ मध्यें दाताळ्याचा लालसिंग रजपूत ( मारलेल्या रजपुताचा नातेवाईक ) यानें तीन हजार हिंदु जमवून आगाऊ बातमी कळूं न देतां मलकापुरावर छापा घातला. मोंगलाईंतील नांदेड येथील ९०० शीख लोक लालसिंगच्या पक्षास येऊन मिळाले होते. नांदेड* येथें शीकांचें फार मोठें मंदीर असून त्यांचा तेथें फार मोठा समाज आहे व ते लोक फार शूर म्हणून प्रसिद्ध आहेत.

लालसिंगाच्या मंडळीचें व मलकापूरच्या मुसलमानांचे सर्व शहरभर कांहीं दिवस पावेतों युद्ध सुरू होतें व प्राणहानि जरी फार झाली नाहीं तरी मुसलमान तयार नसल्यामुळें त्यांचा फार मोड झाला. त्यांना फक्त पातूरच्या मुसलमानांकडून थोडीशी आगाऊ सूचना आली होती व त्याप्रमाणें त्यांनीं बोलाविलेल्या बऱ्हाणपूर व आणखी जवळच्या मुसलमानांची एक मोठी टोळी मलकापुरास येण्यास निघाली होती. निजामाचे पोलिस व लष्कर यांच्यानें कांहींच बंदोबस्त झाला नाहीं. सर्व मुसलमान मलका-

---

* शीखांचा गुरु गोविंदसिंग हा नांदेड येथें मेला. तेथें त्याची कबर आहे व एक मंदिर आहे. तें ठिकाण शीखांत फार पवित्र म्हणून समजलें जातें.

पूरच्या बाहेर पळून गेले व रजपूत दाताळ्यास येऊन राहिले. त्यानंतर निजामाच्या सबसीडियरी लष्कराची एक तुकडी मेजर विंडहॅम याचे हाताखालीं तेथें येऊन दाखल झाली. परंतु त्या पूर्वीच सर्व शांत झालें होतें. तरी दाताळ्यास त्याची व रजपुतांची लहानशी चकमक झालीच. या बंदोबस्तामुळें पुढें जास्त गडबड झाली नाहीं. लालसिंग रजपूत हा १८७० पर्यंत शांतपणानें दाताळ्यास रहात होता व वऱ्हाड इंग्रजांकडे आल्यानंतर बऱ्याच इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्याच्याविषयीं चांगले उद्गार काढले आहेत.

प्रत्येक धाडशी मनुष्यानें उठावें व कांहीं तरी सबब सांगून अगर कोणा तरी मोठ्या मनुष्याचें नांव धारण करून पोटभरू सैन्य उभें करावें व लुटालूट करावी हा प्रकार त्यावेळीं चालू असे.

इ. स. १८४१ मध्यें **मुगुटराव** नांवाच्या एका मराठ्यानें जळगांवाजवळ असेंच सैन्य उभें केलें व मी शिंद्यांच्या घराण्यांतला आहें असें म्हणून लुटालूट सुरू केली पूर्वीचा शिंद्याचा मुलूख वऱ्हाडास लागून व वऱ्हाडांतील कांहीं भागही त्याचेकडे होता म्हणून वऱ्हाडांतील कांहीं मराठे जमीनदारहि त्यास मिळाले. त्यानें निजामाचे सर्व अधिकारी हुसकून लावले व तिकडील बऱ्याच भागाचा ताबा घेतला. जामोदच्या किल्ल्यावर त्यानें भोंसल्याचें निशाण लावलें व सर्व देशमुख देशपांडे लोकांस अनुकूळ करून घेऊन बराच जम बसविला होता. शेवटीं निजामाचे तालुकदार व सैन्य येऊन मोठ्या प्रयासानें मुगुटरावाचा मोड झाला.

इ. स. १८४८ मध्यें दुसरा असाच एक मनुष्य नागपूरकर आप्पासाहेब भोंसल्याचें नांव घेऊन वणीच्या बाजूस आला व सैन्य वगैरे जमवून हिंदु जमीनदार लोकांच्या मदतीनें चार हजार सैन्य जमवून सर्व वऱ्हाडभर हिंडला. निजामाच्या

सैन्यानें त्याचा पाठलाग करून कळंब येथें त्यास गांठलें व पराभव करून पळवून लावलें. या लढाईत ब्रिगेडियर ऑन्स्लो हा घोड्यावरून पडून मरण पावला (१८४९). पुढें ब्रि. हॅमटन यानें या तोतया आप्पासाहेबाचा पाठलाग करून त्यास पुन्हां गांठलें. त्यांची जोराची लढाई होऊन आप्पासाहेबास पकडलें व त्याची सर्व मंडळी पळून गेली. हॅमटन हा स्वतः जखमी झाला.

एकंदरींत निजामाची कारकीर्द वऱ्हाडास अत्यंत कष्टाची गेली. पुष्कळ प्रांत ओसाड पडला. वतनदार लोक वतनें सोडून पळून गेले. शेतकरी लोक शेतें सोडून निघून गेले. अशा स्थितींत इंग्रजी कारकीर्द सुरू झाली.

---

# भाग दहावा.

## इंग्रजी कारकीर्द. १८५३ ते १९०२.

इ. स. १८५३ च्या तहानंतर वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यांत येतांच सुव्यवस्थित राज्यपद्धतीनें कारभार सुरू झाला. या तहानें वऱ्हाडाप्रमाणेंच नलदुर्ग व रायचूर दुआब हे दोन प्रदेश इंग्रजांकडे वहिवाटीस आले होते व या सर्व मुलखाचा मुख्य अधिकार हैदराबादेच्या रेसिडेंटाकडे असे. सदरहू प्रांत विस्तारानें वऱ्हाडच्या निमे होता. सबब वऱ्हाडचे दोन जिल्हे व नलदुर्ग व रायचूर हे दोन जिल्हे करून कारभार सुरू झाला. वऱ्हाडचे दोन जिल्हे उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाड असे केले. उत्तर वऱ्हाडांत सर्व पाईनघाट म्हणजे ज्यास " वऱ्हाड " म्हणतात तो येत असून मुख्य जागा बुलडाण्यास होती व बुलढाण्यास छावणीहि होती. दक्षिण वऱ्हाडची मुख्य जागा इंगोली येथें होती व त्यांत सर्व बालाघाट म्हणजे ज्यास साधारणपणें नुसतें घाट म्हणतात तो होता. त्यावेळीं इंगोली वऱ्हाडांत होती ती १८६० च्या तहानें निजामाकडे परत गेली.

या नवीन कारभाराकरितां रेसिडेंटाच्या हाताखालीं नवीन अधिकारी नेमले. त्यांचें पगाराचें प्रमाण पंजाबांतील अधिकाऱ्यांसारखें ठेवलें होतें.

| | | |
|---|---|---|
| १ फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट | पगार दरमहा रु. | १६१२ |
| १ सेकंड ,, | ,, ,, ,, ,, | ६०० |
| १ जुडिशियल कमिशनर वऱ्हाड | | ३५०० |

१ कमिशनर ( रेव्हिन्यू ) ३५००
४ डेप्युटी कमिशनर १००० ते १५००
६ असिस्टंट कमिशनर ६००
१२ एक्स्ट्रा असि. कमिशनर २५० ते ६००
तहसीलदार वगैरे.

उत्तर वऱ्हाडाचा विस्तार लोकसंख्या व उत्पन्न खालीं दिल्याप्रमाणें होतें.

| | क्षेत्रफळ | लोकसंख्या | जमीनमहसूल | एकंदर उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| उ. वऱ्हाड | ६४०० | ९५०००० | १५५०५०७ | २५४०४९२ |
| द. वऱ्हाड | ८२२८ | ५१३५६६ | ७५०५३१ | ७७०७८६ |

१८५३ च्या तहाप्रमाणें निजामास दरसाल हिशेब देण्याचा त्रास पडे व त्यांत अनेक भानगडी निघत व मतभेद होत असत. शिवाय १८०२ मध्यें निजामाचा ब्रिटिशांशीं व्यापारी तह झाला होता त्यांत इंग्रजी व्यापाऱ्यांच्या मालावर फक्त पांच टक्के जकात घ्यावी असें ठरलें होतें. परंतु त्यांतहि वारंवार भानगडी उत्पन्न होत असत. १८५७ च्या बंडाचे वेळीं निजामानें सैन्याची वगैरे सर्व मदत करून इमान जागृत ठेवलें त्याबद्दल त्याचे उपकार फेडण्याचे होते. या एकंदर कारणांवरून १८६० मध्यें इंग्रजांचा व निजामाचा तह झाला त्यांत असें ठरलें कीं इंग्रजांचें ५० लक्ष रुपये कर्ज निजामाकडे होतें तें सर्व माफ करावें. सुरापूर, रायचूर, धाराशीव वगैरे प्रांत निजामास परत द्यावे. फक्त वऱ्हाड व दुसरा थोडा मुलूख १८५३ च्या तहांतील कारणांकरितां इंग्रजांच्या वहि-

वाटीस निजामाचा म्हणून रहावा, इंग्रजी मालावरील जकात माफ व्हावी. वऱ्हाडच्या जमाखर्चाचा हिशेब निजामानें मागूं नये. जहागिरी व सरहद्दीच्या सोईकरितां कांहीं मुलखाची अदलाबदल व्हावी.

या तहाप्रमाणें नलदुर्ग, रायचूर निजामास परत मिळाले व फक्त वऱ्हाड इंग्रजांकडे राहिलें. इंगोली व इतर दक्षिणेकडील भाग निजामाकडे जाऊन हल्लींची सरहद्द कायम झाली ती अद्याप कायम आहे.

याच सुमारास इ. स. १८५८ पासून वऱ्हाडचे पूर्व वऱ्हाड व पश्चिम वऱ्हाड असे दोन जिल्हे झाले. पूर्व वऱ्हाडची जागा उमरावती व पश्चिम वऱ्हाडची जागा आकोला ही झाली. १८६४ मध्यें वणीजिल्हा नवीन केला. त्यास प्रथम आग्नेय-वऱ्हाड जिल्हा असें नांव दिलें होतें व हल्लीं जिल्ह्याच्या गांवाच्या नांवावरून यवतमाळ असें नांव आहे. त्यावेळीं मलकापूर, चिखली व मेहकर या तालुक्यांचा नैऋत्यवऱ्हाड असा जिल्हा करून मेहकर तालुक्यांत जानेफळ येथें जिल्ह्याची मुख्य कचेरी ठेवली. दुसरेच सालीं जिल्ह्याचें हें विचित्र नांव बदलून " मेहकर जिल्हा " असें नांव केलें. १८६७ मध्यें बुलढाणा ही थंड हवेची जागा म्हणून जिल्ह्याची जागा कायमची केली व " बुलडाणा जिल्हा " असें या जिल्ह्यास नांव दिलें याच वेळीं एलिचपूर हा जिल्हा नवीन केला. मोर्शीतालुका प्रथम एलिचपूर जिल्ह्यांत होता तो नंतर उमरावती जिल्ह्यांत दिला. याप्रमाणें सहा जिल्हे १९०३ मध्यें वऱ्हाड मध्यप्रांतास जोडीपर्यंत चालू होते.

इ. स. १२०२ मध्यें लॉर्ड कर्झन हैदराबादेस जाऊन त्यांनीं वऱ्हाडचे प्रश्नाचा कायमचा निकाल लावला. निजामास वऱ्हाडचें उत्पन्न अनिश्चितपणें येत होतें व मागील १८६० च्या

तहाच्या शर्तीप्रमाणें त्यास हिशेब मागण्याचाहि हक्क नव्हता. म्हणून एकतर वऱ्हाड परत द्यावें अगर दुसरा कांहीं तरी समाधानकारक निकाल लागावा असें निजामानें मागणें केलें. लॉर्ड कर्झन यांनीं समक्ष मुलाखतींत ठरविलें कीं पन्नास वर्षांच्या इंग्रजी सुधारलेल्या अमलानंतर वऱ्हाडांतील लोकांस परत निजामाचे राज्यांत परत जाणें आवडणार नाहीं सबब वऱ्हाडप्रांत निजामानें कायमचे कौलानें इंग्रजसरकारास द्यावा. त्याचे स्वामित्वाबद्दल इंग्रज सरकारानें दरसाल पंचवीस लक्ष रुपये निजामास द्यावे व त्यांतील कांहीं भागांतून प्रथम अंशतः निजामाकडून घेण्याचे कर्ज फेडण्यांत यावें. दरसाल ता. १ जानुआरी रोजीं उमरावतीस निजामाचें निशाण उभारून तोफांची सलामी देण्यांत यावी. *याप्रमाणें कायदेशीर करारनामे झाले.

वऱ्हाडांतील लोक निजामाचे राज्यांत परत जाण्यास खुष आहेत काय अशी त्यावेळीं सरकारी अधिकाऱ्यांमार्फत रयतेपैकीं लोकांना विचारपूस केली होती परंतु मोडक्या तोडक्या का होईना इंग्रजी सुधारणेचीं व शांततेचीं फळें चाखल्यानंतर निजामासारख्या त्यावेळच्या विशेष मागसलेल्या राज्यांत जाण्याची खुषी कोणीहि दाखविली * नाहीं. कारण शेजारींच मोंगलाई राज्यांत बंदोबस्त कसा होता हें इंग्रजीं मुलखांतील लोकांस नित्य दिसत असे.

पूर्वींच्या अंदाधुंदीच्या काळांत पुष्कळसे शेतकरी, कारागीर व कर्ते पुरुष नागपूरच्या राज्यांत पळून गेले होते. परंतु वऱ्हाडांत सुव्यवस्थित राज्य झाल्यापासून ते लोक आपल्या जन्मभूमीच्या स्वाभाविक आकर्षणामुळें लौकरच परत येऊन आपआपल्या जमिनी

---

* परिशिष्ट १ पहा.

Hyderabad Residency Orders 1902.

वाहूं लागले व वऱ्हाड पुन्हां पूर्वींप्रमाणें भरत चालला. व वऱ्हाड-च्या जमिनीच्या सुपीकपणाबद्दल लांबवर ख्याति होती. शिवाय कपाशीच्या उत्पन्नापासून देशाची भरभराट फार लौकर होत चालली. अमेरिकन लढाईमुळें १८७० मध्यें वऱ्हाडचे कापसास अतोनात भाव आल्यामुळें विजेच्या गतीप्रमाणें कापसाच्या धंद्यास वेग मिळाला व कापसाचा पेरा अतोनात वाढला व ती लढाई थांबतांच भाव एकदम उतरून जरी बऱ्याच व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं तरी एकंदरीत शेतकऱ्यांस उत्तेजन मिळालें व सर्व जमिनी वहीत झाल्या. हल्लीं वऱ्हाडांत अत्यंत निकृष्ट म्हणजे अर्थशास्त्रांतील "वहीतीच्या मर्यादेच्या" पलीकडील जमिनीशिवाय मुळींच जमीन पडीत नाहीं म्हटलें तरी चालेल.

कापसाच्या पेऱ्यामागें कापूस ओटण्याचें व दाबण्याचे अनेक कारखाने निघून त्यांचा अतिरेक झाला. त्यामानानें अर्थात् सर्वच उद्योगधंदे वाढून मजुरांपासून तो वरिष्ट धंद्यापर्यंत बाहेरच्या प्रांतांतील लोकांचा एकसारखा प्रवाह वऱ्हाडांत सुरू झाला. गिरंण्या-मुळें नगर, सोलापूरकडील मजूर आले. शिक्षण खात्यांत व छोट्या-बड्या सरकारी नौकऱ्याकरितां मुंबई पुण्याकडील व मद्रासेकडील लोक आले. रखवालीच्या व इतर कामाकरितां हिंदुस्थानी पुरभय्ये आले. मारवाड्यांचें तर पेवच फुटलें, याप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांतील पुष्कळसे लोक वऱ्हाडांत आज येऊन कायमचे राहिले आहेत. मजुरांमुळें शेती व उद्योगधंदे सुधारले, शिकलेले लोक आल्यापासून इकडील लोकांमध्यें शिक्षणाची आवड उत्पन्न होऊन पुष्कळ लोक शिकूं लागले व त्यांची राहणी सुधारून व्यवस्थि-तपणा आंगीं आला, थोडेसें धाडसहि उत्पन्न झालें व कूपमंडूकपणा नाहींसा होत चालला. वरील फायद्यांबरोबर नुकसानहि बरेंच झालें.

गाईसारखे गरीब व भोळे, शिक्षणावांचून हतबुद्ध व अडाणी, पोटापाण्यास पुरेसें असल्यामुळें आळशी परंतु उदार बुद्धीचे वऱ्हाडचे लोक हुशार लोकांच्या तेव्हांच तावडींत सांपडत. त्यांची "आई नाहीं ना बाप नाहीं" अशी स्थिति बनली. कारण त्यांचीं दुःखें ऐकणारें सरकार परकें व त्यांचीं दुःखें सांगणार शहाणेसुर्ते लोक तेहि परके. त्यांना आपलें पोट भरण्यापलीकडे कांहींच दिसत नव्हतें. ते जेव्हां बरेच दिवस इकडे राहून त्यांना या देशांत स्वत्व वाटूं लागलें तेव्हां ते लोककल्याणाच्या गोष्टी करूं लागले. परंतु तोंपर्यंत नुकसान होऊन गेलें व या सुधारलेल्या जगाच्या शर्यतींत खरे वऱ्हाडचे लोक फारच मागें पडले. त्यामुळें १९०३ मध्यें वऱ्हाड मध्यप्रांतास जोडीपर्यंत पंचवीस तीस वर्षांपूर्वींच्याच सडका तितकेच पूल, तीच रेलवे, तींच हायस्कुलें व इंग्रजी शाळा, तेच दवाखाने वऱ्हाडांत होते. वऱ्हाडांत अद्यापि एकसुद्धां कॉलेज नव्हतें परंतु वऱ्हाडच्या खिशांतले लाखों रुपये वऱ्हाडाबाहेरच्या कॉलेजांस वर्गणीरूपानें गेले आहेत.

**वऱ्हाडची मागील पन्नास वर्षांतील वाढ.**

वऱ्हाड १८९३ मध्यें ब्रिटिश सरकारचे वहिवाटीस आलें त्यानंतर पहिली खानेसुमारी झाली त्यावेळीं वऱ्हाडची लोकसंख्या बावीस लक्ष (२२२००७४) होती. वास्तविक १८९३ नंतर सुद्धां यावेळेपर्यंत वऱ्हाडचे लोक बाहेरून परत येऊन बाहेरचे लोक धंद्यानिमित्त येऊन हा आंकडा फुगलेला होता. परंतु १८८१ च्या खानेसुमारींत सव्वीस लक्षांचे वर आंकडा गेला. १८९१ मध्यें २९ लक्ष. १९०१ मध्यें २७॥ लक्ष व १९११ मध्यें ३०॥ लक्ष व १९२१ मध्यें ३०८१२१२ झाली. लोकसंख्येचें खरें वाढतें प्रमाण मात्र

सांपडणें शक्य नाहीं, कारण वऱ्हाडांत बाहेरून अनेक मार्गांनीं पोट भरण्याकरितां येणाऱ्या लोकांचा आंकडा फार मोठा आहे व नेहमीं बाहेरून येणारांचा अखंड ओघ चालू आहे तरी पण देशांतील सुस्थितिनिदर्शक ही वाढ आहे हें खास.

सरकारी उत्पन्नावरून देशाच्या भरभराटीचा कांहीं तर्क शक्य असल्यास पुढील आंकड्यावरून बराच तर्क करतां येईल. १८५३ मध्यें चाळीस लक्ष रुपये उत्पन्नाचें १८७० मध्यें सरकारी उत्पन्न सत्तर लक्षांचें झालें. १८८० मध्यें ८८ लक्ष झालें व १८९० मध्यें एक कोटीच्यावर गेलें. १९०३ सालीं नवीन नवीन तह झाला त्या सालीं १। कोट रु. झालें व हल्लीं उत्पन्न सरासरी दोन कोट रु. आहे. याच प्रमाणांत खर्चाहि वाढला. व्यापाराची वाढहि याचप्रमाणें झाली. परंतु उत्पादक उद्योगधंद्यांत मात्र वऱ्हाडची उन्नति न होतां पिछेहाटच झाली आहे. कापसाचें आगर असून वऱ्हाडांत कापड विणण्याच्या लहान एक दोन गिरण्यांपलीकडे मजल गेली नाहीं व त्यांतही एकींतच वऱ्हाडचें भांडवल आहे. दुसरी वऱ्हाडचे बाहेरचे मालकाची आहे.

शिक्षणासंबंधीं सरकारी प्रयत्न बरेच होऊन विशेष वाढ झाली नाहीं. १९०० सालापर्यंत लोकांत विशेष इच्छा नसल्यामुळें, शिक्षण अतिशय महाग होत चालल्यामुळें, मजुरांच्या तुटवड्यामुळें, हायस्कुलें जागोजाग नसल्यामुळें, कॉलेज मुळींच नसल्यामुळें वगैरे अनेक कारणांनीं वऱ्हाडचें सरकार श्रीमंत असूनहि त्या मानानें शिक्षणाचा प्रसार झाला नाहीं व आतां अलीकडे मध्यप्रांतास हा प्रांत जोडला गेल्यामुळें वऱ्हाडचे संपत्तीचा वऱ्हाडास पूर्ण उपयोग होत नाहीं. व वऱ्हाडच्या निकडीच्या गरजाहि भागविल्या जात

माहींत अशी तक्रार आहे. परंतु हा चालू वादविषयक प्रश्न असल्यामुळें त्यासंबंधानें विशेष लिहितां येत नाहीं.

**वऱ्हाडचे सरकारी उत्पन्न व त्याचा विनियोग**

वऱ्हाडचे सरकारी उत्पन्नाची व त्याचे विनियोगाची स्थिति पहिले पासूनच चमत्कारिक आहे. वऱ्हाड या बाबतींत अत्यंत दुर्दैवी आहे. वऱ्हाडचे उत्पन्नाचा पूर्ण फायदा वऱ्हाडचे रहिवाशांस न होतां दुसऱ्यास व्हावा असा ईश्वरी संकेतच दिसतो. शेताचा मक्ता देतात त्याप्रमाणें वऱ्हाडचा मक्ता पूर्वीं मोंगलाईंत देत असत हें मागें आलेंच आहे. त्यावेळीं रयतेची स्थिति कशी होती याचें वर्णनहि मागील भागांतच केलें आहे.

त्यानंतर म्हणजे १८५३ नंतर वऱ्हाडचा खर्च वजा जातां बाकी शिल्लक निजामास द्यावी लागे. आरंभींचा नवीन संसार असल्यामुळें पहिलीं पंधरा वर्षें निजामास कांहीं मिळालें नाहीं. परंतु पुढें चाळीस लक्षांची शिल्लक चालू खर्चाकरितां कायमची ठेऊन दरसाल बरीच मोठी रक्कम निजामास द्यावी लागे. रकम सर्व रयतेकरीतां खर्च केली तर निजामाकडे कुरबुर सुरू होई व सर सालारजंगासारखा मुत्सद्यांचें वऱ्हाड परत मिळविण्याचे प्रयत्न विलायतेपर्यंत चालू असल्यामुळें त्या धाकानें निजामाच्या कुरकुरीस कांहींच कारण न सांपडावें याबद्दल सरकारास काळजी घ्यावी लागे. याप्रमाणें दरसाल पंधरावीस * लक्ष रुपये निजामास शिलकेचे उर्फ नफ्याचे द्यावे लागत. एवढें अर्थात् वऱ्हाडच्या रयतेचें नुकसान होत होतें.

१९०२ च्या तहाप्रमाणें तर राजरोसच पंचवीस लक्ष

---

* पान २५० वरील तक्ता पहा.

रुपये दरसाल वऱ्हाडचा नफा निजामास द्यावा लागतो. एखाद्या शेताच्या स्वामित्वाप्रमाणें प्रांत स्वामित्वानें देण्याची कल्पना आधुनिक दृष्टीनें योग्य नाहीं व त्यांत रयतेच्या कल्याणापेक्षां देश हीं एक खाजगी उत्पन्नाची बाब आहे असाच अर्थ ध्वनित होतो.

नवीन सुधारणांविषयीं चौकशी चालली असतां वऱ्हाडातर्फे डेप्युटेशन जाऊन वऱ्हाडच्या एकंदर परिस्थितीचे निरीक्षण झालें व वऱ्हाडास पुढें मागें पोटप्रांत हें नांव देऊन प्रांतिक आर्थिक स्वातंत्र्य द्यावें लागेल असा रिपोर्टीत अभिप्राय पडला आहे.* पैशाच्या बाबतींत तरी वऱ्हाडचा हिशेब निराळा ठेवावा म्हणून वऱ्हाडी लोकांचे प्रयत्न सारखे चालू आहेत.

---

* रिपोर्ट पान १५९ पहा.

## निरनिराळ्या कारकीर्दींतील वऱ्हाडचें उत्पन्न.

| इ. स. १५९४ अकबर | १६५४ शहाजहान | १६५४ औरंगजेब | १६६३–६६ बरनीर इतिहासकाराप्रमाणें. | मोंगलाईतील एका सरकारी तक्त्यावरून साल नाहीं. | १६९७ औरंगजेब | १७०७ औरंगजेब |
|---|---|---|---|---|---|---|
| रुपये. १७३७६११७ | रुपये १३७५०००० | रुपये. १४७६५००० | रुपये. १५८७५००० | रुपये. २७२९३१३१ | रुपये. १५८०७५०० | रुपये. १५३५०६२५ |

टीपः—वऱ्हाडचा विस्तार यावेळीं हल्लींपेक्षां फार जास्त होता.

Thomas The Revenue Resources of the Moghul empire Page 52

# परिशिष्ट

## इ. स. १८५३ पासून १९०१ पर्यंत वऱ्हाडच्या जमाखर्चाचा तक्ता.

| साल | एकं. उत्पन्न पौंड | एकंदर खर्च पौंड | शिल्लक पौंड | निजामास दिलेली रक्कम पौंड |
|---|---|---|---|---|
| ५३-५४ | ४०७,७४० | ४४३,४३९ | ३५,६९९ | .................. |
| ५४-५५ | ४६६,४१९ | ३३०,२९४ | १३६,१२५ | .................. |
| ५५-५६ | ४४३,६६९ | ३८४,७६३ | ५८,९०६ | .................. |
| ५६-५७ | ४९२,७८१ | ३५७,४८५ | १३५,२९६ | .................. |
| ५७-५८ | ४८१,४५२ | ३९२,७५७ | ९६,६९५ | .................. |
| ५८-५९ | ४५८,२६६ | ४०९,१८२ | ४९,०८४ | .................. |
| ५९-६० | ४५७,५४० | ४२९,१७५ | २८,३६५ | .................. |
| ६०-६१ | ४१५,१३२ | ५२६,१५० | १११,०१८ | .................. |
| ६१-६२ | ३९२,५९६ | ३४४,१६२ | ५८,७५४ | .................. |
| ६२-६३ | ४१८,५३२ | ३५४,६८५ | ६३,८४७ | .................. |
| ६३-६४ | ४२१,२४८ | ३९३,३७१ | २७,८७७ | .................. |
| ६४-६५ | ४६६,३३५ | ४४७,२७४ | १९,०६१ | .................. |
| ६५-६६ | ५१०,३६५ | ४९६,९११ | १३,४५४ | .................. |
| ६६-६७ | ५८०,८७२ | ५०४,०५८ | ७६,८१४ | ५०,००० |
| ६७-६८ | ५८९,९७९ | ५४६,७२५ | ४३,२५४ | .................. |
| ६८-६९ | ६४५,३३५ | ५५५,८४१ | ८९,४९४ | १००,००० |
| ६९-७० | ७०२,२०९ | ६७७,८१७ | २४,३९२ | .................. |
| ७०-७१ | ७५८,७६४ | ७०४,५१० | ५४,२५४ | ९९,४८८ |
| ७१-७२ | ७४२,३९६ | ६७२,७७३ | ६९,६२३ | .................. |
| ७२-७३ | ८०४,१७९ | ६५८,०९८ | १४६,०८१ | १००,००० |
| ७३-७४ | ७४३,४७८ | ६१७,६०० | १६५,८७८ | .................. |
| ७४-७५ | ७३६,६०५ | ५९९,२९५ | १३७,३२० | १६५,४४० |
| ७५-७६ | ८८१,१७० | ७०२,०८२ | १७९,०८८ | १६२,८९९ |
| ७६-७७ | ८२९,५५७ | ६८८,६५८ | १४०,८९९ | १३५,००० |
| ७७-७८ | ८४३,७४९ | ७५०,५३६ | ९३,२१३ | १४७,५०० |
| ७८-७९ | ८८५,८८७ | ८१७,५७७ | ३८,३१० | १२७,५०० |

| साल | एकं. उत्पन्न पौंड | एकंदर खर्च पौंड | शिल्लक पौंड | निजामास दिलेली रक्कम पौंड |
|---|---|---|---|---|
| ७९-८० | ८८७,८४० | ७८७,१३३ | १००,७०७ | १५,००० |
| ८०-८१ | ८९१,२८९ | ७३४,१९६ | १५७,०९३ | १६२,२५१ |
| ८१-८२ | ९०१,२६५ | ७६१,९७० | १३९,२९५ | १२९,११५ |
| ८२-८३ | ९०१,५९८ | ७८२,२७९ | ११९,३१९ | १६८,८८४ |
| ८३-८४ | ८६६,५१२ | ७२८,२२४ | १३८,२८८ | ११९,३१९ |
| ८४-८५ | ९६४,८५२ | ७८२,८०२ | १८२,०५० | १३८,२८८ |
| ८५-८६ | ९५२,७२० | ७५८,४७० | १९४,२५० | १८२,०५० |
| ८६-८७ | ९७५,९६१ | ७९०,५४२ | १८५,४१९ | १८२,३३२ |
| ८७-८८ | ९८७,१२० | ८१३,४७० | १७३,६५० | १९७,३३८ |
| ८८-८९ | १००६,७४८ | ८६४,२५४ | १४२,४९४ | १७३,६५० |
| ८९-९० | १०२२,८७३ | ८७६,३९० | १४६,४७३ | १४२,४९४ |
| ९०-९१ | १००९,५९५ | ८५९,२७२ | १५०,३२३ | १४६,४७३ |
| ९१-९२ | १०२७,६३२ | ९०९,२०२ | ११८,४३० | १३०,६९७ |
| ९२-९३ | ९८५,४४८ | ९०७,९९२ | ७७,४५६ | ८३,१०४ |
| ९३-९४ | १०१७,४७५ | ९४३,८८३ | ७३,५९२ | ६५,००० |
| ९४-९५ | १०११,४४९ | ९६५,०४२ | ४६,९०७ | ११६,२०५ |
| ९५-९६ | १०४४,८२५ | ९३२,४३९ | ११२,३८६ | २९,१७३ |
| ९६-९७ | १००७,५५६ | ९५१,३३५ | ५६,२२१ | ७२,४८१ |
| ९७-९८ | ९९२,३४६ | १००४,७०८ | १२,३६२ | ........... |
| ९८-९९ | १०६३,२८३ | ८९८,८७१ | १६६,४१२ | ४७,२२९ |
| ९९-१९०० | ७७०,८३९ | १२६२,४८९ | ४९१,५७० | १८५,००८ |
| ००-१९०१ | ११०१,२४१ | १७११,४१२ | ६१०,१७१ | .......... |

# भाग अकरावा.

## वऱ्हाडांतील जमीनधाऱ्याची पद्धत

## जहागिरी इजारे वतनदारी जमिनी

## जमीनीची व जमीनदारांची स्थिति

दक्षिणेंत मुसलमानी कारकीर्दींतसुद्धां रयतवारी पद्धतिच सुरू होती. सरकार व रयत यांचे दरम्यान मालगुजार, तालुकदार जमिनदार अशांसारखे मध्यस्थ कोणीच नव्हतें. पाटील पटवारी (पांडे) गांवाचा वसूल करीत व आपलें वेतन काढून घेऊन सरकारी तालुकदार अगर सुभेदारांच्या स्वाधीन सर्व वसूल करीत. प्रत्येक परगण्यास देशमुख व देशपांडे हे अधिकारी असून तेहि वतनदारच असल्यामुळें वंशपरंपरा आपल्या जागेस चिकटून रहात. ते परगण्यांतील सर्व जमाबंदीचा हिशेब ठेवून वसूलीवर देखरेख ठेवीत.

पाटील, पांडे, देशमुख, देशपांडे यांना नगदी पगार असून शिवाय त्यांच्या इतमामाकरितां इनाम जमिनी असत. वंशपरंपरा अधिकार चालविल्यामुळें या लोकांचें वजन बरेंच कायम राहिलें आहे. देशमुख, देशपांडे यांचे अधिकार जरी कायमचे काढून घेऊन त्यांना रुसूम रूपानें वंशपरंपरा पेन्शन दिलें जातें तरी त्यांचा समाजांत फार मोठा दर्जा आहे. पुष्कळसे देशमुख देशपांडे गरीब स्थितींत आले असून त्यांचें सर्व साधारण पूर्ववृत्त मोटेंसें उत्तेजनकारक नाहीं, असें कष्टानें म्हणावें लागतें. त्यांच्या वजनाचा सदुपयोग केल्याच्या गोष्टीहि क्वचित् प्रसंगीं कानावर येतात परंतु पूर्वीं

व हल्लींहि स्वार्थाकरितां या वजनाचा उपयोग झाल्याबद्दल पुष्कळदां तक्रारी ऐकाव्या लागतात अर्थात् यास बरेचसे उत्तम अपवादहि आहेतच. शिवाय बहुतेक देशमुख व देशपांडे तरवारबहादर व मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धीस आलेले असत.

जमाबंदीचे व सरकारी धाऱ्याचे सर्व परगण्यांचे कागदपत्र देशपांडे याचे अधिकारांत असत व त्याचे हाताखालीं मोहरीर (मोहरील) म्हणून हल्लींच्या रेकॉर्डकीपरप्रमाणें अधिकारी असे व सर्व हिशेब त्या काळाचे मानानें फार उत्तम तऱ्हेनें ठेवले जात असत. निरनिराळ्या वहीतदारांचे व वतनदारांचे हक्क व जमीनींचें बारीक सारीक वर्णन त्यांत दिलें जात *होतें.

मलीकंबराच्या पद्धतीप्रमाणें ही पद्धत फार दिवसांपासून अव्याहत चालू होती.

मुसलमानी अमलापर्यंत दक्षिणेंत बरीच शांतता व आबादी असल्यामुळें जमीन बहुतेक वहीत झाली होती. प्रत्येकास आपले जरूरी पुरती जमीन होती व जमिनीवरील प्रत्येकाचे हक्क व्यवस्थितपणें निश्चित झाले होते.

मुसलमानी अमलानंतर देशांत धामधूम झाली. परंतु वरील स्थितींत चलबिचल झाली नाहीं. लढाईचे वेळेपुरती अव्यवस्था होऊन पुन्हां पूर्ववत् व्यवस्था जुळे. जिंकणारा राजा आपल्या पैशापुरता काळजी घेणारा असल्यामुळें त्याची रक्कम परगण्याच्या जमेदारामार्फत पटली म्हणजे तो बाकीच्या पंचाइतींत पडत नसे. जमेदार लोक मात्र पुष्कळदां सर्व वसूल गिळून टाकीत व चांगला

---

*हल्लींच्या रजिस्ट्रेशन पद्धतीप्रमाणें दस्तऐवजावर पाटलाची अगर काजीची मोहोर घेण्याची रीत असे व लिहितां न येणाऱ्या पाटलाच्या निशाणीचें नांगराचें चित्र अद्याप जुन्या दस्तऐवजांवर पाहण्यास सांपडतें.

# भाग अकरावा.

## वऱ्हाडांतील जमीनधाऱ्याची पद्धत

## जहागिरी इजारे वतनदारी जमिनी

## जमीनींची व जमीनदारांची स्थिति

दक्षिणेंत मुसलमानी कारकीर्दींतसुद्धां रयतवारी पद्धतिच सुरू होती. सरकार व रयत यांचे दरम्यान मालगुजार, तालुकदार जमीनदार अशांसारखे मध्यस्थ कोणीच नव्हतें. पाटील पटवारी (पांडे) गांवाचा वसूल करीत व आपलें वेतन काढून घेऊन सरकारी तालुकदार अगर सुभेदारांच्या स्वाधीन सर्व वसूल करीत. प्रत्येक परगण्यास देशमुख व देशपांडे हे अधिकारी असून तेहि वतनदारच असल्यामुळें वंशपरंपरा आपल्या जागेस चिकटून रहात. ते परगण्यांतील सर्व जमाबंदीचा हिशेब ठेवून वसूलीवर देखरेख ठेवीत.

पाटील, पांडे, देशमुख, देशपांडे यांना नगदी पगार असून शिवाय त्यांच्या इतमामाकरितां इनाम जमिनी असत. वंशपरंपरा अधिकार चालविल्यामुळें या लोकांचें वजन बरेंच कायम राहिलें आहे. देशमुख, देशपांडे यांचे अधिकार जरी कायमचे काढून घेऊन त्यांना रुसूम रूपानें वंशपरंपरा पेन्शन दिलें जातें तरी त्यांचा समाजांत फार मोठा दर्जा आहे. पुष्कळसे देशमुख देशपांडे गरीब स्थितींत आले असून त्यांचें सर्व साधारण पूर्ववृत्त मोठेंसें उत्तेजनकारक नाहीं, असें कष्टानें म्हणावें लागतें. त्यांच्या वजनाचा सदुपयोग केल्याच्या गोष्टीहि क्वचित् प्रसंगीं कानावर येतात परंतु पूर्वी

व हल्लींहि स्वार्थाकरितां या वजनाचा उपयोग झाल्याबद्दल पुष्कळदां तक्रारी ऐकाव्या लागतात अर्थात् यास बरेचसे उत्तम अपवादहि आहेतच. शिवाय बहुतेक देशमुख व देशपांडे तरवारबहादर व मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धीस आलेले असत.

जमाबंदीचे व सरकारी धाऱ्याचे सर्व परगण्यांचे कागदपत्र देशपांडे याचे अधिकारांत असत व त्याचे हाताखालीं मोहरीर (मोहरील) म्हणून हल्लींच्या रेकर्डकीपरप्रमाणें अधिकारी असे व सर्व हिशेब त्या कालाचे मानानें फार उत्तम तऱ्हेनें ठेवले जात असत. निरानिराळ्या वहीतदारांचे व वतनदारांचे हक्क व जमीनींचें बारीक सारीक वर्णन त्यांत दिलें जात *होतें.

मलीकंबराच्या पद्धतीप्रमाणें ही पद्धत फार दिवसांपासून अव्याहत चालू होती.

मुसलमानी अमलापर्यंत दक्षिणेंत बरीच शांतता व आबादी असल्यामुळें जमीन बहुतेक वहीत झाली होती. प्रत्येकास आपले जरूरी पुरती जमीन होती व जमिनीवरील प्रत्येकाचे हक्क व्यवस्थितपणें निश्चित झाले होते.

मुसलमानी अमलानंतर देशांत धामधूम झाली. परंतु वरील स्थितींत चलबिचल झाली नाहीं. लढाईचे वेळेपुरती अव्यवस्था होऊन पुन्हां पूर्ववत् व्यवस्था जुळे. जिंकणारा राजा आपल्या पैशापुरता काळजी घेणारा असल्यामुळें त्याची रक्कम परगण्याच्या जमेदारामार्फत पटली म्हणजे तो बाकीच्या पंचाइतींत पडत नसे. जमेदार लोक मात्र पुष्कळदां सर्व वसूल गिळून टाकीत व चांगला

---

*हल्लींच्या रजिस्ट्रेशन पद्धतीप्रमाणें दस्तऐवजावर पाटलाची अगर काजीची मोहोर घेण्याची रीत असे व लिहितां न येणाऱ्या पाटलाच्या निशाणीचें नांगराचें चित्र अद्याप जुन्या दस्तऐवजांवर पाहण्यास सांपडतें.

जबरदस्त अधिकारी आला तरच देत. नाहींतर आपणच खर्चून टाकीत व दामाजीपंताप्रमाणें त्यांना नेहमीं धरणें येई. दामाजीपंताचे पैसे परोपकाराकरितां लागत परंतु यांचा पैसा स्वत:करितां खर्च होई इतकाच फरक. जमेदार लोकांस उन्हांत उभे करून सव्वा-मणाचे दगड डोक्यावर देऊन सरकारी रकम वसूल केल्याचीं उदा-हरणें जुनें लोक अद्याप सांगतात.

ही व्यवस्था निजाम व मराठे यांचे दोअमली कारकीर्दींत बिघडली व १८०३ पासून १८९३ च्या निजामशाहींत तर अव्यवस्थेचा कळस झाला. जेथें जेथें मराठ्यांचा पाय पक्का रुतला होता तेथें तेथें मात्र ते रयतेच्या कल्याणाची काळजी घेऊन त्यांच्या हक्कांचें संरक्षण करीत. एरवीं निजामाच्या दुर्बलतेमुळें भोंसल्यांच्या अंदाधुंदीस रयतेस बळी पडावें लागे. कित्येक वेळां निजामचे व भोंसल्यांचे याप्रमाणें दोन्हीहि अधिकारी एकामागून एक याप्रमाणें दोनदां रकम वसूल करीत. दोन्हीहि अधिकारी एकदम आले तर जो जास्त प्रबळ तो सर्व रकम वसूल करी.

यानंतरचे निजामाचे अमलांत तर फारच अव्यवस्था झाली. राजा चंदुलाल वगैरे दिवाणांना पैशाची नेहमीं तूट पडल्यामुळें त्यांनीं वऱ्हाडचा सर्व वसूल मक्त्यानें देण्याची चाल सुरू केली त्यामुळें मक्तेदार व त्याचे हस्तक हे रयतेस फार त्रास देत. कित्ये-क वेळां शेतकऱ्यानें वर्षभर काबाडकष्ट करून वाढविलेलें पीक मक्ते-दाराच्या हस्तकानें जबरीनें नेऊन शेतकऱ्यास नागवावें.

यामुळें व दंग्याधोप्यामुळें पुष्कळ जमिनी पडीत पडल्या. आपण पेरलेले पीक आपल्याच पदरांत पडेल ही मुळींच खात्री नसे. आपल्या पिढीजाद जमिनीवरील उत्कट प्रेम सोडून शेतकरी देशो-

घडीस लागले. त्यांपैकीं पुष्कळजण पुढें इंग्रजी अंमलांत परत आले व आपल्या वतनदारीच्या जमिनी वाहूं लागले.

मक्तेदारांनीं इतरांपेक्षां "वतनदार" लोकांना व त्यांच्या जमीनीला फार त्रास द्यावा. कारण साधारण शेतकरी ज्यांना "बिछायती" अगर "आसामी" असें म्हणतात ते थोडासा त्रास झाला कीं जमिनी सोडून निघून जात व जमिनी पडीत पडल्या म्हणजे पुढें सरकारचें अगर मक्तेदाराचें कायमचें नुकसान होई. आतांप्रमाणें दुसऱ्या शेतकऱ्याची त्यावर उडी पडण्याचा संभव नसे. परंतु वतनदारास वतनदारी जमिनीचा मोठा अभिमान असून इतर इस्टेटीपेक्षां त्या "मिरासी" जमिनीचा ते सांभाळ करीत. गढींतील घराप्रमाणें त्यांच्या वरिष्ठ दर्जाचा तो एक अवश्य भाग व खूण असे. म्हणून किती जरी बोजा झाला तरी तो ती जमीन सोडीत नसे व हें इंगित ओळखून मक्तेदार त्यांचेकडून वाटेल तसे पैसे काढीत. निरुपाय झाला म्हणजे मग वतनदार ह्या जमिनी सोडीत. याप्रमाणें मोहकमसिंग नांवाच्या जुलमी तालुकदाराच्या कारकीर्दींत पश्चिमेकडील बहुतेक वतनदार ही गोष्ट "मोहकमसिंगाची गर्दी" म्हणून अव्वल इंग्रजींत सांगत असत.

वतनदारी जमिनी बहुधा गांवास लागून असून त्यांस "पांढरी" "मुंड" अथवा "हाडोळी" म्हणतात. गांवास लागून असल्यामुळें जमिनीचा रंग *पांढरा असतो. इतर जमिनीचा

---

*याशिवाय "काळी" व "पांढरी" असेहि शब्दप्रयोग आहेत. वस्तीच्या जमिनीस म्हणजे गांवठाणास पांढरी म्हणतात व शेतीस "काळी" म्हणतात. उ. एखाद्या मनुष्यास मालकीचें घरदार, शेतवाडी नसली म्हणजे त्याच्याविषयीं बोलतांना म्हणतात, "त्याला पांढरीवर घर नाहीं व काळीवर शेत नाहीं."

रंग काळा असतो. " हाडोळी " नांव अशामुळें कीं वतनदार लोकांचीं प्रेतें पुरण्याकरितां अगर जाळण्याकरितां यांत निराळी जागा राखून ठेवली असते. या जमिनींत सर्व वतनदारांचे हिस्से असतात व वांटणीचे वेळीं ती समाईक ठेवली जाते अगर प्रत्येक हिस्सेदारास त्यांतील हिस्सा कायम राहतो. पांढरींतील हिश्या-च्या ऐवजीं दुसऱ्या साधारण शेतांतील जास्त जमीन वाटणींत दिली तरी वतनदार ती न घेतां आपला पांढरींतील हिस्सा कायम ठेवील. कारण ती त्याच्या वतनदारीच्या दर्जाची खूण असते. याचप्रमाणें गढीच्या जागेपैकीं हिस्साहि सर्वजण राखून ठेवतात. दिवाणी कोर्टांतून अगर अन्य तऱ्हेनें एखाद्या वतनदाराचा हिस्सा दुसऱ्याचे घरांत गेल्यास दुसरे वतनदार हिस्सेदार त्याकरितां वाटेल ती किंमत देऊन ती आपल्या घराण्यांत परत आणण्याचा प्रयत्न करितात. वांटणीच्या योगानें या पांढरीच्या शेतांत अत्यंत लहान तुकडे व बारीक हिस्से पडलेले आहेत.

खेड्यांतून फक्त पाटलाचीच वतनदारी पांढरी जमीन व गढी असते. पांड्याची याप्रमाणें कांहीं वतनदारी जमीन नसते. तशीच, देशमुख देशपांडे यांची त्या त्या नात्यानें पांढरी नसते. परंतु पुष्कळ देशमुख पाटीलहि असतात व त्या नात्यानें त्यांची पांढरी, गढी व मानपान असतो.

पाटलाच्या घराण्यांत वाटणीवरून वतनदारी जमिनींत हिस्से होतात. परंतु या घराण्याच्या बाहेर दुसरे वतनदार लोक बनले आहेत. वतनदारीचा समाजांत मोठा दर्जा व *मानपान अस-ल्यामुळें तो दर्जा मिळविण्यासाठीं कुणबी वगैरे लोक मोठा प्रयत्न करितात. पूर्वीं पाटीलकींतील हिस्सा विकला जात असे. एखादा

*भाग १२ पहा

पाटील वतनदार गरीब स्थितींत आल्यामुळें अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें आपला वतनदारींतील हिस्सा दुसऱ्यास विकीत असे. या कारणामुळें व अन्य कारणांमुळें पुष्कळ ठिकाणीं हें पाटीलकीचें वतन दोनतीन किंवा अधिक घराण्यांत वाटलें गेलेलें आहे. या निरनिराळ्या घराण्यास "* तक्षीमदार" असें म्हणतात. ते आपलें पाटीलकीचें काम फेरपाळीनें करतात व ज्यांची वहिवाट अव्वल इंग्रजींत चालू होती त्यांची पाटीलकी हल्लींपर्यंत सरकार मार्फत चालू आहे. कित्येकांची बंद पडली आहे. तरी सरकारी कामें खेरीज करून म्हणजे गढींतील व पांढरींतील जमीन व मानपानांतील हिस्सा हें मात्र अद्याप चालू आहे. तक्षीमदारांचीं घराणीं निरनिराळीं व निरनिराळ्या जातींचीं सुद्धां असतात. साधारणपणें बोलतांना तक्षीमदार एकमेकांस "बिरादर" असेंहि म्हणतात. परंतु खरे बिरादर म्हणजे एकाच घराण्यांतील भांऊबंद असतात. वतनदारी जमिनी खेरीज करून बाकींच्या जमिनी आपआपल्या पिकाऊपणावर व सोईस्करपणावर किंमतवान् समजल्या जातात.

या वतनदार लोकांनीं अव्वल इंग्रजींत आपल्या वास्तविक हक्कापेक्षां बरेच जास्त हक्क दाखविले. कित्येकांनीं तर सालीम गांवावर आमचा हक्क आहे व रयत ही आमचेतर्फे जमीन वाहते असे हक्क दाखविले. अव्वल इंग्रजीच्या पूर्वीं जवळजवळ एक शतकभर अंदाधुंदी चालू असल्यामुळें शेतकऱ्यांचे हक्कांची पायमली होऊन गेली होती व वतनदारांनीं आपले हक्क बरेच पुढें ढकलले होते. यामुळें प्रथम वऱ्हाडांत जमीन धाऱ्याची पद्धत ठरवितांना थोडीशी पंचाईत पडली. १८६३—६४ मध्यें प्रथम वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यांत आल्यानंतर दक्षिण वऱ्हाड जिल्ह्याची लावणी केली त्यावेळीं

*फा०. तकसीम = वाटणी.

रंग काळा असतो. " हाडोळी " नांव अशामुळें कीं वतनदार लोकांचीं प्रेतें पुरण्याकरितां अगर जाळण्याकरितां यांत निराळी जागा राखून ठेवली असते. या जमिनींत सर्व वतनदारांचे हिस्से असतात व वांटणीचे वेळीं ती समाईक ठेवली जाते अगर प्रत्येक हिस्सेदारास त्यांतील हिस्सा कायम राहतो. पांढरींतील हिश्या-च्या ऐवजीं दुसऱ्या साधारण शेतांतील जास्त जमीन वाटणींत दिली तरी वतनदार ती न घेतां आपला पांढरीतील हिस्सा कायम ठेवील. कारण ती त्याच्या वतनदारीच्या दर्जाची खूण असते. याचप्रमाणें गढीच्या जागेपैकीं हिस्साहि सर्वजण राखून ठेवतात. दिवाणी कोर्टांतून अगर अन्य तऱ्हेनें एखाद्या वतनदाराचा हिस्सा दुसऱ्याचे घरांत गेल्यास दुसरे वतनदार हिस्सेदार त्याकरितां वाटेल ती किंमत देऊन ती आपल्या घराण्यांत परत आणण्याचा प्रयत्न करितात. वांटणीच्या योगानें या पांढरीच्या शेतांत अत्यंत लहान तुकडे व बारीक हिस्से पडलेले आहेत.

खेड्यांतून फक्त पाटलाचीच वतनदारी पांढरी जमीन व गढी असते. पांड्याची याप्रमाणें कांहीं वतनदारी जमीन नसते. तशीच, देशमुख देशपांडे यांची त्या त्या नात्यानें पांढरी नसते. परंतु पुष्कळ देशमुख पाटीलहि असतात व त्या नात्यानें त्यांची पांढरी, गढी व मानपान असतो.

पाटलाच्या घराण्यांत वाटणीवरून वतनदारी जमिनींत हिस्से होतात. परंतु या घराण्याच्या बाहेर दुसरे वतनदार लोक बनले आहेत. वतनदारीचा समाजांत मोठा दर्जा व *मानपान अस-ल्यामुळें तो दर्जा मिळविण्यासाठीं कुणबी वगैरे लोक मोठा प्रयत्न करितात. पूर्वीं पाटीलकींतील हिस्सा विकला जात असे. एखादा

*भाग १२ पहा.

पाटील वतनदार गरीब स्थितींत आल्यामुळें अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें आपला वतनदारींतील हिस्सा दुसऱ्यास विकीत असे. या कारणामुळें व अन्य कारणांमुळें पुष्कळ ठिकाणीं हें पाटीलकीचें वतन दोनतीन किंवा अधिक घराण्यांत वाटलें गेलेलें आहे. या निरनिराळ्या घराण्यास "* तक्षीमदार" असें म्हणतात. ते आपलें पाटीलकीचें काम फेरपाळीनें करतात व ज्यांची वहिवाट अव्वल इंग्रजींत चालू होती त्यांची पाटीलकी हल्लीपर्यंत सरकार मार्फत चालू आहे. कित्येकांची बंद पडली आहे. तरी सरकारी कामें खेरीज करून म्हणजे गढींतील व पांढरींतील जमीन व मानपानांतील हिस्सा हें मात्र अद्याप चालू आहे. तक्षीमदारांचीं घराणीं निरनिराळीं व निरनिराळ्या जातींचीं सुद्धां असतात. साधारणपणें बोलतांना तक्षीमदार एकमेकांस "बिरादर" असेंहि म्हणतात. परंतु खरे बिरादर म्हणजे एकाच घराण्यांतील भाऊबंद असतात. वतनदारी जमिनी खेरीज करून बाकीच्या जमिनी आपआपल्या पिकाऊपणावर व सोईस्करपणावर किंमतवान् समजल्या जातात.

या वतनदार लोकांनीं अव्वल इंग्रजींत आपल्या वास्तविक हक्कापेक्षां बरेच जास्त हक्क दाखविले. कित्येकांनीं तर सालीम गांवावर आमचा हक्क आहे व रयत ही आमचेतर्फे जमीन वाहते असे हक्क दाखविले. अव्वल इंग्रजीच्या पूर्वीं जवळजवळ एक शतकभर अंदाधुंदी चालू असल्यामुळें शेतकऱ्यांचे हक्कांची पायमली होऊन गेली होती व वतनदारांनीं आपले हक्क बरेच पुढें ढकलले होते. यामुळें प्रथम वऱ्हाडांत जमीन धाऱ्याची पद्धत ठरवितांना थोडीशी अडचण पडली. १८६३—६४ मध्यें प्रथम वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यांत आल्यानंतर दक्षिण वऱ्हाड जिल्ह्याची लावणी केली त्यावेळीं

*फा०. तकसीम = वाटणी.

खरोखरच मौजेवार आकारणी केली व प्रत्येक गांवचे पाटलास वसूलाबद्दल जबाबदार धरून त्यांचेपासून करारनामे व कौल घेतले व गांवच्या एकंदर वसूलीची विभागणी प्रत्येक शेताच्या ऐपतीवर योग्य प्रमाणानें करून द्यावी एवढी शर्त रयतेच्या बचावाकरीतां घातली.

याप्रमाणें जमीनदारी पद्धतीचा प्रयोग प्रत्यक्ष सुरू झाला. त्यावेळचे हिंदुस्थान सरकारचे फॉरीन सेक्रेटरी मि. एडमंडस्टन हे वायव्येकडील प्रांताचे (हल्लींचा संयुक्तप्रांत) माहीतगार असल्यामुळें त्यांनीं व त्यावेळचे रेसिडेंट यांनीं त्या प्रांताचे धर्तीवर वऱ्हाडची जमाबंदी करण्याचें ठरविलें* व कोणत्याही सरकारास प्रथम तीच पद्धत कमी त्रासाची व कमी जोखमेची असल्यामुळें पसंत पडते परंतु त्यांत बाकीच्या रयतेचें किती नुकसान होतें हें सहसा कोणी पहात नाहीं.

परंतु ही चूक तेव्हांच लक्षांत आली. पाटील हा वंशपरंपरेचा हक्कदार नोकर आहे व गांवच्या जमिनीवर त्याचा त्या नात्यानें मालकीचा कोणताहि हक्क नाहीं हें स्पष्ट ठरलें. त्यामुळें मुंबई इलाख्याच्या रयतवारी पद्धतीप्रमाणें मोजणी व जमाबंदी झाली व रयतेवरचें मोठें संकट टळलें. वऱ्हाडची सर्व सुस्थिति रयतवारी पद्धतीवरच अवलंबून आहे.

वऱ्हाडांतील रयतवारी पद्धतीचें मुख्य श्रेय एका इंग्रज कमिशनरास आहे. मि. माल्टबी नांवाचा वऱ्हाडचा पहिला कमिशनर १८६४ सालीं नेमला गेला. तो मद्रासेकडील जुना अनुभ-

---

*इंग्रजी अमलापूर्वी मक्तेदार आपला मक्ता ग्रामाधिकाऱ्यांच्या व परगणा अधिकाऱ्यांच्या मार्फत गांववार विभागून देत त्यामुळें वरील पद्धतीस वहिवाटीचाहि पाठिंबा होता.

विक सिव्हिलियन होता. तोंपर्यंत सर्व कारभार हैदराबादच्या रेसिडेंटाकडे होता. वऱ्हाडांतील सर्व राज्यव्यवस्था हिंदुस्थान सरकारच्या हुकमावरून पंजाबच्या धर्तीवर चालली होती. त्याचप्रमाणें व निजामाच्या कारकीर्दीच्या अखेरच्या आगंतुक मक्त्याच्या पद्धतीमुळें वऱ्हाडांत मालगुजारी पद्धत सुरू करण्याचे हुकूम सुद्धां सुटले होते. परंतु माल्टबी यानें ते हुकूम अंमलांत न आणतां वऱ्हाडांत पूर्वापार रयतवारी पद्धति सुरू आहे हें सिद्ध करून दिलें तेव्हां रयतवारी पद्धति सुरू होऊन नवीन मोजणी व जमाबंदी झाली.

माल्टबी याचें व रेसिडेंटाचें अगदीं पटत नसल्यामुळें या व इतर गोष्टींत माल्टबी यास हिंदुस्थानसरकारच्या रोषास पात्र व्हावें लागलें परंतु या हिंमती अधिकाऱ्यानें पार्लमेंटपर्यंत भांडून आपलें म्हणणें खरें करून दाखविलें.*

वऱ्हाडांतील मोजणीचें काम इ. स. १८६२ मध्यें सुरू झालें व १८७८ मध्यें पूर्ण झालें. त्यास एकंदर बावीस लक्ष रुपये खर्च आला. सर्व्हेच्या पूर्वीं जमाबंदीचा आकार होता त्यापेक्षां सर्व्हे केल्यामुळें पंधरा लक्ष रुपये दरसालचें उत्पन्न वाढलें.

वऱ्हाडांतील आकारणीचा ठराव तीस वर्षांचा आहे. ज्या ज्या तालक्याची जसजशी मोजणी पुरी झाली तेव्हांपासून वरील तीस वर्षें मोजतात. कांहीं विशेष कारणावरून नवीन जमिनीस पंधरा पंधरा वर्षांचेहि ठराव केले आहेत. तीस वर्षांनंतर पुन्हां आकारणीची दुरुस्ती होते. परंतु यांत नेहमीं सारा वाढविण्याकडेच कल असतो. स्वाभाविक कारणांमुळें व किंमती वाढल्यामुळें उत्पन्नाची व जमीनीची किंमत बरीच वाढली आहे. व त्यामुळें

*Maltby's Memorial to the Governor general (London)

सरकारासहि त्या प्रमाणांत अर्थशास्त्रांतील या “स्वाभाविक* वाढीचा” फायदा मिळालाच पाहिजे. परंतु खालच्या अधिकाऱ्यांच्या अयोग्य उत्साहामुळें सारे बहुधा वाजवीपेक्षां जास्त वाढतात. शिवाय जुन्या जमिनी फार वहिती झाल्यामुळें निकस झाल्या आहेत. त्या इतर जमिनीबरोबर पिकत नाहींत, त्यांचा सारा कमी करणें जरूर असतें.

ह्या किरकोळ गोष्टी खेरीज करून वऱ्हाडची आकारणी बरीच प्रमाणशीर व न्यायाची झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं वऱ्हाडच्या सर्वेकरितां मुंबई इलाख्यांत तयार झालेला महकामा येथें आणला होता व मुंबई इलाख्यांतील चुकांमुळें सरकार शहाणें झालें होतें. म्हणून वऱ्हाडांतील जमिनीचें कागदपत्र फारच उत्तम तऱ्हेचे व पूर्ण बनले आहेत.

जमिनीच्या सरकारी कागदपत्रांत एक मोठा दोष असे व त्यामुळें अशिक्षित मुक्या रयतेचें अतोनात नुकसान झालें. १९१३ च्या पूर्वीं वऱ्हाडांत हल्लींप्रमाणें जमिनीवरील हक्कांचें रजिस्टर म्हणजे ज्यास “रेकर्ड ऑफ राईट” म्हणतात तें रजिस्टर नसे. १८६३ सालापासून खातेदार म्हणून सरकारानें मान्य केलेलें एक कूळ प्रत्येक शेताबद्दल असे व त्याची कबुलायत सरकारानें घेतलेली होती. वास्तविक त्याचे पोटांत अनेक हिस्सेदार व मालक असत परंतु त्यांचीं नांवें कोठेंहि दर्शविलेलीं नसत. कित्येक वेळां खातेदार हे नांवाचेच असत.

यापुढें खातेदार मरण पावला म्हणजे त्याचे कायदेशीर वारसांचे नांवें “वर्ग” होऊन खातें बदलत असे. त्यांतहि तो वास्तविक मालक आहे कीं नाहीं अगर त्या शेतांत किती हिस्सेदार मालक

* Unearned inerement

आहेत याची चौकशी नसे. त्याचप्रमाणें खातेदारानें अगर हिस्सेदारानें शेत विकलें तरी मुलकी दप्तरांत त्याचा कधींच पत्ता लागत नसे, कारण विक्रीवरून खातें बदलण्याची जरूरी नसे. विक्री करणारानें व खरेदी घेणारानें अर्ज देऊन "राजीनामा व कबुलायत" देऊन नांव बदलून घेतलें तरच खातेदाराचें नांव बदलत असे. खरेदीखत करून घेतल्यानंतर एवढी उठाठेव कोणी करीत नसे.

यामुळें खातें भलत्याचेच नांवानें राहून मालकी व वहिंती भलत्याचीच असे व पाटीलपांडे हल्लीं इतक्या काळजीपूर्वक लिहीत नसल्यामुळें खरी स्थिति मुलकी दप्तरावरून कांहींच समजत नसे. त्यामुळें सावकारवर्ग व तंट्यावर उपजीविका करणाऱ्या वर्गाचें चांगलें फावलें व शेतकरी वर्ग अत्यंत अशिक्षित व अडाणी असल्यामुळें पुष्कळच शेतकरी बुडाले. लेखी पुरावा अशा तऱ्हेचा कच्चा असल्यामुळें वाटेल तसा खोटा पुरावा कोर्टांत येत असे.

हल्लीं १९१३ पासून रेकर्ड ऑफ राइट झाल्यामुळें हें संकट टळलें व पुढें तरी खोटा पुरावा कोर्टापुढें येणें बरेंच कठीण झालें. यामुळें अशा प्रकारचे दावे कोर्टांत येणें बंदच झालें आहे.

जमिनीवरील हक्कांच्या कायमपणामुळें व जमिनीच्या उत्तमपणामुळें वऱ्हाडांतील जमीन फार किंमतवान् झाली आहे. रयतवारी पद्धतीमुळें जमिनींचे मालक पुष्कळ असून मध्यमवर्ग खाऊन पिऊन सुखी आहे. बंगाल व संयुक्त प्रांताप्रमाणें गांवात एक जमीनदार लक्षाधीश व बाकींचे हजार लोक मजूर अथवा गुलाम अशी स्थिति नाहीं. परंतु जमीनदारी पद्धतींचें थोडेंसे चिन्ह वऱ्हाडांतहि आहे.

**इजारा पद्धती.**

अव्वल इंग्रजीनंतर वणी (हल्लीं यवतमाळ) व वाशीम जिल्ह्यांत बरींच गांवें पडीत राहिलीं व तीं आपोआप वहीत व आबाद होण्याचें चिन्ह

सरकारासहि त्या प्रमाणांत अर्थशास्त्रांतील या " स्वाभाविक* वाढीचा " फायदा मिळालाच पाहिजे. परंतु खालच्या अधिकाऱ्यांच्या अयोग्य उत्साहामुळें सारे बहुधा वाजवीपेक्षां जास्त वाढतात. शिवाय जुन्या जमिनी फार वहितीं झाल्यामुळें निकस झाल्या आहेत. त्या इतर जमिनीबरोबर पिकत नाहींत, त्यांचा सारा कमी करणें जरूर असतें.

ह्या किरकोळ गोष्टी खेरीज करून वऱ्हाडची आकारणी बरीच प्रमाणशीर व न्यायाची झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं वऱ्हाडच्या सर्वेकरितां मुंबई इलाख्यांत तयार झालेला महकामा येथें आणला होता व मुंबई इलाख्यांतील चुकांमुळें सरकार शहाणें झालें होतें. म्हणून वऱ्हाडांतील जमिनीचें कागदपत्र फारच उत्तम तऱ्हेचे व पूर्ण बनले आहेत.

जमिनीच्या सरकारी कागदपत्रांत एक मोठा दोष असे व त्यामुळें अशिक्षित मुक्या रयतेचें अतोनात नुकसान झालें. १९१३ च्या पूर्वीं वऱ्हाडांत हल्लींप्रमाणें जमिनीवरील हक्कांचें रजिस्टर म्हणजे ज्यास " रेकर्ड ऑफ राईट " म्हणतात तें रजिस्टर नसे. १८६३ सालापासून खातेदार म्हणून सरकारानें मान्य केलेलें एक कूळ प्रत्येक शेताबद्दल असे व त्याची कबुलायत सरकारानें घेतलेली होती. वास्तविक त्याचे पोटांत अनेक हिस्सेदार व मालक असत परंतु त्यांचीं नांवें कोठेंहि दर्शविलेलीं नसत. कित्येक वेळां खातेदार हे नांवाचेच असत.

यापुढें खातेदार मरण पावला म्हणजे त्याचे कायदेशीर वारसांचे नांवें "वर्ग" होऊन खातें बदलत असे. त्यांतहि तो वास्तविक मालक आहे कीं नाहीं अगर त्या शेतांत किती हिस्सेदार मालक

* Unearned inerement

आहेत याची चौकशी नसे. त्याचप्रमाणें खातेदारानें अगर हिस्सेदारानें शेत विकलें तरी मुलकी दप्तरांत त्याचा कधींच पत्ता लागत नसे, कारण विक्रीवरून खातें बदलण्याची जरूरी नसे. विक्री करणारानें व खरेदी घेणारानें अर्ज देऊन "राजीनामा व कबुलायत" देऊन नांव बदलून घेतलें तरच खातेदाराचें नांव बदलत असे. खरेदीखत करून घेतल्यानंतर एवढी उठाठेव कोणी करीत नसे.

यामुळें खातें भलत्याचेच नांवानें राहून मालकी व वहिती भलत्याचीच असे व पाटीलपांडे हल्लीं इतक्या काळजीपूर्वक लिहीत नसल्यामुळें खरी स्थिति मुलकी दप्तरावरून कांहींच समजत नसे. त्यामुळें सावकारवर्ग व तंट्यावर उपजीविका करणाऱ्या वर्गाचें चांगलें फावलें व शेतकरी वर्ग अत्यंत अशिक्षित व अडाणी असल्यामुळें पुष्कळच शेतकरी बुडाले. लेखी पुरावा अशा तऱ्हेचा कच्चा असल्यामुळें वाटेल तसा खोटा पुरावा कोर्टांत येत असे.

हल्लीं १९१३ पासून रेकर्ड ऑफ राइट झाल्यामुळें हें संकट टळलें व पुढें तरी खोटा पुरावा कोर्टापुढें येणें बरेंच कठीण झालें. यामुळें अशा प्रकारचे दावे कोर्टांत येणें बंदच झालें आहे.

जमिनीवरील हक्कांच्या कायमपणामुळें व जमिनीच्या उत्तमपणामुळें वऱ्हाडांतील जमीन फार किंमतवान् झाली आहे. रयतवारी पद्धतीमुळें जमिनीचे मालक पुष्कळ असून मध्यमवर्ग खाऊन पिऊन सुखी आहे. बंगाल व संयुक्त प्रांताप्रमाणें गांवात एक जमीनदार लक्षाधीश व बाकीचे हजार लोक मजूर अथवा गुलाम अशी स्थिति नाहीं. परंतु जमीनदारी पद्धतीचें थोडेंसे चिन्ह वऱ्हाडांतहि आहे.

**इजारा पद्धती.** अव्वल इंग्रजीनंतर वणी (हल्लीं यवतमाळ) व वाशीम जिल्ह्यांत बरींच गांवें पडीत राहिलीं व तीं आपोआप वहीत व आबाद होण्याचें चिन्ह

दिसेना. म्हणून १८६९ सालीं सरकारानें कांहीं नियम प्रसिद्ध करून पडीत गांवें लोकांस वहितीस दिलीं. तीं "इजारा" या नांवानें प्रसिद्ध आहेत. याप्रमाणें पुष्कळ सबंध गावें निरनिराळ्या लोकांनीं घेतलीं त्यांना "इजारदार" असें म्हणतात. याप्रमाणें वरील दोन जिल्ह्यांत ९१९ गांवें इजारदारांस दिलीं आहेत. त्यांपैकीं बहुतेक वणी जिल्ह्यांत आहेत. इजारदारांची संख्या ६४ आहे.

१८६९ च्या नियमांप्रमाणें इजारदारांस पुष्कळ जास्ती हक्क आहेत. पहिलीं दोन तीन वर्षें इजारदारांकडून कांहींच सारा घेण्याचा नसून पुढें डेप्युटी कमीशनर ठराव करील ती रक्कम द्यावी. अर्थात् ही रक्कम फार थोडी असून क्रमाक्रमानें वाढविली असे. एकंदर कौल तीस वर्षांचा असून इजारदारांनीं आपले इच्छेप्रमाणें वहीतदारांशीं ठराव करून जमीन वहितीस द्यावी. कारण जुने वहीतदार कोणीच नसून सर्वच नवीन असत. कुळांचे एकमेकांशीं अगर इजारदारांशीं वाद उत्पन्न झाल्यास दिवाणी कोर्टांतून निकाल व्हावेत. तीस वर्षांच्या मुदती पावेतों पाटील पटवाऱ्याचें काम त्यानें अगर त्याचे तर्फेच्या मनुष्यानें करावें. तीस वर्षांनंतर नवीन कायमची आकारणी होऊन इजारदारांस सर्व गांवाच्या जमिनीचे खातेदार व मालक म्हणून कबूल करण्यांत यावे. हा हक्क विक्री करण्याचा इजारदारांस हक्क असावा. एकंदर काळीच्या वसूलापैकीं निमे त्यानें घेऊन निमे सरकारांत भरावे. अगर त्या गांवाची वतनदारी पाटीलकी त्यानें *घ्यावी.

१८६९ चे नियम १८७१ मध्यें रद्द होऊन नवीन गांवें पुढें वेळोवेळीं १८७६-१८७९ व १८८० ह्या सालीं नवीन नवीन नियम होऊन त्या अन्वयें दिलीं गेलीं. त्यांत वरच्या पेक्षां पुष्कळ

*Berar Land Revenue Manual Vol. II. Sec. VII.

कमी हक्क इजारदारास आहेत. हल्लीं जमीन फार महत्वाची झाल्यामुळें इजारदारांच्या व कुळाच्यामध्यें वारंवार तंटे होऊन त्यापासून दंगेधोपे सुद्धां झाले. दिवाणी फौजदारी कोर्टांत खटले झाले. शेवटीं सरकारानें इजारदार व कुळें यांचे हक्कांचा कायदा केला. तरी सुद्धां हा वाद अद्याप मिटला नाहीं.

**पालंपट**

इजाऱ्यांप्रमाणेंच पूर्वीच्या सनदांवरून कांहीं गांवें वऱ्हाडांतील देशमुख व देशपांडे यांस दिलीं आहेत. त्यांस पालंपट असें म्हणतात. हीं गांवें बरीचशीं वणी व उमरावती जिल्ह्यांत आहेत. या गांवांचें सरकारी देणें कायमचें ठरलेलें आहे. ही पद्धत बंगाल्याच्या कायमधारेपद्धतीप्रमाणें आहे. फक्त सारा पूर्ण देण्याचा नसून निमजहागिरीप्रमाणें आहे.

**जहागिरी व इनाम**

वऱ्हाडांत एकंदर २१८ गांवें जहागीर दिलेलीं आहेत. त्यापैकीं बरींच देवस्थानांस असून बाकीचीं पूर्वी महत्वाचीं कामें केलेल्या मनुष्यांस व वतनदारांस दिलेलीं आहेत. त्याप्रमाणें प्रत्येक गांवांत कांहीं शेतें पाटील, पांडे, देशमुख, देशपांडे, महार, काजी, मुल्ला वगैरे गांवकामगारांस दिलीं आहेत. गांवाच्या देणगीस “जहागीर” व शेताच्या देणगीस “इनाम” म्हणतात. दोन्हीसहि * नियम एकच लागू आहेत.

पुढील राजांनीं व अधिकाऱ्यांनीं दिलेल्या जहागिरी वऱ्हाडांत आहेत.

दिल्लीचे मोंगल बादशहा, साताराचे राजे, पेशवे, शिंदे, निजाम.

---

*Berar Inam Rules

दिसेना. म्हणून १८६५ सालीं सरकारानें कांहीं नियम प्रसिद्ध करून पडीत गांवें लोकांस वहितीस दिलीं. तीं "इजारा" या नांवानें प्रसिद्ध आहेत. याप्रमाणें पुष्कळ सबंध गावें निरनिराळ्या लोकांनीं घेतलीं त्यांना "इजारदार" असें म्हणतात. याप्रमाणें वरील दोन जिल्ह्यांत ५१९ गांवें इजारदारांस दिलीं आहेत. त्यांपैकीं बहुतेक वणी जिल्ह्यांत आहेत. इजारदारांची संख्या ६४ आहे.

१८६५ च्या नियमांप्रमाणें इजारदारांस पुष्कळ जास्ती हक्क आहेत. पाहिलीं दोन तीन वर्षें इजारदारांकडून कांहींच सारा घेण्याचा नसून पुढें डेप्युटी कमीशनर ठराव करील ती रक्कम द्यावी. अर्थात् ही रक्कम फार थोडी असून क्रमाक्रमानें वाढविली असे. एकंदर कौल तीस वर्षांचा असून इजारदारांनीं आपले इच्छेप्रमाणें वहीतदारांशीं ठराव करून जमीन वहितीस द्यावी. कारण जुने वहीतदार कोणीच नसून सर्वच नवीन असत. कुळांचे एकमेकांशीं अगर इजारदारांशीं वाद उत्पन्न झाल्यास दिवाणी कोर्टांतून निकाल व्हावेत. तीस वर्षांच्या मुदती पावेतों पाटील पटवाऱ्याचें काम त्यानें अगर त्याचे तर्फेच्या मनुष्यानें करावें. तीस वर्षांनंतर नवीन कायमची आकारणी होऊन इजारदारांस सर्व गांवाच्या जमिनीचे खातेदार व मालक म्हणून कबूल करण्यांत यावे. हा हक्क विक्री करण्याचा इजारदारांस हक्क असावा. एकंदर काळीच्या वसूलापैकीं निमे त्यानें घेऊन निमे सरकारांत भरावे. अगर त्या गांवाची वतनदारी पाटीलकी त्यानें *घ्यावी.

१८६५ चे नियम १८७१ मध्यें रद्द होऊन नवीन गांवें पुढें वेळोवेळीं १८७६-१८७९ व १८८० ह्या सालीं नवीन नवीन नियम होऊन त्या अन्वयें दिलीं गेलीं. त्यांत वरच्या पेक्षां पुष्कळ

*Berar Land Revenue Manual Vol. II. Sec. VII.

कमी हक्क इजारदारास आहेत. हल्लीं जमीन फार महत्वाची झाल्यामुळें इजारदारांच्या व कुळाच्यामध्यें वारंवार तंटे होऊन त्या पासून दंगेधोपे सुद्धां झाले. दिवाणी फौजदारी कोर्टांत खटले झाले. शेवटीं सरकारानें इजारदार व कुळें यांचे हक्कांचा कायदा केला. तरी सुद्धां हा वाद अद्याप मिटला नाहीं.

**पालंपट**

इजाऱ्यांप्रमाणेंच पूर्वींच्या सनदांवरून कांहीं गांवें वऱ्हाडांतील देशमुख व देशपांडे यांस दिलीं आहेत. त्यांस पालंपट असें म्हणतात. हीं गांवें बरीचशीं वणी व उमरावती जिल्ह्यांत आहेत. या गांवांचें सरकारी देणें कायमचें ठरलेलें आहे. ही पद्धत बंगाल्याच्या कायमधारेपद्धतीप्रमाणें आहे. फक्त सारा पूर्ण देण्याचा नसून निमजहागिरीप्रमाणें आहे.

**जहागिरी व इनाम**

वऱ्हाडांत एकंदर २१८ गांवें जहागीर दिलेलीं आहेत. त्यापैकीं बरींच देवस्थानांस असून बाकीचीं पूर्वीं महत्वाचीं कामें केलेल्या मनुष्यांस व वतनदारांस दिलेलीं आहेत. त्याप्रमाणें प्रत्येक गांवांत कांहीं शेतें पाटील, पांडे, पेशमुख, देशपांडे, महार, काजी, मुल्ला वगैरे गांवकामगारांस दिलीं आहेत. गांवाच्या देणगीस " जहागीर " व शेताच्या देणगीस " इनाम " म्हणतात. दोन्हीसहि * नियम एकच लागू आहेत.

पुढील राजांनीं व अधिकाऱ्यांनीं दिलेल्या जहागिरी वऱ्हाडांत आहेत.

दिल्लीचे मोंगल बादशहा, सातारचे राजे, पेशवे, शिंदे, निजाम.

---

*Berar Inam Rules

निजामाच्या राज्यांतील सनदांपैकीं राजे चंदूलाल यांच्या दुसऱ्या दिवाणगिरींतील फसली १२९० ते १२९२ पर्यंतच्या सनदा ( १८४० ते १८४२ इ. ) व राजा रामबक्ष याच्या १३–७–१८४९ पासून ७–१०–१८५० पर्यंत व दिवाण सिराजुलमुल्क याच्या ता. २९-६-१८५१ पासून २६-५-१८५३ पर्यंतच्या सनदा त्या त्या दिवाणांच्या अधिकाराबाहेर ठरवून नामंजूर केल्या आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळ्या मुलकी अधिकाऱ्यांनीं आपल्या अधिकाराबाहेर अशा सनदा दिल्या आहेत त्याहि नामंजूर करण्यांत आल्या आहेत. बाकीच्या सर्व जहागिरी व इनाम कायम झाले आहेत.

इजाऱ्यांतील कुळांप्रमाणें किंबहुना जास्ती महत्वाचा व भानगडीचा प्रश्न जहागिरीच्या व इनामाच्या कुळांसंबंधीं उत्पन्न झाला आहे. इजारा गांवांत पूर्वींचे वहीतदार नव्हते व इजारदार व कुळें याचे संबंध अगदीं अलीकडील असून त्यांच्या आपसांतील करारांवरून उत्पन्न झाले आहेत. परंतु बहुतेक जहागिरी व इनाम हे भरभराटीच्या व पूर्णपणें आबाद असलेल्या भागांत असल्यामुळें बहुतेक ठिकाणीं गांवें पूर्ण वहितींचीं असून वहीतदारांचे जमिनीवर त्यापूर्वींचे कायमचे वहितीचे अगर मालकींचे हक्क होते व ते हक्क कायम ठेऊन जहागिरी व इनाम दिलेले आहेत. जहागिरी व इनाम यांचा सरकारी सारा माफ असून तोच सरकारी सारा सरकारचे ऐवजीं जहागिरदारानें घेण्याचा हक्क सरकारनें जहागीरदारास दिला आहे. जास्त देण्याचा बहुधा उद्देश नव्हता व त्याप्रमाणें आतांपर्यंत वहिवाटही चालू आहे परंतु अलीकडे अलीकडे विशेषत: मध्यप्रांतांतील मालगुजारी कायद्याच्या वर्चस्वामुळें व सनदा व सर्टिफिकिटें यांत सबंध गांव असें लिहिल्यामुळें कांहीं सरकारी कोर्टाच्या ठरावावरून

जहागीदारांमध्यें जास्त स्वार्थबुद्धि उत्पन्न होऊन ते योग्य अयोग्य प्रयत्न करून कोर्टमार्फत व कधींकधीं जुलमानें फार जुनाट अशा कुळांकडूनहि जमिनी काढीत आहेत. उलटपक्षीं कुळांचे संघ बनून तेहि जहागीरदारांस विनाकारण त्रास देत आहेत परंतु जहागीरदारां-इतकें शहाणपण व सामर्थ्य कुळांत नसल्यामुळें कुळांस नेहमीं नुक-सान सोसावें लागतें. इजाऱ्याप्रमाणें जहागीर गांवांतील कुळांचें व जहांगीरदारांचे हितसंबंधांचें रक्षण होण्याकरितां कायदा होणें अवश्य आहे. पूर्वींच्या मनसबी पद्धतीप्रमाणें लढाईच्या प्रसंगीं अमुक लष्कर द्यावें या ठरावावरहि कांहीं जहागिरी दिल्या होत्या परंतु ती पद्धति आतांच्या काळांत न राहिल्यामुळें तशा जहागिरी आतां राहिल्या नाहींत.

अव्वल इंग्रजींत तरी अनुभव असा होता कीं, मोंगलाईत अगर इंग्रजींत, कोठेंहि असो, खालसा गांवापेक्षां जहागिर गांवाची व कुळांची स्थिति चांगली असे. असें त्यावेळच्या अधिकाऱ्यांनीं नमूद करून ठेवलें आहे. कारण जहागीरदारांचें हित कुळांना राजी ठेवण्यांतच असे. नाहींतर तो गांव सोडून गेल्यास आपला वसूल बुडेल ही भीति होती. हल्लीं मात्र स्थिति अगदीं उलट आहे. जमि-नींचें महत्त्व वाढल्यामुळें एका कुळाकडून जमीन निघाल्यास दुसरीं कुळें जास्त रक्कम शेत देऊन घेण्यास तयार असतात.

---

# भाग बारावा.

## धार्मिक व सामाजिक स्थिति, चालीरीति वगैरे

वऱ्हाड हा निव्वळ शेतकीचा प्रांत आहे. उद्योगधंदे फार थोडे. त्या मानानें येथील समाज बहुतेक शेतकरी आहे. बहुजन-समाज अशिक्षित आहे परंतु नैतिक गुणांत अद्यापहि या समाजाचा दर्जा बराच वर लागेल. नवीन परिस्थितीमुळें ग्रामसस्थांस बराच धक्का बसला आहे. व यामुळें समाजाचा दाब व्यक्तिमात्रावर कमी होत चालला आहे. तरी बाह्य संस्कार ज्यांचे मनावर झालेले नाहींत ते लोक अद्याप अत्यंत प्रामाणिक, साधे, धार्मिक, उदार व दयाळू आहेत. किंबहुना हे गुण त्यांच्या नुकसानीस कारण झाले आहेत.

हिंदुस्थानांतील इतर भागांप्रमाणें गांव हें स्वयंपूर्ण स्वराज्यच आहे. अद्याप पुष्कळ लोक असे सांपडतील कीं ते तहसिलीच्या गांवीं सुद्धां गेले नाहींत, मग रेलवे पहाण्याचें तर दूरच.

गांवांत मुख्य महत्त्वाचा मनुष्य म्हणजे पाटील. सर्व अष्टा-धिकार त्याच्या आंगीं. त्याच्याशिवाय गांवांत पान हलायचें नाहीं. त्याच्या बरेवाईट वळणावर गांव बरें किंवा वाईट बनणार. पाटील बहुधा अशिक्षित असायचा. परंतु त्या मानानें त्याचे आंगीं बरीच हुशारी व करामत असते. कुणबी लोकांत म्हण आहे कीं, मुलीला कांहीं नसलें तरी हरकत नाहीं "पण पाटील *दादला असावा" पाटीलकीची एवढी किंमत त्या समाजांत अद्याप आहे.

---

*नवरा.

पाटलाची व त्याचे भाऊबंदांची नेहमीं अदावत असायची. निरनिराळया तक्षिमी त्या गांवांत असल्या तर त्यांची सुद्धां तीच वाट. पाटीलकी एकाच घराण्यांत असते किंवा फेरपाळीनें निरनिराळया घराण्यांतहि हिश्शाप्रमाणें चालते. निरनिराळया घराण्यांत असल्यास त्या निरनिराळया घराण्यांस एकमेकांचे तक्षीमदार म्हणतात. (फा. तक्सीम = हिस्सा, वांटणी).

पाटलांचीं मुख्य भूषणें म्हणजे सरकारी अंमल, गढींतील घर, पांढरीच्या शेतांतील जमीन व मानपान. गांवांत एक अगर अनेक गढ्या असायच्याच व त्यांत सर्व पाटील घराण्यांतील लोकांचे हिस्से असायचे. गैरसोईमुळें गढींत राहणें जरी नसलें तरी वतनदारीचा अवश्य भाग म्हणून ती जमीन जतन करून ठेवलीच पाहिजे. पांढरीच्या जमिनीसंबंधानें मागील भागांत वर्णन आलेंच आहे.

**मानपान**

शेवटचा भाग "मानपान" हा फारच महत्त्वाचा आहे व यांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. पाटील घराण्याच्या वडील मनुष्यास लग्नकार्याच्या व सामाजिक संमेलनाच्या प्रसंगीं प्रथम मान मिळतो तोच हा मानपान. त्याचीं उदाहरणें:—

१ लग्नकार्य वगैरे मंगलप्रसंगीं कुंकवाचा टिळा प्रथम त्यास लावणें व पागोटें बांधणें त्यावेळीं त्यास पानसुपारी (पांढरगण) व पैसेहि मिळतात.

२ दसऱ्याचे दिवशीं हेला वेशींत मारतात, त्यावेळीं प्रथम त्यानें तलवारीचा हात मारणें.

३ पोळयाचे दिवशीं त्याचा मानाचा बैल सर्वांच्या पुढें ठेवणें.

४ होळीची पूजा करून ती प्रथम शिलगाविणें.

हे व इतर किरकोळ हक्क म्हणजे घरच्या मेलेल्या जनावरांचें *कातडें महाराकडून हक्कानें घेणें वगैरे हक्क या मानपानांत येतात.

या मानपानाच्या प्रथम हक्काबद्दल पाटील घराण्यांच्या लोकांत नेहमीं तंटे होतात. मारामाऱ्या तर नेहमींच होतात पण खून सुद्धां झालेले आहेत. असा तंटा होण्याचा संभव दसरा व पोळा या सणांचे वेळीं फार असतो. व त्यावेळीं असल्या गांवांतील दोन्ही टोळ्या पोलिसच्या अगर माजिस्ट्रेटाच्या दौऱ्यावर ( मुद्दाम सुनावणीची तारीख दूरच्या मुक्कामावर अगर जिल्ह्याच्या गांवीं देऊन ) अडकवून ठेवलेल्या असतात.

या मानपानाचा क्रयविक्रय अद्यापहि क्वचित्प्रसंगीं होतो. या मानपानाच्या हिश्शाची किंमत हजारों रुपये दिलेली गोष्ट अगदीं अलीकडे झालेली आहे.

" वतनदार " व " आसामी " हे समाजाचे दोन मुख्य भाग. वतनदारांशिवाय जे इतर सुखवस्तु शेतकरी लोक ते "आसामी." त्यास " बिछायती " असेंहि म्हणत.

---

*पूर्वापार वहिवाट अशी आहे कीं गांवांत कोणतेंहि जनावर मेलें तर वतनदार महारांनीं तें ओढून न्यावें व त्याचें मांस ( ज्यास भाजी अथवा माती असें पारिभाषिक नांव आहे तें ) व कातडें महारांनीं घ्यावें. वतनदार लोकांचें घरचें जनावराचें कातडें मात्र मालकांस देण्याची रीत आहे. अलीकडे चामडें फार किंमतवान् झाल्यामुळें त्याबद्दल महारांत व लोकांत तंटे होऊन हायकोर्टांतून निकाल झाला आहे कीं महारांचा कातड्यावर कांहीं हक्क नाहीं त्यांचीं वाटल्यास जनावरें ओढून नेऊं नयेत. ालकांनीं आपली तजवीज करावी. हा ठराव झाला तरी सुद्धां महारांची वहिवाट उभयपक्षाच्या खुषीनें बरीच चालू आहे.

पाटलाच्या खालोखाल अगर पाटील अशिक्षित व गरीब असला म्हणजे त्याच्यापेक्षांहि जास्त वजन पांडेबुवा अथवा "दिवाणजीचें" असतें. गांवांतील कायद्याचा सल्लागार तोच. राजकारणाच्या चारचार महिन्यांच्या पूर्वींच्या शिळ्या असलेल्या परंतु ताज्या म्हणून व अतिशयोक्ति करून सांगणारें चालतें बोलतें वर्तमानपत्र तेंच. प्रत्येक गांवांत शाळा नसते म्हणून गोल्डस्मिथच्या शाळामास्तराचा अधिकार यानें हिरावून घेतला आहे. याचे वास्तव्याचा लाभ सर्व खेड्यांना होत नाहीं, करण याचें कार्यक्षेत्र चारपांच गांवांतून वाटलेलें असतें. वतनदारीच्या दुर्घट लालचीनें अत्यंत अल्पवेतनावर इमानें इतबारें काबाडकष्ट करणारा असा दुसरा सरकारी नोकर सांपडणार नाहीं. मनुष्यस्वभावास अनुसरून तो आपल्या हुशारीचा फायदाही घेतोच पण त्याच्या स्थितींतला कोणीहि मनुष्य तेंच करील.

या खालचे महत्त्वाचे ग्रामाधिकारी म्हणजे वतनदार महार. सरकारी कामांत यांच्या इतका कष्टाळू व इमानदार नोकर मिळणें दुर्लभ. घरांत दोन दिवसांचें अन्न नाहीं अगर आंगभर वस्त्र नाहीं परंतु सरकारी तहासिलीचें हजारों रुपयांचें "पोतें" (थैली) एकटा दुकटा, रात्रींबेरात्रीं, जिवापलीकडे जतन करून तालुक्यांत तो पोहोंचवून देतो. त्याचप्रमाणें आठ रुपयांच्या कान्स्टेबलापासून तो बड्या अधिकाऱ्यांपर्यंत वाटेल तेव्हां घोड्यागाडीपुढें भरधांव पळण्यास व त्यांचे चाबूक निमूटपणें खाणारा त्यांचेच शब्दांतील "सर्वांचे लाथेचा चेंडू" अगर सरकारी "*फौरन" पुरापाण्यांतून सुद्धां वेळचेवेळीं पोंचविणारा तोच. या सर्वांस कारण वतनाची जादूची कांडी.

---

*जलदीचा हुकूम

महार हा कुणब्याइतकाच अशिक्षित परंतु सरकारी कामाच्या प्रसंगामुळें तो मामुली कुणब्यापेक्षां जास्त हुशार व बहुश्रुत बनतो. इंग्रजी अमदानीपूर्वीं महार शेतकऱ्यांचे शेतीसंबंधीं व इतर ठराविक खानगी काम करीत असे. परंतु इंग्रजी अमदानीपासून तें बंद होऊन तो पूर्ण सरकारी नोकर बनला आहे. पूर्वीं शेतकऱ्यांकडून हंगामाचे वेळीं इतर बलुतेदारांप्रमाणें महारांसाहि धान्य मिळत असे परंतु तें त्यांच्या खानगी नोकरीबद्दल असे. त्यास बलुतें अथवा भीकपायली असें नांव होतें. इंग्रजी अमदानींत महारांच्या सरकारी नोकरीबद्दल शेतकऱ्यांनीं तें द्यावें असा कायदा झाला व या बलुत्यास कराचें स्वरूप आलें. धान्याचे भाव वाढल्यामुळें व महार प्रत्यक्ष दिसण्यांत तरी शेतकऱ्यांची कांहीं नोकरी बजावीत नसल्यामुळें हा कर शेतकऱ्यांस जड वाटूं लागला व त्याबद्दल बऱ्याच **महारबलुतें** तकरारी होऊन एक चौकशीकमिटी नेमण्यांत आली. तिच्या शिफारसीवरून जमीन महसुलाच्या दर रुपयामागें कांहीं ठराविक रक्कम पट्टी म्हणून ठरविण्यांत आली व महारांची संख्या कमी करून त्यांना नगदी पगार ठरविण्यांत आला. या नवीन व्यवस्थेमुळें रयतेवरील बोजा बराच कमी झाला आहे.

महाराष्ट्रांतील इतर भागांप्रमाणें बारा बलुतेदार अद्यापहि कायम आहेत व त्यांच्या कामाबद्दल त्यांस बलुतें मिळतें. त्यापैकीं ग्रामजोशांचा हक्क कायद्यानें मान्य झाला आहे. इतरांचे हक्क खुशीचे व वेतनाच्या रूपाचे झाले आहेत परंतु व्यवहारांत ते योग्य रीतीनें दिले जातात. पाटील, पटवारी व महार हे वतनदारी सरकारी नोकर म्हणून वंशपरंपरा काम करीत आहेत.

शेतकऱ्यांत एकमेकांस मदत करण्याच्या व इतर चालीरीति इतर जुन्या रीति समाजांत रूढ आहेत. त्या:—

१ एखाद्या गरीब शेतकऱ्यास बैल नसले व इतर अडचणींमुळें त्यांचें शेत जर पडीत पडलें व पेरण्याचें राहिलें तर गांवांतील सर्व शेतकरी एके दिवशीं आपली सर्व आऊतें फुकट नेऊन त्याचें शेत तयार करून पेरून देतात व हें एक अवश्य कर्तव्य समजतात.

२ एकमेकांनीं एकमेकाचे शेतांत बैलांवगैरेसुद्धां कामास जाणें व त्याचेबद्दल हिशेबानें त्या दुसऱ्यानें पहिल्या गृहस्थाच्या शेतास जाणें ही सहकारी तत्वाची पद्धतही बरीच रूढ आहे तिला "सायड" म्हणतात.

३. शेत नांगरण्याचें असल्यास गांवांतील सर्व शेतकऱ्यांनीं आपले नांगर व बैल नेऊन ते एक दिवस नांगरून द्यावें, त्याबद्दल फक्त त्यांना त्या दिवशीं जेवण द्यावें. या रीतीस "आथार" अगर "आथारी" म्हणतात.

४. गळ्यांत दावें बांधलेलें असतांना जर जनावर मेलें तर ज्यानें तें बांधलें असेल त्या मनुष्यावर "हत्या" पडली असें म्हणतात व त्याला सक्षौर प्रायश्चित्त देतात. दुसरें कोणास माहित नसलें तरी ज्यानें जनावर बांधलें असेल तो मनुष्य ती गोष्ट कधींहि लपवीत नाहीं. आजारी जनावरांची हेळसांड न व्हावी हा मूळचा उद्देश असावा व त्यामुळें निष्काळजी मालकास ही शिक्षा ठरविलेली आहे. यामुळें कोठ्यास आग वगैरे लागल्यास शेतकरी प्रथम विळा घेऊन आंत जाऊन जनावरांचे दोर तोडून त्यांना मोकळें करतो व जनावर मरायास झालें तर त्याला बांधून अजीबात ठेवीत नाहीं.

एकंदर हिंदु समाजांत व विशेषतः शेतकरी वर्गांत स्त्रियांचा दर्जा बराच मोठा आहे. बरोबरीनें शेतीचीं कामें करूं लागत

**स्त्रियांचा दर्जा** असल्यामुळें त्यांची मदत शेतकऱ्यास फार उपयोगी पडते शिवाय मामुली विक्री, खरेदी, बाजार–हाट वगैरे बायकाच करतात. त्यामुळें त्या पुरुषांपेक्षां जास्त व्यवहारदक्ष व हुशार होतात. कुणबी वगैरे जातींत तर पुरुषांपेक्षां बायका जास्त बुद्धिवान् व हुशार असें अनुभवास येतें. वऱ्हाडांत बायकांस कुणब्यांत लक्ष्मी हा शब्द लावतात.* सर्व वर्गांतील वैवाहिक संबंध प्रेमळ व वरिष्ठ प्रतीचे राहिले आहेत.

**धार्मिक स्थिति** प्राचीन काळीं म्हणजे हिंदुधर्माचा प्रसार सर्वत्र झाल्यानंतर वऱ्हाडची धार्मिक स्थिति कशी असेल याची बरीच कल्पना मागील वर्णनावरून येण्यासारखी आहे. त्या वेळेस सर्व भरतखंडाप्रमाणें वऱ्हडांतहि हिंदुधर्माचीं सर्व तत्वें उच्च नीच वर्गांत पूर्णपणें भिनून गेलीं होतीं जर आपण बारीक दृष्टीस वऱ्हाडांतील शुद्ध रहिवाशी कुणबी, तेली, माळी वगैरे शूद्र वर्गाकडे व त्यांच्या बारीक सारीक चालीरीती, त्यांचे अंगभूत स्वभाव, मनोवृत्ति, दररोजचे व नेहमींचे आचारविचार व त्यांच्या तोंडचे कांहीं निवडक शब्द यांकडे पाहिलें व त्यांची इतर प्रांतांतील त्याच जातींच्या लोकांशीं तुलना केली तर त्याना धार्मिक लोकांचा व उच्च हिंदुतत्वांचा सहवास फार काळपर्यंत झाला असावा व त्यांच्या आंगीं तीं तत्वें जास्त स्पष्टपणानें वास करीत आहेत असें आपल्या तेव्हांच लक्षांत येईल. एका निःपक्षपाती विद्वान् गृहस्थानें त्यास वऱ्हाडाविषयीं पक्षपात असण्यास इतर कांहींच कारण नसतांनाहि, पुढील उद्गार काढले आहेत. ते म्हणतात:– "अतिशूद्रापर्यंतहि आलेला व आतांपर्यंत कायम राहिलेला हा शुचिर्भूतपणा एकाएकीं येणारा नव्हे." साधारणतः मध्यम

* उ०–आज शेतांत निंदणास वीस लक्ष्मिया होत्या.

वर्गांतच प्राचीन चालीरीतींचा अंश कायम रहाण्याचा संभव असतो. कारण उच्च वर्गांत स्थित्यंतराप्रमाणें फारच लौकर फरक होत असतो. परंतु मध्यमवर्ग साधारणपणें अडाणी असून अगदीं नवीन गोष्टी ग्रहण करणें त्याच्या नेहमीं जिवावर येत असतें. मुसलमानी व व इंग्रजी आचारविचार व पोषाख यांचा ब्राम्हण व इतर उच्च वर्गावर थोड्याच काळांत जितका परिणाम झाला त्याच्या चतुर्थांश सुद्धां मध्यम वर्गावर झाला नाहीं. यावरूनहि वरील गोष्टची कल्पना करितां येईल. हिंदुधर्माचा प्रसार व प्राबल्य प्राचीन काळीं वऱ्हाडांत फारच जास्त असावें असें यावरून दिसतें.

**बुद्ध व जैन धर्माचा परिणाम**

यानंतर बौद्धधर्माचा उदय हिंदुस्थानांत आला व त्याचा चोहोंकडे प्रसार व्हावयास लागला. त्यामुळें बौद्ध-धर्मांच्या लाटा वऱ्हाडावरहि येऊन आदळल्या. हिंदुस्थानाच्या इतर भागांप्रमाणें बौद्ध धर्मानें आपलें *ठाणें वऱ्हाडावरहि बसविलें होतें. तसाच जैन धर्माचाहि वऱ्हाडांत बराच प्रसार झाला होता. आज-मितीस वऱ्हाडांत जी बरीच जैन वस्ती आहे ती वरील प्रसारामुळेंच होय. वऱ्हाडांत ईलिचपुर ( एलिचपुर ) येथें ईल नांवाचा एक जैन राजा इ. स. १०५८ च्या सुमारास राज्य करीत होता. यामुळें जैन धर्मास राजाश्रय मिळून त्याचा बराच प्रसार झाला व शिरपूर येथील प्रसिद्ध जैन मंदीर, मुक्तागिरी नांवाचें प्रेक्षणीय क्षेत्र, पातूर, भांदक वगैरे ठिकाणचीं जुनीं देवळें व विहार वगैरे ठिकाणें अस्ति-

---

*अतिविख्यात बुद्ध पंडीत व ग्रंथकार व माध्यमिक शास्त्राचा उत्पादक नागार्जुन हा विदर्भीय होता.

Watters yuan Chwang Vol II P. 203 R B
Hiralal Inscriptions in C. P. Berar Introd. P. 2

त्यांत आली. परंतु जैनधर्माचा वऱ्हाडांत पूर्ण प्रसार व्हावा असा ईश्वरी संकेत नव्हता. ईलराजानें धर्मप्रसाराचें काम मोठ्या उत्साहानें चालविलें होतें व याप्रमाणें सर्व उत्तर वऱ्हाड व दक्षिणेकडी अर्धा प्रदेश यांत त्यानें आपल्या मताचा प्रसार केला परंतु पुढें त्याची व मुसलमानांची एलिचपुरास एक निकराची लढाई होऊन त्यांत ईलराजा पडला व वऱ्हाडचें राज्यहि नंतर देवगिरी येथील हिंदुराजाकडे गेलें. यामुळें जैनधर्माचा जास्त प्रसार झाला नाहीं व तें काम अर्धेंच राहिलें. वऱ्हाडांत कित्येक जाती अद्याप अशा आहेत कीं त्यांच्या जातींतले कांहीं ठिकाणचे लोक जैन झालेले व कांहीं ठिकाणचे हिंदु आहेत उदाहरणार्थ ईलिचपूर, कारंजा, देऊळगाव-साकरशा, वगैरे पुष्कळ ठिकाणचे लाड जातीचे लोक जैन आहेत. परंतु नैऋत्येकडील चिखली, मेहकर, देऊळगांवराजा वगैरे ठिकाणचे सर्व लाड हिंदु आहेत. तसेंच शिरपूर व उत्तरवऱ्हाडांतील कांहीं शिंपी जैन आहेत व कांहीं ठिकाणचे हिंदु आहेत. कित्येक प्रसंगीं तर एकाच ठिकाणीं अर्धी जात हिंदु व अर्धी जैन अशी सांपडते. असो धार्मिक बाबींखेरीज इतर बाबतींत मात्र जैन लोक हिंदूंशीं पूर्ण मिसळले आहेत.

जैन धर्माप्रमाणें मानभाव ( महानुभाव ) धर्माचेंहि वऱ्हाडांत एके काळीं बरेंच प्राबल्य होतें असें दिसतें. हिंदूंच्या काशीप्रमाणें मानभावांचें पवित्र स्थान जें रिथपूर ( ऋद्धपूर ) तें वऱ्हाडांत आहे व यात्रेकरितां मानभावांच्या टोळ्या बऱ्याच दुरून येतात. तसाच त्यांचा माहूर येथेंहि एक मोठा मठ आहे. वऱ्हाडाइतका मानभावाचा प्रसार पंजाबांत मात्र आहे असें म्हणतात. मानभावांचे बरेच वर्ग वऱ्हाडांत आहेत. परंतु हा वर्ग जात्याच शांतिप्रिय असल्यामुळें त्याविषयीं फारसें ऐकू येत नाहीं. जैनाप्रमाणें ते मात्र हिंदूंशीं फारसे मिसळत नाहींत.

**मुसलमानी कारकीर्दीचा परिणाम**

वऱ्हाडच्या सामाजिक स्थितीवर सर्वांत जास्त परिणाम मुसलमानी कारकीर्दीचा झाला. अल्ला-उद्दीन खिलजी दक्षिणेंत आल्यापासून तों तहत आजपर्यंत म्हणजे सहाशें वर्षे वऱ्हाडाचा मुसलमानांशीं बरेच दिवस प्रजा व राज्यकर्ते व कांहीं दिवस एकाच छत्राखालीं नांदणारे राहिवासी असा संबंध आहे. या त्यांच्या संघट्टणाचा वऱ्हाडांतील लोकांच्या भाषेवर, चालीरीतींवर, पोषाखावर व स्वभावावरहि बराच परिणाम झाला आहे. जुन्या वऱ्हाडी लोकांचा वऱ्हाडी पोशाख, समाजांत बसण्याउठण्याच्या व भाषणाच्या मुसलमानी रीती, त्यांच्या घरगुती व बाहेरच्या कामांत शिरलेला डौल, काहींसा. मानी स्वभाव हे सर्व गुण या मुसलमानी संघट्टणाचे परिणाम आहेत त्याचप्रमाणें मुसलमानांच्या या संघट्टणानें त्यांच्याशीं जास्त सहवास झालेल्या वऱ्हाडी लोकांचा मूळचा सात्विकपणा जाऊन कित्येकांच्या आंगीं तमोगुणाचाहि बराच प्रादुर्भाव झाला आहे. याचीं उदाहरणें मोंगलाईंतील देशमुख व इतर *जमेदार ( जमीनदार ) यांच्या ठिकाणीं सांपडतात.

धार्मिक बाबतींत हिंदूंवर मुसलमानी सहवासाचा जो परिणाम झाला तो फार लक्षांत ठेवण्यासारखा आहे. अगदीं आरंभीं हिंदु व मुसलमान यांचे नेहमींप्रमाणें धार्मिक बाबतींत पुष्कळ तंटे झाले असतील परंतु जेव्हां दोन्ही पक्षांचा एकमेकांशीं कायमचा संबंध जडला तेव्हां कांहीं बाबतींत त्यांचें ऐक्य होऊं लागलें. लौकरच दोन्हीहि पक्षांनीं थोडथोडी पड घेतली व हिंदु व मुसलमान एकमेकांशीं हळूहळू मिसळले. मुसलमानांचा मोठा सण जो मोहरम त्यांत सर्व वऱ्हाडभर मुसलमानाइतकेंच हिंदूंचेंहि आंग असतें व

संख्येनें तर अशा समारंभांत मुसलमानांपेक्षां हिंदु बरेच जास्त किंबहुना दुप्पट असतात. व ह्यांपैकीं सर्व नुसते प्रेक्षकच नव्हे तर पुष्कळजण त्यांत स्वतः आंग घालणारे व सहानुभूति दाखविणारे असतात. पुष्कळ हिंदूच्या घरीं सुद्धां या मोहरमांतील स्वाऱ्यांचें वार्षिक ठाणें असतें व मोहरमांत "अल्ला" चा प्रासादिक नाडा आपल्या व विशेषतः आपल्या मुलांच्या गळ्यांत बांधून मोहरमांत फकीर होणारे भाविक हिंदू तर बरेच आहेत. कित्येक ठिकाणीं तर वरिष्ठ जातींत सुद्धां याचा प्रसार झालेला आहे. पुष्कळ ठिकाणीं वतनदार देशमुख, देशपांडे यांच्या घरीं दरवर्षीं डोले (ताबूत) होत असतात.

याप्रमाणें हिंदूंनीं मुसलमानांत मिसळून त्यांच्या धार्मिक कृत्यांत आंग घातलेलें दिसून येतें. ही सहानुभूति कांहीं अंशीं मुसलमानी अमलामुळें हिंदूच्या आंगीं आली असें म्हणण्यास जागा आहे. व त्यास हिंदू समाजांतील हलक्या जातींतील मानसिक शैथिल्याचीहि भर पडली आह परंतु त्याच्या उलटहि उदाहरणें आहेत. तेथें मात्र ही सहानुभूति असलें कांहीं कारण नसतां नैसर्गिकपणेंच उत्पन्न झाली आहे. वऱ्हाडच्या बाहेर ज्याप्रमाणें शेख महंमद, शहा बहामनी वगैरे मुसलमान हिंदु साधु बनले त्याप्रमाणें वऱ्हाडांतहि कांहीं पुरुष होऊन गेले.पातूर येथील शेख बाबु नांवाचा साधु मूळचा मुसलमान; परंतु मतानें व आचरणानें शुद्ध हिंदू होता. त्यानें हिंदुधर्मांप्रमाणें ईश्वरभक्ति करण्यांत आपला जन्म घालविला पुढ तो मुसलमानांचे त्रासानें पळूनहि गेला होता असेच दुसरें प्रसिद्ध उदाहरण आकोट येथील नरसिंगबुवा यांचे गुरु मियासाहेब यांचें. हा साधु आपल्या ज्ञानानें नरसिंगबुवासारख्यांचा गुरु होऊन त्यांना उपदेश करण्यास अधिकारी झाला. याचप्रमाणें

कारंजा येथील एका मुसलमान साधूनें हिंदु धर्माचा इतका अभ्यास केला होता व त्याची त्यावर इतकी श्रद्धा होती कीं त्या भगवद्गीतेवर टीका लिहिली होती असा एका* जुन्या हस्तलिखित ग्रंथांत उल्लेख सांपडला आहे. थोडे वर्षांपूर्वीं यवतमाळ येथें एक मुसलमान हिंदुधर्माप्रमाणें ईश्वरभजन करून दरसाल माहूर व पंढरपूर येथील यात्रा करित असे. तो अत्यंत विरक्त असे व त्याच्याबद्दल लोकांची बरीच पूज्यबुद्धि होती.

**हिंदु मुसलमानांचें धार्मिक ऐक्य**

यापेक्षांहि चमत्कारिक धार्मिक ऐक्य वऱ्हाडांत कित्येक ठिकाणीं दिसून येतें. एलिचपूरच्या उत्तरेस चार कोसांवर बहिरम म्हणून एक गांव आहे. तेथें बाहिरमबुवा या देवाचें ठिकाण आहे. त्यानिमित्त दरवर्षीं तेथें एक मोठी यात्रा भरत असतें. ही यात्रा म्हणजे हिंदु व मुसलमान या दोहोंचीहि असते. तो देव म्हणजे एक उंच खडक आहे. त्यास हिंदु व मुसलमान हे दोन्ही पवित्र मानून त्याची दोहोंकडून पूजा करतात. एका बाजूनें हिंदु शेंदूर, नैवेद्यादिकेंकरून पूजा करतात व दुसऱ्या बाजूनें मुसलमान बकरीं वगैरे मारून त्यांचें रक्त त्यावर शिंपडून त्याची आपल्या चालीप्रमाणें पुजा करतात. या रक्तानें जमीन जरी कित्येक फूट खोल भिजते तरी तेथें एकहि माशी कधीं दिसत नाहीं, हा तेथें मोठा चमत्कार आहे. या समारंभांत तंटे कधींच होत नाहींत. मुसलमान तर त्या देवास आपला व हिंदूंचाहि समजून वागतात. मुसलमानांच्या आंगीं कधींहि दिसून न येणारी ही धार्मिक सहिष्णुता लक्षांत ठेवण्यासारखी आहे. असेंच दुसरें एक

---

*अनंतकविकृत भक्तरहस्य.

उदाहरण याच जिल्ह्यांतील उपराई या गांवचें आहे. तेथें शहा-दावल या साधूच्या नांवानें दरवर्षी यात्रा भरते व ही यात्रा वरील यात्रेंप्रमाणेंच हिंदु व मुसलमान या दोन्ही वर्गांची असते. या साधूंची हकीकत अशी सांगतात कीं, शहा या नांवाचा एक मुसलमान फकीर व दावल या नांवाचा एक महार साधु हे फार मित्र असून ते एकाच वेळीं मेले व त्या दोघांनींहि आपणास एकाच ठिकाणीं पुरण्यास सांगितलें.*

वरील दोन्ही उदाहरणांशिवाय मुसलमानांच्या सहानुभूतीचीं आणखीहि उदाहरणें मिळण्यासारखीं आहेत. याशिवाय खुद्द मुसलमान वर्गांतहि धर्मांतर केलेल्या हिंदूंचीच संख्या जास्त आहे व अर्थात् या धर्मांतर करणाऱ्या हिंदूंचा ओढा साहजिकपणें निदान दोनतीन पिढ्या तरी हिंदु धर्माकडे असे. धर्मांतर केलेल्या पुष्कळ मुसलमानांच्या घरीं कित्येक पिढ्यांपर्यंत हिंदूप्रमाणें महालक्ष्मीचें व एकादशीचें व्रत मागील पिढीपर्यंत चालू होतें. तसेंच हिंदूंच्या मोठ्या समाजांत अल्पसंख्याक मुसलमानांवर हिंदूंच्या चालीरीतींचा परिणाम स्वाभाविकपणेंच झाला आहे. जातकर्म, लग्नें वगैरे कामांत जोशी बोलावून बहुतेक मुसलमान श्रद्धेनें मुहूर्त वगैरे पाहातात.

**मुसलमानी अमदानींतील हिंदु सत्पुरुष**

अगदीं आरंभीं म्हणजे देवगिरी येथील राजांच्या कारकीर्दींत व मराठी अमदानींत तर हिंदुधर्मास पूर्ण उत्तेजन होतें. बहामनी राजांनीं हिंदूंचा फार छळ केला परंतु ते वऱ्हाडापासून दूर होते. ह्या कारकीर्दींतहि अनेक प्रख्यात हिंदु सत्पु-

* रोजे येथें अशीच एक समाधि आहे. हिंदु लोक जालंदरनाथाची समाधि म्हणून तिची पूजा करतात व मुसलमान लोक अवलियाची म्हणून मानतात.

रुष उदयास आले. यावरून मुसलमानी अंमलांतलि प्रातिकूल वातावरणहि हिंदुधर्मांच्या स्वातंत्र्यास विशेष आड येऊं शकलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमानी अमदानींतसुद्धां वऱ्हाडांत अनेक साधुसंतांचा उदय झाला. उत्तर वऱ्हाडांत रुद्रनाथ, मारकी येथें मारकीनाथ, सुर्जीअंजनगांव येथें देवनाथ, आकोटाजवळ मियसाहेब व नरसिंगबुवा, सोनाळे येथील सोनबुवा व दक्षिण वऱ्हाडांत उठी येथील ब्रम्हचारी बुवा, शिवानंदबुवा, लोणीकर सखारामबुवा, मेहकर येथील मंगलनाथ, उमरखेड येथील गोचरस्वामी, आईनाथ, मुनीनाथ, उत्तमश्लोक, शीरपुर येथील उदारामाचे गुरु पद्माजी, साकरखेडर्याचे प्रख्यात अमृतराय, रिसोड येथील आप्पास्वामी वाशमिकर मोरेश्वरबुवा, पातूर येथील नानासाहेब वगैरे अनेक सत्पुरुष निर्माण झाले व त्यांनीं वऱ्हाडांतील भूमि व परिस्थिति मोठमोठे साधुसंत उत्पन्न करण्यास कमी कसदार नाहीं हें दाखविलें. महाराष्ट्रांत अत्यंत प्रसिद्धीस आलेले व स्वतः विरक्त असून हिंदुपादशाही करितां मुत्सद्दी, व जनकल्याकरितां प्रापंचिक बनलेले पेशव्यांचे गुरु धावडशीकर श्रीब्रम्हेंद्रस्वामी ह्यांचा जन्म व वेदाभ्यास वऱ्हाडांतच गणपतींचें *राजूर येथें झाला व जरी ते वऱ्हाडाच्या बाहेर प्रसिद्धीस आले तरी मूळचे ते वऱ्हाडी होते. तसच समर्थांचे तीन वऱ्हाडी†शिष्य भोळाराम एलिचपुरकर देवदास बडनेरकर व पुसदकर बालकराम हे होते. तसेंच समर्थ सांप्रदायिक रामदसांचे प्रसिद्ध चरित्रकार उद्धवसुत हे सुरजी अंजनगांव येथील राहाणारे होते. बालकरामाचे पुत्र रोकडाराम यांचा मठ कारंज्यास आहे. अनंतकविकृत

---

*ब्रम्हेंद्रस्वामीचें चरित्र. पारसनीस. पान. २ हें राजूर देऊळगाव राजाजवळ आहे. †हनुमंत स्वामीची बखर पहा.

उदाहरण याच जिल्ह्यांतील उपराई या गांवचें आहे. तेथें शहा-दावल या साधूच्या नांवानें दरवर्षी यात्रा भरते व ही यात्रा वरील यात्रेंप्रमाणेंच हिंदु व मुसलमान या दोन्ही वर्गांची असते. या साधूंची हकीकत अशी सांगतात कीं, शहा या नांवाचा एक मुसलमान फकीर व दावल या नांवाचा एक महार साधु हे फार मित्र असून ते एकाच वेळीं मेले व त्या दोघांनींहि आपणास एकाच ठिकाणीं पुरण्यास सांगितलें.*

वरील दोन्ही उदाहरणांशिवाय मुसलमानांच्या सहानुभूतीचीं आणखीहि उदाहरणें मिळण्यासारखीं आहेत. याशिवाय खुद्द मुसलमान वर्गांतहि धर्मांतर केलेल्या हिंदूंचीच संख्या जास्त आहे व अर्थात् या धर्मांतर करणाऱ्या हिंदूंचा ओढा साहजिकपणें निदान दोनतीन पिढ्या तरी हिंदु धर्माकडे असे. धर्मांतर केलेल्या पुष्कळ मुसलमानांच्या घरीं कित्येक पिढ्यांपर्यंत हिंदूप्रमाणें महालक्ष्मीचें व एकादशीचें व्रत मागील पिढीपर्यंत चालू होतें. तसेंच हिंदूंच्या मोठ्या समाजांत अल्पसंख्याक मुसलमानांवर हिंदूंच्या चालीरीतींचा परिणाम स्वाभाविकपणेंच झाला आहे. जातकर्म, लग्नें वगैरे कामांत जोशी बोलावून बहुतेक मुसलमान श्रद्धेनें मुहूर्त वगैरे पाहातात.

**मुसलमानी अमदानींतील हिंदु सत्पुरुष**

अगदीं आरंभीं म्हणजे देवगिरी येथील राजांच्या कारकीर्दींत व मराठी अमदानींत तर हिंदुधर्मास पूर्ण उत्तेजन होतें. बहामनी राजांनीं हिंदूंचा फार छळ केला परंतु ते वऱ्हाडापासून दूर होते. ह्या कारकीर्दींतहि अनेक प्रख्यात हिंदु सत्पु-

---

* रोजे येथें अशीच एक समाधि आहे. हिंदु लोक जालंदरनाथाची समाधि म्हणून तिची पूजा करतात व मुसलमान लोक अवलियाची म्हणून मानतात.

रुष उदयास आले. यावरून मुसलमानी अंमलांतील प्रातिकूल वातावरणहि हिंदुधर्मांच्या स्वातंत्र्यास विशेष आड येऊं शकलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमानी अमदानींतसुद्धां वऱ्हाडांत अनेक साधुसंतांचा उदय झाला. उत्तर वऱ्हाडांत रुद्रनाथ, मारकी येथें मारकीनाथ, सुर्जीअंजनगांव येथें देवनाथ, आकोटाजवळ मियसाहेब व नरसिंगबुवा, सोनाळे येथील सोनबुवा व दक्षिण वऱ्हाडांत उठी येथील ब्रम्हचारी बुवा, शिवानंदबुवा, लोणीकर सखारामबुवा, मेहकर येथील मंगलनाथ, उमरखेड येथील गोचरस्वामी, आईनाथ, मुनीनाथ, उत्तमश्लोक, शीरपुर येथील उदारामाचे गुरु पद्माजी, साकरखेडर्याचे प्रख्यात अमृतराय, रिसोड येथील आप्पास्वामी वाशिमकर मोरेश्वरबुवा, पातूर येथील नानासाहेब वगैरे अनेक सत्पुरुष निर्माण झाले व त्यांनीं वऱ्हाडांतील भूमि व परिस्थिति मोठमोठे साधुसंत उत्पन्न करण्यास कमी कसदार नाहीं हें दाखविलें. महाराष्ट्रांत अत्यंत प्रसिद्धीस आलेले व स्वतः विरक्त असून हिंदुपादशाही करितां मुत्सद्दी, व जनकल्याकरितां प्रापंचिक बनलेले पेशव्यांचे गुरु धावडशीकर श्रीब्रम्हेंद्रस्वामी ह्यांचा जन्म व वेदाभ्यास वऱ्हाडांतच गणपतीचें *राजूर येथें झाला व जरी ते वऱ्हाडाच्या बाहेर प्रसिद्धीस आले तरी मूळचे ते वऱ्हाडी होते. तसच समर्थांचे तीन वऱ्हाडी †शिष्य भोलाराम एलिचपुरकर देवदास बडनेरकर व पुसदकर बालकराम हे होते. तसेंच समर्थ सांप्रदायिक रामदसांचे प्रसिद्ध चरित्रकार उद्धवसुत हे सुरजी अंजनगांव येथील राहाणारे होते. बालकरामाचे पुत्र रोकडाराम यांचा मठ कारंज्यास आहे. अनंतकविकृत

---

*ब्रम्हेंद्रस्वामीचें चरित्र. पारसनीस. पान. २ हें राजूर देऊळगाव राजाजवळ आहे. †हनुमंत स्वामीची बखर पहा.

"भक्तरहस्य"** नांवाच्या एका अप्रसिद्ध ग्रंथांत वऱ्हाडांतील अनेक संतांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत.

मुसलमान राज्यकर्त्यांपैकीं सुद्धां बाहामनी राजे, दिल्लीचे बादशाहा व निजाम हे खेरीज करून वऱ्हाडचे सर्व मुसलमान राज्यकर्ते हिंदूचें मुसलमान झालेले होते व मुसलमानांचा आरंभींचा जोम व धर्मवेड कमी झालें होतें. यामुळें त्यांच्या कारकीर्दींत हिंदूस धर्माविषयीं विशेष त्रास झाला नाहीं. या राज्यकर्त्यांपैकीं अहमदनगरच्या निजामशाही बादशहाचा मूळपुरुष वऱ्हाडांतील पाथरी या गांवच्या ब्राम्हण कुळकर्ण्याचा मुलगा होता. त्यानें व त्याच्या वंशजांनीं तें गांव वऱ्हाडच्या इमादशाही बादशहाकडून घेण्याबद्दल कितीतरी प्रयत्न केले व शेवटीं मोठ्या प्रयासानें तें आपल्या पूर्वजांचें गांव मिळविलें. यावरून त्याचा मूळच्या घराण्याविषयींचा अभिमान दिसून येतो. एलिचपूरच्या इमादशाही बादशहांचा मूळपुरुष फत्रेउल्ला हाहि मूळचा हिंदूच होता. मुसलमानांच्या कारकीर्दींतच वऱ्हाडांतील बहुतेक हिंदु दवालयांस इनामें जहागिरी वगैरे मिळाल्या आहेत. शुद्ध मुसलमान बादशहांच्या कारकीर्दींतहि वऱ्हाडचा कारभार प्रत्यक्षपणें त्यांच्या हातीं नसे तर वर सांगितल्या सारख्याच हिंदूचे मुसलमान झालेल्या सुभेदारांच्या हातीं असे व निजामाच्या कारकीर्दींत तर तो पुष्कळदां निवळ हिंदूंच्याच हातीं असे.

---

**सदरहू हस्तलिखित ग्रंथ रा. यशवंत खुशाल देशपांडे यवतमाळ यांचे संग्रहीं आहे.

# भाग तेरावा.

## वऱ्हाडांतील मराठी भाषा, वाङ्मय कवि वगैरे.

वऱ्हाडांतील भाषा मराठी आहे. तिचें सर्वसाधारण स्वरूप हल्लीं शुद्ध मानल्या गेलेल्या मराठी भाषेसारखेंच आहेपरंतु स्थलभेदाप्रमाणें तिच्यांत कांहीं वैशिष्ट्य आहे. सर्व प्रांतांतील भाषेची रूढि ध्यानांत आणून जरी आद्य मराठी व्याकरणकारानें आपल्या शुद्ध मराठी भाषेची मर्यादा बरीच विस्तृत केली आहे तरी त्या मर्यादेसहि ओलांडून बाहेर जाण्याइतकी वऱ्हाडांतील भाषा भिन्न आहे. मराठीची मातृभाषा जी संस्कृत तिचा वऱ्हाडचे मराठी भाषेंत अद्यापहि इतर प्रांतांच्या बरोबरीनेंच किंबहुना जास्त अंश राहिला आहे, हें जरी खरें आहे तरी मुसलमानांच्या अतिनिकट व फार दिवसांच्या सहवासामुळें मुसलमानांच्या भाषेचा बराच जास्त परिणाम तिच्यावर झाला आहे.

येथील मराठी भाषेंत फारशी व उर्दू शब्द बरेच मिसळलेले आहेत. जुन्या वऱ्हाडी गृहस्थांचें बोलणें जर आपण ऐकिलें तर त्यांत शेंकडा निदान दहापंधरा तरी उर्दू शब्द आपणास ऐकू येतील. मुसलमानी कारकीर्दींत सरकारी दप्तर बहुतकरून फारशींत असे व कारकुनीचा पेशा हिंदूंनींच उचललेला असल्यामुळें फारशी शिकलेले हिंदु बरेच असत. उर्दू भाषा तर अद्याप वऱ्हाडांतील बायकापोरांसहि चांगली समजते व बोलतां येते. पुष्कळ मुसलमानी

*शब्द तर नेहमींच्या मराठी भाषेंत जसेच्यातसे घुसले आहेत. इतर प्रांतांतील सर्वसाधारण मराठे गृहस्थास ते समजणारहि नाहींत.

परंतु आतां महराष्ट्रांतील सुधारलेल्या मराठी भाषेशीं संघट्टण जास्त होत चालल्यानें व तिचा अभ्यासहि सुरू झाल्यामुळें दिवसें-दिवस त्यांमधील भिन्नत्व नाहींसें होत चाललें आहे. वऱ्हाडी भाषेचें वैशिष्टय झपाट्यानें नाहींसें होत चाललें असून ती पुण्याकडील भाषेच्या वळणावर चालली आहे. त्याचप्रमाणें इतर प्रांतांतील भाषाहि हल्लीं पुस्तकांतून येणाऱ्या भाषेच्या धर्तीवर चालली आहे. कांहीं दिवसांनीं हें प्रांतीय वैशिष्टय निघून जाऊन मराठी भाषा एकाच तऱ्हेची राहणार आहे.

वऱ्हाडी भाषेचें विशेष स्वरूपः—वऱ्हाडांतील मराठी भाषेची कांहीं कल्पना येण्यास तिच्या स्वरूपाची ओळख करून दिली पाहिजे. कोंकण, नगर, पंढरपूर, धारवाड, नगर, पुणें, नागपूर वगैरे निरनिराळ्या भागांत जसे निरनिराळे आणि विशेष तऱ्हेचे उच्चार व शब्द सांपडतात तसेंच वऱ्हाडांतहि आहेत वऱ्हाडांतील भाषा देशावरलि इतर भागांतील भाषेहून कांहींशीं भिन्न आहे हें तर खरेंच परंतु सर्व वऱ्हाडभरहि ती अगदीं सारखी नाहीं. बारकाईनें पाहिलें तर वऱ्हाडांतील मराठी भाषेचेही तीन भाग स्पष्ट दिसून येतात. या तीन भागांपैकीं प्रत्येकांत कांहीं निरनिराळे प्रकार दिसून येतात.

भाषेसंबंधानें वऱ्हाडांतील पहिला व मोठा भाग म्हटला म्हणजे खास वऱ्हाड हा होय. दुसरा भाग घाट व तिसरा वर्धा-तटाचा प्रदेश.

---

* सहद ( मध ), मौका ( संधी ), कोषीस ( खटपट ), तोषीस त्रास ) कलम ( लेखणी ), वाढी ( उ० बढई–सुतार ), डेहळज ( उंबरठा )

पहिला भाग म्हणजे खास वऱ्हाड यांतील भाषेचें स्वरूप स्वतंत्र आहे. या भागांतील भाषेवर मुसलमानी कारकीर्दीचा परिणाम सर्वांत जास्त झालेला दिसून येतो व मार्दव वाजवीपेक्षां फारच जास्त आहे.

दुसरा भाग घाट हा पहिल्याहून बराच भिन्न आहे; व यांत मुसलमानी सहवासाचा परिणाम सर्वांत कमी दिसतो व येथील भाषेचें वऱ्हाडच्या पश्चिमेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांतील भाषेशीं साम्य आहे. या भागांतील भाषेवर तिच्या स्थलविशेषाचा परिणाम झाला आहे. घाट म्हणजे निवळ डोंगराळ प्रदेश असल्यामुळें तेथील भाषेंत मार्दव फारच कमी असून रांकटपणा विशेष आला आहे. तिसरा भाग वणी जिल्हा व वर्धातट याची भाषा बहुतेक पहिल्या भागाप्रमाणेंच आहे. फक्त तिच्यावर नागपूर प्रांताच्या सान्निध्यानें तिकडील भाषेचा थोडासा परिणाम झाला आहे. एरव्हीं ती सर्वस्वी उत्तर वऱ्हाडाच्या भाषेप्रमाणेंच आहे.

पुणें सोडून इतर भागांतील देशस्थांच्या भाषेंत सांपडणाऱ्या बहुतेक विशेष गोष्टी वऱ्हाडांत आहेत. वऱ्हाडांत सर्वत्र सांपडणाऱ्या अशा कांहीं विशेष गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. 'ण'चा बहुतेक अभाव; बहुतेक शब्दांत 'ओ'च्या ठिकाणीं 'व' उदाहरणार्थ वटा (ओटा) वंगण (ओंगण) वकणें (ओकणें, वमन) वसरी (ओसरी); कांहीं ठिकाणीं 'वे'च्या ठिकाणीं 'ये' उदा० येळ (वेळ), येसन (वेसण) येस (वेस). नपुंसकलिंगी अनेकवचनी रूपें पुल्लिंगी रूपाप्रमाणेंच असणें, अनेकवचन अनुस्वारांनीं न होतां 'हीं' अगर 'हा' ह्या सामान्यरूपाच्या प्रत्ययानें होणें. उदा० त्याहांस (त्यांस) पोरा-

हीचा (पोरांचा) वगैरे गोष्टी वऱ्हाडांत सर्वत्र रूढ आहेत. ब्राम्हण लोकांतहि वरील गोष्टींपैकीं बहुतेक रूढ आहेत.

वर सर्वसाधारण गोष्टी सांगितल्या आहेत. ह्यांशिवाय मागें सांगितलेल्या प्रत्येक भागांत कांहीं विशेष निराळ्या गोष्टी आहेत. त्यांपैकीं भाषादृष्टीनें विशेष लक्षपूर्वक पहाण्यासारख्या गोष्टी उत्तर वऱ्हाडांत बऱ्याच आहेत. त्यांपैकीं जास्त महत्वाच्या पुढें दिल्या आहेत.

१ उत्तर वऱ्हाडांतील बोलण्याच्या आवाजांतील मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे बोलतांना एक विशेष प्रकारचा हेल काढणें. हा हेल वाक्याच्या शेवटीं येतो. पंढरपूर, सोलापुराकडील लोक जसे त्यांच्या बोलण्याच्या स्वरावरून समजून येतात तसेच वऱ्हाडी लोकहि त्यांच्या बोलण्यांतील हेलावरून हटकून समजून यावयाचे. हा हेल परकीयांच्या कानास गोड लागत नाहीं. हा प्रकार ब्राम्हणेतरजातींत व बायकांत विशेष आहे.

२ उत्तर वऱ्हाडांतील दुसरी विशेष गोष्ट म्हजे 'स' हा विभक्तीप्रत्यय होय. वऱ्हाडाच्या बाहेर (नागपूर खेरीज करून) व वऱ्हाडांत सुद्धां घाटावर या प्रत्ययाचा बोलण्यांत फार क्वचित् उपयोग करितात. अशीं रूपें पुस्तकांत व विशेषतःकाव्यांत मात्र असतात परंतु वऱ्हाडांत सर्व काम 'स' नेंच होते. 'ला' ह्या प्रत्ययाचा उपयोग बहुधा होत नाहीं. उदा० त्यांस, आम्हांस, तूस, मज (मला) वगैरे.

३ या भागांतील तिसरी विशेष गोष्ट स्त्रीलिंगी सर्वनामांची मराठी कवींच्या काव्यांत जशीं 'हे धेनु' 'ते रामअंगना' अशीं रूपें आढळतात तशींच रूपें वऱ्हाडांत नेहमीं होतात. फक्त घाटावर हा प्रचार नाहीं. इतिहासाच्या दृष्टीनें हें फार विचार करण्यासारखें

आहे. मोरोपंतादि कवींच्या वेळेस रूढ असलेलें हें रूप वऱ्हाडा-शिवाय इतर ठिकाणीं कोठेंच प्रचारांत राहिलें नाहीं.

४ चवथी गोष्टहि उत्तर वऱ्हाड व वणी या भागांस लागू आहे. ती ही कीं, येथील स्त्रिया प्रथम पुरुषीं पुरुषाप्रमाणेंच, 'मी जातों' 'मी बसतों' असें म्हणतात. हा प्रचार ब्राम्हणांपासून तों शूद्रांपर्यंत सारखा आहे. याचप्रमाणें पुल्लिंगी तृतीयपुरुषी एक-वचनीं कर्ता असल्यास वर्तमानकाळीं क्रियापद स्त्रीलिंगाप्रमाणें घालतात. उदा० तो जाते, बोलावते. नागपूर प्रांतांत जेथें मराठी भाषा चालू आहे तेथेंहि अशींच रुपें होतात व यास कारण नागपुराकडील व वऱ्हाडांतील भाषेचें साधारणपणें साम्य आहे हें होय. इतर ठिकाणीं व खुद्द वऱ्हाडांतच घाटावरहि हा *प्रचार नाहीं.

५ पांचवा फारच चमत्कारीक प्रचार उत्तर वऱ्हाडांत रूढ आहे. हा प्रचार विशेषतः शूद्रवर्गांत आहे. ब्राम्हणवर्गांत हा प्रचार नाहीं. हा प्रचार म्हणजे कोणत्याहि शब्दांतील 'ळ' च्या जागीं 'य' व क्वचित् 'र'† (वणी) घालणें. बायापूर (बाळापूर) तीय (तीळ) गुय (गुळ) पय (पळ), हीं अशा प्रकारचीं उदा-हरणें होत. ह्या रूपांचा उगम कसा झाला असेल हेंहि सांगतां येत

---

* प्रथम पुरुषीं स्त्रीलिंगी 'मी जातों' हें व 'तो जाते' हीं दोन्हींहि रूपें संस्कृत भाषेंतील अवशेष राहिलीं असावींत असें वाटतें. 'अहं गच्छामि' यानें जसा पुल्लिंगी व स्त्रीलिंगीहि बोध होतो तसेंच 'स कुरुते' सा कुरुते' या दोन्हींहि पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपांत "कुरुते" यानेंच काम होतें. संस्कृतांत लिंगभेदानें क्रियापदाचें रूप बदलत नाहीं तसेंच येथेंहि बदलत नाहीं. द्वितीय पुरुषांत सुद्धां हीच प्रवृत्ति आहे. शिवाय तूं जातीस, ती जाती हींहि रूपें प्रचारांत आहेतच.

† रलयोरभेदः

नाहीं. ह्या लोकांना 'ळ' म्हणावयास सांगितला तर तो इतरां-प्रमाणें स्पष्ट म्हणतात परंतु 'य' घालण्याची भाषेचीच रूढि बन-लेली आहे. हा प्रचार बाळापूर आकोला या भागापासून पूर्वेस थेटपर्यंत आहे. वणी व उमरावती जिल्ह्यांत तो कांहींसा कमी आहे व घाटावर तर मुळींच नाहीं. या यकाराविषयीं ब्राम्हण वगैरे लोक थट्टेनें त्या लोकांसमोर पुढील वाक्यें म्हणतात. 'बाया-पूरची नदी झुयझुय वाहते आणि वाशीमचा बालाजी झयझय झयकते' (बाळापूरची नदी झुळझुळ वाहते आणि वाशींमचा बालाजी झळझळ झळकतो.) यच्या सुळसुळाटानें वरील वाक्यांत मोठी गंमत उडते. शब्दांचा अपभ्रंश होण्याच्या नियमाप्रमाणें व संस्कृतांतील सावर्ण्याच्या तत्वाप्रमाणें याचा कांहीं उलगडा करतां येईल.

ह्यांशिवाय बारीकसारीक गोष्टी बऱ्याच आहेत. परंतु त्या विस्तारास्तव लिहितां येत नाहींत. मुसलमानी कारकीर्दीचा भाषेवर काय परिणाम झाला आहे हें मागें सांगितलेंच आहे. ताप (स्त्री.) तंबाखू (स्त्री.) पागोटें (नपूं.) वगैरे पुष्कळ शब्दांचीं लिंगेंहि बरींच भिन्न झालीं आहेत.

वऱ्हाडचा दुसरा भाग घाट. यावरील भाषा बरीचशी डोंगरी वळणावर गेल्यामुळें कांहींशी रांकट आहे हें मागें सांगितलें. ह्याहि भागांत कांहीं विशेष प्रचार रूढ आहेत. परंतु ते उत्तर वऱ्हाडांतील प्रचारांइतके महत्त्वाचे व विचार करण्यासारखे नाहींत. तिसरा भाग वणी जिल्हा व वर्धातट यांतील भाषा उत्तर वऱ्हाडांतील भाषेच्या अगदीं जवळ आहे परंतु नागपुराकडील कांहीं विशिष्ट शब्द तेथें रूढ झाले आहेत. नेहमीं बोलतांना अरे, अहो याबद्दल गा, जी व जा, जा वगैरे बहुमानार्थी शब्दांचा उपयोग नागपुराप्रमाणें वणी

जिल्ह्यांत फार होतो. परंतु एकंदरीनें उत्तर वऱ्हाड व घाट यांत जो फरक दिसतो तो उत्तर वऱ्हाड व वर्धाकाठ यांत नाहीं.

वऱ्हाडांतील मराठी भाषेंत ज्या कांहीं विशेष गोष्टी सांगितल्या तसल्या गोष्टी फक्त वऱ्हाडांतच आहेत असें नाहीं. कोंकणांत कांहीं चमत्कारिक भाषासरणी चालू आहे. पढंरपुराकडे त्याहून निराळी. म्हणजे सध्या शुद्ध अशा मानल्या गेलेल्या भाषेहून कांहीं-तरी निराळे गुणधर्म व बारीक सारीक फरक प्रत्येक प्रांतांतील भाषेंत दिसतात. हा फरक निवळ देशपरत्वें झालेला आहे. प्रत्येक प्रांतांत एकाच भाषेस निरनिराळी परिस्थिति असल्यावर तिच्यावर निरनिराळे संस्कार झाल्यास तिचें रूप भिन्न होणारच. बारा कोसांत भाषा बदलते अशी म्हणच आहे, म्हणून हे निरनिराळे देशाचार अशुद्ध व चुकीचे आहेत असें मात्र म्हणतां येणार नाहीं. तसें म्हटलें तर एकाहि प्रांतांतील भाषा शुद्ध म्हणतां येणार नाहीं. सध्यां जी मराठी भाषा शुद्ध अशी मानली गेली आहे तिच्या मर्यादेंत फक्त पुणें व त्याच्या आसपासचा प्रदेश येईल. असें होण्याचें कारण इंग्रजी शिक्षणाचा, मराठी व्याकरणकारांचा व ग्रंथकरांचा उगम तेथेंच झाला हें होय. दुसऱ्या एखाद्या भागांत ह्याच गोष्टी झाल्या असत्या तर हल्लींची शुद्ध मराठी भाषा त्या वळणावर खास गेली असती.*

भाषेंतील स्थानिक भिन्नभाव नाहींसा होऊन अखिल महाराष्ट्राची एकरूपी भाषा बनणें ही गोष्ट सर्वथैव इष्ट आहे व त्याप्रमाणें चालू असलेला प्रकार एकराष्ट्रीय भाषेच्या वाढीस व समान भावनेस पोषक आहे हें खरें, परंतु हें होतांना सर्व ठिकाणचे चांगले

* इ० स० १९०४ मध्यें ग्रंथमाला मासिकांत या विषयासंबंधानें आपले विचार प्रस्तुत लेखकानें जास्त सविस्तर रीतीनें मांडले आहेत.

प्रयोग व शब्दसंपत्ति यांचा फायदा घेणें अवश्य आहे. ही संपत्ति गमावणें फायदेशीर नाहीं. व्याकरणकारांनीं व कोशकारांनीं सर्व ठिकाणचे शब्दांचा व प्रयोगांचा तपास करून त्यांचा अवश्य संग्रह केला पाहिजे. नाहीं तर ही संपत्ति नष्ट होईल. शिवाय भाषाशास्त्राचे अभ्यासास याची विशेष मदत होण्याचा संभव असतो. पुढील कांहीं उदाहरणांवरून हें दिसून येईल.

इंग्रजींतील Present continuous म्हणजे चालू वर्तमानकाळाप्रमाणें वऱ्हाडांत "मी लिहून राहिलों आहे" असा प्रयोग होतो. मराठी व्याकरणांत व पुस्तकी मराठींत हा प्रयोग विशेष उपयोगांत नाहीं. परंतु वऱ्हाडांत या काळाचा सार्वत्रिक उपयोग आहे व यानें रूढ भाषेंतील एक व्यंग दूर होईल.

तसेंच इकडील शब्दसंग्रह कोशकारांनीं व ग्रंथकारांनीं उपयोगांत आणिल्यास वैचित्र्य येऊन कित्येक प्रसंगीं भाषा जास्त सुंदर व शुद्ध बनेल. उ०:–

१ इंधन – सर्पण. हा शब्द वऱ्हाडांत मोळीविक्ये व विशेषतः ब्राम्हणेतर सर्व लोक वापरतात. इतरत्र रूढ नसलेला शुद्ध संस्कृत शब्द येथें रूढ असून तो शुद्ध शब्द आहे हें माहीत नसल्यामुळें वऱ्हाडांतील ब्राम्हण वगैरे लोकांस तो उच्चारण्याची लाज वाटते.

२ दोहणें = दूध काढणें

३ संध्यापात्र = संध्येचें ताम्हन. वऱ्हाडांत ताम्हन हा शब्द ताटाएवढया उंच कांठाच्या परातीस लावतात. संध्या करण्याच्या

---

I have been writing पूर्वी कांहीं काळापासून क्रिया सुरू होऊन ती अद्याप चालू आहे असा अर्थ दाखविणारा प्रयोग.

भांड्यास मुळींच लावीत नाहींत. त्यास फक्त संध्यापात्र असेंच म्हणतात.

४ देर = दीर . वऱ्हाडांतील "देर" हा शब्द संस्कृतांतील "देवृ" व हिंदी "देवर" यांस ज्यास्त जवळ आहे. वऱ्हाडांत दीर हा शब्द नवऱ्याच्या धाकट्या भावास लावतात, वडील भावास "भावा" असें म्हणतात.

५ दाटून = खोटें. ( जुन्या ग्रंथांतून व लेखांतून हा सांपडतो. )

६ ढवळा = पांढरा. ( सं. धवल ) (ब्राम्हणेतरांत रूढ आहे. )

७ वस्त(प्रत्यय) = च्यानें. उ० माझ्यावस्त हें काम होणार नाहीं = माझ्याच्यानें हें काम होणार नाहीं.

८ फाम = आठवण, शुद्धि. उ० मला फाम राहिली नाहीं हा शब्द ब्राम्हणेतरांत रूढ आहे. बेफाम हा शब्द या शब्दापासून बनला आहे.

९ कल्ला, कल्हमा = गोंगाट

१० डेहळज, ढेळज = उंबरठा. ( सं० देहली. उर्दू—देहलिज )

११ वायला = विभक्त, वेगळा. (कुणबी लोकांत)

१२ बारव = पायाविहीर.

याशिवाय शेतीचीं आऊतें, जनावरांचे रंग, आकार व वर्ण, फळें व झाडें यांचीं नांवें, धंदेवाल्यांचीं नांवें व अवजारें, खाण्याचे पदार्थ व पक्वान्नें, यांचीं नांवें कोशांत कायम ठेवणें जरूर आहे. यांचीं नांवें स्थलपरत्वें अगदीं भिन्न आहेत.

पुस्तकी मराठी भाषेंत नसलेले पण वऱ्हाडांत हल्लीं रूढ असलेले पुष्कळ शब्द जुन्या काव्यांतून सांपडतात.

उ० अमृतराय
ताथी = ताजी ( भाजी, तूप व० )
कोरवडे,= कोन्होडे
बोटवे,= देठवे ( वळवटाचे खिरींचे प्रकार )
कानवळे,= कान्होले.
राब = उसाचे रसाचा पाक.
जांब = प्याला.
फूट = भांब्याचें फळ.
भानें = जेवण्याचें वाढलेलें पान.
गोठण = जनावरांचा कोठा, जनावरें सकाळीं गांवाबाहेर जमण्याची जागा.
मुगें, मुगवें = लुगड्याचा रंग.

**वऱ्हाडांतील मराठी कवि**

संस्कृत काळाप्रमाणें मराठीच्या वेळेस पहिल्या इतक्या उत्कर्षानें जरी नाहीं तरी वऱ्हाडांत बरीच काव्यरचना झाली. मराठी वाङ्मयाचे वेळीं विदर्भांत राज्याची जागा नव्हती. वऱ्हाडांतील दक्षिणेकडील निमे भाग तुटून वऱ्हाडाचे बाहेर गेला होता. दक्षिण विदर्भाची राजधानी प्रतिष्ठान अथवा पैठण या बाजूस व स्थूलमानानें दक्षिण विदर्भांतच पुढील राजक्रांत्या झाल्या. चालुक्य व देवगिरीचे यादव हे या दक्षिण विदर्भांतच होते व जरी त्यांच्या अमलाखालींच उत्तर विदर्भही होता तरी राजधानी व राजाजाश्रय दक्षिणेंत आल्यामुळें सर्व गुणीजन, व विद्वान प्रतिष्ठान, देवगिरि येथें अगर त्या भागाकडे ओढले गेले. चालुक्य व यादव राजे विद्वानांचे चाहते असल्यामुळें प्रत्येक गुणी मनुष्य त्यांच्या

संग्रहास जाई व याप्रमाणें पैठण, बीड, जोगाईचें आंबें, दौलताबाद, वेरूळ, औरंगाबाद, या भागांत पुष्कळ कवि व विद्वान् निपजले अगर जाऊन राहिले. मराठी भाषेच्या उदयाचा काल चालुक्यांच्या व यादवांच्या कालाच्या बरोबरीचाच होता.

नंतरच्या यवनी राज्यांत सुद्धां याच भागांत सर्व उलाढाली झाल्या व यवनांचे राज्याचीं मुख्य ठिकाणें, विजापूर, दौलताबाद, औरंगाबाद, बेदर, अहमदनगर याच बाजूस राहिलीं. त्यामुळें हिंदूंतील पुष्कळ कर्ती माणसें तिकडे राहिलीं. त्यांच्या आश्रयानें व सर्वसाधारण धर्मस्फूर्तीनें या भागांत बरेंच वाङ्मय निर्माण झालें.

इतकी प्रतिकूल स्थिति असतांनाहि उत्तरविदर्भांत म्हणजे हल्लींच्या वऱ्हाडांत बरेच साधुसंत व कवि उत्पन्न झाले.

**अमृत राय**

" कीर्तन सुखार्थ "[1] ज्याचा अवतार झाला अशी मोरोपंतांनीं ज्यांची स्तुति केली ते कवि अमृतराय हे वऱ्हाडांतील साकरखेर्डा ऊर्फ फत्तेखेर्डा येथील राहाणार होते.

काव्यसंग्रहांत अमृतरायांची कविता प्रसिद्ध झाली, त्यांत कै. वामनराव ओक यांनीं अमृतरायांच्या संबंधानें माहिती दिली आहे कीं, ते औरंगाबादेस रहात असत. त्यांचा जन्मशक १६२० हा होता. ह्या नक्की शकास समजण्यास आधार काय हें समजण्यास मार्ग नाहीं. तरी पेशवाईच्या भरांत अमृतरायांचा कीर्तननिनाद जोरानें चालू होता. यावरून हा जन्मशक बरोबर आहे असें दिसतें. औरंगाबादेस विसा मोरो म्हणून कोणी अंमलदार होते त्यांचे आश्र-

---

१ सन्मणिमाला. मोरोपंत.

यानें अमृतराय होते अशी आख्यायिका आहे. ओकांना व नवनीतकारांना ती मान्य आहे व ती खरी असण्यास हरकत दिसत नाहीं. साकरखेड्यांच्या बाजूस त्यावेळचें पहिलें महत्त्वाचें राजकीय ठिकाण औरंगाबाद हेंच होतें. त्याचे वंशांतील पुरुष औरंगाबादेस आहेत. रायजीच्या काव्यांतील मोंगलाई रिवाजाचे शब्द येथूनच उचलले असावेत.

मोरो गणेश लोंढे यांच्या विविधज्ञान विस्तारांतील निबंधांत वरील विसामोरोची आख्यायिका खोटी आहे असें म्हटलें आहे, परंतु आधार दिला नाहीं.

अमृतरायांनीं आपल्या एका पदांत आपण "साकर खेडुलेकर आहों"असा उल्लेख केला आहे. काव्यासंग्रहकारांनीं हें पद छापलें आहे परंतु त्यांना वऱ्हाडांतील गांवांचीं नांवें माहीत नसल्यामुळें त्या पदांतलि "अमृतेश्वर साकर खेडुलेकर" याचा अर्थबोध त्यांना साहजिकपणें झाला नाहीं.वरील गोष्ट प्रथम मुमुक्षुकर्ते पांगारकर यांनीं मुमुक्षुच्या वर्ष २अंक ३मध्यें उघडकीस आणली. साकरखेर्डा हें गांव वऱ्हाडांत मेहकर तालुक्यांत आहे त्या जागीं निजामाची प्रथम फत्ते झाली म्हणून त्यानें फत्तेखेर्डा असें नांव ठेवलें व कागदोपत्रीं तें नांव आतां चालू आहे. पण व्यावहारांत अझूनहि साकरखेर्डा अगर साकरखेडलें असें म्हणतात व "खेर्डेकर"च्या ऐवजीं "खेडुलकर" "खेडलेकर" असें म्हणतात.

---

१ भक्तकथामृत. धुंडिराजमालोकृत.

२ काव्यसंग्रह अमृतरायकृत कवितासंग्रह पान १२३ पद नं. २७

आत्मप्रभाकर, भज तूं लौकर, ध्यायि निरंतर
अमृतेश्वर साखरखेडुलेकर ॥

३ पान १५० पहा.

साकरखेडर्याच्या आजूबाजूस रायजींचे सोयरे धायरे अझून बरेच आहेत व मागील पिढींतील रायजींचे वंशज कांहीं वर्षांपूर्वी आपलें मूळगांव म्हणून खेर्ड्यास येऊन गेले. त्यांचे सर्वांकडून अमृतरायांची खालील अप्रसिद्ध असलेली माहिती मिळते.

साखरखेर्डे येथील वतनदार कुळकर्णी घराण्यांत रायजींचा जन्म झाला. सबब ते गृहस्थ व म्हणूनच "राय" होते. ते ऋग्वेदी आश्वलायन शाखेचे असून गोत्र मुनिभार्गव हें होतें. खेर्ड्याच्या पांढरीचे ते कुळकर्णी होते. त्यांचे घराची पडीत जागा व त्यांचें उपास्य दैवत "अमृतेश्वर" नामक महादेवाचें देवालय तेथें अद्याप आहे. या अमृतेश्वराचें नांवावरूनच कवीचे आईबापानीं अमृतराय हें नांव ठेवलें. या अमृतेश्वर महादेवाचा उल्लेखहि त्यांचे पद्यांत आहे. (पा. १२३, १२८, १३०) कर्जदारीमुळें त्यांचे पांडेपणाची वृत्ति गहाण पडली म्हणून ते तेथून निघून गेले. पुढें तें पांडेपण तेथील देशपांड्यांकडे गेलें. कोणी म्हणतात आंदण दिलें. हल्ली त्यांचे वंशज औरंगाबादेस आहेत. सुपारी मारुतीजवळ त्यांचें घर आहे. त्यांना आतां हरदास हें आडनांव आहे. त्यांचे मुलीचा वंश पैठणास आहे.

अमृतरायांच्या आईचें नांव उमाबाई व बापाचें नांव शंकर. अंबिका सरस्वतीचा यांनीं अनुग्रह घेतला होता. मध्वमुनीश्वरांचे समकालीन. त्याविषयीं बऱ्याच आख्यायिका आहेत. अमृतरायांच्या ध्रुवचरित्रांत अखेरीस स्वतःचें वर्णन दिलें आहे तें असें:—

माता उमा परम शंकर तात झाला ।
अंबाजिता अमृत पावन नाम ज्याला ॥

---

१ कित्येक मोठ्या गांवीं काळीचे व पांढरीचे कुळकर्णी निरनिराळे आहेत. त्यावरून उपनांवें सुद्धां काळीकर, पांढरकर अशीं आहेत.

यांतील अंबाजिता या पदाचा अर्थ समाधानकारक रीतीनें लागत नाहीं. आपले गुरु अंबिका सरस्वती यांचेबद्दल हा उल्लेख असावा असा तर्क आहे. अमृत उर्फ अंबाजी हें कवीचें नांव होतें हा दुसरा तर्क आहे. अमृतरायांचे शिष्य सिद्धेश्वर महाराज कोल्हापूरकर व दुसरे माधव व ब्रम्हगिरि नांवाचे होते.

प्रथम अमृतराय यांनीं औरंगाबादेस मोंगलाई दरबारांत नोकरी केली. त्या वेळच्या जरूरीप्रमाणें त्यांना फारशी व उर्दू या भाषा चांगल्या येत होत्या व त्यांचा ओघ त्यांच्या हिंदी काव्यरचनेंत पुष्कळदां आला आहे, त्यांना संस्कृत तर उत्तमच येत होतें. विरक्त होऊन गुरुकृपा झाल्यानंतर ते गोदावरीच्या कांठीं कांहीं दिवस राहिले.

---

१ खंडेकर - खानापुर.

२ पान १२१ पद नं. १६ ( काव्यसंग्रह ) यांत " गुणलेखक मोहरीर अमृत घरीं । बसल्या घेत हरीर ॥ असा उल्लेख आहे. यावरून मोहरीलाचें काम रायजींनीं केलें असावें असें वाटतें. गर्भित रीतीनें तोच बोध होतो. पूर्वीं देशपांड्यांचें सर्व दप्तर लिहिण्याचें व सांभाळण्याचें काम मोहरील करीत व देशपांड्यांपासून त्यांस वेतन मिळे. खेड्यांचे मोहरील भिन्नगोत्री आहेत.

१ यालागीं अमृतेश्वरासि रुचली गंगातिरीं झोंपडी ॥१॥
अमृ. क. पा. ९१

तोचि सांप्रदाय माधव सरस्वती ।
वास गोदातीर नाभि तीर्थीं (नांदेड)
मग तयाचा उपदेश । प्राप्त अंबीका सरस्वतीस
तयाचा अभयकर अमृतास । असो नित्य ॥

अविनाशसंदेहहरण ॥१॥ पान १८८.

अमृतरायांचें देहावसान शके १६७९ मध्यें झालें. वय ५५.

अमृतरायांच्या कवितेंत पुष्कळ वऱ्हाडी शब्द आले आहेत. तसेंच वऱ्हाडांतील व जवळच्या स्थळांचीं नांवें आहेत. उदाहरणार्थ

पयोष्णा ( पा. १२१ ), वऱ्हाड बावन ( पा. ५१ )

जाल्हनें ( पा. ४९-५१ ) रोजे, अष्टी ( ४९ ) वऱ्हाड ८३.

**देवनाथ**

मराठी कवींपैकीं दुसरे विदर्भस्थ कवि म्हणजे **देवनाथ महाराज** होत. इतिहासप्रसिद्ध **सुर्जीअंजनगांव** या गांवाचे ते राहणारे. प्रथम काव्यसंग्रह- कारांनीं यांची कविता व चरित्र छापून काढलें. अलीकडे देवनाथ महाराजांची बरीच कविता व विस्तृत चरित्र रा० **अच्युतराव साठे सुंदरपंत पांडे** व **अग्निहोत्री** यांनीं वैदर्भ काव्यसंग्रहाचें दुसरें गुच्छांत छापून काढलें आहे.

देवनाथांचें मूळ नांव **देवराव**. सुरजी येथील **राजोपंत** नांवाच्या मध्यम स्थितींतल्या एका गृहस्थाचे पुत्र. जन्मशक १६७६ बारावें वर्षीं लग्न झालें. कुटुंबाचें माहेरचें नांव काशी व सासरचें **रमा**. सासऱ्याचें नांव **कृष्णराव**. हे जळगांव ( वऱ्हाड ) येथील राहणोरे. कुटुंबसुख फार काळपर्यंत लाभलेलें दिसत नाहीं. आरंभीं तालीमबाज होते. आखाड्याचा नाद मोठा. उनाडपणांत पूर्ववय गेलें. ज्येष्ठ बंधु व मातोश्री रागें भरल्यामुळें घरांतून निघाले. मारुतीची भक्ति फार. जळगांव तालुक्यांतील " **हनुमंताची बारी** " येथील जागृत मारुतीची आराधना केली. पुढें सुर्जीच्या मारुतीजवळ ठाणें देऊन बसले **एकनाथाचे** सांप्रदायांपैकीं तेरावे पुरुष **गोविंदनाथ** हे आकोला तालुक्यांतील **घूसर** गांवीं रहात त्यांचा अनुग्रह झाला ( शके १७०३. )

पुढें काव्यरचना व हरिनामकीर्तन करण्यास सुरवात झाली. देशोदेशीं हिंडले. ग्वाल्हेर, बऱ्हाणपूर, एलिचपूर, रामटेक येथें मठ स्थापिले. ते अद्याप आहेत. मुख्य मठ सुर्जी येथें आहे. सांप्रदाय चालू आहे. देवनाथांची पुष्कळ कविता व त्यांच्या सांप्रदायापैकीं इतर शिष्यांची कविता अद्याप छापली नाहीं.

**देवनाथ** महाराजांची कविता प्रासादिक व स्वाभाविक आहे. संस्कृत भाषेवर जरी प्रभुत्व बरेंच होतें तरी मूळचे व्युत्पन्न नसल्यामुळें कठोर शास्त्री लोकांनीं खोड्या कराव्या परंतु ईश्वरप्रसादाच्या तेजापुढें असे प्रयत्न निस्तेज होऊन **बाळापूरकर नानामहाराज गावलीसारख्या** प्रतिन्यासासहि खरी परीक्षा करून मान डोलवावी लागली.

अखेरीस कीर्तन करणें सोडून दिलें होतें पण ग्वाल्हेरीस एका श्रीमंत शिष्याच्या आग्रहावरून रामनवमीचें कीर्तन केलें. मंडपास आग लागली. भयंकर गर्दी. लोक बाहेर गेले पण सातशें मनुष्य जळून मेले. देवनाथ महाराजांस बाहेर जातां आलें असतें परंतु एका कुटिल पंडितानें मत्सरानें "**नैनं छिन्दंति शस्त्राणि, नैनं दहति पावकः**" या वाक्याची आठवण देऊन चिमटा घेतला. नाथांनीं उत्तर दिलें; "हें वाक्य तुम्हांला व मला दोघांसहि सारखेंच लागू आहे. या आपण दोघेंहि येथेंच हरिनामस्मरण करीत बसूं." हात धरून पंडितास बसविलें व भजन चालविलें. पंडितानें नाथांचा निश्चय पाहिला व जळून खाक होईपर्यंत स्थान सोडणार नाहींत हें जाणलें व पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला. नाथांच्या आंगांत ज्वानींतील तालीमबाजी रुजलेली. त्यांनीं पंडितांचा हात सोडला नाहीं व त्यांच्यासुद्धां भजन करीत जागच्याजागीं जळून मेले. समाधि ग्वाल्हेरीस आहे. अवसान शके १७४३.

**दयाळनाथ व सुर्जीचा मठ**

हे देवनाथांचे शिष्य व सुर्जीचे मठाधिपती होते. यांचीहि बरीच कविता वरप्रमाणेंच एका भागांत छापली आहे. हे हैदराबादेस समाधिस्थ झाले. या सांप्रदायांत आणखी बरेच कवि झाले. त्यांत भालचंद्रनाथ, गोविंदनाथ, गोपाळनाथ, यांचीहि बरीच कविता आहे. ती अद्याप छापली नाहीं.

**गोसावी नंदन**

हे कवि व संत हल्लींच्या वऱ्हाडांतले नव्हते. मोंगलाईंत औरंगाबादेजवळ त्यांचे वंशज आहेत. परंतु शिंदखेड येथें त्यांचा एक मठ अद्याप आहे. ते गाणपत्य असून गणपतीची मूर्ति पुढें ठेऊन ध्यानस्थ बसले असतां कांहीं कुचेष्टेखोरांनीं गणपति उचलून तेथें शालिग्राम ठेवला तों त्या शालिग्रामास सोंड फुटून त्याचा गणपति बनला. ही आख्यायिका याच मठांतील असून तेथील गणपति तो वरील आख्यायिकेंतलाच आहे असें सांगण्यांत येतें. त्या ठिकाणीं त्यांचें समाधि लावून बसण्याचें विवरहि आहे. तेथें ते बरेच दिवस राहिले त्यांची पुष्कळ कविता तेथें सांपडली आहे गोसावीनंदनाचे वंशज शिंदखेडाजवळच मोंगलाई हद्दींत आहेत.

**शिवदिनकेसरीचे वंशजांचा देऊळगांवराजा येथील मठ.**

शिवदिनकेसरीचे सांप्रदायाचा एक मठ देऊळगांवराजा येथें आहे. शिवदिनकेसरीचे चिरंजीव नरहरीनाथ यांची समाधि येथें आहे. त्यांचे चिरंजीव विठ्ठलनाथ यांचे मुलीचे पुत्र गणपतिनाथ यांचे वंशाजांकडे हा मठ आहे. गणपतिनाथ यांचीहि समाधि तेथेंच आहे. हे सर्व सांप्रदायी

भगवद्भक्त व कवि होते. हल्लीं गौतमनाथ हे गादीवर आहेत. शिवादिनकेसरींचा मुख्य मठ पैठणास आहे.

**मोरेश्वर वाशीमकर** देवनाथ महाराजांचे कवींचे व संतांचे यादींत यांचें नांव आलें आहे. यांचें कांहीं काव्यें असल्यास तें उपलब्ध नाहीं

मुक्तेश्वर कविराज मोरेश्वर ब्राम्हण ।
वैराग्य थोर ज्याचे वाचे नव्हे वर्णन ।
केवळ ज्ञानसिंधु वासीमकर मुख्य प्राण ॥

**गोविंद कवि वणीकर** या कवींचे स्त्रीनें रोगानें पीडित होऊन जलसमाधि घेतली. त्यानंतर तो विरक्त झाला. व ईश्वरसेवेस लागला. त्यानें ईश्वर स्तुतिपर पुष्कळ कविता केली आहे. काव्यसंग्रहांत अनेक कविकृत कवितासंग्रहांत[२] त्याचीं कांहीं पदें छापलेलीं आहेत पण बाकीची कविता संकलित केली गेली नाहीं. त्यानें रामायणाचा बहुतेक भाग प्राकृतांत केला आहे. पण उपलब्ध झाला नाहीं.

**मुकुंदराज** आदिकवि मुकुंदराज यांचे मूलस्थानाचा निर्णय अद्याप झाला नाहीं परंतु हे देवगिरीच्या आसपास म्हणजे वऱ्हाडच्या दक्षिण हद्दीवर कोठेंतरी जन्मले असावे. जोगाईचें अंबे येथें ते होते असा बहुजनसंमत तर्क आहे. वऱ्हाडचे उत्तर हद्दीवर सातपुड्याचे पायथ्याशीं खेरला म्हणून ठिकाण आहे व एक किल्ला आहे. त्या किल्ल्याजवळ मुकुंदराजाची म्हणून एक समाधि आहे. ती आदिकवि

---

१ चंद्रावलीचा कर्ता ! २ अनेक कविकृत काव्यसंग्रह भाग तीन पान ७५ पहा.

मुकुंदराजांची म्हणून म्हणतात. खेरला येथें रजपूत गोंडांचें एक राज्य बरेच दिवस होतें. " नृसिंहाचा बल्लाळू, त्याचा पुत्र जयत्पाळू" वगैरे वर्णन तेथील राजांसहि लागू पडतें. कांहीं विद्वानाचे[1] मतांचाहि यास आधार आहे.

मेहकर तालुक्यांत जानेफळ येथेंहि मुकुंदराज महाराजांची म्हणून फार जुनी समाधि आहे व समोर तशीच जुनी व सुंदर बारव आहे. या समाधीस पूर्वींपासून इनाम शेत होतें. तें हल्लीं सार्वजनिक म्हणून एका प्रमुख गृहस्थाकडे आहे. येथेंहि हे मुकुंदराज आदिकवीच होत अशी आख्यायिका आहे.

मुकुंदराज कवि यांना विदर्भस्थ असें मानण्यांत येतें.

वैद्यक ग्रंथकार त्रिंबकराज हा पयोष्णीचे कांठचा खोलापूर येथील राहाणारा होता. मराठी कवींपैकीं विठ्ठल नांवाचे दोन तीन कवि होऊन गेले त्यांपैकीं एक वऱ्हाडांतील *केळापूर येथील रहाणारा होता. रासक्रीडा व रुक्मिणीस्वयंवर यानें रचिलें आहे. काल शके १६३६ चे सुमारचा. उमरखेडचे बाजूस अनंत नांवाचा कवि होऊन गेला त्यानें वऱ्हाडांतील व जवळपासचे एकशें आठ संतांचें ओंवीबद्ध चरित्र लिहिलें आहे व तें ऐतिहासिक दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. उमरखेड येथील उत्तमश्लोक याची सप्तशतीवरील ओंवीबद्ध टीका सांपडली असून ती छापली जात आहे. माहूरकर आधुनिक सत्पुरुष विष्णुदास याचेंहि काव्य उत्तम आहे.

---

* भावेकृत महाराष्ट्रसारस्वत पान २८२ यांत हा वऱ्हाडांत कळपुर येथील राहणारा होता असें म्हटलें आहे. तें गांव कळपुर नसून केळापुर असावें.

१ मागें पान ९३ पहा

२ राजवाडे.

यांशिवाय इतरहि पुष्कळ बारीक सारीक कवि वऱ्हाडांत झाले असतील असें मानण्यास जागा आहे. परंतु या दृष्टीनें संगतशीर प्रयत्न *अद्याप झाला नाहीं. शिवकल्याण यांच्या आकोला येथील मठांतील रासपंच्याध्यायी रा. मोडक यांनीं वऱ्हाडांतील धनिक लोकांचे मदतीनें छापून काढली आहे परंतु सबंध भागवतावरील अप्रसिद्ध टीका प्रसिद्ध होणें आहे. आकोला येथें तो संग्रह कांहीं कायम आहे व कांहीं नाश झाला आहे.

---

* इंग्रजी कारकीर्दीचे सुरवातीस कावतकर म्हणून एक शिक्षक वऱ्हाडांत होते त्यांनीं मात्र बराच उद्योग करून वऱ्हाडांतील कांहीं कविता मिळवून कै० वामनराव ओक यांचे मदतीनें काव्यसंग्रहांत छापिली. देवनाथ, गोविंद, अमृतराय यांची कविता त्यामुळेंच छापली गेली.

# भाग चौदावा

## वऱ्हाडांतील जुन्या इमारती.

Where towers are crushed and unforbidden
weeds
Over mutilated towers shed their seeds,
And temples doomed to milder change unfold
A new magniffîcence that vies with old

*Wordsworth*

हिंदुस्थानच्या सर्व भागांप्रमाणें वऱ्हाडांत बऱ्याच पुरातन इमारती आहेत. कित्येक तर प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनें फारच महत्त्वाच्या आहेत व त्यावरून ह्या प्रांताच्या प्राचीन कारागिरीवरहि उजेड पडण्यासारखा आहे. त्या इमारतींचें साधारणपणें तीन भाग करितां येतील. हिंदु इमारती, बुद्ध व जैनधर्मी इमारती व मुसलमानी इमारती. इंग्रजी कारकीर्दीच्या आरंभीं मि० *लायल नांवाच्या युरोपियन गृहस्थानें ह्या जुन्या इमारती पाहण्याकरितां मुद्दाम वऱ्हाडांतून प्रवास केला व त्यानें आपण पाहिलेल्या इमारतींचें वर्णन करून त्यांचा कालनिर्णय करण्याचाहि प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारानें अजिंठा घाटावरील खडक कोरून तयार केलेल्या व इतर बांधीव इमारतींचे फोटो घेण्याकरितां मेजर गिल् नांवाच्या अधिकाऱ्यास पाठविलें होतें. त्यानेंहि आपण पाहिलेल्या इमारतींचें वर्णन प्रसिद्ध केलें आहे. त्यापैकीं विशेष प्रसिद्ध अशा इमारतींचें थोडेंसें वर्णन पुढें दिलें आहे.

---

* नंतर सर आलफ्रेड लायल. वऱ्हाडांचा कमिशनर व इतिहासकार.

## हिंदु इमारती.

१ मि० लायल यांच्या मतें पुरातनपणा व कारागिरी यांत अति महत्त्वाची इमारत वऱ्हाडच्या नैर्ऋत्येकडील लोणार ह्या गांवीं असलेलें " दैत्यसूदनाचें " देवालय होय. ह्या देवळाचा आकार चतुष्कोणी अष्टकोणी किंवा शुद्ध वाटोळाहि नसून बराच चमत्कारिक व सांगण्यास बराच कठीण आहे. साधारणपणें एका चिंचोळ्या पट्टीनें मध्यें जोडलेलीं दोन बहुकोनी वर्तुळें घेतलीं तर याचा कांहींसा आकार होईल. परंतु एवढ्यानें त्या देवळाच्या आकाराची खरी कल्पना येणें अशक्य आहे. ती इमारत प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय ह्या आकाराची कल्पना येणार नाहीं. ह्या देवळाच्या भोंवतालीं एक दगडी पटांगण असून हें सर्व देऊळ आंतून बाहेरून व वरूनहि दगडांचें बांधलें आहे. यास लाकूड किंवा चुना लावलेला नाहीं. देवळाच्या बाहेरच्या बाजूंनीं दगडावर असंख्य चित्रें कोरलीं आहेत. यापैकीं बहुतेक मुसलमानांच्या अमदानींत, विशेषतः मोंगल बादशहा औरंगजेब याच्या कारकीर्दींत फोडून छिन्नभिन्न केलेलीं आहेत. तरी सध्यां जेवढा भाग शिल्लक आहे तेवढ्यावरून मूळचें पूर्ण स्वरूप लक्षांत येतें व हें देऊळ त्याच्या वयाच्या मानानें अद्याप चांगल्या स्थितींत आहे. अशाप्रकारचीं देवळें दक्षिण हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं आहेत ह्याच गांवीं दुसरीं शेंकडों हेमाडपंती देवळें व प्रेक्षणीय स्थळें आहेत. अशींच देवळें धोत्र व सातगांव ता० चिखली येथें आहेत.

२ दुसरें कौशल्याचें काम व पुष्कळांच्या मतें हिंदु कारागिरीचें शिरोरत्न मेहेकर येथें ३९ वर्षांपूर्वीं सांपडलेली बालाजीची मूर्ति आहे. ही मूर्ति काळ्या पाषाणाची असून साडेदहा फूट उंच आहे व तिच्या प्रभावळीवर दशावताराचीं सुंदर चित्रें आहेत. ह्या



लोणार येथील दैत्यसूदनाचें देऊळ.

[ पृ. ३०२

मूर्तींच्या नखांकेसांसुद्धां नकशीचा बारीकपणा व कुशलतेचा पूर्णपणा पाहिला म्हणजे मन थक्क झाल्याशिवाय रहात नाहीं. ही मूर्ति मोंगल कारकीर्दींत यवनांच्या भीतीमुळें खोल पुरून ठेविली होती. ती नुकतीच अचानक सांपडली. सावळापूर येथेंहि अशीच परंतु लहान मूर्ति याचप्रमाणें जमिनींत सांपडली आहे. वाशीम येथील बालाजीची मूर्तीहि अशीच पुरलेली सांपडली.

३ तिसरी दिसण्यांस साधारण परंतु शिल्पशास्त्रज्ञांच्या मतें फारच महत्त्वाची इमारत मेहकर येथें पैनगंगेच्या कांठीं आहे. ही इमारत नदीच्या पात्रास अगदीं लागून आहे. हीं सर्व इमारत लांब दगडी चिऱ्यांची बांधलेली आहे. तेथेंहि चुना किंवा माती याचा कोठेंच उपयोग केला नाहीं. ह्या इमारतीस दगडच जसे लागतील तसे कापून घेतले आहेत. व एकावर एक तजविजीनें व अकलेनें बसविले आहेत. ही इमारत चालुक्यांच्या कार-कीर्दींत बांधली गेली असावी असें मेजर गिल् यांचें मत आहे. ह्या धर्तींवर बांधलेल्या इमारती गुजराथेंत मात्र कोठेंकोठें दिसतात. ह्या इमारतीस तेथील लोक 'मढ' असें ह्मणतात. ही इमारत एक हजार वर्षांपूर्वींची असावी. ही श्राद्धें व अंत्यविधि वगैरे करण्याची जागा होती व अद्यापहि त्या कामाकरितां तिचा उपयोग होतो.

वऱ्हाडांत ज्याप्रमाणें नांव घेण्यासारखीं बरींच हिंदु देवळें आहेत त्याचप्रमाणें पाहण्यासारख्या देवांच्या मूर्तीहि आहेत. मेहकर व पयोष्णीचे कांठचे सांवळापुर येथील विष्णुमूर्ती, आकोट तालुक्यांतील वारी येथील व लोणार येथील हनुमानाच्या प्रचंड मूर्ती ह्यांचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. या सर्वांपेक्षां प्राचीन व प्रचंड देवीची मूर्ति चिखली तालुक्यांतील अमडापूर येथें होती. ह्या ठिकाणीं देवीचे एक प्रसिद्ध देऊळ आहे. हल्लींचे देवळाचे जागीं जुनें हेमाडपंती देऊळ व

देवीची प्रचंड मूर्ति होती. पूर्वीच्या देवीच्या प्रचंड मूर्तीचे भाग त्या देवळाच्या पाठीमागें उघड्यावरच अद्याप मांडलेले आहेत. ते भाग व त्याच्या बरोबरीच्याच इतर लहानसहान मूर्ति खरोखरच कोणत्याहि विचारी पुरुषाचें मन बराच वेळपर्यंत आपल्याकडे गुंतविल्याखेरीज रहात नाहींत. त्या देवीच्या मूर्तीचे घोंट्यापर्यंत पायाचे पंजे व एका हाताचा पंजा त्यांत धरलेल्या सीताफळीच्या फळासह तेथें आहे. मधील अवयवांचेहि कांहीं भाग तेथें आहेत. त्या पायांतील दागिन्यांवरून ही देवीची मूर्ति होती असें ओळखू येतें. त्या पावलांची लांबी सुमारें साडेसहा फूट आहे व सीताफळीचा घेर दहा फूट असेल. पावलांच्या आकारावरून जर देवीच्या शिरापर्यंत उंचीची कल्पना केली तर ती मूर्ति निदान पन्नास साठ फूट तरी उंच असावी; परंतु बहुधा ती बसलेली मूर्ति असावी. नेहमीप्रमाणें ही मूर्ति एकाच दगडाची असली पाहिजे. ही मूर्ति फारच प्राचीन असून ती यवनांच्या हातून फोडली गेली असावी. जुन्या देवळावरील संस्कृत लेख कायम आहे त्यावरून सिंघण यादवाचे वेळचें हें देऊळ होतें असें *दिसतें. हल्लींचें देऊळ व मूर्ति पेशव्यांचा अमडापूरचा कमावीसदार खंडेरावबल्लाळ याचे वेळची आहे व त्यावरून देवीस बल्लाळी देवी असेंहि म्हणतात.

ह्याचप्रमाणें उत्तर वऱ्हाडांत बारशीटाकळी, पुसद, पातूर, पिंजर, पूर्णाकांठ वगैरे ठिकाणीं बऱ्याच सांगण्यासारख्या हेमाडपंती व इतर इमारती आहेत परंतु त्याचें सविस्तर वर्णन करणें या ठिकाणीं शक्य नाहीं.

## जैनधर्मी इमारती.

वऱ्हाडावर एकदां जैनधर्मी राजांचा अंमल असल्यामुळें वऱ्हाडांत जैनधर्मी देवळेंहि बरींच आहेत. त्यांपैकीं सातपुड्यांतील

* Hiralals Inscriptions in C. P. and Berar.



मुक्तागिरि येथील जैन देवळें.

[ पृ. ३०४

मुक्तागिरी येथील धबधब्याजवळचीं देवळें, व शिरपूर येथील प्रसिद्ध जैनमंदिर एवढ्याच इमारती सांगण्यासारख्या आहेत.

मुक्तागिरी हें ठिकाण एलिचपुराहून पांच कोसांवर सातपुडा पर्वताच्या दोन उंच शिखरांच्या आडोशास मध्यभागीं आहे. ही जैनधर्माची मोठी पवित्र क्षेत्राची जागा आहे. व जैनांच्या पवित्र ग्रंथांत* त्याचा उल्लेख आहे. हें त्या ठिकाणच्या नांवावरून स्पष्ट दिसतें. या यात्रेकरितां दूरदूरचे जैन लोक येतात. येथें सरासरी दीडशें फूट उंचीवरून खालीं पडणारा एक धबधबा आहे. या धबधब्याच्या प्रवाहाच्या दोन्ही बाजूंस शिखरावर व कांहींतर प्रवाहाच्या वर पूल बांधून त्यावर बांधलेलीं अशीं लहानमोठीं शेकडों देवळें आहेत. यांपैकीं कित्येक देवळें खोल भुयारांत अंधारमय जागेंत आहेत. त्याच्या आंतील सफेत दगडाच्या भव्य व मोठ्या मूर्ति पाहून प्रथमदर्शनीं तर आंत जाणारास भीतीच वाटते. एक देऊळ तर सरळ उभा भिंतीसारख्या काळ्या पाषाणाचा सुमारें तीनचारशें फूट उंच कडा फोडून धबधब्याच्या पायथ्याशीं वेरूळच्या लेण्याच्या धर्तीवर खडकांत कोरून तयार केलें आहे. आंतील भिंती व खांब मूळचा खडक राखूनच खोदले आहेत. वेरूळच्या लेण्याएवढें हें प्रचंड काम मात्र नाहीं. याशिवाय उघड्यावर बांधलेलीं पुष्कळ मोठमोठीं देवळें आहेत. या सर्व देवळांत पारसनाथाच्या काळ्या अगर संगमरवरी नग्न मूर्ति आहेत व त्यांवर बांधणारांचीं नांवें व शक देवनागरी लिपींत लिहिले आहेत.

मुख्य देवळें एलिचपुरास अकराव्या शतकांत राज्य करणाऱ्या ईल† नांवाच्या जैन राजानें बांधलीं आहेत व त्यानंतर पुढें

---

* पान ७१ टीप पहा
पान ७८ पहा. † भाग ३ पान-७०

मुक्तागिरी येथील धबधब्याजवळचीं देवळें, व शिरपूर येथील प्रसिद्ध जैनमंदिर एवढ्याच इमारती सांगण्यासारख्या आहेत.

मुक्तागिरी हें ठिकाण एलिचपुराहून पांच कोसांवर सातपुडा पर्वताच्या दोन उंच शिखरांच्या आडोशास मध्यभागीं आहे. ही जैनधर्माची मोठी पवित्र क्षेत्राची जागा आहे. व जैनांच्या पवित्र ग्रंथांत* त्याचा उल्लेख आहे. हें त्या ठिकाणच्या नांवावरून स्पष्ट दिसतें. या यात्रेकरितां दूरदूरचे जैन लोक येतात. येथें सरासरी दीडशें फूट उंचीवरून खालीं पडणारा एक धबधबा आहे. या धबधब्याच्या प्रवाहाच्या दोन्ही बाजूंस शिखरावर व कांहींतर प्रवाहाच्या वर पूल बांधून त्यावर बांधलेलीं अशीं लहानमोठीं शेकडों देवळें आहेत. यांपैकीं कित्येक देवळें खोल भुयारांत अंधारमय जागेंत आहेत. त्याच्या आंतील सफेत दगडाच्या भव्य व मोठ्या मूर्ति पाहून प्रथमदर्शनीं तर आंत जाणारास भीतीच वाटते. एक देऊळ तर सरळ उभा भिंतीसारख्या काळ्या पाषाणाचा सुमारें तीनचारशें फूट उंच कडा फोडून धबधब्याच्या पायथ्याशीं वेरूळच्या लेण्याच्या धर्तीवर खडकांत कोरून तयार केलें आहे. आंतील भिंती व खांब मूळचा खडक राखूनच खोदले आहेत. वेरूळच्या लेण्याएवढें हें प्रचंड काम मात्र नाहीं. याशिवाय उघड्यावर बांधलेलीं पुष्कळ मोठमोठीं देवळें आहेत. या सर्व देवळांत पारसनाथाच्या काळ्या अगर संगमरवरी नग्न मूर्ति आहेत व त्यांवर बांधणारांचीं नांवें व शक देवनागरी लिपींत लिहिले आहेत.

मुख्य देवळें एलिचपुरास अकराव्या शतकांत राज्य करणाऱ्या ईल† नांवाच्या जैन राजानें बांधलीं आहेत व त्यानंतर पुढें

---

* पान ७१ टीप पहा
पान ७८ पहा. † भाग ३ पान-७०

त्यांत निरनिराळ्या लोकांनीं भर घातली आहे. ह्या देवळांवरून तीं बांधणाऱ्या लोकांचा दृढनिश्चय, मेहनत, करामत व कोणतेंही काम करण्याचा उत्साह हे गुण स्पष्ट दिसून येतात. हीं देवळें एक हजार वर्षांचीं जुनीं असूनहि निवाऱ्याच्या जागीं असल्यामुळें अगदीं नवीं दिसतात.

शिरपुर येथील जैन मंदिरहि बरेंच जुनें आहे.

## मुसलमानी इमारती

मुसलमानी कारकीर्दींत बांधलेल्या इमारतींपैकीं ईलिचपूर बाळापूर वगैरे ठिकाणच्या इमारती न नरनाळा, गाविलगड हे किल्ले सांगण्यासारखे आहेत.

१ एलिचपुरच्या इमारतींपैकीं 'बीचन' नदीच्या कांठची दूलारहिमानशहाची कबर बरीच जुनी आहे. दूलारहिमान मेल्यास आतां नऊशांवर वर्षें होऊन गेलीं. परंतु त्यानंतर शेंदीडशें वर्षांनीं अल्लाउद्दीन खिलजीनें प्रथम कबर बांधविली. त्याचेनंतर दुरुस्ती होत होत बहामनी राजांचे कारकीर्दींत हल्लींची कबर बांधली. एलिचपूरचे नबाबांनींहि कांहीं दुरुस्ती केली. कांहीं वेशी व भोंवतालची भिंत मुधोजी व रघूजी भोसल्यांनीं बांधली. सदरहू कबरीभोंवतीं दुसऱ्याहि अनेक इमारती आहेत.

२ एलिचपूरचें दुसरें मुसलमानी काम तेथील पहिला नबाब इस्मायलखान यानें बांधलेला त्या शहराभोंवतालचा तट व त्याचे भव्य दरवाजे हें आहे. ही भिंत बहुतेक बाजूंनीं चांगली असून सर्व वेशी फारच मजबूत व युद्धकलेकडे पूर्ण लक्ष देऊन केलेल्या आहेत. त्यांच्या बाहेरच्या बाजूस फारच सुंदर नक्षी दगडावर खोदली आहे. व ह्या सर्वांवर इस्मायलखांचें नांव व सन आहे. हा तट अगदीं अलीकडचा म्हणजे दीडशें वर्षांपूर्वींचा आहे.



शिरपुर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथाचें देऊळ. [पृ. ३०६

३ एलिचपूरची अत्यंत महत्त्वाची इमारत 'हौज कटोरा' ही आहे. ही गांवापासून पश्चिमेस एक मैलावर आहे. हौज कटोरा ही इमारत इमादशाही वंशांतील बादशहा अल्लाउद्दीन यानें बांधविली. एक कृत्रिम तलाव करून त्याच्या मध्यभागीं ही इमारत बांधविली होती. आरंभीं हिचे तीन मजले होते; व वर मनोरे होते परंतु आतां वरचा भाग पडल्यामुळें ती नादुरुस्त झाली आहे. तरी हल्ली तिची उंची ८० फूट आहे. ह्या तलावांत नानाप्रकारचीं जलपुष्पें व कमलें यांचे वेल लावले होते. हौजकटोरा हें त्या बादशहाचें जलविहाराचें स्थान होतें. ही इमारत बांधून सुमारें पांचशें वर्षें होत आलीं आहेत.

४ वरील इमारतींशिवाय इमादशाहीच्या वेळचा किल्ल्याचा दरवाजा व कैदखाना, (हा भरकल या नांवानें प्रसिद्ध आहे.) निरनिराळ्या वेळेस बांधल्या गेलेल्या प्राचीन व मध्यकाळच्या मशीदी (यांपैकीं जुम्मामशीद, इमामवाडा व दुसरी एक पुरातन मोडकळीस आलेली मशीद ह्या सांगण्यासारखा आहेत. ह्या दुसरीवर लेख आहे) सर्व नबाब व थोर पुरुष यांच्या कबरी असलेले बारादरी नांवाचें ठिकाण, इमादुलमुल्क याचा दर्गा वगैरे ठिकाणें पाहाण्यासारखीं आहेत.

५ नरनाळ किल्ला वऱ्हाडांतील किल्ल्यांत अगदीं प्रथमचा आहे. हा प्रथम हजार वर्षांपूर्वीं बांधला गेला असावा. ह्या किल्ल्यांत बरेच प्राचीन असे झांकलेले हौद आहेत. ते जैन धर्तींचे आहेत असा एकानें तर्क केला होता पण तो खरा नाहीं. ते तेलातुपाचे हौद होते असें म्हणतात. सर्व भाग एका वेळीं बांधला गेला नसावा हें तेव्हांच दिसून येतें. सध्यांच्या स्वरूपांत दिसणारा नरनाळा किल्ला बहामनी घराण्यांतील महमूदशहा याच्याच कारकीर्दींत बांधला गेला.

त्यापूर्वीं अहमदशहा बहामनी यानें त्यापूर्वीं असलेल्या किल्ल्याची दुरुस्ती केल्याचा उल्लेख फेरिस्ता यानें केला आहे. इ०स० १४८४ च्या सुमारास त्यानें आपला सरदार कमालजंग ह्याकडून हा बांधविला. नंतर हा लागलीच इमादशाही बादशहांच्या ताब्यांत गेला. ह्यानंतर मोंगलांच्या ताब्यांत हा किल्ला गेल्यावर औरंगजेबानेंहि पूर्वींच्या कामांत बरीच भर घातली.

नरनाळा किल्ला समुद्रसपाटीपासून ३१६१ फूट उंच आहे. नरनाळा किल्ल्याचा एकंदर घेर चौदा मैल आहे, असें ठोकळ मानानें म्हणतात. ह्या मुख्य किल्ल्यांत दुसरे लहान तीन किल्ले आहेत; त्यांस तेलीगड, जाफराबाद व नरनाळा अशीं निरनिराळीं नांवें आहेत. किल्ल्यांत सभोंवतालचा तट जागेच्या मानानें २५ पासून ४० फूट उंच असून त्यास एकंदर ६७ बुरूज आहेत. २१ लहान व ६ मोठे दरवाजे आहेत.त्यांतील मुख्य दिल्ली दरवाजा, सिरपुर दरवाजा, आकोट दरवाजा व शहानूर दरवाजा. आंत पाण्याचीं एकंदर १९ टाकीं आहेत. परंतु त्यांपैकीं चार पांच टाक्यांतच आतां वर्षभर पाणी राहतें. आंत पाहण्यसारखीं ठिकाणें जुन्या राजवाड्याचा पडका भाग, औरंगजेबाचा पडका महाल व मशीदी, बारादरी, सिलाखाना, नगारखाना, वगैरे इमारती आहेत. खुनी बुरूज ( देहांत शिक्षा दिलेल्या अपराध्यास कडेलोट करण्याची जागा ) भोंसल्याच्या वेळचे वाडे व तुळशीवृंदावनें आहेत.

किल्ल्यांत कारागिरीचें उत्तम काम 'शहानूर*' दरवाजा हें आहे. हा किल्ला शिल्पशास्त्राच्या नियमानें प्रमाणशीर बांधला असल्यामुळें ह्याच्या बांधणींत कोठेंहि नांव ठेवण्यास जागा नाहीं. व त्याच्या सौंदर्यांतहि कोठें कमी पडलें नाहीं. दरवाज्याच्या बाजूस नकशींत अरबी लिपींत कुराणांतील वाक्यें कोरलीं आहेत.

किल्ल्याच्या पश्चिम टेंकडीवर एक मोठी दक्षिणाभिमुख तोफ मांडली आहे; व ती तोफ औरंगजेबाच्या कारकीर्दींत इ० स० १६७० त प्रथम बसविली असा तिच्यावर परशियिन भाषेंत लेख आहे. ही नऊ यार्ड लांब असून तिला "नऊ गज तोफ" असेंच नांव आहे. दुसरी एवढीच मोठी "कडकबिजली" नांवाची तोफ होती ती खालीं "चंदनखोऱ्यांत" पडली असें म्हणतात पण तिचा पत्ता नाहीं. १८५७ सालचे बंडाचे वेळीं तात्या टोपी व मुगुटराव हे जळगावांस आले होते तेव्हां नरनाळ्यांतील सर्व दारूगोळा, तोफा वगैरे काढून आकोटास आणल्या.

६ वऱ्हाडांतील दुसरा किल्ला गाविलगड हाहि सातपुड्याचे एका टेंकडीवर बांधलेला आहे. हा वऱ्हाडांतील अति थंड ठिकाण जें चिखलदरा त्यापासून एक मैलावर आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची सुमारें चार हजार फूट आहे. हा किल्ला नरनाळ्यापक्षांहि मजबूत आहे. बहामनी वंशांतला नववा राजा अहमदशहा यानें हा किल्ला १४२५ या सालीं बांधिला. या किल्ल्यास खालून माऱ्याची जागा नसल्यामुळें हा सर करण्यास बराच कठीण आहे. खुद्द इंग्रजांसहि या किल्ल्यानें कांहीं दिवस दाद दिली * नाहीं. फत्तेउल्ला इमादुल्मुल्क व नागपूरकर भोंसल्यांनीं त्याची पुढें बरीच दुरुस्ती केली. किल्ल्यांतील इमारतीपैकीं मुख्य एक मशीद आहे. ती फार दुरून दिसते. दिल्ली दरवाजावर फत्तेऊल्ला इमादुल्मुल्क याचा लेख आहे व विजयानगरच्या हिंदु राजांच्या चिन्हाप्रमाणें सिंह, हत्ती वगैरेंचीं चित्रें आहेत. फत्तेउल्ला हा विजयानगरचा ब्राम्हण असून पाडाव करून आणलेला होता म्हणून त्यानें विजयानगरच्या धर्तीवरील चित्र काढलें असा तर्क आहे. मुर्तिजा निजाम-

* पान २०८ पहा.

शहाचे वेळचा गाविलगडचा किल्लेदार बहिरामखान यानें पश्चिमे कडील बाजूस एक बुरूज इ० स० १५७७ मध्यें बांधला त्यावरही त्याबद्दल लेख आहे. बाहेरचा किल्ला म्हणून एक किल्ल्याचा भाग आहे तो नागपूरकर भोंसल्यांनीं बांधला आहे. त्यावर एक मराठी लेख आहे. नरनाळ्याप्रमाणेंच येथेंहि एक " नऊ गज तोफ " आहे.

७ वरील किल्ल्याशिवाय एलिचपूरच्या नबाबानें बांधविलेला बाळापूरचा लहानसा परंतु मजबूत किल्ला, बहामनी राजांच्या कारकीर्दींत बांधला गेलेला माहूरचा किल्ला, आकोला येथील नदीकांठचा लहानसा किल्ला वगैरे इमारती उल्लेख करण्यासारख्या आहेत.

यांशिवाय अलीकडच्या इमारतींपैकीं शिंदखेड येथील जाधवांनीं बांधलेला तलाव व त्यावरील महाल, बाळापूर येथील जयसिंग राजाची ( राजा सवाई जयसिंग ) छत्री, उमरावतीचा तट व भोंसल्यांची गढी बाळापुराजवळ शहापूर येथील पडक्या घरांच्या खुणा, भाम येथील भोंसल्यांच्या महालाच्या खुणा, सर्व ठिकाणचीं हेमाडपंतीं देवळें वगैरे स्थळें इतिहासाच्या दृष्टीनें महत्वाचीं आहेत त्या सर्वांची सविस्तर हकीकत येथें देतां येत नाहीं त्यांतील बहुतेकांची त्रोटक हकीकत पुरवणींत त्या त्या गांवाच्या पुढें दिली आहे.

---

* राजा जयसिंगाचा जेथें जेथें तळ होता तेथें तेथें त्यानें कांहीं खूण ठेविली आहे. उमरावती जिल्ह्यांत जयपूरच्या दरबाराच्या त्यावेळच्या कांहीं जहागिरी अद्याप कायम आहेत.:

ांचा वंशवृक्ष.

रवलीकर.

( बायको )

२ यमुनाबाई ४ — बहादुरजी — ( भुतजीस दत्तक)

भुतजी उर्फ जगदेवराव — बहादुरजी — मानासिंग उर्फ रुस्तुमराव (याची मुलगी अंबिकाबाई दिल्लीस शाहूस दिली. ) किनगांव राजा येथील शाखा

ां

वा)

सुलक्षणाबाई (कन्या)

ंतराव

आधार—१ शिंदखेडचे घुमटावरलि लेख.
२ जाधवरावांची बखर.
३ जाधव घराण्यांतलि वंशवृक्ष.
४ तंजावरचा शिलालेख.
५ प्रसिद्ध ऐतिहासिक बखरी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ना.
ठाणे.

त)

ना)

शहाचे वेळचा गाविलगडचा किल्लेदार बहिरामखान यानें पश्चिमेकडील बाजूस एक बुरूज इ० स० १५७७ मध्यें बांधला त्यावरही त्याबद्दल लेख आहे. बाहेरचा किल्ला म्हणून एक किल्ल्याचा भाग आहे तो नागपूरकर भोंसल्यांनीं बांधला आहे. त्यावर एक मराठी लेख आहे. नरनाळ्याप्रमाणेंच येथेंहि एक " नऊ गज तोफ " आहे.

७ वरील किल्ल्याशिवाय एलिचपूरच्या नबाबानें बांधविलेला बाळापूरचा लहानसा परंतु मजबूत किल्ला, बहामनी राजांच्या कारकीर्दींत बांधला गेलेला माहूरचा किल्ला, आकोला येथील नदीकांठचा लहानसा किल्ला वगैरे इमारती उल्लेख करण्यासारख्या आहेत.

यांशिवाय अलीकडच्या इमारतींपैकीं शिंदखेड येथील जाधवांनीं बांधलेला तलाव व त्यावरील महाल, बाळापूर येथील जयसिंग राजाची ( राजा सवाई जयसिंग ) छत्री, उमरावतीचा तट व भोंसल्यांची गढी बाळापुराजवळ शहापूर येथील पडक्या घरांच्या खुणा, भाम येथील भोंसल्यांच्या महालाच्या खुणा, सर्व ठिकाणचीं हेमाडपंतीं देवळें वगैरे स्थळें इतिहासाच्या दृष्टीनें महत्वाचीं आहेत त्या सर्वांची सविस्तर हकीकत येथें देतां येत नाहीं त्यांतील बहुतेकांची त्रोटक हकीकत पुरवणींत त्या त्या गांवाच्या पुढें दिली आहे.

---

* राजा जयसिंगाचा जेथें जेथें तळ होता तेथें तेथें त्यानें कांहीं खूण ठेविली आहे. उमरावती जिल्ह्यांत जयपूरच्या दरबाराच्या त्यावेळच्या कांहीं जहागिरी अद्याप कायम आहेत.:

# शिंदखेडचे जाधवांचा वंशवृक्ष.

मुकुंद [illegible]खलीकर.

विठोजी=ठा(२ बायको)

लुकजी=(बायका) १ म्हाळसाबाई, २ गिर[illegible] ३ यमुनाबाई    भुतजी उर्फ जगदेवराव

१    २    ३    ४

जिजाबाई(मुलगी) शिवाजीची आई    राघोजी    दत्ताजी    अचलोज[illegible]    बहादुरजी    बहादुरजी

बहादुरजी    यशवंतराव    लिंबाजी (लुकजी!) (पुढें पत्ता लागत नाहीं)    अडगांव [illegible] येथील शा[illegible] (धनाजीची [illegible]ा)    (भुतजीस दत्तक)    मानासिंग उर्फ रुस्तुमराव (याची मुलगी अंबिकाबाई दिल्लीस शाहूस दिली.) किनगांव राजा येथील शाखा

दत्ताजी

=दुर्गाऊ    राव जगदेव    =मुलाऊ    =तुळजाऊ

मानासिंग ०    राघोजी=अंबिकाबाई (बापूसाहेब)    यशवंतराव (कुंभागीची शाखा)    दत्ताजी    सुलक्षणाबाई (कन्या)

तुळजाजी (पैठणची शाखा)    [illegible]ंतराव

मानासिंग (बाबजी) =(कडूबाई, महादजी नाईक निंबाळकरांची मुलगी)

आनंदराव

व्यंकटराव

बाजीराव=अहिल्याबाई.    रामचंद्रराव (भाऊसाहेब)

मानासिंग=कोंडाबाई    कृष्णराव

दु. बाजीराव =यमुनाबाई) (आनंदराव औरंगाबादकर पुत्र म्हणून हक्क सांगतात. औरंगाबाद शाखा)    रासोजी(दासीपुत्र)    जगदेवराव ०    दत्ताजीराव ([illegible]त) (देऊळगांव [illegible]ा)

आधार–१ शिंदखेडचे घुमटावरील लेख.
२ जाधवरावांची बखर.
३ जाधव घराण्यांतील वंशवृक्ष.
४ तंजावरचा शिलालेख.
५ प्रसिद्ध ऐतिहासिक बखरी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

या गांवच्या पाटीलक्या दिल्या. त्या त्याचे घराण्यांत अद्याप चालत आहेत.

लुकजी व भुतजी दोघे बंधू शिंदखेडास प्रथम येत असतां सटवाजी व० राघोजी नांवाच्या वारकाचे शेतांत उतरले व भोजनोत्तर एका झाडाखालीं लुकजी निजला. दुसरे लोक दुसरे झाडांखालीं निजले, तों लुकजीवर एका नागानें फणा धरली हें त्या शेताचा मालक सटवाजी वारीक यानें पाहिलें व हा कोणीतरी मोठा मनुष्य होणार हें ओळखून तो येऊन लुकजीचे पाय दाबीत बसला. लुकजी जागा झाल्यावर तो त्यास लवून मुजरा करून "तुम्हास तुमचे कामांत यश येईल, तुमचा मोठा भाग्योदय होईल" वगैरे धूर्तपणाच्या गोष्टी बोलूं लागला व याप्रमाणें करून "माझा भाग्योदय झाल्यास मी तुला विसरणार नाहीं" असें त्यानें लुकजीपासून वचन घेतलें. लुकजीचा भाग्योदय झाल्यावर लुकजीनें त्या वारकास एक मुंडाचें शेत इनाम दिलें व शिंदखेड येथील देशमुखीचा मान दिला. शिंदखेड व देऊळगांवराजा येथील सटवाजीचे वंशज वारीक अद्यापिहि मशाल धरीत नाहींत व देशमुखीचा मान हें त्याचें कारण सांगतात.

शिंदखेडाकडील बंदोबस्त करून जाधवराव दौलताबादेस निजामशहा पादशहाकडेस गेले व त्याचे मदतीस राहून बराच पराक्रम केला. त्यामुळें बादशहानें त्यास खासगत खर्चासाठीं शिंदखेड, पडतुर, *खेरडें व मेहकर वगैरे प्रांत जहागीर दिले व फौज ठेवण्यास सांगून फौजेचे खर्चासाठीं वैजापूर, गांडापूर, फुलंबरी,

---

* खेरडा हा गांव ३०० वर्षें जाधवरावांचे जहागिरींत होता तेथें "मानसिंग दरवाजा" नांवाची वेस अद्याप आहे.

कन्नड, दाऊरवाडी, पैठण, मेहकर, परगणा लोणार, रिसवड बामनी, पिंपळगांव, कुऱ्हेमंगरूळ वगैरे महाल दिले,

जाधवरावाचा बादशहाशीं फारच सलोखा झाला इतका कीं, जाधवरावाचे बायकोनें एकदां पादशहास दिवाळीची भाऊबीज केली होती. पादशहानें विजापूर व दौलताबाद सरकारच्या देशमुख देशपांडेपणाचें फर्मान करून दिलें.

जाधवरावांकडे एकूण २७ महाल व बावन चावड्यांचा अधिकार असे. त्यांची यादी बखरकारानें दिली आहे. लखूजीस चार पुत्र होते. १ दत्ताजी २ अचलोजी ३ बहादुरजी व ४ राघोजी-पैकीं बहादुरजी हा भूतजीस दत्तक दिला होता.

जाधवरावांच्या शिंदखेडच्या घराण्याच्या चार शाखा झाल्या-व चार गांवीं जवळजवळच त्यांनीं वस्ती केली. अडगांव, मेहुणें, किनगांव व शिंदखेड याप्रमाणें वरील चार भावांनीं अनुक्रमें ठाणें दिलें. शिंदखेडची शाखा पुढें देऊळगांवास आली. ह्या चारी शाखा अद्याप त्या त्या गांवीं कायम आहेत. या सर्व गांवांस जाधवरावांचे नांवावरून "राजा" हें उपपद चालू आहे व सदरहू गांवांच्या पाटिलक्या व देशमुखी (देऊळगांवचे शाखेचें खालसा झालेलें खेरीज करून) वतनें अद्याप त्याचे वंशजांकडे चालू आहेत.

लखूजी जाधवराव हा निजामशाही घराण्याचा आधारस्तंभ होता. व तो पुढें मोंगलांकडे गेला हें मागील *भागांत आलेंच आहे. आपसांतील मत्सर हें राज्य बुडण्याचें लक्षण. प्रत्यक्ष सासरे जांवई लखूजी व शहाजी यांचेमध्यें अधिकारासंबंधीं चुरस उत्पन्न होऊन शहाजीचा वरपगडा होतांच लखूजीनें मोंगलांची सरदारी पत्करून निजामशाही रसातळास घातली. पुढें शाहूचे कारकीर्दींत धनाजी

* पान १६३ पहा.

या गांवच्या पाटीलक्या दिल्या. त्या त्याचे घराण्यांत अद्याप चालत आहेत.

लुकजी व भुतजी दोघे बंधू शिंदखेडास प्रथम येत असतां सटवाजी व० राघोजी नांवाच्या वारकाचे शेतांत उतरले व भोजनोत्तर एका झाडाखालीं लुकजी निजला. दुसरे लोक दुसरे झाडांखालीं निजले, तों लुकजीवर एका नागानें फणा धरली हें त्या शेताचा मालक सटवाजी वारीक यानें पाहिलें व हा कोणीतरी मोठा मनुष्य होणार हें ओळखून तो येऊन लुकजीचे पाय दाबीत बसला. लुकजी जागा झाल्यावर तो त्यास लवून मुजरा करून "तुम्हास तुमचे कामांत यश येईल, तुमचा मोठा भाग्योदय होईल" वगैरे धूर्तपणाच्या गोष्टी बोलूं लागला व याप्रमाणें करून "माझा भाग्योदय झाल्यास मी तुला विसरणार नाहीं" असें त्यानें लुकजीपासून वचन घेतलें. लुकजीचा भाग्योदय झाल्यावर लुकजीनें त्या वारकास एक मुंडाचें शेत इनाम दिलें व शिंदखेड येथील देशमुखीचा मान दिला. शिंदखेड व देऊळगांवराजा येथील सटवाजीचे वंशज वारीक अद्यापिहि मशाल धरीत नाहींत व देशमुखीचा मान हें त्याचें कारण सांगतात.

शिंदखेडाकडील बंदोबस्त करून जाधवराव दौलताबादेस निजामशहा पादशहाकडेस गेले व त्याचे मदतीस राहून बराच पराक्रम केला. त्यामुळें बादशहानें त्यास खासगत खर्चासाठीं शिंदखेड, पडतुर, *खेरडें व मेहकर वगैरे प्रांत जहागीर दिले व फौज ठेवण्यास सांगून फौजेचे खर्चासाठीं वैजापूर, गांडापूर, फुलंबरी,

* खेरडा हा गांव ३०० वर्षें जाधवरावांचे जहागीरींत होता तेथें "मानसिंग दरवाजा" नांवाची वेस अद्याप आहे.

कन्नड, दाऊरवाडी, पैठण, मेहकर, परगणा लोणार, रिसवड बामनी, पिंपळगांव, कुऱ्हेमंगरूळ वगैरे महाल दिले,

जाधवरावाचा बादशहाशीं फारच सलोखा झाला इतका कीं, जाधवरावाचे बायकोनें एकदां पादशहास दिवाळीची भाऊबीज केली होती. पादशहानें विजापूर व दौलताबाद सरकारच्या देशमुख देशपांडेपणाचें फर्मान करून दिलें.

जाधवरावांकडे एकूण २७ महाल व बावन चावड्यांचा अधिकार असे. त्यांची यादी बखरकारानें दिली आहे लखूजीस चार पुत्र होते. १ दत्ताजी २ अचलोजी ३ बहादुरजी व ४ राघोजी- पैकीं बहादुरजी हा भूतजीस दत्तक दिला होता.

जाधवरावांच्या शिंदखेडच्या घराण्याच्या चार शाखा झाल्या- व चार गांवीं जवळजवळच त्यांनीं वस्ती केली. अडगांव, मेहुणें, किनगांव व शिंदखेड याप्रमाणें वरील चार भावांनीं अनुक्रमें ठाणें दिलें. शिंदखेडची शाखा पुढें देऊळगांवास आली. ह्या चारी शाखा अद्याप त्या त्या गांवीं कायम आहेत. या सर्व गांवांस जाधवरावांचे नांवावरून "राजा" हें उपपद चालू आहे व सदरहू गांवांच्या पाटिलक्या व देशमुखी (देऊळगांवचे शाखेचें खालसा झालेलें खेरीज करून) वतनें अद्याप त्याचे वंशजांकडे चालू आहेत.

लखूजी जाधवराव हा निजामशाही घराण्याचा आधारस्तंभ होता. व तो पुढें मोंगलांकडे गेला हें मागील *भागांत आलेंच आहे. आपसांतील मत्सर हें राज्य बुडण्याचें लक्षण. प्रत्यक्ष सासरे जांवई लखूजी व शहाजी यांचेमध्यें अधिकारासंबंधीं चुरस उत्पन्न होऊन शहाजीचा वरपगडा होतांच लखूजीनें मोंगलांची सरदारी पत्करून निजामशाही रसातळास घातली. पुढें शाहूचे कारकीर्दींत धनाजी

* पान १६३ पहा.

जाधवरावासारख्या स्वामिनिष्ठ मराठे सरदाराचा मुलगा चंद्रसेन जाधवराव बाळाजी विश्वनाथाचे चुरशीनें मराठी राज्य सोडून निजामास मिळाला.

जाधवराव व भोंसले यांचा संबंध जुलमाचा रामराम असाच झाला व त्यामुळें प्रथमपासूनच एकमेकांशीं एकमेकांचें रहस्य नव्हतें. पुढें शहाजी कर्तबगार निघून निजामशाहीचा आधारस्तंभ बनत चालला तसतसा जाधवराव मागें पडत चालला. तें मानी जाधवरावास आवडेनासें झालें. त्यामुळें जाधवराव व भोंसले असे दोन पक्ष पडून त्यांच्या एकामेकांत नेहमीं धुसफुशी चालत. या मत्सराचा एकदां तर फारच विपरीत परिणाम झाला. तो तंजावरच्या प्रसिद्ध बृहदीश्वर *शिलालेखांत पुढीलप्रमाणें दिला आहे.

**खंडागळ्याच्या हत्तीवरून भांडण**

इ.स.१६२२ चे सुमारास जहांगिरानें शहाजहान यास निजामशाही राज्य घेण्याकरितां दक्षिणेंत पाठविलें. त्यास तोंड देण्याकरितां निजामशहानें आपले लहान मोठे सरदार बोलावले व त्यानिमित्तानें तो एक मोठा दरबारच भरला. निजामशाहीचे आधारस्तंभ म्हणजे मलिकंबर, लुकजी व शहाजी. ते सर्व आपआपल्या परिवारासह व इतमामासह हजर होते. दरबार खलास झाल्यावर सर्वजण परत जात असतां एकच गर्दी झाली. त्यांत भोंसल्यांकडील खंडागळे नांवाच्या एका सरदाराचा हत्ती बेफाम होऊन त्यानें जाधवरावाकडील कित्येक लोक पायाखालीं चिरडले. म्हणून लुकजीचा मुलगा दत्ताजी हा त्या हत्तीवर धांवला व त्यास मारणार इतक्यांत विठोजी भोंसल्याचे आठहि पुत्र त्याच्या आड झाले. त्यामुळें जाधवरावांच्या व भोंसल्यांच्या लोकांत मारामारी चालली.

* तं. शिलालेख पा. ७–८

व दत्तांजीनें भोंसल्यांकडील पुष्कळ लोक मारले. विठोजीचा पुत्र संभाजी यानें दत्ताजीवर तरवार चालवून त्याचे डोकें उडविलें. हें समजतांच पुढें लांबलेले लुकजी जाधवराव व शहाजी तेथें आले व आपआपल्या पक्षांत मिसळून एकमेकांवर तुटून पडले. पुत्रशोकानें वेडा झालेल्या लुकजीनें संभाजीस ठार केलें व शहाजी मध्यें पडून त्याच्याशी लढूं लागला तर त्यावरहि तरवार चालविली. लुकजीच्या तरवारीचा वार शहाजीस लागून तो मूर्छित पडला व त्याचे लोकांनी त्यास त्वरेनें उचलून नेलें. हें वर्तमान मुर्तिजा निजामशहास कळतांच तो धांवून आला व त्यानें तें भांडण मिटविलें. त्यानें लुकजीस बराच दोष दिला त्यामुळें लुकजी जास्तच नाराज झाला *व लौकरच निजामशहाची नोकरी सोडून मोंगलास मिळाला. यानंतर लौकरच प्रसिद्ध भातोडीची लढाई झाली.

**भातोडीची लढाई इ० स० १६२४**

विजापुरचे आदिलशहा व मोंगल एकीकडे व दुसरीकडे निजामशहा असे पक्ष पडले. विजापुरकराकडे लुकजी जाधवराव व त्याच्या हाताखालचे मराठे व तुर्क सरदार, धुंडिराज नांवाचा एक ब्राम्हण सरदार, घाटगे वगैरे मराठे सरदार व मुल्लामहमद वगैरे मुसलमान सरदार होते. मोंगलांच्या लष्करांत मुसलमान सरदारांशिवाय वऱ्हाडांतील प्रसिद्ध

---

* तंजावरचा शिलालेख पा. ७–९

राजवाडे. राधामाधवचंपू. पा. ५०

तंजावरचे शिलालेखांत प्रथम लुकजी आदिलशहास मिळाला असें म्हटलें आहे परंतु याबद्दल संशय वाटतो तो एकदम मोंगलासच मिळाल्याचें दिसतें. आदिलशहा व मोंगल एका पक्षास असून ते निजामशहाविरुद्ध लढले त्यामुळें लुकजी आदिलशहाचे बाजूनें लढल्याचा भास होतो.

" राजे उदाराम " घराण्याचा मूळ पुरुष उदाराम हा ब्राम्हण सरदार आपल्या लष्करासह होता. निजामशाही लष्करांत मलिकंबर व शहाजी हे प्रमुख होते. मलिकंबर व शहाजी यांनीं या लढाईंत फारच पराक्रम गाजविला आणि मोंगल व विजापूरच्या सैन्याचा अहमदनगराजवळ भातोडी येथें पूर्ण पराजय केला. मलिकंवरानें रात्रीं घातलेल्या एका छाप्यांत तर असावध असलेल्या मोंगल लष्कराची फार कत्तल झाली. त्या छाप्यांत लुकजी व उदाराम दोघेहि हजर होते ते कसेतरी घोड्यावर स्वार होऊन जीव घेऊन पळाले परंतु त्यांचें पुष्कळ लष्कर मारलें गेलें. *

शहाजीचा मत्सर जाधवराव वगैरे मराठे सरदारच करीत होते असें नाहीं. प्रत्यक्ष मलिकंबरास हि त्याचा हेवा वाटूं लागला. वरील युद्धांतील शहाजीच्या कर्तबगारीचें कौतुक मलिकंबरानें न करितां त्यानें शहाजीचा चुलतभाऊ म्हणजे विठोजीचा मुलगा खेळोजी याची तारीफ केली तें शहाजीस सहन झालें नाहीं. त्यामुळें या भावांतहि चुरस उत्पन्न झाली. शहाजीनें निजामशाही सोडून विजापूरची नोकरी पत्करली व तो निजामशाहीविरुद्ध आपल्या अपमानाबद्दल सूड उगविण्याच्या तयारीस लागला. पुढें कांहीं दिवसांनीं तो परत निजामशाहींत आला.

लखूजीनें निजामशाहीची नोकरी सोडल्यानंतर मोंगलांनीं निजामशाही बुडविण्याकरितां दक्षिणेंत स्वारी केली; त्यावेळीं शहाजहान बादशहा गादीवर होता. दक्षिणेंतील जुना माहितगार व

---

* मोडककृत विजापूरचा इतिहास (बुसातिने सलातिन) पा. १४६ अहमदनगर ग्याझिटियर ३९४. खरे मालोजी पा. ९ तंजावर बृहदीश्वर शिलालेख पा. १०

वजनदार सरदार असंतुष्ट होऊन फुटला व तो आपणास मिळा-ल्यास फारच उपयोग होईल हें मोंगलांनीं जाणून शाहाजाद्यासहि न मिळणारी अशी २४००० ची मनसब व १९००० घोडेस्वारांचा अधिकार देऊन त्यास आपणाकडे घेतलें (इ. स. १६२१)

निजामशाही सर करण्यांत मोंगलांस लखूजी जाधवरावाचा फार उपयोग झाला. शेवटीं दौलताबाद किल्ला सर करण्याचें मुख्य काम शिल्लक राहिलें होतें. तो किल्ला घेण्याकरितां मोगलांचे प्रयत्न व डांवपेच चालू होते व लुकजीहि या प्रयत्नांतच होता. परंतु तो मरेपर्यंत किल्ला मोंगलांच्या हातीं लागला नाहीं. दौलताबाद किल्ला फार दुर्गम* म्हणून प्रसिद्ध होता व पूर्वींच्या काळाच्या युद्धसामुग्रीच्या मानानें पाहिलें तर तो लढून घेणें जवळजवळ अशक्य असेंच वाटतें.

---

* दौलताबादचा किल्ला हल्ला करून क्वचितच घेतला गेला. लुकजीच्या उदयाच्या वेळेस त्यानें युक्तीनेंच तो निजामशहाकरितां घेतला होता त याबद्दल खालील दंतकथा प्रसिद्ध आहे:—

लखूजी किल्ल्याचा माहीतगार. धान्याची व पाण्याची अडचण आंतील शिबंदीस पडणार नाहीं. हें त्यास माहीत. फक्त आंतील घोड्यांस व जनावरांस गवत बाहेरून आणावें लागत असे. किल्ल्यांतील लोक आंतील सनईच्या ठरीव सुरावरून बाहेरील आपले पक्षाचे लोकांस इशारा देत असत. आंतील लोकांनीं आंत गवताची तूट पडली आहे असें सनईनें बाहेरील लोकांस कळविलें. लखूजीनें ती खूण ओळखली व आपले माणसांस भारेवाल्यांचा वेष देऊन त्यांचें डोक्यावर मोठमोठे गवताचे भारे दिले व त्या गवतांत हत्यारें, व पाणी भरण्याच्या डोलच्या घातल्या. आपणहि तसाच वेष घेऊन व एक भारा घेऊन त्यांचेबरोबर रात्र पडल्यावर गेला. दरवाज्यावरील पहारेकऱ्यांस सांगितलें कीं, खुणेप्रमाणें गवत आणलें आहे. पहारेकऱ्यांनीं

हा किल्ला म्हणजे साधारण लहानच अशा टेंकडीवर उंच खांबासारखा एक सुळका वर गेला आहे. टेंकडीच्या पायथ्याजवळचा खडक कोरून त्याच्या भिंती बनविल्या आहेत व भोंवतीं खंदक खणून त्यांत पाणी सोडलें आहे. त्यावर वाटेल तेव्हां काढतां येणारा लांकडी पूल आहे. पुलावरून वर चढण्यास वाटा आहेत. त्यानीं एकदम मोठें लष्कर चढून जाणें शक्य नसून थोडेथोडे लोकच वर जाऊं शकतात. त्यापुढील वाट खुली नसून मुद्दाम खडक कोरून बोगदे करून वर नेली आहे व त्या बोगद्यांत ठिकठिकाणीं भिंतींत कोनाडे कोरून त्यांत हत्यारबंद शिपाई बसविण्याची सोय केली आहे. बोगद्यांत अंधार असून व एकदम जास्त माणसें जाण्याइतकी जागा नाहीं. ठिकठिकाणीं तोफा ठेवलेल्या आहेत. सर्वांच्यावर बोगद्याच्या वरील तोंडाशीं एक मोठा लोखंडी पत्रा, त्यास खालीं चाकें

---

(मागील पानावरील टीप पुढें चालू)

फसून दरवाजा उघडला व सर्व भारेवाले आंत घेतले. भारेवाल्यांनीं हत्यारें काढून पहारेवाल्यांस ठार मारून किल्ली घेऊन दरवाजा बंद केला व नाकेबंदी करून आंत शिरले. आंतील शिबंदी बेसावध होती त्यामुळें जास्त त्रास न पडतां लोखंडी तव्यापर्यंत ते सहज गेले पण तितक्यांत गडबड होऊन तवेवाल्यानीं तवा टाकून विस्तव पेठविला परंतु तो तापण्याचे अगोदरच लखूजी तेथें जाऊन पोहोंचला. त्यास हें होणार हें माहीतच होतें म्हणून त्यानें आपले लोकांबरोबर पाण्याच्या डोलच्या किल्ल्यांतील खालच्या टाक्यावरून भरून घेतल्याच होत्या. त्या पाण्यानें विस्तव विझवून त्यानें तवा फेंकून दिला व रस्ता मोकळा केला व वर जाऊन निजामशहाचें निशाण लावलें व तोफ उडविली. हें पाहतांच किल्ला पडला हें समजून बाहेरील लष्कर किल्ल्याचे दरवाज्यापाशीं आलें व लखूजीच्या लोकांनीं त्यांस आंत घेतलें. याप्रमाणें हा दुर्गम किल्ला निजामशहाचे ताब्यांत गेला.

वगैरे बसवून फिरता केला आहे. तो तवा बोगद्याच्या तोंडावर घालून वर विस्तव पेटवून देत असत. म्हणजे बोगद्याचे तोंडाशीं दहावीस हातांपर्यंत मनुष्य येऊं शकत नसे. या लोखंडी तव्याचे वरील बाजूस मुख्य निशाण रोंवण्याची जागा व शेवटची मोठी तोफ आहे. वर आपलें निशाण रोंविल्याशिवाय किल्ला सर झाला नाहीं असें समजत.(याच किल्ल्यांत श्रीजनार्दन स्वामींची* समाधि व गुहा आहे.)

हा दुर्गम किल्ला घेण्याकरितां शहाजहानाचे सैन्यानें पुष्कळ खटपटी केल्या. किल्ल्याचे भोंवतीं पटांगण व दोन बाजूंनीं कांहींसा उंचवटा आहे त्यावरून जास्त उंचीच्या त्या किल्ल्यावर मारा चालेना व किल्ल्यांतील रोंवलेल्या प्रचंड तोफांचा मात्र मारा चालत असे. शेवटीं वेढा देऊन व आंतील रसद बंद करून आंतील शिबंदीस उपाशी मारल्याशिवाय इलाज नाहीं असें समजून मोंगल लष्कर वेढा देऊन स्वस्थ बसलें. किल्ल्याचे आंत देवीचे देवळाजवळील धान्याचीं कोठारें व पाण्याचीं पुष्कळ टाकीं भरलेलीं असल्यामुळे आंतील शिबंदी निर्धास्त होती. पण अखेरीस अठ्ठावन दिवसांच्या कडक वेढ्यानें रसद संपून तो किल्ला मोंगलांचे हातीं आला.(इ० स० १६३३)

लखूजी हा अखेरपर्यंत मोंगलांकडे राहिला. तरी निजामशाही राजांचा पूर्वींचा नोकर या नात्यानें प्रसंगविशेषीं तो त्यांस सल्लामसलत व मदत करीत असे. व निजामशहाहि त्यानें आपलेकडे फिरून यावें म्हणून त्यास नाना प्रकारचें आमिष दाखवीत असे.

---

* दौलताबादचा किल्ला मूळ देवगिरीच्या यादव राजाचे वेळचा असून तेथें देवीचें व गणपतीचें देऊळ अद्याप आहे. देवीचे देवळाचें रूपांतर मशिदींत केलें आहे परंतु सर्व इमारतीचें मूळचें स्वरूप कायम असल्यामुळें त्या हिंदु इमारती म्हणून स्पष्ट ओळखूं येतात.

मुर्तिजा निजामशहा यास त्यानेंच त्याचा शिरजोर वजीर फत्तेखान याचे त्रासांतून सोडविलें व हमीदखान हा वजीर झाला. या हमीदखानाच्या फंदानेंच इ. स. १६३० चे आगष्टांत मुर्तिजानें सल्लामसलतीचें मिष दाखवून लखूजीस दौलताबादेच्या किल्ल्यांत बोलाविलें व दग्यानें त्यास व त्याचा मुलगा, नातू व इतर आप्त यांस ठार *मारलें तो प्रकार असा:—

" फत्तेखानास¶ निजामशहानें कैदेंत टाकल्यावर हमीदखान हा वजीर झाला व त्यानें निजामशहास समजाविलें कीं आमच्या राज्यांतील प्राचीन सरदार व माहीतगार लुकजी जाधवराव मोंगलांस मिळाला आहे तो आमच्या राज्यांतलीं छिद्रें मोंगलांस दाखवून देतो त्यामुळें मोंगल आम्हांस भारी झाले आहेत.† याकरितां कसेंहि करून जाधवरावाचा बंदोबस्त आधीं केल्याखेरीज मोंगलांवर आम्हास कदापि जय मिळावयाचा नाहीं. लुकजी जाधवरावाविषयीं निजामशहाच्या मनांत पूर्वींपासून अढी होतीच. त्यामुळें नवीन वजीरानें दिलेला हा सल्ला त्याच्या मनांत तत्काळ भरला आणि जाधवरावास युक्तीनें बोलावून आणून त्यास कैद करण्याचा त्यानें बेत योजिला. मग त्याप्रमाणें भेटीस येण्याविषयीं निजामशहाकडून जाधवरावास बोलावणें गेलें. त्यावेळीं त्यास लोभाविष्ट करण्यासाठीं कोणचें आश्वासन देण्यांत आलें होतें हें समजत नाहीं.‡ परंतु एवढें मात्र खरें कीं निजामशहाच्या मायावीपणानें लुकजी जाधवरावास भुरळ पडली आणि तो घरच्या

---

* – पादशहानामा – जेधे शकावली. – ग्रांट डफ. पा० ४५

¶ खरे मालोजी व शहाजी पा० १४–१५. † इ० स०. १६२९ पासून मोंगलांनीं निजामशहाविरुद्ध प्रत्यक्ष लढाई चालविली होती. ‡ लुकजीनें परत निजामशाहींत यावें याबद्दल बोलणें चालू होतें व हेंच निमित्त असावें.

मंडळीसह येऊन दौलताबाद शहराबाहेर फौजेचा तळ देऊन राहिला व त्याचा भाऊ जगदेवराव किल्लयाबाहेर कोतुळकच्या तळ्यावर उतरला. ठरलेल्या दिवशीं लुकजी जाधवराव आपले पुत्र व नातू व आप्तस्वकीय लोक बरोबर घेऊन किल्यावर गेला. राजवाड्यांत जातांच या सर्व लोकांस असें समजाविण्यांत आलें कीं, हुजूर स्वारीस तुमचें भय वाटतें.तुह्मी पहाऱ्यावर हत्यारें ठेवून आंत गेल्याखेरीज हुजूर तुमची भेट घेणार नाहींत. लुकजीच्या मनांत कांहींच पाप नसल्यामुळें त्यानें आपली तरवार सोडून ठेविली व आपल्या अनुयायांकडूनही तसेंच करविलें. नंतर हे सर्व लोक आंत गेले. दरबार झाला. निजामशहाची भेट झाली. निजामशहा क्षणभर बसून बोलून कांहीं निमित्तानें उठून गेला तों दरबारच्या दिवाणखान्यांत मारेकरी घुसले व लुकजीस कैद करूं लागले. कैदेपेक्षां मरण बरें असें मानून तो लढाईस तयार झाला मारेकऱ्यांनीं तरवारी चालविल्या; लुकजी व त्याचे लोक यांच्या कमरेस फक्त कट्यारी राहिल्या होत्या तरी मारेकऱ्यांवर चढाई करून ते मारतां मारतां गतप्राण झाले. या कत्तलीस लुकजीबरोबर त्याचे मुलगे अचलोजी व राघोजी व नातू यशवंतराव* व दुसरेहि कित्येक आप्तइष्ट मारले गेले. ती वार्ता किल्लयाबाहेर जगदेवराव उतरला होता त्यास कळतांच तो व त्याचा मुलगा बहादुरजी तत्काळ स्वार होऊन पळाले ते शिंदखेडास आले. मागें लष्करांत लुकजीची बायको गिरिजाबाई होती. (हिलाच एका बखरींत म्हाळसाबाई म्हटलें आहे.) तिजवर असें हें एकदम आकाश कोसळलें तरी आक्रोश करीत रडत बसणारी ती बाई नव्हती. तिनें लोकोत्तर धैर्य धरून जलदीनें आपली फौज तयार करविली. बाजारबुणगें बाडबिशाद

* येथें यशवंतराव पाहिजे. खऱ्यांनीं लिहिलेलें वसंतराव चूक आहे.

आवरून लादून ती शत्रूच्या देखदेखत शिंदखेडास निघून आली,,**

लुकजी हा त्यावेळीं ८० वर्षांचा म्हातारा झाला होता तरी तो चित्त्यासारखा त्वेषानें व चपळाईनें लढला व हातांत फक्त कट्यार होतीं तरी आंगावर तरवारीचे वार होत असतां मारतां मारतां मरून गेला, परंतु जिवंत हातीं सांपडला नाहीं. याप्रमाणें या शूर *पुरुषाचा दुःखद रीतीनें अंत झाला.

---

** वऱ्हाडांतील दुसरी शूर ब्राह्मण स्त्री **रायबागन** इनें शाहिस्ते-खानाच्या स्वारीच्या वेळेस प्रत्यक्ष शिवाजीच्या मुलखांत कोकणापर्यंत जाऊन धुमाकूळ घातला व **गिरजाबाई** याप्रमाणें कठीण प्रसंगांतून धैर्यानें निभावली पुढेंहि या घराण्यांतील स्त्रियांनीं बरेंच धैर्य दाखविलें आहे. योग्य प्रसंग आल्यास स्त्रियाहि किती कर्तबगार होतात याच्या अनेक उदाहरणांपैकीं हें एक आहे.

* प्रसिद्ध इतिहासकार वासुदेव वामनशास्त्री खरे यांनीं लुकजी जाधवरावावर विश्वासघातकीपणाचा आरोप केला आहे व त्याचाच अनु-वाद इतर कांहीं इतिहासकारांनीं केला आहे. शिवसभव नाटकांत तर खरेशास्त्री यांनीं लुकजीचें चित्र काळेंकुट्ट रेखाटलें आहे, त्याचे उलट शहा-जीचें चित्र उज्वल रीतीचें रेखाटलें आहे. परंतु प्रस्तुत लेखकाच्या मतें शहाजीच्या चरित्रांत असाधारण उज्वलपणा अगर लुकजीच्या चरित्रांत असाधारण वाईटपणा यापैकीं कांहींच नसून खाजगी महत्त्वाकांक्षा व चुरस यापलीकडे दोघांच्याहि वर्तनांत विशेष फरक नाहीं. दोघांनींहि मालक बदलले व पूर्वीच्या मालकांशीं लढले. दोघांनींहि त्यावेळपुरता आपल्या मालकांचा अभिमान धरला व घरसोडी केल्या. त्याकाळाच्या नीतिमत्तेच्या कल्पना हल्लींच्या पुस्तकी व तात्त्विक कल्पनांशीं जुळणें शक्य नाहीं व त्याप्रमाणें या पूर्वीच्या व्यक्तींचें परीक्षण केल्यास दोघांसहि सार-खाच दोष द्यावा लागेल. त्यावेळची नोकरी म्हणजे तींत आपलेपणा नसून जवळजवळ बाजारचा सवदाच असे व तसा आपलेपणा वाटण्या-

[ ही टीप पुढील पानावर चालू ]

लखूजी मेल्यानंतर त्याची बायको शिंदखेडास येऊन राहिली, तिचा दीर भैतोजी उर्फ जगदेवराव यास मोंगलांकडून १००० स्वारांची मनसब मिळाली. तसेंच जगदेवरावाचा पुत्र बहादुरजी व नातू मानसिंग यांसहि मनसबा मिळाल्या. शहाजहानानें निजामशाही बुडविली त्यांत जगदेवरावानें निजामशहाविरुद्ध फार पराक्रम केला. निजामशाहीचे सरदार शहाजी भोंसले व फत्तेखान यांचा जगदेवराव व मोंगल सरदार मोहोबतखान यांनीं पराभव केला वं निजामशहास व फत्तेखानास कैद केलें. (इ. स. १६३३)

या स्वारींतील पराक्रमाबद्दल लखूजीचे वेळची ९२ चावड्यांची देशमुखी जगदेवरावाच्या नांवानें करण्यांत आली व फौजेच्या खर्चाकरितां जहागीर तोडून दिली. त्यांपैकीं कांहीं जहागीर निजामाचे राज्यांत अद्याप चालू आहे. शिवाय जगदेवरावास "रुस्तुमराव" असा किताब मिळाला.

लखूजीजाधवरावाचे वेळेपासून शहाजींचें व लखूजींचें पटत नसे ही हकीकत मागें आलीच आहे. लखूजीनें १६२७ मध्यें

---

सारखें शहाजी व लुकजी यांना कांहीं कारणहि नव्हतें. प्रस्तुत लेखकानें या विषयावर सन १९२२ च्या भा. इ. सं. मंडळाच्या पुणें येथील संमेलनांतील निबंधांत सविस्तर चर्चा केली आहे.

खरे व इतर इतिहासकार यांनीं तारीफ केलेल्या शहाजींचें वर्तन सुद्धां याप्रमाणेंच किंबहुना जास्त धरसोडीचें होतें. त्यानें चारपांच वेळां मालक बदलले व पूर्वीच्या मालकाविरुद्ध लढाई केली. या वर्तनाचे संपादणीकरितां शिवाजीस सुद्धां बापाची वकीली करावी लागली. *"मनें-कडून हे आपले म्हणून मानावयाजोगी करणी वडीलांकडून घडली नाहीं" हें पितृभक्त शिवाजीस सुद्धां कबूल करावें लागलें.

* तंजावर शिलालेख पा. २७-२८ पहा.

राजवाडे राधामाधव. पा. ११३

शहाजीचा पराभव केला तेव्हां जिजाबाईस टाकून शहाजीस पळून जावें लागलें परंतु मानीं जिजाबाई माहेरीं गेली नाहीं. निजामशाही बादशहास कैद केल्यानंतर शहाजीनें एका मुलास गादीवर बसवून गडबड केली होती. परंतु मोंगलांतर्फेचे सरदार मोहोबतखान व महालदारखान त्यांनीं त्यांचा पराभव करून त्या गडबडींत जिजाबाईस मुलांबाळांसह कैद केलें.* धाकटा मुलगा शिवाजी यास त्यावेळीं तिनें पळवून दुसरीकडे लपविलें होतें व सुटका होतांच आणविलें असेंहि वर्णन आहे.

जगदेवरावानें मध्यस्थी करून जिजाबाईस मुलांसह सोडवून आणलें. या सुमारास कांहीं काळपर्यंत जिजाबाई बालशिवाजीसह शिंदखेडास राहिली.

जगदेवराव १६९० मध्यें दिल्लीस वारला. त्यानें लखुजीचा तिसरा मुलगा बहादुरजी यास दत्तक घेतलें होतें. त्याची शाखा किनगांवराजा येथें आहे. जगदेवरावानंतर त्याचें घराणें दिल्लीस राहिलें व त्याचा रुस्तुमराव हा किताब त्याचे वंशजाकडे चालू राहिला. मानसिंगराव रुस्तुमराव दिल्लीस असतांना त्याची मुलगी अंबिकाबाई ही दिल्लीस शाहूस दिली. तिचें नांव राजसबाई. या लग्नाची हकीकत मनोरंजक आहे.

औरंगजेबाचे मुलीचा आग्रह पडला कीं शाहूचें लग्न करून द्यावें. दिल्लीस मराठ्यांची वस्ती नाहीं. दिल्लीस त्यावेळीं फक्त दोनच मराठे आढळले. एक जाधवराव व दुसरे कण्हेरखेडचे पाटील शिंदे. (त्यांचें घराणें पुढें मराठेशाहींत उदयास आलें). पैकीं जाधवराव श्रेष्ठ व जुने सोयरे म्हणून त्यांची मुलगी पसंत झाली. सदरहू

* खरे यांचे मतें ही गोष्ट मुळींच घडली नाहीं, मालोजी व शहाजी पा. १८ परंतु ग्रांट डफ भा. १ पा. ८१ पहा.

लग्नांतील एक गमतीची गोष्ट बखरकारांनीं दिली आहे ती त्यांचेच शब्दांत देणें ठीक आहे.

" मग पादशहाचे मनांत आलें कीं, बेगमसाहेब यांचा पुत्र आमचा नातू पोतरा. मग पादशहा याचे मनांत आलें शिवाजीमहाराज याचें लग्न करावें म्हणोन एक मोठा येवन पठाण सरदार होता, त्याची कन्या नेमस्त केली. ते समयीं झुलपुकार बेगमसाहेब व जोत्याची केसरकर वकील या उभयतानें पादशहास अर्ज केला कीं हा क्षत्रिय राजा आहे. त्यास मुसलमान करूं नये. असा पादशहास अर्ज केल्यावरून पादशहा यांनीं बेगमसाहेब व जोत्याजी केसरकर वकील यास सांगितलें कीं याचे कोणी जातभाई शरीरसंबधी येथें हिंदू कोणी असतील त्यांचा शोध करून मुलगी चांगली पाहून नेमस्त करावी. मग त्यांनीं रुस्तुमराव जाधवराव शिंदखेडकर हे पादशहाचे पदरीं दिल्लीस होते त्यांची कन्या वधू तिंचे नांव अंबीकाबाई ही पाहून नेमस्त केली. नंतर पादशहा यास बेगमसाहेब व केसरकर वकील यांनीं औरंगजेब पादशहास खबर दिली. मग पादशहा यांनीं शिवाजी महाराज याजवर दिवसादिवस मोठी कमाल मेहेरबानी करून हा आपले लेकीचा लेक म्हणून त्याचें लग्न पादशहा यांनीं आपण जातीनें उमे राहून बहुत द्रव्य खर्च करून सात बिघ्याचा मांडव घालून लग्न उच्छाह दिल्लीस मोठा शिवाजीमहाराज याचा केला. आणि जाधवराव यांनीं आपले दासीची मुलगी हीरूबाई ( वीरूबाई ) आंदण दिली. पुढें लग्नसमारंभ जाहल्यानंतर पादशहाचे भेटीस नवरानवरी न्यावयाची ती झुलपुकार बेगम व जोत्याजी केसरकर वकील यांनीं मसलत करून खासी नवरी होती तीस महालांत ठेवलें आणि त्याचे आलंकार वस्त्रंभूषणें वीरूबाईचे आंगावर घालून पदरास गांठी देऊन हीच नवरी म्हणोन कचेरीस नेली. असा सिधांत केला जर करतां आम्ही खासी नवरीस कचेरीस नेली तर पादशहा यांनीं आपलें तोंडांतील तांबूल घातल्यास नवरी बाटेल असें मनांत आणून मग शिवाजीमहाराज व वीरूबाई उभयतांस तुळातुळण ( ? ) पातशहाचे भेटीस नेली. समागमें बेगमसाहेब व जोत्याजीराव केसरकर वकील हे घेऊन गेले. नंतर पादशहा यांनीं दुरून पाहतांच

शाहूची ही बायको राजसबाई दिल्लीसच मरण पावली. दक्षिणेंत आली नाहीं. भाविक बखरकारानें दिलेलें बादशहाचें भविष्य खरें झालें.

लखूजीचा मुलगा अचलोजी जो दौलताबदच्या किल्लयांत दग्यानें मारला गेला त्याचा अज्ञान मुलगा सुजनसिंह ऊर्फ संताजी यास व अचलोजीचे बायकोस घेऊन जिजाबाईची आई म्हाळसाबाई ही जिजाबाईबरोबर पुणें प्रांती गेली होती व तिनें आपले कारभारी, आप्त व परिवाराहि नेला होता. शिवाजीनें मराठी राज्य स्थापिलें त्यांत त्याचे मातुलपक्षाचे वरील मंडळींनें भाग घेतला होता.

संताजी हा शिवाजीचा वडील भाऊ संभाजी याचा समवयस्क होता. ते दोघेहि शहाजीबरोबर कर्नाटकच्या लढाईंत गेले होते व तिकडील एका लढाईंत १६५३ चे सुमारास मारले गेले. या संताजीचा मुलगा संभाजी या शिवाजीच्या समकालीन होता. व त्याचे बरोबर सर्व कामांत मदतगार होता. संताजीचा नातू प्रसिद्ध धनाजी जाधव शिवाजीच्या तालमींत शिकलेला होता व संभाजीनंतर झालेल्या गडबडींत मराठी राज्याचें तारू सांभाळणाऱ्या लोकांत प्रमुख होता. ग्रांटडफनें लिहि-

---

पादशहा हा खुदाचा अवतार म्हणोन उभयतांकडे पाहतांच सांगितलें कीं शिवाजीमहाराज ही तुमची दूलण नव्हे. हें तुम्ही कृत्रिम केलें बरें असो. म्हणून जवळ बोलावून उजवे मांडीवर शिवाजीमहाराज यास बसविलें व डावे मांडीवर वीरूबाईस बसविली आणि उभयतांस दुवा दिला कीं हीच तुमची राणी. तुम्ही उभयतांनीं राज्य करावें. असा अंतःकरणापासून दुवा देऊन वस्त्रंभूषणें अलंकार देऊन उभयतांस आपले मकानास रवानगी करून दिली. मग औरंगजेब पादशहा याचे वरप्रदानें करोन त्या वीरूबाईनीं राज्यकारभार तेहतीस वर्षे केला"

त्याप्रमाणें मोंगलांचे घोड्यांस पाण्यांत दिसणारा धनाजी* जाधव हाच होता.

या घराण्यांतील पुढील दोन पुरुष चंद्रसेन व रामचंद्रराव पेशवाईंत निजामास मिळाले होते. बाळाजी विश्वनाथाशीं चंद्रसेनाचें वांकडे आल्यामुळें तो निजामाकडे गेला.

लखूजीच्या मुलांपैकीं वडील दत्ताजी याची म्हणजे अडगांवकराची शाखा विशेष प्रसिद्धीस आली नाहीं.

सर्वांत कनिष्ठ मुलगा राघोजी याची शाखा मात्र धनाजी रावाचे शाखेप्रमाणेंच प्रसिद्धीस आली. या शाखेंतील तिसरा पुरुष दत्ताजी हा मोंगलांतर्फे लढतांना कर्नाटकांत १६६४ मध्यें पडला. त्याचा मुलगा म्हणजे दुसरा रावजगदेव हा देऊळगांव येथील बालाजीच्या संस्थानाचा स्थापक ह्मणून मानला जातो. लखूजीच्या मागें या घराण्यांतील सर्वांत प्रसिद्ध पुरुष हाच होता. यानेंच† देऊळगांव

---

*धनाजी जाधवरावाचा लुकजीचे वंशाशीं संबंध जोडण्यास आधार फक्त मराठामित्रकारांचा "जाधवकुळाचा इतिहास" हा होय. परंतु त्यांनीं आधार दिला नाहीं. प्रसिद्ध ऐतिहासिक वाङ्मयांत अगर जाधवरावांचे बखरींत यास आधार नाहीं. परंतु नागपुरकर भोसल्यांची बखर पान २० यांत धनाजीस शाहूचे सोयरे व मामासाहेब म्हटलें आहे. रूस्तुमराव दिल्लीकर यांची मुलगी अंबिकाबाई दिल्यामुळें व सासऱ्यास मामा म्हणण्याची रीत असल्यामुळें कांहीसें संभवनीय आहे. पण रूस्तुमरावाचें धनाजीशीं भावाचें नातें येत नाहीं. एकंदरींत सर्व प्रकार संशयित आहे.

† पूर्वीं हें देवळी नांवाचें खेडें होतें तेथें रावजगदेव यानें आपल्या वंशांतील रासोजी नांवाच्या दासीपुत्राच्या हातून गढी, वाडे व पेठा वसवून त्याचें मोठें शहर केलें. हा रासोजी राजे बाजीरावाचा दासीपुत्र पुढें प्रसिद्धीस आला तो नव्हे.

शहर वसविलें व ही शाखा सिंदखेडाहून देऊळगांवास राहण्यास आली व हल्लींहि आहे. दुसरे रावजगदेव यांस मोंगलांकडून छत्री, चवरी वगैरे राजचिन्हें मिळालीं होतीं. तो. इ० स० १६९९ मध्यें मरण पावला. रावजगदेव याचा दुसरा मुलगा राघोजी यांस सातारचे छत्रपति राजाराम यांची कन्या *अंबिकाबाई ही दिली होती. इचें सासरचें नांव अंबिकाबाई. लग्न मोठ्या समारंभानें पन्हाळ्यास झालें. त्यावेळीं राजारामाची बायको ताराबाई ही प्रमुख होती. अंबिकाबाईस आंदण दिलें त्यांत शिंदखेड, साखरखेर्डे वगैरे गांवचे मोकाशाचे हक्क व मेहकर, लोणार, शिरपुर वगैरे गांवचे सरदेशमुखीचे हक्क दिल्याबद्दल राजपत्रें मिळाल्याचा बखरींत उल्लेख आहे.

मानसिंगराव, राघोजीराव वगैरे बंधु औरंगाबादेस रहात असत. तो सुभा व जहागिरी वगैरे त्यांचेकडे असत. त्यांची शहरांत हवेली असून, बाहेर जाधववाडी म्हणून ठिकाण होतें. बागबगीचे होते. हल्लींहि कायम आहेत.

शाहूचे कारकीर्दींत एकदां मराठ्यांनीं औरंगाबादेवर स्वारी केली.तेव्हां या चौघां बंधूंनीं चार हजार फौजेनिशीं तोंड दिलें परंतु सोयरेसंबंधामुळें त्यावेळीं लढाई न होतां औरंगाबाद मराठ्यांनीं लुटलें नाहीं.

इ. स. १७२४ मध्यें निजामुलमुल्क व दिल्लीपतीचा सरदार मुबारिजखान यांची साखरखेर्डा येथें जी लढाई झाली त्यावेळीं बादशहाकडून जाधवरावांस हुकूम आला कीं, तुम्ही स्वतः

---

*हिचें नांव अंबिकाबाई असें दिलें आहे तें तिचें सासरचें नांव असावें. राजारामाचे एका बायकोचेंहि नांव अंबिकाबाई होतें. मल्हार रामराव चिटणीसकृत थो. राजाराम यांचे चरित्र पा. ९२ जाधवरावांची हस्तलिखित बखर.

जाऊन मुबारिजखानास मदत करावी. त्याप्रमाणें राघोजी हा सैन्यासह मोंगल सैन्यास जाऊन मिळाला व त्या लढाईंत तो हजर होता. तो मोठ्या शिकस्तीनें लढला व लढतां लढतां पडला. त्यानें निजामुल्मुल्काच्या सैन्याची फारच खराबी केली. शिवाय पूर्वीचा आपले हाताखालचा असून इतर सरदारांप्रमाणें हा आपणांस न मिळतां दिल्लीचे सरदारास मिळाला हा राग; यामुळें याचीं मुलें माणसें धरून घरदार लुटण्याकरितां निजामुल्मुल्कानें शिंदखेड व औरंगाबादेवर लष्कर पाठविलें परंतु राघोजीची आई दुर्गाऊ, बायको अंबिकाबाई व पुत्र मानसिंग उर्फ बाबजी यांस आगाऊ बातमी लागून ते पळून साताऱ्यास गेले. शाहू राजानें त्यांना आश्रय देऊन त्यांचा योग्य मरातब ठेविला. बाबजी हा अल्पवयी होता. शाहूस पुत्रसंतान नसल्यामुळें या बाबजीचा त्यास विशेष लळा होता. त्यास घेऊन तो एका ताटांत भोजन करी. कांहीं दिवस गेल्यावर शाहूनें निजामुल्मुल्क याजकडेस औरंगाबादेस वकील पाठवून जाधवांची सर्व जहागीर खुली करून घेतली. त्यानंतर दुर्गाऊ ही परत जाऊन पैठणास राहिली. अंबिकाबाई व बाबजी साताऱ्यासच राहिले.

शाहू मेल्यानंतर बाबजी हा ताराबाईचे पक्षाचा मोठा आधार झाला. रामराजास अटकेंत ठेवण्यास व पेशव्यांशीं विरोध करण्यांत व ताराबाईच्या सर्व कारस्थानांत हा प्रमुख होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणें ताराबाई वागे. पेशव्यांचे विरुद्ध नागपूरकर भोंसल्यांची मदत मागण्यास ताराबाईनें त्यालाच पाठविलें होतें. शेवटीं पुण्यास इ. स. १७५१ मध्यें नानासाहेब पेशव्यांचा व ताराबाईचा तह झाला त्यामुळें त्यांचें भांडण मिटलें व पेशव्यांचा मेहुणा त्रिंबकराव मामा पेठे यानें मोठ्या युक्तीनें बाबजीस तारा-

बाईच्या कारभारांतून *काढलें. आपलें आतां कांहीं चालत नाहीं असें पाहून तो परत औरंगाबादेकडे गेला व पुन्हां पेशव्यांस त्याचा त्रास झाला नाहीं.

या शाखेंतील अखेरचे प्रसिद्ध पुरुष राजे बाजीराव हे होते. हे औरंगाबादेस रहात असत व निजामाचे दरबारांत यांचें मोठें वजन होतें. निजामाचे मुलखांतील व वऱ्हाडांतील या घराण्याचें सर्व उत्पन्न यांचे वेळेपर्यंत या घराण्यास मिळत असे इ. स. १८९१ मध्यें यांचेवर एक संकट आलें व त्यांत ते सफाई बुडाले. राजे बाजीराव औरंगाबादेस रहात असत व त्यांच्या हाताखालीं अरब लोकांचें लष्कर असे. त्या लष्कराची व इंग्रजी सबसीडियरी सैन्याची लढाई होऊन त्यांत कांहीं इंग्रज अधिकारी मारले गेले. त्यावरून राजे बाजीराव यांचें सर्व वतन जप्त करून त्यांस दौलताबादेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें व पार्लमेंटपर्यंत प्रकरण जाऊन त्यांचें सर्व वतन खालसा झालें. राजे बाजीरावांचें म्हणणें कीं, वरील अरब शिपाई आपल्या कह्यांत नव्हते व या दंग्यांत आपला कांहीं संबंध नव्हता त्यांचा पगार तुंबल्यामुळें ते त्यांचेवरच उलटले होते.

जानेफळ, फत्तेखेर्डा या गांवच्या व इतर पाटीलकीचीं वतनें व खेर्डा येथील जहागीर या वेळेपर्यंत जाधवरावांकडे होतीं तीं खालसा झालीं. इतर तीन शाखेचीं वतनें कायम आहेत. देऊळगांवचे शाखेची बहुतेक इस्टेट सावकाराचे कर्जांत गेली आहे.

राजे बाजीराव कैदेंतच १८९९ मध्यें दौलताबादेच्या किल्ल्यांत मरण पावले. त्यांची बायको राणी अहिल्याबाई व तिचे

---

* सरदेसाई मध्य. भा. २ पा. २७८, २८४.
राजवाडे खंड ६ ले. २७६ वगैरे.

भाऊ रायबागचे देसाई यांनीं बाजीरावाचा मुलगा मानसिंगराव हा लहान असल्यामुळें त्याचे तर्फे कारभार सुरू केला. या पुढील जाधव घराण्याचा इतिहास म्हणजे एक दुःखाची कहाणी आहे. यांत मुख्य भाग देऊळगांव येथील प्रसिद्ध श्रीबालाजीचे संस्थानाशीं येतो.

देऊळगांवचे बालाजीची मूर्ति लहान असून पंचधातूची व अंगुष्टमात्र उंच आहे देवळाची जागाहि तशीच लहान आहे. हें देवस्थान इतकें महत्वास येईल अशी त्या स्थापकांचीहि कल्पना नव्हती. प्रसिद्ध रावजगदेवराव यानें या मूर्तीची स्थापना केली.* लौकरच हें देवस्थान अत्यंत भरभराटीस आलें. देव तेजस्वी असून नवसास पावणारा आहे अशी आसपासच्या शेंकडों कोसांत भाविक लोकांची खात्री आहे. विशेषतः व्यापारी लोक नफ्यावर शेंकडा कांहींतरी रक्कम काढून देवाचे खात्यांत जमा करतात व आश्विन मासांत यात्रेचे वेळीं दर्शनास येऊन ती देवाचे दुकांनीं सरकार देण्यापेक्षांहि जास्ती काळजीनें पटवितात. याप्रमाणें दरसाल नुसते [illegible]चे दहाबारा दिवसांत सव्वालक्षापेक्षां जास्त रक्कम येत असे. [illegible]ला कानगी असें म्हणतात. हल्लींसुद्धां पन्नास साठहजार रुपये यात्रेचे वेळीं येतात- शिवाय इतर वेळीं येतात ते निराळे.

---

*राव जगदेव यास गिरीच्या बालाजीची भक्ति विशेष. त्यास दृष्टांत झाल्यावरून त्यानें काशीहून विद्वान ब्राह्मण आणून मूर्तीची स्थापना केली आपलें मूळगांव शिंदखेड येथेंहि याच मुहूर्तावर दुसरी बालाजीची मूर्ति बसविली व मुहूर्त न चुकावा म्हणून देऊळगांवापासून शिंदखेडापर्यंत माणसें बसविलीं. तरी शिंदखेडच्या स्थापनेचा मुहूर्त साधला नाहीं व तो देव गरीबच राहिला. त्यास वस्त्रें सुद्धां देऊळगांवच्या बालाजीकडून जातात व त्याच्या गरीबीचें हें एक कारण सांगण्यांत येतें.

हें संस्थान २००।३०० वर्षेंपर्यंत देऊळगांव येथील हरीसा रामासा नांवाच्या लाड जातीच्या गृहस्थाच्या घराण्याच्या ताब्यांत होतें. लाड ही जात वऱ्हाडांत सावकारी करणारी हिंदुधर्मापैकीं एक वरच्या दर्जाची जात आहे व त्या जातींतील लोक धनिक, व वजनदार आहेत. विशेषतः हरीसानें व त्याचा आजा नवलसा यांनें बरीच मेहनत करून शिंदे, होळकर, भोंसले वगैरे संस्थानिकांकडून संस्थानाकरितां उत्पन्नाच्या सनदा करून घेतल्या व एकंदरींत संस्थान बरेंच नांवारूपास आणलें. हरीसाचीं पुणें; हैदराबाद वगैरे सर्व मोठमोठ्या ठिकाणीं दुकानें होतीं. राजे बाजीराव औरंगाबादेस राहून निजामाचे राज्यांतील जहागिरी व वतनदारीची व्यवस्था पहात असे. व धाकटाभाऊ रामचंद्रराव हा देऊळगांवास रहात असे. हरीसाचे सत्तेचा केळस झाला असतां जाधवरावांचे मनांत या धनिक संस्थानाची व्यवस्था आपले हातीं यावी असें आलें व त्यांनीं हरीसावर दावा मांडला कीं हरीसा आमचे तर्फे आमचा कारभारी म्हणून संस्थानची व्यवस्था पहात होता. वास्तविक संस्थानचे मालक आम्ही. व याचे पुष्ट्यर्थ हरीसाचा एक करारनामा त्यांनीं दाखविला. सदरहू दाव्याचा निकाल राजे यांचे तर्फे होऊन संस्थानची व्यवस्था राजे यांचेकडे आली. ( १८६८ ). मात्र राजे यांची स्वतंत्र खानगी मालकी नाहीं पण धार्मिक सार्वजनिक संस्थान आहे. संस्थापक नात्यानें राजे यांस व्यवस्था करण्याचा मात्र अधिकार आहे असें ठरलें.

---

१ कांहीं काळपावेतों बालाजीच्या दर्शनापेक्षां हरीसाचें दर्शन जास्त दुर्लभ झालें होतें. हरीसाचा शेवट फार वाईट झाला. त्याचें दिवाळें निघून तो अन्नास मोताद झाला व हालांत मरण पावला.

राजे यांचेकडे संस्थानची व्यवस्था आल्यापासून संस्थानचे पैशाची राजरोस लूट सुरू झाली. राजा मानसिंग अज्ञान असल्यामुळें राणी अहिल्याबाईचे भाऊ व दुसरे नातलग संस्थानचे पैशावर चैन करीत असत. आपले औरंगाबादचे खानगी नौकरांचे पगार संस्थानांतून खर्चीं पडल्याची व आपल्या नातलगांस संस्थानांतून वर्षासनाच्या सनदा दिल्याचींहि उदाहरणें आहेत. राजे बाजीरावाचे वेळीं सर्व जहागीरहि जप्तींत होती.

रासोजी या नांवाचा बाजीरावाचा दासीपुत्र होता. त्यानें हैदराबादेस खटपट करून मोंगलाईंतील जहागीर सोडविली व तो मानसिंगास घेऊन देऊळगांवास येऊन राहिला. त्याचें वाढतें वजन अहिल्याबाई व तिचे बंधूंस न आवडून त्यांचें भांडण सुरू झालें. त्यांत इ. १८६९ दिसेंबरांत विषप्रयोग होऊन रासोजीचा शेवट झाला. त्यांत देसाईबंधू व अहिल्याबाइ गुरफटलीं गेली. देसाईबंधू यांजवर आरोप शाबीत होऊन त्यांना काळे पाण्याची शिक्षा झाली. परंतु अहिल्याबाइनें लाखोंरुपये संस्थानच्या पैशांतून खर्च करून हैदराबादेस अपील करून त्यांस सोडाविलें. रासोजी अत्यंत लोकप्रिय होता. त्याचा पोवाडा त्या बाजूस प्रसिद्ध आहे.

राजे बाजीराव यांचा बंधु रामचंद्रराव हाहि मरण पावला होता. यामुळें अहिल्याबाई व देसाईबंधू यांची चैन सुरू झाली परंतु इतक्यांत राजे मानसिंगराव सज्ञान होऊन त्यानें सर्व कारभार हातांत घेतला व देसाई बंधूंचें कांहीं चालेनासें झालें. अहिल्याबाईनें औरंगाबादेस मोठ्या थाटानें मानसिंगरावाचें दुसरें लग्न केलें परंतु लग्नापासून १५-१६ दिवसांत तोहि मरण पावला. त्याला देसाई बंधूंचे तर्फे विषप्रयोग केल्याचा जबरदस्त संशय होता. (१८७८).

**मानसिंगरावाची** पहिली बायको **कोंडाबाई** इला त्याचे मृत्यूनंतर तीन महिन्यांनीं मुलगा झाला. त्याचें नांव **बाजीराव** ठेवलें.

कायदेशीर मालक **बाजीराव** व त्याची कायदेशीर पालनकर्ती आई **कोंडाबाई** झाल्यामुळें अहिल्याबाईचें व कोंडाबाईचें भांडण सुरू झालें. अहिल्याबाईचा एक भाऊ **रामचंद्रराव** हाहि प्रसंग पाहून **कोंडाबाईस** मिळाला. व दुसरा भाऊ **गोविंदराव अहिल्याबाईस** धरून राहिला. कोर्टांत दोघांनींहि संस्थानाचे लाखों रुपये या भांडणांत खर्च केले. **कोंडाबाई** मरण पावली व **अहिल्याबाई** कायदेशीर पालनकर्ती बनून सर्व व्यवस्था तिचे हातीं आली. **रामचंद्ररावा**-सहि विषप्रयोग झाला.

**बाजीराव** वयांत आल्यावरहि आपल्या हातून न जावा म्हणून **गोविंदराव** व **अहिल्याबाई** यांनीं एक युक्ति योजिली. **गोविंद-रावाची** मुलगी **यमुनाबाई** हिचें लग्न **बाजीरावाशीं** करून दिलें. **गोविंदरावानें** तो पूर्ण आपल्या कह्यांत रहावा म्हणून त्यास घराबाहेरहि जाऊं देऊं नये. तो अत्यंत स्त्रैण व व्यसनीं बनला. **गोविंदरावाचा** व **अहिल्याबाईचा** कारभार मनसोक्त चालला.

**बाजीराव** सज्ञान झाल्यावरहि हाच प्रकार चालला. संस्थानचे पैशाची अफरातफर फार झाली. इतकें उत्पन्न असून संस्थानास कर्ज. सावकारांचे हुकूमनामे होऊन यात्रेच्या वेळीं कानगीच्या हांड्यांवर जप्त्या बसूं लागल्या. ज्याच्या हातीं पडेल त्यानें पैसा लांबवावा अशी स्थिति चालली. शेवटीं १९०४ मध्यें गांवचे मुख्य लोक जमून त्यांनीं सार्वजनिक नात्यानें राजावर कोर्टांत दावा लावला कीं हें संस्थान राजाची खानगी मिळकत नसून सार्वजनिक आहे व राजांचे कारकीर्दींत अफरातर चालली आहे तर राजाची व्यवस्था काढून संस्थान सर्व लोकांतर्फें पंचांचे

ताब्यांत मिळावें. त्यावरून १९०४ सालीं संस्थान कोर्टानें आपल्या ताब्यांत घेतलें व दाव्याचा निकाल होईपर्यंत सरकारी रिसीव्हिर नेमला. त्यांतच अफरातफरीबद्दल कांहीं लोकांस शिक्षाहि झाल्या.

१९०६ मध्यें राजे बाजीराव औरंगाबादेस एकाएकीं निवर्तले. व त्यांचे वारसाबद्दल वाद सुरू झाला. राजे रामचंद्रराव यांचे नातू राजे दत्ताजीराव एका पक्षास व राजे बाजीराव यांचे पुत्र म्हणविणारे राजे आनंदराव दुसरे पक्षास. हा वाद कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपांत अद्याप कोर्टांत आहे सबब या संबंधानें तूर्त कांहीं लिहितां येत नाहीं.

सार्वजनिक दाव्याचा निकाल अंशतः राजांच्या व अंशतः लोकांचे विरुद्ध होऊन असें ठरविण्यांत आलें कीं संस्थान राजांचें खानगी नाहीं तरी व्यवस्था पाहण्याचा हक्क त्यांचाच आहे. त्यांनीं पैशाची अफरातफर करूं नये एवढा बंदोबस्त मात्र करण्याचा उद्देश आहे.

हल्लीं संस्थान कोर्टमार्फत नेमलेल्या पंचांच्या ताब्यांत आहे व ही व्यवस्था राजे आनंदराव यांचे अज्ञानपणापर्यंत अगर दत्ताजीराव व आनंदराव यांचे दाव्यांचा अखेर निकाल लागून वारस कोण हें ठरेपर्यंत चालण्याची आहे. परंतु कांहीं जरी झालें तरी राजांना देवस्थानाचे पैशाची पूर्वीप्रमाणें अफरातफर करण्याची संधी मिळणार नाहीं, इतका बंदोबस्त होण्यापुरती योजना ठरावांत झाली आहे.

जाधवरावांचे घराण्याची माहिती थोडक्यांत वर दिली आहे. शिंदखेड, देऊळगांवराजा, जानेफळ या गांवीं व किनगांवराजा

अडगांवराजा व मेहुणें या गांवीं त्यांच्या वैभवाच्या खुणा अद्याप आहेत. शिंदखेड येथें लखूजी जाधवाचे वेळचा पडका महाल आहे व त्यास रंगपंचमीचा महाल ह्मणतात. दुसऱ्या एका महालांत हल्लीं मराठीशाळा आहे. रावजगदेव यानें चारलक्ष रुपये खर्चून बांधलेला तलाव, व त्यांचे कांठचा बंगला अद्याप आहे. तलावाचें पाणी या बंगल्याच्या आंतून भोंकें ठेवून बाहेर गांवाकडेस काढलें आहे व बागाईतास दिलें आहे. बंगल्याच्या आंतील रचना निव्वळ कादंबरीतील वर्णनाप्रमाणें आहे. जाधवांच्या हातचीं अप्रतिम आंब्याचीं झाडें शिंदखेडास व मेहुण्यास आहेत. शिंदखेड येथें काळाकोट ह्मणून मजबूत किल्ला बांधण्याचें काम जगदेवरावानें सुरू केलें होतें. त्यांतील मोठमोठ्या दगडास शिसें पाजून सांधे जोडलेले आहेत. त्यावेळचे बादशहाचे डिटेक्टिव्ह म्हणजे "अकबारनवीस" यांनीं गुप्त बातमी दिल्यामुळें बादशाही हुकमावरून जगदेवरावास हें काम बंद करावें लागलें.

देऊळगांवास जाधवांनीं नळाचें पाणी आणण्याचा प्रयत्न केला आहे. या घराण्यांतील रावजगदेव यांची धाकटी बायको तुळजाऊ इची समाधि "मोतीसमाध" या नांवानें प्रसिद्ध असून ती गांवाच्या पूर्वेकडेस असून इमारत फार चांगली आहे. जवळच शंकरसागर नांवाची बारव आहे. जानेफळची गढी यांचे हातची आहे. खेड्यास "मानसिंग वेस" म्हणून एक दरवाजा आहे तो रावजगदेव याचा वडील मुलगा मानसिंग याचे हातचा आहे.

शिंदखेडास गांवाबाहेर रामेश्वराचे देवळाजवळ लुकजी जाधवराव व त्याचे इतर वंशज यांची एक घुमटाचे आकाराची समाधि आहे. जवळच त्याच घराण्यांतील सोरबाबाई नांवाचे एका सतीची समाधि आहे. तीवर शक १६२३ दिला आहे. घुमटाचे दरवाज्यवर पुढील लेख आहे.

" सिंदखेडचे देशमुख भानवसे विठोजी सौ. अर्धांगी ठाकराई राणी यांचे पोटीं जाधवराव लुकजी महाराज अर्धांगी गिरजाई राणी यांचे पोटीं पुत्र दत्ताजी व अचलाजी व राघोजी राजे व जाधवराव लुकजी पुत्र दत्ताजी यांचे पोटीं यशवंतराव राजे व लिंबाजी."*

तंजावरच्या बृहदीश्वर शिलालेखांत¶ लुकजीच्या सात पुत्रांचीं नांवें दिलीं आहेत तीं:—

**उदारराम, विश्वनाथ, अचल, बाहदार, दादाजी, राघव व जसवंत.**

यांपैकीं उदारराम म्हणजे उदाराम. हें इतिहासप्रसिद्ध माहूरकर देशमुखांचे घराण्यांतील मूळपुरुषाचें नांव. हा लुकजी जाधवरावाचा समकालीन होता व शिलालेखाच्या ज्या लढाईच्या वर्णनांत वरील पुत्रांचीं नांवें आलीं आहेत त्याच लढाईत उदाराम हजर होता व त्याचें नांव त्याच पक्षांत येण्याचें तें चुकून लुकजीच्या पुत्रांच्या यादींत पडलेलें दिसतें. या नांवाचा पुत्र लुकजीस नव्हता. विश्वनाथ याचें नांव इतरत्र आढळत नाहीं.

---

*या लेखांतील भानवसे हें चुकीचें दिसतें. भानवसे हा लुकजीचा बारगीर होता. लुकजीच्या बायकोचें नांव गिरजाबाई इतरत्रहि आढळतें. जिजाबाईची आई म्हाळसाबाई म्हणून बखरींत उल्लेख आहे. खरे यांचें मतें म्हाळसाबाई व गिरजाबाई एकच. (मालोजी व शहाजी पा. १९) पण असें मानण्याचें कारण नाहीं. मोठ्या माणसांना त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें दोन किंवा तीन बायका असणें कठीण नाहीं. जाधवरावांच्या बखरींत यमुनाबाई म्हणूनहि लुकजीच्या बायकोचें नांव आहे.

¶ तंजा. शिलालेख पान १०-११.

यशवंत हा लुकजीचा नातू व दत्ताजीचा पुत्र. लुकजीचा पुत्र नव्हे. अचळ म्हणजे अचलोजी, बाहदार हा बहादुरजी जो भुतजी ऊर्फ जगदेवराव यास दत्तक दिला तो. दादाजी म्हणजे दत्ताजी व राघव हा राघोजी या नांवानें प्रसिद्ध होता. अचलोजी, राघोजी व यशवंतराव हे इ. १६३० मध्यें लुकजीबरोबर दौलताबादेच्या किल्ल्यांत मारले गेले.* दत्ताजी हा खंडागळ्याचे भांडणांत मारला गेला. बहादुरजी दिल्लीस जाऊन राहिला.

जाधवरावांचा वंशवृक्ष खालीलायक असा जुळत नाहीं.मराठा मित्रकार दळवी यांनीं मराठा कुळांचा इतिहास यांत दिलेला वंशवृक्ष बराचसा चुकीचा आहे.

प्रस्तुत लेखकाचे मतें साधारणपणें विश्वसनीय असा वंशवृक्ष पुढें दिला आहे.

---

* Badshahnama I. 308.

## २

## वाशीमचे राजे उदाराम.

जाधवरावांचे खालोखाल महत्वाचें इतिहासप्रसिद्ध घराणें राजे उदाराम यांचें आहे. हें घराणें त्याच्या महत्वाचे मानानें हल्लीं प्रसिद्ध नाहीं त्यामुळें शिवरायाच्या बखरींतील एका महत्वाच्या भागावर आतांपर्यंत उजेड पडला नव्हता. शिवाजीवर स्वारी करणाऱ्या शूर "रायबागीण" नांवाच्या वीर स्त्रीचें हें घराणें आहे इतकें सांगितलें म्हणजे इतिहासज्ञांस त्याचें महत्व कळून येईल.

उदाराम घराण्याचे मूळपुरुष उद्धवराव नांवाचे होते त्यांचे वडिलांचें नांव रामजीपंत म्हणून त्यांचें नांव कागदोपत्रीं उद्धवरामजी असें होतें त्याचा अपभ्रंश होत होत हल्लींचा "उदाराम" हा अपभ्रंश झाला आहे. उद्धवराव हे मूळचे वाशीम येथें राहणारे ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण. त्यांची कुळकर्णीपणाचीं दोनतीन वतनाचीं गांवें वाशीमच्या जवळ सावरगांव, चिवरें वगैरे असत. उद्धवराव त्या वेळच्या संस्कृत, फारशी, अरबी वगैरे विद्यांत तरबेज होते. गरीबीमुळें व आंगच्या तरतरीमुळें ते दिल्लीस गेले. त्यांचे मामा ते वेळेस दिल्लीस दिवाणी खात्यांत अकबराचे वेळेस कोठें नोकर होते. त्यामुळें सरकारी कामांत उद्धवरावाचा प्रवेश होऊन त्यांची हुशारी अकबराचे ध्यानांत येऊन त्यानें त्यास वाढवीत वाढवीत अखेरीस पांच हजारांची मनसब दिली (हिजरी सन १००१. इ. स. १५९२).

अनंत कृत भक्तरहस्य नांवाच्या* हस्तलिखित ग्रंथांत उदाराम याचे गरिबीचें व भाग्योदयाचें वर्णन केलें आहे कीं तो

* भक्तरहस्य अ० ९.

इतका गरीब होता कीं पाटलाचे घरचें ताक मागून आणीत असे. एके दिवशीं पाटलाचे बायकोनें त्याचे निरुद्योगीपणाबद्दल निर्भर्त्सना करून ताक नाहीं म्हणून सांगितलें व ताकाकरितां नेलेला तांब्या त्यास फेंकून मारला. त्यामुळें आपले स्थितीबद्दल वैताग येऊन तो शिरपूर येथें वंजारी कुणबी जातीचा पद्माजी नांवाचा सत्पुरुष होता त्यास शरण गेला व आपली दुःखद काहणी त्यास सांगितली. त्यानें त्यास ठेवून घेतलें. पुढें त्यास 'शहरास' जाऊन रोजगार कर म्हणजे तुझा भाग्योदय होईल असें सांगितलें. (त्यावेळीं या भागांत शहर हें नांव औरंगाबादेस होतें.) उदाराम औरंगाबादेस जाऊन एका अमीराचे दिवाणाचे घरीं नोकर राहिला व त्याचे बरोबर दिल्लीस गेला. तेथें बादशहानें अमीरास सांगितलेली कांहीं कामगिरी यानेंच केली अमीरानें त्याबद्दल बादशहास सांगितलें. त्यावरून बादशहानें समोर बोलावून उत्तेजन दिलें व पुढें वाढवीत वाढवीत बादशहानें माहूर पासून वाशीम पर्यंत बावन्न चावड्यांची देशमुखी. पांचहजारांची मनसब व नौबत, निशाण वगैरेची सनद देऊन दक्षिणेंत पाठविलें.

लष्करी कामांतहि उद्धवरावानें फार बहादुरी दाखविली शहाजहानाचे वेळींहि उद्धवरावास (ज्यास नंतर उदाजीराम असें कागदोपत्रीं व सर्वत्र नांव पडलें) वरील दोन्ही सरकारांतील देशमुखी वतन व कांहीं जहागिरी मिळाल्या.

उदारामाची मुख्य कामगिरी जहांगीराचे कारकीर्दींत दिसून येते. फारशी ग्रंथकारांच्या आधारावरून असें दिसतें कीं, लखूजी जाधवरावाप्रमाणेंच हा प्रथम निजामशाहींत मलिकंबराचे हाताखालीं प्रसिद्धीस आला. इ. स. १६१७ मध्यें मलिकंबराविरुद्ध राजपुत्र खुर्रम (पुढें शहाजहान) यानें जी लढाई चालविली त्यांत तो मलिकंबराचा पक्ष सोडून * बादशाही पक्षास मिळाला. शहाजहाना-

बरोबर तो दिल्लीस गेला व इतर यशस्वी सरदारांबरोबर त्यासहि जहांगिरानें गौरवून अधिकार दिला.

शहाजहानानें पुढें जहांगिराविरुद्ध बंड करून त्याच्याशीं युद्ध केलें त्यांत लुकजी व उदाराम हे दोघेही शहाजहानाच्या पक्षास होते. परवीज व महाबतखान यांनीं शहाजहानाचा पाठलाग केला असतां सर्व मुसलमान सरदार शहाजहानाचा पक्ष सोडून बादशाही पक्षास मिळाले परंतु लुकजी व उदाराम हे शेवटपर्यंत शहाजहानाचे पक्षास राहिले. त्यांनीं आपले मुलखांत त्यास ठेवून सर्व तऱ्हेची मदत देऊन पुढें रवाना केलें.

माहूरचा किल्ला उदारामाचे ताब्यांत असून तेथेंच तो रहात असे. त्यानें शहाजहानास माहूरास नेलें. शहाजहानानें तेथें आपलें जडजवाहीर, हत्ती, घोडे वगैरे सामान ठेवलें व आपण आपली बायको मुमताजमहाल व पुत्र दाराशुको, सुजा व औरंगजेब यांसह तेथें कांहीं दिवस राहून नंतर तैलंगणांतून बंगाल्याकडे गेला.§

यामुळें लुकजी व उदाराम यांजवर बादशहाची गैरमर्जी झाली व पुढें शहाजहानाचें बंड मोडल्यावर लुकजी व उदाराम यांना अनुक्रमें आपला पुत्र व बंधु यांस ओलीस ठेवून पुढें नौकरी करावी लागली.

दक्षिणेंत उदाराम हा मोंगलांतर्फे एक महत्वाचा सरदार समजला जात असे व मोठमोठ्या महत्वाच्या कामगिरीवर त्याची रवानगी होत असे, शहाजहानाच्या कारकीर्दीत मलिकंबराविरुद्ध निजामशाहीचीं मोंगलांचीं लढाई चालली तेव्हां मोंगलांतर्फे लुकजी जाधवराव व राजे उदाराम हे लढत होतें. इ. स. १६२४ मध्यें भातवडी जवळ मलिकंबरानें मोंगल लष्करावर रात्रीं छापा घातला

---

* Beniprasad's Jahangir. P. 284.

§ Jahangir, Beniprasad. p. 317.

इतका गरीब होता कीं पाटलाचे घरचें ताक मागून आणीत असे. एके दिवशीं पाटलाचे बायकोनें त्याचे निरुद्योगीपणाबद्दल निर्भर्त्सना करून ताक नाहीं म्हणून सांगितलें व ताकाकरितां नेलेला तांब्या त्यास फेंकून मारला. त्यामुळें आपले स्थितीबद्दल वैताग येऊन तो शिरपूर येथें वंजारी कुणबी जातीचा पद्माजी नांवाचा सत्पुरुष होता त्यास शरण गेला व आपली दुःखद काहणी त्यास सांगितली. त्यानें त्यास ठेवून घेतलें. पुढें त्यास 'शहरास' जाऊन रोजगार कर म्हणजे तुझा भाग्योदय होईल असें सांगितलें. (त्यावेळीं या भागांत शहर हें नांव औरंगाबादेस होतें.) उदाराम औरंगाबादेस जाऊन एका अमीराचे दिवाणाचे घरीं नोकर राहिला व त्याचे बरोबर दिल्लीस गेला. तेथें बादशहानें अमीरास सांगितलेली कांहीं कामगिरी यानेंच केली अमीरानें त्याबद्दल बादशहास सांगितलें. त्यावरून बादशहानें समोर बोलावून उत्तेजन दिलें व पुढें वाढवीत वाढवीत बादशहानें माहूर पासून वाशीम पर्यंत बावन्न चावड्यांची देशमुखी. पांचहजारांची मनसब व नौबत, निशाण वगैरेची सनद देऊन दक्षिणेंत पाठविलें.

लष्करी कामांतहि उद्धवरावानें फार बहादुरी दाखविली शहाजहानाचे वेळींहि उद्धवरावास (ज्यास नंतर उदाजीराम असें कागदोपत्रीं व सर्वत्र नांव पडलें) वरील दोन्ही सरकारांतील देशमुखी वतन व कांहीं जहागिरी मिळाल्या.

उदारामाची मुख्य कामगिरी जहांगीराचे कारकीर्दींत दिसून येते. फारशी ग्रंथकारांच्या आधारावरून असें दिसतें कीं, लखूजी जाधवरावाप्रमाणेंच हा प्रथम निजामशाहींत मलिकंबराचे हाताखालीं प्रसिद्धीस आला. इ. स. १६१७ मध्यें मलिकंबराविरुद्ध राजपुत्र खुर्रम (पुढें शहाजहान) यानें जी लढाई चालविली त्यांत तो मलिकंबराचा पक्ष सोडून * बादशाही पक्षास मिळाला. शहाजहाना-

बरोबर तो दिल्लीस गेला व इतर यशस्वी सरदारांबरोबर त्यासहि जहांगिरानें गौरवून अधिकार दिला.

शहाजहानानें पुढें जहांगिराविरुद्ध बंड करून त्याच्याशीं युद्ध केलें त्यांत लुकजी व उदाराम हे दोघेही शहाजहानाच्या पक्षास होते. परवीज व महाबतखान यांनीं शहाजहानाचा पाठलाग केला असतां सर्व मुसलमान सरदार शहाजहानाचा पक्ष सोडून बादशाही पक्षास मिळाले परंतु लुकजी व उदाराम हे शेवटपर्यंत शहाजहानाचे पक्षास राहिले. त्यांनीं आपले मुलखांत त्यास ठेवून सर्व तऱ्हेची मदत देऊन पुढें रवाना केलें.

माहूरचा किल्ला उदारामाचे ताब्यांत असून तेथेंच तो रहात असे. त्यानें शहाजहानास माहूरास नेलें. शहाजहानानें तेथें आपलें जडजवाहीर, हत्ती, घोडे वगैरे सामान ठेवलें व आपण आपली बायको मुमताजमहाल व पुत्र दाराशुको, सुजा व औरंगजेब यांसह तेथें कांहीं दिवस राहून नंतर तैलंगणांतून बंगाल्याकडे गेला.§

यामुळें लुकजी व उदाराम यांजवर बादशहाची गैरमर्जी झाली व पुढें शहाजहानाचें बंड मोडल्यावर लुकजी व उदाराम यांना अनुक्रमें आपला पुत्र व बंधु यांस ओलीस ठेवून पुढें नोकरी करावी लागली.

दक्षिणेंत उदाराम हा मोंगलांतर्फे एक महत्वाचा सरदार समजला जात असे व मोठमोठ्या महत्वाच्या कामगिरीवर त्याची रवानगी होत असे, शहाजहानाच्या कारकीर्दींत मलिकंबराविरुद्ध निजामशाहीचीं मोंगलांची लढाई चालली तेव्हां मोंगलांतर्फे लुकजी जाधवराव व राजे उदाराम हे लढत होतें. इ. स. १६२४ मध्यें भातवडी जवळ मलिकंबरानें मोंगल लष्करावर रात्रीं छापा घातला

* Beniprasad's Jahangir. P. 284.

§ Jahangir, Beniprasad. p. 317.

त्यांत लुकजी व उदाराम यांचें लष्कर असावध असल्यामुळें फार नासाडी झाली. खुद्द उदाराम व लुकजी घोड्यावर स्वार होऊन कसे तरी जीव घेऊन पळाले.

उद्धवरावांचे पूर्वीं मोगलांतर्फें हरचंदराय नांवाचा एक रजपूत सरदार या प्रांतावर होता पण त्याचे कारकीर्दींत मुलूख ओसाड झाला होता व तो बंडखोर निघाल्यामुळें त्यास कामावरून काढून टाकलें होतें. या वेळच्या एका सनदेंत उल्लेख आहे कीं “ घरांची आबादानी व शेतीची लागवण यांची दिवसेंदिवस वाढ करीत असावी” यावरून मुलखाचे स्थितीची कल्पना येईल.

हरचंदराय मुलखाचा ताबा सोडीना. शेंवटीं उदाराम यास लढून त्याचा मोड करून ताबा घ्यावा लागला. नंतरसुद्धां बरेच दिवस तो व साथीदार दांडगाई करीतच होते.

उद्धवरावानें याप्रमाणें चाळीस वर्षें पराक्रमानें कारभार करून तो हिजरी सन १०४२ इ. स. १,३२ मध्यें आपल्या वयाच्या ६६ वे वर्षीं मरण पावला.

उद्धवराव मरण पावल्यावर त्याचा पुत्र जगजीवनराव हा त्याचे जागीं आला.—इ. स. १६३७ं

**जगजीवनराव**

मध्यें बादशाहानें उदारामाचें सर्व वर्तन मनसब, जहागीर वगैरेची सनद देऊन खिलत (वस्त्रें) व घोडा विठोजी वकील याचेबरोबर जगजीवनरावास पाठविला. इ. स. १६३७ चे सनदेंत मूळ पुरुष उदाजीराव हें नांव सर्व वंशजांनीं लावावें असा अधिकार या घराण्यास मूळ पुरुषाचे सन्मानार्थ दिला आहे. तेव्हांपासून या घराण्यांतील सर्व पुरुष आपल्या नांवापुढें ‘राजे उदाराम’ असें पद लावतात व लेखी सहीहि तशीच करतात.

जगजीवनराव हा फारच कर्तबगार निघाला व त्याची योग्यता वाढून त्याचे अधिकारहि वाढले. १६४९ व १६५२ मध्यें दोन सनदा आणखी मिळून त्यास २ कोटी ७० लक्ष दामाचें उत्पन्न मनसबगिरीबद्दल मिळालें व त्या प्रमाणांत लष्करहि त्याचे हाताखालीं राहिलें. माहूर वगैरे २३ महालांचे दिवाणी फौजदारी सर्व अधिकार त्यास मिळाले. औरंगजेब दक्षिणेंत आला असतां जगजीवनरावास मुद्दाम बऱ्हाणपुरास भेटीस बोलावून औरंगजेबानें त्याचा बहुमान केला. जगजीवनराव यानें औरंगाबादेस जगजीवनपुरा नांवाचा पुरा वसाविला तो अद्याप कायम आहे. त्यासच उदाराम पेठ असेंहि म्हणतात. यां पुऱ्याचे बाबतींत मोआझिम याची सनद आहे. जगजीवनराव हे इ. स. १६५८ मध्यें मरण पावले.

जगजीवनराव माहूरचे किल्ल्यावर रहात असे. त्यामुळें इतिहासांत सर्वत्र "माहूरचे देशमुख" असा या घराण्याचा दाखला सांपडतो. तो किल्ला जगजीवनरावानें दुरुस्त करून उत्तरेकडेस चिनी दरवाजा नांवाचा रंगीत दरवाजा बांधला. दौलताबादेच्या किल्ल्यावरील चिनी महालाप्रमाणें त्यास घोटींव रंग दिला होता. तो महाल अद्याप कायम आहे.

बाबूराव

बाबूराव हा जगजीवनरावाचा मुलगा. त्यासहि त्याचे बापाचे वेळचे सर्व अधिकार मिळाले. यानें आपले सनदेंत देशमुखी व पाटीलकीबद्दल सर्व तपशीलवार वर्णन लिहून घेतलें देशमुखीबद्दल ऐनकाळीचे उत्पन्नावर शेंकडा १० रु. रुसूम व १० नेतन जमीनइनाम. प्रत्येक परगण्यास एक गांव जहागीर व एका गांवचें पाटीलकीचें वतन. पाटीलकीबद्दल त्या गांवचे जमिनीचे उत्पन्नावर शेंकडा

पांच रुपये रुसूम व दरशेंकडा ५ नेतन जमीन इनाम. देशमुखीचे दर गांवास दोन खंडी धान्य व एक पासोडी येणेप्रमाणें सनदेंत उल्लेख आहे. ही सनद ११०५ हिजरीची (इ.१६९३) आहे. बाबूराव लहान होता हें पाहून रजपुतांनीं उचल खाल्ली. जगजीवनरावाची बायको ही * गोषांतील स्त्री असूनहि फार शूर होती. तिनें आपले लोकांस "बाहिणीची लज्जा राखा" असें उत्तेजन देऊन व त्याची खूण ह्मणून निशाणास चोळी लावून लष्कर उभें केलें व रजपुतांवर स्वारी करून त्याचा पराभव केला व त्यास कायमचें हांकून लावलें.

**रायबागीण**

या पराक्रमाची खबर दिल्लीस गेल्यावर औरंगजेबास या बाईचें फार कौतुक वाटलें व त्यानें तिचा गौरव करून तिला "पंडिता" व "रायबागन" असे दोन किताब दिले. पुढें ती इतिहासांत "रायबागन" "रायबागीण" या नांवानेंच प्रसिद्ध राहिली. रायबागन याचा अर्थ "स्त्रीशार्दूल" असा आहे. शिवभारत नांवाच्या शिवकालीन ऐतिहासिक संस्कृत काव्यांत व तंजावरच्या शिलालेखांत इला 'राजव्याघ्री' असें म्हटलें आहे. रायबागन या शब्दाचें हें शब्दशः केलेलें सुंदर भाषांतर आहे. या किताबाबद्दलची सनद हि. १०६९ (इ. १६५८) ची आहे.

शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळेस या रायबागणीस औरंगजेबानें शिवाजीवर पाठविलें होतें. तिनें शिवाजीचे मुलुखांत बराच धुमाकूळ घातला. समुद्रकांठापर्यंत ती आपल्या सैन्यासह गेली व बरेच दिवस कोंकण पट्टींत ती मराठे लष्कराशीं लढत होती. शाहिस्तेखानाच्या मदतीस दिलेल्या सरदारांत रायबागणीचें नांव आहे. करतलबखान व रायबागण व अमरसिंग वगैरे

* उदाराम घराण्याचे सर्व शाखांत अद्यापहि पडद्याची चाल आहे.

सरदार कल्याण, पनवेल ओलांडून पलीकडे गेले होते. शिवाजी-नें करतलबखानास अडविलें तेव्हां रायबागिणीनें त्यास सल्ला दिला कीं या वेळेस तूं युद्ध केल्यास शिवाजी तुला डोंगरांत गांठून सर्व सैन्यासह मारील. तर तूं शिवाजीस शरण जाऊन जिवानिशीं सुटून घाटावर निघून जा. या सल्ल्याप्रमाणें तो सर्व द्रव्य घेऊन घाटावर सुटून आला.*

इ. स. १६७० मध्यें शिवाजीनें सुरत शहरावर हल्ला केला हें कळतांच औरंगजेबानें औरंगाबादेहून मोहोबतखान व दाऊद-खान या दोन सरदारांस ८–१० हजार सैन्यानिशीं शिवाजीवर हल्ला करण्यास पाठविलें व तेच वेळेस या रायबागिणीच्या पूर्वीच्या पराक्रमाचीहि त्यास आठवण येऊन त्यानें तिलाहि या सैन्यास मदत करून शिवाजीवर आपले पांच हजार सैन्यानिशीं हल्ला करण्याचा हुकूम केला. रायबागन इनें आपलें पांच हजार लष्कर तयार केलें. व आपला पुत्र अज्ञान बाबूराव यास बरोबर घेऊन तिनें शिवाजीचे लष्करावर हल्ला केला.

रायबागन ही पाठीमागून गेली होती व शिवाजीनें आपल्या गनिमीच्या अटोकाट धोरणानें मोहोबतखानाचे लष्कराची व रायबागिणीच्या लष्कराची गांठ पडूं दिली नाहीं. सुरत शहर-लुटून शिवाजीनें एक निवडक तुकडी रायबागिणीवर पाठविली. त्यांत बेरटीकर देशमुख व इतर निवडक योद्धे होते. त्यांस हुकूम केला कीं रायबागिणीशीं मैदानांत युद्ध न देतां ती "उमरखिंड" नांवाच्या खिंडींतून येतांच तिला खिंडींत अडवून धरावी व तेथें लढाई द्यावी. तोंपर्यंत मोहबतखानाचे सैन्याचा समाचार घेऊन स्वतः शिवाजी रायबागिणीचे लष्करावर येणार होता. रायबा-

* बृहदीश्वर शिलालेख पान. ४१, ४६

गिणीस मार्ग तोच असल्यामुळें तिला तेथून जावेंच लागलें. शिवाजीच्या लष्करानें शिवाजी येईपर्यंत तिला फक्त अडवून धरलें. शिवाजीनें मोहबतखानाचे लष्कराचा पराभव करून तो त्वरेनें उमरखिंडींत आला व स्वतः हल्ला चालवून त्यानें रायबागिणीच्या लष्कराचा पराभव केला. रायबागिणीचे दोन हजार घोडे व पांच हत्ती शिवाजीच्या हातीं सांपडले. त्याचप्रमाणें स्वतः रायबागीण व तिचा पुत्र बाबूराव हे शिवाजीच्या हातीं सांपडले. रायबागिणीचें शौर्य पाहून कोणासहि कौतुकच वाटेल मग शिवाजीसारख्या गुणग्राही व उदार पुरुषास तिच्याबद्दल अत्यादर वाटला यांत नवल काय? त्यानें रायबागिणीस व तिच्या मुलास बहुमोल वस्त्रें देऊन त्यांचा फार सन्मान केला व त्यांस त्यांच्या उरलेल्या सैन्यासह परत वऱ्हांडात पाठवून दिलें. रायबागीण इनेंहि आपणास शिवाजीची धर्माची कन्या म्हणवून * घेतलें.

---

*वरील प्रसंगाचें वर्णन शिवकालीन बखरींत पुढीलप्रमाणें आहेः—
मल्हार रामराव चिटणीस यांचें श्रीशिवछत्रपति महाराज
यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र पान. ७२–७३.

" सुरतेवर स्वारी महाराजांची गेली हें औरंगाबादेस कळल्यावर तेथील अधिकारी यानें मोहबतखान व दाऊतखान याजला आठदहा हजार फौजेनिशीं सुरतेचे कुमकेस पाठविलें. उदाराम माहूरकर याची स्त्री रायबागीण व त्यांचे लेक †जगजीवन हेहि पांचचार हजार फौजेनिशीं दुसरे मार्गें आले. अशा दोन्ही फौजा दोन्ही वाटांनीं चालून आल्या. सारे लोक पुढें गेले होते आपण सडे फौजेच्या तोंडावर गेले. त्यांत रायबागीण जात होती त्यामागें बेरटीकर देशमुख, राजपाटील, यशवंतराव, रामजी, विश्वा-

†मागें पान १७७ टीप * पहा. बखरींत जगजीवनचे ऐवजीं बाबूराव व उदारामाचे ऐवजीं जगजीवन पाहिजे. उदाराम हें पुढें घराण्याचें नांव झालें म्हणून ही चूक झाली आहे.

मागील पृष्ठावरून चालू

सराव हतनूरकर, दिनकरराव बागराव यांस हुकूम महाराजांनीं केला जे "रायबागीण उमरखिंडींतून जाऊं न द्यावी, बुडवावी" असें सांगून. रवाना केलें. त्यांनीं जाऊन वाट बंद केली. आपण मोहोबतखानावर गेले खेडास म्हणून शहर आहे त्यानजीक गांठ पडली. युद्ध दोन प्रहरपर्यंत होऊन मोगली फौज घोडी घालून महाराजांनीं मोडली. चार हजार घोडे. दहा हत्ती पाडाव केले. लूटहि फार सांपडली. कांहीं लोक पळून गेले. त्यांचा पाठलाग न करतां सुरतेची :लूट निभावून जाणें, रायबागीण आली तिचें पारिपत्य करणें " म्हणून तसेच चालून आले. बागराव वगैरे सरदार यांनीं माने यांचे तळावर जाऊन तेथून रायबागीण येतां खिंडींत अडविली होती तों महाराज येऊन पावले. वेढा देऊन लढाई करून रायबागीण बुडविली. दोन हजार घोडीं पांच हत्ती पाडाव केले. रायबागीण, तिचा लेक जगजीवन यांस धरलें. ती शरण आली. याप्रमाणें महाराज सुरतेची स्वारी करून दोन फौजा लुटून यश घेऊन शत्रूवर दहशत घालून लूटसुद्धां सुरक्षित रायगडीं येऊन पावले. मार्गीं येतां रामनगरहि मारलें. महाराजांनीं रायबागीण ईस बहुत मान देऊन सोडून दिली.

## मराठी दप्तर रुमाल पहिला पान ६४.

मोहबतखान दाऊदखानाचा शिवाजीनें पराभव केल्यावर " शिवाजी फत्ते करून चालले तों पुढें उदाराम वजीर दिल्लीवाले मोंगलाकडील, त्याचा लेक जगजीवन ( मुळांत नांव डांगजीवन चुकीनें दिलें आहे तें मोडी बखरीवरून बाळबोध करतांना लिहिणाराचे चुकीनें झालें आहे )व उदेरामाची बायको रायबागीण व बाजे सरदार मोंगल लोक ५००० चालोन वोहोळखिंडीस ( चिटणीस. उमराखिंडींत ) आले. त्यासहि राजे यांनीं झुज दिले आणि रायबागीणीस कोंडिलें त्यावर तिनें दांतीं तृण धरोन राजियासी बोलली कीं मी तुमची धर्मांची कन्या म्हणवीती मग तीस राजीयांनीं कौल देऊन आजी होत (!) धर्मांची वाट करून सोडून दिली. नतर राजे माघारे राजगडास आले.

बाबूराव

या घराण्यावर अखेरपर्यंत बादशाहाचा विश्वास व मर्जी असे. औरंगजेबानें बाबूरावास सोनेरी नकशीची "शहानामा" या ग्रंथाची प्रत नजर केली होती, ती अद्याप या घराण्याचे ताब्यांत आहे. बाबूराव याचे वेळेस या घराण्यास वंशपरंपरा "राजे" हा किताब दिल्याबद्दलचीहि एक सनद मिळालेली आहे. (इ. स. १६७० हिजरी १०८०)

बाबूराव ११११ हिजरींत (इ. स. १७००) मरण पावले. बाबूरावानंतर त्यांचा पुत्र व्यंकटराव कारभार करूं लागला.

पुढें त्यांचा मुलगा शंकरराव हा कर्ता निघाला व तोच दरबारी कामें करूं लागला. त्याचे वेळेस दिल्लीचें घराणें मोडकळीस येऊन दक्षिणेंत निजामुलमुल्क व पेशवे यांचा जोर सुरू झाला. शंकररावानें तिन्ही दरबारांकडून सनदा मिळविल्या.

शंकरराव

मराठ्यांचे कमाविसदार वऱ्हाडांत सर्व ठिकाणीं असत व ते आपला हक्क वसूल करण्याकरितां मोंगलांच्या रयतेस मात्र त्रास देत असत. उदाजीरामाच्या घराण्यांतील लोक बादशाहाच्या सनदेप्रमाणें उदाजीराम या नांवानेंच दस्तखत (सही) करीत असत. म्हणून बाळाजी बाजीराव पेशव्यांचा कमाविसदार कृष्णाजी अनंत यानें मृत पुरुषाच्या नांवानें सही करण्यास हरकत घेतली. शंकरराव आपला हट्ट सोडीनात. शेवटीं उदारामांची सर्व जहागीर व वतन पेशव्यांनीं जप्त केलें. शेवटीं शंकरराव यांनीं आपला वकील पुण्यास पाठवून व मूळ सनद दाखवून आपला सर्व हक्क स्थापन करून घेतला. बाळाजी बाजीराव यानें त्याच सनदेंत लिहून दिलें कीं उदाजीराम या नांवानें यांनीं केलेली सही मान्य करावी.

शंकरराव मरण पावल्यानंतर त्याचे पुत्र उद्धवराव मालक झाले. त्यांस सहा पुत्र होते. उद्धवरावापासून पुढें या घराण्यांतील सर्व पुरुष आपलें वडिलोपार्जित वतन उपभोगीत आले आहेत. त्यांनीं कांहीं विशेष कर्तबगारी केल्याचें दिसत नाहीं.

उद्धवरावाचे सहा पुत्र होते, त्यांच्या वाटण्या इ. स. १८०७ शके ( १७२९ ) मध्यें झाल्या. त्यांच्या शाखा पुढीलप्रमाणें आपल्या गांवीं राहिल्या व अद्याप आहेत.

१ जगजीवनराव—वाशीम व मालेगांव ( एक शाखा शिरपुर येथेंहि राहते ).
२ खंडेराव— कळमनुरी ( मोंगलाई ).
३ त्रिंबकराव— पुसद. ( भोजलें व गुंज ).
४ जगदीशराव— वारें ( ता० वाशीम ). व अनसिंग.
५ रघुनाथराव— उमरखेड.
६ नारायणराव— माहूर.

या सर्वांमध्यें देमुशखींचे परगणे, पाटिलक्या व जहागीरी वांटलेल्या आहेत. हल्लीं वडील शाखेचे प्रतिनिधि गोपाळराव हे आपले जहागिरीचें गांव मालेगांव येथें राहतात.

राजे उदाराम या घराण्यांतील दोन सनदांचा तर्जुमा नमुन्या-दाखल सोबत दिला आहे. त्याचप्रमाणें त्यांचा वंशवृक्षहि दिला आहे.

# राजे उदाराम यांचा वंशवृक्ष.

उदाजीराम
|
जगजीवनराव=रायबागन
|
बाबूराव
|
व्यंकटराव
|
शंकरराव
|
उद्धवराव

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जगजीवनराव | खंडेराव | त्रिंबकराव | जगदीशराव | रघुनाथराव | नारायणराव |
| (मालेगांव) | (कळमनुरी) | (पुसद) | (वारें) | (उमरखेड) | (माहूर) |
| हल्लीं गोपाळराव | | | | | |

## ३

## एलिचपूरचे नवाब. *

वऱ्हाडावर राज्य करण्यांत प्रत्यक्ष भाग असलेल्या राज्यकर्त्यांत एलिचपूरच्या नबाबांचा वंश प्रमुख आहे. हे नबाब नांवापुरते आपणास हैद्राबादच्या निजामाचे मांडलिक म्हणवीत असत परंतु बहुधा हे स्वतंत्रपणें वागत असत व यामुळें नाकापेक्षां मोतीं जड असे झाले होते. ह्या नबाबांचा अंमल कित्येक वेळां तर माहुर, बाळापुरापासून उत्तरेस आकोट एलिचपुरासुद्धां सातपुड्याच्या पायथ्यापर्यंत असे. म्हणजे वऱ्हाडाचा निम्मे भाग यांचे ताब्यांत असे. परंतु शेवटीं सत्ता कमी होत होत सध्यांच्या एलिचपूर तालुक्याएवढ्या प्रदेशावर राहिली होती. निजामानें त्यांच्या वर आपले कित्येक सरदारहि पाठविले होते परंतु या नबाबांनीं त्यांची केव्हांहि डाळ शिजूं दिली नाहीं. तरी ह्या नबाबांनीं उघडपणें स्वतंत्र होण्याची खटपट कधींच केली नाहीं व मराठ्यांच्या युद्धानंतर ते निजामाच्या वतीनें इंग्रजांस साह्य करून मराठ्यांशीं लढले. उत्तर वऱ्हाडाच्या स्थितींत या नबाबांच्या अमलांत बराचसा परिणाम झाला आहे. व यामुळेंच या घराण्याचा इतिहास महत्वाचा आहे.

एलिचपूरचा पहिला नबाब इस्मायलखां याचा बाप सुलतानखां व त्याचा बंधु सरमसखां हे दोघे मोंगलांच्या कारकीर्दींत अफगाणिस्थानांतून प्रथम नागपुरास आले व दिल्लीच्या बादशहाचा मांडलिक बखतबुलंद नावाचा गोंड राजा होता त्याच्या

---

* ह्या घराण्याचा बहुतेक इतिहास "तवारीखे अमजदी" नांवाच्या फारशी पुस्तकावरून घेतला आहे.

पदरीं नौकर राहिले. पुढें या बंधूंनीं कांहीं दिवस घोड्यांचा व्यापार केला व औरंगजेबाच्या कारकीर्दींत हे एलिचपुरास आले. तेथें दिल्ली-च्या बादशहाकडून अलीमर्दानखां नांवाचा नाजीम (सुभेदार) होता त्याजजवळ हे बंधु राहिले. व हळू हळू आपल्या कर्तबगारीनें वाढत वाढत ते इतके प्रसिद्धीस आले कीं त्यांनीं एलिचपुरच्या दक्षिणेस आणि पश्चिमेस जमीन खरेदी करून दोन पुरे वसविले व त्यांस आपल्या नांवांवरून "सुलतानपुरा" व "सरमसपुरा" अशीं नांवें दिलीं. हे पुरे अद्याप त्याच नांवांनीं प्रसिद्ध आहेत. यानंतर दिल्लीच्या गादीवर महमदशहा असतांना दक्षिणेंत निजामुल्मुल्क यानें बाळापूर, फत्तेखर्डा बऱ्हाणपूर वगैरे ठिकाणीं लढाया करून व मोंगल व मराठे यांच्या एकत्र झालेल्या सैन्याचा पराभव करून आणि हैद्राबाद व वऱ्हाड प्रांतांतील बराच भाग काबीज करून हैद्राबाद येथें इ. स. १७२४ त स्वतंत्र गादी स्थापिली. इ. स. १७५१ च्या सुमारास हैद्राबादच्या गादीवर नासीरजंग असतांना त्याचा भाऊ असफजहां हा एलिचपुरास होता. त्यावेळेस त्याची सुलतानखां व सरमसखां ह्या बंधूंशीं ओळख झाली. व त्यां[illegible] सुलतानखांचा पुत्र इस्मायलखां यास आपल्या बरोबर ने[illegible] इस्मायलखां निजामाच्या पदरीं राहून त्यानें कित्येक लढायांत आपलें शौर्य दाखविल्यावरून निजामाची त्यावर मर्जी बसली. एका लढाईत तर इस्मायलखाच्या मांडीत गोळी लागली होती त्यामुळें तो पुढें जन्मभर लंगडाच राहिला. त्याच्या शूरपणावरून निजामानें त्यास सात हजाराची मनसब दिली व पुढें लौकरच इ. स. १७५८ त इस्मायलखास एलिचपूरची सुभेदारी दिली व बाळापूर, शिंदखेड, माहूर वगैरे मुलूखहि त्याच्याच हाताखालीं ठेविले. इस्मायलखाचे हातीं एवढी सत्ता येतांच तिचा उपयोग पुष्कळ

लोकोपयोगी कामें करण्याकडे केला. इमादशाही राज्यांतील एलिचपुरचा किल्ला लहान होता व त्याच्या बाहेर सर्व शहर अफाट पसरलें होतें. या शहराच्या रक्षणास कांहीं साधन नव्हतें म्हणून इस्मायलखांनें शहरा भोवतीं मजबूत तट बांधविला. एलिचपुराप्रमाणेंच त्यानें स्वतःच्या देखरेखीखालीं बाळापूरचा किल्ला बांधविला. एलिचपूर येथील दूलारहिमानशहा याच्या सुंदर कबरीच्या नगरखान्याकरितां इस्मायलखांनें जवळचा कांडली हा गांव जाहगीर दिला होता. ती जाहगीर अद्याप त्या संस्थानाकडे चालू आहे

तटाच्या किल्ल्याच्या खर्चामुळें इस्मालखांस हैद्राबादेस कांहींच पैसा पाठवितां आला नाहीं. हैद्राबादच्या कित्येक दरबारी मंडळींस इस्मायलखांचा हा उत्कर्ष पाहवत नव्हताच. त्यांनीं पैसा न पाठविण्याचा व किल्ला व तट बांधण्याच्या हेतूचा विपर्यास करून निजाम व त्याचा दिवाण यांस समजाविलें कीं इस्मायलखांचें हें कृत्य धोक्याचें आहे. दुसरी गोष्ट अशीं कीं नागपुरकर मुधोजी भोंसले व इस्मायलखां यांचा फार स्नेह होता. त्यामुळें बहुकाळ वेळां तो एलिचपुरास येत असे व ह्या गोष्टी गुप्त हेरांकडून हैद्राबादेस समजत असत. मुधोजी भोंसल्याच्या येण्या जाण्यानें दिवाणाचा संशय जास्ती दृढ झाला.

यावेळेस हैद्राबादच्या दरबारांत अत्यंत घोंटाळा असे व मुख्य दिवाण व कित्येक प्रसंगीं तर हलकेसलके सरदारसुद्धां निजामाच्या सल्ल्याशिवाय त्याच्या नांवानें वाटेल ती गोष्ट करण्यास धजत असत. निजामाचे प्रसिद्ध सरदारांपैकीं दोघेजण जफीरुद्दला धवसा व मीर मूसाखां रुकनुद्दवला हे इस्मायलखांचा फारच मत्सर करित असत. त्यांनीं निजामाचें मन इस्मायलखा विषयीं

कलुषित करून दिलें. नंतर मीर मूसाखां यानें निजामाच्या सांगण्यावरून इस्मायलखांस आपल्या सहीनें हुकूम लिहिला कीं 'तुम्ही जफीरुद्दवला यास एलिचपुरचें काम समजावून देऊन हैद्राबादेस निघून यावें म्हणजे येथें आल्यावर तुम्हांस दुसरी सुभेदारी देऊं' कित्येकांच्या सांगण्यावरून समजतें कीं हें पत्र मीरमूसाखां यानें निजामाच्या प्रत्यक्ष अनुमतानें लिहिलेंच नव्हतें. निजामाची सही नसलेलें व दिवाणाचे सहीचें पत्र पाहतांच इस्मायलखास फार राग आला व त्यानें उत्तर पाठविलें कीं 'खुद्द निजामाच्या सहीचा हुकुम आल्याशिवाय असल्या महत्वाच्या कामांत मी कोणाचेंहि ऐकणार नाहीं. या उद्दामपणाच्या उत्तरामुळें मीर मूसाखां व इतर अधिकारी यांना बराच त्वेष आला व त्यांनीं निजामास सांगून मीर मूसाखां व जफीरुद्दवला (धवसा) यांच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांना एलिचपुरास पाठविलें.

हें लष्कर बाळापुरावर आलें.तेथील किल्ल्यावर करीमखा नांवाचा पठाण इस्मायलखांनें आपले तर्फे नेमिला होता. त्यानें आपली लढण्याची ताकद नाहीं असें पाहून युक्तीनें हें संकट टाळलें त्यानें मीर मूसाखां यांस सांगितलें कीं एलिचपूर ताब्यांत घेतल्यास त्याबरोबरच त्याखालील मुलुखहि ताब्यांत असल्या सारखाच आहे. मग बाळापूर घेण्याची जरूर तरी काय? बाळापूर घेतल्यानें अथवा न घेतल्यानें तुमच्या एलिचपूरच्या मोहिमेंत कांहीं कमजास्ती होत नाहीं. नंतर हें सैन्य एलिचपुरच्या पश्चिम भागावर आलें. त्या भागावर तट पुरा झाला नव्हता व इस्मायलखांच्या मरणामुळें तो पुढेंहि अपुराच राहिला. ह्या बाजूनें त्यांनीं एलिचपुरावर एका कोसावरून गोळे फेकण्यास आरंभ केला. इस्मायखांनेंहि शहरा बाहेर सैन्यासह येऊन लढाई दिली. पहिले दिवशीं लढाई

सारखीच झाली. हें लष्कर इकडे आल्यावर हैद्राबादेस इस्मायलखांचा कोणी प्रबल शत्रु राहिला नव्हता. तेव्हां त्याचे कित्येक हितचिंतकहि दरबारांत होते. त्यांनीं पुष्कळ गोष्टी सांगून निजामाचें मन इस्मायलखानाकडे वळविलें. व त्याच्याकडून त्याच्या सहीचीं पत्रें देऊन दोन सांडणीस्वार एलिचपुरास रवाना केले. त्यांत मीर मूसाखां व इस्मायलखांसहि लढाई न करितां सल्ला करण्यास व मीर मूसाखा यास परत येण्यास लिहिलें. लढाईच्या पहिल्या दिवशींच्या रात्रींच हे स्वार एलिचपुरास येऊन पोहोंचले व त्यांनीं दोघांसहि पत्रें दिलीं. आपल्या मनाजोगें करावयास सांपडलें नाहीं यामुळें मीरमूसाखां यास फार वाईट वाटलें परंतु बाह्यात्कारें कांहीं न दाखवितां सलोख्यानें इस्मायलखांचा निरोप घेऊन तो परत हैदराबादेस गेला.

ह्याच सुमारास म्हणजे इ. स. १७७२ त नागपुरांत जानोजी भोंसले हा मरण पावला. त्यानें आपला भाऊ मुधोजी यांचा पुत्र दत्तक घेतला होता. तो लहान असल्यामुळें राज्याचा कारभार कोणीं करावा याविषयीं मुधोजी व त्याचा भाऊ साबाजी यांच्यामध्यें तंटा लागला. साबाजी यास जानोजीची स्त्री दर्याबाई ही अनुकूल होती. या भावांच्या कांहीं चकमकी झाल्या. मुधोजी व इस्मायलखां यांचा स्नेह होता हें मागें आलेंच आहे. मुधोजी इस्मायलखास मदत मागण्याकरितां एलिचपुरास आला. एकदां हे दोघे मित्र सायंकाळी मेण्यांत बसून जात असतां साबाजीनें पाठविलेल्या मारेकऱ्यांनीं संधी पाहून मुधोजीवर तरवारीचे वार केले. त्यास दोन जखमा झाल्या व त्या दुखण्यामुळें मुधोजी बरेच दिवसपर्यंत एलिचपुरास राहिला. नबाबाच्या पदरच्या हुशार

*शस्त्र वैद्यानें त्याच्या जखमा शिवल्या त्यास त्यानें दर टांच्याबद्दल एक मोहोर याप्रमाणें पैसे दिले. मुधोजी बरा झाल्याबर इस्मायलखांचें सैन्य घेऊन त्यानें साबाजीशीं लढाई केली व साबाजीस मारिलें व आपण राज्यकारभार पाहूं लागला.

मराठे व निजाम यांचें नेहमीचें वैर होतें. इस्मायलखां व मुधोजी यांच्या स्नेहासंबधीं बातम्या हैदराबादेस समजत असत. इस्मायलखांच्या शत्रूंनीं पुन्हा एकदां कंबर बांधली व इस्मायलखांचें आपला शत्रु जो भोंसले त्याशीं सूत असून तो त्याच्या साह्यानें स्वतंत्र होऊं पाहात आहे व आपल्या हुकमास सुद्धां जुमानीत नाहीं अशी त्याची खात्री करून दिली. त्याच वेळेच्या सुमारास मुधोजीनें पूर्वेकडील कांहीं प्रदेश बळकाविला होता यावरूनहि निजामास तें खरें वाटलें. व आपण स्वत: जाऊन भोंसल्याचा व इस्मायलखांचा बंदोबस्त करावा असा निश्चय करून हैदराबाद सोडून तो निघाला.

पूर्वीप्रमाणें हें लष्कर बाळापुरास आलें. किल्लेदारानें किल्ल्याच्या किल्ल्या निजामाकडे पाठविल्या. त्यानें त्या पुन्हां परत पाठविल्या. ते नंतर पुर्वेकडें भोंसल्यानें घेतलेला मुलूख काबीज करण्याकरितां निघाले. निजामाच्या लष्करानें आमनेरचा किल्ला सर केला पुढें भोंसल्याचा व निजामाचा तह ठरला. नंतर निजाम एलिचपुराकडे येण्यास निघाला. मार्गांत नेरपिंगळाई येथें इस्मायलखांच्या शत्रुद्वयापैकीं मीरमूसाखा यास कोणीं दग्यानें मारिलें व एकटा धवसा मात्र उरला. शत्रूचा अग्रणी मेल्यामुळें त्यांचा पक्ष खालावला. तेव्हां निजामाच्या लष्करांतील इस्मायलखांच्या कांहीं मित्रांनीं त्यास लिहिलें कीं तुम्हांविषयीं निजामाचें मन कलुषित झालें आहे परंतु स्वतां येऊन त्यांना भेटल्यास त्यांचें मन तुम्हांविषयीं शुद्ध

* यासंबंधी नागपूर बखरीतील वर्णन भाग ८ यांत पहा.

होईल, इस्मायलखांसहि हें पसंत पडून त्यानें आपला मुख्य कारभारी रामचंद्रपंत यास शहरचा बंदोबस्त ठेवण्यास सांगून आपण १२०० स्वार बरोबर घेऊन निजामास भेटण्यास निघाला व तळ काटसुरा येथें होता त्याचे नजीक येऊन दाखल झाला.

इकडे धवसा यास वाटलें कीं, इस्मायलखां निजामास भेटल्यास सर्वच गोष्टी फसतील तर त्याच्या आगोदर काय ती तजवीज केली पाहिजे. त्यानें निजामास सांगितलें कीं इस्मायलखां लढाईच्या तयारीनें सैन्यासह नजीक आला आहे तर मला सैन्यासह त्यावर जाण्यास सांगावें. निजामास हेंहि खरें वाटून धवसा यास सैन्यासह इस्मायलखांवर पाठविलें. इस्मायलखांस याचें नवल वाटलें परंतु शत्रु समोर येऊन उभा राहिल्यावर लढण्याशिवाय दुसरा उपायच राहिला नाहीं. निजामाचें सर्व सैन्य या बाराशें लोकांवर पडलें तेव्हां ते कोठवर टिकाव धरणार. लागलींच इस्मायलखांच्या सैन्याची दाणादाण झाली. इस्मायलखाच्या भोंवतीं पांच पंचवीस लोक मात्र राहिले. त्यावेळची अशी अख्यायिका फारशी इतिहासकार सांगतात कीं 'बहुतेक लोक पडल्यावर इस्मायलखानें आपला घोडा जफीरुद्दवला (धवसा)च्या हत्तीवर आवेशानें घातला. तेव्हां त्या चपल घोड्यानें त्या हत्तीवर इतकी उंच उडी घातली कीं कांहीं वेळपर्यंत त्याचे पुढले पाय हत्तीच्या डोक्यास लागले; तितक्या अवकाशांत इस्मायलखांनें आपल्या तेग्याचा असा जोराचा हात मारिला कीं अंबारीची एक दांडी तुटून तरवार धवशाच्या मानेवरून गेली. त्यानें मान खालीं वांकविली म्हणून त्यास इजा झाली नाहीं. नाहींतर जफिरुद्दवला ठार झाला असता. हें कृत्य इतक्या थोड्या वेळांत झालें कीं तें समजलें सुद्धां नाहीं व भोंवतालचे शिपाई, सरदार व स्वतः धव-

साहि कांहीं वेळपर्यंत आश्चर्यानें चित्रासारखा स्तब्ध राहिला. इस्मायलखां लागलींच घोड्यासह खालीं आला इतक्यांत एका सरदारानें आपला हत्ती जवळ आणून इस्मायलखास भाल्यानें टोंचून खालीं पाडिलें. नंतर त्याचे शिर कापून निजामाकडे पाठविलें, तेव्हां निजामासहि फार वाईट वाटलें.इस्मायलखांच्या शिल्लक राहिलेल्या लोकांकडून इस्मायलखांची सविस्तर हकीकत निजामास समजल्यावर त्यास फारच पश्चात्ताप झाला व धवसावरची त्याची मर्जी उडाली.

निजामानें इस्मायलखांचें शिर आपणाबरोबर एलिचपुरास आणिलें व तें मोठ्या सन्मानानें सरमस पुऱ्यांत पुरिलें. त्याची कबर अद्याप आहे. ही गोष्ट इ० स० १७७१ त झाली. इस्मायलखांस सलाबतखां व बहिलोलखां असे दोन पुत्र होते. निजामानें सलाबतखांस कांहीं जाहगीर देऊन त्यास आपणाबरोबर स्वारींत राहण्याची परवानगी दिली. तेव्हां सलाबतखां स्वारींत राहूं लागला, व बहिलोलखां एलिचपुरास राहून जहागिरीचें काम पाहूं लागला.

सलाबतखां १७९६–१८२५.

सलाबतखां हा शूर असून विशेषतः घोड्यावर बसणारा चांगला होता. दक्षिणेंत मराठशाहींत ज्याप्रमाणें साडेतीन शहाणे प्रसिद्ध असत त्याच प्रमाणें मोंगलाईत साडेतीन स्वार प्रसिद्ध असत.

त्यांपैकीं एक स्वार सलाबतखां हा होता. इ.स. १७९९ त निजाम व मराठे यांचीं खर्डा येथें लढाई झाली. त्यांत सलाबतखां हजर होता. *प्रथम दिवशीं लालखां नांवाचा एक शूर बलुची सरदार,

* डफ.भाग २७ पहा.खालील वर्णन डफच्या वर्णनाशीं बरोबर जुळतें.

कर्नूलचा नबाब अलिफखान व सलाबतखां या त्रिवर्गांनीं फार शौर्यानें लढून मराठे लष्कराचा सेनापति परशराभाऊ पटवर्धन यावर हल्ला केला व लालखान यानें भाऊस जखमी केलें. इतक्यांत भाऊचा पुत्र हरीपंत यानें धांवून लालखानास ठार केलें. व मराठ्यांसहित मोठ्या आवेशानें पठाणांवर हल्ला केला. त्या वेळेस सलाबतखां व अलिफखान ह्यांनीं मोठ्या नेटानें सांवरून धरिलें नसतें तर त्याच दिवशीं निजामाचा मोड झाला असता. परंतु ह्या दोघांनीं पुन्हा एकदां हल्ला करून इतकी लगट केली कीं जरीपटकेवाला बाबूराव फडके हा निशाण घेऊन मागें पळूं लागला. त्यास शिंद्यांचा सरदार जिवबा बक्षी यानें थांबविला. अखेर निजामाचा या लढाईत पराभव झाला.

सलाबतखां याप्रमाणें इकडे गुंतला असतां एलिचपुरची सुभेदारी रिकामी झाली. तेव्हां निजामानें या घराण्याची कामगिरी स्मरून सलबतखांचा भाऊ बाहिलोलखां यास ती दिली. परंतु हा फारच चैनी व उधळ्या असल्यामुळें याजकडून हैदराबादेस पैसा [illegible]लींच जात नसे. म्हणून यास लवकरच कामावरून काढून टाकलें [illegible]र दुसरे कांहीं सुभेदार होऊन सलाबतखांस १७७६ त तें काम दिलें.

सलाबतखांच्या कारकीर्दींत इंग्रज व मराठे यांचें युद्ध सुरू झालें. निजामानें इंग्रजांशीं पूर्वींच तह केलेला असल्यामुळें त्यानें "सबसीडियरी सिस्टिमच्या" कलमाप्रमाणें ठेवलेली आपली फौज इंग्रजांच्या मदतीस दिली व शिवाय राजा महिपतराम व नबाब सलाबतखां यांस इंग्रजांना मदत करण्याचा हुकूम केला. ह्याप्रमाणें सलाबतखां वेलस्लीच्या सैन्याला अडगांवाजवळ मिळाला अडगांवच्या लढाईत तो हजर होता व नंतर हें सर्व

लष्कर एलिचपुराहून गाविलगडचा किल्ला घेण्यास गेलें. गाविलगड घेतल्यावर तेथें बरीच लूट सांपडली. त्यापैकीं बरीच संपत्ती सलाबतखानानें उंट व घोड्यांवर लादून एलिचपुरास आणिली गाविलगड घेतल्यानंतर सलाबतखां वेलस्ली साहेबासह एलिचपुरास आला. वेलस्लीनें जखमी लोक बरे होईपर्यंत तेथेंच मुक्काम केला. वेलस्लीच्या सैन्यामधील दोन इंग्रज त्या जखमांमुळें एलिचपुरास मरण पावले, त्यांच्या कबरी तेथील सरकारी दवाखान्याच्या पाठीमागें अद्याप आहेत.

सलाबतखानानें वेलस्लीशीं चांगला स्नेह केला व बऱ्याच धोरणानें वागून चांगलें वजन व अधिकार संपादन केला. ह्याच्या वेळेस सर्व वऱ्हाड स्वतंत्रपणें निजामाच्या ताब्यांत आल्यामुळें हैदराबाद कांटिंजंट फौजेची छावणीहि कायमची एलिचपुरास आली. त्या पलटणी एलिचपूर शहारापासून तीन मैलांवर परतवाडा (एलिचपूरक्यांप) येथें ठेविल्या. सलाबतखां ह्यानेंहि आपल्या पलटणी इंग्रज कामगाराकडून शिकवून घेतल्या.

सलाबतखांच्या वेळेस वऱ्हाडांत शेखडल्ला नांवाचा ए[illegible] लुटारू प्रसिद्धीस आला. हा तंट्याभिल्लाचीच प्रतिमा होता. [illegible]नें मुळचा हिंदु असून पुढें मुसलमान झाला होता. त्याचें खरें ना[illegible] शेखदलेल असें होतें. हा लहानपणापासून फार खट्याळ असे तो लहान असतांनाच एका बोहऱ्याच्या घरीं नौकर राहिला. त्या बोहऱ्यानें शेखडल्लाकडून कांहीं चूक झाल्यास त्याच्या डोक्यावर मारावें. एकदां या मूर्तीनें आपल्या पटक्यांत कांटे टोचून ठेविले. बोहऱ्यानें पटक्यावर मारतांच त्याच्या हातास सर्व कांटे बोंचले. पुढें त्यानें त्यास काढून दिलें. नंतर तो प्रसिद्ध चित्तू पेंढारी याजकडे राहिला व त्याच्या धंद्यांत तरबेज होऊन नंतर पुष्कळ गोंड, भिल्ल

वगैरे लोक जमा करून सातपुड्यांत त्यानें ठाणें दिलें. ह्यानें सातपुड्याचा दक्षिणेचा व उत्तरेचा बराच प्रदेश हालवून सोडला. त्याची चलाखी, हुशारी व धैर्य विलक्षण होतें. तो बायकांच्या व गरीब लोकांच्या वाटेस कधींच जात नसे. शिंदे, एलिचपुरचे नबाब, भोंसले, अशीरगडचा किल्लेदार यांच्या फौजेस तर त्यानें कित्येक वर्षें चकविलें. कोणत्या तरी रूपानें ही स्वारी आपणास पकडण्यास आलेल्या लष्करांत येऊन भेट देऊन जाई व मागाहून ओळख देत असे. त्याजवळ एक स्त्री होती. तिनें त्यास निजला असतां फितुरीनें मारिलें. कोणी म्हणतात त्याच्या एका फितुरी साथीदारानें मारलें.

सलाबतखांच्या कारकीर्दींत फत्तेजंगखां नांवाचा मनुष्य फार प्रसिद्धीस आला. हा सलाबतखांचा मुख्य कारभारी होता. सलाबतखांनें आपल्या कारकीर्दींत शेवटीं शेवटीं राज्यांतून आपलें मन अगदीं काढून घेतलें व फत्तेजंगखांवर सर्व कारभार सोंपविला त्यामुळें त्याचें वजन फारच वाढलें. फत्तेजंगखां फारच हुशार, चाणाक्ष व धोरणी असे. ह्याच्या वेळेस कारभाराची व्यवस्था उत्तम प्रकारची होती. त्यानें लोकोपयोगी कामें बरींच केलीं. एलिचपूर शहरांत राजांच्या वेळेस चारपांच कोसांवरून आणिलेले पाण्याचे नळ असत. ते फत्तेजंगखांनें दुरुस्त केले व त्यांसच नवे नळ लावून शहरांतील सर्व भागांतील मुख्य मुख्य ठिकाणीं पाण्याचा पुरवठा केला. त्यांपैकीं एक मोठा हौद तेथें अद्याप आहे. हेच नळ आतां दुरुस्त करून जागजागीं नेले आहेत.

वरील गोष्टीमुळें फत्तेजंगखांबद्दल आदरबुद्धि उत्पन्न होण्यास हरकत नाहीं. परंतु त्याच्या कित्येक आपमतलबीपणाच्या कृत्यांमुळें त्याच्यावर त्या वेळचे बरेच लोक नाराज असत. फत्तेजंगखां शिया पंथाचा असल्यामुळें त्यानें त्या पंथाचा बराच प्रसार

केला. त्यामुळें सुन्नी पंथाचे पुष्कळ मोठमोठे लोक नाराज झाले. फत्तेजंगखांनें आपल्या दोन मुली सलाबतखांचे पुत्र इस्माइलखां व नामदारखां यांस दिल्या व आपला पुत्र गुलाब हसन अल्लीखां यास नबाबाची मुलगी केली, व याप्रकारें नबाबाच्या घराण्याशीं त्यानें संबंध जोडला. ह्यास पुढें फार महत्त्व आलें. फत्तेजंगखांनें नबाबाच्या वाड्याच्या शेजारींच आपला वाडा बांधिला. याचप्रमाणें पश्चिमेकडे सरमसपुऱ्याच्या बाजूस त्यानें एक नवीन पुरा वसविला व त्यास आपला दुसरा पुत्र आबासखां याच्या नांवावरून आबासपुरा हें नांव दिलें.

याप्रमाणें फत्तेजंगखाचें वजन वाढत जात जात तें इतकें वाढलें कीं खऱ्या नबाबास कोणींहि विचारीनासें झालें, व खुद्द नबाबहि त्यास भिऊन वागूं लागला. नबाबाचे पुत्र इस्मायलखां व नामदारखां हे आतां बरेच मोठे झाले होते. त्यांस हें पारतंत्र्य अगदीं असह्य झालें. हे दोघेहि फत्तेजंगखांचे जांवई. त्यांपैकीं इस्मायलखां हा बराच तामसी असल्यामुळें तो फत्तेजंगखांस मुळींच जुमानी[illegible] नसे व त्यांचें एकमेकांशीं मुळींच पटत नसे. याप्रमाणें चाललें अ[illegible] इस्मायलखां एकाएकीं मरण पावला. पुष्कळांचा संशय फत्तेजंग[illegible]नेंच त्यास मारविलें असा होता. नबाबाचा दुसरा पुत्र नामदारखा यानें आपल्या भावाचा हा परिणाम पाहून फत्तेजंगखांशीं विरोध करणें व्यर्थ आहे असें पाहून बाह्यतः त्याच्या कह्यांत राहूं लागला. परंतु आंतून हें शल्य कसें काढून टाकावें या खटपटींत तो होता. त्यानें निजामाचा दिवाण चंदूलाल यास ही हकीकत गुप्तपणें कळविली व फत्तेजंगखांस एलिचपुराहून कोणत्या तरी युक्तीनें काढण्याची विनंती केली. चंदूलाल यानें नामदारखांस सल्ला दिला कीं, तुम्ही परभारें ब्रिटिश रेसिडेंटाकडून ही हकीकत निजामाच्या कानावर

चालवावी म्हणजे मीहि मदत करीन. याप्रमाणें नामदारखांनें तजवीज केली. शेवटीं निजामानें फत्तेजंगखांची बदली औरंगाबाद सुभ्यावर केली. फत्तेजंगखां औरंगाबादेस गेला; परंतु आपला पुत्र गुलाम हसनअल्लीखां यास त्यानें एलिचपुरासच ठेविलें. सलाबतखां अगदींच वृद्ध झाला होता, त्यामुळें सर्व कारभार नामदारखां हाच पाहूं लागला. सलाबतखां इ. स. १८२१ त मरण पावला व पुढें नामदारखां नवाब झाला.

**नामदारखां १८२५–१८४५.**

नवाब नामदारखां यास शिकारीचा फार नाद असे व हा नेम मारणारा फारच चांगला होता. यानें आपण स्वतः मारलेल्या वाघांच्या कातड्याचा एक मोठा तंबू करविला होता. याचा स्वभाव फार रागीट असे. हैदराबादच्या दरबारच्या खजीन्याची स्थिति यावेळेस फार खालावली होती. यामुळें परतवाडा येथील कांटिंजटच्या खर्चाचा बोजा निजामानें नबाबावर लादला. यामुळें नबाबाच्या खर्चाचीहि फारच ओढाताण होऊं लागली. शेवटीं नबाबानें निजामास लिहून दक्षिणेकडील बाळापुर व त्याखालील मुलूख सोडून दिला व फौजेच्या खर्चाच्या त्रासांतून मोकळा झाला. नबाबाचा अर्धा मुलूख याप्रमाणें गेल्यानंतर एलिचपूर, अकोट या पट्टीवरच म्हणजे जुन्या एलिचपूर जिल्ह्याएवढ्या मुलखावरच नबाबाचा अंमल राहिला. नामदारखां हा फार कृपण व लोभी होता. त्यानें वतनदार ,इनामदार वगैरे लोकांवर नवीन कर बसविले. हा खजीन्यांतून पैसे देतांना अडीच टक्के[1] भावानें देत असे व खजीन्यांत घेतांना मात्र बाजारभावाप्रमाणें साडेतीन टक्के दरानें घेत असे. या त्याच्या कृत्यावरून त्यास 'बानिया नबाब' असें सर्वजण म्हणत असत.

---

१ टक्का=चार आणे.

नामदारखांचे वेळेस वाघांकी पैसे चालत असत. त्यावर वाघाचें चित्र असे. त्यानंतर आळसपुरी (एलिचपुरी) नाणें सर्व वऱ्हाडभर चालू होतें. कांहीं दिवस त्रिशूळी पैसे चालत. यानंतर म्हणजे अगदीं इंग्रजी अमलापर्यंत वऱ्हाडच्या बहुतेक भागांतून जामोदी (जळगांवजामोद. जामोद येथें एक किल्ला आहे ती टांकसाळ होती) पैसे चालत. रुप्याचें व सोन्याचें नाणें मात्र हैदराबादचेंच चालत असे. याशिवाय दुदांडी, देऊळगांवी व वाशीमचें नाणें चालू होतें. दिल्लीचें सोन्याचें नाणेंहि नेहमीं चालू असे व अद्याप जमिनीच्या पोटांत सांपडतें. नामदारखांनें बारादरी, इमामवाडा नांवाची मशीद, नामदारबाग नांवाचा शहराबाहेर एक महाल वगैरे इमारती बांधल्या. ह्यांपैकीं बहुतेक अद्याप आहेत. त्यानें आपल्या वाड्यांत एक सुंदर आरसेमहाल करविला होता; त्यास वरून अभ्रकाचे आरसे लाविले होते. हा आरसेमहाल थोड्या वर्षांपूर्वीं पडला.

नामदारखांच्या कारकीर्दींत कोणीं नागपूरकर आप्पासाहेब भोंसले याचें नांव घेऊन वऱ्हाडांत पुंडावा मांडिला तेव्हां नामदारखांनें स्वत: जाऊन तें बंड मोडिलें व त्यास धरून एलिचपुरास आणून कैदेंत ठेविलें तो तेथेंच मरण पावला.*यानंतर नामदारखांचें आयुष्य कष्टांत गेलें. त्याचे पुत्र वारले. अर्धांगवायूनें त्याचें तोंड वांकडें झालें. तो ९४ वर्षांचा होऊन १८४९ त मरण पावला. त्याच्या मागून त्याचा वडील भाऊ इस्मायलखां उर्फ मालूमिया याचा पुत्र इब्राहिमखां हा नबाब झाला.

---

*भाग ८ पा. २३८.९ पहा. त्यांत ही हकीकत भिन्न आहे.

इब्राहीमखां
१८४५ ते १८४९

नवाब इब्राहीमखांची खाजगी जहागीर ४१००० रुपयांची होती. ह्याचा स्वभाव आपल्या चुलत्याप्रमाणेंच तामसी असे. याचा बांधा ठेंगणा असून हा देखणा होता. हा फारच अडखळत बोलत असे. याच्या तामसीपणामुळें याच्या हातून पुष्कळ नौकर लोकांचे खून झाले. फत्तेजंगखांचा पुत्र गुलाम हमन अल्लीखां. याची मुलगी या नबाबास दिलेली होती.

हैदराबादेहून सनद मिळविण्याकरितां इब्राहीमखांन यानें सीताराम पंडित नांवाच्या हुशार मनुष्यास पाठविलें. या वेळेस हैदराबादेस राजारामबक्ष नांवाचा मनुष्य मुख्य दिवाणाचा नायब होता त्याच्या हातीं सर्व सत्ता असे. हा नबाबास विशेष अनुकूल नसे. यानें सीताराम पंडितास सांगितलें कीं नबाबानें नजराण्याबद्दल चौदा लक्ष रुपये सरकारी खजीन्यांत आणून भरावे म्हणजे त्यास सनद मिळेल.इकडे नबान अति खार्चीक असल्यामुळें कफल्लक बनला होता तेव्हां त्यानें त्यास पैसे मिळविण्याकरितां एक तोड काढिली. तो आपला चुलता व पूर्वीचा नबाब नामदारखां याच्या बायकोच्या महालांत घुसला व पेट्यांतील व त्या बाईच्या अंगावरील सर्व जवाहीर त्यानें जबरदस्तीनें काढिलें. या दुःखानें ती बाई अन्नपाणी वर्ज करून लौकरच मेली. हें सर्व जवाहीर एक कोट रुपयांचें भरलें. या जवाहीरापैकीं पन्नास लक्षांचें जवाहीर लिलांवानें विकलें, परंतु त्याचे अवघे दहा लाख रुपये आले. हे रुपये नबाबानें हैदराबादेस पाठविले परंतु दरबारांतील घोंटाळ्यामुळें त्यापैकीं तीन लाख रुपये मात्र दिवाणी दप्तरांत जमा झाले व शिवाय पूर्ण रक्कम आली नाहीं म्हणून सनद मिळाली नाहीं ती नाहींच.

नबाबाच्या पदरीं शिराजुद्दीन हुसेन नांवाचा मुनशी होता- त्याचें व नबाबाचें न पटल्यामुळें तो एलिचपुराहून हैदराबादेस गेला व राजारामबक्ष याच्या हाताखालीं राहिला. त्यानें व राजारामबक्ष यानें दरबारांत कारस्थानें करून नबाबास नजराण्याची रक्कम देण्यास भाग पाडण्याकरितां घीसेखां नांवाच्या मनुष्याच्या हाताखालीं कांहीं लष्कर देऊन त्याजवळ दिवाणाच्या सहीचा हुकूम दिला कीं, नजराणा वसूल करावा अगर वसूल न झाल्यास एलिचपूर शहर ताब्यांत घ्यावें. घीसेखां एलिचपुरास आला व त्यानें शहराच्या उत्तरेस दूलादरग्यावर डेरे दिले व दिवाणाचा हुकूम नबाबास दाखविला. आपण पाठविलेल्या पैशाचीं काय वाट लागली हें पाहून नबाबानें नजराणा न देण्याचा निश्चय केला व लढाईची तयारी केली. परंतु घीसेखांच्या भेटीनंतर त्याच्या मनांत काय आलें असेल तें असो. त्यानें घीसेखांस सांगितलें कीं शहर व किल्ला मी तुमचे ताब्यांत देतों तो घ्या. माझी खासगी जहागीर मला बस आहे. मला ह्या पंचायतीची जरूर नाहीं. याप्रमाणें वैतागून दिलेल्या उत्तरावरच घीसेखांनें कांहीं अधिकारी व अरब शिपाई शहरास ताबा घेण्यास पाठविले. नबाबानेंहि आपल्या लोकांस किल्ल्यांतील सामान बाहेर काढण्यास सांगितलें घीसेखांच्या अधिकाऱ्यांनीं त्या दिवशींच्या विलायतपुऱ्याच्या बाजाराची पट्टी वसूल केली. शहरच्या लोकांत सर्वत्र गडबड चालली. प्रत्येकाच्या तोंडून एक नवी नवीच गप्प ऐकूं येई. इतक्यांत नबाबाचा सासरा गुलाम हसन अल्लीखां हा नबाबाकडे आला व त्यास चार गोष्टी सांगून घीसेखांस शहरचा ताबा न देण्यास सांगितलें. लागलीच नबाब साहेबांची बुद्धि फिरली व त्यानें आपल्या लष्करास बोलावून हुकूम दिला कीं आतांचे आतां शहरांतील सर्व अरब

लोकांस त्यांचें सामान त्यांच्या डोक्यावर देऊन शहराबाहेर हांकून द्यावें व सर्व वेशींवर शिबंदी ठेवावी. नबाबाच्या हुकूमाप्रमाणें सर्व अरबांस हांकून देण्यांत आलें. ह्या अपमानामुळें घीसेखां संतापून गेला परंतु एलिचपुरच्या लष्कराच्या तयारीवरून तंटा केल्यास यश येण्याची आशा नाहीं असें पाहून त्यास मूग गिळून बसावें लागलें.

पुढें जवळच मोहरम आला होता. त्या वेळेस शहरांतील सर्व ताबूत दूला दरग्यावर नेऊन तेथेंच बीचन नदींत बुडवीत असतात. त्याच जागेवर घीसेखांचा तळ होता. तेव्हां तंटा खास होणार हें पाहून शहरांतील कित्येक मंडळी घीसेखांकडे गेली व तळ मागें न्या नाहीं तर तंटा होईल असें त्यांनीं त्यास सांगितलें. ह्यावर कित्येक अरबांनीं तोफांकडे बोट दाखविलें. हें उत्तर मिळतांच शहरांतील मंडळी परत आली व आपल्या तयारीस लागली. पुढें मोहोरमच्या वेळीं शहरांतील प्रत्येक पुरेवाल्यानें आपापली नेहमींची जागा हल्ला करून घेतली. नंतर सर्व लोकांनीं तोफा प्रथम ताब्यांत घेतल्या व घीसेखांच्या डेऱ्यास घेरा दिला, शेवटीं घीसेखांनें आपला तळ तीन मैल मागें परतवाड्यास नेला. रात्रीं शहरांतील कित्येक खट्याळ मंडळीनें तेथेंहि जाऊन घीसेखांच्या डेऱ्यास आग लाविली. त्या कृत्यांत इब्राहीमखांचें कांहीं एक आंग नव्हतें. यानंतर घीसेखां हैदराबादेहून मदत येईल याची वाट पहात बसला परंतु तितक्यांतच परतवाड्यासच कांहीं आजारानें मरण पावला.

इ० स० १८४५।४६ सालीं वऱ्हाडांत मोठा दुष्काळ पडला. त्या वेळेस ८ पैसे शेर जवारी व १२ पैशांस शेर भर गहूं याप्रमाणें धान्याचे भाव झाले. त्याच्या पुढचेच वर्षीं मात्र इतकी

नबाबाच्या पदरीं शिराजुद्दीन हुसेन नांवाचा मुनशी होता-त्याचें व नबाबाचें न पटल्यामुळें तो एलिचपुराहून हैदराबादेस गेला व राजारामबक्ष याच्या हाताखालीं राहिला. त्यानें व राजारामबक्ष यानें दरबारांत कारस्थानें करून नबाबास नजराण्याची रक्कम देण्यास भाग पाडण्याकरितां घीसेखां नांवाच्या मनुष्याच्या हाताखालीं कांहीं लष्कर देऊन त्याजवळ दिवाणाच्या सहीचा हुकूम दिला कीं, नजराणा वसूल करावा अगर वसूल न झाल्यास एलिचपूर शहर ताब्यांत घ्यावें. घीसेखां एलिचपुरास आला व त्यानें शहराच्या उत्तरेस दूलादरग्यावर डेरे दिले व दिवाणाचा हुकूम नबाबास दाखविला. आपण पाठविलेल्या पैशाचीं काय वाट लागली हें पाहून नबाबानें नजराणा न देण्याचा निश्चय केला व लढाईची तयारी केली. परंतु घीसेखांच्या भेटीनंतर त्याच्या मनांत काय आलें असेल तें असो. त्यानें घीसेखांस सांगितलें कीं शहर व किल्ला मी तुमचे ताब्यांत देतों तो घ्या. माझी खासगी जहागीर मला बस आहे. मला ह्या पंचायतीची जरूर नाहीं. याप्रमाणें वैतागून दिलेल्या उत्तरावरच घीसेखांनें कांहीं अधिकारी व अरब शिपाई शहरास ताबा घेण्यास पाठविले. नबाबानेंहि आपल्या लोकांस किल्ल्यांतील सामान बाहेर काढण्यास सांगितलें घीसेखांच्या अधिकाऱ्यांनीं त्या दिवशींच्या विलायतपुऱ्याच्या बाजाराची पट्टी वसूल केली. शहरच्या लोकांत सर्वत्र गडबड चालली. प्रत्येकाच्या तोंडून एक नवी नवीच गप्प ऐकूं येई. इतक्यांत नबाबाचा सासरा गुलाम हसन अल्लीखां हा नबाबाकडे आला व त्यास चार गोष्टी सांगून घीसेखांस शहरचा ताबा न देण्यास सांगितलें. लागलीच नबाब साहेबांची बुद्धि फिरली व त्यानें आपल्या लष्करास बोलावून हुकूम दिला कीं आतांचे आतां शहरांतील सर्व अरब

लोकांस त्यांचें सामान त्यांच्या डोक्यावर देऊन शहराबाहेर हांकून द्यावें व सर्व वेशींवर शिबंदी ठेवावी. नबाबाच्या हुकूमाप्रमाणें सर्व अरबांस हांकून देण्यांत आलें. ह्या अपमानामुळें घीसेखां संतापून गेला परंतु एलिचपुरच्या लष्कराच्या तयारीवरून तंटा केल्यास यश येण्याची आशा नाहीं असें पाहून त्यास मूग गिळून बसावें लागलें.

पुढें जवळच मोहरम आला होता. त्या वेळेस शहरांतील सर्व ताबूत दूला दरग्याबर नेऊन तेथेंच बीचन नदींत बुडवीत असतात. त्याच जागेवर घीसेखांचा तळ होता. तेव्हां तंटा खास होणार हें पाहून शहरांतील कित्येक मंडळी घीसेखांकडे गेली व तळ मागें न्या नाहीं तर तंटा होईल असें त्यांनीं त्यास सांगितलें. ह्यावर कित्येक अरबांनीं तोफांकडे बोट दाखविलें. हें उत्तर मिळतांच शहरांतील मंडळी परत आली व आपल्या तयारीस लागली. पुढें मोहोरमच्या वेळीं शहरांतील प्रत्येक पुरेवाल्यानें आपापली नेहमींची जागा हल्ला करून घेतली. नंतर सर्व लोकांनीं तोफा प्रथम ताब्यांत घेतल्या व घीसेखांच्या डेऱ्यास घेरा दिला. शेवटीं घीसेखांनें आपला तळ तीन मैल मागें परतवाड्यास नेला. रात्रीं शहरांतील कित्येक खट्याळ मंडळीनें तेथेंहि जाऊन घीसेखांच्या डेऱ्यास आग लाविली. त्या कृत्यांत इब्राहीमखांचें कांहीं एक अंग नव्हतें. यानंतर घीसेखां हैदराबादेहून मदत येईल याची वाट पहात बसला परंतु तितक्यांतच परतवाड्यासच कांहीं आजारानें मरण पावला.

इ० स० १८४५।४६ सालीं वऱ्हाडांत मोठा दुष्काळ पडला. त्या वेळेस ८ पैसे शेर जवारी व १२ पैशांस शेर भर गहूं याप्रमाणें धान्याचे भाव झाले. त्याच्या पुढचेच वर्षीं मात्र इतकी

सुबत्ता झाली कीं, दीड पैशाला पायलीभर ( दोनशेर ) धान्य मिळूं लागलें.

इ० स० १८४९ त एलिचपुरास पटकीची साथ आली. त्या वेळेस एके दिवशीं इब्राहीमखां नवाब किल्ल्यांतील कचेरी, भरकळ ( कैदखाना वगैरे ठिकाणांहून फिरून आले तों त्यांस उलटी झाली. तेव्हां थोडेसें औषध पाणी घेऊन प्रकृतीस आराम पडला. दुसरे दिवशीं सकाळीं तर प्रकृति चांगली झाली व ते मोती बंगल्यांत मानकऱ्यांचे मुजरे घेत मामुलीप्रमाणें बसले इतक्यांत त्यांचा वैद्य येऊन त्यानें प्रकृति पाहिली व औषध घेण्यास दिलें. इब्राहीमखानें आतां प्रकृती बरी आहे, औषधाची जरूर नाहीं असें पुष्कळ सांगितलें परंतु वैद्याच्या आग्रहावरून त्यांनीं तें घेतलें. औषध घेऊन एक घटकाहि झाली नाहीं तोंच इब्राहीमखांस घेरी येऊन तो बेशुद्ध होऊन खालीं पडला. तेव्हां कचेरींतील लोकांनीं त्यास उचलून आपल्या दिवाणखान्यांत नेलें व औषधोपचार सुरू केले, तोंच त्यास एक जुलाब होऊन त्यांतच त्याचा अंत झाला. मेल्यावर त्याचें अंग हिरवें पडलें होतें. यामुळें कोणी तरी वैद्याकडून नबाबास विष देवविलें हें स्पष्ट दिसून आलें. मरण समयीं इब्राहीमखांचें वय १४ वर्षांचें होतें. त्यास मूलबाळ कांहीं नव्हतें व नबाबाच्या घराण्यांतील कोणीहि पुरुष जिवंत नव्हता तेव्हां नबाबाचा सासरा **गुलाम हसन अल्लीखां** यानें आपली मुलगी **शम्सखातून** इच्या नांवानें कारभार चालविण्याचें ठरवून व शहरांतील वजनदार लोकांस अनुकूल करून घेऊन राज्याचीं सूत्रें हातीं घेतलीं.

यास प्रचारांत हशूमियां असें म्हणत असत. एलिचपूरच्या जवळच निजामाचा कांहीं सर्फखा-

गुलाम हसन अल्लीखां
१८४९–१८५३.

सचा (खुद्द निजामाच्या ताब्यांतील जहागिरींत न मोडणारा) मुलूख असे. त्यावर निजामाकडून निराळा अधिकारी नेमून येत असे. नबाब व हे अधिकारी यांच्यांमध्यें नेहमीं तंटे होत. कारण नबाबाची कांहीं शेतकरी कुळें सारा न देतां सर्फखासमध्यें पळून जात व सर्फखासमधील अशींच कुळें एलिचपुरच्या हद्दींत येऊन रहात. एकमेकांचा एकमेकांच्या मुलखांवर अधिकार नसल्यामुळें त्या कुळांना धरून पाठविण्याबद्दल एकमेकांना लिहावें लागे परंतु असें करणें म्हणजे दुसऱ्याचा हुकूम पाळणें असें समजून कोणीच त्याकडे लक्ष देत नसे. त्यांतल्या त्यांत नबाब प्रबळ असल्यामुळें सत्तेच्या जोरावर तो आपले शिपाई सर्फखासमध्यें पाठवून आपलीं कुळें पकडून आणीत असे. नबाब व हे अधिकारी यांचें मित्रत्व असल्यास मात्र सर्व कारभार सुरळीत चाले.

गुलाम हसन अल्लीखा यासहि सनद मिळाली नव्हतीच. ती त्यानें मिळविण्याची खटपट चालविली. त्यावेळेस हैदराबादच्या दरबारीं शमसुल उमरा नांवाचा दिवाण होता. त्यानें सतरा लाख रुपये नजराणा मागितला. एवढी रकम देतां येत नसल्यामुळें व इब्राहीमखांच्या पैशाची काय वाट लागली हें लक्षांत असल्यामुळें नबाबानें पैसा देण्याचें अजीबात नाकारलें. यामुळें हैदराबादेहून एकादा सरदार एलिचपुरावर यावा परंतु त्याच वेळीं एका गोष्टीमुळें हें प्रकरण कांहीं काळपर्यंत मागें पडलें.

नबाबाच्या एलिचपुरच्या किताबखान्यांत एक सुंदर व मौल्यवान् कुराणाची प्रत होती. ह्या पुस्तकाच्या प्रत्येक पाना-

भोंवतीं सोन्याची नकशी केली होती. व त्यांतील अक्षरें हिरे, पांच मोतीं वगैरे मौल्यवान् खडे बसवून व रंग खुलवून काढिलीं होतीं. ह्यांचें वजन साडेसतरा शेर होते. हें बहुमोल कुराण जवळ असल्याबद्दल फक्त नबाबच नव्हे तर सर्व एलिचपूर शहरास मोठा अभिमान वाटत असे व हें कुराण म्हणजे एलिचपुरचें सौभाग्य व रियासतीच्या भरभराटीचें चिन्ह असें सर्व समजत असत. हें कुराण आपणास पाहण्याकरितां हैदराबादेस पाठवावें असा दिवाण शमसुल उमरा याजकडून फारफार आग्रहाचा व मिनतवारीचा निरोप आला. एकदां हें कुराण पाठविलें म्हणजे तें पुन्हा परत येणार नाहीं हें नबाबास माहीत होतें, परंतु दिवाणाच्या हातीं सर्व सत्ता असल्यामुळें आपण ह्यास खुष केल्यास आपणास सनद मिळेल नाहीं तर बराच त्रास सोसावा लागेल या आशेनें नबाबानें शहरचे सर्व लोक मना करित असतां तें कुराण कांहीं स्वार बरोबर देऊन हैदराबादेस पाठविलें. ह्यामुळें शहरच्या लोकांस फार वाईट वाटलें. व एलिचपुरच्या रियासतीची अखेर जवळच आली असें लोक म्हणू लागले व त्यांचें भविष्य पुढें कांहीं कारणानें खरेंहि झालें.

ह्या कुराणाची पूर्वपीठिका बरीच संशयित आहे. परंतु त्याविषयीं लोकवार्ता अशीं आहे कीं तें मूळचें दिल्लीच्या बादशहानें करवून आपल्या किताबखान्यांत ठेविलें होतें. मराठ्यांनीं ज्यावेळेस दिल्ली घतली त्यावेळेस भोंसल्याच्या लोकांनीं तें लुटींत मिळविलें व तें गाविलगड किल्ल्यांत भोंसल्याचें बरेंच बहुमोल सामान होतें त्यांत ठेविलें. इंग्रजांनीं १८०३ मध्यें गाविलगड घेतला त्यावेळेस नबाबानें सर्व संपत्ती लुटून एलिचपुरास आणिली हें मागें आलेंच आहे. त्यांत हें कुराण आलें व तेव्हांपासून तें नबाबाच्या किताबखान्यांत राहिलें. असो. हें कुराण पाठविल्यामुळें दिवाण

फार खुष झाला व नजराण्याचें प्रकरण थोडेसें थांबलें. परंतु यानें कायमचा बंदोबस्त न होतां आजचें मरण उद्यांवर गेल्यासारखें झालें.

नबाबाच्या पदरीं इब्राहीमखांच्या पूर्वींपासून केशवराव नांवाचा कर्तबगार ब्राम्हण कारभारी असे. नबाबाचीं सर्व मुत्सद्दी-पणाचीं व महत्त्वाचीं कामें केशवरावाच्या हातून होत असत, व अडचणींचे प्रसंग केशवरावानें आपल्या करामतीनें निभावून नेले होते. यामुळें इब्राहीमखां नबाब त्याच्याच सल्ल्यानें वागत असे. परंतु हसूमियां आल्यावर त्यानें केशवरावाच्या सल्ल्यानें वागण्याचें सोडून दिलें व बहादरखां नांवाचा त्याच्या पूर्वींच्या प्रांतांतील मनुष्य होता त्यास कारभारी केलें. व नबाब सर्वस्वी बहादरखां व हैदराबादचा प्रसिद्ध सावकार पूरणमल याचा गुमास्ता कुंडनमल नांवाचा एलिचपुरच्या पेढींवर होता या दोघांच्या नादानें वागूं लागला. बाहादरखां याचे आंगीं राज्य कारभाराचें कौशल्य मुळींच नव्हतें व कुंडनमल यास तर पैशाशिवाय कांहींच दिसत नव्हतें.यामुळें नबाबाच्या ताब्यांतील सर्व प्रदेशांत अंदाधुंदी झाली. हसूमियाच्या मनांत अद्यापहि पैसे जमल्यावर ते भरून सनद मिळवूं अशी इच्छा होतीच. यामुळें बहादरखां व कुंडनमल यांनीं त्यांस पैसे मिळवून देण्याचें आंगा-वर घेतलें. या दोघांनीं पैसे मिळविण्याकरीतां हवे तसे जुलूम केले. पुष्कळांच्या जवळून कोणत्याना कोणत्या सबबीवर त्यांनीं हजारों रुपये घेतले. कित्येकांचीं घरें सुद्धां लुटलीं. या दोघांनीं या गडब-डींत आपण स्वतःहि हात मारण्यास कमी केलें नाहीं. जेव्हां जेव्हां संधि सांपडली तेव्हां तेव्हां यांनीं खुद्द नबाबास सुद्धां फसविलें यामुळें प्रजेमध्यें सर्वत्र असंतोष वाढत चालला.

बहादरखां साहेबाची बहादुगी सर्वत्र गाजली होती. तिची धाड शेवटीं नबाबाचे जुनें कारभारी केशवराव याजवरहि आली. बहादरखां यांनीं जेव्हां पाहिलें कीं मुलखांतील सर्व सावकार व श्रीमंत लोक यांना आपल्या कृपेचा प्रसाद मिळाला तेव्हां त्यांनीं केशवराव याजवरहि तो करण्याचा निश्चय केला. त्यानें केशवरावास निरोप पाठविला कीं दोन दिवसाच्या आंत अमुक रकम आणून आमचे पुढें हजर करावी नांहीं तर त्याचा परिणाम भोगावा लागेल. ही रकम अर्थात् केशवरावाच्या शक्तीबाहेर होती. ज्या शहरांत आपण इतक्या अब्रूनें दिवस घालविले तेथेंच आतां विटंबना होणार हें पाहून केशवरावानें विष खाऊन आपला अंत करून घेतला!!

या बहादरखांनें केवळ हिंदूंसच नाहीं तर मुसलमानांसहि अतोनात त्रास दिला. ही कारकीर्द पाहिलेले पुष्कळ लोक अद्याप विसरले नाहींत व एखादी जुलमाची गोष्ट झाल्यास तेथील लोक 'ही तर बहादरखानीच झाली!' असें अद्याप म्हणतात.

हसूमियाच्या कारकिर्दींत देशमुख, देशपांडे वगैरे वतनदार लोकांच्या हक्कांचें तर अगदींच वाटोळें झालें होतें व साधारण लोक तरी बरे अशी त्यांची स्थिति झाली होती. याकारणानें त्यांनीं आपणा सर्वांतर्फे गणेशपंत आबाजी नांवाच्या वकीलास हैदराबादेस पाठविलें. त्यानें राजारामबक्ष याच्याकडून ही सर्व हकीकत दिवाणाच्या कानावर घातली. या वेळेस शमसुल उमरा हा जाऊन त्याच्या जागीं दुसरा दिवाण आला होता त्यानें नजराण्याचें निमित्त पुढें करून पूर्वीं बिसनचंद नांवाचा कामगार एलिचपुरास होता त्याच्या जवळ कांहीं सैन्य देऊन त्यास नजराणा वसूल करण्याकरितां एलिचपुरास पाठविलें व पैसा न दिल्यास शहर ताब्यांत घेऊन बिसनचंदाचा नातू जयवंतराम यांच्या स्वाधीन शहर

करावें असा हुकूम दिला. नबाब, दिवाण यांच्या कृतींचें आपणास आजच्या स्थितींत फार नवल वाटेल. दिवाणाचें वारंवार लष्कर पाठविणें,नबाबाचें त्यास न जुमानतां हांकून लावणें व निजामाचें पुन्हां स्वस्थ बसणें ह्या गोष्टी खरोखरच चमत्कारिक आहेत. परंतु खरी स्थिति अशी होती कीं दिवाण मनास वाटेल तसा कारभार करीत. निजामास त्याची वार्ताहि नसे. असो. बिसनचंद आपल्या लोकांसह **उमरावती** मार्गानें **एलिचपुरापासून** पांच कोसावर **धानोरा** येथें आला. नबाबास हें समजतांच त्यानें लष्कर तयार करून धानोऱ्या-वर चाल करून त्यास पळावयास लाविलें. ह्यावेळीं नबाबाच्या तोफ-खान्यावर **टॉमस ब्राऊन** नांवाचा युरोपियन होता त्यानें आपली कामागिरी चांगली बजाविली. ही गोष्टी १८९० त झाली.

ह्यानंतर दिवाणानें नबाबाचा शत्रु **सिराजुद्दीन हुसेन** ह्यास **नरनाळ्यास** मुनसफ नेमून पाठविलें व त्यास नबाबाचा वाटेल त्या रीतीनें मोड करून शहर ताब्यांत घेण्यास सांगितलें. त्यानें नबाबाच्या ताब्यांतील **अकोली, अकोलखेड, बोरडी** वगैरे **अकोटा** जवळील गांवें घेतली परंतु नबाबानें आपलें सैन्य पाठवून तीं परत घेतलीं. नबाबाच्या सैन्याची व सिराजुद्दीन याची एक चकमक **सुर्जी अंजनगांव** येथें झाली. तींतहि शिराजुद्दीन याचा पराभव झाला. पुढें हैदराबादेस दिवाण बदलल्यामुळें सिरा-जुद्दीन याचा आधार नाहींसा झाला व यामुळें तो स्तब्ध राहिला.

इ० स० १८९१ ह्या वर्षीं हैदराबादेस सिराजुल्मुल्क हा दिवाण होता. त्यानें नबाबाच्या सनदेचें प्रकरण विझवावें म्हणून नबाबास सात लक्ष रुपये नजराणा भरून सनद घेऊन जावें म्हणून लिहिलें. नबाबास सनद न मिळाल्यामुळें बराच त्रास सोसावा लागला होता व ही रक्कमहि पूर्वींच्याप्रमाणें फार नव्हती. म्हणून

नबाबानें हैदराबादच्या पूरणमल सावकाराचा गुमास्ता कुंडनमल याच्या मार्फतीनें हैदराबादेस पुरणमलकडून सर्व रक्कम भरविली. तेव्हां शेवटीं नबाबास सनद मिळाली. तींत नबाबाच्या ताब्यांत साडेचार लक्षांचा मुलूख दिला होता. व नबाबाच्या अमला खालील प्रदेश मुकरर केला होता. हा पूर्वीपेक्षां बराच कमी होता.

परंतु ह्याचा फार दिवस उपभोग घेणें नबाबाच्या नशीबीं नव्हतें. कारण १८५३ त निजाम व इंग्रज ह्यांच्यामध्यें तह होऊन हैदराबाद कांटिंजंट फौजेच्या खर्चाकरितां वऱ्हाड इंग्रजांच्या वहिवाटीस देण्यांत आलें. त्या वेळेस मुलूख खाली करून देण्याविषयीं नबाबाच्या नांवाचा सरकारी हुकूम निजामाकडून नबाबास आला व दुसरा इंग्रजांच्या मार्फतहि मिळाला तेव्हां मात्र कांहीं एक अडथळा न करीतां नबाबानें इंग्रज कामगारांच्या स्वाधीन सर्व कारभार करून आपली खाजगी दौलत व नौकर चाकर घेऊन आपली मुलगी शम्सखातून इजसह हैदराबादेस गेला. निजामानें त्यास उदगीर येथें खर्चाकरितां पन्नास हजारांची जहागीर दिली. गुलाम हसन अल्लीखां हैदराबाद येथें इ० स० १८५९ मध्यें वारला. याचें प्रेत बरेच दिवस तसेंच राखून ठेविलें होतें; पुढें तें एलिचपुरास आणून सर्पीण नदीच्या कांठीं इमामवाड्यांत पुरलें. त्याच्यामागून त्याची जहागीर मुलीस मिळाली. पुढें तीहि कांहीं दिवसांनीं वारली.

नबाब हसन अल्लीखां यानें पूरणमल याच्या सात लक्ष रुपयांची अद्याप फेड केली नव्हती म्हणून त्यानें त्याच्या मृत्यूनंतर फिर्याद करून फैसल मिळविला व सरकारमार्फत एलिचपुर येथील गुलाम हसन अल्ली याचा खासगत महाल व त्याच्या बापानें वसविलेला त्याच्या ताब्यांतील आबासपुरा हे जप्त केले. ते बरींच वर्षे जप्तींतच होते. हल्लीं वाडा हरास झाला आहे. ह्या महा-

लांत सध्यां दोन शाळा आहेत. हा महाल अद्यापहि आपल्या जुन्या वैभवाची साक्ष देत आहे.

नबाब इब्राहीमखां याचा खाजगत महाल व कांहीं जहागीर अद्यापहि एलिचपुरास होती ती कोणास द्यावी याचा विचार पडला. खुद्द नबाबाच्या वंशांतला कोणीच पुरुष जिवंत नव्हता. शेवटीं पहिला नबाब इस्मायलखां ह्याची बहीण हिंमतख तून इचे वंशज दोघे बंधु दाऊदखां व यूनसखां नांवांचे, ते पुढें येऊन त्यांनीं आपला हक्क शाबीत केला. त्यावरून त्या दोघा बंधूंना नबाबाचा महाल व थोडीशी जहागीर देण्यांत आली, तिचा ते अद्याप उपभोग घेत आहेत.

इ० स० १७९८ पासून तों १८९३ पर्यंत एलिचपुरच्या नबाबांनीं एलिचपूर व त्या भोंवतालचा बराच प्रदेश यांवर राज्य केलें. त्यांपैकीं शेवटची थोडींशीं वर्षें खेरीज करून ही कारकीर्द सुखाची गेली.

एलिचपुरच्या नबाबाच्या कारकीर्दींत शेवटीं जरी प्रजेस फार त्रास झाला तरी पहिल्या नबाबाच्या कारकीर्दी फार चांगल्या गेल्या. इमादशाही वंशाप्रमाणेंच ह्याही वंशाच्या वेळेस कलाकौशल्यांत बरीच सुधारणा झाली. एलिचपूर, बाळापूर, खोलापूर येथें उत्तम प्रकारचें कापड निघूं लागलें तें अद्यापपर्यंतहि नांव घेण्यासारखें निघत आहे. तसेंच बाळापुरास उत्तम कागद तयार होत असे. सर्व महाराष्ट्रांत विलायती कागदाच्या पूर्वीं जसा दौलताबादी कागद वापरण्यांत येई तसा ह्या वेळीं सर्व वऱ्हाडभर व बाहेरसुद्धां बाळापुरी कागद खपत असे. अद्याप सुद्धां बाळापुरी कागदांवर लिहिलेलीं कित्येक कागदपत्रें सांपडतात. सतारी, शस्त्रें, कागदावरील कारागिरी, चित्रकला, वाद्यें व वाद्यविद्या यासंबधानें

एलिचपूर शहर फार प्रसिद्ध होतें व त्यांपैकीं कांहींचा राहिलेला अंश अद्यापहि तेथें दिसतो. ह्या कारकीर्दींत फार सुंदर इमारती एलिचपुरास बांधल्या गेल्या. त्यांपैकीं बऱ्याच अद्याप आहेत-

## एलिचपुरच्या नबाबांचा वंशवृक्ष.



## ४

## नागपूरकर भोंसले व त्यांचे पदरची मंडळी.

भोंसल्यांचा वऱ्हाडाशीं संबंध आला त्यांतील ठळक ठळक माहिती भाग ८ यांत दिली आहे. त्याशिवाय त्यांचे कारकीर्दींतील घरगुती भानगडींची हकीकत व त्यांचे पदरीं जी जी मंडळी प्रसिद्धीस आली त्यांचीहि हकीकत पुढें दिली आहे.

शाहूचा हुकूम घेऊन पहिला रघूजी कान्होजीचा मोड करण्यास वऱ्हाडांत आला तो प्रथम जालन्यास आला व त्या बाजूस समशेर बहाद्दर आटोळे* नांवाचा एक मराठा सरदार होता तो रघूजीस पुढें जाऊं देईना. या रस्त्यानें माझा मुलूख खराब होईल, नांदेड वसमत या मार्गानें जा, असें तो म्हणूं लागला. शेवटीं लढाईची वेळ आली. अखेरीस रघूजीच्या बरोबरच्या रखमाजी गणेश परभू चिटणीस यानें व इतर मंडळीनें आटोळ्याशीं समेट केला व कसे तरी त्याच्या मुलखांतून निघून पुढें गेले. त्यांचा मार्ग जालन्याहून चिखली व मेहकर तालुक्यांतून लाखनवाड्याचे घाटानें खालीं उतरून त्यांनीं प्रथम बाळापुरास ठाणें दिलें व तीस हजार फौजेनिशीं सर्व वऱ्हाडभर खंडण्या घेणें सुरू केलें.

कान्होजी हा भाम येथें रहात होता. भाम येथें पूर्वीं मोंगलांचें लष्करी ठाणें होतें. भोंसल्यांनीं तेथेंच आपलेंहि ठाणें दिलें

---

* पान २१८ पहा. हे आटोळे पेशवाइचे अखेरीपर्यंत औरंगाबादेच्या बाजूस होते. यांचीं कांहीं आज्ञापत्रें लेखकाजवळ आहेत. यांचा शिक्का "श्री राजा शाहुचरनी तत्पर सुभानजीसुत संताजी आटोळे नीरंतर" असा आहे.

होतें. रघूजी हा आपला जम चांगला बसे तों पावेतों बाळापुरास राहिला व नंतर कान्होजीवर चाल करून गेला.

रघूजीच्या धाकानें कान्होजी भाम सोडून वर्धेच्या पलीकडे गेला व फौज जमवून तयारीनें राहिला. रघूजीनें त्यावर चढाई केली.दोघांची गांठ वणीजवळ मंदार या गांवीं झाली. कान्होजीचा पराभव होउन रघूजीच्या लोकांनीं कान्होजीस कांहीं लोकांसह घेरा देऊन तसेंच रघूजीकडेस आणिलें. रघूजीनें त्यास पालखींत बसण्यास सांगितलें. कान्होजीचा राग पोटांत सांठविला होताच. तो रघूजीस मनस्वी बोलूं लागला. तेव्हां रघूजीनें त्यास कैद केलें व त्यास घेऊन राजूर* येथें छावणी दिली. कान्होजीस साताऱ्यास पाठविलें. राजूर येथें सहा वर्षें रघूजीची छावणी होती.

रघूजीनें वऱ्हाडांतील नरनाळा व गाविलगड हे दोन डोंगरी किल्ले घेतले. रघूजीचा पुत्र मुधोजी यास गाविलगडावर पाठविलें. लढाई न होतांच तो किल्ला हस्तगत झाला. तोंच ( शके १६७४ मध्यें ) रघूजी मरण पावल्याचें वर्तमान त्यास समजलें. मुधोजी वडील बायकोचा पुत्र म्हणून त्यानें सुरजी अंजनगांवास रघूजीचें क्रियाकर्मांतर केलें.

जानोजी.

पहिला रघूजी मरण पावला तेव्हां मुधोजी गाविलगडास होता व दुसरे दोन पुत्र साबाजी व जानोजी नागपुरास होते. जानोजीनें आपल्या विश्वासांतला जयाजीभाई नांवाचा मनुष्य मुधोजीकडे पाठविला. जयाजीनें लबाडीनें आपणास जानोजीनें काढून दिलें असें सांगून मुधोजीचा विश्वास संपादन केला. मुधोजीनें विश्वासाचा मनुष्य म्हणून त्यास नुकत्याच घेतलेल्या गाविलगड किल्ल्या-

---

*राजूर हा गांव वणीजवळच आहे.

वर नेमलें. जयाजी किल्ल्यावर गेला व किल्ला बळकावून बसला. जानोजी नागपुरास असल्यामुळें रघूजीचे सर्व जुने कारभारी व अधिकाऱ्यांस, त्यानें मिळवून घेतलें. कोन्हेरपंत मुजुमदार, रखमाजी गणेश चिटणीस, कृष्णाजी गोविंद वऱ्हाडचे सुभेदार व कटकचे सुभेदार शिवभट साठे, नागपूरचे गुजर व भोंसल्याचे पुण्याचे दरबारचे वकील त्रिंबकजी राजे हे सर्व जानोजीच्या पक्षास होते. जानोजी वयानें वडील ( परंतु धाकटे बायकोचा ) व मुधोजी वयानें धाकटा ( परंतु वडील बायकोचा ) असल्यामुळें जानोजीचा जोर जास्त झाला.

जानोजीनें बाबूराव कोन्हेर मुजुमदार व त्रिंबकजी राजे वकील यांस पुण्यास पाठविलें व सेनासाहेबीचीं वस्त्रें मिळविण्याचा उद्योग सुरू केला व अडीच लक्ष रुपये नजराणा कबूल करून वस्त्रें मिळविलीं.

या उद्योगांत साडेतीन शहाण्यांपैकीं प्रसिद्ध देवाजीपंत उदयास आला. याचें नांव दिवाकरपंत चोरघोडे.

देवाजीपंताचा उदय. नागपूर जिल्ह्यांतील चिमूर या गांवचा राहणारा. त्रिंबकजी राजे वकील यांचेकडे कोन्हेरराम उमरेडकर नांवाचा कारकून होता त्यांचेकडे हा शागीर्द होता. वरील कारभारांत राजे पुण्यास गेले असतां कोन्हेरराम व दिवाकरपंत पुण्यास गेले. नानासाहेब पेशव्यांशीं राजे यांची मसलत होत असतां रात्रीं सर्वजण परत गेले व देवाजी हे झोंपेंत तसेच पेशव्यांचे वाड्यांत राहिले. नानासाहेब रात्रीं उठले असतां यांस उठवून 'तुम्ही कोण' म्हणून विचारलें. त्यावर बोलणें चालणें होऊन देवाजीपंताची हुशारी व बहुश्रुतपणा नानासाहेबांचे लक्षांत येऊन त्याजवर मर्जी बसली व नित्य येणें जाणें

सुरू झालें. जानोजीस राजे यांनीं सात लक्ष रुपये वस्त्रांकरितां द्यावे लागतील असें लबाडीनें सांगितलें होतें. देवाजीपंतांनीं अडीच लक्षांवर देववितों असें जानोजीस सांगून त्याप्रमाणें पुण्यास जाऊन घडवून आणिलें. त्यावरून जानोजीचा हा उजवा हात झाला व पुढें शहाणपणानें फारच प्रसिद्धीस आला; त्यास पेशव्यांकडून पत्रांत " विनंती " म्हणून लिहिलें जावें हा मान मिळाला.*

जानोजी, मुधोजी यांच्या भांडणाचा निकाल अखेर पुण्यास होऊन जानोजीस सेनासाहेब सुभा या पदावर कायम करून भोंसल्यांच्या सर्व मुलखाचें अग्रेसरत्व मिळालें. मुधोजी यास सेनाधुरंधर हा नवीनच किताब देऊन त्यानें जानोजीचा सर्व कारभार करावा असें ठरलें. तिसरा भाऊ साबाजी यानें वऱ्हाडांत दारव्हें येथें राहावें व बिंबाजी यानें छत्तीसगडास राहून त्या त्या मुलखाचा कारभार करावा असें ठरलें.

नागपूरकराप्रमाणें हैदराबादेस असफजहा पहिला निजाम याचे पुत्र सलाबतजंग, निजामअल्ली वगैरे भावांचा तंटा होता. त्यांचाहि निकाल याच सुमारास होऊन निजामअल्लीच्या वांटणीस वऱ्हाड आलें व मुख्य ठिकाण एलिचपूर ठरलें. त्याप्रमाणें तो एलिचपुरास येऊन राहिला. त्यानें जानोजीशीं सलोखा केला व दारव्हें वगैरे बाजूचा साबाजीचा हक्क मान्य *केला.

**वऱ्हाडचे साठचाळिशीचा तह.**

फ्रेंच सरदार बुसी याचे कारस्थानांत मराठ्यांचें व हैदरजंगाचें वांकडें आलें व पेशव्यांनीं जानोजीस सैन्यासह मदतीस बोलावून घेतलें. जानोजी तिकडे जातांना वऱ्हाड प्रांतीं

* नागपूरकर भोंसल्याची बखर. पान ५३ व ७४

रघोजी करांडा नांवाच्या सरदारास ठेवून गेला. या गडबडींत मराठ्यांस वऱ्हाडाबाहेर हांकून देण्याचा बेत निजामअल्लीनें केला व बऱ्हाणपूराहून दारूगोळा, तोफखाना वगैरे निमगांव नांदुरा या मार्गानें बोरगांव कंडी ( मंजू ? ) नजीक आला व स्वतः निजाम अल्ली एलिचपुराहून त्यास मिळण्यास निघाला. करांडा सावधच होता. त्यानें निजामअल्लीस या तयारीचा अर्थ काय म्हणून विचारलें असतां "काय असेल तें उद्यीक समजेल" म्हणून निरोप आला. करांडा यानें रातोरात जाऊन एकदम छापा घालून नबाबाचे सैन्याची नासाडी केली. निजामअल्ली उलटून "तुमचे सरकाराची व आमची दोस्ती असतां असें कां केलें" म्हणून विचारूं लागला. करांड्यानें "तुमचे कडेच चूक आहे" असें सांगितलें व "लौकर परत एलिचपुरास जा. आम्ही माणसें बरोबर देऊन पोहोंचवून देतों, नाहीं तर पुन्हा लढाई होईल" असें सांगून आपले दोनशें स्वार बरोबर देऊन त्यास एलिचपुरास पोहोंचवून दिलें.

जानोजी परत आल्यावर त्यास करांड्यानें नबाबाची लबाडी कळविली. तेव्हां जानोजीस सर्व कपट लक्षांत येऊन त्यानें सर्व वऱ्हाडप्रांताची तहसील घेणें सुरू केलें. नबाबास कांहींच मिळेना व भोंसल्याशीं लढाई करून घेणें शक्य नव्हतें. शेवटीं निजामअल्लीनें एलिचपुरकर सुलतानखान पन्हीं याचे मार्फतीनें जानोजीशीं तह केला व वऱ्हाडचें उत्पन्न शेंकडा साठ भोंसल्यानें व शेंकडा चाळीस निजामानें घ्यावें असें ठरलें. मराठ्यांच्या साठाचा हिशेब खालीलप्रमाणें होता.

२५ चौथाई.

१० सरदेशमुखी.

२५ स्वारलष्करीखर्च, घांसदाणा वगैरे. एकंदर ६०

थास साठचाळिसीचा तह असें म्हणतात. वऱ्हाडावर दोघांचाहि अंमल चालत असल्यामुळें "दोअमली कारकीर्द" असेंहि म्हणतात.

निजामुलमुल्क मरण पावल्यानंतर हैदराबादच्या गादीकरितां त्याच्या मुलांत तंटे सुरू झाले. त्यांत फ्रेंच व मराठे यांचा संबंध आला. निजामाचा तिसरा पुत्र निजामअल्ली हा औरंगाबादेस होता. नानासाहेब पेशव्यांचा प्रयत्न सर्व दक्षिण मोकळी करण्याचा होता. त्यांस निजामाचा कांटा काढून टाकावयाचा होता. त्यास ही संधि सांपडली. निजामअल्लीनें युद्धाची तयारी केली व आपले सर्व सरदार जमविले.

निजामाशीं लढाई दिसेंबर इ. स. १७५७.

नानासाहेब पेशव्यानें आपला अल्पवयी पंधरा वर्षांचा मुलगा विश्वासराव यास दत्ताजी शिंद्याचे हाताखालीं देऊन युद्धकलेचा पहिला धडा शिकण्यास औरंगाबादेवर पाठविलें. मराठे व निजाम यांच्या या लढ्याचा संबंध वऱ्हाडापर्यंत येऊन पोहोंचला. औरंगाबादेच्या आसपास म्हणजे वऱ्हाडच्या दक्षिण हद्दीवर या लढाईचें क्षेत्र होतें.

हैदराबादकर दिवाण विठ्ठल सुंदर हा निजामअल्लीस या अडचणींतून सोडविण्याची धडपड करीत होता. निजामअल्लीच्या सैन्याची स्थिति समाधानकारक नव्हती. सैन्याचा पगार तुंबल्यामुळें तें अधीर झालें होतें. विठ्ठल सुंदर हा वऱ्हाडांत वाढलेला, त्याच्या ओळखी वऱ्हाडांत पुष्कळ. त्यानें कोठून तरी कर्ज काढून आणतों म्हणून तो पांचशें स्वारांनिशीं वऱ्हाडांत बाळापुराकडे गेला. तेथून त्यानें

दोन लाख रुपये *कोठून तरी कर्ज आणलें पण तें कसें पुरणार? पेशव्यांचा औरंगाबादेचा वकील पेशव्यास+लिहितो " या रुपयांपैकीं कोणास दोन कोणास तीन याप्रमाणें रुपये देऊन थोडे दिवस समजाविलें आहे."

ता. २२-१०-१७५७ रोजीं विश्वासराव व दत्ताजी शिंदे यांनीं निजामअल्लीवर औरंगाबादेस हल्ला करून त्याचा मोड केला. निजामाकडील मुख्य मराठा सरदार रामचंद्रराव जाधव हा या लढाईत नव्हता, तो दक्षिणेस भालकी येथें होता. त्यास निजामअल्लीनें त्वरेनें बोलावतांच तो आपले दहा हजार फौजेनिशीं निजामअल्लीचे मदतीस आला. रामचंद्रराव येण्यास निघाला हें कळतांच दत्ताजी व विश्वासराव यांनीं त्याजवर चाल केली.

रामचंद्रराव दत्ताजीस चुकवीत निजामअल्लीस मिळण्याच्या विचारांत होता, पण दत्ताजी सावध असल्यामुळें त्यास मध्येंच गांठण्याच्या खटपटींत होता. या शर्यतींत रामचंद्ररावास औरंगाबादेच्या पूर्वेस झुकावें लागलें तोंच दत्ताजीनें लगट करून त्यास पिटाळीत उत्तरकडे वऱ्हाडांत घातलें. रामचंद्रराव जाधव औरंगाबादेहून पंचवीस कोसांवर जाधवरावांचें मुख्य ठिकाण शिंदखेड इकडे पळून शिंदखेडच्या गढींत जाऊन आश्रयानें राहिला. दत्ताजीनें शिंदखेडचे गढीस वेढा दिला व मोर्चे लावले.

---

*हें कर्ज त्यानें कोणाजवळून आणलें हें समजत नाहीं.

+ { राजवाडे खंड ११ ले. १००
सरदेसाई मध्यविभाग. भा. २ पा. ३८४ }

इकडे निजामअल्ली हाहि रामचंद्ररावास मिळण्याची व त्यास मदत करण्याची खटपट करीतच होता. त्यानें आपला भाऊ सलाबतजंग यास रामचंद्ररावाच्या मदतीस चलण्याविषयीं पुष्कळ म्हटलें पण तो जागचा हालेना. शेवटीं निजामअल्ली एकटाच शिंदखेडावर चालून गेला.

**शिंदखेडची लढाई, दिसेंबर १७५७ अखेर.**

इकडे नानासाहेब पेशवा डोळ्यांत तेल घालून इकडच्या हालचालीवर नजर देत होता. इकडचीं पत्रें जातील त्याप्रमाणें तो मदत पुरवीत असे. निजाम अल्ली रामचंद्ररावाच्या मदतीस निघाला हें कळतांच नानासाहेबानें नगराहून हुकूम करून रास्ते व पवार या दोन सरदारांस दत्ताजींच्या मदतीस जाण्यास सांगितलें. त्यांनीं मध्येंच निजामअल्लीस गांठून त्यास अडवून धरलें. लहान सहान चकमकी होत होत हीं दोन्ही लष्करें शिंदखेडास आलीं. नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ हेहि शिंदखेडास युद्धप्रसंग मोठा होणार हें जाणून स्वतः तेथें येऊन दाखल झाले. तोंच इकडे दत्ताजी शिंदे व सर्व मराठे सैन्य एकत्र होऊन त्यांनीं गर्दीचे मोर्चे कायम ठेवून निजामअल्लीवर हल्ला केला. या युद्धांत दत्ताजी शिंद्यानें अतोनात पराक्रम केला तो डोळ्यानें पाहून नुकतेच आलेले नानासाहेब पेशवे व भाऊसाहेब अत्यंत संतुष्ट झाले. मोगलांचा मोड झाला व ते उत्तरेस साखरखेर्ड्याकडे पळाले.

इकडे रामचंद्ररावाची रसद, पाणी बंद केल्यामुळें व निजाम अल्लीची मदत पोंचण्याची निराशा झाल्यामुळें तो जेरीस आला. निजाम अल्लीस तह केल्याखेरीज इलाज राहिला नाहीं. शेवटीं शिंदखेडच्या लढाईनंतर आठ दिवसांनीं (जान्युआरी १७-

५८) स्वतः नानासाहेब पेशवे यांच्याशीं साखरखेरडें मुक्कामीं निजाम अल्लीचें बोलणें होऊन उभयतांचा तह झाला. निजाम अल्लीनें पूर्वीं कबूल केलेला पंचवीस लक्षांचा मुलूख पेशव्यास जहागीर दिला व नलदुर्ग किल्ला दिला. यानंतर पेशव्यास घेऊन निजाम अल्ली औरंगाबादेस परत *आला.

निजामअल्लीस हैदराबादेची गादी मिळाल्यावर त्यानें औरंगाबाद व एलिचपूर या दोन सुभ्यांवर मशीरउल्मुल्क यास नेमलें. तो स्वतः औरंगाबादेच्या सुभ्यावर काम करीत असे. एलिचपूरचे सुभ्यावर आपले तर्फे त्यानें राजारामपंत नांवाच्या मनुष्यास नेमलें व तो एलिचपुरास येऊन काम पाहूं लागला. वऱ्हाडचे साठचाळिसीचा तह त्याचे डोळयांत खुपूं लागला व तो मोडण्याचा तो यत्न करूं लागला. जानोजीनें त्यास भेटीस बोलावून ठार मारलें.‡

बंगाल्यांत अलीवर्दीखानाचें गर्दींत मारला गेलेला सरदार भास्करराम म्हणजे भास्करराव कोलटकर याची बायको ताईबाई इला वऱ्हाडचे सुभ्याचा हक्क भोंसल्यांनीं दिला होता. ती काशीस रहात असे व तिच्यातर्फें कृष्णाजी गोविंद हे वहिवाट करीत असत. आकोल्याजवळील पंचगव्हाण व पिंजर येथील दोन जमेदारांमध्यें सोयरिकीसंबंधानें+ तंटा उत्पन्न झाला. त्यांत कृष्णाजी गोविंद यानें पिंजरकराचा पक्ष घेतला व पंचगव्हाणकरांस कैद करून त्यांजवर बराच जुलूम केला. पंचगव्हाणकरांनीं नागपुराहून ताकीद आणविली परंतु कृष्णाजीनें मानली नाहीं त्यामुळें जानोजीनें

---

* { भा. व. शकावली.
सरदेसाई मध्य. भा. २ पा. ३८५

‡नाग. भों. बखर, पा. ५९. हे प्रकार त्यावेळच्या राजकारणांत सर्व साधारण होते +देशमुख, देशपांडे यांस वऱ्हाडांत जमेदार म्हणतात.

कृष्णाजी गोविंद यास वऱ्हाडचे सुभ्यावरून काढून आपले सोयरे मानासिंगराव मोहिते यांस तें काम दिलें. त्यांचे तर्फे त्रिंबकराव कोन्हेर परभू हे वऱ्हाडचे सुभ्याचा कारभार चालवीत असत.

भोंसल्यांनीं आपले प्रांताचे चार सुभे केले होते. नागपूर, वऱ्हाड, छत्तीसगड व कटक. कटकचें सुभ्यावर भास्कररावाचे मृत्यूनंतर शिवभट साठे यांस भोसल्यांनीं नेमलें होतें व त्या दूरच्या व महत्वाच्या सुभ्याचा कारभार या भटजीनें फार वर्षे मोठ्या बहादुरीनें केला. छत्तीसगडास भोंसल्यांचे लेकवळे* मोहनसिंग भोंसले म्हणून होते. स्वतः भोंसले नागपूरच्या सुभ्याचा कारभार करीत. नागपूरच्या खालोखाल महत्वाचें ठाणें चंद्रपूर उर्फ चांदा हें होतें व तेथें भोंसल्यांचा परम विश्वासू असा किल्लेदार रहात असे. चांद्याचें ठाणें सेनाधुरंधुर मुधोजी उर्फ आप्पासाहेब यांचे वांटणीस गेलें होतें. वऱ्हाडांत भोंसल्यांचें दारव्हें हें एक मुख्य ठाणें होतें.

जानोजी व मुधोजी यांचें पुन्हां वैमनस्य आलें. मुधोजी दादासाहेब पेशवे यांजबरोबर आग्रा प्रांतीं गेले होते. तिकडून परत येत असतां खानदेशांत पारोळेकर ब्राम्हण देशमुख यांचें कर्ज मुधोजीनें पूर्वीं वस्त्रें मिळविण्याच्या प्रकरणांत सदाशिव हरी दिवाण (पारोळेकरांचे आप्त )यांचे मार्फत काढलें होतें. सदाशिव हरी हे जानोजीस मिळाले त्यामुळें पारोळेकरांनीं आपले कर्जाचा तगादा मुधोजीकडेस लावला.वरप्रमाणें मुधोजी बऱ्हाणपुराकडून खानदेशांतून वऱ्हाडांत येत असतां पारोळेकरांनीं त्यास मेजवानीकरितां बोलावलें. पारोळेकरांचा उद्देश मुधोजीस मेजवानीस आला असतां कैद करावें व आपल्या पैशाचा निकाल करून घ्यावा असा

* नाग. भोसल्यांची बखर पान ६१.

होता. हें वर्तमान मुधोजीस कळलें तेव्हां त्यानें पोटदुखीची सबब सांगून आमंत्रण नाकारलें व आपलें सैन्य आकोटाजवळ होतें तेथें रातोरात येऊन सैन्यास मिळाला.

**नांदगांवची लढाई.**

मुधोजीनें जानोजीकडील प्रमुख मराठा सरदार रघोजी करांडे यास फोडून आपलेकडे घेतलें. त्याचे मागें इतरहि सरदार आले. मोरोपंत फडणीस नांवाचा नवीन सरदार त्यानें पूर्वींच मिळविला होता. महिपतराव दिनकर हा मुरलेला मुत्सद्दी पूर्वींच त्याचेकडे होता. याप्रमाणें त्याचा जमाव वाढून एकंदर सैन्य पस्तीस हजार झालें व जानोजीजवळ फक्त आठ दहा हजार लोक व दिवाकरपंत दिवाण व सदाशिव हरी इतकेच लोक राहिले. दिवाकरपंतांनीं पिराजी नाईक निंबाळकर (पुढें पेशव्यांच्या व भोंसल्यांच्या युद्धांत प्रसिद्धीस आलेला) यास सहा हजार फौजेनिशीं चाकरीस ठेवलें व महिपतराव दिनकर याचे चुलते उमाजी विनायक यांसहि नोकरीस ठेवलें. याप्रमाणें बरोबरी करून जानोजीनें मुधोजीवर स्वारी केली. दोन्ही सैन्यांची लढाई उमरावतीजवळ नांदगांव राहाटगांव येथें झाली. कांहीं वेळ युद्ध झाल्यावर मुधोजीकडील मुख्य सरदार रघोजी करांडा याच्या बसत्या जरद्या रंगाच्या घोड्यासारखाच एक घोडा स्वाराशिवाय मोकळा सुटला. त्यावरून रघोजी करांडा पडला अशी सैन्यांत भुमका उठून सर्व सैन्याचा धीर सुटला व मुधोजींचे सैन्याचा मोड होऊन मोरोपंत फडणीस जानोजीच्या हातीं सांपडले. करांडा व मुधोजी यांनीं सावरासावर करून पुन्हां लढाई देऊन फडणीसास सोडविलें परंतु पुढें त्याची घडी नीट बसली नाहीं व तो पेशव्यांच्या कच्छपीं लागला व पुढें उभयतां बंधूंचा कसा तरी समेट झाला.

**पेशव्यांची भोसल्यांवर स्वारी* इ. १७६८-६९**

पेशव्यांचें व भोसल्यांचें केव्हांच सूत नव्हतें. दादासाहेबांस आंतून भोंसले मदत करीतच होते. शिवाय मोंगलहि पेशव्यांच्या विरुद्ध असल्यामुळें त्यांच्या शत्रूस मदत करण्यास नेहमीं तयार असत. दादासाहेबास त्यांचीहि मदत करण्याची नेहमीं तयारी होतीच. अर्थातच पेशव्याविरुद्ध मोंगल व भोंसले एक होण्यास वेळ लागला नाहीं. राक्षसभुवनचे लढाईपूर्वीं भोंसल्यानें निजामाचे मदतीस लष्कर सुद्धां पाठविलें होतें. तेव्हां पेशव्यांनीं निजामाकडील येईल तो निम्मे मुलूख देण्याची लालूच दाखवून मोठ्या प्रयासानें त्यास मल्हारराव होळकरामार्फत मोंगलाकडून फोडलें व निजामाकडून औरंगाबादेच्या तहांत मिळालेल्या पासष्ट लक्षांच्या मुलखापैकीं निम्मे मुलूख बत्तीस लक्षांचा भोंसल्यास दिला. त्यांत मेहकर व साखरखेरड्यापर्यंत मुलूख भोंसल्याकडे आला.

पेशव्यांच्या पोटांत हें खुपतच होतें. दादासाहेबांस पळून जाण्यास मदत करणाऱ्या लोकांस शिक्षा करण्याकडे माधवराव पेशव्याचें सर्व लक्ष या वेळेस होतें. गोविंदराव गायकवाडाकडून तेवीस लक्ष रुपये दंड घेतला तेव्हां त्यास सरदारीचीं वस्त्रें दिलीं. आतां फक्त जानोजी भोंसले राहिला. त्यास शिक्षा करतांना निजाम कोणते तरी पक्षास मिळणार तेव्हां त्यास आपण आधीं मिळवून घेणें जरूर होतें. निजामाचा डाव या घरगुती तंट्यांत नेहमीं उजवाच पडत गेला. त्याला स्वतःच्या फायद्याशिवाय मराठ्यांच्या घरगुती राजकारणाशीं कांहींच कर्तव्य नव्हतें. इ. स.

---

* ऐ. लेखसंग्रह भाग ३ पान १३२३ ते १३७० व नागपूरकर भों. बखर. पृ. ७५-७६.

१७६६ चे भोंसल्यावरील पहिल्या स्वारींतहि त्यानें याप्रमाणें पेशव्यांस मदत करून आपलें सैन्य पेशव्यांचे सैन्याबरोबर पाठविलें. आतां पुन्हां पेशव्यानें त्यास मदत मागितली. त्यानें रुकनुद्दौला व रामचंद्रराव जाधव यांस सात आठ हजार फौज देऊन पाठविलें. ही फौज औरंगाबादेच्या सुमारास पेशव्याचे फौजेस मिळाली. भोंसल्यांच्या भावाभावाच्या भांडणांत जानोजीचे मदतीस असलेला सरदार पिराजी नाईक निंबाळकर हाहि पेशव्यांकडून होता. एकंदर पेशव्यांचा जमाव साठ हजारांपर्यंत झाला व सर्व सैन्य औरंगाबादेहून वाशीमपर्यंत घाटानें आलें.*

जानोजीस ही बातमी समजतांच त्यानें देवाजीपंतास पुण्यास पाठविलें. त्यास पंतप्रधान मध्येंच भेटले. देवाजीपंतानें सर्व मजकूर जानोजीस कळविला व तयारींत राहण्याची सूचना केली. त्यानें सर्व भावांशीं सलोखा केला व नागपुराबाहेर फौज जमवून तळ दिला. जडजवाहीर व मुलें माणसें गाविलगड किल्ल्यावर नेऊन ठेवलीं व आपण रामटेकास आला. पेशव्यांच्या एवढ्या मोठ्या सैन्याशीं तोंडांवर लढाई देणें आपणांस शक्य नाहीं हें त्यानें ओळखलें व गनिमी काव्यानें लढण्याचा त्यानें निश्चय केला. जानोजी हा कसलेला शिपाई व मुत्सद्दी होता. देवाजीपंतास

---

* या स्वारीचा मार्ग ऐ. ले. सं. भा. ३ लेखांक ७८१, ७८२ वरून दिसेल. गांवांचीं नांवें शक्य तितकीं दुरुस्त करून घेतलीं आहेत. इ. स. १७६९ च्या जान्युआरीमध्यें म्हणजे पौष महिन्यांत हा प्रवास झाला. बीड, पाथरी, नडसी, बामणी, कळमनुरी, (वाशीम), मंगरूळ पीर ( मूळांत पाचा पिराचे ), पिंजर, कारंजा, उमरावती, वरूड, आमनेर, भंडारा, नागपूर, पांढरकेवडा.

माधवराव पेशव्यानें नजरकैदेंत आपल्या सैन्याबरोबर ठेविलें होतें, तरी तो सर्व बातम्या जानोर्जीस कळवीत असे.*

इकडे पेशव्यांनीं वऱ्हाडांत भोंसल्यांचे जे हक्क होते ते व इनाम जहागिरी जप्त केल्या. गोपाळराव व रामचंद्र गणेश पटवर्धन यांनीं वर्धेच्या कांठचा‡ आमनेरचा किल्ला सर केला व तें शहर लुटून फस्त केलें. तेथून भंडाऱ्याचा किल्ला घेतला व नागपुरास येऊन नागपूर †जाळलें.

**आमनेर व भंडारा घेतला.**

जानोजी व त्याचे भाऊ आपलें दुय्यम ठाणें चंद्रपूर येथें परभारे गेले व तेथें माहिपतराव दिनकर परभू हा विश्वासांतला किल्लेदार होता त्यास ठेवून बंदोबस्त करून राहिले. माहिपतरावाचे चुलते उमाजी विनायक व भाऊबंद सखाराम हरी, बाबूराव हरी व सोयरे चिटणीस वगैरे मंडळी पेशव्यांच्या लष्करांत होती म्हणून माहिपतराव त्यांचे मार्फत फितूर होईल ही शंका जानोर्जीस आली परंतु सेनाधुरंधर मुधोजी यास तो गृहस्थ पक्का इमानी म्हणून माहीत होता. त्यानें त्याची खात्री दिली व ती अखेर खरी ठरली.

**चंद्रपूरचा वेढा.**

माधवराव पेशवे यांनीं पांढरकेवड्यास तळ दिला व पुढची बिनी चंद्रपुरावर पाठविली. बिनीवाल्यांनीं चंद्रपुरास वेढा

---

* बुद्धिबळाच्या खेळाच्या द्वारें दोन शहाणे एकमेकांस सूचना देत तो प्रसंग याच वेळचा आहे.

‡ ऐ. ले. त अमळनेर आहे तें चुकीचें आहे. आमनेर पाहिजे.

† नाग. भों. बखर. पान ७५ ऐ. ले. त नागपुर घेतल्याचा व जाळल्याचा उल्लेख नाहीं.

देऊन आंत पत्रें ब्राम्हणांस पाठविलीं कीं "आम्हीं देव ब्राम्हणांचे भक्त आहों. तुम्हांस उपसर्ग न व्हावा याकरितां तुम्ही निघून जावें. आमचे जवळ पंधराशें तोफा आहेत. एक दोन घटकेंत चंद्रपूर घेतलें जाईल. आम्ही आल्यावर कठीण जाईल." परंतु आंतील लोकांचा महिपतरावाच्या शौर्यावर विश्वास भारी. कोणीहि बाहेर गेलें नाहीं. जानोजी व मुधोजी हे पेशवे येतात असें पाहून माहुराकडेस निघून गेले व तेथून खबरा मागवीत बसले. जानोजीच्या अंदाजाप्रमाणें पेशव्यांनीं महिपतरावास फोडण्याचा प्रयत्न करून पाहिला. उमाजी विनायक, बाबूराव व सखाराम हरी यांना सांगितलें कीं "देशीं पंचवीस हजारांची जहागीर महिपतरावास देतों. किल्ला आमचे स्वाधीन करावा." त्रिवर्गानें उत्तर केलें कीं, हें शक्य नाहीं. महिपतराव जिवंत आपलेजवळ येणार नाहीं. माधवरावानें चंद्रपूरच्या वेढेवाल्यांचे मदतीस पंचवीस हजार लष्कर पाठविलें, त्याचप्रमाणें भोंसल्यांचा बाकीचा उघडा मुलूख वऱ्हाडांत होता तो घेण्याकरितांहि कांहीं * टोळ्या रवाना केल्या. याचप्रमाणें वेढा देणारे आपले लष्कराचे पिछाडीस जानोजी मोकळा होता त्याचेकडून छापे वगैरे येऊ नयेत म्हणून किल्ल्यापासून मागें नऊ कोसांवर गोपाळराव पटवर्धन मिरजकर यांस ठेवलें व आपण पांढरकवड्यास राहिले.

इकडे महिपतराव, जानोजी व पेशव्यांच्या कैदेंत असलेला त्यांचा मुत्सद्दी देवाजीपंत यांचा गुप्त पत्रव्यवहार व कारस्थानें चालूच होतीं. महिपतराव शूर होता. तरी लष्कर फक्त

---

* या टोळ्यांपैकीं एका टोळीनें पंचगव्हाण मुक्कामीं भोंसल्याचे सरदार नरहरपंत रिसबूड व बापू करांडा यांजवर हल्ला केला. नरहरपंत लढाईत पडला व करांडा पंचवीस स्वारांनिशीं पळून गेला.

पांच सहा हजार. सामोरे होऊन लढाई देणें कठीण. जें काय होईल तें युक्तीनेंच होईल. तेव्हां जानोजीनें ठरविलें कीं, पुण्यास शह दिला म्हणजे इकडील कारस्थान टाकून पेशवे आपोआपच पुण्याकडे पळतील व इकडचा उपद्रव नाहींसा होईल. पुण्यास पेशव्यांचे विरुद्ध कारस्थानी पुरुष व दादासाहेब संधि पहातच होते. तोहि धाक पेशव्यांस होताच. तेव्हां तिकडे हुलकावणी दाखविली कीं आयतेंच काम होईल असें जानोजीनें ओळखलें. परंतु हुलकावणीचें पाठीमागें थोडाबहुत तरी आधार पाहिजे. नुसत्या तोंडी हुलकावणीस कोण भितो ? पेशव्यांचे हेर सर्वत्र जानोजीच्या टेहळणीवर होतेच. पुरेसें लष्कर घेऊन दोन चार मुक्काम पुण्याकडे गेले कीं ती बातमी पेशव्यांस समजून चंद्रपूरचा वेढा उठेल ही जानोजीस खात्री होती. पण जमवाजमव करण्यास व कांहीं मुक्काम पुढें निघून जाण्यास कांहीं वेळ पाहिजे होता. त्यापूर्वीं किल्ला पडल्यास सर्वच मसलत व्यर्थ. तसेंच एक दोन मुक्कामांतच बातमी कळल्यास एकदम रिकामी फौज आंगावर येऊन गांठील सबब त्यांनीं खालील युक्ति योजली.

देवाजीपंत पेशव्यांच्या कैदेंत होते. उमरावतीच्या मुक्कामापासूनच त्यानें माधवरावाशीं बोलणें चालविलें होतें कीं, भोंसल्याकडून पंधरा लक्ष रुपये देववितों, तह करावा. परंतु पेशव्यांच्या मनांत भोंसल्याची पुरी खोड मोडावयाची होती. त्यामुळें ते ऐकेनात. महिपतरावानें एके दिवशीं किल्ल्याबाहेर पांच हजार लष्करानिशीं येऊन लढाई देऊन पेशव्यांचे पन्नास साठ घोडे पाडाव करून नेले व रात्रीं गुप्त पत्र देवाजीपंतास लिहिलें कीं “ पेशव्यांच्या लष्करापुढें किल्ला आठ चार दिवसांपेक्षां जास्त दिवस टिकाव धरील असें नाहीं परंतु भोंसले पुण्यापर्यंत जाईतों टिकाव

धरला पाहिजे. तरी तुम्ही आठ चार दिवस पेशव्यांस चंद्रपुराकडेच झुलवावें. चंद्रपुरचा किल्ला पडला कीं भोंसल्यांचें सर्व राज्य हस्तगत झाल्यासारखें आहे असें सांगावें म्हणजे ते त्याच नादीं राहतील. आम्हीहि आठ चार दिवस किल्ला झुंजवितों. तितक्यांत भोंसले पुण्यास जाऊन दादासाहेबांस सोडवून पुणें लुटतात. वरील बातमी कळतांच वेढा सोडून पेशवे पुण्याकडे जातील व तिकडचेंहि कार्य दादासाहेबांस सोडविण्याचें पूर्ण होईल."

वरील मनसुब्याप्रमाणें जानोजी जमावासह माहुराहून उमरखेडच्या मुक्कामास आला. इकडे वरील गुप्त पत्र चौकीवर धरलें गेलें व सर्व बेत उघडकीस आला. पेशवे घाबरले. तिकडे जानोजी उमरखेडापर्यंत पोहोंचल्याची बातमी आली. किल्ला सर करून मग जावें तर महिपतरावानें पांच हजार लष्करानिशीं तोंड दिलें तर आठ दिवस तरी किल्ला खास पडूं देणार नाहीं ही खात्री. चोहोंकडून वर्तमान येऊं लागले कीं, भोंसले पुणें जाळणार व दादासाहेबांस सोडविणार. पेशव्यांच्या डोळ्यांपुढें सर्व भयानक स्वप्नें दिसूं लागलीं. दादासाहेब व त्यांचे साथीदार प्रतिनिधी वगैरे मंडळी मोकळी झाली म्हणजे साताऱ्याच्या राजमंडळाशीं कांहीं तरी खलबत करणार. भोंसल्यांचें साताऱ्यास थोडेंबहुत सूत होतेंच. इकडील कांहीं सरदारहि फुटण्याचा संभव. रुकनुद्दौल्ला व रामचंद्र राव जाधव यांचें भोंसल्याशीं पूर्वींपासून थोडेंबहुत सूत होतेंच. व तसा संशय पेशव्यास पूर्वींच येत असे. कारण पेशव्याबरोबर आपल्याच्यानें इतक्या लांब लांब मजला होत नाहींत, अशा सबबीवर ते नेहमीं मागें राहून ऐन प्रसंगीं उपयोगी कधींच पडत नसत. नुसते निमित्तास आले होते. कदाचित् इंग्रज सुद्धां दादासाहेबांचे कारस्थानांत पडणार. आपण होऊन भोंसल्याशीं तह करावा तरी फजितीच.

ही सर्व भीति उत्पन्न होतांच पेशव्यांनीं गोपाळराव व रामचंद्र गणेश पटवर्धन यांस पंचवीस हजार फौजेनिशीं प्रथम जानोजीच्या पाठीवर पाठविलें व आपण चांद्याचा वेढा उठवून व कांहीं लष्कर वऱ्हाडच्या बंदोबस्ताकरितां ठेवून स्वतः लांब लांब मजला मारीत जानोजीच्या मागें लागले. याप्रमाणें पत्र शत्रूचे हातीं सांपडावें ही इच्छा नसतांहि तें सांपडल्यामुळेंच भोंसल्याचें जास्त काम झालें.

इकडे पुण्याची स्थिति फारच वाईट झाली. पेशव्यांनीं पुण्यास नाना फडणीसास जासूद पाठवून कळविलें कीं, भोंसले पुण्यावर येणार तर जडजवाहीर व मुलें माणसें व दादासाहेब वगैरे मंडळी सिंहगडास पाठवावीं. नानांनीं जामदारखाने वगैरे बंद करून जडजवाहीर व पेशव्यांच्या घरच्या बायकांस सिंहगडास पाठविलें. दादासाहेब जाईनात. मोठ्या प्रयासानें किल्ल्याच्या पायथ्याशीं आले. नानांनीं सर्व बातमी गुप्त ठेवली. लष्करांतून घरीं पत्रें आलीं होतीं तीं कोणासच दिलीं नाहींत, तरी बातमी फुटावयाची राहिली नाहीं. सर्व पळापळ सुरू झाली. ता. २[illegible] फेब्रुआरीस अर्ध्या रात्रीपर्यंत सर्व पुणें फुटलें. दरमैलास पंचवीस रुपये भाडें पडूं लागलें. गांव ओस पडला.

इकडे पटवर्धनांचें व जानोजीचें पंचवीस कोसांचें अंतर राहिलें तोंच मागाहून पेशवेहि आपल्या जड सामानासह पटवर्धनामागें पंचवीस कोसांवर आले. लांब लांब मजला मारल्यानें मूत्रांतून रक्त जाऊं लागून पेशवे आजारी पडले. मोंगलाई फौज लांब मजला होत नाहींत या सबबीवर मागें राहिली ती पुन्हां पुढें आलीच नाहीं.

चांद्याचा वेढा उठला व दोन्ही लष्करें जवळ आलीं हें पाहतांच आपलें कार्य झालें असें पाहून जानोजी उलटून पूर्वेस

मोंगलाईंत निर्मळच्या रोखानें गेला. पटवर्धनही माहूरचा घाट चढून त्याचे मागें गेले. जानोजी इंदूरपासून ( बोधन ) बेदरपर्यंत जाऊन लुटालूट करूं लागला. पेशवे माहुराहून पाथरी येथें आपलें जड सामान ठेवून सडे जानोजीच्या पाठीस लागले. जानोजीचा सरदार बापू करांडा यानें एकदां आडवाटेनें जाऊन पेशव्यांचें बुणगें लुटलें. जानोजीनें पेशव्यांचें लष्करास हुलकावण्या देत देत मोंगलाईंत पश्चिमेकडेस नेलें व आतां आपलें काम झालें व आतां जास्त लांब गेल्यास आपण कोंडले जाऊं हें पाहून तो नागपूरच्या मार्गास लागला तों खरोखरच पेशव्यांच्या व पटवर्धनांच्या लष्करानें घेरला गेला. शेवटीं दोन्ही पक्ष कंटाळून व एकमेकांस भिऊन तह करण्यास राजी झाले. शेवटीं देवाजीपंताचे व गोपाळराव पटवर्धनाचे मार्फतीनें तह करण्याचें व पेशवे व भोंसले यांच्या भेटी होण्याचें ठरलें व कच्च्या शर्ती ठरल्या. त्यावेळीं पेशवे निर्मळ येथें होते. ही गोष्ट एप्रिलचे आरंभीं झाली.

पेशवे आवंढे नागनाथास देवदर्शनाकरितां गेले व देवाजीपंतास जानोजीकडे पाठविलें. दोघांच्या भेटी वाशीम येथें होण्याचें ठरलें. देवाजीपंत फितूर करील म्हणून गोविंद शिवराम खाजगीवाले यांस पेशव्यांनीं त्याचे मागोमाग पाठविलें. कारण पेशवेहि तह करण्यास उतावळे झाले होते. पावसाळा जवळ आला होता. हिंदुस्थानांत फौज रवाना होण्याची राहिली होती. पुण्यास पहिल्या बातमीच्या मागोमाग सांडणीस्वार पाठविले कीं, भोंसले पुण्यावर येत नाहींत, तेव्हां थांबाथांब झाली व सर्व लोक परत आले.

भोंसले, देवाजीपंत व खासगीवाले यांसह वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तानें निघून वाशीम येथें आले. माधवराव पेशवेहि पूर्वींच आले होते. उभयतांच्या भेटी झाल्या. उभयतांचा मानसन्मान

झाल्यावर पेशवे पुण्यास जाण्याकरितां परत फिरले. कच्च्या शर्ती-प्रमाणें पक्का तहनामा भिमातीरीं ब्रह्मेश्वरानजीक कनकापूर येथें झाला. त्याच्या शर्ती:—

१ जानोजीस पेशव्यांनीं १७६३ इ. मध्यें जी बत्तीस लक्षांची जहागीर दिली होती त्यापैकीं इ० स० १७६६ चे स्वारींत चोवीस लक्षांची परत घेतली. आतां आठ लक्षांची राहिली ती पेश-व्यांस परत द्यावी.

२ अक्कलकोटकर शहाजी भोंसले यांचे कांहीं हक्क व उत्पन्नें वऱ्हाडांत होतीं तीं जानोजीनें जप्त केलीं होतीं तीं खुलीं करावीं.

३ पेशवाई मुलखापैकीं औरंगाबाद सुभ्यांत व मोंगलाईंत जानोजीनें फौज पाठवून परभारें जबरीनें घांसदाणा वसूल करूं नये. पेशवे आपल्या अधिकाऱ्याकडून वसूल करून जानोजीस देववितील. मोंगलांचा मात्र सामोपचारानें न मिळाल्यास भोंसल्यांनीं जबरदस्तीनें घ्यावा.

४ पेशवे बोलावतील तेव्हां भोंसल्यांनीं सैन्यासह चाकरीस हजर असावें.

५ पेशव्यांचे परवानगीशिवाय फौज वाढवूं अगर कमी करूं नये.

६ फितुरी लोकांस मदत करूं नये.

७ दुसरे संस्थानिकांशीं पेशव्यांचे परवानगीशिवाय सख्य करूं नये.

८ दरसाल पांच लक्ष रुपये खंडणी द्यावी.

९ हिंदुस्थानांत पेशव्यांची फौज जाईल ती जुन्या वाटेनें जावी, नवीन वाट पाडूं नये.

१० जानोजी भावांचें यथास्थित चालवील तोंपर्यंत पेशव्यांनीं त्याचे गृहकलहांत पडूं नये.

११ भोंसल्यांवर परचक्र आल्यास पेशव्यांनीं मदत करावी.

याप्रमाणें पेशव्यांचें व भोंसल्यांचें भांडण मिटलें.

याच सुमारास काळूंचें घराणें उदयास आलें. जानोजीचा भाऊ साबाजी याजपाशीं त्याचा दिवाण वऱ्हाडांतील घाटावरील राहणारा महिपतराव नरसिंह धारूरकर म्हणून होता. त्यानंतर राजाराम वाळके म्हणून कारभारी झाला. त्याचे मामा गणेश काळू व भवानी काळू म्हणून मंगरूळ तालुक्यांतील खडी धामणी या गांवाचे वतनदार पटवारी होते ते वाढत वाढत राजारामपंताचे मार्फतीनें साबाजीच्या नजरेस आले, व त्यांनीं कर्तबगार जाणून त्यांस आपले नोकरीस ठेवलें. त्यांत भवानी काळू लौकरच साबाजीचे दिवाण झाले. माधवराव पेशव्यांनीं साबाजीशीं जानोजीविरुद्ध संगनमत चालविलें तेव्हां साबाजीचें मन फिरून तो पेशव्यास मिळण्यास निघाला. भवानी काळू बरोबर होता, त्यानें युक्तीनें पुष्कळ बोध केला व साबाजीस परावृत्त केलें. तसेंच जानोजी व दिवाकरपंतासही लिहून उपाय करण्यास सांगितलें. त्यामुळें वेळींच सावध होऊन जानोजीनें आपली बायको दर्याबाई इला पाठविलें. तिनें दीराची समजूत घालून परत आणलें. यामुळें जानोजीची व देवाजीपंताची मर्जी भवानी काळूवर विशेषच बसली. साबाजीचीहि होतीच. जानोजीनें त्यास साबाजीजवळून मुद्दाम मागून आपलेकडे घेतलें.

**काळू घराणें.**

पुढें कटक व ओडिसा येथील सुभेदार शिवभट साठे यांनीं सुभ्याचा सर्व वसूल खर्च केल्यामुळें त्यांवर भोंसल्यांची इत-

राजी झाली असतां त्यांनीं भवानी काळूस त्या सुभ्यावर पाठविलें. कांहीं दिवस काम करून परत नागपुरास आल्यावर त्याजवर एक लाख रुपये खाल्लयाचा आरोप आला होता. परंतु साबाजीनें मध्यस्थी केली कीं, आमचा विश्वासू मनुष्य घेऊन त्याजवर अशी तोहमत लोकांचे सांगण्यावरून आणली हें बरें नाहीं. त्यामुळें भवानी काळू वांचले. पुढें ते भोंसल्याचे फौजेचे मुख्य अधिकारी व बक्षी होऊन त्यांनीं मोठमोठीं कामें केलीं. त्यांचे पुतणेहि प्रसिद्धीस आले. हल्लीं त्यांची सहावी पिढी वाशीम व नागपूर येथें आहे.

भोंसल्यावरील स्वारीचे प्रकरणांत देवाजीपंतावर पेशव्यांची फारच इतराजी झाली, म्हणून जानोजीनें दिवाणगिरी भवानीपंत मुनशी यास दिली व फौजेचा अधिकार भवानीपंत काळू यास दिला. भवानी काळू हे अखेरपर्यंत देवाजीपंताचे पक्षाचे होते. भवानीपंत मुनशीनें मात्र देवाजीपंताचे विरुद्ध कामें केलीं.

जानोजीनें मुधोजीचा पुत्र रघोजीबापूसाहेब यास दत्तक घेतलें होतें व त्यास जरीपटक्याचें नवीन निशाण करून देऊन त्यास व आपली बायको दर्याबाई यांस आकोटास ठेवलें व कारभारी व्यंकटराव काशी यांस ठेवलें. जानोजीचा व एलिचपूरकर नबाब इस्मायलखान यांचा फार लोभ असे. त्यानें व जानोजीनें पेशव्यांकडे जाऊन सदरहू दत्तक मंजूर करून घेतले.

जानोजी इ० स० १७७२ (वैशाख शु. १९ फसली सन ११८१) मध्यें बालेघाटाकडे मरण पावला. त्यानंतर दुसरा रघूजी गादीवर बसला.

जानोजीचे मरणाचे वेळीं रघूजी—ज्यास बापूसाहेब म्हणत

दुसरा रघूजी.

तो वयानें लहान असून जानोजीची बायको दर्याबाई इजजवळ आकोटास रहात

असे. जानोजीचा भाऊ साबाजी हाहि तेथेंच होता. मुधोजीनें आकोटास जानोजीच्या मरणाचीं पत्रें लिहिलीं व दर्याबाईस मोठेंपण देऊन गौरवानें लिहिलें कीं, सर्वपरी मालक तुम्हींच आहांत. रघूजी हा मुधोजीचा पुत्र अर्थात् सर्व अधिकार मुधोजीकडे जाणार हें साबाजीस व दर्याबाईस कळून चुकलें. त्यांनीं एक विचार केला. मुधोजी बालेघाटाकडेस जानोजी-बरोबर होता तो आकोटास दर्याबाईस भेटण्यास व पुढील विचार ठरविण्यास आला. तेथें येण्यापूर्वींच आकोट येथील विश्वासू दिवाण त्र्यंबकटराव काशी यानें मुधोजीस दर्याबाईचा व साबाजीचा मिलाफ झालेला कळविला होता सबब मुधोजी आकोटापासून दूर अंतरावर मुक्काम करून सर्व फौज व इतर मंडळी आकोटास गेली. साबाजी आकोटाहून मुधोजीच्या मुक्कामावर भेटीस आला व मुधोजीस घेऊन दर्याबाईच्या भेटीस रात्रीं आकोटास गेले. दुःखाच्या गोष्टी झाल्यावर दोन चार दिवसांनीं दर्याबाईनें मुधोजीस सांगितलें कीं, तुम्हीं पूर्ववत् चंद्रपूरचें ठाणें संभाळावें आम्हीं बापूसाहेबांस घेऊन नागपुरास जातों. मुधोजीसहि नागपूरचें मुख्य ठाणें व सर्व अधिकार हवा होता.

एलिचपुरचे नबाब इस्मायलखान यांचा भोंसल्याशीं फार भाऊपणा होता तोहि आकोटास जानोजीच्या मृत्यूनिमित्त भेटीकरितां आला होता. त्याचे मध्यस्थीनें ठरलें कीं, मुधोजीनें मुलास ( रघूजीस ) घेऊन चंद्रपुरास जावें. दर्याबाईनें आपण गरोदर असल्याचेंहि खूळ काढलें. शेवटीं मुधोजी रघूजीस घेऊन चंद्रपुरास निघून गेला. दर्याबाई, साबाजी व त्यांस मिळालेले भवानीपंत मुनशी हे नागपुरास गेले.

मुधोजी उर्फ आपासाहेब हा चंद्रपुरास गेला खरा परंतु नागपुराचा कारभार आपले हातांत यावा ही इच्छा त्यास सोडीना. भोंसल्यांच्या सर्व सत्तेचें केंद्र नागपूर. शेवटीं चंद्रपूरचा विश्वासू सुभेदार महिपतराव दिनकर यास व धाकटा मुलगा व्यंकोजी-राव भोंसले यांस मुधोजीनें नागपुरास पाठविलें व कोणकोण मंडळी आपणास अनुकूल होतील त्याचा शोध काढण्यास सांगितलें. महिपतराव मुधोजीचे हवेलींत उतरले व व्यंकोजी दर्याबाईकडे गेले. प्रसिद्ध माणसांपैकीं भवानीपंत मुनशी व साबाजीचे कारभारी भवानी शिवराम हे खेरीज करून सर्वांनीं महिपतरावास आश्वासन देऊन सांगितलें कीं, आम्ही मुधोजीच्या पक्षास अनुकूल आहोंत सैन्याचे अधिकारी व बक्षी भवानी काळू, भोंसल्यांचे मुख्य सोयरे गुजर, शूर सरदार शिवाजीपंत टाळकुटे वगैरे सर्वांनीं नागपूरचे बुधवारपेठेंतील जागेश्वराचे देवळांत जाऊन महिपतरावाचे हातावर बेल उचलून दिला. भवानीपंत मुनशी व दर्याबाई यांसहि महिपतरावानें समजाविलें परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. देवाजीपंत कैदेंतच होते. त्यांची भेट होणें शक्य नव्हतें. व्यंकोजी आधींच निघून गेला. महिपतरावास संताजी नाईक ( बातमी खात्याकडील ) यांनीं बातमी दिली कीं, महिपतरावास कैद करणार आहेत तेव्हां सर्व सामानसुमान टाकून देऊन महिपतराव रातोरात गाडींत बसून चंद्रपुरास निघून गेले.

विजयादशमीचे मुहूर्तानें मुधोजीनें बाहेर पडण्याचा निश्चय केला चंद्रपूरचा बंदोबस्त करून महिपतराव दिनकर यास समागमें घेऊन कायर वेरीवरून *एदलाबादेस गेले. पलीकड

*माहूरचे दक्षिणेस, निजामाचे राज्यांत.

निर्मळ येथें मोंगलांचा सरदार जफीरुद्दवला उर्फ धवसा हा होता. त्याचें व मुनशीचें सूत होतें म्हणून त्यास आधींच मिळवून घेतलें व नंतर तो माहुराहून वऱ्हाडांत आला. नागपुरास सूचना जातांच भवानी आटोळे, गोविंदराव मुगुटराव, शिवाजीपंत टाळकुटे, जगदेवराव गुजर वगैरे सरदार आपआपले जमावांनिशीं मुधोजीस वऱ्हाडांत येऊन मिळाले. वऱ्हाडांतील भोंसल्यांचा सरदार खंडूजी करांडे हाहि मिळाला. निंबाळकर, घाटगे, घोरपडे वगैरे सरदार देशांतून साबाजीनें मुद्दाम बोलावले होते. ते तिकडे जात असतां मध्येंच मुधोजीनें जास्त लालूच दाखवून आपणाकडे घेतले.

आतां एलिचपूरचे नबाब राहिले. दर्याबाई व साबाजी यांनीं भवानीपंत मुनशी यांस इस्मायलखान भाई नबाब यांजकडेस पाठविलें. मुधोजीकडून महिपतरावही तेथें येऊन पोहोंचले. इस्मायलखान याचा ओढा मुधोजीकडे जास्त पण ते दोघांचेहि भाई पडले. पूर्वींपासून ऋणानुबंध, त्यामुळें उघडपणें एका पक्षास घरच्या भांडणांत मिळण्यास त्याचें मन होईना. शेवटीं वेडेपणाचें निमित्त करून त्यानें दोघांसहि लावून दिलें.

अखेरीस मुधोजीजवळ पंचवीस हजार व साबाजीजवळ वीस हजार फौज जमली. मुधोजीनें "लक्ष्मीकांत" अक्षराचें निशाण उभारून सेनासाहेबाचे नांवाचीं पत्रें सुरू केलीं. मुधोजीचें सेनाधुरंधर नात्यानें जें निशाण होतें त्यावर "सीताकांत" अशीं अक्षरें असत. आकोल्याजवळ कुंभारी म्हणून गांव आहे तेथें या दोघा भावांची लढाई झाली.

**कुंभारी येथील लढाई इ० स० १७७३.**

मुधोजीचा निशाणाचा हत्ती मदारी नांवाचा होता त्यास साबाजीचे निशाणाचा हत्ती बीरबाली

मुधोजी उर्फ आपासाहेब हा चंद्रपुरास गेला खरा परंतु नागपुराचा कारभार आपले हातांत यावा ही इच्छा त्यास सोडीना. भोंसल्यांच्या सर्व सत्तेचें केंद्र नागपूर. शेवटीं चंद्रपूरचा विश्वासू सुभेदार महिपतराव दिनकर यास व धाकटा मुलगा व्यंकोजीराव भोंसले यांस मुधोजीनें नागपुरास पाठविलें व कोणकोण मंडळी आपणास अनुकूल होतील त्याचा शोध काढण्यास सांगितलें. महिपतराव मुधोजीचे हवेलींत उतरले व व्यंकोजी दर्याबाईकडे गेले. प्रसिद्ध माणसांपैकीं भवानीपंत मुनशी व साबाजीचे कारभारी भवानी शिवराम हे खेरीज करून सर्वांनीं महिपतरावास आश्वासन देऊन सांगितलें कीं, आम्ही मुधोजीच्या पक्षास अनुकूल आहोंत सैन्याचे अधिकारी व बक्षी भवानी काळू, भोंसल्यांचे मुख्य सोयरे गुजर, शूर सरदार शिवाजीपंत टाळकुटे वगैरे सर्वांनीं नागपूरचे बुधवारपेठेंतील जागेश्वराचे देवळांत जाऊन महिपतरावाचे हातावर बेल उचलून दिला. भवानीपंत मुनशी व दर्याबाई यांसहि महिपतरावानें समजाविलें परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. देवाजीपंत कैदेंतच होते. त्यांची भेट होणें शक्य नव्हतें. व्यंकोजी आधींच निघून गेला. महिपतरावास संताजी नाईक ( बातमी खात्याकडील ) यांनीं बातमी दिली कीं, महिपतरावास कैद करणार आहेत तेव्हां सर्व सामानसुमान टाकून देऊन महिपतराव रातोरात गाडींत बसून चंद्रपुरास निघून गेले.

विजयादशमीचे मुहूर्तानें मुधोजीनें बाहेर पडण्याचा निश्चय केला चंद्रपूरचा बंदोबस्त करून महिपतराव दिनकर यास समागमें घेऊन कायर वोरीवरून *एदलाबादेस गेले. पलीकड

*माहूरचे दक्षिणेस, निजामाचे राज्यांत.

निर्मळ येथें मोंगलांचा सरदार जफीरुद्दवला उर्फ धवसा हा होता. त्याचें व मुनशीचें सूत होतें म्हणून त्यास आधींच मिळवून घेतलें व नंतर तो माहुराहून वऱ्हाडांत आला. नागपुरास सूचना जातांच भवानी आटोळे, गोविंदराव मुगुटराव, शिवाजीपंत टाळकुटे, जगदेवराव गुजर वगैरे सरदार आपआपले जमावांनिशीं मुधोजीस वऱ्हाडांत येऊन मिळाले. वऱ्हाडांतील भोंसल्यांचा सरदार खंडूजी करांडे हाहि मिळाला. निंबाळकर, घाटगे, घोरपडे वगैरे सरदार देशांतून साबाजीनें मुद्दाम बोलावले होते. ते तिकडे जात असतां मध्येंच मुधोजीनें जास्त लालूच दाखवून आपणाकडे घेतले.

आतां एलिचपूरचे नबाब राहिले. दर्याबाई व साबाजी यांनीं भवानीपंत मुनशी यांस इस्मायलखान भाई नबाब यांजकडेस पाठविलें. मुधोजीकडून महिपतरावही तेथें येऊन पोहोंचले. इस्मायलखान याचा ओढा मुधोजीकडे जास्त पण ते दोघांचेहि भाई पडले. पूर्वींपासून ऋणानुबंध, त्यामुळें उघडपणें एका पक्षास घरच्या भांडणांत मिळण्यास त्याचें मन होईना. शेवटीं वेडेपणाचें निमित्त करून त्यानें दोघांसहि लावून दिलें.

अखेरीस मुधोजीजवळ पंचवीस हजार व साबाजीजवळ वीस हजार फौज जमली. मुधोजीनें "लक्ष्मीकांत" अक्षराचें निशाण उभारून सेनासाहेबाचे नांवाचीं पत्रें सुरू केलीं. मुधोजीचें सेनाधुरंधर नात्यानें जें निशाण होतें त्यावर "सीताकांत" अशीं अक्षरें असत.

**कुंभारी येथील लढाई इ० स० १७७३.**

आकोल्याजवळ कुंभारी म्हणून गांव आहे तेथें या दोघा भावांची लढाई झाली. मुधोजीचा निशाणाचा हत्ती मदारी नांवाचा होता त्यास साबाजीचे निशाणाचा हत्ती बीरबाली

नांवाचा होता त्यानें टक्कर दिली व मदारीवरील निशाण खालीं आलें त्यावरून मुधोजीच्या सैन्यांत गडबड उडाली व त्याचें सैन्य किंचित् हटलें. पुढें दोन दिवस मध्यस्थांचे सांगण्यावरून लढाई बंद राहिली. नंतर साबाजी व मुधोजी या दोघांनींहि रघूजीच्या नांवानें कारभार करावा असें ठरलें. या गडबडींत मुधोजीनें दर्याबाईस फोडून आपणाकडे आणलें.

साबाजी व मुधोजी एक झाल्यावर वास्तविक कांहींच भांडण उरलें नाहीं. परंतु मुनशीच्या करामतीनें पुन्हां तंटा उभा राहिला. मोंगल सरदार धवशा हा आशेनें मुधोजीच्या मदतीस एलिचपुराकडे आला परंतु भांडण मिटल्यामुळें मुधोजीनें त्यास परत जाण्यास सांगितलें. तें त्यास बरें वाटलें नाहीं इकडे मुनशीनें साबाजीस फितवून आयते धवसे आले आहेत त्यांची मदत घेऊन कार्य करा असा उपदेश केला. साबाजीनें त्याप्रमाणें धवशे याची मदत घेऊन मुधोजीवर चाल केली. मुधोजीनें एलिचपूरचे इस्मायलखानाची मदत मिळविली व कसे बसे नागपुरास आले.

नागपुरास येतांच मुधोजीनें मुनशीचा पुत्र लक्ष्मणपंत व मुलें माणसें कैद केलीं व देवाजीपंत कैदेंत होते त्यांस सोडविलें. नंतर चंद्रपुरास गेले व तेथील बंदोबस्त करून माहूर, कारंजा, आकोला या मार्गानें एलिचपुरास आले. इतक्यांत धवशानें मोंगल सरदार रुकनुदौला यास बोलावलें व साबाजी व मोंगल लष्कर यांनें एलिचपुरावर स्वारी केली. मुधोजी जळगांव जामोद या बाजूस होता. इस्मायलखान यानें एलिचपुराबाहेर येऊन लढाई दिली व मोंगल लष्कराचे मोर्चे उठविले. तोफेच्या गोळ्यांचे आवाज जळगांव जामोदास ऐकूं गेलेवरून मुधोजीनें स्वार पाठविले तों बातमी आली कीं, एलिचपुरास लढाई झाली.

मुधोजीनें येऊन मोंगल लष्करावर हल्ला केला. तसेंच भोंसल्यांचा गाविलगडचा किल्लेदार झामासिंग यानें किल्ल्यावरून लोक पाठवून पहाडांतून मोंगल लष्करावर मारा केला. मोंगल लष्कर हतवीर्य झालें.

इतक्यांत पुण्यांत नारायणराव पेशवे मारले जाऊन दादासाहेबांचे नांवाची द्वाही फिरल्याबद्दल बातम्या एलिचपुरास दोन्ही सैन्यांत आल्या. मुधोजीचें व दादासाहेबांचें सूत होतें. त्यामुळें मुधोजीस हर्ष झाला व रुकनुद्दौला व मोंगल लष्कर जास्तच हवालदील झालें. शेवटीं ते समेट करून निघून गेले.

नारायणरावाचे मृत्यूनंतर पुण्यांत जीं कारस्थानें सुरू झालीं त्यांत मुधोजी व साबाजी यांचींहि कारस्थानें होतींच. मुधोजीचा उजवा हात महिपतराव हा त्या खटपटींतच होता. त्यास त्रिंबकराव मामानें दर्याबाईच्या सांगण्यावरून कैद केलें. दर्याबाई पुन्हां साबाजीच्या पक्षास मिळाली. महिपतराव मोठ्या युक्तीनें निसटून मुधोजी एलिचपुरास होता तेथें येऊन त्यास मिळाला. वाटेंत त्याचें मागें धरणें आलें होतें तें युक्तीनें टाळीत चालला. एके गांवीं एका दुकानांत उतरले असतां तर खुद्द त्यास व त्याचेबरोबर असलेल्या महिपतराव काशीस धरणेंवाल्यांनीं विचारलें कीं, इकडून भोंसल्यांचे दिवाण गेले काय? यांनीं उत्तर दिलें " दिवाण तर माहीत नाहीं. पण दोनशें स्वार आतांच गेले. आतां जाल तर हातीं लागतील." मध्यंतरीं देऊळघाट परगण्यांत मालगणी या गांवीं महिपतराव यांचे साडू मल्हारराव परभू म्हणून होते त्यांनीं मेजवानी दिली व एक चांगली घोडी व पंचवीस स्वार बरोबर दिले.

मुधोजी भोंसले एलिचपुरास इस्मायलखानाच्या आधारानें राहिले. दर्याबाई व रघूजी पुण्याकडील कारस्थानांत गर्क होते. रघूजीस आतां कळूं लागलें होतें. ब्र्हाणपूरच्या मुक्कामास रुकनुद्दौला यानें दर्याबाईस लुटलें. त्या चकमकींत त्यानें चांगला पराक्रम दाखविला. दर्याबाई, साबाजी व रघूजी नागपुरास गेले व मुधोजी एलिचपुरास राहिला.

**उमरावतीस दंड.**

मुधोजीबरोबर जें सैन्य होतें त्यास खर्चास देण्याची वरचेवर अडचण पडूं लागली. एकदां उमरावतीस जाऊन मुधोजीनें सर्व गांवकऱ्यांपासून दंड घेतला व फौजेस वाटला. तरी तेवढ्यानें भरती झाली नाहीं. एकदां तर राजगड, भोपाळकडील कांहीं पठाण नोकरीस होते त्यांशीं बोलाचाली झाली. पठाण जाणून बुजून पैशाकरितां सर्व कांहीं करणारे व जातीचे करडे. एकदां एलिचपूर मुक्कामीं इस्मायलखान नबाबास भेटून मुधोजी पालखींत बसून परत आपले ठिकाणीं जात असतां सदरहू पठाणांनीं वेशीजवळ पालखी घेरली व हल्ला केला. बरोबर प्रसिद्ध गुजाबा दादा गुजर याचे चुलते जगदेवराव गुजर देवाजी डोंगरदेव व इतर मानकरी होते ते पठाणांवर धांवले व चांगली चकमक झाली. जगदेवराव मारले गेले. मुधोजी भोंसले पळून एका तेल्याचे घरांत जाऊन घाणोडींत लपले. दोन रोहिले मागें धांवले व त्यांस बाहेर काढलें. एका रोहिल्याशीं मुधोजीनें कुस्ती केली. रोहिल्यानें त्यास पाडून सुऱ्यानें गळा कापूं लागला. मुधोजीनें सुरा हातानें धरला. बोटें कापलीं पण सुरा सोडला नाहीं.

**एलिचपुरास रोहिल्यांचा दंगा.**

**मुधोजीस मारण्याचा प्रयत्न.**

तितक्यांत एक भंगिरा भांग घोटीत बसला होता तो धांवला व त्यानें एका सोटा रोहिल्याच्या मस्तकांत हाणून त्याचा प्राण घेतला, व मुधोजीचा प्राण वांचविला. दुसरा रोहिला एका रजपुतानें मारला. याप्रमाणें मुधोजीचा जीव शर्तीनें बचावला.*

ही बातमी इस्मायलखानास समजतांच तो धांवून आला व मुधोजीस घेऊन गेला व त्याच्या जखमा नबाबाच्या पदरच्या लालमहमद व रहिमान या नांवांच्या शस्त्रवैद्यांनीं फार कुशलतें बांधल्या व बऱ्या केल्या. यावेळीं महिपतराव दिनकर चंद्रपुरास आपले मुलाचे लग्नाकरितां गेला होता. त्यास हें वर्तमान समजतांच तो निघून एलिचपुरास आला. रस्त्यानें साबार्जीच्या सैन्याचा बंदोबस्त होताच, तो टाळीत त्यास मोठ्या मुष्कीलीनें यावें लागलें.

नागपुरास साबार्जी, दर्याबाई व रघूर्जी जाऊन पोहोंचल्यामुळें त्या पक्षाचा जम तेथें बसला.

**पांचगांवची लढाई व साबार्जीचा मृत्यु.**

शिवाय मालक रघूजी तोहि त्यांचेच जवळ. त्यामुळें फौजहि त्यांचेच ताब्यांत आली. भवानी काळू फौजेचा मुख्य तोहि त्यांचे बाजूनें झाला. शेवटीं मुधोर्जानें पुण्याहून दादासाहेबांकडून मदत मागितली. त्यांनीं पांच हजार लष्कर देऊन महंमद यूसफखान गारदी यास पाठविलें. आणखीहि जमवाजमव केली व नागपूरवर चाल केली. नागपुराजवळ तीन कोसांवर पाचगांव येथें मोठी लढाई झाली. तींत साबाजी पडला व मुधोर्जीची फत्ते झाली. भवानी काळूच्या आंगावर एकवीस जखमा झाल्या परंतु तो वांचला. याप्रमाणें मुधोर्जीचे हातीं नागपूरचा सर्व कारभार आला.

---

* एलिचपुरच्या बखरींत साबाजीनें पाठविलेल्या मारेकऱ्यांनीं हें केलें असा मजकूर आहे. ( एलिचपूरचे नबाब पान ३५७ पहा. )

साबाजीचा दिवाण भवानी शिवराम हा पाचगांवाच्या लढाईतून पळून गेला होता त्यानें उमरावतीकर शिवाजी भोसले यास उठावणी देऊन निजामाची मदत घेऊन वऱ्हाडांत बंड उभें केलें. निजामास केव्हांहि हात घालण्यास संधी पाहिजे होती. त्यानें वऱ्हाडांत लष्कर पाठविलें. परंतु मुधोजीनें दिवाकरपंतास पाठवून तडजोड केली व निजामाची व मुधोजी, रघूजीची समक्ष भेट होऊन सलोखा झाला.

याच सुमारास निजामानें बाळापुरावरून एलिचपुरावर स्वारी केली. मुधोजी व इस्मायलखान यांनीं धवशाची फजीती केल्यामुळें त्यानें निजामाचें मन नबाबाविरुद्ध भरविलें. नबाब १२०० स्वार घेऊन निजामाच्या भेटीस आला, तों धवशानें तो चाल करून आला असें निजामास सांगून त्याची परवानगी घेऊन इस्मायलखानावर हल्ला करून त्यास ठार मारलें. ही लढाई एलिचपुराजवळ काटसुरा येथें झाली.* मुधोजीनें दिवाकरपंत व धवशे यांचे मार्फतीनें इस्मायलखानाचे पुत्र सलाबतखां व बहिलोलखां यांस बाळापूर वगैरे जहागिरी दिल्या व नंतर कांहीं वर्षांनीं सलाबतखां यांस एलिचपूरचा कारभारहि मिळाला.

**प्रसिद्ध पुरुषांच्या घडामोडी.**

इसवी सन १७८१ चे सुमारास देवाजीपंत† नागपुरास मरण पावले. भवानी काळू पूर्ववत् फौजेच्या अधिकारावर राहिले. महिपतराव दिनकर हे मुधोजीच्या पक्षाविरुद्ध नाना फडणिसाचे कारस्थानांत गेले. मुनशी मागें पडले होते ते दिवाकरपंताचे मृत्यूनंतर पुढें आले. भवानी व काळूचे

---

* भाग १५ (३) एलिचपुरचे नबाब पा. ३५९ पहा.

† देवाजीपंताचें पूर्ण नांव दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे.

पुत्र बळवंतराव, यशवंतराव व पुतणे पांडुरंग गणेश हे आतां प्रसिद्धीस आले. मुधोजी, साबाजींचे भांडणापासून वणी येथील एक ऋग्वेदी ब्राम्हण महादाजी बल्लाळ लष्करी हे आपल्या पराक्रमानें व मुत्सद्दीगिरीनें पुढें आले. इ० स० १७९० चे सुमारास भवानीपंत मुनशी मरण पावले.

राजाराम मुकुंद हा कटकचा सुभेदार झाला व विठ्ठल दिनकर इंग्रजी मुलखाच्या तोंडावर रायपूर, छत्तीसगडास सुभेदार नेमला. गंगथडीचा सुभा अनंतराव धोंडीराज कोठेंकर याजकडून एक लक्ष रुपये घेऊन महादजी लष्करी याचे मार्फतीनें त्यास दिला गेला. भवानीपंत मुनशीचे सोयरे रामचंद्र दादो एलिचपूरकर यास हैदराबादेस भोंसल्यांतर्फें वकील नेमले. त्याचे नंतर त्याचा पुत्र केशवराव हा हैदराबादेस कायमचा वकील झाला. भवानी मुनशीचा भाऊ श्रीधर लक्ष्मण मुनशी हा पूर्वींपासून राजकारणांत होताच. तोहि बराच पुढें आला व पुण्यापर्यंत कारभार करूं लागला. विठ्ठल बल्लाळ सुभेदार पुढें खर्ड्यांचे लढाईंत प्रसिद्धीस आलेला त्यास जरीपटक्याचें निशाण दिलें. प्रसिद्ध मुत्सद्दी व्यंकटराव काशी व लक्ष्मणराव काशी व त्यांचा भाचा दौलराव नरसिंह हे शिंद्याकडे भोंसल्यास वळवितात म्हणून नानाफडणीस यांनीं त्यांस भोंसल्याकडून कैद करविलें ते गाविलगडास कैदेंत होते.

गाविलगड किल्ल्यावर पूर्वीं झामासिंग जमादार म्हणून रजपूत किल्लेदार होता. तो फार शूर होता. त्यानंतर त्याचा पुतण्या प्रमोदासिंग यास किल्लेदारी दिली, तों झामासिंगाचा मेहुणा संतोकसिंग यानें फंद करून किल्ला बळकाविला. त्यावेळेस मुधोजी

पुण्याकडेस गेला होता. हें वर्तमान समजतांच मुधोजी स्वतः आला व फंदी लोकांस शिक्षा करून बंदोबस्त केला.

खर्ड्याचे लढाईनंतर भोंसल्यांचें लष्कर व स्वतः रघूजी आलेगांव येथें तळ देऊन राहिले व तेथेंच रघूजीचा मुलगा परसोजी याचें लग्न झालें. (सन १२०९ फसली इ० १७९९)

---

## वऱ्हाडांतील इतर प्रसिद्ध घराणीं.

नागपूरकर भोंसले वऱ्हाडांत ठाणें देऊन राहिले होते व नंतर ते नागपुरास गेले. त्यांचेबरोबर त्यांनीं वऱ्हाडांतील पुष्कळ कार्यकर्तीं माणसें नेलीं व पुढेंहि वऱ्हाडांतील शूर व गुणी माणसांना आपले गुण दाखविण्यास नागपूरच्या दरबारांत पुष्कळ संधि मिळाल्यामुळें पुष्कळ लोक नागपुरास गेले. अशीं पुष्कळ घराणीं अद्याप नागपुरास व तिकडील भागांत आहेत.

१ भोंसल्यांचे सेनापति भवानराव काळू व देवाजीपंत चोरघोडे हे वऱ्हाडांतील राहणारे होते.

२ चिखली तालुक्यांतील "नायकांचें धोत्रें" या गांवचे मराठे नागपुरास गेले व त्यांनीं फार शौर्य दाखविलें. त्यांना झेंड्याचा मान अद्याप आहे. त्यांचा मोठा वाडा नागपुरास असून दारासमोर झेंडा आहे व त्या भागास "नायकांचा झेंडा" असें म्हणतात. त्यांचेकडे त्यावेळचे डिटेक्टिव खातें व मुलखांतील बातम्या व जासूद पुरविण्याचें काम असे.

३ "नगरनाईक काळे" यांचा मूळ पुरुष "लक्ष्मीकांत नाईक हा ब्राह्मण फार श्रीमंत सावकार होता. हा मूळचा कारंजा येथील राहणारा. "नगरनायकाची कोठी व तळें" हीं त्या घराण्याचीं स्मारकें आहेत.

४ नागपूरचे प्रसिद्ध व जुने सावकार " घटाटे " हे तळेगांव दशसहस्र येथें राहणारे.

५ मेहेकरकर शास्त्र्यांचें एक घर अद्याप नागपुरास आहे. त्यांचे पूर्वज फार विद्वान् असून त्यांना सरकारांतून घोडा असे.

६ नागपूर येथील जानेफळकरांचें घराणें मेहेकर तालुक्यांतील "जानेफळ" येथील वतनदार जोशी. त्यांचे पूर्वजांनींहि नागपुरास बरेंच नांव कमावलें.

७ लोणार येथील पाटील घराण्यांपैकीं नवलोजी नाईक नांवाचे मूळ पुरुष नागपुरास गेले व त्यांनींहि बरीच कामागिरी केली. त्यांचें घर नागपुरास आहे.

८ आळंद येथील कोरके गाईकवाड, मंगरूळ (ता. चिखली) येथील नवघरे आंढेरा येथील तुपकर व आवणेशिवणे येथील काळे (पुढें त्यांना दाणी हें नांव पडलें) हीं घराणीं नागपुरास आहेत.

९ नागपुराचें प्रसिद्ध सुभेदार घराणें मूळचें वऱ्हाडांतलेंच ( शेवली ?) आहे.

१० नांदगांव येथील राहणारा खंडो मुकुंद हा नागपूरकर भोंसल्यांच्या दरबारांत चांगला मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धीस आला. चांगला हुशार म्हणून पेशव्यांनीं त्याला पुण्यास नेलें. परत नागपुरास येऊन नंतर तो आपल्या गांवीं जाऊन शांततेनें राहिला.

११ बाळापुराकडील "गजाजीपंत" या नांवाच्या पुरुषानें नागपूरच्या राजकारणांत भाग घेतला होता.

१२ नागपूरकर *पोतनीस—एलिचपूरचे राहणारे. ते पेशवाईत पुण्यास गेले व तिकडेच राहिले. दक्षिणेंतील सरदारांत त्यांची गणना आहे.

---

* दक्षिणेंतील सरदारांच्या कैफियती, यादी वगैरे बाड.

## ५

## मलकापूरचे राजे नेमिवंत.

गुलामगिरीच्या भरांत व राष्ट्रीय अवनतीच्या व अंदाधुंदीच्या काळांत वऱ्हाडांत जे लोक खालच्या दर्जापासून वरच्या दर्जास चढले त्यांत राजे नेमिवंत या नांवाचें ऋग्वेदी ब्राम्हण घराणें आहे. नेमिवंताचें घराणें मूळचें भिक्षुक असून मलकापुर तालुक्यांतील धरणगांव वगैरे गांवचे हे जोशी आहेत. मूळपुरुष हा मोठा कार्यकर्ता पुरुष निघाला व त्यानें पान्हेरें वगैरे गांवांची कुळकर्णीपणाची वृत्ति कमावली.

नंतर लष्करी पेशा स्वीकारून तो बारा हजार स्वारांचा रिसालदार झाला. साकरखेर्डा येथील लढाईत (इ. स. १७२४) निजामुलमुल्काकडून लढून त्यानें मोठा पराक्रम दाखविला. निजामास यश आल्यावर त्यानें त्यास पांच गांवें जहागीर दिलीं. तीं गांवें मलकापुर तालुक्यांत देवधाब, माकोडी, कमळदीपुर, चावरद व सारगांव जहागीर याप्रमाणें आहेत.

निजामाच्या दरबारांत हिंदु लोकांना देण्याच्या पदव्यांपैकीं "वंत" या उपपदाची एक मोठी पदवी आहे. साडेतीन शहाण्यांपैकीं प्रसिद्ध विठ्ठल सुंदर, निजामाचा दिवाण यास राजे प्रतापवंत ही पदवी होती. त्याचप्रमाणें या मूळपुरुषासहि "राजे" व "नेमिवंत" या दोन पदव्या मिळाल्या. या घराण्यास आणखीहि जहागिरी मिळाल्या त्या निजामाचे हद्दींत आहेत.

नेमिवंताचे पूर्वजांचे हातचें एक राममंदिर मलकापुरास असून त्यावर त्यावेळचा शिलालेख आहे, व त्यांत या घराण्याची

त्रोटक हकीकत आहे. तो लेख शके १७३१ चा आहे. शिवाय त्यांचा फार सुंदर जुना वाडा मलकापुरास आहे. नेमित्वंत घराण्याचे हल्लींचे पुरुष राजे श्रीनिवासराव व विनायकराव हे हैदराबादेस चारकमानींत राहतात व मलकापुरास त्यांचा कारभारी असतो.

---

६

## देऊळघाटचे नबाब.

हें घराणें मूळचें दिल्लीचें पठाण. नादीरशहाचे स्वारीनंतर दिल्लीहून निघून हैदराबादेस येऊन निजामाकडेस नौकर राहिले. हल्लींचे नबाबाचे आजे महमंद रंहीमखान हे प्रथम देऊळघाटास किल्लेदार म्हणून आले. त्यांनीं अखेरचे मराठ्यांचे युद्धांत असईचे लढाईपर्यंत वेलस्लीसाहेबांस मदत केली. आसईच्या लढाईत वेलस्लीचा जय झाल्यावर त्यांना निजामाकडून चार गांवें जहागीर मिळालीं. दोन चिखली तालुक्यांत असून दोन मोंगलाईंत आहेत. हल्लींचे नबाब महमदसल्लामुल्लाखान हे फारच वजनदार व लोकप्रिय आहेत.

---

७

## मेळघाटांतील राजे.

मेळघाट हा वऱ्हाडांतील सर्वांत डोंगराळ प्रदेश आहे. हा सातपुड्याच्या शिखरावर असून यावर नरनाळा व गाविलगड हे दोन प्रसिद्ध डोंगरी किल्ले आहेत. हा सर्व प्रदेश जाण्यास दुर्गम असून अरण्यमय आहे. वस्ती गोंड व विशेषतः कोरकू या लोकांची आहे. भिल्लांचीहि कांहीं वस्ती आहे. डोंगरामुळें तिकडून हमरस्ता

नसे. तरी सातपुड्यांतून ब्ऱ्हाणपुराहून एलिचपुरास व आकोटास रस्ते होते व हल्लींहि एलिचपुराहून ब्ऱ्हाणपुरापर्यंत पक्की सडक आहे मोंगलाई अमलांत सुद्धां त्यांचे वाटेस कोणी गेलें नाहीं. राज्यक्रांतीच्या वावटळीचा त्यांस विशेष उपसर्ग झाला नाहीं. बाहेरच्या सुधारलेल्या जगाशीं अद्यापहि त्यांचा संबंध आला नाहीं व सुधारणेच्या प्रकाशाचे किरणहि अद्याप तेथें पडले नाहींत. तेथलि सृष्टिसौंदर्य उत्तम असून पीकहि कामापुरतें मुबलक होतें. सागवानी लांकूड, वेळू यांचा मोठा व्यापार चालतो. एकंदरींत बाहेरील जगाशीं कांहीं संबंध ठेवण्याची जरूरी नसून मेळघाट हें एक स्वयंपूर्ण राज्यच आहे असें म्हटलें तरी चालेल. बाहेरच्या महत्त्वाकांक्षी जगानें तेथील रहिवाशांस त्रास न दिल्यास ते आपल्या वन्य पशूंच्या सहवासांत राहून त्यांच्या पोटापुरत्या पण मुबलक पिकणाऱ्या धान्यावर उपजीविका करून सर्व जगास तुच्छ लेखण्यास तयार आहेत. पण सुधारलेलें जग मात्र त्यांच्या कल्याणाच्या निमित्तानें त्यांना स्वस्थ बसूं देण्यास तयार नाहीं, ही गोष्ट वेगळी.

या प्रदेशांत लहान लहान राजे आहेत. त्यांस गोंडराजे असें म्हणतात. परंतु ते स्वतः क्षत्रिय व रजपूत असें आपणास म्हणवितात. कांहीं भिल्ल राजे मुसलमान झालेले आहेत. त्यांचे म्हणण्याप्रमाणें अकबरानें माळव्यांतून यांचे पूर्वजांना या डोंगरी प्रदेशांत वस्ती वाढवून शेती वगैरेची सुधारणा करण्याकरितां अधिकार देऊन पाठविले व माळव्याचे सुभेदारास त्यांना मदत करण्याचा हुकूम दिला.

हे राजे प्रथम आपलें लहानसें डोंगरी लष्कर जमवून बाहेर लूटमार करून ती सातपुड्यांत आणून आपलें छोटेसें राजवैभव उपभोगीत असत. व त्या धामधुमीच्या वेळीं त्यांचेकडे लक्ष देण्यास

कोणास फुरसतहि होत नसे. त्यांचेपासून खालच्या वस्तीच्या मुलखास उपसर्ग लागूं नये म्हणून प्रत्येक सरकारानें त्यांचे तोंडावर कांहीं तुकडा टाकावा असें चाललें होतें व प्रथम प्रथम इंग्रज सरकारास सुद्धां तेंच करावें लागलें. हळू हळू त्यांना दाबांत आणून हल्लीं छोट्याशा जहागिरदारापेक्षां त्यांची किंमत विशेष राहिली नाहीं.

इ. स. १८१० ते १८३८ पर्यंत सातपुडा हें शेखडल्ला नांवाच्या प्रसिद्ध दरोडेखोराचें वसतिस्थान होतें. तंट्याभिल्लाप्रमाणेंच हा अत्यंत धाडशी असल्यामुळें त्यानें बरेच दिवस दाद दिली नाहीं. हा मूळचा पेंढाऱ्यांचे टोळींत असून मेळघाटांतील मकला येथील राजा खुशालसिंग यानें त्यास आपलेकडे नौकरीकरितां आणलें होतें परंतु त्यास तें कोंडलेलें राहणें न आवडून त्यानें हा धंदा सुरू केला. त्याचें नांव काढलें कीं सर्व लोकांचा थरकांप होत असे. त्याचा स्वतःच्या पराक्रमाबद्दल गर्व तर इतका वाढला होता कीं, तो स्वतः "उपर अल्ला और नीचे शेखडल्ला" अशी प्रौढी मिरवीत असे त्यानें पुण्यापर्यंत जाऊन लुटालूट करून मेळघाटांत पळून यावें. इ.स. [illegible]१३ मध्यें त्यानें पुण्याभोंवतीं इतकी लुटालूट केली कीं पेशव्यानें त्याचेमागें लष्कर पाठवून मेळघाटापर्यंत त्याचा पाठलाग केला. शेखडल्ला हातीं लागला नाहीं परंतु खुशालसिंग याचे पदरीं तो नोकर होता व अद्यापहि त्याचें आंतून पाठबळ आहे अशावरून पेशव्याचे सैन्यानें खुशालसिंग व त्याचा भाऊ या उभयतांस कैद केलें व त्यांचा मुलूख आपले राज्यास जोडला. ते दोघे भाऊ पळून गेले व पेशव्याचे नोकर तेथें असत त्यांना त्रास देऊं लागले. शेवटीं १८१६ मध्यें पेशव्यानें आपलें लष्कर व अधिकारी परत बोलावले.

इ. स. १८१७ मध्यें एलिचपूरचा नबाब सलाबतखान यानें खुशालसिंग यास कैद करून त्याचा प्रांत आपले मुलुखास

जोडला. खुशालसिंग मेल्यावर १८१८ सालीं शेखडल्ला त्याच्याच टोळींतील एका फितुरी साथीदाराकडून मारला गेला.

हल्लीं मेळघाटांत पुढील मुख्य मुख्य राजे आहेत, व त्यांचें उत्पन्न पुढें दिल्याप्रमाणें आहे.

| | ठिकाण | दरसालचें उत्पन्न. |
|---|---|---|
| १ राजा खुमानसिंग... | मकला... | १३००० |
| २ राजा तारासिंग ... | धूळघाट... | ५००० |
| ३ राजा दानसिंग ... | जामगड ... | ४२५० |
| ४ राजा मंगलसिंग.... | जितगड... | २२५० |
| ५ राजा जामसिंग ... | खटकाळी... | ३७०० |
| ६ राजा गणपतसिंग... | रूपगड... | २८०० |
| ७ राजा शाबासखान... (मुसलमान भिल्ल) | भिंगारा... | |

पूर्वीं पोलिसचे अधिकार या राजांस असून त्यांनीं आपले हाताखालीं पोलिस नोकर ठेवावे व त्यांचे पगाराबद्दल ठरीव रक्कम सरकारानें या राजांस द्यावी अशी रीत होती, परंतु त्यांचेकडून बंदोबस्त न होतां उलट गुन्ह्यांस मदत मात्र होत असे. तंट्याभिल्लाचे धामधुमीचे वेळीं हें फारच स्पष्टपणें नजरेस आलें. तंट्याभिल्लानें मेळघाटांत धुमाकूळ चालविला; परंतु या राजांकडून कांहींच बंदोबस्त झाला नाहीं व यांची तंट्याभिल्लास मदत होती असा संशय दृढ झाला. त्यामुळें त्यांची पोलिसाबद्दलची रक्कम बंद केली व स्वतंत्र पोलिस ठेवलें. या राजांना जहागिरी आहेत.

१८५७ सालचे बंडाचे वेळीं मात्र या राजांनीं सरकारास फार मदत केली असा मेडोजटेलर या प्रसिद्ध इतिहासकारानें शेरा दिला आहे. मेडोजटेलर हा या बंडाचे वेळीं उत्तर वऱ्हाडांत डेप्युटी कमिशनर होता.

मेळघाटांतील जमीन बहुतेक डोंगराळ व वस्ती कमी आहे. शेती वाहणारे कुळांना विशेष हक्क नाहींत व राजांच्या मनास येईल तेव्हां त्यांना वहीतदारांस काढतां येतें, परंतु वहीतदारांची संख्या कमी असल्यामुळें चढाओढ नाहीं. राजांच्या गांवांच्या हद्दीच्या बाहेरच्या जमिनी कमी मुदतीच्या हक्कानें ब्रिटिश सरकारनें दिल्या आहेत.

मेळघाटांत शिक्षण अगदीं कमी आहे. स्थानिक स्वराज्याच्या व नवीन सुधारणेच्या कक्षेंतूनहि तो भाग वगळला आहे. राजे लोक अशिक्षित व आळशी असून एकीकडे पडलेले आहेत. त्यांना नवीन युगाचें वारेंहि लागलें नाहीं. त्यांची दिनचर्या ठरीव, त्यांत बदल होण्याचा संभव कांहींच नाहीं. राजकीय व बौद्धिक क्रांतीच्या प्रचंड वावटळी जरी चाललेल्या असल्या तरी समुद्राच्या पृष्ठभागावरील तुफानाचा त्याच्या तळास ज्याप्रमाणें पत्ताहि नसतो तशाच या अज्ञानमय मेळघाटाची स्थिति आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे प्रयत्न मात्र त्यांतूनहि शांतपणानें या एकीकडच्या प्रदेशांत चालू आहेत.

---

# परिशिष्ट.

## ऐतिहासिक तहनामे व इतर कागदपत्रांचे तर्जुमे व नकला.

### १.

### नागपुरकर भोंसले व ईस्ट इंडिया कंपनी. देवगांवचा तह– भोंसल्यानें वऱ्हाड इंग्रजांस दिलें–१७-१२-१८०३.

तहनामा–एका बाजूनें ऑनरेबल ईस्ट इंडिया कंपनी व तिचे स्नेही व दुसऱ्या बाजूनें सेनासाहेब सुभा रघूजी भोंसले. कंपनीच्या व स्नेह्यांच्या वतीनें मेजर जनरल वेलस्ली व सेनासाहेब सुभा रघूजी भोंसले यांच्या वतीनें यशवंतराव रामचंद्र या दोघांनीं मुकरर केलेला, ज्यांनीं एकमेकांस आपले आम मुखत्यारपत्र दाखविलें आहे.

× × × ×

कलम ३.

भोंसले दक्षिणेच्या सुभेदारा ( निजाम ) बरोबर ज्या मुलुखाचा वसूल घेत होते आणि जो मुलूख त्यांचे ताब्यांत होता तो वर्धा नदीच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख भोंसल्यांनीं ऑ. कंपनी व तिचे स्नेही यांस कायमचा व पूर्ण मालकी हक्कानें द्यावा.

कलम ४.

इंजर्डीच्या डोंगरांतील वर्धा नदीच्या उगमापासून तों तिच्या गोदावरीशीं संगमापर्यंत वर्धा नदीची सरहद्द सेनासाहेब सुभा यांचे राज्याच्या व दक्षिणेच्या सुभेदाराच्या मुलखांमध्यें पश्चिमेचे बाजूस रहावी.

ज्या डोंगरांवर नरनाळा व गाविलगड हे किल्ले आहेत ते डोंगर सेनासाहेब सुभा यांचे ताब्यांत रहावे. या डोंगरांच्या दक्षिणेस व वर्धा नदीच्या पश्चिमेस जो मुलूख आहे तो सर्व ब्रिटिश सरकार व त्यांचे स्नेही यांस मिळावा.

*  *  *  *

कलम ९.

नरनाळा व गाविलगड यांस लागून दक्षिणेकडेस असलेल्या मुलखांपैकीं चार लक्षांचा मुलूख सेनासाहेब सुभा यांस द्यावा. हा मुलूख मे. ज. वेलस्ली यांनीं ठरवून वरील किल्ल्यांबरोबरच ( भोंसल्यांच्या ) ताब्यांत द्यावा.

वरील कलम २-३-४ यांतील ब्रिटिश सरकार व त्यांचे स्नेही यांच्या मुलखावरील सर्व प्रकारचे हक्क सेनासाहेब सुभा यानें आपल्या स्वतःतर्फे व आपले वंशजांतर्फे पूर्णपणें सोडून द्यावे.

*  *  *  *  *

कलम ९.

अधिकार दिलेले एकमेकांचे वकील एकमेकांचे दरबारीं रहावे.

मुक्काम देवगांव ता. १७-१२-१८०३ इंग्रजी, ता. २ रमजान १२१३ फसली.

गव्हर्नर जनरल यांनीं मंजूर केला ता. ९-१-१८०४

## २.

## निजाम व इंग्रज २८-४-१८०४

## १८०३ चे मराठे युद्धानंतरचा वांटणीचा तहनामा.

## वऱ्हाड निजामास दिलें.

ईस्ट इंडिया कंपनी व तिचे दोस्त निजाम व पेशवे यांजमधील तहनामा.

कंपनी सरकार व त्यांचे दोस्त यांतर्फे मेजर जनरल आर्थर वेल्स्ली यांनीं महाराजा सेनासाहेब सुभा, वऱ्हाडचे राजे यांच्याशीं ता. १७-१२-१८०३ रोजीं देवगांव मुक्कामीं व महाराजा दौलतराव शिंदे यांच्याशीं त्याच महिन्याचे ३० तारखेस सुर्जी अंजनगांव येथें केलेल्या व गव्हर्नर जनरल यांनीं व दोस्त सरकारांनीं मंजूर केलेल्या सदरहू तहांच्या शर्तीप्रमाणें कांहीं किल्ले व मुलूख सेनासाहेब सुभा व शिंदे यांनीं कंपनी व दोस्तांस दिले आहेत त्यांची व्यवस्था लावण्याकरितां खालील कलमांचा करार ब्रिटिश सरकार व त्यांचे दोस्त यांजमध्यें ठरला आहे:—

१ कटकप्रांत व बालासोर प्रांत व बंदर व देवगांवच्या तहाच्या दुसऱ्या व दहाव्या कलमांत लिहिलेला सर्व मुलूख ईस्ट इंडिया कंपनीस मिळावा.

२ भोंसले व निजाम हे उभयतां ज्या भागाचा वसूल करीत असत तो मुलूख व देवगांवच्या तहाच्या तिसऱ्या कलमांत

---

Aitchisons treaties, Vol. IX. P. 83 [1909 ed.]

ठरविलेला भोंसल्यांचा वर्धेच्या पश्चिमेकडील व चवथ्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नरनाळा व गाविलगड हे किल्ले ज्या डोंगरांवर आहेत त्या डोंगरांच्या दक्षिणेकडील सर्व प्रांत (भोंसल्यांनीं तहाच्या ९ या कलमांत आपलेकडे ठेवलेला भाग खेरीजकरून ) ( नरनाळा, गाविलगड ) निजामास मिळावा.

❀ ❀ ❀

९ अहमदनगर शहर व किल्ला व सुरजी अंजनगांवच्या तहाच्या तिसऱ्या कलमाप्रमाणें मिळालेला सर्व मुलूख पेशव्यास मिळावा.

६ सुरजी अंजनगांवच्या तहाच्या चवथ्या कलमांतील दौलतराव शिंद्याकडून आलेला अजिंठ्याच्या डोंगराच्या दक्षिणेकडील प्रांत म्हणजे जालनापुर शहर व किल्ला, गांडापुर शहर व जिल्हा व सदरहू अजिंठ्याचे डोंगर व गोदावरी यांमधलि सर्व प्रदेश निजामास मिळावा.

हैद्राबाद मेजर कर्कप्याट्रिक
रेसिडेंट.

## ३

### भोंसले व इंग्रज, ता. ६-१-१८१८

### नरनाळा, गाविलगड भोंसल्यांनीं इंग्रजांस दिले.

ऑ. कंपनी व महाराजा मुधोजी भोंसले यांजमध्यें झालेला तात्पुरता तहनामा—कंपनीच्या तर्फे मि. जेनकिन्स व भोंसल्यांच्या वतीनें नागो पंडित व नारायण पंडित यांनीं ठरविलेला.

× × × × ×

कलम २.

पूर्वीची खंडणी व सबसीडियरी सैन्य यांचे मोबदल्यांत राजे ( भोंसले ) यांनीं पुढील मुलूख देण्याचें कबूल केलें आहे. नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व प्रांत, त्याचप्रमाणें दक्षिणेकडीलहि सर्व प्रांत, गाविलगड व वऱ्हाडांतील इतर प्रांत, सिरगुजा व जसपूर.

× × × ×

ता. ६-१-१८१८.

सही, आर. जेनाकिन्स रेसिडेंट.

४

निजाम व इंग्रज.

नरनाळा, गाविलगड निजामास व आर्वी, आष्टी, आमनेर भोंसल्यांस दिलें.

हैदराबाद, ता. १२-१२-१८२२.

चार्लस मेटकाफ, हैदराबादचे रेसिडेंट व दक्षिणचे सुभेदार यांजमध्यें—

ज्याअर्थीं नागपूर व होळकर या राज्यांतील कांहीं हक्क संबंध किल्ले व मुलूख ऑ. ईस्ट इंडिया कंपनीचे ताब्यांत आला आहे व पेशव्यांचा पाडाव होऊन त्यांचाहि मुलूख मिळाला आहे त्याअर्थीं त्या हक्कसंबंधांची, किल्ल्यांची व मुलखाची विल्हेवाट लावण्याकरितां कंपनी व निजाम यांमध्यें पुढील कराराचीं कलमें ठरलीं आहेत:—

कलम १

निजामाचे मुलखावर असलेले पेशव्याचे चौथाईचे व इतर सर्व हक्काची मागील येणें असलेली सर्व बाकी रद्द झाली आहे व निजामाचे राज्यावर पेशव्याचा यापुढें चौथाईचा व इतर सर्व हक्क कायमचा नष्ट झाला आहे.

कलम ३.

नवीन लढाईंत मिळालेले मुलुखांपैकीं कांहीं मुलूख निजामाचे मुलुखाच्या, बाहेरील स्थूल मर्यादेच्या आंत येत असल्यामुळें तो आपणास मिळावा, अशी निजामाची इच्छा असल्यावरून त्याचे फायद्याकरितां व करार करणारे दोन्ही पक्षांचे हिताकरितां खालीलप्रमाणें मुलखाची अदलाबदल करण्यांत आली आहे.

यास जोडलेल्या पुरवणी ( ब ) यांत लिहिलेले, पूर्वीं नागपूरचे राजाचे ताब्यांत असलेले प्रांत, ज्यांचा वसूल अंदाज रु० ३१३७४३ आ. ८ आहे. तो व नरनाळा, गाविलगड हे किल्ले व त्याखालचा डोंगर हे कायमचे निजामाच्या मालकीचे व्हावेत.

पुरवणी ( ब ).

· आकोट, अडगांव ××, भातोली ( भातकुली ? ), ××
वसूल रु. ३२५०००-८.
यांतून वजा ११२५७-० श्रीधर पंडित व यशवंतराव रामचंद्र यांचे मुंडगांव हें गांव व यशवंतराव रामचंद्र यांचें अर्धें गांव बेलखेडें याचा वसूल वजा.

---

एकूण ३१३७४३-८.

कलम ८.

तहनाम्यास जोडलेल्या पुरवणी ( ड ) या यादींत लिहिलेले वर्धा नदीचे पश्चिमेकडील व पूर्वेकडील मुलूख ज्यावर निजामाचा सवाईक हक्क होता तो सर्व मुलूख नागपूरचे राजास देण्याकरितां निजामानें सोडून द्यावा. याचा वसूल अंदाज रु. ७५०००.

## पुरवणी ( ड ).

| | |
|---|---|
| आर्वी परगणा, सरकार गावेल<br>आष्टी परगणा.<br>आमनेर परगणा | रु. ७५००० |

× × × ×

कलम १०—निजामानें पेशव्यास देण्याच्या चौथाईचे रकमेवर अगर पेशव्यांचा जो मुलुख हल्लींच्या तहानें निजामाकडे आला आहे त्यावर जें इनाम, वर्षासनें व इतर धार्मिक देणग्या युद्धाचे आरंभास ( नोव्हेंबर १८१७ मध्यें ) चालू होत्या त्या एल्फिन्स्टन साहेबाच्या ता. ११-२-१८१८ च्या जाहीरनाम्याच्या शर्तीप्रमाणें चांगल्या वर्तणूकीवर अवलंबून कायम ठेवण्याचें व पुढें चालविण्याचें निजामानें कबूल केलें आहे.




चार्लस मेटकाफ
—रेसिडेंट
मार्किस ऑफ हेस्टिंग्ज
—गव्हर्नर जनरल

## ५.

## निजाम व इंग्रज

### वऱ्हाड इंग्रजांस वहिवाटीस दिलें.

### हैदराबाद, ता. २१-५-१८५३.

ज्याअर्थी ऑ. ईस्ट इंडिया कंपनी व नबाव निजामुल्मुल्क असफजहां बहादूर यांजमध्यें पुष्कळ दिवसांपासून स्नेह व ऐक्य-भाव चालत आला आहे व सर्वसाधारण संरक्षक तहाच्या योगानें तो वृद्धिंगत झाला आहे व ज्याअर्थी एवढ्या कालावधींत भोंवतालचे राजे व राज्यें यांमध्यें बऱ्याचशा घडामोडी झाल्या आहेत व त्या योगानें मागील तहाच्या अमलबारीसंबंधानें जी लष्करी व्यवस्था ठरविली होती तिची फेरतपासणी करणें जरूर झालें आहे आणि ज्या अर्थी या दोन राज्यांमध्यें कांहीं लष्करी व्यवस्थेच्या खर्चाचे तडजोडीसंबं-धानें दोन्ही पक्षांत मतभेद उत्पन्न होऊन वादविवाद झाले आहेत व ज्या अर्थी दोन्ही पक्षांच्या फायद्याकरीतां हे मदभेद कायमचे निका-लांत लावणें व दोन्ही पक्षांच्या मित्रत्वास बाध आणणारे हे तंटे पुन्हां उत्पन्न न व्हावेत असा बंदोबस्त करणें हें योग्य आहे त्या अर्थीं ऑ० ईस्ट इंडिया कंपनी व नबाव निजामुल्मुल्क अस-फजहां बहादूर यांनीं उभयतांमध्यें पुढें लिहिलेलीं कलमें ठरविलीं आहेत.

*      *      *      *

कलम. २

कंपनीनें निजामास सर्वसाधारण संरक्षणाकरितां पुरविण्याचें सबसीडियरी सैन्य पूर्ववत् चालू ठेवावें. सदहू लष्कर पूर्वींइतकेंच म्हणजे शिपायांच्या ८ पलटणी, घोडेस्वारांच्या दोन पलटणी व

त्यांना जरूर असलेल्या बंदुका व सामुग्री, तोफखान्यावरील युरोपियन लष्कर लढाईच्या सामानासुद्धां व दारूगोळ्यासुद्धां.

या सैन्यापैकीं पायदळाच्या पांच पलटणी व घोडेस्वारांची एक पलटण व त्या प्रमाणांत तोफखाना निजामाचे राज्याच्या हद्दींत नेहमीं राहिला पाहिजे. निजामाचे स्पष्ट परवानगीशिवाय यांतील लष्कर कमी होतां कामा नये. बाकीचें लष्कर निजामानें मागतांच तावडतोब निजामाचे राज्यांत आणून हजर केलें पाहिजे.

या लष्कराचा महत्त्वाच्या कामांत उपयोग करावा: जसें निजाम व त्यांचे वारस वंशज यांचे शरीराचें रक्षण करणें व बंडखोर व अशांतता उत्पन्न करणारे लोकांचा पाडाव करून निजामाचा हुकूम मानण्यास लावणें. परंतु क्षुल्लक कामांत व वसुली करण्याचे कामावर शिबंदी म्हणून याचा उपयोग करूं नये.

कलम ३.

हल्लींच्या सबसीडियरी सैन्याचे कंटिंजंटाऐवजीं ऑक्सिलियरी सैन्य ( परकी मदतगार सैन्य ) म्हणून जें सैन्य राहील त्यास " हैदराबाद कंटिंजंट " असें नांव राहील. त्याची संख्या ९००[illegible] पायदळ, २००० घोडेस्वार, तोफखान्याच्या चार ब्याटरी इतक[illegible] राहील. त्याचा अंमल हैदराबादच्या रेसिडेंटाकडे राहील.

कलम ४.

राज्यांतील दंगे नाहींसे करण्याकरितां इंग्रज व निजाम या दोघांच्याहि उपयोगी वरील सैन्य पडेल.

कलम ६.

सदरहू कंटिंजंट फौजेस नेमानें दरमहा पगार देण्याकरितां व आप्पा देसाई याची चौथाईची रकम देण्याकरितां व राजा महिपतराम ( वऱ्हाडचा सुभेदार ) याचे कुटुंबाचे नेमणुकीकरितां

व १८२२ चे तहांतील दहावे कलमांत लिहिल्याप्रमाणें कांहीं मराठ्यांच्या नेमणुकांबद्दल ( ता. ११-२-१८१८ च्या एल्फिन्स्टन साहेबाच्या जाहीरनाम्याच्या शर्ती ज्यांनीं पाळल्या असतील अशा लोकांस पेशव्यांकडून जीं इनामें, वर्षासनें व नेमणुका चालू होत्या त्या सर्व, निजामाकडे तो प्रांत आल्यावर निजामानें द्याव्या, असें वरील १० वें कलम होतें ) व कंपनी सरकारचें जें कर्ज निजामाकडे आहे त्यावरील दरसाल दरशेंकडा सहा टक्के व्याजाचे रकमेबद्दल ( हल्लीं हें कर्ज अंदाज पन्नास लक्ष रुपये ( हैदराबादी ) आहे ) निजाम सरकार असें कबूल करतात कीं, सोबतच्या पुरवणी ( अ ) मध्यें लिहिलेले प्रांत, ज्यांचा वसूल अंदाज पन्नास लक्षांचा आहे, ते इंग्रजास द्यावे. त्यांची व्यवस्था हैदराबादच्या रेसिडेंटानें व त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनीं स्वतंत्रपणें चालवावी.

कलम ७.

निजामानें फक्त लढाईच्या वेळीं इंग्रजास वरील सैन्य दुसरीकडे नेऊं द्यावें. इ० स० १८०० च्या तहांत ठरल्याप्रमाणें नऊ हजार स्वार व सहा हजार पायदळ निजामानें देण्याची जरूरी नाहीं.

कलम ८.

पुरवणी ( अ ) यांत लिहिलेले मुलखाचा ताबा कर्नल लो सी. बी. हैदराबादचे रेसिडेंट यास कलकत्त्याहून सदरहू तह मंजूर होऊन आल्याबरोबर देण्यांत यावा. ब्रिटिश सरकारातर्फे असें आश्वासन देण्यांत येत आहे कीं, हैदराबादचे रेसिडेंट हे दरसाल निजामास सदरहू मुलखाच्या जमाखर्चाचा प्रामाणिकपणें खरा हिशेब देत जातील व कलम ६ यांत लिहिलेले खर्च वजा जातां जी शिल्लक राहील ती निजामास पावती करीत जातील.

कलम ९.

हा नऊ कलमांचा तह ऑ. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी-तर्फे कर्नल जॉन लो सी. बी. यांनीं नबाब निजामुल्मुल्क आसफजहां बहादुर यांचेशीं ठरविला आहे. कर्नल लो यांनीं या तहाची एक इंग्रजी व एक फारशी प्रत आपले सही शिक्क्यानिशीं निजामास दिली आहे व नबाब यांनींहि आपले सही शिक्क्यानिशीं तशीच एक प्रत कर्नल लो यास दिली आहे व कर्नल लो कबूल करतात कीं, गव्हर्नर जनरल साहेबांची मंजुरी घेतलेली एक प्रत निजामास आजपासून तीस दिवसांचे आंत दिली जाईल.

हैदराबाद येथें इं. ता. २१ माहे मे सन १८९३ व हिजरी ता. १२ साबान सन १२६९ रोजीं सही व शिक्का मोर्तब करून एकमेकांस दिले.

| | |
|---|---|
| कर्नल लो रेसिडेंट<br>याचा शिक्का | निजामाचें स्वत:चें<br>हस्ताक्षर. |

सही जे. लो. कर्नल

— हैदराबादचे रेसिडेंट.

सही — डलहौसी.

— गव्हर्नर जनरल.

सही जे. लोईस

— मेंबर कौन्सिल.

जे. डॉरिन ,,

फार थोर असे जे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं बंगाल्यांतील फोर्ट विलयम येथें ता. १८ जून १८९३ रोजीं मंजूर केला.

सही, सी. आलन,
--- हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी.

पुरवणी ( अ )

ऑ० ईस्ट इंडिया कंपनी व निजाम सरकार यांजमध्यें ठरलेल्या इ. स. १८९३ ( फसली १२६३ ) च्या तहाच्या सहाव्या कलमामध्यें ठरल्याप्रमाणें हैदराबादच्या रेसिडेंटाच्या अमलाखालीं देण्याचा वऱ्हाडांतील मुलूख **पाईनघाट, रायचूर दुआब, सोलापूर** व अहमदनगर सुभ्याचे सरहद्दीचे भाग यांची यादी.

ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं देण्याचे वऱ्हाड पाइनघाटांतील प्रदेश म्हणजे पश्चिमेकडे आजिंठ्यापासून पूर्वेस वर्धेच्या कांठीं वणीपर्यंत जी डोंगराची ओळ जाते तिच्या उत्तरेकडील प्रदेश. वरील हद्दीच्या आंत येणारीं गांवें, यांचें नांव खालील यादींत नसलें तरी त्यांत तीं सामील आहेत असें समजावें.

परगणे.

| | | | |
|---|---|---|---|
| आकोला | १२४९४४ | चिंचोली ,, | १२७२२ |
| दहीहांडा | १३३८४४ | लाडखेड | ४५५६ |
| वडगांव | १७३८१ | येवत उर्फ येवतमहाल | २२८७ |
| यूगांव | ६१४२५ | कळंब | २५१० |
| कुळ बाळाघाट | २२५० | चिकणी | २५०१ |
| पुसद | १७१५८ | महागांव | ११३७० |
| अडगांव | १०००० | नारगांव | ९७५ |
| नडसी बालाघाट | ७३१२९ | राळेगांव | ८७५० |
| माहूर ,, | १४३६० | पांढर केवडा | २००० |

| | |
|---|---|
| बोकशीखेड (?) | २००० |
| वनमैदी (?) | २८०३३ |
| मनवा | १२००० |
| वडनेर भोलजी | ३२०६८ |
| बुनकी (?) टुणकी | २७०२ |
| धामोडी | १८९२३ |
| गुत्रू (?) | ६००० |
| बावनवीर | १४०००* |
| जळकें | ३०००* |
| शिराळें | १०००० |
| पुसलें | ५०००* |
| अडगांवखुर्द | १५००* |
| आकोट | ७७००० |
| अडगांव | १२५००० |
| जळगांव | ९७००० |
| जामोद | ३५१५५ |
| मोरशी | ३६००० |
| पाळे | ३००० |
| मेळघाट | १५००० |
| | १०२५५४३. |
| देऊळघाट | २४०१ |
| बुनगांव | ७५०० |
| मुंडगांव | १५०० |
| जरुड | ९००० |
| कारल | ८०२० |
| भिलखेड | २५६३ |
| उमरावती | ५८४४२ |
| पातुरशेखबाबू | १५८८१ |

| | |
|---|---|
| बारशीटाकळी | १२०७६ |
| बाबुन (?) | ३८८३ |
| नांदगांव | १८५९२ |
| पातुरडा | २४००१ |
| पिंजर | १६६८२ |
| पिंपळगांवराजा | ३७९४६ |
| वडनेरबिबी | ३७७५९ |
| खोलापूर | ३३८०३ |
| तळेगांव | २११७३ |
| टिकटाळ (?) | ३५००० |
| लाखपुरी | २४०१ |
| रांजा | १५०० |
| वरूड | ९०३९४ |
| सुरळी | २९९१ |
| अंजनगांव बारी | २९१८ |
| शिराळें तिराळें | ७०१४ |
| नवसरी | १०३६ |
| बुकी (?) | |
| एलिचपूर | १०००० |
| करजगांव | १०००० |
| अंजनगांव | १०५२१९ |
| धारूड | २०००० |
| आकोली | ६५००* |
| तळगांव | ५००० |
| वडनेर गंगाई | ५९८४३ |
| पंचगव्हाण | ३०३७१ |
| तालोद | २३९१२ |
| पापळ | ७९११ |
| | ११०८७४५. |

| | |
|---|---|
| पंचमहागांव | ५११२१ |
| रीथपूर | ६१७१० |
| चिंचोन | १११३९ |
| खेडवेलूरे | १४९१० |
| शिवणें | १४८२० |
| बनोदे | १७८५५ |
| भातकुली | ३८५९६ |
| पथरोट | १३७९३२ |
| मालखेड | १०८७१ |
| पळसखेड | १००११ |
| सांवरगांव टाकळी | २५०० |
| नेरपरसोपंत | ८३६० |
| नांदगांवकाजी | १३२६३ |
| देविकोटा (वेणीकोठा) | ३२२६ |
| धामणगांव | २८९९ |
| [illegible]रसोली | २२०० |
| मांजरखेड | ८५२५ |
| उमरावती राणी | ४६६५ |
| हिवरखेड | २२६०१ |
| आमनेर | ६८५५ |
| शिरसगांव | ११९८९ |
| दानापूर | ७५००० |
| माना | २२००० |
| गिरोनी ( गिरोली ) | १०००० |
| | २४७९७९३ |
| कुरम | १८००० |
| मुर्तिजापूर | ४५००० |

| | |
|---|---|
| मंगरूळपीर | ४०००० |
| कुऱ्हे | ४५००० |
| मंगरुळ दस्तगरि | १२०० |
| कुरुमखेड | ८७०८ |
| धनज | ५३२० |
| असलगांव | १०१०५ |
| आकोट | ९००० |
| बाळापूर | २४१२७५ |
| मलकापूर | ५१३१९ |
| रायपूर | २४९९ |
| राजोरा | ३७४२ |
| रोहिणखेड | २४९१ |
| चांदूर | २०७२७ |
| नांदुरा | ९८४६ |
| निमगांव | ३७७६ |
| जेपूर | ४१४६ |
| कोथळी | ९९० |
| देउळघांट | १७९५५ |
| धांडसांवगी | ६१५९ |
| धाड | १७४३६ |
| कारंजाबिबी | २३५३५ |
| धामनी | १४२९७ |
| कमरगांव | २२३० |
| | ३०९५३०९ |
| वजा * खूण केलेल्या खाजगत जहागिरी | ३५००० |
| एकूण. | ३०६०३०९ |

देह, सायर, रुसूम, मुकते, योमिया इनाम व इतर धार्मिक नेमणुकांच्या आजपर्यंत चालत आलेल्या रकमा वजा जातां वरील आकार केला आहे. या हक्काबद्दल योग्य सनदा अगर दुसरे सरकारी कागद वरील हक्कदारांनीं दाखविल्यानंतर व ते निजाम सरकारनें कबूल केल्यानंतर वरील हक्क त्या त्या हक्कदारास देण्यांत येईल.

खालीं लिहिलेले तालुके सर्फ-इ-खास (निजामाचे खाजगत उत्पन्नाचे) व खालीं लिहिलेले सरदार लोकांचे खाजगी आहेत त्यांची व्यवस्था हैदराबाद सरकार जे अधिकारी नेमतील त्यांचे मार्फत होईल.

वऱ्हाड सर्फ-इ-खास तालुके.

| | | | |
|---|---|---|---|
| बडनेरगंगाई | ५९८४३. | खेडबेलूरा | १४९१० |
| पंचगव्हाण | ३०३७१ | शिवणा | १४८२० |
| साळवद | २३९१२ | बुनोदा (?) | १७८९९ |
| | ११४१२६ | भातकुली | ३८९९८ |
| पापळ | ७९११ | पथरोट | १३७९३२ |
| पंचमहागांव | ९१९२१ | मालखेडा | १०८७१ |
| रिथपूर | ६१७१० | पळसखेडा | १००११ |
| चिंचोना | ११९३१ | | |

सिराजुल्मुल्कु बहादूर याचे जहागीर तालुके

| | | | |
|---|---|---|---|
| दर्यापूर | ७५००० | मंगरूळ दस्तगीर | १२००० |
| माना | २२००० | मंगरूळ पीर | ४०००० |
| गिरोली | १०००० | कुऱ्हे. | ४५००० |
| कुरम | १८००० | | |
| मुर्तिजापूर | ४५००० | | २६७००० |

इंग्रज सरकाराकडे दिलेले सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यास लागून असलेले पश्चिमेकडील प्रांताचे उत्पन्नाचे मूळचे अंदाजांतील तूट भरून काढण्याकरितां व त्याचप्रमाणें पाठीमागील यादींत सर्फ-इ-खासचे तालुके व राजा अर्जुन बहादुर यांची भामची जहागीर वरील यादींत दाखविल्यामुळें येणारी तूट भरून काढण्याकरितां:—

तपशील.

| | | |
|---|---|---|
| पश्चिमेकडील जिल्ह्याचे उत्पन्नाची तूट | | ४९८९०६. |
| सर्फ-इ-खास तालुके | | |
| पांढरकवडा | २००० | |
| मोमभार (?) | १२०००. | |
| परगणें वडनेर मोलजी | ३२०६८ | |
| सावरगांव टाकळी | २९००. | ४८९६८ |
| | ४८९६८ | |
| राजा अर्जुन बहादुर यांची परगणे भामची जहागीर | | ४११०० |
| एकूण. | | ५४८१६४ |

वरील तूट भरून येण्याकरितां निजाम सरकारनें बालाघाटापैकीं खालील तालुके हैदराबादचे रेसिडेंट यास दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| परगणा मेहकर | ३८३६९ | परगणा पाचलगांव | ८४७० |
| ,, शिंदखेड | १७९८८ | ,, नंदापूर { १०९८१ / १९६१९ } | २६६०० |
| ,, मलकापूर पांगरा | ११३९० | मौजे चिखलठाण | ८२९ |
| ,, शेवली | १३४९१ | ,, देऊळगांव प्र. लोहगांव | |
| ,, लोणार | ८९३७ | ,, अडसोली प्र | ९१४१ |
| ,, वाकद | ९१९९ | ,, धार | ८०१२ |
| ,, घाटबोरी | १२७९ | ,, लेह | १८६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, फत्तेखेर्डा | २७६६६ | ,, शेलापूर प्र. पाथरी | १४००० |
| मौजे कुपटे | ७२२ | परगणा कुरळ | ६६५६ |
| कसबा डोणगांव | ४१०९ | तालुका कुरळ | ६००० |
| वरिल महालाची सायर वगैरे उत्पन्न, | ७५१३ | मौजे चांदूर प्र. शिरपूर | ४३८ |
| | | ,, अतोळी प्र. जिंतूर | ४८९९. |
| परगणा वाशीम | ६०८९१ | ,, देऊळगांव प्र. शिंदशेड | २३४९ |
| ,, आंवढे | २०१९७ | ,, परगणा अनसिंग | ६१९९ |
| ,, शिरपूर | २२८९७ | ,, किसूर | १२२९७ |
| मौजे मुंगळे | १२८६ | ,, दसूर | ६०७९ |
| परगणा कळमनुरी | ३८६७७० | मोजे केनबेट ( किनवट ) | ६९० |
| ,, उमरखेड | ८९२०८ | | |
| | ३८१८८३ | एकूण | ९४६६०१ |
| परगणा तामसी | १९०९४ | | |
| ,, मानवत | ८१७१ | | |
| ,, सवळे | २४९१९ | | |

---

ऑ. ईस्ट इंडिया कंपनी व निजाम यांजमध्यें ता. १८-६-५[illegible] रोजीं मंजूर झालेल्या तहांतील परिशिष्ट ( अ ) मध्यें लिहिल्याप्रमा[illegible] अंदाजी उत्पन्नाचे वऱ्हाडापैकीं बालघाटांतील परगणे, कजबे व मौ[illegible] यांची यादी—

जे हिंदुस्थान सरकारचा खरीता नंबर ४४०९ ता. १८-१०-१८९३ यांतील हुकमाप्रमाणें निजाम सरकारास परत दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| परगणा उमरखेड | ८९२०८ | मौजे कुरळगांव | ५००० |
| ,, कळमनुरी | ३८७७० | ,, अंतोली व इतर गांवें पर. जिंतूर | ४८९९ |

„ नंदापूर २६६६० 
„ सेवली २४९१९ 
„ आवंढें २०१९७ 
„ तामसा १९०९४ 
„ मानवत ८१७१ 
„ चिंचोली १२७२२ 
„ महागांव ११३७० 
„ पाचलगांव ८४७० 
मौजे धार ८०१२ 
„ लेह १८३७ 
कसबा शेळगांव १७६१ 
परगणा कुरळ २२९० 
खेडीं. पर. कुरळमधील ६६९६ 
„ ता. कुरळमधील ६००० 
मौजे झाळापूर पर. पाथरी १४००० 

„ चिखलठान पर. चारठा[illegible] 
अडसोली व इतर गांवें ९१४२ 
पर. कुरळ 
„ मुंगळे. पर. शिरपूर. १२८६. 
„ चांदूर ४३८ 

एकूण. ३१३१८३.

*Hyderabad*, 22-11-1853.

(20 Suffer 1270)

(Sd.) C. DAVIDSON, 
*Offg. Resident*.

६.

## निजाम व इंग्रज.

पूर्वीच्या तहांतील मुलखांत फेरबदल*ता. १६-१२-१८६०

ज्याअर्थी १८५३ च्या तहनाम्यांत कांहीं फेरफार केल्यामुळे दोन्ही पक्षांची जास्त सोय होणार आहे व उभय सरकारांमधील संबंध जास्त साधे व सोपे होणार आहेत आणि ज्याअर्थी त्या तहनाम्यांत खुलासा न झालेल्या कित्येक गोष्टींची सारासार करणें जरूर आहे आणि ज्याअर्थी गव्हर्नर साहेबांची अशी इच्छा

---

*यानंतर १८७१ सालींहि दक्षिण सरहद्दीवरील कांहीं गांवांची अदलाबदल झाली आहे.

तो दाखविणाऱ्या कांहीं गोष्टी रीतशीर घडवून आणणें जरूर आहे त्याअर्थीं पुढील कलमें एका बाजूनें राणी सरकारातर्फें व्हाइसराय व गव्हर्नरजनरल व दुसऱ्या बाजूनें नबाब अफजुलउद्दौला, निजामुल्मुल्क असफजहां बहादुर यांनीं ठरविलीं आहेत.

कलम २. सोलापूर प्रांत पूर्ण मालकी हक्कानें निजामास द्यावा.

कलम ३. निजामाकडून इंग्रजास घेण्याचें हैदराबादी रुपये पन्नास लक्षांचें कर्ज इंग्रजांनीं निजामास सोडून दिलें.

कलम ४. निजामानें पूर्वीचें, हल्लींचें व पुढें होणारें उत्पन्न व खर्च यांचा हिशेब मागण्याचा आपला हक्क सोडून दिला. परंतु कलम ६ मध्यें लिहिलेल्या बाबींचे खर्च व राज्यकारभाराचा पुढील खर्च हे वजा जातां बाकी जी शिल्लक राहील ती इंग्रज सरकार निजामास देत जातील. राज्यकारभारचा खर्च किती करावयाचा हें ब्रिटिश सरकारच्या पूर्ण खुषीवर राहील.

कलम ५. रायचूर दुआबांतील व अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यास लागून असलेले निजामाचे राज्याचे पश्चिमेकडील अमानती मुलूख निजामास परत द्यावे.

कलम ६. १८५३ च्या तहा अन्वयें ब्रिटिश सरकारास तोडून दिलेला वऱ्हाडचा मुलूख व त्यांतील सर्व सर्फ-ई-खास तालुके व बत्तीस लक्ष इंग्रजी रुपयांची भरती होईल इतका आणखी नवा मुलूख हैदराबाद कॉंटिंजंटचे खर्चाकरितां व आप्पा देसायाची चौथाई देण्याकरितां व राजा महिपतराम याचे कुटुंबास देण्याच्या नेमणुकीकरितां व मागील तहाच्या कलम ६ मधील इतर पेन्शनी देण्याकरितां ब्रिटिश सरकाराजवळ अमानत रहावा.

कलम ७. हा तहनामा मंजूर होतांच सर्फ-ई-खासचे तालुके व नवीन मुलूख मागील कलमांत लिहिल्याप्रमाणें रेसिडेंट याचे ताब्यांत देण्यांत यावा.

कलम ८. गोदावरी व वाइनगंगा या नद्यांचे संगमाचे डावेकडील कांठावरील सर्व मुलूख म्हणजे राकापल्ली, भद्राचलम, चेरला, अलबाका, नुगूर व सिरोंचा यांवरील हक्क निजामानें सोडून इंग्रजास द्यावे.

कलम ९. गोदावरी व तीस मिळणाऱ्या नद्या यांवर इंग्रजांना बिन जकातीनें व्यापार करण्याची परवानगी असावी.

हैदराबाद, ता० २६-१२-१८६०. हिजरी १२७७.

सही

लेफटेनेंट कर्नल सी. डेव्हिडसन

मंजूर केला.

—क्यानिंग

शिक्का निजामाचा

३१-१२-१८६०

मुक्काम आमीरपट्टण

शिक्का इंग्रजांचा

( दौऱ्यावर )

७

## इंग्रज व निजाम. १९०२

## वऱ्हाड कायमचे कौलानें इंग्रजांस दिलें.

फोर्ट विलयम ता० १८-१२-१९०२ रोजीं जाहीर केलें.

ले. क. सर डेव्हिड बार, रेसिडेंट–गव्हर्नर जनरल तर्फे व महाराजा पेशकार किसनप्रसाद बहादूर, निजामाचे दिवाण.

ज्याअर्थीं ब्रिटिश सरकार व हैदराबाद संस्थान यांजमध्यें ता. २१-५-१८५३ व २६-१२-१८६० रोजीं झालेले तहाप्रमाणें हैदराबाद कंटिंजंटच्या खर्चाकरितां वऱ्हाडांतील मुलूख ब्रिटिश सरकारास दिले होते व शिलक निजामास मिळण्याचा करार होता,

व ब्रिटिश सरकार व निजाम सरकार या व्यवस्थेंत सुधारणा करूं इच्छितात,

व ज्याअर्थीं काटकसर करण्याकरितां वऱ्हाड हा स्वतंत्र प्रांत ठेवणें व हैदराबाद कंटिंजंट ही स्वतंत्र फौज म्हणून ठेवणें हें जरूरी आहे,

व ज्याअर्थीं निजाम सरकारास हल्लींच्या कमीजास्ती होणारे उत्पन्नापेक्षां कायमचें ठरीव उत्पन्न मिळणें जास्त हितकर आहे,

त्याअर्थीं व्हाइसराय आणि गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांजमध्यें व निजाम नबाब मीर सर महेबुब अलीखान बहादुर फत्तेजंग यांजमध्यें खालील शर्ती ठरल्या आहेतः—

१ वऱ्हाडावर निजामसरकारचें स्वामित्व ब्रिटिश सरकार कबूल करतात व निजाम सरकारहि दरसाल पंचवीस लक्ष रुपयांच्या कायमच्या स्वामित्वावर वऱ्हाडप्रांत ब्रिटिश सरकारास कायमच्या कौलानें देत आहे.

२ सन १८५३ व १८६० च्या तहा अन्वयें ब्रिटिश सरकारची वऱ्हाड प्रांताच्या राज्यव्यवस्थेवर पूर्ण व एकमुखी सत्ता कायम ठेवून शिवाय ब्रिटिश सरकारानें वरील तहांत न दिलेल्या पद्धतीनेंहि त्यांना वाटल्यास राज्यव्यवस्था करावी. कंटिंजंट फौजेची फाळणी अगर पुनर्घटना, सैन्य कमी करणें व योग्य वाटेल त्या दुसऱ्या तऱ्हेनें त्या फौजेची हुकमत चालविण्यास ब्रिटिश सरकारास पूर्ण अधिकार आहे. फक्त निजाम सरकारच्या राज्याच्या बंदोबस्ताकरितां १८५३ सालच्या तहाच्या तिसऱ्या कलमाप्रमाणें निजाम सरकारच्या राज्याच्या संरक्षणाची योग्य तजवीज ब्रिटिश सरकारानें केली पाहिजे.

हैदराबाद रेसिडेन्सी, ता. ५-११-१९०२.

ले. क. बार, रेसिडेंट

किशन प्रसाद.

हिंदुस्थान सरकारनें मंजूर केला. ता. १६-१२-१९०२.

---

८.

हैदराबाद रेसिडेन्सी ऑर्डर्स, ता. ३०-९-१९०३.

हिंदुस्थान सरकारचा जाहीरनामा, सिमला, ता. ११-९-१९०३

नं० ४२४६ आय्. बी.

ज्याअर्थी असें ठरविण्यांत आलें आहे कीं, ता० १ आक्टोबर सन १९०३ रोजीं व त्या दिवसापासून वऱ्हाड प्रांताची राज्यव्यवस्था मध्यप्रांताचे चीफ कमिशनर साहेबांच्या मार्फतीनें व्हावी,

त्याअर्थी १९०२ सालांतील इंडिया कौन्सिलांतील हुकुमान्वयें मिळालेल्या परराष्ट्रीय खात्यांतील अधिकारान्वयें गव्हर्नर जनरल साहेब असें फर्मावतात कीं, वरील तारखेस वऱ्हाडांतील कायद्यान्वयें हैदराबादच्या रेसिडेंटास जे जे अधिकार होते व त्यांचेकडे जीं जीं कामें सोंपविलीं होतीं तीं तीं कामें व अधिकार त्या तारखेपासून मध्यप्रांताचे चीफ कमिशनर साहेब यांजकडेस दिले आहेत व त्या कायद्यांत जेथें जेथें रेसिडेंट, स्थानिक सरकार व रेसिडेन्सी ऑर्डर्स असा अन्वय येईल तेथें तेथें त्याऐवजीं सदरहू चीफ कमिशनर साहेब व मध्यप्रांताचें ग्याझेट असें समजलें जावें.

एल्. डब्ल्यू. डेन,
हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी.

---

९.

हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस
ता. १३-११-१९०२

---

× × × ×

३ — मागील सतत पन्नास वर्षें वऱ्हाड इंग्रजांच्या व्यवस्थेखालीं असतांना ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या योगानें राज्यव्यस्थेची कायमची रूढि बनून गेली आहे व ही रूढ परिस्थिति बदलणें शक्यहि नाहीं व फायद्याचेंहि नाहीं हें उभय पक्षांच्या ( इंग्रज व निजाम ) पुरतेपणीं लक्षांत आलें म्हणून दोन्ही पक्षांनीं अशाच तऱ्हेनें हा प्रश्न सोडविला कीं तेणेंकरून हल्लीं २७।२८ लक्षांपर्यंत

वाढलेल्या लोकसंख्येस असें आश्वासन द्यावें कीं, आजपर्यंत ज्या ज्य
स्थितीमुळें व राज्यव्यवस्थेच्या दर्जामुळें त्याची एवढी भरभरा
झाली तीच राज्यपद्धति पुढेंहि अबाधित चालू राहील.

× × × ×

---

## १०.

सर सालरजंग दिवाण यांनीं सन १८७७ सालीं वऱ्हाड निजामास मिळण्याकरितां खटपट केली त्यासंबंधीं सेक्रेटरी ऑफ स्टेटचें हिंदुस्थान सरकारास पत्र.

नं० १९ इंडिया ऑफिस लंडन, ता. २८-३-१८७८.
मार्क्विस ऑफ सालिसबरी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांजकडून हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल—यांस

तुमचें पत्र नं. १८ ता. ११-६-१८७७ चें पावलें व वाचलें. सोबत हैदराबाद सरकारचे रीजेंट (पालक) दिवाण यांचें ाड परत हैदराबाद संस्थानचे ताब्यांत देण्यासंबंधीं मेमोरियल (विनंती अर्ज) व त्यावरील तुमचा जबाब हाहि वाचला.

× × × ×

प्यारा ९—प्रस्तुतचे बाबतींत वादाचा विषय मानमरातब, वसूलाची रक्कम अगर व्यक्तिविषयक सत्ता हा नसून लाखों माणसांच्या जीविताचा व मालमत्तेचा हा प्रश्न आहे. एवढ्या मोठ्या हितसंबंधाचा विचार करतांना दुसऱ्या सरकाराविषयीं कितीहि प्रेमभाव असला तरी त्या भावनेपेक्षां जास्त महत्त्वाच्या व निकडीच्या अशा गोष्टींच्या अनुरोधानेंच राणीसाहेबांस व येथील सरकारास

भाग आहे. हल्लीं देशाची जी राज्यव्यवस्था चालू आहे ती
मंजूर झाली एवढेंच नव्हे तर हल्लीं वहिवाटीनें दृढमूल झाली
ती व्यवस्था बिघडविणें ही गोष्टी गृहीत परिस्थितीच्या अगदीं
द्ध आहे. दिवाणांनीं दाखविलेल्या कालमर्यादेंत निजाम सरका-
राज्यव्यवस्थेची जी पद्धति चालू होती व त्याच कालावधींत
श सरकारची जी व्यवस्था होती त्यांतील बरेवाईटपणाबद्दल
संगीं तुलना करणें शिष्टाचाराविरुद्ध आहे परंतु एवढें मात्र
रीनें म्हणतां येईल कीं, ह्या दोन्हीं राज्यव्यवस्थेमध्यें महदंतर
े व एवढ्या दाट वस्तीचा देश एका पद्धतीच्या राज्यव्यवस्थे-
दुसरीकडे बदलल्यास प्रजेपैकीं प्रत्येक वर्गाच्या जीवनव्यवसा-
महत्त्वाच्या घडामोडी होऊन त्याचे परिणाम प्रत्येक वर्गास
सतील............तहाच्या योगानें व रयतेच्या कल्याणाच्या
ष्टीनें राज्यव्यवस्था न बदलतां हल्लींप्रमाणेंच कायम राहणें हें पक्के-
णीं प्रस्थापित झालें आहे व त्याविरुद्ध कोणतीहि सूचना आणण्या-
वीं ज्या रयतेचें नफानुकसान होण्याचा प्रश्न आहे त्यांच्या कल्या-
च्याच दृष्टीनें फार दृढतर अशीं कारणें पुढें आलीं पाहिजेत.

# स्थलवर्णनात्मक सूचि.

आकोलाः— आकोला जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. समुद्रसपाटी पासून ९२५ फूट. मोरणा नदीच्या कांठीं. पश्चिमेस जुनी वस्ती. पूर्वेस नवीन. जुने शहरास तट आहे. लोकसंख्या ३२०००.

मोरणा नदीच्या कांठीं जुना किल्ला आहे. तो इ. स. १६९७, हिजरी १११४ मध्यें औरंगजेबाच्या कारकीर्दीत खाजाअबदुल लतीफ याचे वेळीं नबाब असदखान जहागिरदार यानें बांधला अशाबद्दल दहिहांडा वेशीवर फारशी लेख आहे.

आगरवेस नांवाची शहराची जुनी वेस आहे, तिच्यावर मराठी लेख आहे कीं, ती गोविंद अप्पाजी यानें १८४३ इ. मध्यें बांधली.

निजाम व मराठे यांचे लष्करांमध्यें येथें एक लढाई झाली.

इ. स. १७९० मध्यें गाजीखान पेंढारी यास भोंसल्याचे लष्करानें येथें गांठून त्याचा पुरा मोड केला.

जनरल वेलस्ली हा असईहून आडगांवचे लढाईस जातांना मध्यें आकोला येथें त्यानें मुक्काम केला होता व पुढें आंदुऱ्याहून आडगांवास गेला.

इ. स. १८१७ मध्यें जनरल डव्हटन हा नागपुरास जातांना येथें तळ देऊन राहिला होता. त्या जागेवर हल्लीं डेप्युटी कमिशनरची कचेरी व जेल आहेत.

आकोळासिंग नांवाच्या रजपुतानें मूळ गांव व किल्ला वसविला व त्यावरून त्या गांवास नांव पडलें अशी दंतकथा आहे.

आकोटः—सतरंज्या व इतर कापड चांगलें होतें. नरसिंगबुवा नांवाचा साधु फार प्रसिद्धीस येऊन गेला. त्याची मोठी समाधि आहे. नरनाळा किल्ला येथून जवळ असून त्या किल्ल्याचे किल्लेदार फडनवीस, सरदेशमुख वगैरे सर्व अधिकारी येथें रहात असत. नरनाळ्याचे किल्लेदार दिवाकर भाऊ यांचा चांगला वाडा अद्याप आहे.

अडगांवः—आकोटचे पश्चिमेस ९ मैल. ता. २९-११-१८०३ रोजीं अडगांवचे दक्षिणेस शिरसोलीचे मैदानावर भोंसले व शिंदे यांचें लष्कराशीं इंग्रजांची लढाई झाली. जनरल वेलस्लीनें मराठ्यांचा पराभव केला.

अजिंठाः—वऱ्हाडचे पश्चिम सरहद्दीजवळ निजामाचें राज्यांत. येथील प्रसिद्ध लेण्यावरून वऱ्हाडचे इतिहासावर उजेड पडला आहे. ( वाकाटक पहा. )

अमडापूरः—येथें एका टेंकडीवर फार जुनें देवीचें देवालय आहे. त्यावर एक लेख आहे, पण तो वाचतां येत नाहीं. दोन प्रचंड मूर्तीचे खंड तेथें पडले आहेत.त्यावरून मूळच्या मूर्ति फार मोठ्या असाव्या. पेशव्यांचा कमाविसदार खंडो बल्लाळ येथें रहात होता. त्याचें घर अद्याप तेथें असलेलें दाखवितात.

अमरावतीः—उमरावती पहा.

आमनेर झिलपीः—मेळघाटांत गर्गा व तापी नदीचे संगमावर फार जुना किल्ला आहे. १८५७ सालचे बंडाचे अखेरीस तात्या टोपी येंथपर्यंत आला होता. परंतु पुढें त्याचा प्रवेश झाला नाहीं. तंट्या भिल्लाचा आखाडा याचे भोंवतीं होता व त्याचेकरितां या किल्ल्यावर शिबंदी ठेविली होती.

आमनेर ( ता. मोर्शी ):—वर्धेच्या कांठीं निजामानें एलिचपूर नबाबावर स्वारी केली असतां भोंसले नबाबाच्या मदतीस आले. त्या येथें लढाई झाली. त्या लढाईंत मेलेल्या लोकांची थडगीं अद्याप दा[illegible] विण्यांत येतात. येथें तट होता.

लालखां पठाणाची एक मोठी कबर आहे व जवळच एक मशीद आहे. त्यावरील फारशी लेखावरून समजतें कीं, औरंगजेबाच्या कारकीर्दीत राजाकिसनसिंग नांवाच्या हिंदू सरदारानें ती लालखां पठाण नांवाच्या अमलदाराच्या स्मरणार्थ बांधिली. हिजरी सन ११००

असदपूरः—( उमरावती जि० ) इ० स० १७६३ मध्यें निजामानें महिताबखान नांवाच्या मनुष्यास ही जहागीर दिली. ती त्याचे वंशजाकडे आहे.

अंजनगांव सुर्जीः—वस्ती ११८८१. देवनाथ महा... ...भूमि. मुख्य मठ येथें आहे. त्यांचा व त्यांचेनंतर झालेले मठाधि... सर्व काव्यसंग्रह येथें आहे.

ह्याचप्रमाणे रामदासांचे चरित्रकार व सांप्रदायी प्रसिद्ध उद्धवसु... यांचाही मठ आहे.

ता. १०-१२-१८०३ रोजीं शिंदे व इंग्रज यांचा तहनामा येथें झाला.

अंजनगांवबारी ( उमरावती ) – पेशव्यांना जहागीर होतें.

अनासिंग —शृंग ऋषीचें एक जुनें देऊळ आहे.

उपरा... ...पुरः—शहादावल या नांवाचें देवस्थान आहे. शहा नांवाचा मुसलमान फकीर व दावल नांवाचा महार साधु हे मोठे मित्र असून एकत्र रहात असत. त्यांना एके जागींच पुरलें. हिंदु व मुसलमान एक होऊन या देवास भजतात. खालच्या हिंदु जाती व मुसलमान यांचें धार्मिक मिश्रणाचें हें एक उदाहरण आहे.

उमरखेडः—दक्षिणेस पेन गंगेच्या कांठीं. इ. स. १७५० मध्ये निजामाकडून तें पेशव्याकडे आलें व तें त्यांचे स्वतःचे अधिकाऱ्यांचे ताब्यांत होतें. सन १८१८ मध्यें दुसरे बाजीराव पळत असतां उमरखेडास येऊन राहिले होते, व पुढें पांढरकेवड्याकडे गेले. गोचर ...स्वामींचा एक मठ प्रसिद्ध आहे.

आईनाथ मुनी—एकनाथाचे परंपरेपैकीं गोचर स्वामी, मुनीच्य... ...ठांतील गादीवरील एकनाथाचे चौथे अगर पांचवे पुरुष उत्तमश्लोक ( देशपांडे ) यांचे ग्रंथ आहेत सप्तशतीची टीका प्रसिद्ध होत आहे.

उमरावतीः—(अमरावती ) वऱ्हाडचें मुख्य ठिकाण. लोकसंख्य... ३८००० देवी रुक्मिणीस श्रीकृष्णानें ज्या ठिकाणाहून नेलें तें अंबादेवीचें देऊळ प्रसिद्ध आहे.

येथून कुंडीनपूर बरेंच दूर आहे, व कुंडीनपूरचा विस्तार उमरावतीपर्यंत होता व हें अंबेचें देऊळ नगराबाहेर होतें अशी दंतकथा आहे येथें रुक्मिणीचा भाऊ रुक्मी व शिशुपाल यांशीं श्रीकृष्णाची लढा... झाली. रुक्मी याचा पराभव झाल्यामुळें तो कुंडीनपुरास परत

तेथेप्रमाणें येथून सात कोसांवर (भातकुली येथें) नवीन भोजकट
ोजनगर वसवून शेवटपर्यंत तेथेंच राहिला.

भोंसल्यांनीं उमरावती बरीच भरभराटीस आणली. निजाम व
सले या दोघांचेही अमलदार उमरावतीस रहात असत. व त्यांच्या
स्यांत रयतेस फार त्रास होई. मराठे साठी चाळीशीच्या वांटणीप्रमाणें
सुलापैकीं शेंकडा साठ रुपये घेत व निजामाचे अधिकारी चाळीस घेत.

वऱ्हाडचा मक्तेदार **राजा बिसनचंद** याची हवेली येथें आहे.
थें हल्लीं मराठी शाळा आहे.

प्रसिद्ध चित्तू पेंढारी यानें उमरावती लुटली होती. त्याचें विस्तृत
मनोरंजक वर्णन मेडोज टेलर यानें "ठगाची जबानी" या पुस्तकांत
केलें आहे. १८०३ चे तहानंतर वऱ्हाड स्वतंत्रपणें निजामाकडे आल्या-
नंतर उमरावतीचे तटास निजामाचे अधिकाऱ्यांनीं सुरवात केली. त्यास
तरा वर्षें लागलीं. "खुनारी खिडकी" नांवाचा या तटास लहान
रवाजा आहे. तेथें इ० स० १८१६ मध्यें मोहरमच्या महिन्यांत हिंदू
सलमानांत मोठा दंगा होऊन सातशें माणसें मारलीं गेलीं.

गाविलगडच्या लढाईनंतर **वेलस्लीनें** येथें मुक्काम केला होता.

उमरावतीहून १॥ २ मैलांवर **रहाटगांव** येथें भोंसल्यांची आप-
ल लढाई झाली होती. (मागें पान ३८९ पहा)

ऋणमोचनः—पूर्णेच्या कांठीं जहागीर गांव. पौष महिन्यांत द
ववारीं मोठी यात्रा भरते. सरासरी दहाहजार लोक जमतात.

एलिचपूरः—वऱ्हाडची जुनी राजधानी. लोकसंख्या २६०००.
ठ नांवाच्या जैन राजानें वसविलें अशी दंतकथा आहे. त्यावरून मूळ-
व इलेशपूर असावें असें म्हणतात. **अचलपूर** या नांवाचा अपभ्रंश
हे असें आतां साधार ठरलें आहे.

इमादशाही घराण्याची राजधानी. नंतर नबाबाची राजधानी. दोन्ही
रकीर्दींच्या पुष्कळ इमारती येथें आहेत. मुसलमानी कारकीर्दीतील जुने
याचे नळ आहेत. पूर्वीं ५४ पुरे होते, आतां ३५ आहेत. व त्या त्या
याचे स्थापन करणाराचे नांवानें प्रसिद्ध आहेत. बहुतेक नांवें मुसल-
ी आहेत.

## पूर्वीच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारतीः—

१ सुलतान इमादुल्मुल्क याचा इदगा. इ० स० १३४७

२ **भरकल** जुना हिंदु काळचा किल्ला. यांत पुढें कैदखाना होत.

३ **हौजकटोरा** नांवाचें जलविहाराचें स्थान. पश्चिमेस एक कोसावर आहे.

एका तलावांत तीन मजली इमारत व मनोरे आहेत. हल्लीं पडलेलें आहेत. मुसलमानी कारकीर्दीच्या आरंभाचे असावे.

४ **दूला रहिमान शहाची** कबर—बीचन नदीच्या कांठीं,

५ शहराचा तट नबाब इस्मायल खानानें बांधला आहे.

६ नबाबाचे महाल.

७ नबाबाचें कबरस्थान.

८ गाविलगडचें लढाईत पडलेला वेलस्लीचा हस्तक ले. क. **केनी** याची कबर हल्लींच्या म्युनिसिपल ऑफिसचे जवळ आहे.

जवळच परतवाडा येथें १९०३ पर्यंत हैदराबाद कंटिंजंटचें लष्कर रहात असे.

९ समर्थशिष्य प्रसिद्ध **भोलाराम** याची समाधि व मठ.

१० **देवनाथांचें** सांप्रदायाचा मठ.

करजगांवः—एलिचपुराजवळ. घंटा, पितळी व तांब्याचें सामान ... नामदारखां नबाबाची जहागीर होती. विठ्ठल भागदेव नांवाच्या ...दारानें बांधलेला लहानसा किल्ला आहे.

कळंबः—यवतमाळ तालुक्यांत यवतमाळपासून सात कोसांवर गणेश पुराणांतील प्रसिद्ध **चिंतामणीचें** स्थान आहे. समोर एक कुंड आहे. पूर्वी महत्त्वाचें ठिकाण होतें. पूर्वी एक किल्ला होता, व माहूरच्या किल्ल्याचें खालोखाल हें महत्त्वाचें ठाणें होतें.

कुंडिनपूरः—कौंडण्यपूर—वर्धेच्या कांठीं. उमरावतीहून पूर्वेस कोसावर. प्राचीन विदर्भाची राजधानी. हल्लीं वस्ती चार पांचशें. पूर्वी उमरावतीपर्यंत विस्तार होता असें म्हणतात. पूर्वीचें शहर जमिनीच्या खालीं आहे. विदर्भाचें प्रसिद्ध राजकुल येथें नांदत होतें. यदुवंशीय विदर्भ राजानें वसविलें. **रुक्मिणीचें** माहेरघर. **रुक्मिणीच्या** भावानें

जधानी **भोजकट** म्हणजे हल्लींची "भातकुली" येथें नेली. विठ्ठल
णचिं मंदीर येथें आहे. व दरवर्षीं कार्तिकीपौर्णिमेस फार
ठी यात्रा भरते. पन्नास हजारांपर्यंत लोक येतात. जास्त वर्णन भा. २

कुरमः— मुर्तिजापूरचे पूर्वेकडील रेलवे स्टेशन. स्टेशनाच्या पश्चिमेस एका नदीवर रेलवे गाडी जातांना पुलावरून हळू जाते, कारण पाया पक्का नसल्यामुळें पूल कच्चा आहे व थोडा थोडा हलतो. पुलाखालीं नदीच्या कांठीं एक कबर आहे. तेथील फकीरानें गाडी हळू जाण्याचें कारण ती सदरहू अवलियाचे कबरीस सलामी देते असें प्रसिद्ध केलें आहे, त्यामुळें प्रत्येक गाडींतील भाविक उतारू गाडींतून पैसे फेंकतात व फकिरांचें पोट चांगलें चालतें.

कारंजाः— मूर्तिजापूर तालुक्यांत. व्यापाराचें मोठें ठिकाण. मूर्तिजापुराहून रेल्वेचा फांटा आहे. जुन्या नागपूर डांक लाइनीवर आहे. पूर्वीं तट होता. हल्लीं वेशी आहेत. फार पूर्वींपासून फार श्रीमंत शहर म्हणून प्रसिद्ध आहे. कस्तुरीचे उंट विकत घेणाऱ्या सावकाराची गोष्ट पा. १७२ मध्यें पहा. सदरहू कस्तुरीची भिंत अद्याप दाखवितात, व गरीब लोक कस्तुरीच्या ऐवजीं त्या भिंतीची माती नेतात. जुन्या घरांत तळघरें व लांब लांब भुयारें आहेत. कांहीं गांवाबाहेर निघतात. त्यावरून पूर्वींच्या श्रीमंतीची जास्तच कल्पना होते.

शिवाजीचा सरदार **प्रतापराव** यानें हें शहर इ. स. १६७० लुटलें. व पुष्कळ संपत्ति नेली. पान १७२ पहा.

प्राचीन काळींहि प्रसिद्ध होतें. **कारिंज** ऋषींच्या नांवावरून गांवा नांव पडलें. या ऋषीच्या नांवावरून ऋषी तलाव नांवाचा तलाव आहे. तेथें कारिंजऋषीनें व्याधिनिवारणार्थ तपश्चर्या केली होती भा. २पहा.

येथें दत्ताचा एक अवतार झाला होता. ( गुरुचरित्र पहा. ) कारिंज महात्म नांवाची स्थल वर्णनात्मक एक पोथी आहे **बिंदुतीर्थ** नांवाचें कुंड गांवांत आहे. त्यांतून बेंबळा नांवाच्या नदीचा उगम आहे.

समर्थ परंपरेपैकीं **रोकडा रामाची** समाधि व मठ येथें आहे.

**कारंजाबिबी** असेंहि नाव होतें. कारण अहमदनगरच्या बादशहाच्या मुलीस आंदण दिलें होतें. तिची कबर तेथें आहे.

**लाडाचे कांरजे** असेंहि म्हणतात, कारण लाड जातीच्या साव-कारांचीं पुष्कळ घरें तेथें आहेत.

कोथळीः-- मलकापूर तालुक्यांत. अजिंठ्याच्या ओळीच्या पाय-थ्याशीं **विश्वगंगा** नदीच्या कांठीं. दोन सुंदर जुनाट देवळें आहेत. त्यावरलि दगडी कोंरीव काम चांगलें आहे. येथून अजिंठ्याचे डोंगरावर चढण्यास "जयपूर कोथळीचा घाट" म्हणून एक घाट रोहिण-खेडच्या खालोखाल प्रसिद्ध होता.

कुटासाः-आकोट तालुक्यांत **कोटेश्वर** महादेवाचें जुनाट देवा-लय असून एका खांबावर देवनागरी लेख आहे. अद्याप वाचला गेला नाहीं.

केळापूर-पांढरकेवडा--दोन्ही गांवें जवळ जवळ आहेत. केळा-पुरास फार जुना असा एक किल्ला आहे, त्यास कुंतलपूर म्हणून जुनें नांव होतें अशी दंतकथा आहे. देवीचें व गणपतीचें देऊळ आहे. गणपतीचे एकाच शिळेस चारी बाजूस गणपती आहेत. प्राचीन चंद्रहास्य राजाचें नगर अशी दंतकथा आहे. दुसरे **बाजीराव** पळत असतां येथें येऊन राहिले होते. ता. २-४-१८१८ रोजीं **स्कॉट** व **आडाम्स** या इंग्रज सर-दारांनीं येथें लढाई देऊन बाजीरावाचे सैन्याचा मोड केला व **आप्पासा-**हेब भोंसल्यास जाऊन मिळण्याचा त्याचा बेत फसून त्यास उत्तरेकडे जावें लागलें.

खामगांवः--ऐतिहासिक महत्त्व नाहीं. हल्लीं कापसाचे व्यापाराची फार मोठी पेठ आहे.

खोलापूरः--( उमरावती जि. ) कापड विणण्याचे बरेच कारखाने आहेत. एलिचपूरचा निजामाचा सुभेदार विठ्ठल भागदेव यानें एक लक्ष रुपये खंडणी मागितली व या गांवास वेढा दिला. गांवकऱ्यांनीं दोन महिने दाद दिली नाहीं. शेवटीं गांवकऱ्यांचा नाइलाज झाला व या सुभेदाराच्या लष्करानें गांव लुटलें. तेव्हांपासून अद्याप गांव सुधरला नाहीं.

गणोजेः--( उमरावती ) येथें देवीचें देऊळ आहे. मार्गशीर्ष पौर्णि-मेस यात्रा भरते. कुष्टादि रोग दूर होतात असा भरंवसा आहे.

गर्गानदीः--( मेळघाट ) तापीस मिळते. देखावा रमणीय आहे.

गिरडें:—( चिखली ) येथील डोंगराच्या खडकांतून शिलाजित निघतें.

ग्यान:—( ज्ञानगंगा नदी ) डोंगर शेवली ( चिखली ) येथून निघून पिंपळगांव राजाहून उत्तरेकडे जाऊन पूर्णेस मिळते.

चंद्रचुडामण नदी:—मोर्शी तालुक्यांत.

चंद्रभागा नदी:—दर्यापूर तालुक्यांत पूर्णेस मिळते.

चांदूर रेल्वे:—वाकाटक घरण्यांतील एका शिलालेखांत चंद्रपूर असें नांव आहे, तें हें असावें असा एक तर्क आहे. चांदा याचेंही जुनें नांव चंद्रपुर असें आहे.

चांदुरबाजार:—फार मोठा बाजार भरतो.

चिखली:—तालुक्याची जागा.

चिखलदरा:—गाविलगड किल्ल्याजवळ मेळघाटांत. हवा खाण्याचें ठिकाण.

जळगांव:—जळगांव जामोद असेंहि म्हणतात. जामोद जवळच आहे. येथें " राजा भर्तृहरीचें " देऊळ आहे. नागपंचमीस, त्या जागीं यात्रा भरते. भर्तृहरीचा या जागीं मृत्यु झाला असावा व त्याची हि समाधि आहे. हा शतककार अगर दुसरा कोणी ? बहुधा दुसरा.

जामोद:—जळगांवहून तीन कोस. मुसलमानी कारकीर्दीत [illegible]र महत्त्वाचें ठिकाण होतें. किल्ला असून टांकसाळ होती. येथील ज[illegible] पैसे इंग्रजी अमदानीच्या आरंभास चालत असत.

जांभोरा:—( चिखली ता. ) येथील वतनदार पाटील बु[illegible] जातीचे आहेत, व त्यांचा पूर्वज अगर त्यांचा देव येलूजी याच्या नांवानें एक देऊळ आहे. त्यास दिलेली लोखंडाच्या पत्र्यावर कोरलेली शहाजहानाच्या वेळची सनद आहे. त्यावर शहाजहानाचा शिक्का आहे. ती इ० स० १७११ ची आहे. ताम्रपटावरील मुसलमानी सनद ही एकच आहे.

जानेफळ:—शिंदखेडचे जाधवरावांचें पाटिलकीचें गांव होतें. त्यांची मोठी गढी अद्याप आहे. राजे बाजीराव यांचें वतन जप्त झालें त्यांत हेंहि वतन गेलें. ही अव्वल इंग्रजींत जिल्ह्याची जागा होती. नंतर ती बुलडाण्यास गेली.

येथें मुकुंदराज नांवाच्या जुन्या साधूची फार जुनी समाधि आहे. त्या समाधीस पूर्वी इनाम जमीन होती. हे कोणते मुकुंदराज हें माहीत नाहीं.

डोणगांवः—वाशीमच्या बालाजीच्या संस्थानाची पाटिलकीची एक तक्षीम व इनाम जमीन आहे. जवळच नागापुर म्हणून उमरावतीचें घन वल्लभाचे देवळास जहागिरीचें गांव आहे.

तळगांव दशसहस्र—चांदूरच्यापूर्वी तहासिलीचें गांव होतें शहा-लतीफ नांवाच्या अवलियाच्या दर्ग्यास शहाजानाच्या सनदेवरून इनाम जमीन आहे. या दर्ग्याचें अधिकाऱ्याजवळ शहालतीफ यानें स्वतः सोनेरी अक्षरांत लिहिलेली कुराणाची प्रत आहे असें कळतें.

दशसहस्र हें नांव कसें पडलें याबद्दल पुढील दंतकथा आहे:—

एके दिवशीं एक मोठें कालिंगड विकण्यास दारावर आलें. एका जहागिरदाराचें घर व एका सावकाराचें घर जवळ जवळ होतें. विक-णाऱ्याजवळ फळ एकच होतें. जहागिरदारणीनें व सावकारणीनें दोघीं-नींही तें मागितलें. किंमतीची चढाओढ सुरू झाली. दोघीही मीच तें घेईन म्हणून हट्टास पेटल्या. शेवटीं किंमत वाढत जाऊन तें दहा हजारांस गेलें. त्यावरून तळेगांव दशसहस्र हें नांव पडलें.

तपोवनः—( चिखली )

तपोवनः–( यवतमाळ ) ओसाड झालेलें गांव. येथें काशीविश्वे-श्वराचें एक जुनें हेमाडपंती देऊळ आहे. लाडखेडावरून एक कोसावर.

तारापूरः—बुलडाण्यापासून चार कोसांवर डोंगरांत ओसाड गांव आहे. तेथें एक जुनें देऊळ आहे. त्यावर कांहीं लेख आहेत पण वाचण्यालायक नाहींत.

तेल्हाराः—आकोट तालुक्यांतील एक मोठें गांव. पूर्वी येथें दिवाणी कोर्ट होतें.

दत्तापूरः—धामणगांव पहा.

दर्यापूरः—तालुक्याची जागा. इमादशाही घराण्यांतील तिसरा राजा देरिया इमादशहा यानें वसविलें.

दहीहांडाः—येथें निजाम व भोंसले या दोघांचेहि अधिकारी रहात असत. त्यांच्या रहाण्याच्या जागा अद्याप दाखविण्यांत येतात. मीठ काढ-

ण्याचे कारखाने इंग्रजी अमदानीपर्यंत चालू होते. येथील विहीरींतून मीठ काढीत असत. व एकेक विहीरीचें उत्पन्न पांच पांचशें रुपये येत असे. अशा ५०।६० विहीरी येथें असत. विहीरींतून पाणी इतक्या जोरानें येत असें कीं खणणारास वर ओढून घ्यावें लागे.

दाताळा:—( मलकापुराजवळ ) येथील रजपुतांची व मलकापूरचे मुसलमानांची एक मोठी लढाई सुरू इंग्रजींत झाली होती. भाग पहा.

दारव्हा:—पूर्वी साबाजी भोंसल्यांची रहाण्याची जागा होती "दारव्हाचे उजागर, कारंजाचे नकटे व राळेगांवचे उचले" अशी एक पूर्वापार म्हण आहे. कारण समजत नाहीं.

येथील देशमुखाची एक शाखा हिंदु असून दुसरी मुसलमान झालेली आहे. हिंदु घराणें "राणे रजपुत" आहेत. व आपण उदेपूरच्या रजपूत घराण्यांपैकीं आहों असें तें म्हणतात. यांची पांच महालांची देशमुखी होती. या दोन महालांचें उत्पन्न सव्वादोन लाखांचें होतें असें फ.१०८३ च्या वांटणीपत्रावरून कळतें. त्यांत प्रत्येक गांवचें उत्पन्न वैगेर तपशीलवार दिलें आहे.

देउळघांट—बुलडाण्याजवळ. मुसलमानी वस्ती फार आहे. येथील नवाबघराणें प्रसिद्ध आहे. राजुरा व रोहिणखेडच्या घाटानें चढलें म्हणजे येथील वेशींतून वर चढावें लागत होतें. म्हणून घाटाचें द्वार हो[illegible]

देऊळगांवराजा— पूर्वी देवळी म्हणून खेडें होतें, जा[illegible] रावांच्या घराण्यांतील रासोजी नांवाच्या दासीपुत्रानें येथें वस्ती वाढ[illegible] महात्त्वास आणलें. पुढें जाधवरावांचें रहाण्याचें ठिकाण झालें. तेव्हांपासून देऊळगांवराजा हें नांव पडलें. रावजगदेव नांवाच्या पुरुषानें येथील प्रसिद्ध बालाजीची स्थापना केली, असें मानण्यांत येतें. हें देवस्थान फारच महत्त्वास चढलें. स्थापना जरी जाधवरावांच्या घराण्यांतून झाली तरी त्या संस्थानाची खरी वाढ निरनिराळ्या दुसऱ्याच पुरुषांनीं केली. त्यांत हरीसा, रामासा, नवलसा, या लाड सावकारांच्या तीन पिढ्यांत ती विशेष झाली. हें घराणें फार श्रीमंत असून त्यांचेकडे संस्थानचा कारभार असतांना त्यांनीं सर्व राजेरजवाड्यांकडून संस्थानास इनाम जमीनी व वर्षासनें मिळविलीं.

हल्लीं या गांवाचें सर्व महत्त्व बालाजीच्या देवस्थानावर आहे. भोंवतालच्या सर्व भागांत हें देवस्थान फार प्रसिद्ध आहे. अश्विन महिन्यांत मोठा उत्सव असतो व यात्रा भरते.देवाचे दुकांनात व्यापारी व इतर लोकांकडून हजारों रुपयांची कानगी ( देणगी ) येते.

या देवस्थानाचे व्यवस्थेसंबंधानें राजे, सार्वजनिक लोक व हरीसांचें घराणें यांचेमध्यें वेळोवेळीं दावे झाले आहेत. ( भाग १५ जाधवघराण्याचें वर्णन पहा ) हल्लीं व्यवस्था दिवाणी कोर्टामार्फत कमेटी नेमून चालली आहे.

येथें बरेंच कापड विणलें जातें. जाधवरावांचा किल्ला व राव जगदेव यांची बायको दुर्गाबाई इची " मोती समाध " नांवाची समाधि कायम आहेत.

शिवदिन केसरीचे पुत्र नरहरीनाथ यांची समाधि व मठ येथें आहे. विठ्ठलनाथ यांचे मुलीचे वंशांतील गौतमनाथ हे हल्लीं येथील गादीवर आहेत.

देऊरवाडाः-- देऊळवाडा-- एलिचपुराहून सात कोस पूर्णेच्या कांठीं. येथें नरसिंहाचें प्रसिद्ध देऊळ आहे.नृसिंहावतार झाल्यानंतर येथें नृसिंहानें हात धुतले अशी आख्यायिका आहे. त्याची खूण म्हणून 'न[illegible]शुद्धितीर्थ' नांवाचें कुंड तेथें आहे.

देवगांवः---गाविलगडाजवळ मेळघाटाच्या पायथ्याशीं एक लहान खेडें आहे. गाविलगडाच्या लढाईनंतर भोंसले व इंग्रज यांचा या गांवीं १८०३ मध्यें तह होऊन वऱ्हाड भोंसल्याकडून गेलें. हा तह या नांवानें प्रसिद्ध आहे.

धामणगांव दत्तापूरः---व्यापाराचें एक ठिकाण आहे.

धानोराः---जळगांव-महासिद्धाची यात्रा भरते.

धोत्रः---येथें फार जुनें सुंदर देऊळ आहे. लोणार सातगांव व धोत्र येथील तीन्ही देवळें एक नमुन्याचीं आहेत,व एका वेळचीं असा[illegible]

धोत्र नायकाचेंः---(चिखली ता०) येथील मराठ्यांचे घराणें नागपुरास भोंसल्यांच्या कारकीर्दीत फार प्रसिद्धीस आलें. व त्यांनीं मोठमोठीं कामें केलीं. " झेंडेवाले नाईक " म्हणून नागपुरास आहेत, ते त्यांचेच

वंशज आहेत. त्यांस झेंड्याचा मान असे.त्यांच्या हवेलीसमोर अद्याप झेंडा आहे व "नायकाचा झेंडा" ही त्या मोहल्ल्याची एक मोठी खूण आहे.

नलकुंड नलगंगानदी:---मलकापूर तालुक्यांत अजिंठ्याच्या घाटांतून निघून पूर्णेस मिळते.

नरनाळा किल्ला:—मेळघाटांतील प्रसिद्ध किल्ला. आकोटावरून तेथें जाण्यास रस्ता आहे ( ६ कोस ). वऱ्हाडांतील फार जुना किल्ला. किल्ल्याचे तीन भाग आहेत. पूर्वेस जाफराबाद, मध्यम भागीं नरनाळा मुख्य किल्ला, पश्चिमेस तेलियागड प्रत्येकास मजबूत तटबंदी आहे. लहान मोठे २२ दरवाजे व पुष्कळ बुरूज आहेत. मुख्य दरवाजे चार आहेत. दिल्ली दरवाजा, शिरपूर दरवाजा, आकोट दरवाजा, शहानूर दरवाजा. शहानूर दरवाजा मुख्य आहे. तो मुसलमानांचे पूर्वींचा आहे. इ० स० १४२५ मध्यें बहामनी घराण्यांतील नववा राजा महमदशहा यानें गाविलगड किल्ला बांधला व नरनाळा दुरुस्त केला म्हणून **फेरिस्त्याचे** इतिहासांत वर्णन आहे. परंतु सर्वांत महत्त्वाचा दरवाजा "**महाकाली**" दरवाजा हा होय. दरवाज्याची बांधणी मुसलमानी असून फत्तेउल्ला इमादशहानें इ० स० १४८७ मध्यें बांधल्याबद्दल त्यावर फारशी लेख आहे, मूळच्या हिंदू काळांत तेथें महाकाली असल्यामुळें अगर जुन्या दरवाज्याचेंच महाकाली दरवाजा हें नांव कायम राहिल्यामुळें हें नाव राहिलें आहे.

"**नऊगज तोफ**" नांवाची मोठी तोफ अद्याप तेथें क[illegible] आहे. ती औरंगजेबाच्या कारकीर्दींत ओतलेली असा तिच्यावर लेख आ[illegible] बाकीच्या सर्व तोफा व दारूगोळा १८५७ सालांत आकोटास आणला कारण **तात्या टोपी** जळगांवास आला होता व नरनाळा किल्ला घेईल अशी धास्ती होती. पाण्याचीं बावीस टाकीं आहेत व जागोजाग झांकलेले दगडी हौद बांधले असून नळानें चोहोंकडे पाणी खेळविलें आहे. झांकलेल्या हौदांवरून हे मूळचे जैनांचे असावेत असा एकानें तर्क केला आहे त्यात [illegible] त्यास इतर कांहीं आधार नाहीं.

**जामे मशीद** नांवांची मूळची मोठी पण हल्लीं पडकी मशीद आहे. अंबरखाना, सराफखाना ( टांकसाळ ), दारूखाना, हत्तीखाना

यांच्या जागा कायम आहेत. व तोफा गाळण्याची जागाही आहे. भोंसल्याच्या वेळचा एक पडका महाल आहे.

निर्गुणा नदीः—वाशीम तालुक्यांतून निघून बाळापुराजवळून पूर्णेस मिळते.

पाईन घाटः—वऱ्हाडचे दक्षिणेकडील निमे डोंगराळ भागास बालाघाट व उत्तरेकडील सपाट भागास पाईनघाट म्हणत असत.

पातूरः—यास "पातुर शेख बाबू" अथवा "नानासाहेबाचें पातुर" असें म्हणतात. दोन्ही साधू येथें होऊन गेले. येथें दगडांत कोरलेलीं दोन लेणीं आहेत. त्यांत एक महादेवाची पिंड आहे. या लेण्यावर एक लहानसा लेख होता तो फार जुना होऊन पडून गेला.

शेखबाबू नांवाचा मुसलमान साधु होऊन गेला, त्याचा दर्गा आहे.

नानासाहेब नांवाचा हिंदु साधु होऊन गेला, त्याची समाधि आहे. नानासाहेबांचा मुलगा मुकुंदराज यानें एका हस्तलिखित ग्रंथांत त्यांचें चरित्र लिहिलें आहे. नानासाहेब एका श्रीमंत यजुर्वेदी ब्राह्मणाचे चिरंजीव होते. उमरावती जिल्ह्यांतील मारकी येथील **मारकीनाथ** बुवांचे शिष्य होते. त्यांचे व त्यांचे वंशजांचे पुष्कळ चमत्कार सांगतात. नागपूरकर राजांनीं यांचें देऊळ बांधलें आहे. माघ महिन्यांत यात्रा भरते.

पिंजरः—आकोल्याहून अकरा कोस. एका हेमाडपंती देवळावर मोठा संस्कृत लेख आहे.

पिंपळगांव देवीः—पौष महिन्यांत देवीची फारच मोठी यात्रा भरते. पंधरा दिवस राहते. विशेषतः तऱ्हेतऱ्हेच्या गाड्या विक्रीस येतात.

पिंपळगांव राजाः—**नागेश दैवज्ञ** म्हणून मोठा ज्योतिषी येथें होऊन गेला. त्याचे वंशज तेथें आहेत. पेंढाऱ्यांनीं हें गांव लुटलें होतें. **महादजी शिंदे** दिल्लीहून पुण्यास जातांना वऱ्हाडांतून गेला त्यानेंही लुटलें. एका भुयारांत खडकांत कोरलेलें रेणुका देवीचें देऊळ आहे व त्यांतच पाण्याचें टाकें आहे. राजा हें नांव कां पडलें याचे अनेक तर्क आहेत. राज्या नांवाच्या महारास गांवचा किल्ला बांधतांना पायांत पुरलें म्हणून त्याचें नांव दिलें, हा एक तर्क. दुसरा तर्क विरतसिंग नांवाचा गवळी राजा होता त्यानें हें गांव वसविलें.

पिंपळनेरः—लोणारजवळ लहान गांव. पूर्वी सरकटे आडनां-वाच्या मराठे देशमुखांच्या ताब्यांत होतें. ते फार शूर होते. औरंगजे-बाच्या वेळीं नबाब करतलबखान व येशबासखान यांच्या ताब्यांत गेलें. त्यांच्या पडक्या इमारतीच्या खुणा आहेत, त्यांचा वंशज हल्लीं तेथील पाटील व देशमुख आहे.

पूर्णाः—पयोष्णी भाग २ पहा. पौराणिक महत्त्वाची नदी. उत्तर वऱ्हाडांतील सर्वांत मोठी नदी.

मत्स्यपुराण अध्याय २२, धौम्यतीर्थ यात्रा वर्णन ( महाभारत अध्याय ) पहा. पयोष्णीमहात्म्य नांवाचा संस्कृत ग्रंथ आहे, त्यांत या नदीच्या कांठच्या सर्व स्थानांचें वर्णन आहे.

पूर्णाः—दक्षिण पूर्णा अथवा खडक पूर्णा. दक्षिणेकडे पैन गंगेच्या बरोबरीची मोठी नदी.

घुसदः—एक दोन जुनीं देवळें व मूर्ति प्रेक्षणीय आहेत.

पैनगंगाः—पाइनगंगा घाटावरील सर्वांत मोठी नदी. पूर्वेकडे वऱ्हाडची दक्षिण मर्यादा. वर्धेस वणी तालुक्यांत माहुराजवळ मिळते. जुनें नांव प्रणीता.

फत्तेखेर्डाः—मूळचे साखरखेर्डा, अमृतराय कवीचें जन्मस्थान व मूळचें गांव. ( भाग २ रा पहा. )

निजामाची व दिल्लीचे मोंगल लष्कराची इ. स. १७२४ [illegible]ें मोठी लढाई होऊन निजामाची फत्ते झाली म्हणून फत्तेखेर्डा नांव [illegible] या विजयानें निजाम स्वतंत्र झाला. दिल्लीचा सरदार मुबारिज[illegible] वरील लढाईत पडला. त्याची कबर लढाईचे मैदानांत आहे. त्यास इनाम जमीन आहे. इ. स. १५८१ मध्यें खुदावंतखान मेहदवी नांवांच्या अधि-काऱ्यानें बांधलेली सुंदर मशीद आहे. ती व मलकापुर तालुक्यांतील रोहीणखेड येथील मशीद अगदीं सारख्या आहेत, व दोन्ही एकाच वेळच्या व खुदावंत खानाच्याच हातच्या आहेत. पलसिद्ध नांवाच्या [illegible]म साधुचा मोठा प्रसिद्ध मठ गांवाबाहेर आहे.

वडनेर बिबीः—रेल्वे स्टेशन. इमादशाही घराण्यांतील देरिया इमाद-शहा याची मुलगी दौलत शहा बेगम ही अहंमदनगरचा हुसेन निजाम

शहा यास दिली होती. तिला हें गांव व कारंजा ही दोन गांवें आंदण दिली होतीं. त्यावरून बिबी हें नांव पडलें. इ. स. १७७२ मध्यें तें पेशव्यास निजामाकडून खानगी जहागीर म्हणून आलें व इ. स. १८१८ मध्यें मराठ्यांचें राज्य गेलें तेव्हां निजामाकडे परत आलें.

बहीरमः---एलिचपुरचे पूर्वेस सात कोस. एका खडकास शेंदूर लावलेला देव आहे. हिंदू व मुसलमान एकदम पुजतात. तेथील चमत्कार हा आहे कीं तेथें हजारों बकरे मारले जातात व जमीन त्यांच्या रक्तानें भिजते पण एकही माशी तेथें नसते.

बाळापूरः---मन व म्हैस या दोन नद्यांच्या संगमावर दोन्ही नद्यांमध्यें किल्ल्याच्या दक्षिणेस बाला नामक देवीचें देऊळ आहे. तिच्या नांवावरून नांव पडलें. ( भक्त रहस्य व Gazetteer ) एलिचपुरच्या खालोखाल मुसलमानी आमदानींतील महत्त्वाचें लष्करी ठाणें. औरंगजेबाचा मुलगा अजमशहा हा या ठाण्याच्या हुद्यावर होता. इ. स. १७२१ मध्यें निजामुल्मुक व दिल्लीकडचें लष्कर यांमध्यें तेथें लढाई झाली.

एलिचपूरचा पहिला नबाब इस्मायलखान यानें तेथील किल्ला बांधला ( इ. स. १७५७ ). हें ठाणें एलिचपूरच्या नबाबाच्या हाताखालीं होतें. येथील किल्ला नदीच्या कांठीं असून फार मजबूत आहे. नेहमीप्रमाणें चांदशा मियाची तुरबत व पाढरें निशाण आंत असून "बिचमे मेरा [illegible]र भाई" या म्हणीचा खरेपणा पटवीत आहे. [illegible]ळीं किल्ल्यांत तहसील कचेरी, शाळा व इतर सार्वजनीक [illegible] आहेत.

औरंगजेबाचें पदरीं असलेल्या जयपूरच्या सवाई जयसिंग राजाची छत्री नदीमध्यें आहे. तिची जयपूरच्या दरबारांतून दुरुस्ती झाली होती.

पूर्वीं कागद, पागोटीं, सत्रंज्या करणारे लोक होते. कागद आतां होत नाहीं. सत्रंज्या व पागोटीं होतात.

बालाघांटः---वऱ्हाडच्या दक्षिणेकडील अजिंठ्याच्या घांटास बालाघांट असें म्हणतात.

बारशी टाकळीः—निजामाचा मोकासवाडा व भोंसल्याची कचेरी. दोन्ही जागा अजून आहेत. दोन हेमाडपंती देवळें, एक देवीचें व दुसरें महादेवाचें.

बुलडाणें:--जिल्ह्याची जागा. उंच जागीं असल्यामुळें हवा थंड आहे. पूर्वीं लष्कर होतें. उंची २१९० फूट.

बैराट:—मेळघाटांतील सर्वांत उंच पर्वत. उंची ३८६६ वर वैराटेश्वर नांवाचें महादेवाचें मंदीर आहे.

ब्राह्मणवाडा:—पुर्णेच्या कांठीं.

भांदक:--चंद्रपुराजवळ हें फार प्राचीन स्थान आहे. वाकाटक घराण्याची ही राजधानी असावी असा पुष्कळांचा तर्क आहे. येथें जुनीं देंवळें व त्यांवर जुने लेख आहेत. गणेशपुराण उपासना खंड अ.३७ यांत भानक व भद्रक हीं नांवें यास दिलीं आहेत. वरद विनायक गणपतीचें प्राचीन स्थान.

भाम राजाची:—यवतमाळपासून सात कोस. हल्लीं ओसाड आहे. कान्होजी भोंसले वऱ्हाडची सरदेशमुखी व चौथाई वसूल करण्यास आला तेव्हां प्रथम त्यानें या गांवीं वस्ती केली. हें गांव इतकें मोठें झालें होतें कीं, फक्त बैराग्यांचीं पांच हजार घरें होतीं. हल्लीं सर्व जुन्या इमारती पडल्या आहेत. व सर्व पडकें जंगल झालें आहे.

भोंसल्यांचे पूर्वीं मोंगलांचे वेळीं येथें लष्करी ठाणें असून तेथें खंदकासह एक लष्करी किल्ला असे. त्याच वेळची जामा मशीद म्हणून जुनी पडकी मशीद आहे. त्याकरितां तेथील काजीस अलमगीर बादशाहानें लोणी म्हणून एक गांव जहागीर दिला होता. त्याची सनद त्याचे वं[illegible] जवळ आहे.

भातकुली:--उमरावतीपासून चार कोसांवर. लोकसंख्या ती[illegible] हजार. रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याचें एक देऊळ येथें आहे. जुनें नांव भोजकट. रुक्मिणीचें हरण केल्यावर यानें तिला परत आणल्याशिवाय मी तोंड दाखविणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली होती. श्रीकृष्णानें त्याचा पराभव केल्यामुळें तो परत कुंडीनपुरास न जातां भोजकट नांवाचें नवीन नगर वसवून तेथेंच राहिला. दीडशें वर्षांपूर्वीं किल्ल्यांत जुन्या जैन मुर्ती [illegible]डल्या असून जैन लोकांनीं त्यांची स्थापना करून चांगली व्यवस्था केली आहे.

भीलटेक:--चांदूर तालुक्यांत. नागोबाचें देऊळ प्रख्यात आहे. नागपंचमीस त्याची यात्रा भरते. ती दोन अडीच महिने राहते. येथील देवळांत जिवंत नाग असतो व नागपंचमीस दर्शन देतो. सर्प डसलेले लोक विष उतरण्याकरतां येथें येतात.

मढ:--चिखली तालुक्यांत अजिंठ्याच्या लेण्याजवळ. येथून पेन-गंगेचा उगम आहे. तेथें देवळें व गायमुख व कुंडें आहेत. त्यांतून पाणी निघतें. महादेवाचें मोठें देऊळ आहे. पूर्वीं हें सर्व बुजलेलें होतें परंतु एका बैराग्यानें वर्गणी जमवून देवळें व कुंडे उकरलीं आहेत.

मरदडी:--चिखली तालुक्यांत घाडचे बाजूस. डोंगरांत देवीचें स्थान आहे.

मलकापुर:--वऱ्हाडचें मुंबईकडून पहिलें स्टेशन. सरकार नर-नाळ्यापैकीं महत्त्वाचें ठाणें. इ० स० १७६१ मध्यें या गांवाजवळून साठ हजार रुपये खंडणी रघुनाथराव पेशव्यांनीं घेतली होती.

निजामाचे वेळेस येथें वीस हजार लष्कर राहात असे. १८४९ मध्यें येथें दाताळ्याचे रजपूत व मलकापुरचे मुसलमान यांजमध्यें लढाई झाली. ( पान २३७ पहा ).

मंगरूळपीर:--शहाबद्दुदीन नांवाचें पिराचे स्थान प्रसिद्ध आहे. त्यास जहागीर आहे.

मालेगांव बाजार:--वाशीम तालुक्यांत राजे उदारामाच्या घरा-ण्यांतलि जहागिरीचें गांव. येथें बाजार मोठा भरतो.

मारकी:--उमरावती जिल्ह्यांत मारकीनाथ म्हणून प्रसिद्ध साधू होऊन गेला. पातुरच्या नानासाहेबांचा गुरु. चैत्र महिन्यांत यात्रा भरते.

मुर्तिजापुर:--मुर्तिजा अली नांवाच्या नायब अधिकाऱ्याच्या नांवावरून नांव पडलें. दुसरा तर्क मुर्तिजा निजाम शहाच्या नांवावरून.

मेहकर:--मत्स्यपुराण अ० २२ यांत या मेघंकर क्षेत्राचें वर्णन आहे. श्राद्धकल्पास हें स्थळ मान्य केलें आहे. पद्मपुराण गीतामहात्म्य अ० १८५ पहा.

मेघंकर नांवाच्या राक्षसाच्या त्रासानें विष्णूनें शार्ङ्गधर रूप धरून त्यास मारलें अशी दंतकथा आहे.

इमारतीः—नदीकांठीं मढ नांवाची हेमाडपंती इमारत. तेथें शार्ङ्ग-
ाची धर्मशाळा व अन्नछत्र होतें असें म्हणतात. परंतु हें ठिकाण श्राद्ध-
र्मांकरितां नदीचें कांठीं बांधलेलें आहे हें स्पष्ट दिसतें.

शार्ङ्गधर नांवाची विष्णूची जुनी मूर्ति १८८८ इ० मध्यें जमीन
णतांना गढींत सांपडली. तिचें मोठें देऊळ आहे. मूर्ति फार मोठी व
दर आहे. मत्स्यपुराणांत महाविष्णु म्हणून व पद्मपुराणांत शार्ङ्गधर
्हणून या गांवाची देवता सांगितली आहे तो देव हाच. त्यापूर्वीची ही
ूर्ति आहे. आणखी स्कंदपुराण वगैरेंत या ठिकाणाचा उल्लेख आहे.

नृसिंहाची एक चांगली मूर्ति व देऊळ आहे. अकबराच्या वेळेस
्हाडच्या सुभ्याखालीं मेहकर हा एक सरकार म्हणजे जिल्हा होता व
ेथें लष्कर होतें.

इ० स० १७६९ मध्यें **माधवराव** पेशवे व निजामाचा दिवाण
**रुकनुद्दौला** हे नागपूरकर भोंसल्यावर स्वारीस जात असतां येथें राहिले
होते.

इ० स० १८१७ मध्यें जनरल डोव्हटन हा तिसरे मराठे युद्धाचे
वेळीं नागपुरकर आप्पासाहेब भोंसल्यावर स्वारी करून जात असतां येथें
थांबला होता. बहामनी कारकीर्दींत येथें लढाई झाली. त्यांत पडलेले
मोठमोठ्या सरदारांच्या दोन कबरी घुमट या नांवानें प्रसिद्ध आहे.
येथील धोतरजोडे प्रसिद्ध होते. मोमीन विणकरी लोकांची वस्ती होती.
त्यांचे नांवानें एक वेस प्रसिद्ध आहे. तीवर सन दिला आहे तो. इ. स.
१४८८ येतो.

पंचपीर नांवाचें पीराचें स्थान असून त्यास एक गांव जहागीर आहे.

मुक्तागिरीः—एलीचपुरचे ईशान्येस सात मैलांवर. जैन लोकांचें
यात्रेचें मोठें स्थान आहे. जैन ग्रंथ **निर्वाण भक्ती** यांत याचें वर्णन दिलें
आहे. जरी सातपुड्याच्या दक्षिणेस आहे तरी तें मध्यप्रांताच्या बैतुल
जिल्ह्यांत आहे. येथें एक धबधबा असून पुष्कळशीं जैन देवळें आहेत.
[illegible] जमीनीच्या आंत भुयारांत आहेत व कांहीं खडकांत कोंरलेलीं
आहेत. पूर्वीं कोणी लक्ष दिलें नाहीं पण हल्लीं जैन लोकांनीं चांगलें लक्ष
घालून दुरुस्ती केली आहे. डोंगराखालीं नवीन देऊळ असून कायमचे

नौकर वगैरे आहेत. हीं देवळें एलिचपूरच्या ईल राजाच्या वेळची आहे अर्से म्हणतात. कांहीं देवळांवर इ० स० १४८८ पर्यंत जुनें शक लिहि लेले आहेत. परंतु एकंदरींत देवळें दहाव्या अकराव्या शतकांतलीं आहेत.

राजूरा:—मलकापुर तालुक्यांत राजुरचे उर्फ रोहिणखेडचे घाटानें वर देऊळघाटास जाऊन घाटावर चढण्याचा जुना हमरस्ता होता. घाटाचे पायथ्याशीं आहे.

राळेगांव:—येथें शें सवाशें वर्षांपूर्वीं एका कासारास खणीत असतां रामाची व देवीची मूर्ति सांपडली. त्यांचे देऊळ बांधलें असून दोन्हीं मूर्तींवर लेख आहेत ते अद्याप वाचलें गेलें नाहींत.

राजूर गणपतीचें:—देऊळगांव राजाजवळ. जाफराबादेच्या बाजूस. पहिल्या बाजीराव पेशव्याचे गुरु धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामीचें मूलस्थान.

रिसोड:—१८५७ मध्यें रोहिले व पेंढाऱ्यांनीं लुटलें. हैद्राबाद कंटीजंट फौजेची व त्यांची जवळच चिंचावें नावाच्या खेड्याजवळ लढाई झाली. त्यांत कॅपटन माकिनान नांवाचा सरदार पडला. जुनीं देवळें आहेत.

रिथपुर:—ऋद्धपुर. मानभावांचें मुख्य स्थान. राजमठ व कृष्ण-मंदीर हीं त्यांचीं देवळें आहेत. राजा बिसनचंद हा येथें तालुकदार होता त्याच्या त्रासानें लोक कंटाळून गेले होते. मानभावांची यात्रा चैत्रांत व आषाढांत भरते.

रोहिणखेड:—घाटाचे पायथ्याशीं राजूरजवळ. इ. स. १४३७ मध्यें खानदेशचा राजा नासीरखान हा अल्लाउद्दीन बहामनी याजवर स्वारीस जात असतां अल्लाउद्दीनानें त्याजवर दौलताबादेचा सुभेदार खलफखान हा पाठविला. त्यांची येथें लढाई होऊन नासीरखानाचा पराभव झाला व खलफखानें बऱ्हाणपुरापर्यंत त्याचा पाठलाग केला.

इ.स.१५९० मध्यें अहंमदनगराचा बुऱ्हाणशहा हा दिल्लीचें लष्कर घेऊन आपला मुलगा इस्मायल याजवर स्वारी करून जात असतां रोहिण-खेड येथें दोघांची लढाई झाली. बुऱ्हाणशहाचा जय होऊन त्याचा मुलगा इस्मायल हा त्याच्या हातीं सापडला व इस्मायलचा मुख्य सल्लागार जमा-लखान हा मारला गेला. जमालखानाचा हस्तक खुदावंतखान यानें इ. स. १५८२ मध्यें बांधलेली एक जुनी मशीद आहे. ही फत्तेखर्ड्याच्या

मशीदीच्या नमुन्याची आहे पण पडली आहे. दोन्ही मशीदी खुदावंतखानानें एकाच वेळीं एका वर्षाच्या अंतरानें बांधविल्या आहेत.

लाडखेडः--( यवतमाळ ) हेमाडपंती देवळें. जवळ तपोपन.

लोणारः--जुनें नांव **विरजक्षेत्र**. प्राचीनत्वाच्या दृष्टीनें वऱ्हाडांतील सर्वांत महत्त्वाचें ठिकाण. अनेक हेमाडपंती व इतर जुनीं देवळें आहेत. **लवणासुर** नांवाच्या दैत्यास मारण्याकरितां **बालविष्णूचा** अवतार होऊन त्या दैत्यास मारलें: अशी कथा आहे. त्यावरून **लोणार** हें नांव पडलें. **विरज महात्म्य** नांवांची संस्कृत पोथी आहे. त्यांत या गांवांतील सर्व तीर्थांचें वर्णन आहे.एका गायमुखांतून पाण्याची अखंड धार पडते. व तेथेंच बालविष्णूचीं व इतर जुनीं देवळें आहेत.

जवळच **पापहरेश्वर** म्हणून तीर्थ आहे. तेथें एक मोठा संस्कृत लेख आहे.फार जुना झाल्यामुळें तो वाचतां येत नाहीं व अद्याप खटपटही विशेष झाली नाहीं.

गोपीनाथ पंडित म्हणून एक मोठा पंडित तेथें होऊन गेला.

**दैत्यसूदनाचें देऊळ** म्हणून चालुक्य कारकीर्दीतील मोठें देऊळ आहे. त्यावर कोरीव काम चांगलें आहे. **धोत्रा** व **सातगांव** येथील देवळें याच नमुन्याचीं आहेत. तेथेंच बालाजीचें देऊळ आहे. त्यांत ब्रह्मदेवाची मूर्ति आहे.

गांवापासून एका मैलावर एक मोठी मारुतीची मूर्ति आहे. देवास जहागीर आहे.

जवळच एका वर्तुळाकार डोंगराच्या ओळींत खोल सपाटींत खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. त्यांतून क्षार निघतात.तें लवणासुराचें क्षारमय रक्त आहे, असें विरजमहात्म्य ग्रंथांत वर्णन आहे. व लवण, लोण यावरूनच गांवाचें नांव लोणार पडलें आहे. पूर्वेकडेस एक पायबारव व जुनें देऊळ आहे.

भाग २ पहा.

याच लेखकाचें " लोणारवर्णन " पुस्तक पहा.

वर्धा नदीः--दुसरीं नांवें **वरदा**, **वशिष्ठा**.वऱ्हाडची पूर्व मर्यादा.

पूर्वीं वर्धेच्या पूर्वेस वऱ्हाडचें राज्य होतें. **विदर्भा** हेंही ह्या नदीचें नांव होतें. इच्या दोन्हींकडे विदर्भाचें राज्य असल्यामुळें वर्धा तट म्हणत असत.

विश्वामित्रा नदीसः—मन नदी म्हणतात.

वलगांव जहागीरः— ( उमरावती ) हैद्राबाद येथील सीताराम महाराज नांवाच देवास हें गांव जहागीर दिलें आहे. सनदा महाराज चंदूलाल व राजा रामबक्ष यांच्या इ. स. १८४२ व १८५० च्या आहेत. शेतसारा सरासरी १२००० रु. आहे व तो सर्व वरील देवस्थानास मिळतो.

वढवः— मेहेकर तालुक्यांत एक खेडें. लक्ष्मणराव नाईक यांची गादी आहे. हल्लीं लोणारचे देशपांडे यांच्या ताब्यांत आहे.

वाशीमः— जुनें नांव **वत्सगुल्म**, प्राकृत ग्रंथांत **वत्सोम**· **वच्छोम** असें रूपांतर सांपडतें. वत्सगुल्म अख्यान म्हणून वर्णनात्मक पोथी आहे. पूर्वीं येथें दंडकारण्य असतां **वत्स** नांवाचा ऋषि तपश्चर्या करीत होता. महादेव व इतर देवतांनीं त्यास दर्शन दिलें तें महादेवाचें जुनें देऊळ तेथें आहे. इतर देवता गुल्म अथवा समुच्चयत्वानें तेथें राहिल्या. अनेक तीर्थें, पद्म तीर्थ,दरिद्रहरण तीर्थ, चंद्रेश्वर तीर्थ वगैरे तीर्थें आहेत. वासुकी नांवाच्या राजानें पद्म तर्थींत स्नान केल्यानें त्याचा रोग गेला. त्या राजाच्या नांवावरून वाशीम नांव पडलें अशी एक दंतकथा आहे.

[illegible] वाशीमचें हल्लींचें महत्त्वाचें ठिकाण तेथील **श्री बालाजीचें देऊळ** [illegible]. वऱ्हाडचे दक्षिण भागीं घाटावर तीन मोठमोठीं बालाजीचीं संस्थानें आहेत. वाशीम,मेहकर व देऊळगांव राजा. पैकीं देऊळगांव राजाचें संस्थान अलीकडचें आहे. मेहकर व वाशीमच्या मूर्ति फार जुन्या आहेत. दोन्हीही औरंगजेबाच्या दक्षिणेच्या स्वारीच्या वेळीं अगर त्यापूर्वीं मुसलमान फोडतील म्हणून जमीनींत पुरलेल्या होत्या व जुनीं देवळें नामशेष झालीं होतीं. मेहकरची मूर्ति १८८८ मध्यें सांपडली व वाशीमची १७६० मध्यें सांपडली. त्या वेळीं तेथें **हाशमत जंग** नांवांचा हैद्राबादेचा मुसलमान अधिकारी होता. तो निजामाचा नातलग होता. भोंसल्याचा दिवाण [illegible] **भवानराव काळू** हा त्याच भागांतील मूळचा राहाणारा असून मंगरूळ तालुक्यांत **धामनी** वगैरे त्याचीं पांडेपणाचीं गांवें होतीं. तो प्रासि-

द्वीस येऊन नागपूरच्या दरबारांत वाढला होता, व या वेळीं कारंज्याच्या लष्करी ठाण्यावर अंमलदार होता. तो शूर व मुत्सद्दी असल्यामुळें व वाशीमपर्यंत भाग त्याचे देखरेखालीं असल्यामुळें त्याचे वजनामुळें व हाशमतखानाचे चांगुलपणामुळें हाशमतखानानें ती मूर्ति हिंदू लोकांस दिली. भवानरावानें तेथें मोठें देऊळ बांधलें व देवतलाव नांवाचा तलाव बांधून दिला. त्याचें काम बारा वर्षे चालूं होतें. त्याच्याच वजनानें या देवस्थानास दाहा बारा हजार रुपयांच्या जहागीरी मिळाल्या. हल्लीं देवस्थान काळु घराण्याच्या ताब्यांत असून ते फक्त नोकरीपुरती नेमणूक घेऊन सर्व पैसा देवस्थानावर खर्च करतात.

वाशीमचे अक्षांश सर्व वऱ्हाडांत प्रमाणभूत धरून वऱ्हाडांतील ज्योतिषी पंचांग करतात.

विदर्भा नदीः— (वणी तालुक्यांत) भाग २रा " ज्ञानराज" पहा.

विश्वगंगा नदीः— मलकापूर तालुक्यांत.

शहापूरः— बाळापुराजवळ. शहाजहानाचा मुलगा मुराद् हा बाळापुरास सुभेदार होऊन आला असतां त्यानें हें वसविलें व आपण येथेंच राहूं लागला. अत्यंत मद्यपानानें तो येथें मरण पावला. हल्लीं गांव अगदीं लहान असून पडक्या महालांच्या खुणा आहेत.

शीरपूरः—येथें जैनांचीं दोन प्रसिद्ध जुनीं देवळें आहेत. मुक्तागि[illegible] प्रमाणें हेंही जैनांचे गतवैभवाचें स्मारक आहे. अंतरिक्ष पार्श्वनाथा[illegible] मूर्ति आहे. सदरहू मूर्ति अशा रितीनें बसविली आहे कीं अंतरिक्षांतच आहे, जमीनीचा स्पर्श नाहीं असें मानण्यांत येतें म्हणून अंतरिक्ष असें नांव. राजा ईल यानें सदरहु मूर्ति वेरुळाहून आणली व तो एलीचपुरास नेत होता. देवाचे आज्ञेविरुद्ध राजानें मागें पाहिलें म्हणून रस्त्यांत शीरपूर येथें राहिली. राजानें तेथेंच देऊळ बांधलें. हल्लीं दिगंबरी व श्वेतांबरी जैनांत मूर्तिबद्दल तंटा आहे.

शिंदखेडः—मूळनांव सिद्धखेटक अथवा सिद्धक्षेत्र (शिंदीचे झाडावरून हें नांव पडलें असावें ). लखुजी जाधवराव याचे वंशजांचें मूळ ठिकाण. जाधवरावांच्या इतर गांवांप्रमाणें यासही शिंदखेडराजा

असें म्हणतात. सिंधू नांवाच्या राजानें मूळ वसाविलें असें जाधवरावांच्या बखरींत लिहिलें आहे. जाधवरावांचें वंशवृत्त भाग १५ पहा.

सर्व इमारती जाधवरावांच्या संबंधाच्या आहेत.

मुख्य खालीलप्रमाणें:--

१ नीळकंठ महादेवाचें देऊळ व निळकंठ बारव ( जुनें )

२ जाधवरावांचे पडके महाल. त्यावर लेख आहेत. विशेषतः रंगपंचमीचा महाल.

३ कचेरीचा महाल. ज्यांत हल्लीं मराठी शाळा आहे.

४ रामेश्वराचें देऊळ.

५ लखूजी जाधवरावांचे कबरींचे घुमट व सतीचें देऊळ.

६ जाधवरावांचा तलाव, बंगला व त्यांतील पाटाची रचना.

७ जलविहाराचा लहान तलाव.

८ सजना बाईची विहीर.

९ काळा कोट.

नीलकंठेश्वराचें देऊळ जाधवरावापेक्षां बरेच जुनें आहे. त्यावरील लेख वाचला गेला नाहीं.

शिंदखेड, देऊळगांव व त्या बाजूचा कांहीं मुलुख शिंद्याच्या ताब्यांत ...स साठ वर्षे होता. व आसईच्या लढाईनंतर निजामाच्या ताब्यांत ...ा. देऊळगांवच्या बालाजीस या गांवासंबंधीं सनदा दिल्या आहेत.

इ. स. १८१८ मध्यें दुसरा बाजीराव या रस्त्यानें गेला होता व येथें कांहीं दिवस मुक्काम करून राहिला होता.

शगांवः--गजानन महाराज नांवाच्या आधुनिक सत्पुरुषाची समाधि आहे. त्यागाचें मोठें ठिकाण आहे.

शेंदूरजनः-- ( मेहकर तालुका ).

जुनें हेमाडपंती महादेवाचें देऊळ, सीतानहाणी नांवाचें जिवत पाण्याचें टाकें आहे. पूर्वीं जमीनींत बुजलें होतें, हल्लीं उकरून काढलें ...

साकेगांवः--( चिखली ) चिखलीहून तीन कोस. सातगांवच्या देवळाप्रमाणेंच महादेवाचें फार जुनें कोरींव देऊळ आहे.

सातगांव:—( चिखली ) येथें चार मोठीं कोंगीव देवळें आहेत.तीन हिंदू व एक जैनांचें असावें असा तर्क आहे. एक भंगलेली पारसनाथाची मूर्ति आहे, तिजवर शके ११७३ ( इ० १२५१ ) कोंरलेला आहे. त्या पूर्वींची हीं हिंदु देवळें असावीत. चिखली व मेहकर तालुक्यांत या घर्तीचीं पुष्कळ देवळें आहेत. व तीं सर्व एका काळचीं आहेत. चालुक्यांच्या युगांतील आहेत असा तज्ज्ञांजा तर्क आहे.

सातेफळ:—( दारव्हा ) कपिलेश्वराचें देऊळ आहे.

सालबरडी:—मोर्शी तालुक्याचे बैतुलाकडील हद्दीवर ( भाग २ सविस्तर वर्णन पहा.)

सावळापूर:—( उमरावती ) **केशवराजाची** जुनी मूर्ति मेहकर व वाशीमप्रमाणें जमिनींत पुरलेली सांपडली ( सन १८८४ ).

सोनाळें:—( जळगांव ) **सोनाजी बुवा** नांवाच्या प्रसिद्ध साधूची जागी समाधि आहे.

सोनाटी:—( मेहकर तालुक्यांत ) खंडोबाचें देऊळ, पौष महिन्यांत मोठी यात्रा भरते. एक माहिना राहते.

---

# वऱ्हाडच्या इतिहासावरील अभिप्राय.

केसरी (ता. ८।१।२४,)

वऱ्हाडचा इतिहास—अदमासें पांच शे पानांत वऱ्हाडसंबंधीं आजपर्यंत प्रसिद्ध झालेली व कांहीं अप्रकाशित माहिती संगतवार रीतीनें व चिकित्सक पद्धतीनें मांडण्याचें महत्त्वाचें काम बुलढाण्याचे यादवराव काळे यांनीं या ग्रंथांत करून दाखविलें आहे. वऱ्हाडसारख्या उदयोन्मुख प्रांताचा इतिहास वाचण्याची इच्छा पुष्कळ लोकांना होणें स्वाभाविक आहे. परंतु ती पुरवून घेण्यास काळे यांनीं १९०५ सालीं प्रसिद्ध केलेल्या एका छोट्या पुस्तकाखेरीज दुसरें चांगलेंसें साधन नव्हतें. ती उणीव या ग्रंथानें चांगल्या रीतीनें भरून निघाली आहे. अनेक ताम्रपट, शिलालेख, इंडियन अँटीकेरी, एपिग्राफिआ इंडिका व भारत इतिहाससंशोधक मंडळाचे ग्रंथ यांमधून व इतरत्र पसरलेली व विद्वानांनीं पारखून [illegible] ठरविलेली विदर्भ देशविषयक माहिती कणशः जमवून आतां [illegible] केली गेल्यामुळें अनेक पौराणिक कथानकांचा व स्थानांचा साधा-[illegible] रीतीनें पत्ता लावणें सोपें झालें आहे. विदर्भ देशाच्या प्राचीन मर्यादा कोणत्या, काव्यपद्धतींत " वैदर्भी रीति " हे शब्द कसे आले, भवभूति, बोपदेव हेमाडपंत, पाथरीचा ज्योतिषी ज्ञानराज, बीजप्रबोध टीका लिहिणारा उमरावतीचा रामकृष्ण व कारंजा, मेहेकर, वाशीम वगैरे अनेक व्यक्ति व स्थलें यांच्या संबंधीं या ग्रंथांत मार्मिक चर्चा केलेली आहे. पौराणिक स्थानांचा निर्णय करतांना स्थानिक माहितीचाहि उपयोग परिश्रमपूर्वक केलेला दिसतो. याखेरीज राजे उदाराम, [illegible] बागीण, जाधवराव घराणें, एलिचपूरचे नवाब, मेळघाटचे गोंडराजे वगैरेंचा इतिहास या ग्रंथांतून प्रथमच साधाररीतीनें बाहेर आला आहे. बहामनी व इमादशाही रियासतींची हकीकत दिल्यानंतर मोंगल,

मराठे व निजाम यांच्यामध्यें घडलेले हर्षामर्षाचे प्रसंग बरेच विस्तृत व मनोरंजक पद्धतीनें मांडले आहेत. त्यांतल्या त्यांत भोंसलेशाहीच्या अखेरीस वऱ्हाडांत माजलेली धामधूम हृदयद्रावक आहे. अगदीं चालू परिस्थिति समजून घेण्यास देखील निजामाच्या दरबारची स्थिति, रेसिडेंटाचा दाब, वऱ्हाडच्या उत्पन्नाचा तक्ता, ऐतिहासिक तहनामे वगैरे प्रकरणें मनन करून स्मरणांत ठेवण्याजोगीं आहेत. याखेरीज धार्मिक व सामाजिक परिस्थिति भाषा, वाङ्मय, प्राचीन इमारती, जमीनधाऱ्याची पद्धति वगैरे तत्प्रांतस्थ चिकित्सक व आस्थेवाईक इतिहासकारालाच ज्यांचें अंतरंग कळू शकेल अशा विषयांचा उलगडा यांत यथावकाश आला आहे. वऱ्हाड प्रांत महाराष्ट्राचा महत्त्वाचा भाग असल्यामुळें सर्व प्रांतांतील मराठी वाचकांकडून या ग्रंथाचें परिशलिन होणें आवश्यक आहे.

---

### स्वराज्य ( ता. ३।१।१९२४ )

वऱ्हाडचा इतिहास—ले. यादव माधव काळे. वऱ्हाड प्रांताचा महाराष्ट्रांशीं व निजामाच्या राज्याशीं निकट संबंध होता. परंतु अ[illegible]ं राजकीय दृष्ट्या हा प्रांत सर्वांपासून अलग करण्यांत आलेला आहे [illegible] ताटातूट कशी झाली, निजामापासून हा प्रांत इंग्रजांनीं कसा मिळवि[illegible] नागपूरचे भोंसले व निजाम यांची कारकीर्द कशी होती, बहामनी राज्यापासून मुसलमानी छाप या प्रांतावर कसा पडला, त्यापूर्वीं देवगिरी येथिल यादवांच्या, राष्ट्रकूटांच्या व चालुक्यांच्या स्वराज्यांतल्या अमदानींत या प्रांतांत कसा जोम होता वगैरे महत्वाच्या गोष्टींचा खुलासा होण्यास प्रस्तुत ग्रंथ चांगला उपयोगी पडण्याजोगा आहे. हिंदुस्थानांत [illegible]कारी व बिनसरकारी संशोधक संस्थांनीं प्रसिद्ध केलेली माहिती अनेक दुर्मिळ ग्रंथांतून आलेली असते. ती निरलसपणें व निर्विकार मनानें एकत्र ग्रंथित करण्याचें काम बरेंच कंटाळवाणें असतें. तें आपण पत्करून रा. काळे यांनीं हा मनोरंजक व वाचनीय ग्रंथ मराठी वाच-

कांना सादर केला आहे. वैदर्भी रीति, कुंदिनपुर, पयोष्णी, प्रणीता, चांडस, मातापूर वगैरे जुन्या पुराणग्रंथांत येणाऱ्या शब्दांचा व गांवांचा पत्ता लावण्यापासून रायबागीण, उदाराम, करवंडकर, देशमुख वगैरे ऐतिहासिक पुरुषांसंबंधीं नवीन माहिती प्रथमच उजेडांत आणण्यापर्यंतचें संशोधकाचें काम या ग्रंथकारांनीं लक्षपूर्वक केलें आहे. मराठ्यांच्या अमदानींत वऱ्हाड कसा सुस्थितींत होता, निजामाच्या वेळीं तेथें दंगा धोपा कसा सुरू झाला व इंग्रजी रेसिडेंटाच्या अमदानींत त्याची काय दशा झाली याचें तुलनात्मक वर्णन व परिशिष्टांत दिलेले करारनामे मराठी वाचकांनीं बारकाईनें वाचण्याजोगे आहेत. प्रत्येक जिल्ह्यांत एक दोन तरी विद्याव्यासंगी पुरुष असतात. परंतु ते आपलें काम आंखून घेत नाहींत. यामुळें त्यांच्या हातून मराठी वाङ्मयांत नवीन माहितीची भर पडत नाहीं. त्याऐवजीं रा. काळे यांच्याप्रमाणें एखाद्या विशिष्ट जिल्ह्यांतील माहिती १५।२० वर्षें सारखी जमवीत राहिल्यानें अनेक व्यवसाय संभाळून देखील नवीन सुंदर ग्रंथांची भर मराठींत कशी टाकतां येते तें या इतिहासावरून कोणाहि विद्याव्यासंगी लेखकाच्या लक्षांत येण्याजोगें आहे. हा ग्रंथ केवळ वऱ्हाडांतलिच नव्हे तर इतर प्रांतांतील वाचकांनीं देखील संग्रहीं ठेवण्याजोगा आहे.

---

### महामहोपाध्याय प्रो. सदाशिव जयराम, नागपूर यांचा अभिप्राय.

श्रीयुत रा. रा. यादव माधव काळे, बी. ए. एल् एल्. बी यांनीं लिहिलेला ‘ वऱ्हाडचा इतिहास ’ ह्या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध ऐतिहासिक ग्रंथांत उच्च स्थान मिळविण्याइतका प्रशंसनीय झाला आहे. मीं ह्या ग्रंथाचे पहिले ५।६ भाग विचारपूर्वक वाचले व पुढें यवनांच्या आक्रमणकालापासून सांप्रतिक कालापर्यंतचा इतिहासहि मधून मधून वा[illegible] या ग्रंथांत श्रीयुत काळे यांनीं खिस्ती शकाचे पूर्वीं सरासरी ४०० [illegible] पासून तों सध्यां असलेल्या आंग्लशासन कालापर्यंतचा वऱ्हाड प्र[illegible] इतिहास मोठ्या मार्मिक रीतीनें दिला आहे. मोंगल बादशाहीपा[illegible]

अलीकडचा वऱ्हाडचा इतिहास ग्याझेटियर इत्यादि ग्रंथांतून थोडाबहुत उपलब्ध असल्यामुळें व इतर उपयुक्त सामग्री सुखसाध्य असल्यामुळें संगतवार जुळवून लिहिण्यास फार परिश्रम नकोत. पण प्राचीन काळच्या सुसंबद्ध व विश्वसनीय इतिहास लिहावयास पर्याप्त सामग्रीच्या अभावामुळें ग्रंथकारास बरेच परिश्रम व विद्वत्ता खर्च करावी लागते. हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांताचा प्राचीन इतिहास लिहावयाचा असल्यास ज्ञातावरून अज्ञाताचें अनुमान करण्यापलीकडे दुसरा मार्ग नाहीं व याच मार्गाचें अवलंबन करून सदर ग्रंथकारानें उपलब्ध शिलालेख, प्राचीन व अर्वाचिन संस्कृत वाङ्मय इत्यादिकांचे साहाय्यानें हा जो वऱ्हाडचा प्राचीन इतिहास लिहिला आहे तो फार मनोरंजक व शिक्षणप्रद आहे. ह्या ग्रंथांत केवळ राजांची वंशावळी, राज्यक्रांति, लढाया व त्यांच्या तारखा ह्यांचेंच वर्णन नसून वऱ्हाडच्या प्राचीन व अर्वाचीन राजकीय, औद्योगिक व सामाजिक स्थितीचें व तसेंच भाषा, वाङ्मय इत्यादिकांचेंहि वर्णन यथोचित दिलें आहे. फार प्राचीनकाळीं विदर्भ देशाचें वैभव फारच मोठें असलें पाहिजे. म्हणूनच कविश्रेष्ठ **कालिदासानें** या देशाला " सौराज्यरम्य " असें म्हटलें आहे. ( सौराज्यरम्यानपरो विदर्भान् रघु. सर्ग. ५. ६० ). यादव, भोज वगैरे वंशातील राजे राज्य करीत असतांना विदर्भ देशाची भरभराटी, सुखसंपत्ति व समृद्धि, [illegible]च रामराजाच्या वेळेस झालेले सुप्रसिद्ध **हेमाद्रीसारखे** धर्मशास्त्रकर्ते व[illegible] कार्यकुशल पुरुषरत्न, **बोपदेवासारखे** पंडित, **अमृतराय व ज्ञानेश्वर** ह्यांच्यासारखें प्रासादिक कवि, व त्यांनीं लिहिलेले ग्रंथ, वऱ्हाडांत असलेलीं प्राचीन प्रसिद्ध स्थलें, तीर्थांच्या व देवालयांच्या जागा, बौद्धकालचीं कोरींव लेणीं इत्यादिकांची मनोरंजक माहिती ह्या ग्रंथांत दिली आहे. भाषा ऐतिहासिक ग्रंथाच्या पद्धतीस अनुसरून साधी व सरळ आहे. प्राचीन इतिहासाप्रमाणें मोंगलांचे काळापासून सांप्रतचे काळापर्यंतचा [illegible]चीन इतिहासही विश्वसनीय माहितीनें परिप्लुत आहे. सारांश, हा [illegible]र्वांगसुंदर असा आहे. अशा प्रकारची सुसंगत वऱ्हाड देशाची [illegible]ती एकत्रित केलेली आजपर्यंत उपलब्ध नव्हती. हा ग्रंथ लिहून

श्रीयुत यादवराव काळे ह्यांनीं मराठी वाङ्मयांत बहुमूल्य भर घातली याबद्दल ते विद्वान् लोकांचे प्रशंसेस पात्र आहेत. अलमति विस्तारेण.

नागपूर,
ता. ५।२।२४.

**सदाशिव जयराम.**

---

बुलढाण्याचे सुप्रसिद्ध इतिहासभक्त वकील रा. यादवराव काळे यांनीं लिहिलेला वऱ्हाडचा इतिहास हा ग्रंथ समग्र वाचणारास वऱ्हाड प्रांताविषयीं फार उपयुक्त माहिती मिळेल व हा ग्रंथ लिहून रा. काळे यांनीं सकल महाराष्ट्राभिमानी जिज्ञासु जनांवर मोठा उपकार केला आहे असेंच वाटेल. या ग्रंथाचे १५ भाग आहेत व त्यांत प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन या तिन्ही काळीं वऱ्हाड नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या वैभवसंपन्न देशाची महति यथातथ्य वर्णिली आहे. रा. काळे यांनीं ग्रंथांत जागोजाग आपल्या विधानांस आधारहि दिलेले आहेत. ग्रंथाचा उत्तरार्ध आम्हांस विशेष आवडला. वऱ्हाडांतली प्रसिद्ध घराणीं, प्रसिद्ध स्थळें यांची माहिती वाचनीय आहे. रा. काळे यांनीं वऱ्हाडी भाषेचाहि थोडा परामर्ष घेतला आहे त्यांवरून त्याची व्यापक दृष्टि कळून येते. ते नुस-
[illegible] इतिहासरचक नाहींत तर स्वतः संशोधक आहेत व त्यामुळें राजे
[illegible]दाराम, अमृतराय साकरखेडुलेकर इत्यादिकांविषयीं नवी व अप्रसिद्ध
माहिती त्यांनीं पुरविली आहे. त्याचप्रमाणें अज्ञानामुळें घडणा[illegible] केलेला आहे.
चुकाहि त्यांनीं दुरुस्त करून दिल्या आहेत. तथापि [illegible]धर, भोजराजा-
फिरविल्यामुळें त्यांच्या या प्रस्तुत ग्रंथांतच कांहीं जा[illegible] आणि यादव घरा-
आहेत. उदा० पृ. १६२।१६३।१६४ वर म्हाळसा[illegible] व जैत्रपाळ यांच्या-
मुद्रणाच्या चुका तर आमच्या मराठी ग्रंथांत ह[illegible]ाचीन काळची कीर्ति
त्याला हा ग्रंथ तरी अपवाद कसा होईल ! [illegible]ईत विजयानगरचें [illegible]
इ. स. १६२७ चाच काळे यांनीं मान्य केला[illegible] दक्षिणदेशाची द्वार[illegible]
द्यावयास पाहिजे. गंगू बहामनीच्या संबंधांत[illegible] पादशहात व तिचें इ[illegible]
रसपंत देशपांडे याची रा. राजवाडे यांनीं भा[illegible]

मार्फत प्रसिद्ध केलेली माहिती जमेस धरलेली दिसत नाहीं. रा. काळे यांनीं आपल्या ग्रंथास एक शकावलि जोडावी. सूची तर ते अखेर देतीलच परंतु एकंदर विदर्भेतिहासविषयक लहानमोठ्या आधारग्रंथांचेंहि स्वतंत्र वर्णन व विवेचन त्यांनीं पुढील आवृत्तींत निराळें जोडावें. कारण हा विदर्भाचा रा. काळेकृत इतिहास आज ४६६ पृष्ठें भरला आहे तरी तो त्यांस सारांश रूपानेंच वर्णावा लागला आहे. पौराणिक आणि पूर्व पौराणिक काळापासून तों आजतागायतचा इतिहास सर्वांगपरिपूर्ण लिहिण्याचा रा. काळे यांनीं उद्योग केला तर हल्लींच्या दुप्पट तिप्पट ग्रंथ होईल, आणि आपल्या देशाचें वैभव वर्णण्यास एवढाहि वाग्विलास अपूर्ण आहे असें वाटण्याइतकी पितृभक्ति जेव्हां विदर्भांत उदित होईल त्यावेळीं घराण्याघराण्यांचे इतिहास, गांवागांवांचे इतिहास, पंथापंथांचे इतिहास असे शेंकडो तयार होतील आणि त्या सर्वांचा साररूपानें व समष्टि दृष्टीनें परामर्ष घेऊन विदर्भाचा मनोहर, स्फूर्तिदायक व प्रौढ इतिहास सिद्ध करण्याचें श्रेय रा. काळे यांच्या गादीवर बसणारा कोणी प्रतिभासंपन्न लेखक लिहून लोकांस रिझवील. तो मार्ग लोकांस दाखवून स्फूर्ति उत्पन्न करावी असा प्रयत्न होईल तेवढा आज आपणास केला पाहिजे. रा. काळेयांनीं विद्वत्तेनें, परिश्रमानें व शोधानें तयार केलेल्या ह्या ग्रंथानें आम्हां मराठ्यांच्या ज्ञानभांडारांत चांगली भर पडली याजबद्दल आम्ही रा. काळे यांचे फार ऋणी आहों हें त्यांस कळवून आम्ही त्यांची रजा घेतों.

रा. काळे यांचा हा ग्रंथ केवळ वऱ्हाडांतच वाचावा असें नव्हे ... हाराष्ट्रांत पडला गेला पाहिजे, कारण विद्यमान विदर्भ हा ह्यांच्यासार... त्र अंश आहे व ही मराठी ऐक्यबुद्धि आमच्या भावी ... लेलीं प्राचीन प्र... आहे.

... १८४५ } दत्तो वामन पोतदार.
... लेज.

---

कोरींव लेणीं इत्...
भाषा ऐतिहासिक
प्राचीन इतिहासाप्रमा...
...चीन इतिहासही वि...
अनेक दृ... सर्वांगसुंदर असा आ...
मनानें ए... ...ती एकत्रित केलेली
पत्करू...

रा. अच्युत सिताराम साठे एम् ए. एल बी. एम्. आर. ए. एस्. अडिशनल डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज जबलपूर व नागपूर विश्वविद्यालयाच्या अक्याडेमिक् कौन्सिलचे सभासद यांचा अभिप्राय.

श्री. रा. रा. यादवराव काळे हायकोर्ट वकील बुलडाणें यांनीं वऱ्हाड प्रांताचा पांचशें पानांचा इतिहास लिहिला त्याची पूर्वप्रत त्यांनीं माझ्या अवलोकनार्थ पाठविली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. मोंगल व मराठा कारकीर्दींत जो वऱ्हाडचा विस्तार होता तो कमी होत होत हल्लीं एका लहानग्या टापूला वऱ्हाड म्हणतात, परंतु रा. काळे यांनीं आपल्याकडून एकंदर वऱ्हाडचा इतिहास आपल्या संशोधनक्षेत्रांत आणल्यामुळें प्रस्तुतच्या ग्रंथाला फारच महत्त्व आलेलें आहे. प्राचीन काळीं हा देश अति नामांकित असून विद्याकलादिकांचें माहेरघर होता. जगज्जननी जगदंबावतार श्री रुक्मिणीचें माहेर म्हणून पौराणिक युगांत हा प्रसिद्ध होताच, परंतु महाराष्ट्रमातुश्री रत्नगर्भा महाराणी जिजाबाई साहेबांचे माहेरघर या नात्यानें हल्लीं देखील हा प्रांत सर्व हिंदुस्थानाला पूज्य आहे. जिजाबाईसाहेबांचें माहेर राजे जाधवरावांची राजधानी शिंदखेड याच्या जवळच रा. काळे यांचा जन्म झाला आणि आयुष्ययात्रा बहुतेक पार पडली यामुळें वऱ्हाडच्या अखबरनवीशी वतनाला त्यांचा जन्मतःच हक्क पोंचतो; व या हक्काच्या संपादणीसाठीं त्यांनीं जुन्या लेखांचें आणि अधुनिक इतिहासाचें जें दांडगें अध्ययन केलें आहे त्याची साक्ष त्यांचा प्रस्तुतचा ग्रंथ प्रतिपृष्ठीं दाखवितो. इंग्रजी इतिहास, मुसलमानांच्या तवारिखा, जुने शिलालेख, संस्कृतांतील गद्यपद्यात्मक लेख या सर्वांतील माहितीचा रा. काळे यांनीं जागोजाग उल्लेख व उपयोग केलेला आहे. भवभूति इत्यादि कवि, हेमाद्रि पंडितासारखे राज्यधुरंधर, भोजराजासारिखा राजकुलीन विद्वान्, जाधवरावांचें शिंदखेड आणि यादव घराण्याची देवगिरी यांसारखीं राजभवनें, मुकुंदराज व जैत्रपाळ यांच्यासारखी गुरुशिष्याची जोडी यामुळें या प्रदेशाची प्राचीन काळची कीर्ति फारच उज्वल राहिली. तालिकोट येथील लढाईत विजयानगरचें [illegible] साम्राज्य नष्ट झालें, तोंपावेतों येथील लोकांनीं दक्षिणदेशाची द्वारप[illegible]गिरी फार मर्दुमकीनें बजावली. पुढें बहामनी पादशहात व तिचें [illegible]

पंचक यांच्या आमदानींत हा प्रांत ग्रहणग्रस्त झाला होता, परंतु जाधव घराण्याचा अरुणकाल आणि छत्रपति मार्तंडाचा माध्यान्हकाल यांनीं या मुलुखाचें नैसर्गिक तेज पुन्हां दुणावलें. नागपूरकर भोंसले आणि महाराष्ट्रपंथाचे पुनरर्जीवन करणारें पंतप्रधान घराणें आणि त्यांचे अनुरोधक साधुसंतपंडित यांनीं या प्रांताची रावकळा चढती बढतीच्या पदवीला पोंचवली. त्यानंतर पुन्हां एकदां "जिकडे तिकडे कली मातला, धर्म पाहतां पाहतां बुडाला, कठिण काळ पुढें ओढवला वाणी-तेली दाली बांधूं लागले, राज्य नेलें म्लेंच्छ क्षेत्रीं, गुरुत्व नेलें कुपात्रीं" ही स्थिति दिसूं लागली. दावलमलकाची आणि पिरांची भक्ति वाढली, उपासनेचा गजर रोडावला, उदंड पाखंड बळावलें, पुन्हां दुसरा चमत्कार होऊन वाघ शेळ्या एकत्र पाणी पितानां दिसूं लागलीं, खांड्याच्या कोयत्या झाल्या, नवी सृष्टि दिसावयाला लागली. हीं सर्व स्थित्यंतरें रा. काळे यांनीं आपल्या प्रेमळ वाणीनें फार स्पष्ट रीतीनें दाखविलीं आहेत. जागोजागच्या टीपांवरून दिसतें कीं, रा. काळे यांच्याजवळ अद्याप पुष्कळसें अप्रकाशित इतिहाससाहित्य आहे. याशिवाय बरेंचसें नागपुरला सांपडेल. काळे यांनीं इतिहास प्रदीप प्रज्वालित केलेला आहे, त्याची जागती ज्योत कायम राखणें लोकांचें काम आहे. नागपूर वऱ्हाडच्या सधन लोकांनीं नवीन स्थापित झालेल्या वाङ्मय संस्थांच्या द्वारें हीं साधनें प्रकाशित करून पूर्वजांच्या पितृऋणांतून मोकळें व्हावें. क्यापटन् हेगसारखे परकी लोक ज्या इतिहासाचा अभिमान बाळगतात त्याबद्दल स्वदेशीयांनीं हेळसांड करणें हें लांछनास्पद आहे. देऊळ बांधील राज्याला अपरंपार पुण्य लागतें, तर रोज तें झाडून साफ ठेवील तोही येथींण्याचा अंशभाक् होतोच. राष्ट्राचा यशोदुंदुभि पुन्हा वाजावयाला नींलागला आहे. त्याला प्रतिहुंकार न देणाऱ्यांची खचितच अभाग्यांत होण्यणना होईल. समाजानें रा. काळे यांच्या प्रयत्नांचें चीज करावें आणि त्यांना द्विगुणीत श्रम पुन्हां करण्याबद्दल वारंवार प्रोत्साहन द्यावें एवढी आमची सविनय प्रार्थना आहे.

अच्युत सिताराम साठे.

---

रा. काळे यांनीं लिहिलेला वऱ्हाडचा इतिहास हा ग्रंथ मी वाचला. यांत अत्यंत महत्त्वाची माहिती प्राचीन काळापासून आजपर्यंतची भरपूर दिली असून ती सर्व साधार आणि विचिकित्सक दृष्टीनें सर्व सध्या उपलब्ध असलेल्या साधनांचा विचार करून दिली आहे. ती वाचकांस मनोरंजक आणि ज्ञान देणारी अशी झाल्यावांचून राहणार नाहीं. काळे हे वऱ्हाडचे स्वतः माहितगार असल्यानें वऱ्हाडांतील गांवें व शहरें त्यांच्या जास्ती परिचयाचीं आहेत यामुळें बाहेर प्रांतांतील लिहिणाऱ्यांच्या लेखांपेक्षां यांचा इतिहास जास्त विश्वसनीय व वस्तुस्थितीस धरून आहे हें सांगणें नको. वऱ्हाडांतील मुख्य मुख्य घराण्यांचीहि सविस्तर माहिती त्यांनीं दिलेली इतिहासाला फार महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणें निजामशाहीची १८२३ पासून १८५३ ची हकीकत व १९०२ पर्यंत नंतरची इंग्रजी अमलांतील माहिती दिलेली पुष्कळांस अज्ञात असून हल्लींच्या वऱ्हाड परत देण्याच्या प्रश्नावर चांगलाच प्रकाश पाडणारी आहे. स्थल वर्णनात्मक सूची इत्यादि प्रकरणांवरून या ग्रंथांतील माहिती किती सूक्ष्म व तपशीलवार आहे. हें वाचकांच्या लक्षांत येईल. सारांश हा इतिहास वऱ्हांडातील राहणारास किंबहुना सर्व हिंदुस्थानाच्या इतिहासकारांस फारच माहितीचा असल्यानें अवश्य संग्रहणीय आहे.

पुस्तकांत दिलेल्या माहितीसंबंधानें कांहींच आक्षेप घेतां येणें शक्य नाहीं. कांहीं मतें कदाचित् आक्षेपार्ह वाटतील पण अशीं स्थळें मला तरी फारच थोडीं आढळलीं. वऱ्हाड शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधानें वरदा तट याच शब्दापासून व्युत्पत्ती देणें पुरें असें मला वाटतें. हा शब्द पूर्व ग्रंथकारांनीं वापरलेलाहि आहे आणि प्राकृत भाषेच्या नियमानुसार वरआ-अट—वराट—वऱ्हाड असें रूप होणें साहजिक आहे. मध्ययुगाचा इतिहास देतांना पूर्व चालुक्यांचा उल्लेख ग्रंथकारानें केला नाहीं याचें आश्च वाटतें. कारण पुलकेशी पहिला याच्या वेळच्या एका लेखांत त्यास मह राष्ट्रकाणां त्रयाणां अधिपति असें म्हटलें आहे आणि तीन महाराष्ट्र म्ह वऱ्हाड, मध्यमहाराष्ट्र, आणि कुंतल—कृष्णा तुंगभद्रा यांतील होत. त्याचप्रमाणें ईल राजाची व शहाडका रहिमान गाजीची द या काळाच्या शेवटीं राष्ट्रकूटानंतर देणें युक्त होतें. महाराष्ट्र व

किंवा विदर्भ यांचा प्राचीनकाळीं एकीभाव होता हें ग्रंथकारानें बरोबर म्हटल आहे. शंकराचार्यांच्या वेळींसुद्धां विदर्भ कृष्णेपर्यंत मानला जात असे हें शांकरदिग्विजयावरून दिसतें इतकेंच नव्हे तर फेरिस्तानें लिहिलें आहे कीं, बिदर ( याचा उच्चार पुष्कळ लोक बेदर करितात पण तो बिदर असा जाग्यावर आहे. ) शब्द विदर्भावरून निघाला आहे आणि नलदमयन्तीची पौराणिक कथा त्यानें याच बिदराविषयीं सांगितली आहे. असो, याजबद्दल ग्रंथकार पुढील आवृत्तीच्या वेळीं विचार करतील.

२५५३

चिं. वि वैद्य.

---

रा. रा. यादवराव काळे यांनीं वऱ्हाडच्या इतिहासाचें पुस्तक नुकतेंच छापून झालेलें वाचून अभिप्राय देण्यासाठीं मजकडे पाठविलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. एखाद्या विशिष्ट प्रांतासंबंधानें निरनिराळ्या ठिकाणची व प्रकारची पुष्कळशी उपलब्ध माहिती एकत्र करण्याचा हा उपक्रम फारच उपयुक्त आहे. ऐतिहासिक घराण्यांचे इतिहास जसे मुख्य इतिहासाचे आधार होत, तसेच प्रांतिक इतिहासही राष्ट्रीय इतिहासाचे आधार होऊं शकतात, हें ध्यानांत ठेविलें असतां वऱ्हाडच्या या पुस्तकाची महति मला फार मोठी वाटते.

रा. काळे यांचा हा उद्योग त्यांचे विद्वत्तेस शोभेल असाच झाला आहे, हें लिहिण्यास संतोष वाटतो. अगदीं प्राचीन काळापासून तों स्तुत क्षणापर्यंतची वऱ्हाड प्रांताची नानाविध मनोरंजक माहिती मोठ्या प्रयानें व विवेचक बुद्धीच्या तारतम्यानें संग्रहीत करून ती सर्व त्यांनीं या स्कांत वाचकांस सादर केली आहे. खरें म्हटलें तर या पुस्तकास पहास म्हणण्यापेक्षां सारसंग्रह किंवा गॅझेटियर अशासारखें नांव जास्त ल. कारण यांत, भाषा, कवि, जमीन धाऱ्याची पद्धत, प्राचीन इमाअने ोक व त्यांच्या चालीरीती, अशा अनेक बाबतींचे जरूर ते तपमना ांत आणिले आहेत. वऱ्हाडची भूगोलिक रचना हा भाग प्रथमच पत्क त्यामुळें पुढील स्थितीवर काय परिणाम घडले ते मार्मिक रीतीनें

दाखविलें आहे. अर्थात् कोणत्याही इतिहासाचें सांगोपांग अध्ययन करणें झाल्यास त्याच्या कोणकोणत्या अंगांचा विचार त्यांत ओघानें येतो हें समजून घेण्यास वऱ्हाडचें हें पुस्तक विशेष नमुनेदार झालें आहे, आणि अभ्यासकांस त्याचा मोठा उपयोग होईल यांत संशय नाहीं. भाषाही गोड व सुबोध असून पुस्तक गोष्टीसारखें मनोरंजक वाटतें.

निजामाचा वंश, सिंदखेडकर जाधव, नागपुरकर भोंसले, उदाराम वगैरे अनेक ऐतिहासिक घराण्यांचें भरपूर वृत्तांन्त यापूर्वी ठिकठिकाणीं विखुरलेले व अप्रसिद्ध होते. ते सर्व या पुस्तकांत एकत्र आल्यानें मराठ्यांच्या इतिहासांत त्यांची भर चांगली पडेल. कित्येक बाबती पुनः पुनः या पुस्तकांत निरनिराळ्या ठिकाणीं आल्या आहेत. त्यांची योग्य गोठवण आरंभींच करावयास पाहिजे होती. परंतु छापखान्याच्या वगैरे अनेक अडचणी हल्लींच्या लेखकांस कशा जाचतात हें ज्यास अवगत आहे त्यास अशा कित्येक क्षुल्लक पुनरुक्तींबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. रा. काळे यांच्या हातून आणखीही या विषयाचा परिपोष होऊन आपल्या राष्ट्रीय इतिहासांत कायमची स्मरणीय कामगिरी घडून येईल अशी आशा आहे.

बडोदें ता. ९।१।१९२४. गो. स. सरदेसाई.

---

रा. यादव माधव काळे यांचा "वऱ्हाडचा इतिहास" हा ग्रंथ मीं लक्ष्यपूर्वक वाचिला. या ग्रंथांत कर्त्यानें पौराणिक काळापासून इंग्रजी अमलापर्यंत वऱ्हाडांत घडून आलेल्या राजकीय घडामोडी व सामाजिक स्थित्यंतरें आणि त्यांत निर्माण झालेले बुद्धिमान् व कर्तृत्ववान् पुरुष यांजबद्दल उपलब्ध असलेली सर्व माहिती परिश्रमपूर्वक छाननी करून बऱ्याच व्यवस्थितपणें दिली आहे. कर्त्यास वऱ्हाडच्या प्रत्यक्ष व मार्मिक परिचयामुळें त्या प्रांताबद्दल जी सूक्ष्म माहिती आहे तिचा त्यांनीं प्रचलित भाषा, समाजस्थिति व ऐतिहासिक स्थळें वर्णितांना पूर्ण उपयोग क[illegible]तला आहे. हा ग्रंथ लिहितांना त्यांनीं प्राचीनाबद्दलचा आदर व चिकित्सक बुद्धि यांचा समतोलपणा कायम ठेविला आहे. वऱ्हाडचा संपूर्ण

इतिहास आजपर्यंत झाला नव्हता. ती उणीव या ग्रंथानें पूर्णपणें भरून निघेल. किंबहुना इतर प्रांतांच्या इतिहासलेखकांस हा ग्रंथ मार्गदर्शक होण्याच्या योग्यतेचा आहे. नकाशांच्या जोडीस बहामनी, इमादशाही व निजामशाही घराण्यांतील राजांच्या व हैदराबादच्या निजामाच्या वंशावळी त्यांच्या कारकीर्दींच्या सनांसह दिल्या असत्या तर संदर्भ समजण्याचे कामीं त्यांचा उपयोग होऊन ग्रंथाची उपयुक्तता वाढली असती. या ग्रंथांत क्वचित् भाषाशुद्धीच्या व भाषासौष्टवाच्या दृष्टीनें दोष राहिले. आहेत पण या बखरवजा ग्रंथांत ते पूर्णपणें लोपून किंबहुना शोभूनच जाण्यासारखे आहेत. सारांश, हा ग्रंथ प्रत्येक इतिहासभक्तास संग्राह्य वाटेल अशी खात्री आहे.

जळगांव, वऱ्हाड.
ता. १७-२-२४.

श्री. कृ. कोल्हटकर.

REFBK-0002553
REFBK-0002553